म. ग्रं. सं. ठाणें.
विषय चरित्र
सं. क्र. १५६

# अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक

७

ग्रंथकर्ता

देवराव खानोलकर.

REFBK-0004383

पुष्प
१०१ वें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८४८०
मराठी ग्रंथ संग्रहालय
ता.
प. ९२६

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प १०१ वें.

# अर्वाचीन
# मराठी वाङ्मयसेवक.

[ प्रथम खण्ड ]



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

REFBK-0004383

गंगाधर देवराव खानोलकर.

किंमत कापडी रु. २-४-०

प्रकाशक
एम्. एन्. कुळकर्णी,
मालक,
भारत-गौरव-ग्रंथमाला,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

या पुस्तकाचें पुनर्मुद्रण किंवा भाषांतर यांसंबंधींचे
व इतर सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें
आपणाकडे राखून ठेविले आहेत.

मुद्रक
एम्. एन्. कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

ती. वामन पांडुरंग खानोलकर,

बी. ए., बी. टी., टी. डी. (लंडन)

यांस,

दादा,

गतायुष्यांत अनेक वादळें उठून, मनःक्षोभामुळें जीवित-नौका कुणीकडल्या कुणीकडेच वाहत जाण्याचा प्रसंग आला असतां, तुम्हीं भारवीच्या 'सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम्। वृणुते हि विमृश्यकारिणम् गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥' या सोन्याच्या मोलाच्या उपदेशाची आठवण देऊन, अनेकदां मला कार्यप्रवृत्त केलें आहे, मनाचा तोल सुटत असतां मला सांवरलें आहे.

तुम्हीं मजवर करीत असलेल्या निरपेक्ष प्रेमाला तर सीमाच नाहीं.

आणि म्हणूनच आज अत्यंत कृतज्ञतापूर्वक मी हा ग्रंथ तुमच्या चरणीं अर्पण करीत आहें.

मुंबई,
भाद्रपद शु. ४, शके १८५३

तुमचा,
गंगाधर

# पहिलें पान उलटण्यापूर्वी—

तीन वर्षांपूर्वी मनाशीं ठरविलेलें काम आज अंशतः पुरें होत आहे. प्रारंभीं आंखणी केली होती त्याप्रमाणें लेखन होतें तर हें काम यापूर्वीच पुरें होऊन लोकांसमोर येतें. पण तसें होऊं शकलें नाहीं.

ग्रंथरचना पायाशुद्ध व्हावी, निर्दोष व्हावी यासाठीं एकट्या माणसाला जितके कष्ट करतां येणें शक्य होतें तितके केले. तरीहि क्वचित् दोष राहणें शक्य व अपरिहार्यहि आहे. अशा तऱ्हेचें काम करावयाला जशीं व जितकीं साधनें हवींत तशीं व तितकीं तीं नाहींत. आणि जीं थोडींबहुत आहेत तीं एकत्र करून, संगतवार रचून व शास्त्रीयतेच्या चाळणींतून चाळून त्यांची निवड करावयास कितीतरी वेळ खर्ची पडतो.

ब्रिटिश अंमल सुरू झाल्यापासून मराठी वाङ्मयाची ज्यांनीं संस्मरणीय अशी सेवा केली, अशा वाङ्मयसेवकांची व त्यांच्या वाङ्मयाची यांत पद्धतशीर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

हा ग्रंथ दोन खण्डांत विभागला असून, एकंदर १७५ चरित्रें त्यांत दिलीं आहेत. संदर्भाचे सोईसाठीं चरित्रें कालानुक्रमें न देतां अकारविल्हानें दिलीं आहेत. प्रत्येक चरित्राचे शेवटीं ग्रंथसूची व ग्रंथकार व त्याचे ग्रंथ यांवर प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयाची स्थलकालनिर्देशासह सूची दिली आहे. वाङ्मयाभ्यासक व संशोधक यांस ती उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

या व पुढील द्वितीय खण्डांत फक्त दिवंगत वाङ्मयसेवकांचींच चरित्रें दिलीं आहेत. विद्यमान वाङ्मयसेवकांसंबंधींची माहिती '**विसाव्या शतकांतील मराठी वाङ्मय**' या माझ्या तयार होत असलेल्या स्वतंत्र पुस्तकांत यावयाची आहे.

प्रस्तुत खण्डांतील कांहीं वाङ्मयसेवकांसंबंधींचे लेख त्यांचा विशेष अभ्यास केलेल्या, माझ्या स्नेह्यांकडून लिहून घेतले आहेत. हे लेख व त्यांचे लेखक खालीलप्रमाणें:—

| | |
|---|---|
| केशवसुत;<br>दत्तात्रय कोंडो घाटे | प्रो. माधवराव त्रिं. पटवर्धन, एम् ए. |

| | |
|---|---|
| गोपाळ गणेश आगरकर; अच्युत बळवंत कोल्हटकर | विठ्ठल हरि कुळकर्णी, एम्. ए |
| अण्णा किर्लोस्कर; राम गणेश गडकरी | विष्णु सखाराम खांडेकर. |

विष्णू शास्त्री चिपळूणकर...वासुदेव दामोदर गोखले, एम्. ए.
रे. नारायण वामन टिळक...रामचंद्र महादेव मराठे, एम्. ए., एल् एल्बी.

माझ्या या पांचहि स्नेह्यांनीं आपले नित्याचे व्यवसाय कांहीं काळ एका बाजूस ठेवून, वरीलप्रमाणें जें आपलेपणाच्या भावनेनें लेखनसाहाय्य केलें आहे, त्याबद्दल मी त्यांचे किती व कसे आभार मानूं!

या खंडांत वाङ्मयसेवकांचीं जी छायाचित्रें दिलीं आहेत, त्यांपैकीं बऱ्याच चित्रांचे ब्लॉक्स् पुणें येथील गणेश महादेव कंपनीचे मालक श्रीयुत ग. म. वीरकर यांचे आहेत. त्यांनीं केलेल्या या सहाय्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

अखेर, ज्यानीं मालेंतून नेहमीं प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांहून अगदींच वेगळ्या स्वरूपाचें असें हें पुस्तक स्वीकारून थोडेंसें धाडसच केलें आहे त्या प्रकाशकांचे, श्री. मंगेशराव कुळकर्णी यांचे, आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. महाराष्ट्र त्यांच्या या धाडसाचें चीज करो. व्यक्तिशः मला कुणाकडे कांहींच मागावयाचें नाहीं. अशा तऱ्हेचें काम करावें अशी फारां दिवसांची इच्छा. ती अंशतः पूर्ण होत आहे यांतच मला समाधान आहे.

मुंबई,
गणेशचतुर्थी, शके १८५३

सर्वांचा नम्र,
**गं. दे. खानोलकर**

७८
१८३१

४८०
चरित्र २१४
२३।१९

# अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक

अनंततनय—[इ० स० १८७९—१९२९] कवि. यांचें पूर्ण नांव दत्तात्रय अनंत आपटे. जन्म बुलाढाणें जिल्ह्यांत वडनेर भोलजी या गांवीं झाला. प्राथमिक शिक्षण वऱ्हाडांत व इंग्रजी स्कूलफायनलपर्यंतचें पुणें येथें भावे स्कुलमध्यें झालें. यांची स्फुट कविता बरीच असून, ती दोन खंडांत 'हृदयतरंग' (१९१६) या नांवानें प्रसिद्ध झालेली आहे. यांनीं पुढील काव्यें लिहिलेलीं आहेतः—१ महाराष्ट्रगीत, २ बालगीता, ३ झोंपाळ्यावरची गीता, ४ श्रीशारदादूतिका १९१४, ५ अंतर्विद्ध कलिका, ६ श्री स्वामीचंडीराम चरित्र, ७ श्रीभक्तिकल्पलता, ८ महाराष्ट्रशृंगारतिलक, ९ पुण्याची पर्वती, १० बंधविमोचन, ११ वरविडंबन, १२ स्वर्गाचे द्वारांत, १३ श्रीमन्माधव काव्य, १४ तिलकविजय. यांखेरीज यांनीं सार्थ व सटीप ऋतुसंहार, भामिनीविलासाचें गद्य भाषांतर, कविचरित्र, सनातनधर्माचें स्वरूप वगैरे गद्यहि लिहिलें आहे.

'अनंततनयांची बरीच कविता काव्यविषय काव्यमय पद्धतीनें कसा मांडतां येईल याचा विचार न करतां केवळ घाईनें लिहून हातावेगळी केलेली दिसते. अन्य भाषेंतील कवितांचीं मराठी भाषांतरें अगर रूपांतरें करण्याची कला त्यांना चांगली साधली होती, आणि त्यांनीं केलेलीं भाषांतरें व रूपांतरें हींच त्यांच्या स्वतंत्र कवितेपेक्षां अधिक लोकप्रिय झालेलीं आहेत. त्यांच्या एकंदर कवितेवर नव्यापेक्षां जुन्या वळणाच्या कवींची छाप अधिक पडलेली दिसते.' (माधव, मासिक मनोरंजन, पु. ३५)

क्र. ... ०३४३

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

(१) चरित्रलेख, 'माधव', मासिक मनोरंजन, पु. ३५.

(२) अंतर्विद्धकलिका-परीक्षण, गं. गो. कानिटकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४७, अंक १०.

( ३ ) श्रीशारदादूतिका; परीक्षण, 'शारदादूत', विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४४, अंक १२.
( ४ ) हृदयतरंग-परीक्षण, ना. म. भिडे, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४४, अंक १२.

**आगरकर गोपाळ गणेश**—[ १८५६–१८९५ ] निबंधकार व सामाजिक सुधारणेचे आधुनिक कालांतील पहिले पुरस्कर्ते. जन्म सातारा जिल्ह्यांतील टेंभू या गांवीं झाला. या गांवापासून तीन मैलांवर असलेलें दुसरें मोठें गांव कऱ्हाड हें गोपाळरावांचें आजोळ होय. टेंभू व कऱ्हाड या दोन गांवांमधून कृष्णानदी वहाते. गोपाळरावांच्या पूर्वजांचें मूळ ठिकाण कोंकणांत आगरी या नांवाचें गांव असल्यामुळें त्यांच्या घराण्यास आगरकर हें नांव पडलें. गोपाळरावांचे पणजे कोंकणांतून देशावर येऊन टेंभू या गांवीं स्थायिक झाले असावे. बच्चाजीपंत हे गोपाळरावांचे पणजे, विष्णुपंत हे आजोबा व गणेशपंत ऊर्फ गणूआप्पा हे त्यांचे वडील होत. आगरकरांचें घराणें हें मूळचें सधन. पण गोपाळरावांच्या वडिलांच्या हयातींतच लक्ष्मीनें त्यांच्या घरांतून पोबारा केला. गोपाळरावांची आई सरस्वती ही एक बऱ्यापैकीं कवियित्री असल्यामुळें केवळ नांवाचीच सरस्वती नव्हती. त्यामुळेंच लक्ष्मीला तिचें साहचर्य मानवलें नसावें असें वाटतें ! सारांश—घराण्याच्या पडत्या काळांत गोपाळरावांचा जन्म झाल्यामुळें लक्ष्मीचा उपभोग तर दूरच; पण घरांतून निघून जातांना उमटलेल्या तिच्या पावलांचेंही दर्शन त्यांना घडलें नाहीं ! श्रीमंतीचें वैभव भोगण्याचें गोपाळरावांच्या नशिबींच नव्हतें असें म्हणावें लागतें. कारण पुढील आयुष्यांत ज्या ज्या वेळीं लक्ष्मीनें त्यांच्या पायांशीं लोळण घातली त्या प्रत्येक प्रसंगीं गोपाळरावांनीं तिला स्वतः पायांनीं दूर केलें ! एम्. ए. झाल्यानंतर त्यांनीं आपल्या आईला पाठविलेल्या एका पत्रांत आपला मुलगा आतां मोठी नोकरी धरून पुष्कळ पैसे मिळवील अशी व्यर्थ आशा न करण्याबद्दल मुद्दाम बजाविलें होतें. श्रीमंत होळकर यांनीं आगरकरांना पांचशें रुपयांची नोकरी देऊं केली असतां, गोपाळरावांनीं विनम्रपणें त्याचा अव्हेर केला, एवढेंच नव्हे तर त्यांच्या 'वाक्यमीमांसा' या पुस्तकाबद्दल होळकर यांनीं त्यांना जी चारशें रुपयांची देणगी दिली होती, तिजबद्दल चर्चा होऊं लागतांच गोपाळरावांनीं 'असला मत्सरानें विटाळलेला पैसा मी विष्टेसमान मानतों' असें म्हणून तिला स्पर्श करण्याचेंही नाकारलें !

स्थळ प्रत



प्रि. गोपाळ गणेश आगरकर.



गणेश जनार्दन आगाशे

लौकिक ऐश्वर्याची क्षिति न बाळगतां आमरण गरिबीचें वाण पत्करून गोपाळरावांनीं आपलें सर्व आयुष्य देशसेवेला वाहिलें व आपलें नांव अजरामर केलें हें जरी खरें, तरी जन्मजात दारिद्र्यामुळें गोपाळरावांच्या आयुष्यांतील पुष्कळ वर्षें कमी झालीं या गोष्टीकडे लक्ष्य गेलें म्हणजे दारिद्र्याच्या दारुण दुःखाचा त्यांना किती तीव्र अनुभव आला असेल याची कल्पना होते.

गोपाळरावांना एक भाऊ व तीन बहिणी होत्या. या सर्व बहिणी लहानपणींच लग्न होण्यापूर्वी वारल्या. गोपाळराव हे द्वितीय चिरंजीव. टेंभूला शाळा नसल्यामुळें, आगरकरांना वयाच्या सहाव्या वर्षींच आपल्या आईबापांना सोडून शाळेंत जाण्याकरितां कऱ्हाडला आपल्या आजोळीं राहावें लागलें. शिक्षणाकरितां आगरकरांना पुढें अनेक स्थलांतरें करून जी खडतर तपश्चर्या आचरावी लागली तिची ही सुरवातच होय. सुदैवानें गोपाळरावांचे धाकटे मामा त्यांच्याच वयाचे असल्यामुळें गोपाळराव व दत्तुमामा यांची चांगली गट्टी जमली व ती अखेरपर्यंत कायम टिकली. या जोडीचें कऱ्हाडला इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण झालें. गोपाळरावांचा हा बाळपणचा काळ सुखाचा गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. समवयस्क मामाबरोबर आजोळीं खिदळावें, शाळेंत धिंगामस्ती करावी, कृष्णानदींत यथेच्छ डुंबावें व तिच्या वांळवंटावर हरतऱ्हेचे खेळ खेळावे अशा प्रकारें गोपाळरावांचीं येथील बारा तेरा वर्षें चांगलीं आनंदांत गेलीं. आगरकरांचा स्वभाव लहानपणीं फार हूड होता. तथापि खेळांतल्याप्रमाणें शिक्षणांतही त्यांचें पाऊल त्यांच्या संवगड्यांपेक्षां पुढेंच पडत असे. एवढ्या कोंवळ्या वयांत निबंध लिहिणें व वाचणें आणि सभेंत भाषण करणें इत्यादि व्यवसायांत त्यांनीं जी धडाडी दाखविली ती त्यांच्या महत्त्वाकांक्षी मनाची पहिली सलामी होती असें म्हणावयास हरकत नाहीं. कऱ्हाडला पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळें दत्तुमामास त्याच्या भावानें पुण्यास ठेवलें, पण गोपाळरावांची मात्र कोठेंच सोय लागेना! बरोबरीच्या सोबत्याची ताटातूट तर झालीच, पण त्याबरोबर त्याच्या शिक्षणाची गाडी अन्यत्र सुरू झाली त्याप्रमाणें आपली न होतां आपल्या पुढील शिक्षणाची आशाही खुंटली हें पाहून गोपाळरावांच्या उत्साही मनाचा केवढा तेजोभंग झाला असेल बरें? पुढच्या शिक्षणाला गोपाळरावांचें दारिद्र्य नुसतें आडवें आलें एवढेंच नव्हे तर त्यांच्यावर पुढें जी संकटपरंपरा ओढवावयाची होती, त्याचीहि त्यानें गोपाळरावांना यावेळीं तोंडओळख करून दिली असें म्हणावें लागतें. कारण

त्यांच्या खद्दू झालेल्या मनाला डागण्या देण्याकरितांच कीं काय परिस्थितीनें त्यांना दहा बारा रुपयांकरतां मुन्सफ कोर्टांत खर्डेघांशी करावयास लावलें. परंतु परिस्थितीला दास करण्याकरितां सतत धडपड करीत असणें हा गोपाळरावांचा स्वभावधर्मच असल्यामुळें, त्यांनीं कोर्टांतील नाउमेद करणारी उमेदवारीची नोकरी सोडून देऊन शिक्षणाकरितां रत्नागिरीस जाण्याचें ठरविलें. कऱ्हाडचे मुन्सिफ नागपूरकर यांना गोपाळरावांची हुशारी परिचित असल्यामुळें गोपाळरावांचा हा निश्चय पाहून त्यांनीं त्यांना पाउणशें रुपये दिले व अशारीतीनें आपली सक्रिय सहानुभूति प्रकट केली. कऱ्हाडपासून रत्नागिरीचा दीडशें मैलांचा प्रवास गोपाळरावांनीं पायीं केला असें म्हणतात! परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ज्या विद्यादेवीच्या उपासनेकरितां त्यांनीं इतका लांबचा प्रवास पायांनीं केला, तिचें नुसतें दर्शन घेण्यालाच गोपाळरावांना फार कष्ट सहन करावे लागले. गोपाळरावांचे चुलत चुलते डे.ए. इन्स्पेक्टर वामनराव आगरकर हे रत्नागिरीस असल्यामुळें त्यांचा आपणाला आश्रय मिळेल अशी गोपाळरावांची अपेक्षा होती. व एका अर्थानें ती फलद्रूपही झाली. कारण गोपाळरावांनीं इतक्या लांबचा प्रवास पायीं केल्यामुळें त्यांच्या काटकपणासंबंधीं या आप्तांनीं आपली भलतीच कल्पना करून घेऊन त्यांचा घरांतील कामाला चांगला उपयोग होईल असें ताडलें व त्यांना घरांत आसरा दिला.

रत्नागिरीस गोपाळरावांना पोटाकरितां वार लावावे लागले होते, असा त्यांच्या कांहीं चरित्रांत उल्लेख सांपडतो. यावरून गोपाळरावांना आपल्या घरीं शागीर्दी करावयास लावणाऱ्या या नातलगानें त्यांना आपल्या घरांत नुसती राहावयास व काम करावयास परवानगी दिली होती असें म्हणावें लागतें. गोपाळरावांवर या घरांतील कामाचा बोजा इतका बेसुमार पडूं लागला कीं, त्या स्थितींत आपल्या शिक्षणाची तेथें धडगत लागणें कठीण असें दिसून आल्यामुळें ते कऱ्हाडला पुन्हा परत आले. आपल्या निबंधामध्यें हिंदुकुटुंबपद्धतीचें पुढें जें त्यांनीं अत्यंत मार्मिक चित्र रेखाटलें आहे, त्यांतील बरेंचसें साहित्य त्यांनीं रत्नागिरीस पैदा करून ठेवलें असावें असें वाटतें. रत्नागिरीस गोपाळरावांच्या कशा बशा दोन इयत्ता पार पडल्या होत्या. विद्यादेवीचे मनांतून आपल्या भक्ताचें सत्वच पहावयाचें असल्यामुळें, तिनें गोपाळरावांच्या मार्गांत अनेक अडचणी निर्माण करून ठेविल्या. रत्नागिरीहून कऱ्हाडास परत आल्यावर गोपाळरावांनीं तेथील दवाखान्यांत कंपौंडरची नोकरी धरली. परंतु तेथें एकदां प्रेताची चिरफाड चालली असतां

गोपाळरावांच्या मृदु अंतःकरणाला एवढा धक्का बसला कीं त्यांनीं ती नोकरी सोडून दिली. याच सुमारास गोपाळरावांचे थोरले मामा सदाशिवराव यांना वऱ्हाडांत ओव्हरसीयरची जागा मिळाल्यामुळें ते आकोल्याला जाऊन राहिले. त्यानीं तेथें बिऱ्हाड करावयाचें ठरवून, आपल्या पत्नीस तिकडे घेऊन येण्याविषयीं गोपाळरावांस लिहिलें. आपल्या शिक्षणाची आकोल्यास सोय लागेल या आशेनें गोपाळरावांस फार आनंद झाला व ते आपल्या मामीला घेऊन आकोल्यास गेले. सदाशिवरावांनीं दत्तोपंतांसही पुण्याहून आकोल्यास बोलाविलें व अशा रीतीनें मामा-भाचांची गांठ फिरून एकत्र पडली. परंतु शिक्षणक्रम सुरळीत रीतीनें पार पडणें गोपाळरावांच्या नशिबीं नसल्यामुळें त्यांच्या मार्गांत अचानक रीतीनें एक विघ्न दत्त म्हणून उभें राहिलें. आकोल्याला शाळेंत दाखल होऊन कांहीं दिवस लोटले नाहीं तोंच गोपाळरावांच्या मामीची आई आजारी पडल्यामुळें तिनें आपल्या मुलीला अखेरची भेट घेण्याकरितां बोलाविलें व तिला घेऊन जाण्याच्या कामगिरीवर पुनः गोपाळरावांची नेमणूक झाली, व ते फिरून कऱ्हाडला आले. मामीचें आकोल्यास परत जाणें निश्चित नसल्यामुळें मोठ्या मामांनीं गोपाळरावांस कऱ्हाडासच राहावयास सांगितलें. अशा रीतीनें त्यांचा शिक्षणक्रम पुन्हां एकदां खुंटला! आकोल्याचे शाळेंतील मास्तर वि. मो. महाजनी यांनीं गोपाळरावांच्या शिक्षणाची सोय पुण्यांत कोठें तरी लागावी म्हणून पत्रद्वारें खटपट केली, परंतु त्यांत यश येण्याचीं फारशीं चिन्हें दिसेनात तेव्हां तो मार्ग सोडून द्यावा लागला. परंतु पुढें लवकरच महाजनि यांचा आकोल्याचे शाळेंत चांगला जम बसला तेव्हां त्यांनीं गोपाळरावांचे वडील मामांजवळ शब्द खर्च करून, गोपाळरावांस शिक्षणाकरितां फिरून आकोल्यास आणविण्याची व्यवस्था केली व पुन्हां एकदां मामा-भाचे आकोल्याचे शाळेंत जाऊं लागले. या शाळेंत महाजनि यांचे देखरेखीखालीं गोपाळरावांचा अभ्यास चांगला झाला. आकोल्यास तीन वर्षांत गोपाळरावांचा प्रवेशपरीक्षेपर्यंत अभ्यास होऊन १८७५ सालीं ते प्रवेशपरीक्षेस बसून तींत उत्तीर्ण झाले. दत्तुमामा याच्या आदल्या वर्षीच मॅट्रिकचे परीक्षेंत पसार होऊन, पुण्याचे डेक्कन कॉलेजांत दाखल झाले होते. आकोल्याचे शाळेंत असतांना एकदां महाजनि यांच्या वाक्ताडनाला उत्तर म्हणून 'मी आपल्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर' असे गोपाळरावांनीं आत्मप्रत्ययप्रेरित उद्गार काढले होते. मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांचा कॉलेजचा मार्ग दारिद्र्यानें

अडवून धरला. परंतु आपण एकदां अंगिकारलेल्या मार्गांतून कांहीं झालें तरी परत फिरावयाचें नाहीं, हें गोपाळरावांचें ब्रीद असल्यामुळें व आपल्या उपरोक्त शब्दांची आठवण ताजी असल्यामुळें त्यांनीं वाटेल तें करून कॉलेजांत जाण्याचें ठरविलें. त्यांचा असा निग्रह पाहून गोपाळरावांच्या शिक्षकवर्गानें आपआपसांत वर्गणी काढून त्यांच्या हातावर साठ रुपये ठेविले.

ही रक्कम घेऊन गोपाळरावांनीं पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत प्रवेश तर केला; परंतु कॉलेजचा खर्च चालविण्याकरितां त्यांना इतर मार्गांचाही अवलंब करावा लागला. 'वऱ्हाड समाचार' या वर्तमानपत्रांत लेख लिहून गोपाळराव दरमहा पांच रुपये मिळवीत असत. अभ्यास नेटानें करून ज्यूनिअर स्कॉलरशिपही त्यांनीं मिळविली. डेक्कन कॉलेज गॅदरिंगनें 'एकत्र हिंदुकुटुंबापासून फायदे व तोटे' या विषयावर मराठींत उत्तम निबंध लिहिणारास ५० रुपयांचें बक्षिस लावलें होतें; तेंही गोपाळरावांनीं पटकावलें! तथापि एवढया धडपडी करूनही पैशांच्या अडचणींतून गोपाळरावांना मुक्त होतां आलें नाहीं. कॉलेज म्हटल्याबरोबर विद्यार्थ्यांचे मनःचक्षूसमोर जे सुख-सोहाळे दिसूं लागतात ते तर गोपाळरावांना कधीं अनुभवावयास मिळाले नाहींत. परंतु रोजच्या दिनचर्येंतील आवश्यक गरजा देखील त्यांना कमी कराव्या लागल्या! एकच सद्रा असल्यामुळें सकाळीं घालण्याकरितां गोपाळरावांना तो रातोरात धुवून वाळवावा लागत असे हें वाचलें म्हणजे विद्यादेवीला प्रसन्न करून घेण्याकरितां गोपाळरावांना केवढी खडतर तपश्चर्या आचरावी लागली, हें ध्यानांत येतें व डोळ्यांस पाणी आल्याखेरीज राहात नाहीं. गोपाळरावांचें विद्यार्थिदशेंतील आयुष्य गरीब विद्यार्थ्यांनीं आदर्शभूत मानण्यासारखें खरोखरच उज्ज्वल आहे! स्वकष्टानें व बुद्धिप्रभावानें निरनिराळ्या मार्गांनीं पैसे मिळविले व शहरांतील वक्तृत्व समारंभांत भाषण करून ५० रुपयांची त्यांत भर घातली, तरी पहिल्या वर्षाच्या परीक्षेचे वेळीं फी भरण्याला त्यांजजवळ पैसे शिल्लक राहिले नाहींत म्हणून गोपाळरावांनीं नाटक लिहून पैसे मिळविण्याकरितां रात्रीं जाग्रणें करावयास सुरवात केली. परंतु ही बातमी तेथील अध्यापक केरूनाना छत्रे यांच्या कानीं जाऊन, त्यांनीं गोपाळरावांची फी भरण्याची व्यवस्था केली व त्यांना या जादा त्रासांतून मुक्त केलें! गोपाळरावांची पहिल्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांना शिष्यवृत्तीही मिळाली. अशा रीतीनें शिष्यवृत्त्या मिळवून गोपाळरावांनीं कॉलेजांतील आपला अभ्यासक्रम रेंटीत नेला व ते बी. ए. झाले!

त्यांचे मामा दत्तोपंत बी. ए. झाल्यानंतर एलएल. बी. च्या अभ्यासाकरितां मुंबईस गेले व गोपाळराव कॉलेजांतच फेलो होऊन एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. गोपाळरावांचे ऐच्छिक विषय इतिहास, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हे असल्यामुळें बी. ए. च्या वर्गांत असतांनाच त्यांनीं मिलच्या ग्रंथांचें सूक्ष्म परिशीलन केलें होतें; व वादविवादांत स्वपक्षमंडनार्थ व परपक्षखंडनार्थ लागणारी तर्कशुद्ध विचारसरणी हस्तगत करून ठेविली होती. बी. ए. चें वर्ष हें गोपाळरावांचे आयुष्यांत अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें आहे. आनुवंशिक दारिद्र्याप्रमाणें आपल्या मातापितरांपासून दम्याच्या विकाराचीही पैदास गोपाळरावांनीं करून ठेविली होती. दारिद्र्याप्रमाणें या दम्याच्या विकारानेंही गोपाळरावांचा पिच्छा ते मरेपर्यंत सोडला नाहीं. अजूनपर्यंत सुप्तावस्थेंत असलेल्या या विकारानें गोपाळराव बी. ए. च्या वर्गांत असतांना उचल खाल्ली व त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. गोपाळरावांच्या कॉलेजांतील दगदगीच्या आयुष्याचा परिणाम अशा रीतीनें त्यांना यावेळीं भोंवला. बी. ए. ची परीक्षा होण्याच्या सुमारासच गोपाळराव विवाहबद्ध झाले. गोपाळरावांची पत्नी यशोदाबाई. यांचें माहेरचें नांव अंबुताई असून, त्यांचे वडील मोरभट फडके हे कऱ्हाड जवळील उंब्रण गांवचे राहाणारे. लग्नानंतर गोपाळरावांनीं आपल्या पत्नीस थोडें बहुत वाचावयास शिकविलें. आगरकरांचा पुढें समाजानें जो छळ केला व त्यांच्यावर जी आग पाखडली त्याची झळ यशोदाबाईंना बरीच लागली असावी असें वाटतें. "रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांतून होत असलेल्या शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे..." या त्यांच्या महाराष्ट्रास लिहिलेल्या अनावृत पत्रांतील वाक्यावरूनही वरील शंकेस बळकटी येते. खुद्द गोपाळराव यांचे धार्मिक विचार कसेही असले तरी त्यांनीं आपल्या पत्नीच्या धार्मिक भावनांना कधींही दुखविलें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आगरकरांचें बरें वाईट झाल्यास " तुमच्या मागें तुमच्या कुटुंबाचा सर्व भार मजवर आहे. त्यांना मी अंतर देणार नाहीं. त्यांची तुम्ही काळजी करूं नका." असें अभिवचन त्यांचे मामा दत्तोपंत यांनीं त्यांना दिलें होतें. या वचनाला जागून आगरकरांच्या निधनानंतर दत्तोपंतांनीं

गोपाळरावांच्या कुटुंबाला त्यांच्या तीन अपत्यांसह आकोल्यास आपल्या घरीं आणून ठेवलें. असो. गोपाळराव कॉलेजांत पहिल्या वर्षाचा अभ्यास करीत असतांनाच त्यांची व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची मुलाखत झाली होती, व ही परीक्षा पसार झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं आगरकर हे राजकीय विषयावर आपण लिहिलेला एक निबंध विष्णुशास्त्री यांस वाचून दाखविण्याकरितां त्यांचे घरीं गेले होते. आगरकर बी. ए. झाले त्या वेळीं त्यांचें वय बावीस वर्षांचें होतें. कॉलेजांत टिळक हे आगरकरांच्या पुढें एक वर्ष होते. तथापि त्यांची व गोपाळरावांची चांगली ओळख असून एलएल्. बी. चा अभ्यास करण्याकरितां जेव्हां टिळक डेक्कन कॉलेजांत येऊन राहिले तेव्हां गोपाळरावांशीं त्यांचा विशेष परिचय झाला. हा परिचय १८७९ या सालीं विशेष दृढ झाला. आगरकरांच्या खोलीमध्यें टिळकांसारखे त्यांचे स्नेहीसोबती जमून निरनिराळ्या विषयांवर नेहमीं चर्चा करीत. एकदां शिक्षणासंबंधीं बोलणें निघालें असतां शिक्षणप्रसाराशिवाय आपल्या देशाला ऊर्जितावस्था यावयाची नाहीं याविषयीं सर्वांचें एकमत पडलें व कॉलेजांतील तरुण मंडळीनें आपलें शिक्षण पुरें होतांच स्वार्थत्याग करावयाला तयार होऊन, काटकसरीनें एखादी नमुनेदार शिक्षणसंस्था काढावी असेंही त्यांच्या डोक्यांत घोळूं लागलें.

आगरकर व टिळक यांचे अंतःकरणांत स्वदेशाबद्दल अशा तऱ्हेच्या भावना बळावत चालल्या असतांनाच सरकारी नोकरी सोडून पुण्यांत नवीन शाळा काढण्याविषयीं विष्णुशास्त्री चिपळूणकर हे खटपट करीत असल्याची वार्ता या दोघांचे कानीं पडली. तेव्हां त्यांनीं विष्णुशास्त्री यांची भेट घेऊन आपला मनोदय त्यांस कळविला व सर्वांनीं मिळून एक नवीन शाळा काढावी असें ठरलें. शेवटीं सर्व जुळवाजुळव होऊन १८८० च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. टिळक हे याच्या आदल्या वर्षींच एलएल. बी. झाले असल्यामुळें शाळेंत अगदीं सुरवातीपासूनच येऊं शकले. परंतु गोपाळराव एम. ए. मध्यें नापास झाल्यामुळें व शाळेचें काम व अभ्यास हीं एकसमयावच्छेदेंकरून नीट होणार नाहींत म्हणून त्यांनीं एक वर्षानंतर एम. ए. पास होऊन शाळेस मिळण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें १८८० च्या शेवटच्या महिन्यांत ती परीक्षा उत्तीर्ण होऊन कृतसंकल्पाप्रमाणें ते शाळेंत येऊन दाखल झाले. या वेळीं आकोल्याच्या शाळेंत गुरुवर्य महाजनि यांचे समोर आपण केलेल्या प्रतिज्ञेची

आठवण होऊन, ती पार पडल्याबद्दल व स्वदेशसेवेविषयींच्या आपल्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याची संधि प्राप्त झाल्याबद्दल गोपाळरावांना किती धन्यता वाटली असेल याची कल्पनाच करणें बरें.

आगरकर यांचें अजूनपर्यंतचें चरित्र आत्मविशिष्ट होय. ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाल्यापासून त्यांच्या लौकिक चरित्राला व अलौकिक कार्याला सुरवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. शाळेचे सुरवातीचे हेडमास्तर शास्त्रीबुवा असून, शाळेसंबंधीची इतर व्यवस्था आगरकर शाळेला येऊन मिळण्यापूर्वी टिळक व नामजोशी पहात असत. विष्णुशास्त्र्यांची निबंधमालाही चालू होती. शाळेच्या कामाव्यतिरिक्त नामजोशी इतर अनेक उलाढाल्या करून कांहीं वर्तमानपत्रेंही चालवीत असत. त्यांचा स्वतःचा छापखानाही होता. परंतु त्याप्रीत्यर्थ त्यांना बरेंच कर्ज झालें होतें. तेव्हां त्यांजपासून हा छापखाना विकत घेऊन शाळेच्या पुष्ट्यर्थ व ज्ञानप्रसारार्थ एक मराठींत व एक इंग्रजींत अशीं दोन वर्तमानपत्रेंही चालवावींत असा मंडळीचा बेत ठरला व त्याप्रमाणें नामजोशी यांजपासून त्यांचा छापखाना विकत घेऊन, त्याला आर्यभूषण हें नांव देण्यांत आलें व त्यांतून केसरी व मराठा हीं दोन वर्तमानपत्रें निघूं लागलीं ( १८८१ ). या पत्रांतून शाळेंतील बहुतेक मंडळी लिहीत असे. तथापि आगरकर व टिळक यांस अनुक्रमें केसरी व मराठा यांचे संपादक म्हणून पुढें केलें होतें. पुढें हळुहळू केसरीचा सर्व भार आगरकर यांनीं आपल्या एकट्यावर घेतला. मराठ्यांत मात्र बहुतेक मंडळी आळीपाळीनें लिहीत असे.

आगरकरांनीं केसरींत लिहिण्याची सर्व जबाबदारी स्वतःवर घेतल्यापासून, केसरीची भरभराट झपाट्यानें होऊं लागली व त्याच्या गर्जनेनें उभें महाराष्ट्र दुमदुमून गेलें. आगरकर यांनीं सुरवातीलाच केसरींत ' वर्तमानपत्रें ' या विषयावर लेख लिहून केसरीचें निस्पृहपणाचें धोरण जाहीर करून ठेवलें होतें व त्याप्रमाणेंच धडाडीनें तें त्यांनीं चालविलें होतें. तथापि वर्तमानपत्रकर्त्यांचें काम तें निस्पृहपणें चालविण्याचें धोरण कायम ठेवावयाचें असल्यास किती बिकट व जोखमीचें असतें याचा अनुभव आगरकर यांस लवकरच आला, व कोल्हापूर प्रकरण उद्भवून आगरकर व टिळक यांची रवानगी डोंगरीचे तुरुंगांत करण्यांत आली. त्या काळीं हिंदी संस्थानिकांविषयीं खालसांतील प्रजेस एक प्रकारचा आपलेपणाचा जिव्हाळा वाटत असे. कोल्हापूरचे कारभारी बर्वे यांनीं महारा-

जांच्या चालविलेल्या छळामुळें त्यांना वेडाच्या लहरी येतात अशा बातम्या येऊं लागल्यामुळें, केसरी व मराठा यांनीं महाराजांचा कैवार घेऊन बर्वे यांजवर टीकेचा भडीमार चालविला. तेव्हां बर्वे यांनीं या पत्रकर्त्यांवर कायद्याचे कात्रींत धरून त्यांजवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. केसरीनें केलेला आरोप खरा असला तरी कोर्टांत त्यांना तो अनेक कारणांमुळें सिद्ध करून दाखवितां आला नाहीं. त्यामुळें टिळक व आगरकर यांना भलत्याच "माहितीवर इतका विश्वास टाकला याबद्दल आम्हांला अत्यंत वाईट वाटतें" असें कबूल करावें लागून, डोंगरीच्या तुरुंगांत १०१ दिवसपर्यंत कैद भोगावी लागली. टिळक आगरकर यांना ही शिक्षा १८८२ सालीं झाली. या तुरुंगवासाची हकीकत व त्याचें वर्णन आगरकर यांच्या '**डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस**' (१८८२) या छोट्या पुस्तकांत इतकें बहारीचें आहे कीं, त्यावरून त्यांच्या विनोदी स्वभावाची व त्यांच्या मनाच्या प्रसन्नतेची उत्तमरीतीनें जाणीव पटते. या पुस्तकांत आगरकर व टिळक यांचे तुरुंगांतील दिवस परस्परांच्या सहवासांत कसे गेले याचें मोठें हृदयस्पर्शी वर्णन केलें असून, शिवाय तुरुंगांतील शिस्त व त्यांत कोणते फेरफार करावयास पाहिजेत वगैरे विषयांचीही फार मार्मिक चर्चा केली आहे. पुस्तकाच्या उपसंहारांत कोल्हापूर प्रकरणांत ज्या स्नेहीमंडळीनें त्यांना सहाय्य केलें व तुरुंगांतून सुटून आल्यावर ज्यांनीं त्यांचा मोठा सन्मान केला त्यांचे आभार मानून, लोकांच्या अशा प्रेमाला व आदराला आपण पात्र होण्याइतकी योग्यता आपल्या आंगीं आणण्याचे प्रयत्न करूं अशी त्यांनीं सदिच्छा प्रकट केली आहे.

कोल्हापूर प्रकरण कोर्टांत चालू असतांनाच आगरकर यांनीं शेक्सिपअरच्या हॅम्लेट या नाटकाच्या '**विकारविलसित**' (१८८३) या मराठी रूपांतराला सुरवात केली होती. हें नाटक डोंगरी येथें बंदिवासांत असतां त्यांनीं लिहून पुरें केलें. कोल्हापूर प्रकरणाचा खटला कोर्टांत लढविण्याकरतां लागलेली पैशाची चणचण दूर करण्याकरितां आगरकर यांनीं हें नाटक लिहावयास घेतलें, परंतु अनेक अडचणींमुळें अपेक्षित कालांत तें पुरें न झाल्यामुळें त्यांना तें शेवटीं तुरुंगांत पुरें करण्यास सवड मिळाली. त्या वेळच्या आर्योद्धारक मंडळीकडून या नाटकाचे प्रयोग करवून घेऊन, त्याचें उत्पन्न केसरी फंडाकडे लावण्याचा त्यांचा विचार होता. यावरून नाटक लिहिण्यांतील त्यांचा हेतु किती उदात्त होता हें दृष्टोत्पत्तीस येतें. या नाटकाला आगरकरांनीं २८ पृष्ठांची लांबलचक प्रस्तावना जोडली असून,

आगरकर गोपाळ गणेश

त्यांत ' परक्या भाषेंतील नाटकांचीं भाषांतरें कोणत्या रीतीनें करावीं ' याविषयीं आपलीं मतें दिलीं आहेत. प्रस्तावनेच्या शेवटीं शेवटीं शेक्सपिअरच्या मूळ नाटकाविषयींही थोडीशी चर्चा केली आहे. कांहीं आंग्लभाषाकोविदांस आगरकरांचें हें हॅम्लेटचें मराठी भाषांतरवजा रूपांतर पसंत न पडून, त्यांनीं त्यावर टीकाही केली, ( वागळे यांनीं विविधज्ञानविस्तारांत ) परंतु हें रूपांतर आगरकर यानीं कोणत्या परिस्थितींत केलें इकडे लक्ष्य दिलें पाहिजे. शेक्स्पिअरच्या वेळीं रूढ असलेली इंग्रजी भाषा ही अलीकडील इंग्रजी भाषेहून कांहींशी भिन्न व दुर्बोध असल्यामुळें टिपणी पुस्तकांच्या मदतीशिवाय या महाकवीच्या नाटकांचें निर्दोष भाषांतर करणें जवळ जवळ अशक्य आहे. आगरकर यांना ज्या पुस्तकांची मदत पाहिजे होती ती त्यांना न मिळाल्याबद्दल त्यांनीं नाटकाच्या प्रस्तावनेंत उल्लेख केलाच आहे. त्यामुळें त्यांत राहून गेलेल्या दोषांची त्यांस जाणीव होती हें सिद्ध होतें. कोणत्याही ग्रंथाचें मराठींत भाषांतर किंवा रूपांतर करावयाचें असल्यास तें शक्य तितकें मूळास धरून करावें असा आगरकर यांनीं विकार-विलसिताच्या प्रस्तावनेंत आपला अभिप्राय दिला आहे. असो.

आगरकर व टिळक हे डोंगरीच्या तुरुंगांत काळ कंठीत असतां, त्यांच्या मागें त्यांच्या स्नेहीमंडळींनीं शाळेची व वर्तमानपत्रांची व्यवस्था चोख ठेविली होती. कोल्हापूर प्रकरणाचा खटला चालू असतांच विष्णुशास्त्री यांजवर काळानें एकाएकीं झडप घातली व पुढें खटल्याचा निकाल लागून टिळक व आगरकर यांस शिक्षा झाली. अशा रीतीनें शाळेवर व केसरीमराठा या पत्रांवर आपत्ती ओढवली तरी मागें राहिलेल्या तरुण मंडळीनें त्यांनीं सुरू केलेलें कार्य नेटानें चालू ठेवलें. १८८२ च्या आक्टोबरांत टिळकआगरकरांची तुरुंगांतून मुक्तता झाली व लोकांनीं त्यांचा मोठा गौरव केला. केसरीच्या संपादकाच्या जागेवर आगरकर पुन्हा आरूढ होतांच त्याची भरभराट होऊं लागली व केसरीचा आकार बराच मोठा करण्यांत आला. केसरीप्रमाणें शाळेचा लौकिकही वाढूं लागला. वामन शिवराम आपटे यांच्या परिश्रमांमुळें युनिव्हर्सिटीच्या संस्कृतच्या शिष्यवृत्त्या शाळेस मिळूं लागल्या व विद्यार्थ्यांच्या संख्येंतही पुष्कळ वाढ झाली. त्यामुळें शाळेच्या चालकांस हुरूप चढून त्यांनीं कॉलेज काढावयाचें ठरविलें. हेंच फर्ग्युसन कॉलेज होय. हें कॉलेज काढण्यापूर्वीच कांहीं महिने अगोदर ( १८८४ च्या आक्टोबर महिन्यांत ) न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनीं डेक्कन एजुकेशन सोसा-

यटीची स्थापना केली व आपटे, आगरकर, टिळक, नामजोशी, गोळे, वासुदेवराव केळकर व धारप हे तिचे पहिले तहाहयात सभासद झाले. पुढें लवकरच १८८५ सालच्या सुरवातीला गद्र्यांचे वाड्यांत फर्ग्युसन कॉलेज सुरू होऊन, आपटे यांस प्रिन्सिपॉल नेमण्यांत आलें.

डेक्कन एजुकेशन सोसायटी व फर्ग्यूसन कॉलेज यांची स्थापना झाल्यानंतर लवकरच आगरकर व टिळक यांच्यामध्यें प्रथम तेढ उत्पन्न झाली, व ती आगंतुक कारणांनीं उत्तरोत्तर वाढत जाऊन शेवटीं त्यांच्यांत वितुष्ट पडलें. आगरकर आणि टिळक यांचीं अंतःकरणें मित्रत्वाच्या प्रेमरज्जूनें एकत्र कशीं बांधलीं गेलीं हा इतिहास जितका मनोवेधक तितकाच हा प्रेमरज्जू पुढें ताणला जाऊन शेवटीं कसा तुटला याचा इतिहासहि फार उद्वेगजनक आहे.

आगरकर व टिळक यांच्यामधील मतभेदाला प्रथम सुरवात झाली ती केसरींतील मजकुराबाबत होय. आगरकरांनीं केसरीच्या द्वारें पहिलीं चारपांच वर्षें ज्या सामाजिक सुधारणांच्या तत्वांचा पुरस्कार केला, त्याला खरें तोंड मलबारी शेटच्या बालविवाहप्रतिबंधक बिलाच्या चळवळीमुळें लागलें व याच वेळीं आगरकर व टिळक यांच्या विचारसरणींतील विरोध प्रकट होऊं लागला. सामाजिक सुधारणेसंबंधीं व्यक्तिशः टिळकांचीं मतें आगरकरांच्या मतांहून भिन्न होतीं अशांतला प्रकार नाहीं. परंतु बहुजन समाजाला रुचतील अशाच सुधारणांचा पुरस्कार करण्याचें टिळकांनीं आपलें धोरण आंखल्यामुळें व ‘ लोकांना संतुष्ट राखण्याकरितां स्ववंचन करणें महापातक आहे ’ अशी आगरकरांची विचारसरणी असल्यामुळें या दोन थोर व्यक्तींमधील विरोधाला सुदैवानें किंवा दुर्दैवानें प्रारंभ होऊन, त्याला पुढें ‘ आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय ’ इत्यादि वादांच्या फांद्या फुटूं लागल्या. आज समाजानें त्यांतील बऱ्याचशा फांद्या सहज तोडून टाकल्या आहेत हें जरी खरें, तरी त्या वेळीं त्या तुटल्या नाहींत एवढेंच नव्हे तर तोडणाऱ्यांचीं अंगें मात्र खरचटून गेलीं व कित्येकदां तर मुख्य ध्येयाचा विसर पडून आपल्या हातांतील शस्त्रास्त्रांनीं परस्परांवरच प्रहार करण्यास प्रारंभ केला.

मलबारी यांच्या बालविवाहविषयक चळवळीला आगरकर यांनीं उचलून धरून, केसरींतून लेखनद्वारा त्याची तरफदारी केल्यामुळें केसरीचें धोरण काय असावें याविषयीं चर्चा होऊन, आगरकर यांनीं आपलीं मतें संपादकीय म्हणून न छापतां आपल्या नांवानें प्रसिद्ध करावीं असें ठरलें. या प्रकरणामुळें केसरींत

संपादकीय व आगरकरांच्या सहीचे असे कांहींसे परस्परविरुद्ध मतनिदर्शक लेख प्रसिद्ध होऊं लागले. आगरकरांच्या मतप्रतिपादनावर निरनिराळ्या प्रकारांनीं नियंत्रण घालण्यांत आल्यामुळें त्यांच्या निस्पृह वृत्तीला आधींच गुदमरल्यासारखें झालें होतें; त्यांत वर्तमानपत्राच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारा उपरोक्त अनिष्ट प्रकार सुरू झाल्यामुळें आगरकरांनीं केसरी सोडून देण्याचें ठरविलें; व त्याप्रमाणें १८८७ सालीं त्यांनीं केसरीला सोडचिठ्ठी देऊन १८८८ सालीं आपलें स्वतंत्र '**सुधारक**' पत्र काढलें.

१८८१ सालापासून १८८७ सालापर्यंत आगरकर केसरीचे संपादक होते. या अवधींत आगरकर यांच्या हातून विविध विषयावर अनेक लेख लिहिले गेले. त्यांतील बरेचसे '**केसरींतील निवडक निबंध**' ( १८८७ ) या नांवानें पुढें लोकाग्रहास्तव पुस्तकरूपानें छापण्यांत आले. त्याला आगरकरांनीं एक लहान-शीच पण चटकदार प्रस्तावना जोडली आहे. केसरींतील या निवडक निबंधांतून आगरकर यांचे निबंध निराळे निवडून काढण्याला त्यांच्या व्यक्तिविशिष्ट भाषा-शैलीची ज्यांना ओळख पटली आहे त्यांना जड जाणार नाहीं.

केसरी सोडल्यानंतर आगरकर यांनीं 'सुधारक' काढावयाचें ठरविलें खरें, पण स्वजनांच्या विरोधामुळें त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी आल्या. तथापि आगरकरांच्या निश्चयाला अपयश माहीत नसल्यामुळें त्या सर्व अडचणी दूर होऊन १८८८ सालीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर सुधारकाचा जन्म झाला. अशा रीतीनें हिंदुधर्मांतील घातक रूढींचें सीमोल्लंघन करण्याविषयीं स्वबांधवांना उपदेश करण्याचें आपलें व्रत केसरी सोडल्यावर एक वर्षानें आगरकर यांनीं फिरून सुरू केलें !

'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखांत आगरकर यांनीं आपलें धोरण जाहीर करून 'इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार' हा सुधारकाचा बाणा असल्याबद्दल ग्वाही दिली. 'सुधारक' हें नांवही अप्रिय व त्यांतील सडेतोड विचारसरणी त्याहूनही अप्रिय वाटल्यामुळें पुराणमताभिमानी व दांभिक मंडळीनें गोपाळरावांविरुद्ध एकच काहूर उठविलें. 'तुमचा खून करूं' म्हणून त्यांस धमक्या दिल्या व शेवटीं त्यांची खोटी प्रेतयात्रा देखील काढून आपली हिडिस हौस पुरवून घेतली. परंतु कोणत्याही प्रकारच्या धमक्यांना

गोपाळरावांनीं भीक घातली नाहीं व मरेपर्यंत सुधारक चालू ठेवला. “ कोण स्वस्थ बसणार ? सुधारक ! टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल व तीं वाचण्यास एक इसम तरी तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैण कर्म सुधारकास स्पर्श करूं शकणार नाहीं. ” ही आगरकर यांनीं केलेली भीष्मप्रतिज्ञा त्यानीं आमरण पाळली यांत संदेह नाहीं.

इकडे आगरकर केसरी सोडून निघाले तसे तिकडे टिळक डेक्कन एजुकेशन सोयासटी सोडून देण्याच्या तयारीला लागले. कॉलेजचे प्रिन्सिपाल आपटे यांच्याशीं शिस्तीच्या बाबतींत टिळकांचा बेबनाव सुरू झाला व आपटे हे संस्कृत कोश व इतर पुस्तकें लिहून पैसे कमावितात हें सोसायटीच्या तत्वाविरुद्ध आहे अशी कुरकुर टिळकांनीं सुरू केली. यांतच आणखी सोसायटीच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधीं टिळक व आगरकर यांजमधील मतभेदाची भर पडली; पण त्याचा निकाल बहुमतानें आगरकर यांच्या बाजूचा लागला. होळकरांकडून मिळालेल्या ७०० रुपयांच्या देणगीच्या वांटणीसंबंधींही मनांत अढी बसावी अशा प्रकारची चर्चा टिळक व आगरकर यांमध्यें झाली. या ७०० रुपयांपैकीं ४०० रुपये आगरकर यांनीं लिहिलेल्या ‘ **वाक्यमीमांसा** ’ या पुस्तकाबद्दल त्यांना देण्यांत यावी अशी होळकरांनीं आपली इच्छा दर्शविली होती. परंतु ही रक्कम चर्चेचा विषय होऊन बसल्यामुळें आगरकरानीं त्या रकमेला हातही लावला नाहीं ! ह्या व अशाच अनेक बाबींत बेबनाव झाल्यामुळें टिळकांनीं आपला एक लांबलचक राजीनामा सोसायटीकडे पाठवून दिला. व तो १८९१ च्या सुरवातीला मंजूर होऊन टिळकांचा सोसायटीशीं असलेला संबंध सुटून टिळक हे केसरी व मराठा या पत्रांचे पूर्ण मालक बनले.

टिळक सोसायटींतून बाहेर पडले तेव्हां संमतिवयाच्या वादाला रंग चढला होता. या वादांत आगरकर व रानडे एका बाजूचे व टिळक दुसऱ्या बाजूचे असा प्रकार असल्यामुळें आगरकर व रानडे यांच्यांत एकप्रकारचा आदरयुक्त स्नेहसंबंध जडला होता. हा वाद चालू असतांच पंचहौद मिशनमधील चहाच्या पेल्यांतील वादळांतून ग्रामण्य प्रकरण उद्भुत होऊन समुद्रमंथनानंतर सुरासुरांत जसें भांडण झालें, त्याप्रमाणें सुधारक दुर्धारक पक्षांत वैमनस्य येऊन दोन्ही पक्ष हातघाईवर आले. पंचहौद मिशनमधील चहाचे भोंवऱ्यांत सांपडलेल्या ४२ इसमांत टिळक व रानडे हे देखील सांपडल्यामुळें त्यांतून सहीसलामत बाहेर

पडण्याकरितां रानडे यांना टिळकांची मदत मिळाली व दोघांनींही प्रायश्चित्त घेण्याची आवश्यकता मान्य केल्यामुळें या प्रश्नापुरते ते एका बाजूचे झाले ! या ग्रामण्यप्रकरणाचा उल्लेख करून, आगरकर यांनीं एकदां सुधारकांत एक अग्रलेख लिहिला व टिळक हे "ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेस्मनच्या हातचा भात व बिस्कुटें झोडून, श्रीशंकराचार्यांशीं व्यर्थ हुजत घालीत बसतात; ते कर्मठ ब्राह्मणाचे खरे पुढारी नव्हत," असें त्यांत विधान केलें. टिळकांना मुसलमानांच्या हातचा भात खरोखर पचला असता किंवा काय हा प्रश्न अलाहिदा, परंतु आगरकर यांनीं भातासंबंधीं केलेला आरोप टिळकांना न रुचल्यामुळें त्यांनीं आगरकर यानां आपलें विधान परत घेण्याविषयीं निर्वाणीचा खलिता पाठविला. आगरकर यानीं ज्या माणसाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून टिळकांनीं भात खाल्ल्याचें विधान केलें होतें, त्यानें आपलें बोलणें फिरविलें व आगरकर यांना तोंडघशीं पाडलें; परंतु आगरकर हे युद्धप्रिय असल्यामुळें उपरोक्त इसमानें त्यांना दगा दिला तरी विधान परत घ्यावयास तयार होत ना. परंतु रावसाहेब रानडे यांनीं कारणावांचून आपला शब्द इरेस घालून आगरकर यांस आपलें विधान परत घ्यावयास लाविलें व आगरकर यानीं रानडे यांच्या भिडेस्तव तें परत घेतलें. यामुळें टिळकांना आपला विजय झाला असें वाटून आगरकरांवर वाटेल तसें तोंडसुख घ्यावयाला त्यांना आयतीच संधी मिळाली व रानडे यांजकडे पाहून आगरकर यांना ती मुकाट्यानें सहन करावी लागली. या माफी प्रकरणापूर्वींच कांहीं महिने–१८९२ च्या आगस्टांत–प्रिन्सिपॉल आपटे मृत्यु पावले होते. त्यांच्या मृत्यूनंतर आगरकर हे फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले.

पंडिता रमाबाई यांच्या शारदासदनाविषयींचे वादविवादांत आगरकर यांनीं लिहिलेले लेख फारच समतोलपणाचे आहेत. बाईंनीं हिंदु मुलींना ख्रिस्तीधर्माची दीक्षा देण्याचा अप्रत्यक्षपणें प्रयत्न करावा हें आगरकर यांस मुळींच रुचलें नाहीं व "धर्मासंबंधानें आमचीं मतें कशींही असलीं तरी हिंदु स्त्रियांनीं किंवा पुरुषांनीं कोणत्याही ऐहिक अथवा पारमार्थिक लाभासाठीं ख्रिस्ती व्हावें ही गोष्ट आम्हांस बिलकूल संमत नाहीं" हें आपलें मत त्यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें. तथापि पंडिता रमाबाईसंबंधीं अनुदार शब्द केव्हांही काढले नाहींत हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. पंडिता रमाबाईचा धर्माचे बाबतींतील उपद्व्याप आगरकर यांना जरी

नापसंत होता, तरी त्यांनीं हिंदु शारदासनाच्या आवश्यकतेची लोकांना जाणीव करून दिली व पुढें कर्वे यांचा अनाथबालिकाश्रम व गो. कृ. देवधर यांचें सेवा-सदन यांची स्थापना होऊन आगरकरांच्या सदिच्छेला मूर्त स्वरूप प्राप्त झालें.

टिळकांची मुलगी कृष्णाबाई हिचा विवाह त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणें कांहींसा प्रौढपणीं झाला म्हणून आगरकरांनीं टिळकांचें जाहीर अभिनंदन केलें परंतु 'सोळा वर्षेंपर्यंत आम्ही आपल्या कन्येचा विवाह करणार' म्हणून दुसऱ्या लोकांपासून एका काळीं सह्या मागणाऱ्या टिळकांनीं स्वतःच्या मुलीचें लग्न मात्र सोळाव्या वर्षापूर्वीच केलें म्हणून त्यांनीं टिळकांना हिणविलेंही. वस्तुतः आगरकर यांचें हें विधान सत्य होतें. परंतु त्याचा टिळकांना घुस्सा येऊन आगरकरांवर विनाकारण बरीच आग पाखडली; व आगरकर यांनींही आपलें समर्थन यशस्वी-रीतीनें केलें.

१८९३ सालच्या सुरवातीला सार्वजनिक हौदावर शूद्रांना पाणी भरूं देण्या-बद्दल सुधारकांत तत्संबंधीं लेख लिहून आगरकरांनीं बरीच खटपट केली. या प्रसंगाला अनुसरून आगरकरांनीं जातिभेदाच्या अनिष्टत्वासंबंधीं जी तर्कशुद्ध चर्चा केली आहे ती आजही वाचनीय आहे. १८९३ च्या मार्च महिन्यांत प्रो. धों. के. कर्वे यांनीं पुनर्विवाह लावला. या विवाहाच्या आमंत्रण-पत्रिकेवर आगरकर व रा.भि. जोशी यांच्या सह्या होत्या. यावरून कर्त्या सुधारकांना उत्तेजन देण्याकरितां आगरकर कसे एका पायावर तयार असत हें दिसून येतें.

आपल्यांच्या अमदानींत फर्ग्यूसन कॉलेजांत बी. ए. पर्यंत शिक्षण देण्याची परवानगी मिळविली होती. आगरकरांच्या अमदानींत या कॉलेजांत बी. एस्. सी. च्या संपूर्ण अभ्यासाची सोय झाली (१८९३). याच सालांत मुंबई येथें हिंदु मुसलमानांचा भयंकर दंगा झाला त्याला अनुलक्षून आगरकर यांनीं जे लेख लिहिले, त्यांत हिंदुमुसलमानांच्या एकीचें हिंदुस्थानच्या हितासंबंधीं विचार करतांना किती महत्त्व आहे याचें सुंदर विवेचन केलें आहे. तथापि त्यांत मुसल-मानांच्या धर्मवेडास घाबरून हिंदुलोकांच्या न्याय्य हक्काची पायमल्ली होऊं देतां नये, असेंही सरकारास त्यांनीं बजावण्यास कमी केलें नाहीं. १८९५ या सालीं चतुःशृंगीच्या माळावर फर्ग्यूसन कॉलेजची इमारत उघडण्याचा समारंभ मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सॅन्डहर्स्ट यांच्या हस्तें थाटानें साजरा करण्यांत आला. यामुळें आपण सुरू केलेल्या संस्थेला कायमचें स्वरूप आल्याबद्दल आगरकर यांच्या एका डोळ्यांचे

जरी पारणें फिटलें तरी आपटे हा प्रसंग पहावयास जिवंत नाहींत म्हणून त्यांच्या दुसऱ्या डोळ्यांत पाणी आल्याखेरीज राहिलें नाहीं. १८८० सालांत न्यू इंग्लिश स्कूल निघालें. ही शिक्षणसंस्था वाढीस लागून, पंधरा वर्षांचे अवधींत तिला एवढें मोठें स्वरूप प्राप्त झालेलें पाहून गोपाळरावांना धन्यता वाटली असेल हें खरें, परंतु या कालावधींत कालवश झालेल्या कित्येक जोडीदारांची आठवण होऊन, गोपाळरावांच्या अंतःकरणांत परस्परविरुद्ध भावना उचंबळून येऊन त्यांच्या मनाची किती चमत्कारिक स्थिति झाली असली पाहिजे याची कल्पनाच करणें बरें.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी व पर्यायानें फर्ग्यूसन कॉलेज यांवरील काळाची वक्र दृष्टि कमी झाली नव्हती. प्रिन्सिपॉल आपटे यांच्या मृत्यूनंतर प्रो. धारप व पुढें कांहीं दिवसांनीं प्रो. वा. बा. केळकर हेही दिवंगत झाले. उपरोक्त संस्थांशीं प्रत्यक्ष संबंध नसला तरी त्यांजविषयीं सहानुभूति बाळगणारे न्यायमूर्ति तेलंग व शंकर पांडुरंग पंडित यांनाही दरम्यानचे काळामध्यें मृत्यु आला होता. अशा रीतीनें आपल्या मित्रमंडळांतील देदीप्यमान तारे एकामागून एक दिवंगत होत असलेले पाहून गोपाळरावांच्या मनांत स्वतःच्या मृत्यूबद्दलचे विचार वारंवार डोकावणें अगदीं स्वाभाविक होतें. कॉलेजांतील दगदग त्यांच्या क्षीण प्रकृतीला झेंपेनाशी झाली होती. दम्याच्या विकारानें पुन्हां उचल खाऊन त्यानें गोपाळरावांना अगदीं हैराण करून सोडलें होतें. या दम्याच्या विकारावर गोपाळरावांनीं इतकीं विविध औषधें सेवन केलीं होतीं कीं, मरणोत्तर आपल्या पोटांतील औषधसामग्रीवर एक दवाखानाच उघडतां येईल असें ते विनोदानें नेहमीं म्हणत. शिवाय मृत्यूनें त्यांच्या स्नेहीमंडळांतील एक एक इसम कमी करून त्यांच्या सभोंवतीं पिंगा घालण्यास जी सुरवात केली होती, त्यामुळें मरणाविषयींची भीति कमी कमी होत जाऊन ते त्याच्या स्वाधीन होण्यास आपण होऊन तयार झाले होते. व त्याप्रमाणें १८९५ सालच्या जून महिन्यांत त्यांचा अंत झाला. प्रो. केळकर यांजवरील मृत्युलेख हाच आगरकर यांच्या लेखणींतून उतरलेला शेवटचा लेख होय. हा लेख लिहीत असतां ते स्वतःचाच मृत्युलेख लिहीत होते असें म्हणावयास हरकत नाहीं. मरणाच्या दिवसाच्या अगोदर दोन दिवस शनिवारीं गोपाळरावांनीं एक जालीम रेचक घेतलें होतें, त्यामुळें त्यांचा शक्तिपात झाला. रविवारीं त्यांना अगदीं गळल्यासारखें वाटत होतें. रविवारीं रात्रीं ते स्वतः उठून शौचाला जाऊन आले व आपल्या पत्नीला म्हणाले,

" आतां मला थोडें बरें वाटत आहे. मी आतां निजतों. आणि तुम्हीहि निजा " असें म्हणून ते झोपीं गेले तीच त्यांची कालनिद्रा ठरली. ( १७ जून १८९५ सोमवार ) अशा रीतीनें सोमवारीं पहांटे गोपाळरावांनीं आपला देह ठेवला व सकाळ होतांच मुळामुठेच्या तीरावर हजारों मंडळीच्या समक्ष त्याला अग्निसात् करण्यांत आलें ! आगरकरांच्या अखेरच्या दुखण्यांत टिळकांनीं त्यांची भेट घेतली होती व गोपाळरावांच्या स्मशानयात्रेलाही ते हजर राहिले होते. मरणापूर्वी कांहीं दिवस अगोदर ज्या ज्या वेळीं मृत्यूसंबंधींची गोष्ट निघे तेव्हां गोपाळराव म्हणत असत कीं " आतां मी मरणाला तयार आहें. मला लोकांना जें सांगावयाचें होतें तें मी सांगून टाकलें आहे. " आगरकर यांनीं स्वतःचे मरणाविषयीं हे उद्गार काढलेले ऐकिले कीं गिबनची आठवण होते. गिबन हा आगरकरांचा एक आवडता ग्रंथकार होता. आगरकर व गिबन यांच्यामध्यें कांहीं बाबतींत बरेंच साम्य होतें; गिबन यानें देखील आपला रोमन साम्राज्याच्या ऱ्हासावरील प्रचंड इतिहासग्रंथ लिहून पुरा केल्यानंतर स्वतःच्या मरणासंबंधानें आगरकरांच्या प्रमाणेंच उद्गार काढले होते.

आगरकर हे आपल्या वयाच्या ३९ व्या वर्षी मरण पावले. एवढ्या अल्पायुष्यांत त्यांनीं केवढी प्रचंड कामगिरी केली हें पाहिलें म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. गरीब घराण्यांत झालेला त्यांचा जन्म, शिक्षणाकरितां त्यांना भोगावे लागलेले शारीरिक व मानसिक कष्ट, आयुष्यांत आलेल्या अनेक संकटांना तोंड देण्यांत दाखविलेलें धैर्य व लोकसेवेचें त्यांनीं आमरण चालविलेलें व्रत, ह्या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्या म्हणजे त्यांचें चरित्र लहानापासून थोरांपर्यंत सर्वांसच कसें आदरणीय व आदर्शवत् आहे हें कळून येतें. साधी राहाणी व उच्च विचारसरणी याचें आगरकर हें मूर्तिमंत उदाहरण होय. ' सुधारक ' चालविणारा गृहस्थ पंचा नेसलेला, अंगांत बंडी घातलेला व डोक्याला फडकें गुंडाळलेला असा दिसेल, अशी स्वप्नांतही कल्पना नसल्यामुळें आगरकर यांना भेटावयास आलेला इसम आश्चर्यानें किती थक्क झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. आगरकर यांचें लौकिक चरित्र जितकें उज्ज्वल तितकेंच त्यांचें खाजगी चारित्र्यही निष्कलंक होतें. त्यांची तत्वनिष्ठा केवळ अलौकिक होती ! सत्यवक्तेपणा व स्पष्टवक्तेपणा हे त्यांचे प्रधान गुण होते. त्यांची बुद्धि जितकी कठोर व तीव्र होती तितकेंच त्यांचें अंतःकरण उदार व कोमल होतें. त्यांचा स्वभाव अत्यंत सरळ असून,

मन जात्याच प्रेमळ होतें; यामुळें त्यांनीं आयुष्यांत जे मित्र जोडले त्यांना त्यांनीं आपण होऊन केव्हांही अंतर दिलें नाहीं. त्यांना कवित्वशक्ति नव्हती तरी कवीची सहृदयता होती. ते स्वभावतःच विनोदी असल्यामुळें आयुष्यांतील अगदीं खडतर प्रसंगांतही त्यांच्या मनाची प्रसन्नता कधीं ढळली नाहीं. बौद्धिक व शारीरिक गुलामगिरीचा तिटकारा व स्वातंत्र्याची निस्सीम आवड हे त्यांचे स्वभावधर्मच होते. उभ्या आयुष्यांत त्यांनीं स्वतःला व स्वतःचे मतांना विकलें नाहीं. ते जन्मानें दरिद्री होते तरी मनाचे फार उदार होते. पैशांचा लोभ त्यांनीं कधींही धरला नाहीं. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कागदपत्र पहात असतां गोपाळराव गोखले यांना पैशांची एक पुरचुंडी मिळाली. त्यावर मारलेल्या चिठ्ठीवरील "माझ्या प्रेतदहनार्थ" हीं अक्षरें वाचून गोखले यांना रडूं कोसळलें. गोपाळराव गोखले हे आगरकर यांचे स्नेही. त्यांना रडूं कोसळलें यांत आश्चर्य नाहीं. पण आजही ही हकीगत वाचतांना भडभडून आल्याखेरीज राहत नाहीं. आगरकर यांच्या निधनानंतर त्यांचा 'सुधारक' कांहीं दिवस चालला व बंद पडला. मध्यंतरीं कांहीं काळपर्यंत त्याचें पुनरुज्जीवनही झालें. परंतु सुधारकांचें सौभाग्य आगरकरांबरोबरच नष्ट झालें. 'सुधारक' निघाल्यापासून सी. ग. देवधर व पुढें गोपाळराव गोखले यांनीं आगरकर यांना तो चालविण्यांत हरतऱ्हेचें साहाय्य केलें. तथापि आगरकर यांच्या मरणानंतर त्यांच्या 'सुधारका'लाही पुढें लवकरच मरण आल्याचें पाहिलें म्हणजे आगरकर यांच्या पुढची पिढी नादान निपजली व त्यांच्यांत आगरकरांमध्यें दिसून येणारा जोम व तडफदारपणा राहिला नाहीं हें कबूल करावें लागतें. असो.

आगरकर यांच्या मतांवर मिल् व स्पेन्सर यांच्या विचारसरणीची विशेष छाप पडलेली असल्यामुळें धार्मिक बाबतींत ते अज्ञेयवादी बनले होते. धर्मासंबंधीं विचार करतांना त्यांनीं श्रद्धेला अजिबात फांटा देऊन, निव्वळ तार्किक बुद्धीवरच सर्व भिस्त ठेवल्यामुळें रावसाहेब रानडे यांनीं आगरकरांवर नास्तिकपणाचा आरोप केला होता. आगरकरांप्रमाणेंच टिळक हेही नास्तिकच होते. किंबहुना नास्तिकपणांत टिळक अज्ञेयवादी आगरकरांपेक्षां पुढें गेले होते असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु त्यांचें लौकिक वर्तन 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥' या गीतेंतील श्लोकार्धाला अनुसरून असल्यामुळें टिळक धर्ममार्तंड असल्याबद्दल त्यांची उगाच ख्याति झाली; व आगरकरांच्या

विचारसरणीप्रमाणें त्यांची करणी असल्यामुळें त्यांच्या नास्तिकपणाबद्दल मात्र लोकांचा त्यांजवर गहजब झाला ! आगरकर जवळ जवळ नास्तिक असले तरीं 'संशयात्मा विनश्यति' याप्रमाणें त्यांची स्थिति झाली नाहीं. यावरून नास्तिक मनुष्याची अंतःकरणप्रवृत्ति सत्प्रवृत्त व उदार असली तर तोही या जगांत आनंदी व सुखी होऊं शकतो हें सिद्ध होतें.

खरें पाहिलें असतां आगरकर हे धार्मिक बाबतींत उदारमतवादी होते व त्यांनीं दुसऱ्यांच्या धर्मभावना विनाकारण केव्हांहि दुखविल्या नाहींत. त्यांनीं हिंदुधर्मावर केलेली टीका ही हिंदुधर्मांतील मूलभूत तत्त्वांसंबंधीं नसून त्यांतील दांभिकपणा व घातक रूढी यांवर होती हें विसरतां कामा नये.

आगरकर म्हणजे समाजसुधारक अशीच सर्वसाधारण समजूत असल्यामुळें त्यांचे राजकीय विचार त्यांच्या सामाजिक मतांइतकेच जहाल होते, याचा विसर पडतो. सुधारक म्हटला म्हणजे तो राजकीय बाबतींत मवाळ असावयाचा हा संकेत आगरकरांच्या निधनानंतर प्रचारांत येऊन रूढ झाला. राजकारणांत जहाल समजल्या जाणाऱ्या खुद्द टिळकांनाही आगरकर यांचीं राजकीय मतें मवाळ होतीं असा आरोप करतां आला नाहीं. राजकीय बाबतींत मिल्‌प्रमाणेंच ते व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. समाजाकरितां व्यक्ति नसून व्यक्तीकरतां समाज आहे अशी त्यांची विचारसरणी होती. तथापि आगरकर यांचा सुखवाद उदात्त स्वरूपाचा होता. "सुखोपभोगासाठीं सर्व प्राणिमात्र धडपडत असतो व ज्यास जो प्राप्त होईल त्यानें त्यापासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे. पण ज्या सुखोपभोगामुळें निरंतर तो घेतां येण्याची शक्यता नाहींशी होते, बुद्धीस मांद्य येतें, गात्रें निःसत्व होतात, उत्साह नाहींसा होतो, आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो, अशा सुखोपभोगांत निमग्न असण्यांत काय फायदा आहे बरें ?" या उताऱ्यावरून सुखासंबंधीं आगरकर यांची दृष्टि किती उदात्त होती हें ध्यानांत येतें.

आगरकर यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यासंबंधींच्या कल्पनांचें नीट आकलन झालें म्हणजे त्यांच्या सामाजिक मतांसंबंधीं अटकळ बांधतां येते. समाजांतील व्यक्तींचे परस्परांशीं असलेले संबंध समतेच्या उदार तत्वांवर अधिष्ठित झाले पाहिजेत असें त्यांचें मत होतें. सामाजिक जुलमाचे ते द्वेष्टे होते. स्त्रीपुरुषांतील निसर्गसिद्ध भेदाला धक्का लागणार नाहीं इतकी काळजी घेऊन स्त्री

न पुरुष यांना शक्य तितकें स्वातंत्र्य द्यावें, असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. सामाजिक तत्वांचा पुरस्कार करतांना आगरकर यांनीं आपली प्राचीन आर्य संस्कृति विचारांत घेतली नाहीं असा त्यांजवर आरोप करण्यांत येतो, पण त्यांत कांहींएक तथ्य नाहीं. " मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगिकार करीत गेलों तरच आमचा निभाव लागणार आहे." या खेरीज ' भारतीय कलांचें पुराणत्व ' या आपल्या विद्वत्ताप्रचुर निबंधांत आगरकर यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः—" अनेक गोष्टींत आम्ही आज मित्तीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडो योजनें आहों, व आम्हीं त्यांपासून शिकण्यासारख्या अनेक वस्तू आहेत, हें निर्विवाद आहे. पण एवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं ज्याचा आम्ही अभिमान मानावा किंवा ज्याच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें, असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं...नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं, त्यासंबंधानें आज मित्तीससुद्धां आम्हांस कोणापुढें खालीं पहाण्याची आवश्यकता नाहीं." आगरकर यांनीं काढलेल्या या उद्गारांवरून उपरोक्त आरोप किती वृथा व भ्रामक आहे याची खात्री होईल. आगरकर यांनीं हिंदु समाजांतील चालीरीतींचा किती सूक्ष्म अभ्यास केला होता हें त्यांनीं 'सुधारकां'तून लिहिलेल्या निबंधांचे नुसते मथळे वाचूनही कळण्यासारखें आहे. 'सोंवळ्याची मीमांसा,' 'प्रियाराधना,' 'वल्लभोपासना,' 'आमचे प्रेतसंस्कार,' 'वडीलपणाचे हक्क,' 'भेटी, देवदर्शनें व यात्रा,' 'शनीदेव ऊर्फ साडेसातीचा देव,' 'स्वयंवर,' 'आमच्या स्त्रियांचा पेहराव,' 'आम्हां पुरुषांचा पेहराव,' 'अंडीं खाण्यास काय हरकत आहे,' 'आत्मा व पिशाच,' 'मृतात्म्यांची दिनचर्या,' 'थडगीं व देवळें,' 'पुजारी व पंचाक्षरी,' 'हजाम व हजामती,' 'स्नान व आंघोळ,' 'गंधलेपन,' 'सणांचा व खेळांचा न्हास,' 'स्वच्छतेसाठीं घाणेरडा विषय,' 'मिसेस बिझॅंट आणि गंगास्नान' इत्यादि विषय आगरकर यांनीं चर्चेला घेतले होते हें पाहून अचंबा वाटतो. त्याचप्रमाणें आगरकर यांची लिहिण्याची पद्धति

किती चटकदार होती याचीही कल्पना करतां येते. आगरकर यांनीं ३५।४० वर्षांपूर्वी सुचविलेल्या व चर्चिलेल्या कित्येक सामाजिक सुधारणांची आवश्यकता आजही तीव्रतेनें भासत आहे, हें ही गोष्ट ध्यानांत ठेवली म्हणजे त्यांनीं या सुधारणांचा किती खोलवर विचार केला होता हें तर दिसून येतेंच, पण त्यांचे निबंध आजही नव्यानें वाचण्याचे लायखीचे आहेत याचीही जाणीव होते. याखेरीज सामाजिक सुधारणांच्या ज्या मूलभूत तत्वांचा आगरकर यांनीं पुरस्कार केला आहे तीं अनेक सामाजिक स्थित्यंतरें झालीं, तरी फारशीं बद-लण्यासारखीं नाहींत, हें पाहिलें म्हणजे त्यांची विचार करण्याची पद्धति किती पायाशुद्ध होती हें कळून येतें. स्त्रीवर्गासंबंधीं आगरकर यांनीं त्या काळांत ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्यांतील कित्येक आजही अमलांत आलेल्या नाहींत. मुलांमुलींना एकत्र शिक्षण द्यावें, स्त्रियांनीं उच्च शिक्षण घेतलें पाहिजे, मुलींना पतीची निवड स्वतः करण्याइतकें त्यांना स्वातंत्र्य द्यावें, मुलींची विवाह-मर्यादा निदान चौदा वर्षांपर्यंत वाढवावी या व अशा तऱ्हेच्या सुधारणांचा आगरकर यांनीं त्या वेळच्या परिस्थितींतही धडाक्यानें पुरस्कार केला, यावरून ते समा-जाच्या किती पुढें होते हें दिसून येतें.

आगरकर यांनीं सामाजिक सुधारणेशिवाय हिंदुस्थानला वर डोकें काढावयाला नको, असें प्रतिपादन करण्याला सुरवात केल्यामुळें स्वाभाविकच आधीं राजकीय सुधारणा कीं आधीं सामाजिक सुधारणा हा वाद उपस्थित झाला. हा प्रश्न लेख-णीच्या एका फटकाऱ्यासारखा सोडविण्याइतका सोपा नाहीं. हिंदुस्थानांतील परकीयांचें राज्य, हिंदु लोकांतील जातिभेद, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, हिंदु-मुसल-मानांचे हितसंबंध या सर्व गोष्टी विचारांत घेऊनच या बिकट प्रश्नाची चर्चा केली पाहिजे. ती चर्चा करण्याचें अर्थातच हें स्थळ नव्हे. तथापि आगरकर यांनीं सुचविलेल्या कित्येक सामाजिक सुधारणा केवळ अशा स्वरूपाच्या होत्या कीं त्यांमध्यें उपरोक्त प्रश्न निघण्याचेंच कारण नव्हतें. पण या वादविवादांत जो धुरळा उडाला त्यामध्यें सर्व सामाजिक प्रश्न सारख्याच स्वरूपाचे दिसूं लागले.

आगरकर यांनीं अर्थशास्त्राचा चांगला अभ्यास केला होता व हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या कारणाचीही त्यांनीं बरोबर मीमांसा केली होती. आपल्या देशांत स्वदेशी उद्योगधंद्याची वाढ कशी होईल याविषयीं त्यांनीं अनेक मार्मिक सूचना केल्या आहेत. " आमच्या इकडील अलीकडल्या सुशिक्षित लोकांपैं सरकारी

नोकरीवर सगळा जीव ठेवल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे. बरें, हाडांचीं काडें करून, शेंकडों रुपये खर्च करून बी. ए. पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढें फळ काय ? तर रेव्हेन्यू खात्यांत किंवा शाळा खात्यांत ३०।३५ रुपये दरमहाची नोकरी ! चांगला सुतारसुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५।३० रुपये सहज मिळवितो हें या ग्रॅज्युएटांस समजूं नये काय ?......कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय ? विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे ? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वतःचे करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आतां कोठें राहिली आहे ?" आगरकर यांनीं त्या काळीं काढलेले हे उद्गार आजही किती यथार्थ आहेत बरें ?

आगरकर यांचे लिखाणांत विचारांचे प्रौढत्वाइतकीच भाषेची प्रगल्भताही दिसून येते. किंबहुना त्यांच्या भाषेच्या जोरदारपणाचा उगम त्यांच्या विचारांच्या तीव्रतेंतच झाला असला पाहिजे, असें म्हणावयास हरकत नाहीं. एऱ्हीं अंतःकरण पिळवटून निघाल्याखेरीज इतके हृदयस्पर्शी उद्गार कसे निघणार ? उत्कृष्ट भाषाशैलींत आवश्यक असणारे बहुतेक गुण आगरकरांच्या लेखनपद्धतींत प्रकर्षानें आढळतात. आगरकरांच्या भाषासरणीवर त्यांच्या व्यक्तिविशिष्टतेची छाप सर्वत्र दिसून येते. विचारसरणींतील निर्भयता आणि मतप्रतिपादनांतील सडेतोडपणा व आवेश, यामुळें त्यांच्या लिखाणाला इतका जिवंतपणा आलेला आहे, कीं तें वाचतांच मृतप्राय झालेली विचारशक्ति खडबडून जागी व्हावी ! आगरकरांच्या भाषासरणीला खवळलेल्या समुद्राचीच उपमा देणें योग्य होईल. समुद्राच्या पृष्ठभागावरून एकामागून एक झपाट्यानें झोकावत जाणाऱ्या लांबच लांब लाटांप्रमाणें त्यांच्या वाक्यपंक्ति, सागराच्या अफाटपणाची व अगाधत्वाची आठवण करून देणारें त्यांचें लेखनांतील अर्थगौरव व विचारगांभीर्य, फेंसाळलेल्या लाटांच्या गतीलाही मागें टाकणारा त्यांच्या भाषासरणींतील ओघ आणि आवेश, व वडवानलालाही चटका बसेल असा त्यांच्या शब्दांतील दाहकपणा इत्यादि गुणसमुच्चयामुळें आगरकरांची लेखनपद्धति ओजस्वी आणि प्रभावशाली झाली आहे. आगरकरांचें शब्दभांडारही रत्नाकराचीच जाणीव करून देतें. सुंदर कल्पनांप्रमाणें सुंदर शब्द देखील त्यांच्या निबंधांत गर्दी करून बसलेले आढळतात.

उपमा, उत्प्रेक्षा व रूपक इत्यादि अर्थालंकारांचा त्यांनीं आपल्या लिखाणांत सढळ हातानें उपयोग केला आहे. "सुधारणेच्या शब्दांतःपुराच्या बाहेर संचार होऊं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करणाऱ्या नानाविध धर्मकल्पनांशीं तुमुल संग्राम करण्यास ज्यांना स्फुरण यावें, त्याच्या भोंवतालीं उभारलेल्या प्रचंड लोकमततटास ढांसळून पाडण्यास ज्ञानतोफांस ज्यांनीं सरबत्ती द्यावी, व त्यास गराडा घालणाऱ्या रुढिखंदकावर क्रियासेतु बांधण्यास ज्यांनीं प्रवृत्त व्हावें, अशा विद्याचारसंपन्न लोकांनीं दुराग्रहाच्या भरी भरून व शुष्क बाबतींत दुही माजवून आपल्या मुख्य कर्तव्याची हेळसांड होऊं द्यावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय." अशा पद्धतीचे वाक्यसमूह आगरकरांच्या निबंधांत ठिकठिकाणीं आढळतात.

आगरकर यांची वर्णनशैली इतकी बहारदार आहे कीं वर्णनविषयीभूत गोष्टीचें मूर्तिमंत चित्रच मनश्चक्षूंपुढें उभें राहावें.

"ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे; ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागावर तारुण्याचें तेज चकाकत आहे; विषयवासना जागृत झाल्यामुळें उत्साहानें व उत्कंठेनें अननुभूत सुखास्वादाच्या अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत, दृष्टींत व चर्येत लज्जा, अधीरता, साशंकपणा वगैरे परस्परविरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्यांचे हरएक प्रयत्न चालले आहेत; विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनीं आपणास होईल तितकें अलंकृत करून, अन्योन्यास मोह पाडण्याविषयीं जे अहोरात्र झटत आहेत; ज्यांना आपण रतिमन्मथाचे पुतळे आहों व विधात्यानें आपली विवाहमैत्री व्हावी, असें योजूनच त्यानें आपणास निर्माण केलें.... अन्योन्य समागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यांस युगतुल्य झाला असून जे सूर्याच्या अश्वास मंदगतित्वाबद्दल निंदूं लागले आहेत व यामिनीस आपली समागमकारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे जे डोळे लावून बसले आहेत; अशा स्त्रीपुरुषांच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणीकडे? आणि पंतोजीच्या मार खाणाऱ्या व अभ्यासाखालीं अर्धमेल्या झालेल्या, दुर्बल भेकड आणि लुस्कान अशा आमच्या सोळा सतरा वर्षांच्या बहुतेक पोरांच्या आणि बावलाबावलीचा व भातुकुलीचा ज्यांचा खेळ नुकताच सुटला आहे, व नवरा म्हणून ज्याच्याशीं आपला एकप्रकारें विशेष संबंध झाला आहे, अशा

मराठी ग्रंथ



आमच्या बारा तेरा वर्षांच्या निस्तेज लाजाळू व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या महालाची बहार कोणीकडे ?" आगरकरांनीं वर्णिलेलीं परस्परविरुद्ध अशीं हीं दोन दृश्यें किती हुबेहुब वठलीं आहेत.

आगरकरांची भाषा बरीच संस्कृतप्रचुर आहे. प्रचारांतील सोपे मराठी शब्द योजण्यापेक्षां तद्वाचक संस्कृत शब्द योजण्याकडेच त्यांचा विशेष कल दिसून येतो. व्यवच्छेदन, विजयलांछनें, हतपुंस्त्व, वैकल्य, कृष्णरेषा, संतानसमुदायासह, उपायन, सुखसंलाप, लौकिकाभिलाषी, सेवाचिकीर्षु, रुच्यंतर इत्यादि शब्दांवरून उपरोक्त विधानाची सत्यता पटेल. मराठींत रूढ झालेल्या इंग्रजी शब्दांबद्दल देखील आगरकर यांनीं मुद्दाम तदर्थवाहक संस्कृतप्रचुर शब्द योजिले आहेत. 'सामाजिक संनिधान' ( Social organization ) 'मृताक्षर' ( Dead letter ) 'नष्ट नंदनवन' ( Paradise Lost ) बालकुक्कुटार्के, रक्तवर्धक व शक्तिवर्धक औषधें ( Tonics ), सार्ववास्तविक ( Universal ), क्षीरपथ ( Milky way ), बाष्परथ, मूकोत्सेध ( Tower of silence ) यांसारखे अनेक शब्द आगरकरांच्या निबंधांत पहावयास सांपडतील. तथापि 'चर्चांत जाऊन प्रेअर करणें' यांसारखे घेडगुजरी शब्द देखील त्यांनीं क्वचित् ठिकाणीं वापरले आहेत. मिल्ल, स्पेन्सर वगैरे लेखकांच्या ग्रंथाधारें समाजशास्त्रावर लिहितांना आगरकर यांनीं 'वन्यावस्था', 'जातिप्रवाह', 'सत्ताधीनत्व', 'लोकाग्रणी' यांसारखे शब्द मराठींत रूढ केले. 'शिलावस्था' 'साक्षात् किंवा परंपरेनें' इत्यादि शब्द आगरकरांच्या विशेष आवडीचे असून त्यांचा उपयोग आपल्या निबंधांत त्यांनीं ठिकठिकाणीं केला आहे. 'स्वामी-सेवक' 'अग्रणी-अनुयायी,' 'ग्राहक-विक्रेता,' 'श्रेष्ठ-कनिष्ठ,' 'जित-जेते,' 'शास्ते-शासित' या व अशा प्रकारच्या शब्दांच्या जोड्या वापरणें हा आगरकरी भाषाशैलीचा आणखी एक विशेष आहे.

आगरकर यांनीं कित्येक सामाजिक विषयांचें प्रतिपादन इंग्रजी ग्रंथांच्या आधारें केलें असूनही इंग्रजी पद्धतीची वाक्यरचना आगरकरांच्या निबंधांत कोठेंही दिसून येत नाहीं. हा त्यांचा गुण आधुनिक सुशिक्षित लेखकांनीं उचलण्यासारखा व गिरविण्यासारखा आहे.

'वाचालमंद सुधारकांनों', 'विषय-लंपट निःशक्त वाचाळ बाबूंनों', 'हे भीषण, बिभत्स, अमंगळ हिंदुधर्मा,' 'निर्दय वंचका,' इत्यादि संबोधनसमूहानें युक्त अशीं

वाक्यें लिहावयाला आगरकरांनीं सुरवात केली म्हणजे प्रचंड श्रोतृसमुदायासमोर ते अस्खलितपणें आवेशयुक्त भाषणच करीत आहेत कीं काय असा भास होतो. आगरकर यांच्या प्रश्नार्थक वाक्याची सरबत्ती सुरू झाली म्हणजे बाणभट्टाच्या तत्सदृश्य वाक्यपंक्तींची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. बाणभट्टाप्रमाणेंच आगरकर यांच्या लेखनपद्धतींत प्रगल्भता व ओज हे गुण प्रकर्षानें आढळतात. फरक एवढाच कीं, बाणभट्टाप्रमाणें आगरकर यांनीं शृंगारादि रसांचा निव्वळ कलाविकासाच्या दृष्टीनें परिपोष करण्याकरितां आपली लेखणी झिजविली नाहीं. तर या गुणसमुच्चयाचा उपयोग केवळ रसिकरंजनार्थ न करितां लोककल्याणार्थ केला. पराकाष्ठेची कळकळ, जाज्वल्य देशाभिमान, विचारसरणींतील तर्कशुद्धता व ते मांडण्यांत निःसंदिग्धता व निस्पृहपणा, लोकसेवेची खरी आवड, सत्यप्रीति, मनाचा दिलदारपणा, प्रतिपक्षांविषयींची उदार बुद्धि, व अंतःकरणाचें पावित्र्य इत्यादि गुणसमुच्चयामुळें आगरकर यांचें लिखाण मराठी वाङ्मयांत चिरस्थायी होऊन बसलें आहे.

निबंधकार या दृष्टीनेंही आगरकर यांना मराठी वाङ्मयांत स्वतंत्र व उच्च स्थान आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणेंच आगरकर यांनीं देखील निबंधलेखनद्वारें लोकजागृतीचें कार्य केलें. तथापि दोघांचे मार्ग भिन्न होते. विष्णुशास्त्री यांनीं स्वकीय-संस्कृतीचे पवाडे गाऊन लोकांच्या अंतःकरणांत स्वाभिमानाची ज्योत पेटविली व त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न केला. असें करतांना आपल्या प्राचीन परंपरेची व वैभवाची फाजिल स्तुति व परकीय संस्कृतीची फाजील निंदा या तात्कालिक उपायांचा त्यांनीं अवलंब केला. विष्णुशास्त्री यांनीं लोकांच्या भावना उद्दीपित करून स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांविषयीं जनतेंत अभिमान उत्पन्न केला; तर आगरकर यांनीं समाजाच्या बुद्धीस चालना देऊन त्यांस विचार करावयास लाविलें. आपली स्थिति लाजिरवाणी तर खरीच; तथापि त्याला कारण आपणच, हें सत्य आगरकर यांनीं दांभिक, दुरभिमानी व दुराग्रही समाजाच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला. सर्वसामान्य जनता ही निर्बुद्ध व भावनाप्रधान असल्यामुळें विष्णुशास्त्री यांना आपल्या मोहक वाणीनें त्यांच्या मनास भुरळ घालतां आली, व अशा रीतीनें लोकांचीं अंतःकरणें आपणाकडे ओढून घेऊन त्यांत स्वदेशाभिमानाची ज्योत पेटविणें त्यांस सुलभ गेलें. तथापि केवळ भावनाधिरूढ झालेला हा स्वाभिमान गवताच्या गंजीला लावलेल्या आगीहून जास्त

प्रभावशाली व टिकाऊ होणें शक्य नव्हतें. तो प्रभावशाली व चिरस्थायी करण्याचें काम टिळक व आगरकर यांनीं आपल्या परीनें उत्तम केलें. विष्णुशास्त्री यांनीं पेटविलेल्या स्वदेशाभिमानाच्या ज्योतीला टिळक व आगरकर यांनीं योग्य वेळीं इन्धन पुरविलें नसतें तर ती ज्योत किती वेळ जीव धरून राहिली असती हें सांगणें फार कठिण आहे.

विष्णुशास्त्री यांनीं स्वकीयांचे गुण गौरवून सांगितले, तर आगरकर यांनीं स्वजनांचें दोषाविष्करण केलें. शास्त्रीबोवांनीं मिशनरी लोकांची टर करून त्यांचा धर्म हास्यास्पद ठरविला, तर आगरकर यांनीं स्वधर्मातील अनिष्ट चालीरीतींचा निर्देश करून त्यांची हास्यास्पदता स्वकीयांच्या नजरेस आणिली, व परधर्मीयांच्यांत जेवढें चांगलें आहे त्याचा स्वीकार करण्याबद्दल त्यांस आग्रह केला. विष्णुशास्त्री आणि आगरकर यांच्या लेखनपद्धतींतही फरक आहे. शास्त्रीबोवांची लेखनपद्धति कांहींशी पंडिती थाटाची आहे. मऊ गालिच्यावर बसून व लोडाशीं टेकून काव्यशास्त्रविनोद करावा त्याप्रमाणें विष्णुशास्त्री यांची भाषाशैली आहे. शास्त्रीबोवांच्या लेखनास एकप्रकारचें बैठें स्वरूप आहे. याच्या उलट आगरकरांची लेखनशैली गतिमान आहे. तिच्यांत अभिजात वक्त्याचे गुण क्षणोक्षणीं दृष्टीस पडतास. चिपळूणकरांची भाषासुंदरी नखरेबाज, अलंकारप्रिय, गजगामिनी, मंजुभाषिणी, शृंगारयुक्त चेष्टा करणारी व दृष्टिक्षेप करणारी आहे. तिचें बोलणें मधुर तर खरेंच पण वक्रोक्तिपूर्ण आहे. ती दुसऱ्यांचीं व्यंगें दाखवून त्यांचा पाणउतारा करण्यांत आनंद मानते. ती मनाची उथळ, विचारांची कोती, हेकेखोर व हट्टी आहे. आगरकर यांची भाषासुंदरी अलंकारप्रिय नाहीं असें नाहीं पण पोक्त व ठसकेबाज आहे. ती दृष्टीला दृष्टि लाऊन बोलते पण तिच्या डोळ्यांत पाप नाहीं. तिच्या बोलण्याचालण्यांत मूर्तिमंत पावित्र्य दृग्गोचर होतें. ती सडेतोड बोलणारी पण अंतःकरणाची प्रेमळ आहे. दुसऱ्याची चूक दाखविण्यांत ती कसूर करणार नाहीं पण त्यांचा पाणउतारा करणार नाहीं. ती मनाची थोर, अंतःकरणाची उदार व व्यवहारास सरळ आहे. तिला फसविण्याचा प्रयत्न केला तर ती रागावते. पण तिचा राग फार वेळ राहात नाहीं. तिला विनोद प्रिय आहे, पण त्याचा उपयोग ती दुसऱ्याला हिणविण्यांत न करतां मन प्रफुल्लित करण्याकडेच करते.

टिळकांच्या भाषापद्धतीपेक्षां आगरकर यांची लेखनपद्धति अधिक प्रौढ व अलंकारप्रचुर आहे. टिळकांच्या लिखाणांत एक प्रकारचा दुराग्रहीपणा आढळतो व त्यांच्या त्वेषाला क्वचित् द्वेषाची झांक मारते. आगरकरांच्या लेखनपद्धतींत त्वेष कितीहि असला तरी त्याला द्वेषभावनेचा वासही येत नाहीं. टिळकांच्या टीकेचा भडिमार बहुशः व्यक्तींवर होत असे, तर आगरकर यांच्या तोफखान्याची सरबत्ती केवळ दांभिक समाजावर होत असे. टिळकांचे विषदिग्ध वाग्बाण प्रतिपक्ष्याला जखम करून शिवाय त्याच्या शरीराचा दाहही करीत; परंतु आगरकरांचे तीक्ष्ण व अणकुचीदार शब्दशर शत्रूंच्या वक्षःस्थलांतून आरपार निघून जात. टिळकांचा विनोद चावरा असून, त्याचें पर्यवसान बहुधा उपहासांत होतें, परंतु आगरकर यांच्या उपहासात्मक विनोदांतूनही सात्विकतेचा लोप होत नाहीं, इतका तो शुद्ध स्वरूपाचा आहे. आगरकर यांच्या बोलण्यांत जितका विनोद येत असे तितका त्यांच्या लेखनांत दिसून येत नाहीं हें खरें. त्यांनीं समाजाला शिक्षण देण्याकरितांच हातांत लेखणी धरली असल्यामुळें निव्वळ विनोदी अशा लेखांची त्यांच्यापासून अपेक्षा करणें वेडेपणाचें होईल. परंतु त्यांनीं मनांत आणलें असतें तर ते चांगले विनोदी लेख लिहूं शकले असते, इतका पुरावा त्यांच्या निबंधांत मिळण्यासारखा आहे. त्यांच्या विनोदांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची कल्पकता, गडकऱ्यांचा कोटीबाजपणा, शिवरामपंत परांजप्यांची वक्रोक्ति आणि उपहास व नरसिंह चिंतामण केळकरांचा चटकदारपणा इत्यादि गुण प्रकर्षानें आढळले नाहींत, तरी ह्या सर्व गुणसमुच्चयाचें मिश्रण त्यांच्या विनोदांत आढळून येतें. आगरकरांच्या विनोदाचा उत्तम मासला त्यांच्या 'शनीदेव ऊर्फ साडेसातीचा देव' या निबंधांत पहावयास सांपडतो. या निबंधाचे शेवटीं जोडलेली शनीदेवाची आरती उद्धृत करण्याचा मोह आम्हांस आवरत नाहीं.

जयदेव जयदेव जय शनीराया ॥
आज मज झाली बुद्धि तुजला वर्णाया ॥ जय० ॥
भाविक शास्त्रज्ञांसी संमत अशि गाया ॥
गाउनि चित्ताकर्षी केली तव कथा ॥
यास्तव प्रसन्न होउनि वर माग आतां ॥
ऐसें म्हणशिल तरी दे हें तत्त्वतां ॥ जय० ॥

जे न सुधारका पढतील त्यांसी ॥
त्याची बा किंमत न देसी त्यांसी ॥
राशीसी येऊनी छळावेंगा देवा ! ॥
वद नाहीं नामी हें पत्र हें राया ॥ जय० ॥

येथें बारा आणे मुंबापुरिं रुपया ॥
फक्त दीड रुपया दुसऱ्या गांवीं या ॥
बंगींत मागतां पोस्टेजासकट ॥
फक्त अठरा आणे, हें कां संकट ॥ जय० ॥

वाचुनि यातें जोडि जो तत्त्वज्ञानाला ॥
संतती संपत्ती उद्गति दे त्याला ॥
तैसेंच, यांतील विचार ज्या मान्य ॥
त्या महाराष्ट्रीयां दे दे सुखदान ॥ जय० ॥

याखेरीज उपहास, वक्रोक्ति व कोटीबाजपणा याचीं उदाहरणें पहावयाचीं असल्यास त्यांचे 'खुळे रे खुळे अथवा बहिष्काराचें शुष्क अवडंबर' 'व्यवच्छेदन' 'शहाण्यांचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार' हे निबंध पहावे.

लोकहित व लोकशिक्षण या मुख्यत्वेंकरून दोन उद्देशांनीं प्रेरित होऊन आगरकर यांनीं आपले बहुतेक निबंध लिहिले आहेत. निव्वळ कलाविलासाकरितां किंवा मनरंजनाकरितां त्यांनीं बहुधा कधींच लेखणी हातांत धरलेली नाहीं. पण असें असूनही कलेच्या दृष्टीनें आगरकर यांचें वाङ्मय अत्यंत सरस उतरलें आहे. मुद्दाम कलाविलासाकरितां न लिहितांही त्यांच्या निबंधांत कलाविकास प्रकर्षानें आढळतो. याचें कारण अगदीं उघड आहे; आणि तें म्हणजे आगरकर यांना स्वदेशाविषयीं वाटत असलेली पराकाष्ठेची कळकळ होय. आगरकर यांचा देशाभिमान आणि भाषाभिमान अस्सल व जाज्वल्य होता. आपल्या समाजाची खालावलेली स्थिति पाहून त्यांचें अंतःकरण खरोखर तुटत होतें. एऱ्हवीं त्यांच्या हातून इतकें उच्च दर्जाचें वाङ्मय निर्माण झालें नसतें. राष्ट्रहिताकरितां आगरकर यांचें अंतःकरण तळमळत होतें म्हणून त्यांचें वाङ्मय इतकें हृदयस्पर्शी झालें आहे, आगरकरांच्या विद्वत्तेमुळें त्याला गांभीर्य प्राप्त झालें आहे व त्यांची सत्यनिष्ठा व तत्त्वनिष्ठा यांमुळें त्याला चिरस्थायीपणा आला आहे. आगरकर यांनीं

समाजाच्या पाठीवर कोरडे ओढले खरे, परंतु त्यामुळें समाजाविषयीं त्यांना प्रेम व आपलेपणा वाटत नव्हता असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. मनुष्यजातीच्या सत्प्रवृत्तीवर त्यांचा अढळ विश्वास होता. "सुधारकांचे प्रयत्न केवळ त्यांच्या सुखापुरते असते तर तुम्हांपासून वेगळें होण्यास तुमच्या ग्रामण्याची त्यांनीं वाटच पाहिली नसती. परंतु समाजसुधारणा ही त्यांस स्वतःचे सोयीहून अधिक महत्त्वाची वाटत असल्यामुळें तुम्हांस सोडल्यावर त्यांनीं सुधारणा करावी तरी कोणाची? तेव्हां होतां होईल तों तुमच्या शिव्याशाप व जुलूम यांस न भितां तुमच्या डोक्यांत प्रकाश पाडण्याचा ते प्रयत्न करतील; परंतु तुम्ही हट्ट करून त्यांस जातींतून काढूं लागल्यास ते वाटेल तें करतील पण तुमचा पिच्छा सोडणार नाहींत! तुम्ही त्यांचा कितीही द्वेष करा, त्यांस कितीही झिडकारा, पण फिरून ते तुम्हांस चिकटलेले आहेत असें तुमच्या दृष्टीस पडेल. त्यांची मगरमिठी ज्यास उकलतां येईल असें कोणतेंही ग्रामण्य तुमच्याच्यानें बसवतां येणार नाहीं. त्यांच्या तुम्हांवरील भक्तीस पाहिजे तर विरोधभक्ति म्हणा; पण तिचें तुमच्यानें सत्त्वहरण होणार नाहीं आणि सरतेशेवटीं आपल्या प्रभावानें 'मन सुधारकीं रंगलें अवघे जन सुधारक झाले' असें करून टाकल्याशिवाय ती राहाणार नाहीं!"

उपरोक्त उद्गार काढणाऱ्या आगरकरांचा आशावाद खरोखरीच अलौकिक आहे! या उद्गारांतच त्यांच्या जीविताचें रहस्य सांठविलेलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अखिल मानव जातीच्या कल्याणार्थ आत्मार्पण करणाऱ्या येशूख्रिस्तानें वधस्तंभावरून पुढील उद्गार काढले "Oh Lord! Forgive them, they know not what they are doing." लोकहितार्थ आमरण झटणाऱ्या आगरकरांचा त्यांच्या बांधवांनीं जो छळ केला त्याच समाजाविषयीं आगरकरांचे हे आशावादित्वाचे उद्गार ऐकले म्हणजे येशूख्रिस्ताच्या उपरिनिर्दिष्ट वाक्याची आठवण झाल्याखेरीज राहात नाहीं.

वि. ह. कुळकर्णी.

**आगरकरांचें वाङ्मयः**—( १ ) डोंगरीच्या तुरुंगांत आमचे १०१ दिवस; ( २ ) केसरींतील निवडक निबंध भाग १।२; १८८८; ( ३ ) विकारविलसित नाटक, १८८३; ( ४ ) वाक्यमीमांसा, १८८८; ( ५ ) निबंधसंग्रह [ सुधारकांतील निवडक लेख ] भाग १, २; १८९५.

**चरित्र, चर्चा, अभ्यास—**

( १ ) गोपाळ गणेश आगरकर–चरित्रात्मक निबंध, प्रो. मा. दा. अळतेकर, कर्नाटक छापखाना, १९३०.

( २ ) गोपाळ गणेश आगरकर–चरित्र, वि. स. खांडेकर, गणेश महादेव आणि कंपनी, १९३१

( ३ ) गोपाळ गणेश आगरकर यांचें चरित्र, हरि बल्लाळ परचुरे, १८९६.

( ४ ) गोपाळ गणेश आगरकर यांचें चरित्र, जगन्नाथ धोंडु भांगले.

( ५ ) आगरकर अंक, मासिक मनोरंजन, जुलै १९१६.

( ६ ) आगरकरांची श्राद्धतिथि, बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड ४, पृष्ठ ५३१–५३६.

( ७ ) डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील पांचवा मृत्यु, बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड ४, पृष्ठ ५६५–५६९.

( ८ ) कै. गुरुवर्य आगरकरांचें कार्य, प्रो. गो. गो. टिपणीस, नवयुग, जुलै १९२१.

( ९ ) गोपाळ गणेश आगरकर, व. ना. नाईक, महाराष्ट्रसाहित्य, जुलै १९२१.

(१०) आगरकर यांची वाङ्मयात्मक कामगिरी, प्रो. द. वा. पोतदार, मनोरंजन, नोव्हेंबर १९२५.

(११) आगरकरांच्या निबंधलेखनांतील कांहीं विशेष, वि. बा. आंबेकर, रत्नाकर, नोव्हेंबर–डिसेंबर १९३०.

(१२) विकारविलसित–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, अंक २,३,४,५; १८८४.

(१३) विकारविलसित–परीक्षण, ह. ना. आपटे, निबंधचंद्रिका, अंक १३.

**आगाशे गणेश कृष्ण** [ मृत्यु १९२७ ] गद्य ग्रंथकार. हे मिरज संस्थानचे कारभारी होते. यांस रावबहादुर हा किताब मिळाला होता. यांचा विद्याव्यासंग चांगल्यापैकीं होता. यांनीं श्री. कृ. कोल्हटकर व खाडिलकर यांच्या अनुक्रमें 'मतिविकार' व 'विद्याहरण' या नाटकांवर 'रंगभूमी' मासिकांतून टीकात्मक लेख प्रसिद्ध केले आहेत.

**आगाशे यांचें वाङ्मयः**—( १ ) सार्थ ज्ञानेश्वरी; ( २ ) मतिविकार व विद्याहरण यांतील टीकात्मक लेख, १९१४.

**आगाशे गणेश जनार्दन.** [ १८५२–१९१९ ] कवि. जन्म पुणें येथें झाला. ह्यांचें प्राथमिक शिक्षण आळंदी व सासवड येथें व इंग्रजी शिक्षण पुण्यांत झालें. बुद्धिवान विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती होती. पहिल्या इयत्तेपासून तों बी. ए. होईपर्यंत सर्व परीक्षांतील बक्षिसें व शिष्यवृत्त्या यांनीं पटकाविल्या होत्या. मॅट्रीकच्या परीक्षेंत पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती व बी. ए. च्या परीक्षेंत चारशें रुपयांची भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत शिष्यवृत्ती ह्या मिळविल्या. यांचें बरेंचसें आयुष्य शिक्षणखात्यांत नोकरी करण्यांत गेलें. हायस्कुलांच्या मुख्य अध्यापकापासून तों गव्हर्मेंट सेंट्रल बुकडेपोच्या क्युरेटरचे जागेपर्यंत हे वाढत गेले. पेन्शन घेतल्यावर कांहीं महिने यांची डेक्कन कॉलेजांतील इंग्लिश भाषेच्या अध्यापकाच्या जागीं नेमणूक झाली होती. यांचें इंग्लिश, संस्कृत व मराठी या भाषांवरील प्रभुत्व वाखाणण्याजोगें असून त्यांतील वाङ्मयाचा त्यांनीं कसोशीनें अभ्यास केला होता. 'सुंदरेची संक्रांत,' ' सद्गुणमंजरी,' ' बालशिक्षण,' 'अर्थशास्त्राचीं मूलतत्वें,' ' राज्यारोहण,' ' बिरुदावली, ' ' बाष्पांजली ' हीं त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत. मराठी वाङ्मयांत त्यांची प्राचिनांचा अभिमानी असा पंडित कवी म्हणून गणना केली जाते. 'बिरुदावली' व 'बाष्पांजली' हीं त्यांचीं दोन शोककाव्यें उत्तमांत गणलीं जातात. या काव्यांविषयीं व त्यांच्या इतर कवितेविषयीं आपल्या '**विलापिका**' नांवाच्या चर्चात्मक पुस्तकांत रा. माडखोलकर, म्हणतात "लेंभे किंवा टिळक यांच्या शोककाव्यांच्या इतकी जरी आगाशे यांची वैलापिक रचना सरस नसली, तरी निव्वळ संख्येच्या बाबतींत ते या दोन कवींनाच काय, पण शोककवि मोगरे यांनाही मागें टाकतील, अशी भीति वाटते. त्यांच्या तीन खण्डकाव्यांपैकीं 'बिरुदावलि' व ' बाष्पांजलि ' हीं दोन काव्यें वैलापिक असून, शिवाय ' तीन हरिभाऊ,' 'एडवर्ड बादशहा,' ' गो. कृ. गोखले,' ' यंदांचा हिंवाळा ' इत्यादि कविताही शोकपर आहेत. निवळ पद्यसंख्याच लक्षांत घेतली, तर त्यांच्यापुढें मोगरे यांचा टिकाव लागणें कठीण आहे. त्यांना धीटपाठ,–त्या शब्दाच्या चांगल्या अर्थानें,—कवि म्हणतां येईल. मोगरे यांच्या वाणींतील सुगमता किंवा लेंभे व टिळक यांच्या वाणींतील सहजरम्यता त्यांच्या वाणींत नाहीं. जुन्या पिढींतील नामांकित पंडितांत त्यांची गणना होत असे. आणि, प्रतिभा किंवा प्रसाद यांच्यापेक्षां पंडितगिरीचाच प्रकर्ष यांच्या काव्यांत अधिक दृष्टीस पडतो. त्यांनीं वर्णिलेली

निसर्गसिद्ध कविताशक्ति त्यांच्या ठिकाणीं होती, असें म्हणवत नाहीं. त्यांच्या 'कृश' कवित्वाला विद्वत्तेमुळें काय डौल आला असेल तेवढाच. शोककाव्य-रचनेच्या बाबतींत मोगरे यांच्याइतकी त्यांची प्रवृत्ती निरपेक्ष नव्हती. ज्या व्यक्तीशीं त्यांचा निकट संबंध आला किंवा ज्यांच्यावर त्यांची निरतिशय भक्ति होती, अशाच व्यक्तींवर त्यांनीं शोकपर काव्यें लिहिलेलीं आढळतात. 'बिरुदावलि' हें शोककाव्य त्यांनीं आपले गुरू आधुनिक महाराष्ट्राचे जनक रावसाहेब रानडे यांच्यावर, तर 'बाष्पांजलि' ही विलापिका बी. ए. च्या वर्गांत असतांना मरण पावलेला आपला अत्यंत बुद्धिमान् पुत्र राजाराम याच्यावर लिहिली आहे. त्यांनीं कवीला अवश्य म्हणून सांगितलेल्या ज्ञान आणि दृढानुरक्ति या दोनही गुणांचा मिलाफ त्यांच्या या शोककाव्यांत झालेला दिसतो. 'बिरुदावलीं'त केलेलें रानडे यांचें गुणवर्णन मनाला चटका लावतें. परंतु, 'बिरुदावली'पेक्षां 'बाष्पांजलीं'तील शोकाचा उमाळा साहजिकच अधिक उत्कट आहे. उपनिषदें, भगवद्गीता, अजविलाप व इन मेमोरियम् यांत आत्म्याच्या मरणोत्तर गतीविषयीं आलेल्या कल्पनांचा उपयोग केल्यामुळें, 'बाष्पांजलीं'त करुणशांतांचा मोठा सुरेख संगम झाला आहे. करुण रस उत्कट असला, तरी अगदीं शीग सांडून जाणारें उधान नव्हे. आणि, शांतरसाचा परिपोषही, पूर्वसूरींच्या उज्वल विचारांचें स्मरण मनाला देईल, इतक्या बेताचा. त्यामुळें या काव्यांत विकाराचे आवर्त नाहींत किंवा विचाराचे विवर्तही नाहींत. तीरावरील तरुलतांना आपल्या तुषारांनीं भिजवीत स्वैरगतीनें धांवणाऱ्या ओढ्याची आठवण 'बापाचे अश्रु' देतात, तर दुतर्फा बांधून काढलेल्या पात्रांतून संथपणानें मार्ग क्रमणाऱ्या राजधानींतील नदीसारखी 'बाष्पांजली'ची अवस्था आहे."

कवितांचे व्यतिरिक्त आगाशे यांचे बरेच भिन्न भिन्न विषयांवरील विद्वत्ताप्रचुर लेख विविधज्ञानविस्तारादि मासिकांत प्रसिद्ध झाले आहेत. यांना १९१७ सालीं इंदूर येथें भरलेल्या साहित्यपरिषदेचें अध्यक्षस्थान देऊन त्यांचा महाराष्ट्रानें गौरव केला.

**आगाशे यांचें वाङ्मयः**—( १ ) राज्यारोहण काव्य; ( २ ) सुंदरेची संक्रांत गोष्ट; ( ३ ) सद्गुणमंजरी, १८९१; ( ४ ) बालशिक्षण; ( ५ ) बिरुदावली, १९०१; ( ६ ) महाराष्ट्रवाङ्मय; ( ७ ) शुक्रग्रस्त विचित्र सूर्यग्रहण, १८७४; ( ८ ) अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें–भाषांतर, १८९१; ( ९ ) बाष्पांजलि.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें—परीक्षण, विविधज्ञानविस्तार, मे १८९२.

( २ ) बाष्पांजलि, परीक्षण, लक्ष्मणशास्त्री लेले, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४८, अंक २, १९१७.

( ३ ) चरित्र, वि. मो. महाजनी, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ५०, अंक ९, १९१९.

**आठल्ये कृष्णाजी नारायण** [ १८५२–१९२७ ] कवि व निबंधकार. सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड तालुक्यांतील टेंभू नांवाचे गांवीं यांचा जन्म झाला. यांचे वडील दशग्रंथी ब्राह्मण असून, ब्रह्मावर्तास बाजीरावांपाशीं वामनराव म्हणून एक राजवैद्य असत त्यांचे आश्रयास पुष्कळ वर्षे होते. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत यांचें घरींच शिक्षण झालें. यांचे वडिलांनीं यांजकडून संहिता, शिक्षा, ज्योतिष, छंद, निघंट, पूजा, वैश्वदेव, सौर, रुद्र वगैरेंचा अभ्यास करून घेतला होता. या वयापर्यंत यांस मोडी लिहितां किंवा वाचतां येत नसे. तेराव्या वर्षीं यांचें लग्न झालें. सासुरवाडी थोरामोठ्यांची होती. जांवईबुवांनीं इंग्रजी शिकावें अशी श्वशुरांची इच्छा असल्यामुळें त्यांनीं त्यांस कोल्हापुरास नेण्याची खटपट चालविली. परंतु वडील परवानगी देईनात. पुढें त्यांच्या बंधूंनीं त्यांस १८६६ त कऱ्हाडास शाळेंत घातलें. या ठिकाणीं त्यांचें मराठी पांच–सहा बुकें व थोडेंसें इंग्रजी शिक्षण झालें. इंग्रजी शाळेंत असतां प्रि. गोपाळराव आगरकर त्यांचे वर्गबंधु होते. भरपुर आश्रय न मिळाल्यामुळें कृष्णाजीपंतांस कऱ्हाड सोडून पुण्याचा मार्ग धरावा लागला. तेथील ट्रेनिंग कॉलेजांत राहून, मधुकरी मागून त्यांनीं मराठी अभ्यास पुरा केला व सातारा जिल्ह्यांत शिक्षकाची नोकरी पत्करली. ही नोकरी त्यांनीं पांच वर्षे केली. या सुमारास रावबहादुर चिंतामणराव नारायण भट, सबजज्ज यांच्याशीं त्यांचा परिचय झाला. रा. ब. भट यांचा कृष्णाजीपंतांवर लोभ जडला. कृष्णाजीपंतांस ल्हानपणापासून चित्रकलेचा फार नाद असे. हा त्यांचा नाद पाहून रावबहादुरांनीं त्यांस चित्रकलेचें शास्त्रशुद्ध ज्ञान संपादण्याकडे मन वळविलें व त्यांस मुंबईस जे. जे. आर्ट स्कूलमध्यें राहण्यास उत्तेजन दिलें. रावबहादुरांच्या इच्छेप्रमाणें कृष्णाजीपंतांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला व मुंबईस येऊन आर्टस्कूल-

मध्यें नांव नोंदलें. आर्टस्कूलमध्यें हे जवळ जवळ तीन वर्षें राहिले व तैल-चित्रकलेचें ज्ञान त्यांनीं पूर्णपणें अवगत करून घेतलें. मध्यंतरीं सातारच्या आबासाहेब महाराजांनीं यांस आपल्याजवळ ठेवून घेऊन आपली एक मोठी तसबीर त्यांचेकडून काढून घेतली. आर्टस्कूलमधील अभ्यास पुरा झाल्यावर ते बडोद्यास गेले. येथील हायस्कुलांत यांचें 'रंगकलेवर' एक व्याख्यान झालें. हें व्याख्यान त्यावेळचे बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव यांस इतकें आवडलें कीं, त्यांनीं त्यांस दरमहा शंभर रुपये पगारावर आपलेकडे ठेवून घेतलें. माधवराव चित्रकलेचे फार मोठे चहाते असत. त्यांनीं त्यांस आपल्या बैठकीच्या खोली शेजारील एक खोली काम करावयास दिली होती. या ठिकाणीं त्यांनीं श्री. जम्नाबाईसाहेब गायकवाड, ताराबावा सावंतवाडीकर, रघुनाथराव भोंसले सावंत-वाडीकर, डॉ. भालचंद्र, रावबहादुर कीर्तने यांच्या तसबिरा चितारल्या. पुढें राजे सर टी. माधवराव दिवाणगिरीचें काम सोडून मद्रासेस गेले. अर्थातच कृष्णाजी-पंतांसहि त्यांचेबरोबर तिकडे जाणें भाग पडलें. कृष्णाजीपंतांचे बंधु त्यावेळीं मलबारांत कोचीस असत. ते आजारी पडल्यामुळें मद्रास सोडून त्यांस कोचीस जावें लागलें. याच ठिकाणीं ते जवळ जवळ वीस वर्षें राहिले. व्हॉलकॉर्ट ब्रदर्स नांवाची एक कंपनी येथें आहे. त्याचे क्लैन नांवाचे एक एजंट होते, त्यांचे ते हिंदुस्थानी भाषा शिकविणारे कायम पंडीत म्हणून राहिले. कोचींत स्थिरस्थावर झाल्यावर भगवद्गीतेवर नाना वृत्तात्मक श्लोकांचें 'गीतापद्य-मुक्ताहार' नांवाचें पुस्तक यांनीं लिहिलें. हेंच त्यांचें पहिलें पुस्तक होय. या पुस्तकाबद्दल निर्णयसागर छापखान्याच्या मालकांनीं त्यांच्या हातांत १२ तोळ्यांचें सोन्याचें कडें घालून सन्मान केला. याच वेळीं त्यांस श्रृंगेरी मठाचे जगद्गुरु शंकराचार्य ह्यांच्याकडून 'महाराष्ट्र—भाषाचित्रमयुर' ही पदवी अर्पण करण्यांत आली. यानंतर ज्यांच्या-योगें त्यांचें नांव महाराष्ट्रभर झालें, तें केरळ कोकिळ मासिक त्यांनीं संपादण्यास सुरवात केली. हें मासिक प्रथम पांच वर्षें कोचीस निघत असे. नंतर तें मुंबईस गुर्जर कंपनीकडून प्रसिद्ध केलें जाऊं लागलें. या मासिकाचे भर अमदानींत त्याचे तीन हजारांवर वर्गणीदार होते. महाराष्ट्रांत सामान्य जनांत बहुविध वाचनाची गोडी जर कोणी प्रथम उत्पन्न केली असेल तर ती कृष्णाजीपंतांच्या केरळकोकीळ मासिकानेंच होय. यांत विविध विषयांवर लेख येत. यांतील कविता, पुस्तकपरी-क्षणें, लोकोत्तर चमत्कार यांवर वाचकांच्या अधिक उड्या पडत.

"रा. आठल्ये यांनीं पंचवीस वर्षें 'केरळकोकिळ' द्वारें असंख्य वाचकवर्गास बहुश्रुत करून त्यांना वाङ्मयाची गोडी लाविली. यांची भाषाशैली चटकदार, कविता टापटिपीची व व्याकरणशुद्ध, आणि विषययोजना बहुविध व चमत्कृतिमय; तथापि त्यांच्या समालोचनपद्धतीबद्दल मतभेद असून ती अनेकवेळां अवास्तव कडक, दंशपूर्ण आणि वैयक्तिक, छद्मी, थोडक्यांत विघटनात्मक होती, असा पुष्कळांचा आशय आहे. 'कलमबहाद्दरांस शेलापागोटें' देण्याचा त्यांचा उपक्रम सद्भिरुचीस विरुद्ध असून त्यांत शारदोपासकांची थट्टा असे. दरबाराचा आव घालणारे हे 'पंच' स्वतः अश्लीलपणाच्या थडीवर घसरतांना कित्येकदां वाचकांनीं पाहिले असतील. अशांनीं केवळ कलमांच्या अणीवर व शाईच्या गहिरेपणावर भिस्त ठेऊन भालाईती ग[illegible] असमंजसपणाचें होतें. परंतु हा प्रत्याघात धाकट्या चिपळोणकरांच्या टीकापद्धतीचा अतिरेक झाल्यामुळें अवश्यप्राप्त होता; आणि तो केव्हांतरी आलाच असता. तथापि त्यांची चलती अल्पकाळ राहिल्यामुळें वाङ्मयाच्या प्रागतिक ओघास विशेष अपाय झाला नाहीं, ही समाधानाची गोष्ट आहे. इंग्लंडांत देखील सुरुवातीला पांच पन्नास वर्षें अशा प्रकारची टीकापद्धति मान्य झाली होती. जेफ्रे, सिडने स्मिथ, मेकॉले हे याच पद्धतीचे पुरस्कर्ते व प्रवर्तक होते. आणि त्यांचें पोतेरें खाल्लें नाहीं असा लेखक त्यावेळीं विरळ आढळे. एखाद्यानें ग्रंथ तयार करून छापला कीं तो चवाठ्यावर आला असें समजून, त्याच्या उणेपणाची तपासणी भर चावडीवर करून, त्याचे असते नसते दोष वेशीवर टांगावयाचे, ही त्यावेळची रीत होती. विधायक टीका, घटनात्मक चर्चा व रसिकावलोकन हे समालोचनपद्धतीचे भाग पुढें फ्रेंच नमुन्यावरून मॅथ्यू अर्नाल्डनें इंग्लंडांत प्रचलित केले. अर्थात् शास्त्रीबुवांच्या वेळेस हे (जेफ्रे, मॅकॉले वगैरेंचे) नमुने लोकहितवादी, रानडे, दयानंद सरस्वती, प्रार्थनासमाजवाले इत्यादिकांच्या उपहासासाठीं कदाचित् गिरविण्यासारखे असतील, म्हणून त्यांचा फायदा त्यांनीं चाणाक्षपणानें घेतला. परंतु ही विद्या, अस्त्रें परत कशीं आणावीं हें जाणणाऱ्यांनींच, काल, प्रसंग व माणूस ओळखून अमलांत आणावी लागते. 'केरळकोकिळचीं' जुनीं पुस्तकें चाळल्यास आमच्या म्हणण्यास पोषक असें त्यांत पुष्कळ सांपडेल, याची आम्हांस खात्री आहे. टीकात्मक लेख वाङ्मयाच्या व्यवसायास उन्नतपणा व जबाबदारी आणतात; पण ती टीका नेहमीं न्याय्य असावी. निस्पृहपणा हा गुण आहे, पण त्याची पडसांवली फटकळपणावर पडत असल्यामुळें न्यायीपणाचें परिवर्तन अनेकवेळां निष्ठुरपणांत होतें.

म्हणून तें न होण्याची खबरदारी बाळगली नाहीं, तर मुक्तेश्वरानें वर्णिलेली अवगुणाची एकच माशी या रसानुभूतीच्या भोजनांत माती कालवून अरुचि आणण्यास पुरेशी होते. असा प्रकार कोकिळकारांच्या पुष्कळ टीकाविषयक लेखांत आढळतो; परंतु अशी विघातक टीका ग्रंथकारांस उत्साहकारक होतच नाहीं, पण वाचकांस मात्र ती गारठवून सोडते, हें पुष्कळांस उमजतच नाहीं !"

( नी. ब. भवाळकर, विविधज्ञानविस्तार, वर्ष ५७, पृष्ठ २०२ )

कृष्णाजीपंतांचें लिहिणें हृद्य आणि आकर्षक असें आहे. त्यांची भाषा बरीचशी संस्कृतप्रचुर असली तरी त्यांतील काव्यात्मतेमुळें ती वाचकांच्या हृदयास भुलावणी पाडी. कृष्णाजीपंतांची एक वादकुशल टीकाकार म्हणून विशेष ख्याती होती.

**आठल्ये यांचें वाङ्मयः**—( १ ) ब्रह्मचर्याश्रम. ( २ ) सुलभ वेदांत. ( ३ ) कर्मयोग. ( ४ ) आर्याबद्ध गीता. ( ५ ) सार्थ दासबोध. ( ६ ) राजयोग. ( ७ ) ज्ञानेश्वरी सार्थ. ( ८ ) ग्रहदशेचा फटका. ( ९ ) मथुरा—गणेश सौभाग्य. (१०) माहेरचें मूळ—काव्य. (११) मुलीचा समाचार—काव्य. ( १२ ) शृंगारतिलकादर्श—काव्य. (१३) सासरची पाठवणी—काव्य. ( १४ ) सुश्लोकलाघव—काव्य. ( १५ ) पंचतंत्रामृत—कादंबरी. (१६) विवेकानंदजीवन. (१७) मुलें थोर कशीं करावीं. ( १८ ) ज्ञानेश्वऱ्यांचें गौडबंगाल. (१९) माझें कळसूत्री घर अथवा नरदेहाची रचना. ( २० ) नजरबंद शिक्षक. ( २१ ) माझें गुरुस्थान. ( २२ ) वसंत पूजा. ( २३ ) समर्थांचें सामर्थ्य. (२४) फांकडे तलवारबहाद्दर. ( २५ ) गीतापथ्यमुक्ताहार.

**आपटे वासुदेव गोविंद** [ १८७१–१९३० ] टीकाकार, कोशकार, संपादक व बालवाङ्मयकार. जन्म पूर्वखानदेश जिल्ह्यांतील धरणगांव येथें झाला. मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण धुळें येथें व पुढील उच्च शिक्षण इंदूर व नागपूरचें हिस्लॉप कॉलेज येथें झालें. १८९३ सालीं ते कलकत्ता विश्वविद्यालयाची बी. ए. ची परीक्षा पास झाले. या परीक्षेचा अभ्यास करीत असतांना त्यांनीं बंगाली भाषेचा अभ्यास केला. परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं नूतन मराठी विद्यालयांत चार वर्षें शिक्षक म्हणून काम केलें व पुढें मुंबई येथें सेक्रेटरीएटमध्यें रिपोर्टर ऑफ

धी नेटीव्ह प्रेस त्या जागेवर फक्त दहा महिने काम केलें. वरिष्ट अधिकाऱ्यांशीं न पटल्यामुळें त्यांनीं या जागेचा राजिनामा दिला. याच वेळीं इंदूरच्या महाराणी-साहेबांकडून त्यांना राजकन्येसाठीं अध्यापक म्हणून बोलाविण्यांत आलें. वासुदेव-रावांनीं मुंबई सोडली आणि ते अलाहाबादेस गेले. राजकन्येची स्वारी तेथेंच होती. अलाहाबादेस त्यांना बरेच दिवस रहावयाला मिळालें. या ठिकाणींच त्यांचा मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक रामानंद चट्टोपाध्याय यांच्याशीं परिचय झाला. रामा-नंदांनीं 'मॉडर्न रिव्ह्यु' नुकताच काढला होता. त्यांच्या सांगण्यावरून वासुदेव-रावजी मॉडर्न रिव्ह्यूंत मराठी पुस्तकांचें परीक्षण करूं लागले. ते अखेरपर्यंत या मासिकाचे मराठी पुस्तकांचे परीक्षक होते. अलाहाबादेस असतांना त्यांनीं मिसेस हेनरी वुडच्या 'ईस्टलिन्' त्या कादंबरीचें 'माणिकबाग' नांवानें रूपांतर करून प्रसिद्ध केलें. याच ग्रंथकर्त्रीची दुसरी कादंबरी 'मिसेस हॅलिबर्टन्स ट्रबल्स्' ही वासुदेवरावजींच्या वाचण्यांत आली. ती त्यांना फारच आवडली आणि 'दुःखा-अंतीं सुख' हें नांव देऊन त्यांनीं तिला मराठी वेषांत लोकांसमोर आणलें.

कांहीं दिवस अलाहाबाद व नंतर इंदूर येथें काढल्यानंतर वासुदेवरावजींना कै० नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनीं पुण्यास बोलावून घेतलें आणि 'ज्ञान-प्रकाश' चें संपादकत्व त्यांजवर सोंपविलें. वासुदेवरावजींनीं तो दैनिक केला. परंतु प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें एक वर्षानेंच त्यांनीं संपादकत्व सोडलें. पुढें ते नूतन मराठी विद्यालयांत शिक्षक म्हणून राहिले आणि त्या संस्थेचे आजन्म सेवक झाले. तेथें ते १९१० पर्यंत होते. मध्यंतरीं, १९०६ सालीं वासुदेवराव-जींनीं सुप्रसिद्ध 'आनंद' मासिक काढलें.

'आनंद' मासिकाच्या आरंभापूर्वीची थोडीशी हकीकत ऐकण्यासारखी आहे. कै० विनायक कोंडदेव ओक हे 'बालबोध' नांवाचें एक मासिक काढीत असत. ओकांची सुबोध भाषाशैली आणि गोड विवेचनपद्धति वासुदेवरावजींना फार आवडत असे. ते बालबोधाचे एकनिष्ठ वाचक होते. ओकांना ते गुरुस्थानीं मानीत. परंतु 'बालबोधां'त कांहीं सुधारणा व्हाव्या आणि तें सर्वांगसुंदर बाल-मासिक व्हावें असें वासुदेवरावजींना अंतःकरणपूर्वक वाटत होतें. त्यांनीं ओकांची गांठ घेतली आणि त्यांना आपलें म्हणणें सांगून 'मी पाहिजे तर आपणाला लेखनसाह्य करतों' असेंही सांगितलें. ओकांना तें पटलें नाहीं. 'माझ्या मासि-कांत दुसऱ्याची ओळही नको. बालबोधांत कांहीं सुधारणा अवश्य आहेत असें

मला वाटत नाहीं,' असें ओकांनीं स्पष्ट उत्तर दिलें. यावर वासुदेवरावजींनीं आपल्या बालमासिकाच्या कल्पनांस मूर्त स्वरूप देण्याकरितां 'आनंद' मासिक काढलें.

'आनंदाचें' बालपणीं संगोपन करीत असतां वासुदेवरावजींना अत्यंत त्रास पडला. अर्थिक नुकसान होत होतें. नोकरीचा व्याप पाठीमागें होताच. तरी आपल्या वेतनांतील कांहीं भाग 'आनंदा' करितां खर्च करून आणि टपालापासून तों लेखनापर्यंत सर्व काम स्वतः सांभाळून त्यांनीं 'आनंद' नांवारूपाला आणिला.

१९१० सालीं त्यांना पुनः दुखण्यानें घेरलें. थोडासा आराम पडल्यानंतर त्यांनीं इंदूर येथें चंद्रावती महिला विद्यालयांत शिक्षकाची नोकरी पत्करली. पुढें इंदूर सरकारनें 'मल्हारी मार्तंड' या पत्राचें संपादकत्व त्यांना दिलें. तें काम त्यांनीं सुमारें पांच वर्षे केल्यानंतर संपादकत्वाचा राजीनामा देऊन ते पुण्यास आले. १९२२ सालीं त्यांचा एकुलता एक मुलगा वारला. त्यामुळें त्यांच्या जीवितावर औदासीन्याचें धुकें पसरलें. तरी लेखन, वाचन आणि अध्यापन—टिळक महाविद्यालयांत—यांत ते आपलें चित्त नेहमीं गुंतवून दुःखाचा भार हलका करीत. टिळक महाविद्यालयांतील काम त्यांनीं १९२७ सालीं सोडलें. अठ्ठावीस सालीं ते आपल्या पत्नीला व एकुलत्या कन्येला घेऊन काशीयात्रेस गेले होते. तेथून परत आल्यानंतर 'अशोकचरित्र' 'लेखनकला' यांची सुधारून वाढविलेली आवृत्ति त्यांनीं प्रसिद्ध केली आणि 'ज्ञानदीप' व 'भारतकन्या' हीं पुस्तकें लिहिलीं.

वासुदेवरावजींचें वाङ्मयकार्य जितकें विपुल तितकेंच विविध आहे. संपादक, कोशकार, टीकाकार, बालवाङ्मयप्रणेते इत्यादि अनेक नात्यांनीं त्यांनीं वाङ्मयाची सेवा केली आहे. 'मराठी शब्दरत्नाकर', 'शब्दार्थचंद्रिका', 'संप्रदाय व म्हणी', 'अशोक चरित्र', 'बौद्धपर्व' इत्यादि त्यांचीं पुस्तकें वाचून त्यांच्या परिश्रमाची, विद्वत्तेची, विवेचनशक्तीची पूर्ण साक्ष पटते. 'दुःखाअंतीं सुख', 'संपूर्ण बंकिमचंद्र' या कादंबऱ्यांत त्यांचें अप्रतिम रूपान्तर कौशल्य व भाषाप्रभुत्व व्यक्त झालें आहे.

परंतु त्यांचें नांव सर्वतोमुखीं होण्यास त्यांचें बालवाङ्मय मुख्यतः कारणीभूत झालें. 'बालभारत,' 'बालरामायण' इत्यादि त्यांचीं पुस्तकें आज बाळगोपाळ

मोठ्या प्रेमानें वाचीत आहेत. मुलांच्या क्लबांत 'मनी आणि मोत्या' यांनीं सांगितलेल्या गोष्टी पुनः पुनः हौसेनें वाचाव्याशा वाटतात. इतर लहान लहान पुस्तकेंहि अशींच सुंदर आहेत. एखादी गोष्ट सुबोधरीतीनें सांगण्याची हातोटी त्यांना उत्कृष्ट साधली होती. मुलांकरितां लिहिलेलें लिखाण भाषेच्या दृष्टीनें अत्यंत सोपें असावें म्हणून पहिल्या पहिल्यानें तर गोष्ट लिहून होतांच ते एखाद्या लहान मुलास वाचून दाखवीत. गोष्टींतील एखादा भाग त्याला समजला नाहीं असें दिसून आलें तर तेवढाच पुनः लिहून काढीत. आपल्या लिखाणांत दुर्बोधता, अनौचित्य किंवा अनैसर्गिकता मुळींच राहूं नये याविषयीं ते फार काळजी घेत.


वासुदेवरावजींची लेखनाची शिस्त वाखाणण्यासारखी होती. ज्या विषयावर लिहावयाचें त्याची सांगोपांग माहिती मिळवून ते टांचण तयार करीत. नंतर त्या विषयाचा सर्व बाजूंनीं विचार करून ते लिहावयास बसत. लिहिणें कसें रेखीव ! तर्कांचे दुवे कुठें निखळलेले दिसावयाचे नाहींत. शाब्दिक कोट्या, कल्पनेच्या भराऱ्या किंवा चमत्कृतिपूर्ण आकर्षक शब्दरचना यांच्या नादीं लागून विषयांतर, अर्थविपर्यास, क्लिष्टता, किंवा वृथा पांडित्य केलेलें वासुदेवरावजींच्या लिखाणांत कोठें आढळणार नाहीं. शब्दरत्नाकराची प्रस्तावना, अशोक व बुद्ध यांच्या चरित्रांतील विवेचन, लेखनकलेंतील चर्चात्मक भाग इत्यादि त्यांच्या वाङ्मयांतील स्थळें लेखनाचे नमुने म्हणून नवीन लेखकांनीं पुढें ठेवण्यासारखे आहेत. त्यांच्या अदूषित आणि सुबोध लेखनानेंच त्यांना इतकी मान्यता मिळाली. ( संक्षेप—गों. ग. तळवलकरकृत चरित्रात्मक निबंध, यशवंत, फेब्रु. १९३०. )

वासुदेवरावजींनीं १९२० सालीं, विलायतेंतील मुलांच्या साप्ताहिकाच्या धर्तीवर 'विचारसाधन' नांवाचें एक वर्तमानपत्र काढलें होतें. पण तें फार दिवस चालूं शकलें नाहीं. महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचे ते जवळ जवळ दहा वर्षें चिटणीस होते.

**आपटे यांचें वाङ्मयः**—( १ ) माणिकबाग. ( २ ) दुःखाअंतीं सुख. ( ३ ) नवयुग. ( ४ ) मूर्तिमंत देशाभिमान. ( ५ ) विलक्षण भोळेपणा. ( ६ ) पेशवाईची हकिगत. ( ७ ) लेखनकला. ( ८ ) ज्ञानदीप. ( ९ ) मराठ्यांचा दरारा. ( १० ) गांधीगीता. ( ११ ) महाराष्ट्राचा बालबोध इतिहास. ( १२ ) हिंदुस्थानचा मनोरंजक इतिहास. ( १३ ) मुलांकरितां गोड गाणीं. ( १४ ) एक दिव-



हरि नारायण आपटे



वासुदेव गोविंद आपटे

साचे सुटींत. ( १५ ) चित्तरंजन भाग १–२. (१६) मनी व मोत्या. (१७) रवीचे उज्ज्वल किरण. ( १८ ) मौजेच्या गोष्टी. ( १९ ) वीरांच्या कथा. (२०) मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी. ( २१ ) बालोद्यान पद्धतीचें शिक्षण. ( २२ ) अशोक. ( २३ ) जैनधर्म. ( २४ ) बौद्धपर्व. (२५) नाट्यरूप भारतवर्ष. ( २६ ) विचार-सौंदर्य. ( २७ ) नाट्यभारत. ( २८ ) नाट्यरामायण. ( २९ ) बालभारत. (३०) बालभागवत. (३१) महाभारतांतील सोप्या गोष्टी. (३२) मराठी बंगाली शिक्षक. ( ३३ ) रामायणांतील सोप्या गोष्टी. ( ३४ ) सौंदर्य आणि ललितकला. ( ३५ ) राष्ट्रीयशिक्षणाचें वाचनपुस्तक. ( ३६ ) विविधज्ञानसंग्रह. ( ३७ ) टापटिपीचा संसार. ( ३८ ) महर्षींचा प्रसाद, द्रोण १, २. (३९) हरनाथ ठाकुर खण्ड १.(४०) मराठी शब्दरत्नाकर. ( ४१ ) वाल्मीकीचा जय. ( ४२ ) भारतकन्या. ( ४३ ) संपूर्ण बंकिमचंद्र, खण्ड १, २, ३, ४.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) आपटे खास अंक, आनंद १९३१.

( २ ) लेखनकला व लेखनव्यवसाय–परिचय–' साहित्यसेवक ' मनोरंजन, जुलै १९२६.

( ३ ) राधागोविंद पुस्तकमाला–परीक्षण–' यज्ञ, ' विविधज्ञानविस्तार, डिसेंबर १९०४.

( ४ ) मराठीभाषेचे संप्रदाय व म्हणी, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४१, अंक १०, ११; १९१०.

( ५ ) वाल्मीकीचा जय–परीक्षण, वि. कृ. भाटवडेकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४२, अंक ५; १९११.

( ६ ) सौंदर्य आणि ललितकला, परीक्षण, श्री. दा. सातवळेकर, विविधज्ञान-विस्तार, पुस्तक ५१, अंक १२; १९२०.

( ७ ) मराठी शब्दरत्नाकर, दोषदिग्दर्शन, बा. कृ. खेडकर, विविधज्ञान-विस्तार, मार्च १९२६.

( ८ ) लेखनकला, परीक्षण, ना. गो. चापेकर, विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९२६.

( ९ ) गांधीगीता–परीक्षण, के. सी. ठाकरे, महाराष्ट्रसाहित्य, डिसेंबर १९१९.

**आपटे हरि नारायण**—[ १८६४—१९१९ ] कादंवरीकार. यांचा जन्म खानदेशांत पारोळें या गांवीं झाला. प्राथमिक शिक्षण मुंबईंत व पुढील पुण्यांत झालें. डेक्कन व फर्ग्युसन कॉलेजांत ते कांहीं वर्षें होते, विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमापेक्षां वाङ्मयाभ्यासाकडेच अधिक लक्ष असल्यामुळें प्रथम वर्षापुढें यांची मजल जाऊं शकली नाहीं. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या निबंधमालेनें यांस वाङ्मयसेवा करण्याची स्फूर्ति दिली. त्यांनीं शास्त्रीबुवांचा आदर्श पुढें ठेवून मराठी वाङ्मयमंदिराची शोभा वाढविण्याचा प्रयत्न करावा अशी आकांक्षा बाळगली व तत्सिद्ध्यर्थ जबर विद्याव्यासंग केला. या व्यासंगाचें फळ म्हणजे त्यांचें विपुल कथात्मक वाङ्मय होय. वयाच्या चोविसाव्या वर्षी यांनीं आपली लौकिक विद्यार्थिदशा संपविली पण खरी विद्यार्थिदशा यावेळेपासूनच सुरू झाली. ते वस्तुतः आजन्म विद्यार्थी होते, इतकेंच नव्हे तर विद्येचें मर्मसंशोधन करणारे होते. त्यांची बुद्धि अष्टपैलु होती. त्यांच्याजवळील ग्रंथसंग्रह विविध प्रकारचा असे. वाङ्मयाच्या एकाच शाखेपुरतें त्यांचें वाचन मर्यादित नसे. इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, शासनशास्त्र वगैरे अनेक शास्त्रांवरील ग्रंथ त्यांचेपाशीं असत आणि ते अगदीं आजतारखेपर्यंतचे असत. विद्यालयांतील विद्यार्थि असल्या वेळेपासूनच त्यांचा लेखनव्यवसाय सुरू झाला होता. विद्यार्थिदशेंत असतां लिहिलेल्या लेखांत, गोपाळराव आगरकरांनीं हॅम्लेटच्या 'विकारविलसित' नांवानें केलेल्या भाषांतरावरील ७२ पृष्ठांचा विस्तृत टीकात्मक लेख महत्वाचा आहे. हा निबंध १८८२ सालीं 'निबंधचंद्रिका' मासिकांत प्रसिद्ध झाला होता. तो वाचून आगरकरांनीं हरिभाऊंचें फारच कौतुक केलें. यांची पहिली कादंबरी 'मधली स्थिति (१८८५) ही होय. पुणें येथें निघणाऱ्या 'पुणें वैभव' पत्राची पुरवणी म्हणून ती दरमहा क्रमशः प्रसिद्ध होत असे. या कादंबरींतील पहिलें प्रकरण भाषांतरवजा आहे. या काळांत हरिभाऊंचें रेनॉल्डस्च्या कादंबऱ्यांचें वाचन जोरांत चाललेलें होतें. त्याचाच परिणाम हें प्रकरण होय. रेनॉल्डस्च्या 'ओल्ड लंडन' या कादंबरींतील पहिल्याच प्रकरणाचें तें भाषांतर आहे. परंतु हरिभाऊंना परभृतत्व न रुचल्यामुळें त्यांनीं या कादंबरीची पुढील रचना स्वतंत्रपणें केली.

हरिभाऊंनीं सामाजिक दहा व ऐतिहासिक आठ अशा अठरा कादंबऱ्या

लिहिल्या. या सर्व पुणें येथील आर्यभूषण छापखान्यानें छापिल्या आहेत. या कादंबऱ्या पुढीलप्रमाणें:—**सामाजिक**—१ मधली स्थिति, २ पण लक्षांत कोण घेतो, ३ जग हें असें आहे ! ४ मी, ५ यशवंतराव खरे, ६ गणपतराव (अपूर्ण), ७ मायेचा बाजार, ८ भयंकर दिव्य, ९ कर्मयोग (अपूर्ण), १० आजच (अपूर्ण), **ऐतिहासिक**—१ उषःकाल, २ गड आला पण सिंह गेला, ३ रूपनगरची राजकन्या, ४ चंद्रगुप्त, ५ केवळ स्वराज्यासाठीं, ६ सूर्योदय, ७ सूर्यग्रहण (अपूर्ण), ८ वज्राघात. यांखेरीज 'म्हैसुरचा वाघ', 'कालकूट' व 'मध्यान्ह' अशा तीन कादंबऱ्या अपूर्ण स्थितींत करमणूकींत प्रसिद्ध झालेल्या आहेत.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या ह्या महाराष्ट्रांतील विसाव्या शतकाच्या प्रारंभींपर्यंतच्या तीन पिढयांचा इतिहास आहे. महाराष्ट्रांतील मध्यम वर्गाच्या विकारांचें व विचारांचें प्रदर्शन यांत फारच चांगलें झालें आहे. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास कोणी लिहावयास घेतल्यास त्यास या कादंबऱ्या अभ्यासिल्यावांचून चालणार नाहीं.

हरिभाऊंनीं सामाजिक कादंबऱ्यांप्रमाणेंच ऐतिहासिक कादंबऱ्याहि हिंदुस्थानाच्या इतिहासांतील प्रत्येक कालावर लिहिल्या आहेत. हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासावरील कादंबरी म्हणजे 'चंद्रगुप्त' होय. मध्ययुगीन भारतावरील त्यांची कादंबरी म्हणजे 'वज्राघात' ही होय. रजपुतांच्या इतिहासावरील कादंबरी म्हणजे 'रूपनगरची राजकन्या' ही होय. मुसलमानांच्या व मराठ्यांच्या म्हणजे हिंदुस्थानाच्या अर्वाचीन इतिहासावरील कादंबऱ्या म्हणजे 'उषःकाल,' 'गड आला पण सिंह गेला,' 'केवळ स्वराज्यासाठीं,' 'सूर्योदय' व 'सूर्यग्रहण' या होत. या आठ कादंबऱ्यांत हरिभाऊंनीं इ. स. पूर्वी ३०० पासून इ. स. १७०० पर्यंतचा दोन हजार वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास अत्यंत सुंदर रीतीनें ग्रथित केलेला आहे.

कादंबऱ्यांखेरीज हरिभाऊंचें पुढीलप्रमाणें आणखी वाङ्मय आहे:—१ संगीत संत सखूबाई (नाटक), २ संगीत पिंगला (नाटक), ३ भासकवीच्या नाटककथा, ४ मराठी वाङ्मयाचा अभ्यास (निबंध), ५ स्फुट गोष्टी (भाग १, २, ३, ४), ६ कसे दिवस गेले (प्लेगच्या कहरांतील एक गोष्ट). (७) हरिभाऊंचीं पत्रें.

'करमणुक' नांवाचें एक सुंदर साप्ताहिक हरिभाऊंनीं १८९० सालीं सुरू केलें. यावेळीं त्यांचें वय अवघें सव्वीस वर्षांचें होतें. या पत्रावर आबालवृद्धांच्या

उठ्या पडत. या पत्राच्या उद्देशांत हरिभाऊ म्हणतातः—' केसरी, सुधारक एखाद्या कठोर पित्याप्रमाणें कठोर शब्दानें सांगणार व समाजाचें अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळीं वाक्प्रतोदाचे तडाके लगावणार, तीच गोष्ट हें पत्र प्रेमळ माते-प्रमाणें गोड गोड शब्दांनीं व चांगल्या चांगल्या गोष्टींनीं अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेचें शासन करणार. येवढें मात्र ध्यानांत ठेवावें, कीं हें पत्र अचरट आई-प्रमाणें फाजील लाड करणार नाहीं........ज्यास पुढल्या माडीपासून चुलीपर्यंत व दिवाणखान्यांतील टेबलापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्या हातीं पडलें तरी हवें त्यानें, हवें त्याच्या देखत निःशंकपणें वाचण्यास हरकत नाहीं, असें पत्र पाहिजे असेल तर त्यांनीं अवश्य करमणुकीचें वर्गणीदार व्हावें....शनि-वारीं संध्याकाळीं थकून भागून आल्यावर आपल्या कुटुंबांतील लहान मोठ्या माणसांस जमवून खुशाल हंसत खेळत करमणूक करून ज्ञान मिळविण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांचे आम्ही नम्र सेवक आहोंत. ' या उद्देशानुसार हरिभाऊंनीं जवळ जवळ तीस वर्षें ' करमणुक ' पत्र चालविलें. या पत्रांतूनच त्यांच्या सर्व—' मधली स्थिति ' खेरीज—कादंबऱ्या पहिल्यानें प्रसिद्ध झाल्या. त्यांचें इतर लिखाणहि यांतूनच प्रसिद्ध झालें.

" हरिभाऊंच्या आयुष्याच्या शेवटच्या तीस वर्षांचे म्हणजे करमणुकीच्या जन्मापासून तों अखेरपर्यंतच्या काळाचे दहा दहा वर्षांचे तीन भाग पाडले तर त्यांत प्रत्येक भागांत त्यांनीं खालीलप्रमाणें ग्रंथरचना केलेली आढळते:—

[ १८९० पासून १९०० ]

| | | |
|---|---|---|
| **सामाजिकः**— | पण लक्षांत कोण घेतो ! | ( १८९०–९३ ) |
| | सगुणाबाईचीं आपल्या मुलीस व गोविंदरावांचीं आपल्या मुलांस पत्रें. | ( १८९१–९४ ) |
| | यशवंतराव खरे. | ( १८९२–९५ ) |
| | मी. | ( १८९३–९५ ) |
| | जग हें असें आहे. | ( १८९७–९९ ) |
| | काळ तर मोठा कठीण आला; कसे दिवस गेले. | ( १८९९ ) |

मराठी ग्रंथ

ऐतिहासिकः—म्हैसूरचा वाघ (अपूर्ण). ( १८९०–९१ )
उषःकाल. ( १८९५–९७ )
केवळ स्वराज्यासाठीं. ( १८९८–९९ )

[ १९००–१९१० ]

सामाजिकः—भयंकर दिव्य. ( १९०१–०३ )
आजच ( अपूर्ण ) ( १९०४–०६ )

ऐतिहासिकः—रूपनगरची राजकन्या. ( १९००–०२ )
चंद्रगुप्त. ( १९०२–०४ )
गड आला पण सिंह गेला. ( १९०३ )
सूर्योदय. ( १९०५–०६ )
माध्यान्ह ( अपूर्ण ) ( १९०६–०८ )
सूर्यग्रहण ( अपूर्ण ) ( १९०८–०९ )

[ १९१०–१९१९ ]

सामाजिकः—मायेचा बाजार. ( १९१०–१२ )
कर्मयोग ( अपूर्ण ) ( १९१३–१७ )

ऐतिहासिकः—कालकूट ( अपूर्ण ) ( १९०९–११ )
वज्राघात. ) १९१३–१५ )

"हरिभाऊंनीं पहिल्या दहा वर्षांत चार सामाजिक कादंबऱ्या व दोन ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या, दुसऱ्या दहा वर्षांत दोन सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांतील एक अपूर्णच आहे. या काळांत चार पूर्ण व दोन अपूर्ण अशा त्यांनीं सहा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. तिसऱ्या दहा वर्षांत दोन सामाजिक व दोन ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांपैकीं प्रत्येकांतील एक एक कादंबरी अपूर्णच आहे."

" यावरून असें दिसून येतें कीं, सन १९०० नंतर हरिभाऊंनीं 'भयंकर दिव्य' व 'मायेचा बाजार' या दोनच सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यानंतर त्यांचें लक्ष ऐतिहासिक कादंबऱ्यांकडेच विशेष असलेलें दिसतें. दुसऱ्या दहा वर्षांत प्रायः प्रत्येक वर्षी त्यांनीं एक एक ऐतिहासिक कादंबरी लिहिली आहे. त्यांतील 'सूर्यग्रहण' हें कथानकाच्या अनुरोधानें पाहतां वस्तुतः पूर्णच झालें

आहे. फक्त 'माध्यान्ह' हीच काय ती कादंबरी अपूर्ण राहिलेली दिसते. म्हणजे दहा वर्षांच्या काळांत त्यांनीं सात ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या."

"सन १९०० नंतर हरिभाऊंचें सामाजिक कादंबऱ्यांकडील चित्त कमी कां झालें असा साहाजिकच प्रश्न उद्भवतो. त्याचें निश्चित उत्तर देणें अर्थातच शक्य नाहीं. या काळांत सुधारणा लोकांच्या कांहींशा अंगवळणीं पडत चालल्या. अर्थात् सामाजिक चळवळीचा तितका जोर कमी झाला. या परिस्थितीचाहि हा परिणाम असेल. पण साधारणतः असें दिसतें कीं, समाजांतील विद्यमान व पुढील दहावीस वर्षांच्या काळांतील विचारपरिवर्तन त्यांनीं आपल्या १९०० पूर्वीच्या कादंबऱ्यांतच चित्रित केलें. या पुढच्याहि काळाची सद्यःस्थिति रेखाटीत बसणें म्हणजे समाजाचें लक्ष त्या काळाकडे वेधून त्यास सद्यःस्थितीकडे दुर्लक्ष करण्यास लावण्याप्रमाणें होणार आहे असा विचार त्यांच्या मनांत आला असावा. म्हणूनच ते ऐतिहासिक कादंबऱ्यांकडे वळले असावेत. ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या योगानें समाजास सद्यःस्थितीची व पूर्वस्थितीची तुलना करतां येऊन दोहोंमधीलहि चांगल्या गोष्टींचा मिलाफ करतां येतो. आजच्या आणि यापुढें पंचवीस वर्षांनीं होणाऱ्या सद्यःस्थितीचें विवरण केल्यानंतर पूर्वस्थितीचें सिंहावलोकन करणेंच त्यांना इष्ट वाटलें असावें." (आंबेकरकृत आपटे चरित्र.)

१९१३ पासून १९१९ पर्यंत हरिभाऊंचे हातून विशेष लेखन झालेलें दिसत नाहीं. कौटुंबिक आपत्तीमुळें त्यांची वृत्ती उदासीन झाली होती, त्यांत जलोदर विकाराचीहि भर पडली.

हरिभाऊंचे चुलते महादेव चिमणाजी यांनीं जवळ जवळ लाख दीड लाख रुपये खर्च करून प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या जीर्णोद्धारार्थ 'आनंदाश्रम' नांवाची एक संस्था पुणें येथें स्थापन करून ठेवली आहे; या संस्थेमध्यें नुसत्या प्राचीन ग्रंथांचाच जीर्णोद्धार व्हावयाचा आहे असें नाहीं; तर प्राचीन संस्कृत विद्येचा अभ्यास करणाऱ्या १०।१२ विद्यार्थ्यांची जेवणाची व राहण्याची वगैरे सर्व प्रकारची सोय व्हावी, आणि प्रत्यहीं पांच संन्याशांस तरी भोजन मिळेल अशी व्यवस्था करून ठेविली आहे. या संस्थेच्या व्यवस्थेचें काम हरिभाऊंकडे सोंपविण्यांत आल्यामुळें चरितार्थासाठीं इतर उद्योग करण्याची त्यांस आवश्यकता राहिली नाहीं. येथें लेखनव्यवसायास जरूर असलेलें सर्व प्रकारचें स्वास्थ्य त्यांस मिळत होतें.

महाराष्ट्रांतील ग्रंथकारांत हरिभाऊंइतका सर्व प्रकारची मानमान्यता मिळालेला भाग्यवान् ग्रंथकार दुसरा मिळणार नाहीं. हरिभाऊ पुणें म्युनिसिपालिटीचे वीस वर्षें सभासद व तीन वर्षें अध्यक्ष होते. युनिव्हर्सिटीच्या सीनेटच्या फेलोच्या जागीं त्यांची नेमणूक झाली होती व ते कित्येक वर्षें उच्च शिक्षणांतील परीक्षांनाहि परीक्षक होते.

हरिभाऊंच्या कादंबऱ्यांसंबंधीं रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं आपल्या 'मराठी कथात्मक वाङ्मय' या निबंधांत पुढीलप्रमाणें चर्चा केली आहे, "रेनॉल्ड्सूनें कादंबरीकारांना व वाचकांना जें वेड लावलें होतें, त्यापासून हरिभाऊ आपटेहि प्रथम मुक्त नव्हते. त्यांच्या पहिल्या पहिल्या कादंबऱ्यांना त्याच कादंबरीकारांपासून प्रेरणा मिळालेली दिसते. 'मधली स्थिति' या कादंबरीचे पहिले भाग रेनॉल्ड्सच्या एका कादंबरीच्या आधारानें लिहिलेले असून बाकीच्या भागांची रचना, त्यांतील बीभत्स भाग वगैरे प्रकार त्याच ग्रंथकाराच्या धर्तीवर आहेत. आपल्यांच्या अलीकडच्या कादंबऱ्यांत सुद्धां एखाद्या चित्तवेधक प्रसंगाचें वर्णन चाललें असतां तें बंद ठेवून वाचकांचे मनाचा हिरमोड करण्यांत येतो. हा प्रकार रेनॉल्ड्सचाच आहे. हरिभाऊंनां आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच अशा सामान्य ग्रंथकाराबद्दल जो आदर वाटत होता, त्यामुळें त्यांच्या पुढील कादंबऱ्यांच्या रचनेचेंहि स्वरूप अंशतः ठरल्यासारखें झालें. 'जग हें असें आहे' इत्यादि कांहीं कादंबऱ्यांत त्यांनीं मिसेस हेन्री वुडचें व 'उषःकाल,' 'रूपनगरची राजकन्या' इत्यादि ऐतिहासिक कादंबऱ्यांत त्यांनीं स्कॉट, हॅगर्ड या ग्रंथकारांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हेन्री वुड ही ग्रंथकर्तीही सामान्य लेखकांपैकींच आहे; आणि स्कॉट व हॅगर्ड यांचें अनुकरण हरिभाऊंना साधावें तितकें साधलें नाहीं. याचें एक कारण आपल्याकडील पुरातन चालीरीतींच्या ज्ञानाचा अभाव, व दुसरें कारण हरिभाऊंना माधुर्य हा गुण जसा साधतो तसा ओजोगुण साधत नाहीं हें होय. 'उषःकाल' या कादंबरींत श्रीधरस्वामींचें चित्र जितकें आदरणीय झालें पाहिजे अशी वाचकांची अपेक्षा असते व कर्त्याचीहि असावीशी दिसते तितकें तें झालें नाहीं, उलट क्वचित् स्थलीं तें बालिशही वाटतें. या गोष्टीवरून वरील म्हणण्याची सत्यता निदर्शनास येईल. शिवाय आपल्यांच्या तारुण्यांतील भाषेला बांधेसूदपणा होता, तो दिवसेंदिवस लोपत जाऊन हल्लीं तिला एक प्रकारचा विस्खलितपणा, बोजडपणा व एकसारखेपणा आला आहे. यांच्या एक दोन अलीकडील कादंबऱ्या 'करमणूक' पत्रांत प्रसिद्ध होण्यासाठीं हप्त्याहप्त्यांनीं लिहिल्या

असल्यामुळें त्यांमध्यें प्रमाणशुद्धपणा जरा कमी आहे; म्हणजे एखाद्या हलक्या पात्राला किंवा प्रसंगाला नसतें महत्त्व व त्या मानानें प्रमुख पात्राला किंवा प्रसंगाला कमी महत्त्व दिलें गेलें आहे. किरकोळ गोष्टींचीहि चर्चा व त्याबद्दल नसत्या शंकाकुशंका असा प्रकार झाल्यामुळें त्यांतील कांहीं भाग कंटाळवाणे झाले आहेत. पात्रांच्या बाह्य स्वरूपाच्या वर्णनाप्रमाणें विचारांचें प्रतिबिंब थोड्या शब्दांनीं वठविल्यास जितकें स्पष्ट दिसतें, तितकें तें अन्यथा दिसत नाहीं. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत यासंबंधानें योग्य त्यापेक्षां अधिक विस्तार झाला आहे. याशिवाय पुनरुक्ति व अगदींच सामान्य व किरकोळ सिद्धांतांचें कथन हे दोषहि त्यांत मधूनमधून दिसून येतात. कथानकांतील भाग किंवा पात्रांचीं नांवें गुप्त ठेवण्यांतहि हरिभाऊंकडून एक अशी चूक झालेली दिसते कीं ते भाग किंवा तीं नांवें वाचकांना तर्कानें कळल्यानंतर बऱ्याच अवकाशानें त्यांची ग्रंथकाराकडून परिस्फुटता होते. 'उषःकालां'तील शिवाजीचें नांव वाचकांना कळविण्यांत फार विलंब झाला आहे असें वाटतें. हा प्रकार कांहींसा खुद्द ग्रंथकाराचें नांव मराठी वाचकांना कळल्यानंतर फार उशीरानें तें त्याजकडून जाहिर करण्यांत आलें या प्रकारासारखाच आहे."

"हे दोष वर्ज्य केले तर हरिभाऊ आपल्यांच्या कादंबऱ्या चांगल्या झाल्या आहेत असें मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्याला कबूल करावें लागेल. यांच्या पहिल्या कादंबऱ्यांत संविधानकाची मांडणी विशेष चातुर्याची नसे. 'मधली स्थिति' या कादंबरीला 'गोंधळ' हें नांव देण्याचा आपला विचार होता असें कर्त्यानें कांहींसें विनयानें व कांहींसें वस्तुस्थितीला धरून प्रस्तावनेंत म्हटलें आहे. पण पुढें पुढें ही स्थिति बदलून 'चंद्रगुप्त', 'उषःकाल', 'रूपनगरची राजकन्या', 'भयंकर दिव्य' इत्यादि कादंबऱ्यांत आपल्यांचें संविधानकचातुर्य चांगलें प्रत्ययास येतें. या कादंबऱ्यांतील भाषा जरी पूर्वीइतकी चटकदार व बांधेसूद नाहीं, तरी 'ओझरतें दर्शन' इत्यादि कांहीं प्रकरणें भाषेच्या दृष्टीनेंहि उत्कृष्ट साधलीं आहेत; व मनुष्यस्वभावाचें वर्णन कांहीं अपवाद वर्ज्य केल्यास कर्त्याच्या वाढत्या अनुभवाला पूर्णपणें शोभण्यासारखेंच आहे. आपल्यांच्या प्रथमच्या कादंबऱ्यांपेक्षां नंतरच्या कादंबऱ्यांत दुसरा एक गुण दिसून येतो. तो काव्य हा होय. 'रूपनगरची राजकन्या' या कादंबरींतील अचलेश्वराच्या मंदिराचें वर्णन ज्यांनीं वाचलें असेल, त्यांस हें विधान मान्य होईल अशी खात्री आहे."

"आजपर्यंत परकीय देशांतील कादंबरीकारांच्या ग्रंथविस्ताराकडे पाहून मन थक्क होत असे. स्कॉट, डिकन्स, बाल्झॅक, व्हिक्टर ह्यूगो यांपैकीं प्रत्येकाच्या इतक्या कादंबऱ्या आहेत कीं, त्या कादंबऱ्यांचें घाईघाईनें वाचन करणें हेंसुद्धां बऱ्याच काळाचें काम आहे. डयूमास व त्याचे स्नेही यांनीं मिळून दोन हजार कादंबऱ्या लिहिल्या. हा काळ जरी आपणांकडे अजून आला नाहीं तरी तो लौकरच येईल अशी हरिभाऊंच्या ग्रंथविस्तारावरून आशा वाटते. इकडील कादंबऱ्या गुणांच्या बाबतींत अजून मागसलेल्याच आहेत हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. पण तिकडील ग्रंथकारांप्रमाणें उद्योगशीलता व उत्साह हीं आम्हांला पूर्णपणें शक्य आहेत हें हरिभाऊंनीं आपल्या उदाहरणावरून सिद्ध करून दाखविलें आहे. इतर महत्त्वाचीं कामें संभाळून इतकी प्रचंड ग्रंथसृष्टि निर्माण करणारे हेच पहिले मराठी ग्रंथकार होत. यांचें चरित्र दिलें म्हणजे आधुनिक कादंबऱ्यांचा निराळा इतिहास द्यावयास नको, इतकी यांची कथात्मक वाङ्मयांत योग्यता आहे."

"आपट्यांच्या कादंबऱ्यांस जरी जुन्या कथांचा आधार असला तरी रचनेच्या दृष्टीनें त्यांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या स्वतंत्र आहेत, हा त्यांच्यामध्यें एक विशेष गुण आहे. गुंजीकर, धनुर्धारी इत्यादि इतर स्वतंत्र कादंबरीकारांप्रमाणें त्यांना इंग्रजी कादंबऱ्यांवरूनच स्फूर्ति झाली हें खरें आहे, इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें धनुर्धारींनीं 'वांईकर भटजी' चे पहिले भाग गोल्डस्मिथच्या प्रसिद्ध कादंबरीच्या आधारेंच लिहिले, त्याप्रमाणें आपट्यांनींहि 'मधली स्थिति' या कादंबरींतील पहिले भाग एका इंग्रजी कादंबरीच्या आधारेंच लिहिले. पण ज्याप्रमाणें धनुर्धारांनीं 'वांईकर भटजी' चा बहुतेक भाग स्वतंत्र लिहिला आहे, त्याचप्रमाणें आपट्यांनींहि आपल्या कादंबरीचा बाकीचा सर्व भाग स्वतंत्रपणेंच लिहिला आहे. इंग्रजी कादंबऱ्यांचा भाषांतराचा काल व स्वतंत्र रचनेचा काल यांच्या संधिकालांत इंग्रजी ग्रंथांचा आधार घेण्याची प्रवृत्ति स्वाभाविक आहे. पण ती बाजूला सारून केवळ स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची इच्छा होणें हें या ग्रंथकारद्वयाच्या सामर्थ्याचें निदर्शक होय."

"हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांतून कांहीं इंग्रजी धर्तीवर व 'उद्गारणें,' 'स्मितणें' इत्यादि कांहीं नवीन भाषाप्रकार सुरू केले आहेत. ते प्रथम प्रथम जरी कर्णकटु वाटले, तरी कालांतरानें रूढ होण्याचा संभव आहे. या बाबतींत त्यांचें

अनुकरण करण्याला इतर कादंबरीकारांनींहि सुरवात केली आहे. यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील संभाषणांतसुद्धां हल्लींची सुधारलेली मराठी भाषाच वापरण्यांत आली आहे, व यांत नांव ठेवण्यासारखें कांहीं नाहीं; पण शिवाजीच्या तोंडून साक्षात्कारप्रसंगीं देवीची म्हणून जी वाणी प्रकट झाली आहे ती बखरींतलीच कां असावी याचें कारण कळत नाहीं. 'जग हें असें आहे', 'भयंकर दिव्य' इत्यादि सामाजिक कादंबऱ्यांत कांहीं कांहीं व्यक्तींच्या तोंडीं इंग्रजी भाषा वापरली आहे. ही योजना वस्तुस्थितीचें चित्र वठवण्याच्या दृष्टीनें जरी रास्त असली, तरी तिनें मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें, पुस्तकास गौणत्व येतें; व म्हणून ती योजना वारंवार न झालेली बरी."

"आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत अद्भुतरस बराच साधला आहे; व अद्भुत प्रसंग बहुधा स्वाभाविकरीतीनें घडवून आणिल्यामुळें त्यांचा मनावर संस्कारहि दृढ होतो. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांत जरी इकडील गृहस्थितीचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे, तरी त्यांतही विस्मयकारक प्रसंग बरेच आहेत. आणि खरोखर सांप्रतकाळीं आपल्या समाजांत जुनें व नवें यांच्या सांनिध्यामुळें जे आश्चर्यकारक प्रसंग रोजच्या व्यवहारांत घडून येतात तसे अद्भुत कादंबऱ्यांत सुद्धां वाचावयास मिळणार नाहींत. आपणांमधील गेल्या पिढीचे लोक व या देशांतील फार पुरातन कालचे लोक यांमध्यें धार्मिक, नैतिक, सृष्टिविषयक व व्यावहारिक समजुतींसंबंधानें फारसें अंतर नाहीं. अशांचा व इंग्रजी विद्या शिकलेल्यांचा एकत्र योग म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचें हिंदुस्थान व १९ व्या शतकांतील यूरोप यांच्या योगाइतकाच विस्मयकारक आहे. एकीकडे सामायिक तर दुसरीकडे वैयक्तिक कुटुम्बपद्धति, एकीकडे कर्मठपणा तर दुसरीकडे एकेश्वरी पंथ किंवा नास्तिकवाद, एकीकडे स्त्रियांविषयीं व अंत्यजांविषयीं अनादर तर दुसरीकडे विलासी राहणी, एकीकडे बैलगाड्या व सांडणीस्वार तर दुसरीकडे आगगाड्या, विमानें व तारायंत्रें, एकीकडे पंतोजी तर दुसरीकडे प्रोफेसर, एकीकडे तहान लाडू भूकलाडू तर दुसरीकडे इराण्याचें दुकान, एकीकडे भांग्यामारुतीचा अड्डा तर दुसरीकडे वर्तमानपत्रें, याप्रमाणें हजारों गोष्टींत पदोपदीं विलक्षण अंतर दिसून मन थक्क होतें. इंग्रजी विद्येमुळें जे नवे नवे प्रकार सुरू झाले आहेत त्यांतील परस्परविरोध तरी कमी आहे काय? नाहीं. इंग्रजी विद्येचा संस्कार झालेल्यांमध्यें इतरांसाठीं सर्वस्व अर्पणारे महात्मेहि आहेत व केवळ स्वार्थासाठीं इतर

सर्वांवर तिलांजलि सोडण्याला तयार असे पामरमेहि आहेत. पाश्चात्य सुधारणेचा गाभा हस्तगत करूं पाहणारे खरे सुधारकहि आहेत व स्वतः दारू पिऊन पशूंच्या कोटींत जाऊन बसणारेहि आहेत. याप्रमाणें इंग्लंड व हिंदुस्थान या दोन कटाहांतील भिन्न जातीय सामुग्री एकत्र झाल्यामुळें नाना प्रकारचे चमत्कार प्रत्येक दिवशीं प्रत्येक घरीं नजरेस पडत आहेत. या खळबळींचा आपट्यांनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्या चटकदार करण्यांत बराच उपयोग करून घेतला आहे."

"हरिभाऊंना ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षां सामाजिक कादंबऱ्या विशेष साधतात हें वर आलेंच आहे. 'गड आला पण सिंह गेला', 'रूपनगरची राजकन्या', 'उषःकाल' या ऐतिहासिक कादंबऱ्या चांगल्यापैकीं आहेत खऱ्या, पण 'जग हें असें आहे', 'भयंकर दिव्य' इत्यादि सामाजिक कादंबऱ्यांत हरिभाऊंच्या लेखणींत जें स्वातंत्र्य व तेज दृष्टीस पडतें तें त्या कादंबऱ्यांत दिसत नाहीं. त्या कादंबऱ्यांत एक तऱ्हेची कृत्रिमता दिसून येते. या भेदाचें कारण इतकेंच कीं, कर्त्यास मार्मिक अवलोकनानें सद्यःकालाशीं जितका निकट परिचय करून घेतां आला, तितका वाचनाच्या किंवा कल्पनेच्या साहाय्यानें गत कालाशीं करून घेणें शक्य नव्हतें. असो. याप्रमाणें हरिभाऊंच्या बहुतेक सर्व सामाजिक कादंबऱ्या वाचनीय झाल्या आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत आपल्या ऐन उमेदींत लिहिलेली 'पण लक्षांत कोण घेतो?' ही त्यांची कादंबरी विशेष सरस उतरली आहे असें वाटतें. तींत त्यांच्या अगदीं पूर्व वयांतील कादंबऱ्यांचा चटकदारपणा असून शिवाय उत्तरवयांतील कादंबऱ्यांमध्यें दिसून येणारें स्वभाववर्णनचातुर्यहि आहे. पूर्वोक्त कादंबऱ्यांतील विस्खलित संविधानक हा दोष जरी तिच्यांत असला तरी ती कादंबरी आत्मचरित्रात्मक असल्यामुळें तिच्यामध्यें तो दोष इतका भासत नाहीं; व उत्तरोक्त कादंबऱ्यांत दिसून येणारा पाल्हाळिकपणाचा दोष जरी तिच्यांत क्वचित् दिसून येतो, तरी आत्मचरित्र निवेदन करणारी स्त्री असल्यामुळें तिला तो दोष इतका शोभूनच जातो. या कादंबरींत ब्राह्मण स्त्रियेच्या चरित्रांतील बहुतकरून प्रत्येक महत्त्वाची गोष्ट इतक्या चटकदार व स्वाभाविक रीतीनें सांगितली आहे कीं वाचकाची पुस्तकाशीं एकतानता होऊन प्रत्येक प्रसंग आपल्या दृष्टीसमोरच चालला आहे कीं, काय असा भास होतो. या पुस्तकांतील भाषा इतकी घरगुती व हृदयंगम आहे कीं, तशी स्त्रीलेखकाच्याहि हातून उतरणें कठीण. नायिकेचा बाप व आई, आजा व आजी, मामेसासरे व मामेसासवा, भाऊ व भाव-

जय, दुर्गी व तिचा नवरा, हीं विजोड जोडपीं दाखविल्यामुळें हास्यास्पद व करुणास्पद प्रसंग बरेच आणितां आले आहेत. हरिभाऊंना करुणरस फार चांगला साधतो असें त्यांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेंच याहि कादंबरीवरून उघड होतें. यमुनेची आई ही प्रत्येक ब्राह्मण कुटुंबाच्या परिचयाची व्यक्ति आहे; व शंकर मामंजी हें पात्र अद्वितीय झालें आहे."

"पुस्तकाची योग्यता साधारणपणें तीन कसोट्या लावून काढितां येते. एक कसोटी पाठांतराची; पुस्तक एकदां वाचल्यावर तें पुनः वाचण्याची इच्छा होते कीं काय यावर ही अवलंबून असते. दुसरी कसोटी देशांतरांची किंवा भाषांतराची. पुस्तकाचें भाषांतर होऊन तें स्वदेशांतल्याप्रमाणेंच इतर देशांतहि लोकप्रिय होतें किंवा नाहीं याचा विचार ही कसोटी लावतांना करावा लागतो. तिसरी कसोटी कालांतराची. काल हा मोठा मार्मिक परीक्षक आहे. याच्या चाळणींतून हिरकण्या गळून फक्त कोहिनूरसारखे हिरे मात्र राहतात. या कालरूपी सूत्रधाराचे शतकरूपी अनेक पडदे पडूनहि ज्यांची प्रतिभा पूर्वीच्या उज्ज्वल स्वरूपांत दिसते त्यांचे ग्रंथ विश्ववंदनीय होत. कालिदास, होमर, शेक्सपियर, सरव्हँटीज, मोलियर, गेटी, बाल्झॅक हे अशा विभूतींपैकीं होत. वर दिलेल्या तिन्ही परीक्षा उत्तीर्ण झालेले हे पदवीधर होत. उत्तरोक्त दोन कसोट्यांतूच 'पण लक्षांत कोण घेतो' ही कादंबरी पार पडेल कीं काय तें आज सांगतां येत नाहीं. पण पाठांतराची पहिली कसोटी लाविली असतां ती हिणकस ठरणार नाहीं, इतकेंच नव्हे तर सद्यःस्थितीचें रोजच्या भाषेनें वठविलेलें उत्तम चित्र म्हणून ती पुष्कळ वर्षे, टिकाव धरून राहील अशी खात्री वाटते." ( विविध ज्ञानविस्तार पु. ४३ अंक १–२)

प्रो. वामन मल्हार जोशी यांनीं 'हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांसंबंधीं चार शब्द' या व्याख्यानांत हरिभाऊंच्या कादंबऱ्यांच्या भाषेंतील पुढीलप्रमाणें गुणदोष दाखविले आहेत. "हरिभाऊंची भाषा सोपी, अकृत्रिम आहे हें सर्वश्रुतच आहे. त्यांनीं नवीन शब्द व म्हणी तयार करावयाचा व इंग्रजींतून रूपांतर करण्याचा बहुधा किती यशस्वीपणानें प्रयत्न केला आहे, याची कांहीं उदाहरणांवरून कल्पना येईल. तोंडतांडव, मनाचे मनोरे ( कासल्स इन द एअर ) हंसाहंसाट—शब्द साधला नाहीं, पण प्रयत्न आहे—गालहांसुकि–ती छान शब्द ! —'अ' पूर्वक प्रेमप्रसंग ( म्हणजे अप्रेमाचा प्रसंग ), विनोदसंलाप, प्रेमसंभा-

षण, उदाररमणीय, सरलोदार, नाटकघर, 'आ' कृतवक्त्र (वदन), नॉट पेड उपदेश, मन मुलांचें बिंब आरशाचें, कष्टयांचा कनवाळू व दुःख्यांचा दयाळू, असे अनेक नमुने देतां येतील. आपल्या भाषेला श्रीमंती आणण्याचे असे प्रयत्न सर्वांनीं करावे. आपण प्रचारांत आणलेला शब्द लोकप्रिय झाला म्हणजे आपल्याला कोण आनंद होतो! आतां हरिभाऊंच्या भाषेंतील कांहीं दोषहि सांगतों. हवेप्रमाणें सर्वव्यापी झालेल्या इंग्रजीच्या संस्कारानें हरिभाऊंनाहि क्वचित् घेरल्याचें दिसतें. इंग्रजी परोक्षनिवेदनाचा (Indirect) परिणाम ज्यांच्यावर झालेला आहे, अशीं एक दोनच वाक्यें येथें देतों; पण तशीं प्रत्येक कादंबरींत सांपडतील. 'गाडीवान कोठें गेला! मी एकटीशी! अशी त्यांनीं चौकशी केली.' (तूं एकटीशी असें पाहिजे) 'ती तिच्या बापाची आवडती, (आपल्या पाहिजे) 'तो वादविवादाच्या मनोवृत्तींत नव्हता,' हें वाक्य वाचून इंग्रजी 'Not in a mood for discussion' याची आठवण होते. 'दुष्टबातमी' (Cruel news), 'अस्वस्थ झोंप लागली' (Had a disturbed sleep), 'त्यांचीं उदाहरणें केलीं पाहिजेत' (We must make an example of them चें भाषांतर) इत्यादि कांहीं दोषास्पद वाक्यें सांपडतात. डोळ्यांत तेल घालून पहावें तेव्हांच तीं दिसतात, आणि एकंदरीनें तीं फारच अल्प प्रमाणांत आहेत."

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

(१) हरि नारायण आपटे–चरित्र, बा. मा. आंबेकर, १९२२, १९३०, आर्यभूषण प्रेस, पुणें.

(२) हरि नारायण आपटे यांच्या आठवणी व मनोरंजक प्रसंग, बा. मा. आंबेकर, १९३१.

(३) आपटे यांच्या आठवणी व कादंबऱ्या, वा. ना. देशपांडे, १९२४.

(४) आपटे स्मृतिदिनसमयीं वाचलेले दोन निबंध, वा. ना देशपांडे, द. ग. येरवडेकर; सहकारी ग्रंथशाळा, पुणें १९२३.

(५) हरिभाऊंचें 'मी'—'शारदाभक्त,' मनोरंजन, आक्टोबर १९१६.

(६) हरिभाऊंशीं दोन घटका, ए. पां. रेंदाळकर, मनोरंजन, एप्रिल, १९१९.

(७) हरिभाऊंच्या वाङ्मयप्रासादाचें ओझरतें दर्शन, व. ना. नाईक, मनोरंजन एप्रिल, १९१९.

( ८ ) 'मी' चा निष्कर्ष अथवा समाजसेवेचीं कांहीं तत्त्वें, प्रो. रा. प. सवनीस, मनोरंजन, मार्च १९२६.
( ९ ) हरिभाऊंचा संदेश, बा. मा. आंबेकर, मनोरंजन, मार्च १९२६.
( १० ) पण लक्षांत कोण घेतो—परीक्षण, श्री. कृ. कोल्हटकर, विविधज्ञानविस्तार पु. २६, अंक १, २, ३, ४; १८९४.
( ११ ) जग हें असें आहे, परीक्षण, बा. ना. देव, विविधज्ञानविस्तार, एप्रिल १९०२.
( १२ ) चंद्रगुप्त—परीक्षण, पाटणकर, विविधज्ञानविस्तार, अंक ४, ५, १९०६.
( १३ ) गीताञ्जलि—परीक्षण ग. ज. आगाशे, विविधज्ञानविस्तार, डिसेंबर १९१८.
( १४ ) 'मी' परीक्षण, रा. वि. ओतुरकर, नवयुग, जानेवारी १९१७.
( १५ ) हरि नारायण आपटे यांचें त्रोटक चरित्र, काशिबाई कानिटकर, विविधज्ञानविस्तार, मार्च १९२१.
( १६ ) ह. ना. आपटेकृत ऐतिहासिक कादंबऱ्या, न. र. फाटक, विविधज्ञानविस्तार, अंक ३, १९२५.
( १७ ) हरिभाऊंचें समाजकार्य, बा. मा. आंबेकर, रत्नाकर, मार्च १९२६.
( १८ ) हरिभाऊंचें कादंबरीमय चरित्र, वा. ना. देशपांडे, रत्नाकर, मार्च १९२९
( १९ ) हरि नारायण आपटे, चरित्र, वेणुबाई पानसे, १९३१.
( २० ) रूपनगरची राजकन्या, मुर्डेश्वर, रत्नाकर, आगष्ट १९२९.

**उदास यशवंतराव आनंदराव** [ १८४२–१८७७ ] प्रवासवर्णनकार. 'धौममहाबळेश्वरवर्णन' या पुस्तकामुळें हे विशेष प्रसिद्धीस आले. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' या पुस्तकाचे कर्ते प्रो. पोतदार यांनीं यांजविषयीं पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे. " प्रवासस्थळवर्णनें मराठींत फार थोडीं. देश पहावे, ज्ञान मिळवावें हा स्वभावच नाहीं. लोकहितवादींनीं या कूपमंडूकवृत्तीवर ठिकठिकाणीं यथास्थित प्रहार केले आहेत व आणखीहि करून ही घातकी प्रवृत्ति आमच्या मानगुटीं बसली आहे, तिथून तिचें उच्चाटन केलें पाहिजे. उदास यांचें धौममहाबळेश्वरवर्णन फार चांगल्यापैकीं आहे. रा. उदास मूळ ओतूरचे. बी. ए. झाल्यावर यांनीं शाळाखात्यांत मध्यप्रांतांत नोकरी केली. पुढें मराठी

ट्रान्स्लेटर होऊन आणखी खातीं बदलून सन १८७७ त हे वयाचे ३५ वे वर्षांचे आंतच क्षयानें वारले! हे चांगले शोधक होते. वृत्ति नम्र होती. लेथब्रिजच्या इतिहासाचें मराठी भाषांतर यांनीं केलें आहे. धौममहाबळेश्वरवर्णन या १५० पानांच्या पुस्तकांत स्थलवर्णन, क्षेत्रमहात्म्य, इतिहासप्रकरण आणि निबंधसार असे भाग चार कल्पिले आहेत. त्यांतील वर्णन व विवेचन दोन्ही चांगलीं उतरलीं आहेत. तथापि पुस्तकाला वर्णन हें नांव दिल्यानंतर त्यांत ऐतिहासिक विवेचनाला निम्मा अधिक भाग योजणें हें प्रशस्त नाहीं. प्रतापगड म्हणजे मराठ्यांच्या वीर्यभूमीचें तेजस्वी केंद्र! तेथें प्रौढप्रताप श्रीशिवाजीमहाराजांची व कडव्या अफझलखानाची ती काळभेट झाली व महाराजांनीं खान नामोहरम केला. या प्रसंगांतील वादग्रस्त मुद्यांचें विवेचन उदास यांनीं या ग्रंथांत विस्तारानें करून महाराजांची बाजू पुढें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तो चांगला साधला असला तरी त्याचा एवढा विस्तार करण्यानें या ग्रंथाच्या वर्णनात्मक स्वरूपांत ऐतिहासिक रंगाची छटा फाजील गडद उठली गेली आहे. परंतु उदात्त ऐतिहासिक प्रसंगाच्या स्मरणानें ‘जो कोणी विचारदृष्टीनें महाबळेश्वर पाहील त्याच्या सुशिक्षित, संस्कृत व सूक्ष्मदर्शी मनावर फार हितावह परिणाम होतील व असे परिणाम त्यांनीं करून घ्यावे हाच या विषयाचा उद्देश होय,’ असें रा. उदास यांनींच याचें समर्थन केलें आहे. अशीं पुस्तकें जितकीं भाषेंत अधिक होतील तितकी भाषेला प्रौढी येईल व लोकसुधारणा होण्यास फार साहाय्य मिळेल.”

**उदासांचें वाङ्मयः**—धौममहाबळेश्वरवर्णन.

**ओक जनार्दन विनायक** [ १८७९–१९१७ ] शिक्षक, संपादक व कोशकार. जन्म पुणें येथें झाला. हे १९०१ सालीं मुंबई विश्वविद्यालयाची एम. ए. ची परीक्षा पास झाले. परीक्षा पास झाल्यावर फर्ग्युसन कॉलेजांत त्यांनीं तीन वर्षें अध्यापनाचें कार्य केलें. पुढें मध्यप्रांत–शिक्षणखात्यांत त्यांस बऱ्या पगाराची जागा मिळाल्यामुळें या कॉलेजांतील नोकरी त्यांनीं सोडली. कांहीं महिने ते नागपूर येथील नीलसिटी हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट होते. या त्यांस ठिकाणीं दरमहा चारशें रुपये पगार मिळत असे. परंतु लो. टिळकांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें ‘बाल्ये राजगुरुर्यंता यौवने भृतिदो नृपः। तथा पेन्शनदाता च न हिंदुः प्रभुराऽत्मनः’ या राजनीतीच्या तत्त्वांत चिरडून जाऊन जन्मल्यापासून मरेपर्यंत

सर्व लोक एकसारखे दास्यत्वांत मुरले जावे, आणि एक पिढी अशी मुरली म्हणजे तिचे आनुवंशिक संस्कार दुसऱ्या पिढीस मिळून अशा रीतीनें राष्ट्रभक्तिशून्य पुरुषांची सरकारी नोकरीकरतां परंपरा तयार व्हावी, या हेतूनें निघालेलीं रिस्ले सर्क्युलरसारखीं सर्क्युलरें हायस्कूलचा मुख्याधिकारी म्हणून तरुण विद्यार्थ्यांवर बजावण्याचें पाप आपल्या हातून होऊं नये, या हेतूनें त्यांनीं या जागेचा दहा-बारा महिन्यांच्या आंतच राजिनामा दिला. नोकरीचा राजिनामा दिल्यावर प्रो. विजापूरकर यांनीं स्थापन केलेल्या ‘ समर्थ विद्यालय ’ या राष्ट्रीय शिक्षणसंस्थेंत जुळल्यास काम करावें अशा हेतूनें १९०८ च्या एप्रिलांत ते तळेगांव येथें आले. तेथें येऊन त्यांनीं समर्थ विद्यालयाची समक्ष पाहणी केली व चालक मंडळीशीं विचारविनिमय केला. त्यांच्या स्वातंत्र्याभिमानी वृत्तीस ही संस्था बरी वाटली व ते लगेच तिचे आजन्म सेवक झाले. या संस्थेचा आजन्म सेवक होण्यांत त्यांनीं विलक्षण स्वार्थत्याग दाखविला. कोठें दरमहाचा चारशें रुपये पगार व कोठें चाळीस रुपयांचें आजन्म सेवकाचें वेतन !

ओक समर्थविद्यालयांत आल्यापासून विजापुरकरांनीं चिटणिशीचें काम त्यांज-कडे सोंपवून आपणास प्रचाराच्या कामास सर्वस्वीं वाहून घेतलें. विद्यालयाचें चालकत्व त्यांचे हातांत येतांच त्यांनीं विद्यालयाला सर्व बाजूंनीं व्यवस्थित स्वरूप आणण्याचे आटोकाट प्रयत्न केले. दुर्दैवानें १९१० सालीं समिती कायद्याची जी गदा विद्यालयावर कोसळली ती जर कोसळली नसती तर त्यांनीं समर्थविद्या-लयाला एक प्रमुख आदर्श विद्यालय बनविलें असतें. समर्थविद्यालय बंद पडल्यावर त्यांनीं ‘ लोकशिक्षण ’ नांवाचें मासिक सुरू केलें व तें १९१७ पर्यंत चालविलें. या मासिकाबरोबरच ‘ गीर्वाण लघुकोश ’ या संस्कृत-मराठी कोशाचें काम हातीं घेऊन तें यशस्वी रीतीनें १९१५ सालीं त्यांनीं पुरें केलें. त्यांच्या आयुष्यांतील वाङ्मयविषयक महत्त्वाची कामगिरी म्हणजे हा कोशच होय.

**ओक यांचें वाङ्मयः—** ( १ ) गीर्वाणलघुकोश.

**ओक वामन दाजी** [ १८४५–१८९७ ] काव्याभ्यासक, काव्यसंशोधक व निबंधलेखक. यांचा जन्म रत्नगिरी जिल्ह्यांतील चिपळूण तालुक्यांतील हेदवी नांवाचे गांवीं झाला. प्राथमिक शिक्षण गांवींच एका तात्या पंतोजीचे हाताखालीं झालें. मॅट्रीकपर्यंतचें शिक्षण रत्नागिरी हायस्कुलांत झालें. यावेळेस या हायस्कु-

लांत डॉ. भांडारकर हे अध्यापक होते. त्यांचे हाताखालींच त्यांचें संस्कृतचें अध्ययन झालें. १८७० सालीं त्यांनीं मॅट्रीकची परीक्षा दिली व संस्कृतची पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळविली. पुढें एल्फिन्स्टन व वुइल्सन या कॉलेजांत ते अभ्यास करीत होते. परंतु मध्येंच कांहीं अडचण उपस्थित झाल्यामुळें शिक्षण सोडून त्यांस नोकरी पत्करावी लागली. १८७५ त नागपूरच्या सिटी स्कुलांत ते उपगुरू म्हणून काम करूं लागले. निबंधमालाकार विष्णु कृष्ण चिपळूणकर हे यावेळीं मोरापंतांवर निबंध ( मार्च १८७७ ) लिहीत होते. या विषयावर मालाकार व वामनराव यांचा ईर्षेचा सामना झाला. वामनरावांना स्वतंत्र मासिकाच्या अभावीं आपला निबंध निबंधमालेंतच प्रसिद्धीकरितां पाठवावा लागला, व मालाकारांनीं त्याला स्थळहि दिलें. त्यांच्या लेखांचें आरंभींचें स्वरूप सौम्य असून पुढें तें फार कडक होत गेलें आहे व शेवटीं तर मालेच्या जनकास, ' मन मानवेल तसा अभिप्राय झोंकून देणें अत्यंत साहसात्मक, गर्हणीय व अनुचित होय. ' असा शेरा देऊन चुका कबूल करावयास लाविलें आहे. मालाकारांवर जय मिळविल्यामुळें वामनरावांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखी झालें. वामनराव १८८३ पर्यंत सिटीस्कूलमध्यें होते. पुढें १८८४ सालीं त्यांनीं ती जागा सोडली व ते नागपूरच्या मेल नॉर्मलस्कूलचे सुपरिंटेंडेंट झाले; नंतर संबळपूरच्या हायस्कुलावरील मुख्य अध्यापक झाले. येथें त्यांनीं पांच वर्षें काम केलें. याच वेळेस निर्णयसागर छापखान्यानें ' काव्यमाला ' व ' काव्यसंग्रह ' हीं दोन मासिकें प्रसिद्ध करण्यास सुरवात केली होती. या मासिकांचें संपादकत्व जनार्दन बाळाजी मोडक यांजकडे होतें. ते १८९० सालीं वारले. त्यांच्या पश्चात् या मासिकांच्या संपादनाचें काम वामनरावांकडे सोंपविण्यांत आलें. हें काम त्यांनीं इतकें उत्कृष्ट बजाविलें आहे कीं, त्याबद्दल महाराष्ट्र त्यांचा नेहमीं कृतज्ञ राहील.

ओकांच्या लेखनकर्तृत्वाबद्दल ' बालबोध 'कर्ते ओक लिहितात, " वामनरावांपुढें मराठी भाषा अगदीं हात जोडून उभी होती, आणि मनांतला कोणताहि अर्थ अगदीं बरोबर रीतीनें व्यक्त करण्यास—बिनचूक ओळख पटेल असें त्याचें शब्दरूपानें काढण्यास—त्यांस मुळींच प्रयास पडत नसत. असें असून भाषा शुद्ध, सरळ, गोड, रसाळ आणि मोठी भारदस्त अशी असे. त्यांतहि पुस्तकपरीक्षणाविषयीं त्यांचा हातखंडा असे. पुस्तकांतील गुण आणि दोष हे दोन्ही समूह त्यांच्यासमोर जसे एकमेकांवर उड्या घेत असत. आणि ते त्यांवर चर्चा मोठ्या उदार

बुद्धीनें आणि निःपक्षपातानें करीत असत. ह्यामुळें त्यांच्या हातचें पुस्तकपरीक्षण ग्रंथकारांस बोधप्रद आणि अन्य जनांस मनोरंजक होत असे. हे इतके उत्तम ग्रंथकाराचे गुण वामनरावांच्या ठायीं असून, शिवाय, कविहृद्गत—नुसतें स्वतः समजण्याचीच नव्हे—तर तें, आपल्या मधुर भाषेनें, वाचकांच्या अंतःकरणांत बिंबविण्याची शक्ति ह्यांचे अंगीं होती. ती अप्रतिम होती. ही त्यांची शक्ति ते 'काव्यसंग्रह' चालवूं लागल्यापासून विशेष प्रकट झाली." (बालबोध, जुलै १८९७)

१८९१ सालीं त्यांची बदली रामपूरच्या हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं झाली. या जागेवर ते अखेरपर्यंत होते. उद्योगातिरेकामुळें त्यांची प्रकृति क्षीण झाली होती. त्यांची पत्नी अकालीं निवर्तल्यामुळें प्रपंचाचा सर्व भार त्यांचेवरच पडला होता आणि त्यांत शिक्षकाचा धंदा असल्यामुळें विसांवा असा त्यांस मिळाला नाहीं. त्यामुळें त्यांस फार लवकर मृत्यु आला.

वामनराव जसे काव्याभ्यासक तसेच कवीहि होते.

**वामनरावांचें वाङ्मयः**—(१) माधवनृपतिनिधनात्मक पद्यरत्नमाला, १८८३; (२) काव्यमाधुर्य, १८८४; (३) लॉर्ड बेकन-चरित्र, १८८४; (४) कादंबरीकथासार, १८८९; (५) मुद्राराक्षस कथासार, १८८९; (६) वासवदत्ताकथासार, १८८९.

**ओक विनायक कोंडदेव** [१८४०–१९१५] चरित्रकार, बालोपयोगी निबंधकार. काव्यसंग्रहकार ओक यांचे हे चुलत चुलत बंधु. यांचा जन्म हेदवी येथेंच झाला. थोडेंसें मराठी व इंग्रजी तीन इयत्ता एवढेंच यांचें शिक्षण. पण स्वकष्टानें यांनीं आपली मराठी भाषा चांगलीच कमविली. "कँडीसाहेबानें मला लिहावयास शिकविलें' असें हे म्हणत. हे आठ रुपये पगाराच्या मास्तरकीपासून वाढत वाढत १०० रुपये पगाराच्या अ. डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टरचे जागेपर्यंत गेले. यांनीं मुलांकरितां 'बालबोध' नांवाचें मासिक सतत ३४ वर्षें चालविलें. त्यांनीं बालबोधांत एकंदर ४०२ चरित्रें, ४०२ कविता, ४०२ निबंध, ३७१ शास्त्रीय विषयांवरील निबंध, आणि इतर विषय ८५०, एवढें लिहिलें आहे. यांनीं छोटीं मोठीं अशीं जवळ जवळ पन्नास पुस्तकें लिहिलीं आहेत व त्यांतील बहुतेक सर्व निर्णयसागर छापखान्यानें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांच्या ग्रंथांचें स्वरूप लक्षांत घेतां त्यांस बालवाङ्मयाचे जनक म्हणणें अधिक शोभेल. यांची भाषा सुबोध, सरळ व मनोरम आहे.

**ओक यांचीं पुस्तकें:**—( १ ) लघुनिबंधमाला. ( २ ) मधुमक्षिका. ( ३ ) गद्यरत्नावली. ( ४ ) महन्मणिमाला. ( ५ ) पुष्पवाटिका. ( ६ ) शहाणपणाचा ओनामा. ( ७ ) मुलांचें कल्याण. ( ८ ) मुलांस थोडासा बोध. ( ९ ) मुलांस उत्तम बक्षिस. (१०) मनुष्याचें कर्तव्यकर्म. ( ११ ) अनुकरण. ( १२ ) शिक्षकांस थोडासा बोध. ( १३ ) फुलांची परडी. ( १४ ) स्वदेशाभिमान. ( १५ ) प्रपंचरहस्य. ( १६ ) महाराष्ट्र वाङ्मय. ( १७ ) सांप्रतच्या लेखकांचें कर्तव्य. (१८) शिमग्याविषयीं थोडा विचार. ( १९ ) स्त्रियांची परवशता. ( २० ) हिंदुस्तानाचा संक्षिप्त इतिहास. ( २१ ) हिंदुस्थान कथारस. ( २२ ) इतिहास–तरंगिणी. ( २३ ) शिपायांच्या बंडाचा इतिहास. ( २४ ) रोमचा इतिहास. ( २५ ) पीटर धि ग्रेट याचें चरित्र. ( २६ ) शिकंदर बादशहाचें चरित्र. ( २७ ) आल्फ्रेड धि ग्रेटचें चरित्र. ( २८ ) सर टॉमस मन्रो याचें चरित्र. ( २९ ) ग्लॅडस्टनचें चरित्र. ( ३० ) रावराजे दिनकरराव राजवाडे यांचें चरित्र. ( ३१ ) अमीर अब्दुल रहिमान चरित्र. ( ३२ ) ड्यूक ऑफ वेलिंग्टनचें चरित्र. ( ३३ ) जावजी दादाजीचें चरित्र. ( ३४ ) सॅम्युअल जॉन्सनचें चरित्र. ( ३५ ) वॉरन हेस्टिंग्सची गोष्ट. ( ३६ ) फ्रान्सांतील राज्यक्रांतीचा इतिहास. ( ३७ ) बालबोध पहिलें, दुसरें, तिसरें, चौथें व पांचवें पुस्तक. ( ४२ ) सोपें व्याकरण. ( ४३ ) आनंदराव. ( ४४ ) शिरस्तेदार. ( ४५ ) विद्यार्थ्यांचा व्याकरण-मित्र. ( ४६ ) आब्राहाम लिंकनचें चरित्र. ( ४७ ) इसापनीति. ( ४८ ) कठीण शास्त्रांतील सोप्या गोष्टी.

**करंदीकर विनायक जनार्दन** [ १८७२—१९०९ ] कवि. जन्म धुळें येथें झाला. याच शहरीं स्कूलफायनलपर्यंत शिक्षण झालें. गणित विषय नावडता असल्यामुळें परीक्षा पास होणें शक्य झालें नाहीं. पहिल्यानें पोलीसखात्यांत व पुढें अनेक ठिकाणीं अनेक प्रकारची नोकरी झाली. स्वभाव चंचल व फंदी असल्यामुळें आयुष्यांत स्थिरता अशी कधींच आली नाहीं. मृत्यूच्या अगोदर तीन वर्षें ते नगरदेवळें येथील जाहागीरदाराकडे कारभारी म्हणून काम पहात असत.

केशवसुत, टिळक व विनायक हे समकालीन असून, परस्परांत गाढ स्नेह वसत होता. या तिघांनीं अर्वाचीन मराठी कवितेला नवें वळण लाविलें. हें वळण लावण्याचा या तिघांकडून प्रयत्न होत असतां महाराष्ट्रकवींच्या विचारांत व

ध्येयांत फरक पडूं लागला होता. 'इंग्रजी कवितेंत जें विशेष आढळतें तें महाराष्ट्रकवितेंत आलें पाहिजे, आढळलें पाहिजे ही जाणीव कवींच्या कृतींत दिसूं लागली. भाषेच्या चमत्कारापेक्षां अर्थाच्या चमत्काराचें, त्यांतहि बुद्धीला गुदगुल्या करणाऱ्या रचनेपेक्षां अन्तःकरण हलविणाऱ्या रचनेचें महत्त्व कवींना अधिक वाटूं लागलें. कसरती करण्याचें वेड होतें तें गेलें. कृत्रिम डामडौलाला कवि नाक मुरडूं लागले. पण सहजसौभाग्याला आळवूं लागले. सभोंवारचें जग, भोंवतीं होणाऱ्या घडामोडी, ऐहिक व्यवहारांच्या अवगुंठनांत लपलेल्या अन्तःस्फूर्ती वगैरे गोष्टींनीं कविहृदयें हलूं लागलीं. काव्याचे विषय बदलले, वृत्त बदललें, ध्येय बदललें, भाव बदलले, थाट बदलले; सारांश काव्याचें स्वरूप इतकें भिन्न झालें कीं हें काव्यच नव्हे असें रसिकमन्य म्हणूं लागले. मराठी कविता मराठ्यांप्रमाणें, आणि मराठ्यांबरोबर नवे ढंग करूं लागली आणि नवे खेळ खेळूं लागली.' (प्रि. वासुदेव बळवंत पटवर्धन)

विनायक हे आधुनिक राष्ट्रीय व ऐतिहासिक कवितेचे जनक होत. गतकाळांतील वैभवाचीं व नव्या काळांतील दैन्याचीं चित्रें कवितेंतून रंगवून जनहृदयाला चेतवणारा पहिला कवि विनायकच होय. देशाची दुरवस्था पाहून त्यांचें हृदय कसें पिळवटत असे याची साक्ष खालील 'यापुढें' ही कविता देईल. विनायक म्हणतातः—

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी—यापुढें !
कोण देशकार्यांसाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी—यापुढें !
मावळे, जयांनीं दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें !
निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं,
यवनांना धायी धायी—यापुढें !

मराठी

भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें, राज्य आपलें, जरीं स्थापिलें जया यवनांहीं—
कोण असा प्रसवे आई—यापुढें !
फांकडा शिपाई बाजी
दावील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें !
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें, स्थापिलें नवें, राज्य त्या जवें वाढवी बाजी
सर करील त्याची कोण—यापुढें !
अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्य-भरारी—यापुढें !
फडणवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी—यापुढें !
जी खनी, प्रसवली मणी, यापरी जनीं, बहुगुणी भारी
झाली ती हाय भिकारी—यापुढें !
ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं—यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली—यापुढें !
यापरी, नाडलों तरी, लोचनांतरीं, नीज जी भरली—
ती निघेल कवण्या काळीं—यापुढें !

आजकाल राष्ट्रीय कवितेची पैदास भरमसाट होऊं लागली आहे. परंतु विनायकांच्या वरील कवितेसारखी, ज्यांत अंतःकरणांतील सारी तळमळ ओतली आहे अशी, कविता त्यांत क्वचितच आढळेल.

"स्वातंत्र्याचा शाहीर या नात्यानें त्यांच्या, 'हतभागिनी' व 'यापुढें' यांखेरीज, बाकीच्या काव्यांत उमेदीचे, उत्साहाचे शब्द ऐकूं येतात. 'महाराष्ट्र लक्ष्मी', 'इतिहासाचें मर्म', 'शिवराजदर्शन', 'शिवसंदेश', हीं सर्व काव्यें स्वातंत्र्याचीं गाणीं आहेत. यांतही आजची परतंत्रता आणि पूर्वीची स्वतंत्रता यांतील विरोध स्पष्टपणें रंगविला आहे, पण या सर्वांची अखेरी धीर देणारी आहे. 'उद्योग करा, प्रयत्न सोडूं नका, स्वातंत्र्यक्षम व्हा, म्हणजे 'केल्या उद्योगाचें,..........केव्हां तरी घडे चीज' असें तीं काव्यें बजावून सांगत आहेत."

"विनायकाच्या कवितेचा एक भाग मुद्दाम वाचण्यासारखा आहे. विशेषतः स्त्रीवर्गाला तो भाग फार आवडेल. मंगळागौरीच्या कहाण्याबरोबर अहल्या, पन्ना, पद्मिनी, राणी दुर्गावती, संयोगिता, तारा, कृष्णाकुमारी, वीरमती वगैरे गाणीं व कविता जर आमच्या तरुण मुलींच्या तोंडीं बसतील तर महाराष्ट्राच्या तेजस्वी स्त्रीचारित्र्याचे आरसे त्यांच्या दृष्टीपुढें नित्य राहातील आणि शाळांतील इतिहासांमधून जें मिळावयाचें नाहीं तें खऱ्या महाराष्ट्रस्त्रीचें बाळकडू त्यांना आपोआपच मिळेल. कधीं न ढळणारा करार, न भंगणारा निर्धार, न वांकणारा स्वाभिमान, आणि पुरुषांसहि लाजविणारा पराक्रम एका कालीं आमच्या बायकांत होता, याची साक्ष वरील कवितांच्या योगें पटते. विनायकाचीं हीं गाणीं बोधपूर्ण आहेत. विनायकाचें पूर्वेतिहासावरील प्रेम स्त्रीपराक्रमाच्या आणि स्त्रीयशाच्या गीतांच्या रूपानेंच प्रकट झालें. याचें कारण काय असेल कोणाला ठाऊक ? पुरुषस्वभावाच्या चंचलतेसंबंधानें या गाण्यांत ठिकठिकाणीं विनायकानें उल्लेख केला आहे, आणि एकनिष्ठ स्त्रीस्वभावाचे तर तीं गाणीं म्हणजे जिवंत ठसे आहेत......विनायकानें ऐतिहासिक पुरुषांपेक्षां ऐतिहासिक स्त्रियांचें यशोगान फार केलें, आणि त्यांच्या शीलाच्या ओजस्वितेचें प्रेमानें कौतुक करण्यांत व तिचीं स्तोत्रें गाण्यांत त्याला परमानंद होत असे. कदाचित् महाराष्ट्रांतील पुरुषांपेक्षां महाराष्ट्रांतील स्त्रियांवरच त्याच्या आशेची भिस्त अधिक असेल ! कदाचित् पुरुष चुकले, भुलले तर भुलोत बेटे ! त्यांना ताळ्यावर आणायला,

त्यांचे डोळे उघडायला, महाराष्ट्रांतील स्त्रिया तरी स्वतांचें तेज, स्वतांचें ओज, स्वतांचें शील, आणि स्वतांचें सत्त्व संभाळून राहोत, ही त्याची उत्कट इच्छा असेल !"

"विनायकाच्या कालांतील कविवर्गांत विनायकाची जागा कोणती या प्रश्नाचें उत्तर देणें कठिण आहे. तथापि त्याच्या संबंधानें एक विधान बिनदिक्कत करितां येईल कीं, अगदीं नीरस कविता त्यांनीं लिहिली नाहीं. कविता करावयाची म्हणून केलेली कविता त्यांची कोणतीच नाहीं. मनुष्याच्या अंतरंगांतील गूढ प्रदेशांत बुड्या मारून तेथील रत्नें त्यांनीं शोधून आणलीं नसलीं, किंवा सांताच्या कुंपणा-वरून पलीकडे उडी मारून अज्ञाताच्या–अज्ञेयाच्या रहस्यमय प्रदेशांतील निगूढ गाणीं त्यांनीं ऐकिलीं–ऐकविलीं नसलीं तरी लौकिक जगांतील आणि लौकिक भावांतील सर्वमान्य वृत्तींचीं आणि सत्याचीं गोड गीतें त्यांनीं गाइलीं आहेत. विशेषतः महाराष्ट्राच्या दिव्य पूर्वेतिहासाची आठवण त्यांनीं महाराष्ट्राला करून दिली आहे आणि महाराष्ट्राच्या स्त्रीवर्गापुढें ओजस्वितेचे आदर्श ठेविले आहेत. 'चिमा', 'प्रीति निमाली तर', 'सुवास' आणि 'स्त्री आणि पुरुष' यांत त्यांच्या काव्यशक्तीची परिसीमा झाली आहे. त्यांची स्वातंत्र्याची लालसा आणि परवश-तेचा—गुलामगिरीचा—तिटकारा त्यांच्या काव्याचे द्वारा वाचकांच्या हृदयांत पडसाद उठविल्याशिवाय राहणार नाहींत. त्यांच्या अंगीं थोडक्या शब्दांनीं एकादा देखावा, एकादा प्रसंग, एकादें सृष्टिसौंदर्याचें निवासस्थान डोळ्यांपुढें उभें कर-ण्याची शक्ति मोठी होती. तरीहि इंग्रजी वाङ्मयाशीं त्यांचा झाला होता त्यापेक्षां अधिक विस्तृत आणि निकट परिचय झाला असता तर बहार झाली असती असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. विनायकासारखे कवि प्रसादचिन्ह म्हणून महत्वाचे आहेत." (प्रि. पटवर्धन)

विनायकांनीं 'प्रभावती' (१८९२) नांवाचें एक संगीत नाटक लिहिलें आहे. नाट्यशास्त्राचा त्यांच्या अभ्यास चांगला होता असें म्हणतात.

**विनायकांचीं पुस्तकें:**—(१) विनायकाची कविता, संग्राहक, द. अ. आपटे, १९२०; (२) प्रभावती नाटक १८९२.

**चरित्र चर्चा, अभ्यास:**—

(१) चरित्र, द. अ. आपटे (कवितासंग्रहास जोडलेलें).

(२) कवितासंग्रहास प्रि. पटवर्धन यांनीं लिहिलेली प्रस्तावना.

(३) विनायकांची कविता–चर्चा–ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कविपंचक, पृष्ठ ८७–१११;

(४) विनायकाची कविता–चर्चा–ना. के. बेहरे, काव्यचर्चा पृष्ठ ३१७–३२४;

(५) विनायकाची कविता–परीक्षण–लक्ष्मणशास्त्री लेले, विविधज्ञानविस्तार पु. ५२ अं. १०, १९२१.

**कानिटकर गोविंद वासुदेव**—[ १८५४–१९१८ ] कवि. यांचा जन्म पुणें येथें झाला. प्राथमिक शिक्षण पुण्यास व इंग्रजी शिक्षण मुंबईस झालें. मुंबईच्या विल्सन कॉलेजांतून हे बी. ए. झाले. पुढें वकीलीची परीक्षा देऊन, तीन वर्षें हायकोर्टांत वकिली केली व पुढें मुन्सबी स्वीकारली. प्रसिद्ध पारशी समाजसुधारक मलबारी हे यांचे सहाध्यायी होते व रा. ब. माधवराव रानडे गुरु होते. गोविंदराव अतिशय विद्याव्यासंगी व अनेक कलाभिज्ञ असे होते. त्यांस चित्रकलेची, गायनवादनाची फार हौस असे. वेदांताचाहि त्यांचा चांगला अभ्यास होता. प्रसिद्ध विदुषी काशिबाई कानिटकर या यांच्या पत्नी होत, व नाटककार कानिटकर हे यांचे चुलते. हरिभाऊ आपट्यांच्या जिवश्चकंठश्च स्नेह्यांपैकीं कानिटकर हे एक होते. शेक्स्पीयर, ब्राउनिंग, टेनिसन यांच्या काव्यांचें यांनीं चांगलेंच परिशीलन केलें होतें. यांचीं 'अकबरकाव्य,' 'नारायणराव पेशवे ह्यांचा मृत्यु,' 'कृष्णाकुमारी,' आणि 'संमोहलहरी' हीं चार काव्यें प्रसिद्ध आहेत. विशेषतः 'संमोहलहरी' हें काव्य चिंतनपर असून त्यांतील भाषा प्रौढ व विचारसरणी नवीन आहे. यांची बरीचशी स्फुट कविता विविधज्ञानविस्तार, काव्यरत्नावलि, करमणूक व मासिक मनोरंजन वगैरेंतून प्रसिद्ध झालेली आहे.

गोविंदरावांच्या काव्यांसंबंधीं रा. ना. म. भिडे यांनीं आपल्या 'अर्वाचीन मराठी कवि व काव्यें' या लेखांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहे, "संमोहलहरी हें मूळ विविधज्ञानविस्तारांत 'देवास अर्जी या नांवानें प्रसिद्ध झालें होतें. कवीनें हें काव्य आपल्या अठराव्या वर्षीं लिहिलें. तथापि त्यानें या अल्पवयांत इंग्रजी तत्त्वज्ञानाच्या उदात्त कल्पना मराठी काव्यांत गुंफण्याचें अवघड काम कसें केलें याचें खरोखर आश्चर्य वाटतें. हें काव्य अगदीं स्वतंत्र असून तत्त्वज्ञानास प्रेरक आहे. भाषासरणी पाहूं जातां ती जरी

संस्कृतप्रचुर दिसली तरी काव्यांतील विचार अगदीं नवीन प्रकारचे आहेत. जगांतील अस्थिर स्थिति पाहून धर्मसंमूढ झालेल्या मनामध्यें संशयांचे जे कल्लोळ माजले त्याचें प्रतिबिंब प्रस्तुत काव्यामध्यें पृथ्वीछंदांत गोंविलें आहे. चिंतनपर काव्यामध्यें ह्याचा दर्जा बराच वर लागेल यांत संशय नाहीं. संमोहलहरीनंतर यांचीं दोन ऐतिहासिक काव्यें बाहेर पडलीं. पहिल्यानें 'नारायणराव पेशवे यांचा वध' हें काव्य १८७८ त प्रसिद्ध झालें व 'अकबर काव्य' पुढील सालींच प्रसिद्ध झालें. ऐतिहासिक काव्यें लिहिण्याचें जें प्रशंसनीय उदाहरण कुंटे यांनीं घालून दिलें त्याचेंच हीं काव्यें फल होत. ह्या दोन्ही काव्यांची रचना स्कॉट कवीच्या 'मार्मिअन' व 'ले ऑफ द लास्ट मिन्स्ट्रल' या काव्यांच्या नमुन्यावर केली आहे. 'नारायणराव पेशवे' काव्यांत आरंभीं सातारच्या किल्ल्यास उद्देशून केलेलें वर्णन, व तिसऱ्या सर्गांतील पुण्याच्या शनवारवाड्याचें वर्णन, हीं काव्यांतील उत्कृष्ठ स्थळें म्हणून दाखवितां येतील. ह्या काव्याविषयीं 'दक्षिणा प्राईझ कमेटी'चे मर्मज्ञ चिटणीस रावजी शास्त्री गोडबोले यांच्या शब्दांत सांगावयाचें तर 'ह्यांत निरनिराळ्या प्रसंगींचा रसोत्कर्ष योग्यप्रकारें झाला आहे. भाषा गोड असून सुलभ आहे. स्थलांचीं वर्णनें विविध व स्वभाविक आहेत.' दुसऱ्या काव्यामध्यें अकबराची जन्मापासून हकिकत दिली असून त्यांत अनुषंगानें जगन्नाथ पंडित व बादशाहाची कन्या यांच्या प्रेमप्रसंगाची हकीकत गोंवली आहे. याहि काव्यांतील वर्णनस्थलें चांगलीं उतरलीं आहेत. कानिटकर यांचें 'कृष्णाकुमारीकाव्य' विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालें आहे. वरील चार काव्यांनंतर कवीनें आपला काव्यव्यासंग बहुतेक सोडल्यासारखाच होता. शेवटीं शेवटीं त्यांनीं गूढ शृंगारिक व वत्सलरसयुक्त स्फुट कविता लिहिली आहे. या कविता जरी उच्च दर्जाच्या असल्या तरी पण पहिल्या स्फूर्तीला अनुरूप अशी पुढील काळांत काव्यनिष्पत्ति झाली नाहीं हें खास."

(विविधज्ञानविस्तार निबंधावली, ग्रंथ १, पृष्ठ ६९).

काव्यांव्यतिरिक्त गोविंदरावांचे हातून किरकोळ गद्यलेखनहि बरेंच झालें आहे. मिल्लच्या ग्रंथांवरून 'स्त्रियांची परवशता' हें पुस्तक त्यांनीं लिहिलें असून, रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलीचेंहि त्यांनीं सुरस गद्य भाषांतर केलें आहे.

**कानिटकरांचें वाङ्मयः**—(१) संमोहलहरी काव्य १८७२, १९००; (२) नारायणराव पेशवे यांचा वध काव्य, १८७८; (३) अकबर काव्य,

१८७९; ( ४ ) कृष्णाकुमारीकाव्य, ( ५ ) वीरसेन आणि विचित्रपुरीचा राजपुत्र ( हॅम्लेट. भा. ), १८८३; ( ६ ) स्त्रियांची परवशता, ( ७ ) मोक्षमुल्लरकृत धर्मविषयक व्याख्यानें. ( ८ ) गीतांजलि.

**कानिटकर नारायण बापूजी** [ १८५२—१८९७ ] नाटककार. यांचा जन्म पुणें येथें झाला. मराठी शिक्षण पुण्यास झालें. मॅट्रीक्युलेशनची परीक्षा १८६८ मध्यें एल्फिन्स्टन हायस्कूलमधून त्यांनीं दिली. पुढें एक दोन वेळां ‘ लिटल् गो ’ ची परीक्षा नापास झाल्यामुळें पुढील शिक्षणाचा नाद सोडून त्यांनीं वकिलीची परीक्षा दिली. पुण्यांतील चांगल्या वकिलांत यांचें नांव मोडत असे. “ मराठी भाषेंत जे नाटकार होऊन गेले त्यांपैकीं कानिटकर हे एक प्रमुख आहेत. सामाजिक आणि ऐतिहासिक विषयावर नाटकें लिहून बरेच दिवस यांनीं लोकांचें रंजन केलें होतें. यांचीं नाटकें रंगभूमीवर लोकप्रिय असतां सामाजिक नाटकांमुळें सुशिक्षित मंडळींत त्यांना कित्येक शत्रू उत्पन्न झाले होते. हे जसे विनोदी लेखक असत, तसेच यांच्या लेखणींतून विचारी, आवेश व उत्साह उत्पन्न करणारी गंभीर भाषाहि सहज निघत असे. यांच्या नाटकांच्या योगानें, एक दोन नाटक मंडळ्या ऊर्जितदशेला आल्या होत्या......यांच्या नाटकांपैकीं भाषांतरित व रूपांतरित अशीं दोनच नाटकें आहेत. इतर नाटकांना ऐतिहासिक गोष्टींचा किंवा त्यावेळीं उपस्थित झालेल्या चळवळींचा आधार होता. त्यांचे काळीं सामाजिक विचारांत दोन पक्ष माजलेले होते. प्रत्येक पक्षांतील पुढाऱ्यांच्या लेखांतून व भाषणांतून जे विचार त्यावेळीं प्रसिद्ध होत होते ते नाटकरूपानें कानिटकरांनीं प्रसिद्धीस आणले आहेत. परंतु त्याकरितां त्यांच्या स्नेहीवर्गांतसुद्धां त्यांना कांहीं शत्रू झाले व ते कानिटकरांना ‘ पुष्करणी शेक्सपिअर ’ असें म्हणत असत. ( कानिटकरांचें घर पुण्यांत पुष्करणी हौदाजवळ आहे. ) कानिटकरांनीं ‘ तरुणीशिक्षण ’ व ‘ संमतिकायद्यावर ’ नाटकें लिहिलीं त्यावरून ते सुधारणेच्या व स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध असावेत असें त्यांच्या प्रतिपक्षांस वाटत असे......कानिटकरांचे मराठी भाषेवर व नाट्यकलेवर मोठे उपकार आहेत. एका पिढींत त्यांच्या नाटकांवर लोकांचें चांगलें मनरंजन झालें आहे. त्या पिढींत महाराष्ट्र भाषेंतील स्वतंत्र गद्य नाटककारांत शंकर मोरो रानडे यांच्या जोडीला बसण्याला यांचेखेरीज दुसरा नाटककार झाला नाहीं म्हटलें तरी चालेल.

दोघांनींहि त्या त्या वेळच्या स्थितीवर नाटकें लिहून चळवळ उत्पन्न केली व लोकांत नाट्यकलेची उपयुक्तता दाखवून दिली. " ( मुजुमदार, रंगभूमि १९१० ).

**कानिटकरांचीं नाटकें:**—( १ ) मल्हारराव गायकवाड यांचें नाटक–बडोद्याच्या विषप्रकरणावर, १८७४; ( २ ) शशिकला–रत्नपाल–रोमियो ज्युलिएटच्या आधारें, १८८२; ( ३ ) प्रतापराव–चंद्रानना–स्कॉटच्या केनिलवर्थच्या आधारें, १८८६; ( ४ ) तरुणीशिक्षण नाटिका १८८६; ( ५ ) शिवाजी १८८६; ( ६ ) बाजीराव मस्तानी १८८९; ( ७ ) संमति कायद्याचें नाटक १८९२; ( ८ ) न्यायविजय–क्राफर्ड प्रकरणावर, १८९२; ( ९ ) भावी सुधारणाप्रदीप–अप्रसिद्ध, १८९२; ( १० ) बाजी देशपांडे, १८९४; ( ११ ) राजाराम–अपूर्ण, १८९६; १२ ) प्रतापगडचा मोहरा–अपूर्ण. पहिल्या दहाहि नाटकांचे रंगभूमीवर प्रयोग होत असत.

**चरित्र, अभ्यास परीक्षण:**—( १ ) तरुणीशिक्षण नाटिका–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २०, अंक १–२, पृष्ठ १ ते २१, १८८८. ( २ ) शशिकला व रत्नपाल–परीक्षण, निबंधचंद्रिका, अंक ६–७, १८८३.

**काळे त्र्यंबक गुरुनाथ** [ मृत्यु १९१४ ] रसायनशास्त्र व पुराणें यांचे अभ्यासक व संशोधक. यांचें घराणें मूळचें धारवाड जिल्ह्यांतील नरगेल या गांवचें. यांचा प्रारंभींचा अभ्यास धारवाड येथें झाला. कॉलेजांत दाखल होण्यासाठीं हे पुण्यास आले. पण प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांस विश्वविद्यालयीन शिक्षण घेतां आलें नाहीं. यांचा मराठी व संस्कृत—विशेषतः प्राचीन—ग्रंथांचा अभ्यास दांडगा होता. हुबळी येथें असतां यांनीं 'समालोचक' ( १९०८ ) नांवाचें मासिक काढलें होतें, पण तें फार वर्षें चालूं शकलें नाहीं. यांचे 'पुराणनिरीक्षण,' 'भारतीय रसायनशास्त्र', 'रामायण–निरीक्षण' हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. हे अखेरी अखेरीस पुणें येथील न्यु इंग्लिश स्कुलांत संस्कृत भाषेचे अध्यापक होते.

**काळे यांचें वाङ्मय:**—( १ ) रसमंजरी–भाषांतर; ( २ ) नित्यबोध–काव्य, १९०२; ( ३ ) जपानची राष्ट्रभक्ति, १९०५; ( ४ ) भारतीय रसायनशास्त्र; ( ५ ) रामायण-निरीक्षण, १९१४; ( ६ ) पुराण-निरीक्षण, १९१२.

## किर्लोस्कर बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब—

[ १८४३—१८८५ ] नाटककार. यांचा जन्म धारवाड जिल्ह्यांतील गुर्लोसूर या गांवीं झाला. प्राथमिक शिक्षण घरींच पंतोजीच्या देखरेखीखालीं झालें. पुढें धारवाड येथें चार वर्षें राहून त्यांनीं मुलकीची परीक्षा दिली. १८६३ सालीं त्यांच्या आजोबांनीं त्यांस इंग्रजी शिक्षणासाठीं पुणें येथील विश्रामबागेंतील शाळेंत ठेविलें. या शाळेंत त्यावेळच्या शिक्षणक्रमाप्रमाणें जुनिअर फर्स्टक्लासपर्यंतचा त्यांनीं अभ्यास केला. पण पुढें नाटकाचा नाद लागल्यामुळें अभ्यासाकडे चित्त लागेना. वडील माणसांच्या धाकामुळें यांनीं धारवाडास राहून वकिलीचा अभ्यास सुरू केला, पण परीक्षेंत अपयश आल्यामुळें त्याला कायमची रजा देऊन, बेळगांव येथील इंग्रजी शाळेंत २५ रुपये पगारावर नोकरी धरली. या शाळेंत त्यांनीं आठ वर्षें नोकरी केली. " अण्णांच्या अनियमित वागण्यानें त्यांचा शाळाखात्यांत पगार वाढेना, म्हणून नोकरीला कंटाळून त्यांनीं तिचा राजीनामा दिला. लगेच त्यांना तेथेंच त्यांच्याशीं बुद्धिबळें खेळणाऱ्या एका फौजदार स्नेह्याच्या वशिल्यानें जमादाराची जागा मिळाली. परंतु खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करण्याची कला त्यांच्यासारख्या सत्त्वशील माणसाला शक्य नसल्यामुळें त्या नोकरीसहि त्यांना राम राम ठोकावा लागला. पुढें त्यांना एका स्नेह्याच्या वशिल्यानें रेव्हेन्यु कमिशनरच्या ऑफिसांत नोकरी मिळाली."

"१८८० मध्यें आपल्या कचेरीबरोबर अण्णा जेव्हां पुण्यास गेले त्या वेळेस त्यांनीं उर्दू भाषेंत एका पारशी कंपनीचें, नाच आणि गाणें यांनीं युक्त, असें एक नाटक पाहिलें. तें इंग्रजी ऑपेराच्या पद्धतीचें सुधारलेलें नाटक पहातांक्षणींच, अण्णांना आपल्या भाषेंत असा प्रयोग करावा अशी इच्छा झाली, व शाकुंतल नाटकाचें मराठी भाषांतर करण्यास त्यांनीं लगेच आरंभ केला. त्याबरोबरच आपल्या वशीकरण विद्येनें मोरोबा वाघोलीकर आणि गवई पेशाचे बाळकोबा नाटेकर, नाना शेवडे इत्यादि मंडळी त्यांनीं आपलीशी करून घेतली. सर्व योग उत्तम जुळून आला. आपल्या कचेरींतीलहि कांहीं मंडळी त्यांनीं ओढली, व लगेच शाकुंतल नाटकाच्या तीन अंकांची रंगीत तालीम त्यांनीं १३ आक्टोबर १८८० या मुहूर्तावर केली. ती तालीम झाल्यापासून लोक त्यांचें नाटक पहाण्यास अत्यंत उत्सुक झाले. पुढें लवकरच त्या नाटकाचा थिएटरांत सार्वजनिक रीतीनें प्रयोग झाला. त्या वेळची

शोभा, लोकांचा उत्साह व अनुपमेय आनंद हीं वर्णन करणें अशक्य होय. पडदा उघडतांक्षणींच अण्णांची सतेज व भव्य मूर्ति सूत्रधाराच्या वेषांत दृग्गोचर झाली; त्यांनीं आपला गंभीर आवाज, बाजूला उभे असलेल्या नाटेकर आणि शेवडे यांच्या गंधर्वतुल्य आवाजाशीं मिळवून नान्दी म्हणण्यास आरंभ केला. ती ऐकून लोक स्वतःला विसरून गेले व नाटकांतल्या पात्रांशीं तन्मय होऊन गेले. पुढें लवकरच कांहीं दिवसांनीं शेवटल्या चार अंकांचें भाषांतर करून सर्व नाटकाची तालीम करून दाखविण्यांत आली."

"पुणें व मुंबई येथें सर्वत्र शाकुंतलाची फारच चहा होऊं लागली. कमिशनरच्या स्वारीच्या दौऱ्याबरोबर अण्णा ज्यावेळीं पुण्यास येत त्यावेळीं तेथें त्यांचे प्रयोग होत असत. पुढें त्यांनीं नाटकाकरितां सहा महिन्यांची रजा घेतली. त्याच वेळीं त्यांना भाऊराव कोल्हटकर हे नट मिळाले. पुढें त्यांनीं 'सुभद्राहरण' हें कथानक घेऊन आपल्या कल्पनेनें 'संगीत सौभद्र' हें नाटक बसविलें. त्या नाटकांत ते सूत्रधार आणि बलराम यांच्या भूमिका करीत असत. अण्णांची नाटकमंडळी नंतर इंदूर, देवास इत्यादि ठिकाणीं जाऊन आली. श्रीमंत तुकोजीराव महाराज यांची त्या वेळेस कारकीर्द असून त्यांनीं या मंडळीला चांगली मदत केली. श्रीमंत बाळासाहेब होळकर यांनीं अण्णांना 'मालतीमाधव' नाटकाचें भाषांतर करण्यास सांगितलें होतें, परंतु अण्णांना तें बिलकुल आवडत नसे. पुढें त्यांनीं 'रामराज्यवियोग' (१८८४) हें नाटक तीन अंकांपर्यंत लिहिलें. १८८४ सालीं त्यांनीं रेव्हेन्यु कमिशनरच्या कचेरींतील आपल्या नोकरीचा हक्क बदलून घेऊन ते इंदुरास कायमचे नोकर म्हणून राहूं लागले. परंतु या सुमारास त्यांस मधुमेहाचा विकार जडला व तो अधिक होऊन त्याच सालच्या नोव्हेंबर महिन्यांत त्यांचा अंत झाला." (रा. वि. किर्लोस्कर, मनोरंजन, सप्टेंबर १९२२).

'मराठी नाट्याचे जनक' या गौरवपर पदवीवर किर्लोस्करांचा पूर्ण हक्क पोंचतो याबद्दल केव्हांही दुमत होणार नाहीं. नाटकाची आवड त्यांना उपजत असल्यामुळें वयाच्या तेविसाव्या वर्षी 'भरतशास्त्रोत्तेजक' मंडळी काढून 'विक्रमचरित्र' 'बाजीराव यांचा फार्स' इत्यादि खेळ करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती, हें स्वाभाविकच आहे. वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनीं 'श्री शांकरदिग्विजय' हें गद्य नाटक लिहिलें. पुढें उर्दू नाटकें पाहून त्यांना संगीत

नाटकाची कल्पना सुचली. त्यावेळचीं बहुतेक मराठी नाटकें म्हणजे पौराणिक कथांचीं नाटकाच्या गांवठी सांच्यांत घालून केलेलीं, ओबड धोबड रूपांतरें असत. किर्लोस्करांचा कलावंत हात या दगडाला लागला आणि लवकरच सुंदर नाट्यमूर्ति त्यांतून बाहेर पडली. मराठी नाटकांना कलात्मक वळण देणाऱ्या अण्णासाहेबांच्या लेखणींतून शाकुंतल ( १८८० ), सौभद्र ( १८८२ ) व राम-राज्यवियोग ( अपूर्ण १८८४ ) अशीं अडीच नाटकें बाहेर पडलीं.

**शाकुंतल**—हिऱ्यांत कोहिनूर तसें संस्कृत नाटकांत शाकुंतल मानलें जातें. किर्लोस्करांनीं त्याचें केलेलें भाषांतर सरस असलें तरी निर्दोष नाहीं. ' अथवा भवितव्यानां द्वाराणि भवन्ति सर्वत्र ' या चरणाचें ' अथवा भवितव्यद्वारें चहुंकडे दैव फळफळतें ' हें भाषांतर कुणाला आवडेल ? ' सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं ' या सुंदर श्लोकांतील ' अपि ' या अव्ययाची खुमारी किर्लोस्करांच्या भाषांतरांत नाहीं. शेवाळ चिकटलें असलें तरीदेखील कमळ सुंदर दिसतें असा कालिदासाच्या चरणाचा भावार्थ आहे. किर्लोस्कर म्हणतात ' शैवलें युक्त जैसें पंकज तें शोभतें ? ' जणूं काय कमळ सुंदर दिसायला त्याला शेवाळाचीच जोड पाहिजे ! ' काय बेट्या हरिणाचि मजा ' ' आमुच्या गप्पा मनिं कोरव्या ' असली शब्दरचनाही शाकुंतलांत दुर्मिळ नाहीं. यतिभंगही विपुल आहेत. ' शशिकुळभूषण गुणवंता ' ' अभिनव मधुलोलुप ' वगैरे पद्यांसारखीं कांहीं पदें सुंदर साधलीं आहेत. पण कालिदासाच्या मधुर प्रतिभेचें तितकेंच मधुर प्रतिबिंब अण्णांच्या नाट्यादर्शांत पडलें आहे असें म्हणवत नाहीं.

**सौभद्र**—देवांना वार्धक्य कधींही येत नाहीं अशी समजूत आहे. अशा देवकोटीला पोंचलेल्या मराठी नाटकांची यादी करूं लागल्यास तिच्यांत श्रीकाराच्या खालीं सौभद्राचेंच नांव घालावें लागेल. आज पन्नास वर्षें बऱ्यावाईट नाटक-मंडळ्या हें नाटक एकसारखें करीत आहेत पण द्रौपदीची लहानशी स्थाली जशी दुर्वासाच्या हजारों शिष्यांची क्षुधा शांत करूं शकली त्याप्रमाणें किर्लोस्करांच्या प्रतिभेचें हें सुंदर अपत्य पिढ्यान्‌पिढ्या नाट्यलोलुप रसिकांचें मनरंजन करीत आहे.

तसें पाहिलें तर सुभद्राहरणाची कथा कांहीं अगदीं नवीन नाहीं. पण किर्लोस्करांनीं तिला दिलेलें रूप इतकें मोहक आहे कीं त्याची छाप ज्याच्यावर

पडली नाहीं असा प्रेक्षक विरळाच सांपडेल. मानवी मनाला मोहिनी घालणारे सर्व गुण या नाटकांत आहेत. यांत प्रेमविवाहाचा विजय आहे, रमण–रमणीपैकीं एखाद्यानें वेषांतर केल्यामुळें उत्पन्न होणारी चमत्कृति आहे आणि सद्धेतूनें कृष्णानें रचलेलें कपटनाटकही आहे. व्यवहारांत तरुणतरुणींच्या विवाहांचा मक्ता रूढीनें त्यांच्या आईबापांकडे दिला असला तरी कल्पनेच्या जगांत तरुण-तरुणींचा स्वयंवराचा हक्क प्रस्थापित झालेला पाहूनच सर्वांना आनंद होत असतो. प्रणयकथेची रम्यता आणि हृदयंगमता हीं सौभद्रांत सुंदर रीतीनें प्रगट झालीं आहेत.

कालिदासाच्या शाकुंतलासारखें गोड पक्वान्न खाऊन कंटाळलेल्या रसिकांपुढें तोंडपालट म्हणून आपण हें तिखट खाद्य ठेवीत आहों असें किर्लोस्करांनीं सौभद्राच्या प्रारंभीं म्हटलें आहे. पण त्यांचें हें ‘ तिखट ’ ही गोडच आहे यांत शंका नाहीं. भारतांतील सुभद्राहरणाची कथा व मोरोपंतांचें तद्विषयक आख्यान यांचें साहाय्य त्यांनीं कथानकाची रचना करण्याच्या कामीं घेतलें आहे. पण नाटकांतले रसात्मक प्रसंगच सुंदर साधले असल्यामुळें कथानकाच्या गुणदोषांकडे प्रेक्षकांचें तादृशही लक्ष जात नाहीं. रचनेच्या दृष्टीनें विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे सौभद्राचा पहिला व चवथा अंक आधुनिक पाश्चात्य नाटकांप्रमाणें एक प्रवेशात्मक असून पांचवा जवळ जवळ तसाच आहे. दुसरा व तिसरा हे दोन्ही अंकही थोडासा बदल केल्यास एक प्रवेशात्मक होऊं शकतात. कळीला फुलावें कसें हें कुणी शिकवीत नसलें, तरी तिच्या उमलत्या पाकळ्यांत जशी सुंदर प्रमाणबद्धता असते त्याप्रमाणें सौभद्राच्या रचनेंतही आहे.

या नाटकांत मुख्य भूमिका अवघ्या चार. अर्जुन, सुभद्रा, कृष्ण व बळिराम. किरकोळ भूमिकांची काटकसर करण्याकडे नाटककर्त्यानें लक्ष दिलें नसलें तरी रुक्मिणीखेरीज दुसऱ्या कुठल्याही पात्राला महत्वही दिलेलें नाहीं. मुहूर्त चुकवि-ण्याकरतां आपण महालांतून कुठें तरी गेलों असा कलंक लागण्याची भीति वाटतांच मूर्च्छित होणारी, कुसुमावतीसारख्या प्रेमळ दासीपाशीं आपलें हृद्गत व्यक्त करणारी, ‘ वहिनी, तुझ्या भावानें तुला शिशुपाल राजाला देऊं केली होती. तो काय रूपानें, पराक्रमानें, किंवा ऐश्वर्यानें कमी होता, म्हणून तूं चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून कृष्णाला वरलेंस ? ’ असा खोंचदार प्रश्न करून

रुक्मिणीचें तोंड बंद करणारी सुभद्रा पाहून कुणाच्याही मनांत तिच्याविषयीं सहानुभूति उत्पन्न होईल. प्रियकरिणीसाठीं धनुष्यबाण टाकून दंडकमंडलु घेणाऱ्या अर्जुनाची भूमिका साहजिकच मनोरंजक झाली आहे. सुभद्रेबरोबर संसार करायला मिळावा म्हणून बिचाऱ्यानें संन्यास घेतला ! कृष्ण व बळिराम यांच्या स्वभावचित्रांतील विरोधानें नाट्यवस्तूप्रमाणें विनोदाचाही चांगला परिपोष झाला आहे. अर्जुनाचा शेला सुभद्रेकडे जाणें व सुभद्रेची माळ अर्जुनाकडे जाणें असल्या अदलाबदलीनेंही नाटकाच्या चमत्कृतींत भर घातली आहे.

सौभद्रांतील विदूषकाचा कृत्रिम व सामान्य विनोद सोडून दिला तरी संभ्रमामुळें उत्पन्न होणारा प्रसंगात्मक विनोद त्यांत बहारीचा साधला आहे. यति म्हणजे अर्जुन हें ठाऊक नसल्यामुळें बळराम तुपांत मीठ व खिरींत कढी वालण्याच्या त्याच्या कृतीचें भक्तिभावानें कौतुक करतो. वैराग्याप्रमाणें प्रेमही वेडें असतें हें तत्व आणि यतीचें सत्यस्वरूप या दोन्ही गोष्टी जाणणारा कृष्ण त्याला विरोध करतो. भावाभावांतील हा वाद, कृष्णाचीं भविष्यसूचक दुटप्पी विधानें, कृष्ण यतीविरुद्ध बोलत असल्यामुळेंच बळरामाची गणितश्रेढीनें वाढणारी श्रद्धा इत्यादिकांमुळें तिसऱ्या अंकाचा पहिला प्रवेश छान रंगतो. रुक्मिणी संन्यासी अर्जुनापुढें जाऊन सुभद्रेच्या लग्नाची ठिणगी सोडते व त्याच्या अंगाचा भडका उडविते हा प्रसंगही नाट्यदृष्ट्या सुंदर आहे. बळरामानें संन्यासाची तयारी करा म्हणून म्हणतांच अर्जुनाचा यतिवेष घेऊन चाकरानें येणें हा योगायोगही गंमतीचा आहे. रहस्य व रसपरिपोष यांच्या मिश्रणाचें सौभद्र हें एक नमुनेदार उदाहरण आहे.

नाट्यशास्त्राच्या निकषावर घासलें असतां मात्र हें नाटक तितकेंसें निर्दोष ठरणार नाहीं. श्री. श्री० कृ० कोल्हटकर यांनीं आपल्या विस्तृत टीकेंत त्याचें सूक्ष्मदृष्टीनें परीक्षण केलेंच आहे. पण स्थूलदृष्टीनें देखील पहिल्या अंकांतील घटोत्कच व नारद यांची योजना सदोष व कृष्णरुक्मिणींचा शृंगारिक प्रवेश अनावश्यक वाटतो. नाटकाच्या शेवटीं घटोत्कच अर्जुनानें आपल्या शरीरांतून रक्त काढलें याबद्दल आनंदच प्रदर्शित करतो ! जणूं काय तो अधिक रक्तानें फुगलेला एखादा संस्थानिकच होता ! अर्जुनानें सुभद्राहरण करावें म्हणून चोरांकडून गाई चोरविण्यापासून कृष्णाला खटाटोप करावा लागला असें नाटकांत

दाखविलें आहे. नारद-गर्गासारखे ऋषि आणि घटोत्कचासारखा राक्षस इतके साथीदार जमवून तो जें कारस्थान करतो तें बळरामाच्या दुराग्रही स्वभावामुळेंच यशस्वी होतें हें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. 'आशाबद्ध होत्सात्ता' सारखे गद्यप्रयोग वगळले तर सौभद्राची भाषा साधी पण मधुर आहे. बायकांच्या तोंडांतली भाषाही स्वाभाविक आहे. या नाटकांतलीं बरींच पदें वरच्या दर्जाचीं आहेत. प्रसादामुळें आलेलें सौंदर्य ( १ ) झाली ज्याची उपवर दुहिता ( २ ) व्यर्थ मी जन्मलें ( ३ ) अरसिक किति हा शेला ( ४ ) वसंतीं बघुनि मेनकेला ( ५ ) नभ मेघांनीं ( ६ ) नच सुंदरि करुं कोपा प्रभृति पदांत आढळते. राधाधर मधु मिलिंद, लालशालजोडी वगैरे पद्यांत नादमाधुर्य व ठसकेबाजपणा आहे. कल्पनासौंदर्याच्या दृष्टीनें ( १ ) बलसागर तुम्हि ( २ ) सुवर्णकेतकिपरि जो दिसतो ( ३ ) बघुनि उपवना ( ४ ) प्रिये पहा रात्रिचा समय सरुनि येत उषःकाल हा ( ५ ) गिरिवर हा सौदागर आणी इत्यादि पदांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.

स्वभावविश्लेषण अगर विषयप्रतिपादन इत्यादि नवीन निकष क्षणभर बाजूला ठेवले तर सौभद्र हें नाटक चांगलें साधलें आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं. चमत्कृतिपूर्ण कथानकाची सुंदर मांडणी, मुख्य भूमिकांचा केलेला योग्य विकास, रसपरिपोष, कर्णमधुर कानडी व इतर चाली, सुबोध व सरस पद्यें इत्यादि चिरंतन गुणांमुळें या नाटकाचें स्थान रंगभूमीवर पुढेंही अढळच राहील.

**रामराज्यवियोग**—पेशवाईतल्या साडेतीन शहाण्यांप्रमाणें किर्लोस्करांच्या अडीच नाटकांनींही महाराष्ट्राला झुलविलें. साडेतीन शहाण्यांत नाना फडणवीसाचा जो मान तोच या अडीच नाटकांत रामराज्यवियोगाचा. सौभद्राप्रमाणें हें नाटकही पौराणिक आहे. पण कृष्णाच्या गोड कपटामुळें सौभद्रांत करुणाला फारसा अवसर मिळत नाहीं. रामराज्यवियोगांत देवांच्या कटुकपटामुळें करुणाचेंच राज्य होणार होतें असें दिसतें.

रसोत्कर्षाला अनुकूल असें कथानक शोधण्याची किर्लोस्करांची रसिक दृष्टि रामराज्यवियोगांतही आढळून येते. किर्लोस्करांच्या हातून या नाटकाचे तीनच अंक लिहून झाले. तिसऱ्या अंकाच्या शेवटीं कैकेयी वर मागते, पण ते घोर शापासारखे वाटून दशरथ बेशुद्ध होतो इतका कथाभाग आला आहे. यावरून

चवथ्या व पांचव्या अंकांत रामाच्या उज्ज्वल त्यागाचें चित्र रेखाटून राम वनाला जायला निघाल्याबरोबर अयोध्येच्या जनतेप्रमाणें रंगभूमिही दुःखानें आपलें तोंड झांकून घेते अशी किर्लोस्करांची पुढील मांडणी असावी. याच कथानकावर लिहिलेल्या ' सवतीमत्सरा ' चा खाडिलकरांनीं असाच शेवट केला आहे. प्रिय पुत्राच्या शिरोविहीन देहाला गजासुराचें धड लावणाऱ्या शंकराप्रमाणें कित्येकांनीं अपुरें रामराज्यवियोग पुरें केलें आहे, पण या प्रयत्नांत नांव घेण्याजोगा एकही नाहीं.

मंथरेला रामाच्या राज्यारोहणाविषयीं वाटणाऱ्या मत्सराचें मूळ मानवी स्वभावांत नसून देवांच्या कारस्थानांत आहे ही पौराणिक कल्पनाच किर्लोस्करांनीं स्वीकारली आहे. त्यांच्या काळाला ती पटण्याजोगी होती. पण अशा रीतीनें नाटकाचा आत्मा मानवी स्वभाव न होतां चमत्कार हा झाल्यामुळें पहिले दोन अंक व्हावे तितके सरस झाले नाहींत. उत्तररामचरितांत निषिद्ध तप करीत बसणाऱ्या शंबूक नांवाच्या शूद्राचा राम शिरच्छेद करतो. त्या शंबूकाला दंडकारण्यांतून अयोध्येंत आणून किर्लोस्करांनीं आपलें कथानक मनोरंजक केलें आहे. शंबूक राम व वसिष्ठ यांच्यावर चिडलेला असतो. मंथरा रामाच्या राज्यारोहणाला विघ्न करील म्हणून तिला ज्या किल्ल्यांत कोंडलेलें असतें तिथें शंबूक अन्न घेऊन जाणाऱ्या दासीच्या वेषानें जातो आणि तिची सुटका करतो.

कथानकांतली ही गुंतागुंत व मंथरेचा स्पर्श होतांच कलीचा कैकेयीच्या शरीरांत प्रवेश होणें याच काय त्या पहिल्या दोन अंकांतील महत्वाच्या गोष्टी आहेत. दशरथ, राम वगैरे महत्वाच्या भूमिका या दोन्ही अंकांत पडद्याआडच राहतात. कैकेयीचेंही काम विशेष नाहीं. एकीकडे रामविरोधी मंथरा व दुसऱ्या बाजूला वसिष्ठ, सुमंत वगैरेही रामपक्षपाती मंडळी यांच्यांतला हा झगडा आहे. पण वसिष्ठाचें पात्र एखाद्या भिक्षुकासारखें व सुमंताचें पात्र खेडेगांवांतील खाष्ट म्हाताऱ्यासारखें भासत असल्यामुळें ह्या कलहाला रंग चढत नाहीं. मंथरेला देहांत प्रायश्चित्त दिलें पाहिजे असें सुमंतानें म्हणतांच वसिष्ठ उत्तरतात. “ अहो, देवो दुर्बलघातकः ही म्हण खरी आहे. तुम्हांला सांगून ठेवितों तिनें जर मनांत आणिलें तर तुम्हांला देखील ती घरीं बसायला लावील.” वयोवृद्ध व तपोवृद्ध वसिष्ठ ऋषींच्या तोंडीं हे दीनवाणे उद्गार मुळींच शोभत नाहींत. मंथरा सुमंताला तोंड आटपून बोलायला सांगते. तेव्हां तो आवेशानें हुकूम

सोडतो ‘ लावारे रांडेच्या कानाला चाप ! ’ राजकारणापेक्षां गालिप्रदानांतच तो बहुदा पारंगत असवा ! वसिष्ठाच्या समोर ‘ राज्यलक्ष्मीला वारवधूप्रमाणें जसा तरुण राजा प्रिय होतो, तसा वृद्ध आवडत नाहीं,’ हे उद्गार दशरथ काढतो. यावरून अयोध्येंतला दशरथाचा दरबार सध्यांच्या एखाद्या क्लबासारखा असावा असा भास होतो. तिसऱ्या अंकांतील दशरथ कैकेयी यांचाच प्रवेश काय तो सर्व दृष्टींनीं बरा साधला आहे.

या प्रवेशांत कैकेयी दशरथावर ‘ निर्बल्या, नपुंसका, षंढा ’ वगैरे संबोधनांचा मारा करते. दशरथ हीं विशेषणें मुकाट्यानें सोसतो, याचें कारण कामुकता, अग्नीच्या प्रसादानें पुत्रप्राप्ति झाल्याची जाणीव आणि गालिप्रदानशास्त्राची रामायणकालीं पूर्ण वाढ यांपैकीं कोणतें असावें हें नक्की सांगतां येत नाहीं. पहिल्या अंकांतील विष्कंभकांत विनत मंथरेची वार्ता वसिष्ठांना कळविण्याकरतां जातो. त्याच्या पाठोपाठ वसिष्ठ रंगभूमीवर प्रवेश करीत असूनही त्याला मंथरा खवळून गेल्याची बातमी कळलेली असते हा बहुधा महर्षींच्या अंतर्ज्ञानाचा प्रभाव असावा ! मंथरेचें ‘ धेनुमुखीं हा व्याघ्रचि ’ हें पद नगररक्षक विनत एकदांच ऐकतो. पण वसिष्ठासमोर तो तें तोंडपाठ म्हणून दाखवितो. अशा एकपाठी तैलबुद्धीच्या मनुष्याला रक्षकाऐवजीं शिक्षक करणें अधिक योग्य झालें असतें.

नाटकाची भाषा सुबोध असली तरी विशेष सुंदर नाहीं. पद्यांपैकीं ‘ सुटला पितृदिशेचा वारा, ’ ‘ जो मम नयनचकोरा इंदु, ’ ‘ सोडुनि मज रामराय, ’ ‘ सफलेच्छा ती करिन सुरांची ’ ‘ कटु तव शब्दांहुनी ’ वगैरे पद्यें सुंदर आहेत. पण ऱ्हस्वदीर्घाची ओढाताण, मात्रादोष, पद्यबद्ध गद्य इत्यादि दोष या नाटकांतील कवितेंत विपुल आहेत. वर्षाकालचें वर्णन करतांना नटी ‘ घन गर्जत तोफेपरी ’ असें म्हणते. रामाचें ज्ञान त्याच्या राज्यांतल्या या नटीपेक्षांही कमी असावें असें दिसतें. नाहींतर पुढें लंकेवर स्वारी करतांना धनुष्यबाणांवर भिस्त न ठेवतां तोफखाना बरोबर नेण्याची व्यवस्था त्यानें खास केली असती ! दत्ताचें नांव ऐकून भूतें पळून जातात ही माहिती रामाच्या वेळच्या नगररक्षकाला आहे. दत्ताचा अवतार रामापूर्वी झाला कीं नंतर झाला ही गोष्ट इतरांपेक्षां स्वतः एकतृतियांश दत्त असलेल्या रामालाच अधिक माहीत असण्याचा संभव असल्यामुळें या उल्लेखाबद्दल अधिक लिहायलाच नको. ‘नारि’

'छाति' 'किं' 'जानकि' वगैरे जखमी शब्दांची यादी केल्यास ती बरीच लांबलचक होईल. 'रुचती कां तीर्थयात्रा' या चालीवर 'ओळखतें लहान होता मी तेव्हांपासुनी' ही ओळ म्हणायला लागलें कीं 'लहान' शब्द 'लहन' होतो! नाटकारंभीं ईशस्तवन करणाऱ्या सूत्रधाराची पत्नीच मंथरा आहे असा प्रस्तावना व नाटक यांचा सांधा जोडलेला आहे. ही युक्ति कौशल्य-दर्शक आहे. शापसंभ्रम व मानापमान यांच्यांतही हिचाच अवलंब करण्यांत आला आहे. पण नटीनें कलिसंचार झालेल्या मंथरेचें भाषण सुरू केल्यानंतर सूत्रधारानें 'मलाही पण दशरथ झालेंच पाहिजे' असें म्हणून निघून जाणें रसभंगकारक होतें. या सर्व गोष्टींवरून रामराज्यवियोग किर्लोस्करांच्या हातून पुरें झालें असतें तरी तें सौभद्राइतकें सुंदर व सरस वठलें नसतें असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं.

गंगेच्या उगम या दृष्टीनें गंगोत्रीचें जें महत्व तेंच मराठी नाटकांच्या दृष्टीनें किर्लोस्करांचें. नाट्यकलेला गायनकलेची जोड देऊन किर्लोस्करांनीं संगीत नाटकांची जी प्रथा पाडली ती आज अर्धशतक होऊन गेलें तरी जोमानें सुरू आहे. 'शाकुंतला'च्या सुरस भाषांतराप्रमाणें 'सौभद्र' व 'रामराज्यवियोग' हीं त्यांचीं स्वतंत्र नाटकेंही नाट्यवाङ्मयांत अढळ स्थान पटकावून बसलीं आहेत. नादमधुर व प्रसादपूर्ण शब्दरचना, अल्पविस्तर पण चटकदार संभाषणें, रस-परिपोषक प्रसंगांची निवड, रंगभूमीचें मार्मिक ज्ञान इत्यादि गुणांच्या संगमामुळें त्यांचें 'सौभद्र' नेहमींच लोकप्रिय राहील. शृंगाराचा उठाव करण्यांत किर्लोस्कर कुशल होते. स्त्रियांचे संवाद हुबेहुब वठविण्यांतही त्यांनीं चातुर्य प्रगट केलें आहे. सौभद्र नाटकाचा पहिला अंक एकप्रवेशात्मक असून इतर अंकांनाही तसें स्वरूप देणें फारसें कठिण नाहीं हें लक्षांत घेतलें म्हणजे आधुनिक नाट्यरचनेचे नियम ठाऊक नसतांही त्यांनीं दाखविलेल्या रचनाचातुर्याचें कौतुक वाटूं लागतें.

वि. स. खांडेकर.

**किर्लोस्करांचें वाङ्मयः—**( १ ) शाकुंतल ( २ ) सौभद्र ( ३ ) रामराज्यवियोग.

**चरित्र, अभ्यास, परीक्षणः—**

( १ ) अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें चरित्र, लेखक–शं. बा. मुजुमदार. १९०४.

( २ ) सदरहू चरित्राचें परीक्षण. विविधज्ञानविस्तार, ऑगस्ट १९०५, लेखक–श्री. कृ. कोल्हटकर.

(३) सौभद्र-परीक्षण. विविधज्ञानविस्तार १९०३ अंक, ८-९. लेखक-श्री. कृ. कोल्हटकर.

(४) शांकरदिग्विजय नाटक—परीक्षण, विविधज्ञानविस्तार पु. ६, अं. ७ डिसेंबर १८७३, पु. ७, अं. २ फेब्रुआरी, अं. ३ मार्च १८७५.

(५) नाटककार किर्लोस्कर, डॉ. जोशी व देशपांडे, १९३१.

**कीर्तने विनायक जनार्दनः**— १८४०-१८९१ ] नाटककार. जन्म राजुरी येथें झाला. यांचे वडील जनार्दनपंत हे कोल्हापुरास दोन रुपयांच्या चाकरीपासून स्वपराक्रमानें संस्थानचे कारभारी झाले. यांची आई लहानपणींच वारली. विनायकराव व माधवराव रानडे यांचें शिक्षण कोल्हापुरास एकत्रच झालें. रानडे व कीर्तने यांचा दाट घरोबा होता. इ. स. १८५१ त त्यांचे शाळेंत महादेवशास्त्री कोल्हटकर व विष्णुबुवा ब्रह्मचारी आले असतां बारा वर्षांच्या विनायकाचा मराठी निबंध पाहून त्याची त्यांनीं तारीफ केली. १८५६ सालीं ते व रानडे एलिफन्स्टन विद्यालयांत मुंबईस दाखल झाले. १८५७ तच मुंबई युनिव्हर्सिटी नवी निघाली व १८५९ त पहिली ' मॅट्रिक ' मंडळी बाहेर पडली. १२० विद्यार्थ्यांत २० विद्यार्थी पास झाले, त्यांत विनायकराव होते. पुढें विनायकराव कॉलेजांत गेले, परंतु विशेष लाभ न होतां कॉलेज सोडून १८६२ सालीं साठ रुपयांवर त्यांनीं शिक्षकाची जागा पत्करली. १८५९ त त्यांनीं मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढें इंग्लंडांतल्या सोळाव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या राज्यक्रांतीवर व १८६० त ' हिंदुस्थानांतल्या प्राचीन विद्या ' या विषयावर असे निबंध वाचले. त्या वेळीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या संस्कृत नाटकांच्या मराठी भाषांतरांचा उल्लेख या निबंधांत जागोजाग आला आहे. १८६१ त याच सभेपुढें त्यांनीं आपलें ' माधवराव नाटक ' वाचलें. १८६२ त ते शिक्षक बनले व पुढें लवकरच बदलून धुळ्यास गेले. येथें त्यांचा व नाना मोरोजी यांचा स्नेह जडला. [ नाना मोरोजी हे त्या काळांतील एक लोकप्रिय सरकारी अधिकारी होते. हे त्या वेळीं धुळ्यास डेप्युटी कलेक्टरचे जागेवर होते.-ग्रंथकर्ता. ] त्यांनीं व यांनीं मिळून तेथें एक क्लब व पुस्तकालय स्थापिलें. याच क्लबांत ' जयपाळ ' नाटक त्यांनीं पहिल्यानें वाचलें. रा. ब. महाजनी म्हणतात, " जयपाळाचें संविधानक ओल्ड टेस्टामेंटमधील जॉबच्या चरित्रांतून घेतलेलें आहे. जयपाळ हा जॉबचा

नवा अवतार." हें जयपाळ नाटक 'माधवराव' या कृतीशीं तोलून पाहतां तितकें सरस आढळणार नाहीं, असें रा. ब. महाजनी म्हणतात तें आम्हांसहि मान्य आहे. 'माधवराव' लिहिलें तेव्हांचा हुरूपच कांहीं निराळा होता. रानडे, कीर्तने व विठ्ठलराव पाठक (सातारा हायस्कूलचे माजी हेडमास्तर) ही तरुण मंडळी नुकतीच कोल्हापुराहून विद्येसाठीं मुंबईस आलेली. रानड्यांनीं नाना फडणीसांवर "मराठी बाण्याचा कडक लेख लिहून" (महाजनी) शिष्यवृत्ति हारविली; पाठकांनीं मराठ्यांच्या इतिहासाचें सार ज्ञानप्रसारकांत लिहिलें. कीर्तने यांनीं थोरल्या माधवराव पेशव्यांवर सरस नाटक लिहिलें. अशी ही मंडळी मराठी इतिहासाच्या रसांत डुलत होती व नवीन वारें—ते १८५७ सालचे दिवस—यांच्या ठिकाणीं खेळूं लागलें होतें. यांचे गुरु वेस्ट-स्मिथ इत्यादि मंडळी '५७ सालच्या....नाजूक प्रकरणावरहि आपले निर्भीड आणि न्यायपरिपूर्ण उद्गार.... आपल्या वर्गांत शिष्यांसमोर काढीत....स्वदेशाभिमान, परराज्य, पारतंत्र्य, परदास्य, इत्यादिक विषयांवर त्यांचे विचार फार उदार असत आणि ते आपल्या वर्गांत काढण्यास त्यांस शंका वाटत नसे.' (देवकृत कीर्तने चरित्र पृ. १५।१६) या परिस्थितीच्या उत्तेजनामुळें विनायकरावांनीं प्रसन्न व उल्हसित मनोवृत्तीनें 'माधवराव' लिहिलें असावें. परंतु कॉलेजांत अखेरी न साधल्यामुळें—पदवीधर न झाल्यामुळें—ते मनांतून खिन्न झाले असावे. हा खिन्नपणा धुळ्यास गेल्यावर काळ लोटल्यामुळें उतरला तेव्हां मग 'जयपाळ' निर्माण झालें. पण भट्टी पूर्वीप्रमाणें उतरणें शक्यच नव्हतें, असें आम्हांस वाटतें. पहा, उत्तरोत्तर या ग्रंथकर्त्यांचें लक्षच वाङ्मयक्षेत्रांतून निघाल्यासारखें दिसतें. १८७१ तला त्यांचा 'मध्यहिंदुस्थानचा इतिहास' [तुकोजीराव होळकर यांच्या आज्ञेनें मालकमच्या पुस्तकाचें हें भाषांतर केलेलें होतें.—ग्रंथकर्ता] असाच नीरस वठला. १८८२ त इंदुरास अधिकारपद मिळाल्यावर यांनीं मथुरा नाटक हातीं घेतलें, पण त्याचें कथानक एका इंग्रजी नाटकाशीं फार मिळतें आहे, म्हणून त्यांनीं तें अपूर्ण टाकिलें. एव्हांपासून त्यांनीं मराठी लेखन टाकलेंच म्हणाना! उतारवयांत त्यांची मराठीवरील भक्ति उडाली होती. सन १८६५ च्या "पुढें मराठी पुस्तक हातीं धरतांना मीं त्यांस कधीं पाहिलें नाहीं" असें रा. देव लिहितात तें त्यांच्या मानसिक क्रांतीचेंच लक्षण होय असें दिसतें! विनायकराव शिक्षक चांगले परंतु तुसडे व जागचे न हालणारे व छडीभक्त, असें रा. ब.

महाजनी सांगतात. धुळ्याहून कारवारास ( १८६४ ) व तेथें कंटाळून राजीनामा दिल्यावर इंदूर संस्थानांत प्रथम ( १८६५ ) विद्याखात्यांत, मग सुमारें सहा वर्षांनीं १८७१ त इंदुरचे युवराज यांचे शिक्षक, मग १८७३ त सर टी. माधवराव यांच्या दिवाणगिरींत न्यायखात्यांत ५०० रुपयांवर, मग माधवराव बडोद्यास गेल्यावर त्यांचे मागें बडोद्यांत ( १८७५ ) नायब दिवाण, असे ते फिरले व चढले. पण त्यांस आतां पगार रु. १५०० व न्याय, विद्या, पोलीस, खासगी वगैरे खात्यांवर देखरेखीचा अधिकार असें वैभव प्राप्त झालें. आतां पूर्वीचे ते विनायकराव बदलून ते दरबारी झाले. स्वभावहि बदलला. ते संस्थानच्या लडथडींत जे अडकले ते कायम. वरिष्ठ शिक्षण देशी भाषेंत देण्याचा उपक्रम करण्याच्या हेतूनें बडोद्यांत व्हर्नाक्युलर कॉलेज स्थापन झालें. त्या खटपटींत विनायकराव होते. हा देशी पाठशाळेचा प्रयोग पांच पर्षे चालला व यशस्वी झाला; परंतु दिवाण माधवराव विरुद्ध पडल्यामुळें हा उत्तम घाट फिसकटला ! पुढें बडोद्यास, हक्क असतांना, दिवाणगिरी मिळाली नाहीं या रोषानें १८८६ त बडोदें सोडून ते पुण्यास आले. परंतु इंदुरकर तक्तनशीन झाल्यामुळें त्यांनीं विनायकराव यांस आपले दिवाण करून रु. २००० तनखा सुरू केला. पण अखेर बेबनाव होऊन स्वारी परत पुण्यास आली. त्यांस विसाव्या वर्षापासून मधुमेहाचा विकार जडला होता. याच विकारानें ते १८९१ सालीं वारले. ( प्रो. पोतदार, म. ग. इं. अ. )

कीर्तने यांचे चरित्रकार रा. बा. ना. देव यांनीं त्यांच्या ग्रंथकर्तृत्वशक्तीविषयीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. " विनायकराव बारा वर्षांचे होते, तेव्हां मराठी शाळेंत त्यांनीं निबंध लिहिला होता; त्याची तारीफ महादेवशास्त्री कोल्हटकर व विष्णुबुवा ब्रह्मचारी या दोघां रसिकशिरोमणींनीं केली होती. आपल्या विसाव्या वर्षी त्यांनीं थोरले माधवराव पेशवे यांचें नाटक रचून प्रथम तें त्यावेळच्या नामांकित ज्ञानप्रसारक सभेच्या विद्वान् सभासदांसमोर वाचलें. तें ऐकून त्यांतील विद्वन्मुकुटमणि डॉ. भाऊदाजी, ना० विश्वनाथ नारायण मंडलिक, महादेवशास्त्री कोल्हटकर इत्यादिकांनीं त्यांची मोठी प्रशंसा केली आणि सभेच्या खर्चानेंच प्रथम तें छापून प्रसिद्ध झालें. त्याची प्रस्तावना विनायकरावांचे परममित्र प्रो. बाळाजी बापूजी साने यांनीं लिहिली आहे. ही कृति इतक्या प्रमुख विद्वानांच्या स्तुतीस पात्र झाली तेव्हां ती सर्वोत्तम असलीच पाहिजे, हें उघड

आहे. माझ्या अल्पमतीसहि तसेंच वाटतें. कितीदां वाचलें तरी त्याचा कंटाळा येत नाहीं. उलट त्याची गोडी वाढतच जाते. चांगल्या ग्रंथास हाच कस लागतो. या नाटकांत वस्तुस्थितीचें व मनुष्यस्वभावाचें चित्र यथास्थित व उत्तम उतरलें आहे म्हणून तें इतकें मनोहर वाटतें. सर्व पात्रांचीं भाषणें व्यक्तिविशेषाच्या योग्यतेला, मनाला व एकंदर मनुष्यस्वभावाला पूर्ण अनुरूप आहेत. त्यांत मनुष्यस्वभावाचें, मानवी मनोविकारांचें यथातथ्य, मनोहर, चमत्कृतिजनक आणि सन्मार्गवर्ति असें स्वरूप प्रगट झालें आहे........विनायकरावांच्या नाटकाचें सन्मार्गवर्तित्व केवळ निर्विवाद आहे. त्यांतील विनोदहि मजेदार आहे. आतां या त्यांच्या प्रथम कृतींत मनुष्यस्वभावाच्या अति गहन व असामान्य अशा विविध वृत्तींचें रूपाविष्करण किंवा दिग्दर्शन आलें नाहीं हें खरें. विचारगांभीर्य, किंवा अंतःकरणाच्या खांचाखोंचांत गुप्त असलेले, प्रसंगविशेषीं मात्र प्रगट होणारे मनोव्यापार यांचा त्यांत फारसा निर्देश नाहीं. पण याच दिशेनें त्यांनीं सतत व्यासंग ठेविला असता, तर अशी गहनताहि त्यांच्या पात्रांच्या स्वरूपांत भाषणांच्या द्वारें प्रगट झाली नसती असें नाहीं. ”

“ ह्या त्यांच्या कृतींत तरी मनुष्यस्थितीचा बाह्यरंगच चांगला उतरला आहे, आणि अंतरंग जितका रेखला आहे तितका यथार्थ, मनोरंजक, आणि पूर्ण सन्मार्गवर्तीय असा आहे. परंतु मानवस्वभावोदधींत शेक्सपियर किंवा कालिदास यांच्यासारख्या त्यांनीं खोल बुड्या मारल्याचा प्रत्यय मला फारसा आला नाहीं. ”

“ विनायकरावांचें दुसरें नाटक ‘ जयपाळ ’ सन १८६५ सालीं प्रथम बाहेर पडलें. त्याचें कथानक इंग्रजींतून घेतलें आहे. त्याचा कांहीं भाग तर निव्वळ भाषांतररूप आहे असें विठ्ठलराव कीर्तने एकदां मजपाशीं बोलले होते; पण हें खरें मानलें तरी तें नाटक वाचतांना त्याची मनोरमता कमी वाटत नाहीं. त्याचें कथानक चांगलें आहे. त्यांत स्वभाववर्णन मनोहर असून सन्मार्गवर्ती आहे. दुर्गुणांचा प्रभाव जो त्यांत आणलेला आहे तो अश्लील किंवा अमर्याद नसून पुन्हां त्यांस सन्मार्गावर आणून नाटकाचा शेवट फार उत्तम बोधकारक केला आहे. कमळजा, सारजा, जयपाळ, प्रभावती, चंद्रकेतु, जयपाळचा बंधुवर्ग, त्याचे वडील, इत्यादि पात्रांचा स्वाभिमान, स्वातंत्र्यप्रीति वगैरे प्रकार, मानाजीरावाची स्थिति, त्याचें उपकारकर्तृत्व, इत्यादि सर्व गोष्टींचें स्वरूप स्वाभाविक व मनोरंजक वठलें आहे. शेवटचा विदूषक व सूत्रधार

यांचा प्रवेश म्हणजे अलीकडच्या प्रासमय नामधारी कवित्वावर चांगला कोरडा आहे. या नाटकावर गुणदोषदर्शक टीका शालापत्रकांत सन १८६५ सालीं आली असून ती परम मार्मिक टीकाकार कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं लिहिली होती. तिचा उल्लेख प्रस्तुत स्थळीं करणें न्याय्य आहे. कारण त्यांत दाखविलेले दोष विचारार्ह व यथार्थ आहेत. सन १८७५ सालीं थोरले माधवराव व जयपाळ हीं दोन नाटकें पुस्तकरूपानें एकत्र छापलीं होतीं. रसिक-मुकुटमणी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं शालापत्रक व निबंधमाला या दोन्ही मासिक पुस्तकांत त्यांची स्तुति केली आहे आणि जयपाळाचा अखेरचा प्रवेश उत्कृष्ट उताऱ्यांत दाखल करून त्याचा धन्यवाद व गौरव केला आहे...रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनींहि विनायकरावांच्या नाटकरचनाकौशल्याची व विनोदपरतेची योग्य प्रसंशा करून या दिशेनेंच सतत परिश्रम करण्याबद्दलची सूचना 'नाव्हेल व नाटक' या निबंधाच्या इंग्रजी प्रस्तावनेंत त्यांना केली आहे. त्याचप्रमाणें १८९७ सालीं नामदार माधवराव रानडे यांनीं मराठी वाङ्मयाच्या प्रत्येक शाखेंतील ग्रंथसमूहावर जो व्यापक व संकलित लेख लिहिला होता, त्यांत 'नाटकें व कादंबऱ्या' या सदराखालीं ज्या अर्वाचीन नामांकित ग्रंथकारांचा नामनिर्देष केला होता त्यामध्यें विनायकरावांस काला-नुरोधानें तर पहिलें स्थान दिलें होतेंच; पण योग्यतेनेंहि त्यांचें तें प्रथम पण अद्यापपर्यंत दुसऱ्या कोणी घेतलेलें नाहीं असा उल्लेख आहे."

विनायकरावांनीं 'चाळीस वर्षांमागचें पुणें' या नांवाची एक कादंबरी इंग्रजींत लिहावयास घेतली होती. तिचे ४० भाग ज्ञानप्रकाशांत १८९७ सालीं छापले होते. पुढें ती पूर्ण झाली नाहीं.

**विनायकराव कीर्तने यांचें वाङ्मयः—**( १ ) माधवराव नाटक ( २ ) जयपाळ नाटक ( ३ ) मध्य हिंदुस्थानचा इतिहास.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) रा. ब. विनायक जनार्दन कीर्तने ( चरित्र ) ले०–देव, १९०४;

( २ ) देवकृत चरित्रावरील रा. ब. महाजनी यांचा परीक्षणात्मक लेख, विविधज्ञानविस्तार १९०४.

**कीर्तने नीळकंठ जनार्दन:**—[ १८४४–१८९६ ] मराठी इतिहासाचे आद्य टीकाकार व चिकित्सक. नाटककार विनायकराव कीर्तने यांचे हे धाकटे बंधू. यांचें प्राथमिक शिक्षण कोल्हापुरास व मॅट्रीकपर्यंतचें मुंबईस झालें. १८६७ सालीं उच्च शिक्षण घेण्याकरितां हे डेक्कन कॉलेजांत प्रविष्ट झाले. याच सालीं त्यांनीं 'ग्रांटडफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका' हा प्रसिद्ध निबंध लिहून वाचला. या वेळच्या, कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं, लिहिण्याबोलण्याचे कामीं संवय वाढून आपली सुधारणा व्हावी या हेतूनें, 'पूना यंग मेन्स ॲसोसिएशन' या नांवाची एक सभा स्थापन केली होती. या सभेंत निरनिराळ्या विषयांवर निबंध लिहून वाचले जात व त्यांवर वादविवाद होई. या सभेंत वाचण्यासाठीं म्हणून नीळकंठरावांनीं हा निबंध लिहिला होता. हा निबंध ज्या दिवशीं वाचला त्या दिवशींच्या सभेचे अध्यक्ष कृष्णशास्त्री चिपळूणकर हे होते व श्रोतेमंडळींत शंकर पांडुरंग पंडित हे होते. या उभय विद्वानांनीं नीळकंठरावांची खूब तारीफ केली. पंडितांनीं तर निबंध आग्रहपूर्वक मागून घेऊन इंदुप्रकाशांत छापविला. या निबंधांत डफसाहेबांच्या ग्रंथाचा कोतेपणा व प्रमाद दर्शविले आहेत. त्याबरोबरच मराठ्यांचा इतिहास कोणत्या प्रकारें लिहिला पाहिजे तेंहि सांगितलें आहे. "कीर्तन्यांना अस्सल कागदपत्र न मिळाल्यामुळें यद्यपि त्यांनीं केलेली टीका तांत्रिक आहे तत्रापि ग्रांट् डफ्च्या ग्रंथांत दोष व न्यूनें आहेत हें दाखविण्यास तिचा उपयोग झाला आहे. हिंदु लोकांच्या भित्रेपणाविषयीं व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयीं ह्या टीकाकारांचें म्हणणें सयुक्तिक व सशास्त्र आहे." ( राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. १ )

वरील निबंधाखेरीज नीलकंठरावांनीं 'टॅपेस्टचें' भाषांतर केलें असून, 'लोकप्रिय हिंदुधर्म व त्याची पात्रता' या नांवाचा एक निबंध लिहिला आहे. "याखेरीज 'हमीर महाकाव्य*' हा जुना संस्कृत ऐतिहासिक ग्रंथ विद्वत्तापूर्ण इंग्रजी उपोद्घातासहित त्यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. इंडिअन ॲंटिक्वेरी या

* चारशें वर्षांपूर्वी रचिलेलें हें एक काव्य आहे. याचा कर्ता नयचंद्रसूरि नांवाचा एक जैन कवि आहे. दुसऱ्या पृथ्विराजाच्या हमीर नांवाच्या सातव्या वंशजावर रचिलेलें, व चांगल्या दर्जाच्या काव्यांत मोडण्याजोगें असें हें काव्य आहे.

नियतकालिकांतहि त्यांनीं कांहीं लेख लिहिले असावेत असें वाटतें. ( रावसाहेब रा. त्रिं. कीर्तने यांनीं नीळकंठरावांच्या तसबिरीच्या अनावरण प्रसंगीं भा. इ. सं. मंडळांत २६ नोव्हेंबर १९३० रोजीं वाचलेल्या माहितीवरून. )

नीळकंठरावांच्या उत्तर आयुष्यासंबंधीं रा. त्रिं. कीर्तने यांची माहिती पुढीलप्रमाणें आहे. " शिक्षण संपल्यानंतर ते होळकरसरकारच्या विद्याखात्यांत प्रारंभीं असावे असें दिसतें. कारण विनायकराव ( कीर्तने ) यांनीं इंदूरहून आपले वडिलांस लिहिलेल्या पत्रांपैकीं एका पत्रांत 'मी प्रकृतीच्या कारणानें ६ महिन्यांची रजा घेतली आहे व माझे जागेवर नीळकंठराव काम करतील,' असा मजकूर आहे. या पत्रावर ता. ४ आक्टोबर आहे पण साल नाहीं. नंतर ते जावरा संस्थानचे नबाबसाहेबांचे शिक्षक होते व त्यानंतर देवास संस्थान धाकटे पातीचे महाराज कै. नारायणराव महाराज यांचे शिक्षक झाले. शिक्षकाचे कामगिरीबद्दल महाराजांनीं अधिकारप्राप्तीनंतर त्यांना संस्थानापैकीं एक गांव वंशपरंपरा इनाम देऊन त्यांचा गौरव केला व तो गांव हल्लीं त्यांचे नातवाचे नांवें चालला आहे. यानंतर ते कांहीं दिवस काठेवाडांतील मंगळूर संस्थानचे कारभारी होते. तेथून परत पुण्यास आल्यावर देवास संस्थान धाकटे पातीचे कारभारी झाले. या जागेवर कांहीं वर्षे काम करून पुण्यास आले व पुढें बढवाणी संस्थानचे कारभारी झाले. याच जागेवर असतांना संस्थानचे कांहीं कामासाठीं ते इंदुरास आले होते, तेथें एकाएकीं आजारी पडले व फाल्गून व॥ ८ रविवार शके १८१७ या मितीस म्हणजे सन १८९६ सालीं देवाधीन झाले. त्यांना इंग्रजसरकारांतून रावबहादूर ही बहुमानाची पदवी मिळाली होती. "

**कीर्तने यांचें वाङ्मयः**–( १ ) ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका, १८६७ इं. प्र.; १८८४ कि. खा.; १९२६; ( २ ) टेंपेस्ट नाटक–भाषांतर, १८७५; ( ३ ) लोकप्रिय हिंदुधर्म व त्याची पात्रता, १८८६.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) टेंपेस्ट नाटक—परीक्षण—विष्णुशास्त्री चिपळूणकर, निबंधमाला, पृष्ठ ४००–४०६.

( २ ) चरित्रविषयक माहिती, भा. इ. सं. मंडळाचें त्रैमासिक वर्ष ११, अंक ३.

( ३ ) टेंपेस्ट नाटक–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पु. अंक ५, मे १८७६.

( ४ ) टेंपेस्ट परीक्षण, विविधज्ञानविस्तार. पु. ८, अं. ५, मे १८७६.

(५) हंमीर महाकाव्य-परीक्षण, विविधज्ञानविस्तार पु. १२, अं. ४, एप्रील १८८०.
(६) मराठ्यांचे बखरीवर टीका, परीक्षण, विविधज्ञानविस्तार पु. १८, अं. ५-६, १८८६.

**कीर्तिकर कान्होबा रणछोडदासः**—[ १८४९-१९१७ ] कवि, वैद्य, शास्त्रज्ञ. जन्म मुंबई येथें झाला. यांचा मराठीचा व इंग्रजीचा प्राथमिक अभ्यास त्या वेळच्या एलफिन्स्टन इन्स्टिटयूशन व फ्री जनरल असेंब्लिज इन्स्टि-टयूशन ह्या शाळांत झाला. त्यानंतर ते १८६३ पासून १८६६ पर्यंत रे. विल्सन यांच्या हाताखालीं शिकले. पुढें वयाच्या १७ व्या वर्षी मॅट्रिक होऊन, दोन वर्षांनीं त्यांनीं एफ्. ई. ची परीक्षा दिली. १८७० सालीं ते मेडिकल कॉलेजांत प्रविष्ट झाले. या कॉलेजांत कांहीं दिवस राहून त्यांनीं १८७४ सालीं विलायतेस प्रयाण केलें. तेथें प्रथम कांहीं वैद्यकीच्या परिक्षांत पास होऊन त्यांनीं पदकें व बक्षिसें मिळविलीं व शेवटीं इंडियन मेडिकल सर्विसच्या परीक्षेस बसले. या परीक्षेस बसून उत्तीर्ण झालेल्या ४७ विद्यार्थ्यांत यांचा ९ वा नंबर आला. विलायतेहून हिंदुस्थानांत आल्यावर त्यांची मुंबईचे ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें प्रोफेसरचे जागीं नेमणूक झाली. या जागेवर ते कांहीं वर्षें होते. तदनंतर ते पुनः विलाय-तेस गेले व नेट्ले रॉयल मेडिकल स्कूलमध्यें लष्करविषयक शस्त्रक्रियेचें व आरोग्यशास्त्राचें आणखी अध्ययन करून १८७७ त ते स्वदेशीं परत आले. प्रथम त्यांची सोलापूर येथील १९ वी नेटीव इन्फंट्री ह्या पलटणीचे डॉक्टरचे जागीं नेमणूक झाली. नंतर त्यांची बदली कराची, सिंध हैदराबाद, बलुचिस्तान वगैरे ठिकाणीं झाली. सन १८८० सालीं दुसऱ्या अफगाण युद्धांत ते आपल्या पलटणीबरोबर अफगाणिस्थानच्या मोहिमेवर गेले होते. यानंतर कांहीं दिवसां-करितां ठाणें येथील इस्पितळावर बदली होऊन ते पुनः ग्रँट मेडिकल कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. हे पुढें ब्रिगेड सर्जन लेफ्टनंट कर्नलच्या वड्या लष्करी हुद्यापर्यंत चढत गेले व १९०४ सालीं सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्त झाल्यावर अंधेरी मुक्कामीं 'अलेक्झांड्रा लॉज' नांवाच्या विद्याश्रमांत पाश्चात्य पंडितांप्रमाणें हे शारदादेवीचे भक्त थोर थोर कवींच्या, शास्त्रज्ञांच्या व संशोध-कांच्या ग्रंथसमागमांत व लेखनव्यवसायांत गढून गेलेले दृष्टीस पडत. त्यांचा पुस्तकसंग्रह मोठा व मौल्यवान् होता. त्यांत संस्कृत, लॅटिन, इंग्रजी, मराठी वगैरे भाषांवरील सर्वसाधारण वाङ्मय, इतिहास, तत्वज्ञान, काव्य, साहित्य, टीका-

विषय, वनस्पतिशास्त्र व पशुविद्या वगैरे विषयांवरील मौल्यवान् ग्रंथ होते. १८८३ सालीं त्यांना मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो निवडण्यांत आलें होतें. सुमारें चौदा वर्षें ते या विश्वविद्यालयाच्या वैद्यकविषयक निरनिराळ्या शाखांचे परीक्षक होते. विश्वविद्यालयानें १८९१ सालीं त्यांना विलसन फायलॉलॉजिकल लेक्चरर नेमिलें होतें. तेव्हां त्यांनीं संस्कृत व प्राकृत भाषाविषयक व्याख्यानें दिलीं. त्यांनीं ह्यावेळीं मराठी कवींच्या वाङ्मयासंबंधानें सहा व्याख्यानें दिलीं. त्यांत मराठी वाङ्मयाची योग्यता कोणत्याहि वाङ्मयापेक्षां कमी नसून विश्वविद्यालयाच्या मोठमोठ्या परीक्षांच्या अभ्यासक्रमांत मराठी भाषाविषय समाविष्ट करण्यास योग्य आहे असें प्रतिपादन केलें. बडोदें येथें १९०९ सालीं भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपदीं यांस निवडण्यांत आलें होतें. जळगांवच्या कविसंमेलनाचेहि ते अध्यक्ष होते.

वयाच्या १९ व्या वर्षी यांनीं 'भक्तिसुधा' हें काव्य लिहिलें. सिव्हिलसर्जनच्या हुद्यावर असतां विद्याविनयसौजन्यसंपन्न अशा भार्येच्या अकालिक निधनामुळें त्यांना झालेलें दुःख त्यांनीं 'विलापलहरी' या काव्याच्या द्वारा व्यक्त केलें व पुढें राजकवि टेनिसन् याच्या प्रिन्सेस नामक काव्याच्या आधारें त्यांनीं 'इंदिरा' काव्य लिहिलें. 'इंदिरा' काव्याचें काव्यसंग्रहकार ओक यांनीं १८८२ सालीं विविधज्ञानविस्तारांत विस्तृत परीक्षण केलें आहे. यांनीं वनस्पतिशास्त्राचा फार चांगला अभ्यास केला होता. 'मुंबई इलाख्यांतील विषारी वनस्पति,' 'हिंदुस्थानांतील फुलें नसणाऱ्या वनस्पति,' 'हिंदुस्थानांतील औषधी वनस्पति' हे त्यांचे वनस्पति शास्त्रविषयक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (आधारः–रामराव बाळकृष्ण कीर्तीकरकृत चरित्रलेख, नवयुग १९१७.)

कीर्तीकरांच्या कवितेबद्दल बालबोधकर्ते ओक यांनीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे, "त्यांची काव्यरचना सुलभ, गोड, आणि भारदस्त अशी आहे. तिजमध्यें प्रसाद विपुल आहे. अर्वाचीन कवींतल्या अग्रगण्यांत त्यांची गणना आहे. त्यांचें इंदिरा काव्य मुंबईच्या विश्वविद्यालयाच्या युनिव्हर्सिटी स्कूलफायनल परीक्षेस विशेष काव्य म्हणून नेमिलें होतें. ह्यावरून त्यांच्या काव्याच्या योग्यतेची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. ह्या डॉक्टरांच्या हातच्या औषधांनीं आणि शस्त्रक्रियांनीं जसें जनांच्या कायिक वेदनांचें निवारण होऊन त्यांस शांति

मिळत आहे, तसें, त्यांच्या काव्याच्या श्रवणानें आणि अध्ययनानें मानसिक वेदनांचें विस्मरण होऊन चित्त तल्लीन होतें. " (बालबोध, पु. २३, पृष्ठ २७०.)

**कीर्तिकरांचे ग्रंथः**-( १ ) ब्राह्मधर्मप्रतिपादक वाक्यसंग्रह, १८७०. ( २ ) भक्तिसुधा. ( ३ ) विलापलहरि. ( ४ ) इंदिराकाव्य. ( ५ ) आर्यसंगीतमाला. ( ६ ). डार्विनचरित्र ( ७ ) ज्ञानेश्वरवचनामृत. ( ८ ) रामदासवचनामृत.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) चरित्रलेख, रा. ब. कीर्तिकर, नवयुग, १९१७.

( २ ) विलापलहरी–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १८८२.

( ३ ) इंदिरा–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, अंक ४, ५, ६, ७; १८८५.

**कुंटे महादेव मोरेश्वरः**—[ १८३५–१८८८ ] कवि, इतिहासकार, षड्दर्शनज्ञ.* कुंटे हे साताऱ्याजवळ कृष्णातीरीं माहुली म्हणून जें प्रसिद्ध क्षेत्र आहे तेथले राहणारे. तीच त्यांची जन्मभूमि. हे अगदीं गरीब भिक्षुक कुटुंबांत जन्मले. त्यांचा जन्म सन १८३५ च्या श्रावणमासांत झाला. ते लहान असतां यांचे वडील अपघातानें वारले. त्यांचे पश्चात् महादेव व अण्णा असे दोघे मुलगे आणि त्यांची विधवा स्त्री अशीं तीन मनुष्यें शिल्लक होतीं. त्या दोघां भावांमध्यें नऊ वर्षांचें अंतर होतें. घरची अत्यंत दरिद्रदशा. भिक्षुकीशिवाय दुसरें कांहीं निर्वाहास साधन नव्हतें. नदीवर यात्रिकांना श्राद्धसंकल्प वगैरे सांगून जी कांहीं प्राप्ति होईल तेवढ्यांत निर्वाह केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. क्षेत्राची खेडेगांवासारखीच वस्ती. तेथें कांहीं विद्याभ्यासाच्या वगैरे सोयी नव्हत्या. माधवरावांनीं वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत माहुलीस आपले कसेबसे दिवस घालविले. क्षेत्रस्थ मुलें निरुद्योगी असल्यामुळें तीं स्वभावतःच उनाड आणि व्रात्य अशीं निपजतात. त्याचप्रमाणें मोरभट कुंट्यांचा महादेव हाहि अतिशय उनाड व व्रात्य होता. पावसाळ्या दिवसांत

---

* हें चरित्र ' ज्ञानचक्षुकार ' रा. वामन बाळकृष्ण रानडे यांनीं १८८८ त लिहिलें असून तें प्रोफेसर पोतदार यांनीं १९२५ सालीं संपादिलेल्या ' थोर पुरुषांचीं लहान चरित्रें ' यांत संग्रहित केलेलें आहे. जरूर तेथें संक्षेप करून येथें तें देण्यांत आलें आहे.—ग्रंथकर्ता.

नदीमध्यें बापड्याच्या आंघोळीच्या किती आवृत्या होत असतील त्याचा नियम नसे. नदीमध्यें प्रहर प्रहर पोहावयाचें व डुंबायचें, तसेंच उन्हांत अंग वाळवायचें, पुनः नदींत उड्या टाकायच्या, तापलेल्या वाळवंटांत सवंगड्यांसह खूप धिंगाणा घालायचा, व पुनः नदीमध्यें उड्या टाकून पोहायचें, कवठें, चिंचा, बोरें, वगैरे मिळविण्याकरितां झाडांवरून चढायचें, तीं हिरवीं कच्चीं फळें बेलाशक खायचीं, त्यांवर ढसांढसां पाणी प्यायचें, त्यामुळें आईनें महादेवावर रागवावयाचें व संतापावयाचें, असा माधवरावांचा बालवयांत क्रम असे. वयाचीं बारा वर्षें झाल्यावर माधवरावांस विद्याभ्यासाची इच्छा होऊन, एके दिवशीं ते आईला न विचारतां कोल्हापुरास पळून गेले, व तेथें पहिल्यानें कांहीं दिवस माधुकरी मागून व नंतर वार लावून मराठी व इंग्रजी शाळेंत त्यांनीं अभ्यास केला. या वेळचे, म्हणजे चाळीस वर्षांपूर्वींचे, मराठी व इंग्रजी शाळांतले अभ्यास हल्लींपेक्षां अगदीं निराळे होते. त्या वेळीं मराठी शाळेंत इसापनीति व बाळमित्र हीं पुस्तकें शिकवीत असत. कोल्हापुरास पांडोबा तात्या दिवेकर यांची मराठी शाळा असे; त्या शाळेंत कुंटे हे प्रविष्ट होऊन त्यांचे अभ्यासास सुरुवात झाली. मराठी शाळेंतला अभ्यास पुरा झाल्यावर १८५० सालीं ते इंग्रजी शाळेंत गेले. त्या वेळीं कोल्हापूरच्या इंग्रजी शाळेवरील मुख्याध्यापक कृष्णाजी चांफाजी या नांवाचे सुरतेचे परभू गृहस्थ होते. त्यांचे शाळेंत १८५५–५६ पर्यंत कुंटे हे इंग्रजी शिकत होते. कोल्हापुरास कुंटे गेल्यावर त्यांचे मराठी शाळेपासूनचे सतीर्थ म्हटले म्हणजे रा. ब. माधवराव रानडे, रा. सा. विठ्ठलराव पाठक आणि रा. ब. बाबाजीराव सावंत हे होत. १८५६ सालीं कुंटे, विठ्ठलराव पाठक आणि बाबाजीराव असे तिघे विद्यार्थी जवळ पांच–पंचवीस रुपये जमवून, मुंबईस आपला पुढील विद्याभ्यास चालविण्यासाठीं निघून गेले; परंतु मुंबईच्या वस्तींत कोणाची ओळखदेख नसल्यामुळें, त्यांच्याजवळ असलेली अल्पशी पुंजी लवकरच संपून, त्यांना फाके पडूं लागले ! तेव्हां त्यांचा कांहीं उपाय न राहून ते पुनः मुंबईहून कोल्हापुरास परत गेले. त्या वेळीं आगगाड्या वगैरेंची कोठेंच कांहीं सोय नव्हती. बिचारे विद्यादेवीचे तिघेहि भक्त कोल्हापुरास माघारे आले. नंतर तेथें त्यांनीं पुनः मोठ्या प्रयत्नानें शेंपन्नास, रुपये मिळवून, जवळ पांच सहा महिन्यांची सामुग्री जमविली व आतां लवकर परत येण्याचें कारण नाहीं, अशी मनाची खात्री करून ते तिघेहि पुनः मुंबईस गेले. नंतर कुंटे हे विल्सन स्कूलमध्यें प्रविष्ट झाले. पुढें

तीन वर्षें लागोपाठ मॅट्रिक्युलेशन परीक्षेस जात होते. १८५९ सालीं त्यांची मॅट्रिक्युलेशन परीक्षा उतरली. ह्या विल्सन स्कुलांत कुंटे यांस निर्वाहापुरती एक पगारी विद्यार्थ्यांची जागा मिळाली. डॉ. विल्सनसाहेबांची कुंटे यांजवर त्यांच्या हुशारीमुळें आणि बुद्धिमत्वामुळें फार प्रीति असे, व यामुळें त्यांना आपल्या प्रिय छात्राच्या निर्वाहाची सोय करणें अवश्यच होतें. त्यावेळीं ह्या शाळेंतच कॉलेजचे वर्ग होते. १८५९ मध्यें मॅट्रिक्युलेशन परीक्षा झाल्यावर १८६१ त लिटलगो व १८६४ त बी. ए. अशा परीक्षा माधवरावजींनीं देऊन ते मुंबई युनिव्हर्सिटीचे ग्राज्युएट झाले. त्यांचे सतीर्थ रा. ब. रानडे हे १८६२ सालींच बी. ए. झाले होते.

कुंटे यांची मुंबईस स्कॉलर्शिपा वगैरे मिळून निर्वाहाची सोय झाली तसें त्यांनीं आपल्या मातुःश्रीस आणि कनिष्ठ बंधूस मुंबईस नेलें. कुंटे यांच्या मातुःश्रीनें आपल्या मुलांकरितां फार खस्ता खाल्ल्या व अतिशय हाल भोगिले. माहुलीस व कोल्हापुरास असतांना त्या माउलीनें लोकांचीं दळणें दळून व स्वयंपाक करून ह्या आपल्या पोटच्या दोन गोळ्यांचें पोषण केलें; त्या बाईला, आतां आपला मुलगा विद्वान झाला तेव्हां आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें वाटलें असेल, हें सांगायला नकोच. माधवराव कुंटे हे बी. ए. झाल्यावर, पुढें तसाच नेटानें अभ्यास चालविण्याची त्यांना दारिद्र्यावस्थेमुळें बिलकूल उमेद नव्हती. त्यांचे मनांतून यथेच्छ विद्याभ्यास करून मुंबई युनिव्हर्सिटीच्या सर्व पदव्या मिळविण्याची फार हौस होती. परंतु गरिबीमुळें तसाच नेटानें अभ्यास करण्यास त्यांना फुरसत नव्हती.

त्यांना सिंधमध्यें कराची हायस्कूलच्या हेडमास्तरची एक जागा आली व ती त्यांनीं लगेच पत्करली. आपल्या हेतूप्रमाणें आपल्याला पूर्ण विद्याभ्यास करण्यास दारिद्र्यानें सवड झाली नाहीं, परंतु आपल्या प्रिय कनिष्ठ बंधूला सर्व प्रकारें साह्य करून त्याजकडून पूर्ण विद्याभ्यास करवूं असा त्यांनीं निश्चय केला. आणि, अण्णा व मातुःश्री यांस मुंबईस ठेवून, माधवराव कुंटे हे कराचीस हेडमास्तर होऊन गेले.

सिंधमध्यें ते दोन वर्षेंपर्यंत होते. पहिल्यापासूनच कुंट्यांची बुद्धि परम जाज्वल्य असल्यामुळें आणि त्यांस नेहमीं विद्येचें व्यसन असल्यामुळें सिंधमध्यें

गेल्यावर त्यांनीं सिंधी भाषेचा उत्कृष्ट अभ्यास केला. तो इतका कीं, त्या भाषेंत ते व्याख्यानें देऊं लागले. कोणत्याहि भाषेंत व्याख्यानें देणें किंवा कविता करणें हें त्या भाषेंत चांगली गति असल्याशिवाय व ती भाषा उत्तमरीतीनें अवगत असल्यावांचून होत नाहीं. कुंटे हे सिंधी भाषेंत व्याख्यानें देत, यावरून त्यांनीं त्या भाषेंत किती प्राविण्य संपादिलें होतें हें समजतें. शिवाय त्या भाषेंत ते चांगले वाकब होते याची साक्ष त्यांस मुंबई युनिव्हर्सिटीनें कित्येक दिवस सिंधी भाषेचे परीक्षक नेमिले होते, यावरूनहि उत्तम रीतीनें पटत आहे.

पुढें दोन वर्षांनीं म्हणजे १८६७ सालीं, कुंटे यांची कोल्हापूर येथील राजाराम हायस्कुलावर नेमणूक झाली. सुमारें बारा वर्षांपूर्वीं जो महादेव कुंटे माधुकरी मागून किंवा वार लावून कोल्हापुरांत विद्याभ्यास करीत होता तोच विद्यार्थी, आतां माधवराव कुंटे होऊन, त्याच कोल्हापुरांत मोठा वजनदार व विद्वान् गृहस्थ होऊन आला, हें माधवरावजींस लहानसहान भूषण नव्हतें. कोल्हापुरास माधवराव कुंटे हे चार वर्षेंपर्यंत हेडमास्तर होते.

कोल्हापुरास कुंटे हे नौकरीवर येईपर्यंत त्यांस संस्कृताचा गंधहि नव्हता. कोल्हापुरास आल्यावर त्यांना गीर्वाण भाषेचा अभ्यास करावा अशी इच्छा होऊन, त्यांनीं अगदीं जुन्या पद्धतीप्रमाणें–रूपावलि, समासचक्र, अमरकोश, पंचमहाकाव्यें, अशा क्रमानें–सिद्धांत–कौमुदी आणि व्याकरणावरील सर्व ग्रंथ यांचें अध्ययन केलें व अत्यल्पावकाशांत ते उत्तम वैयाकरणी झाले. व्याकरण शास्त्रांत पूर्ण अधीत झाल्यावर त्यांनीं न्यायशास्त्राचा व अलंकारशास्त्राचा कोल्हापुरासच अभ्यास केला. कोल्हापुरास असतांनाच त्यांनीं कै. वा. तरुण राजाराम छत्रपति यांच्या मृत्युविलापाचें एक काव्य केलें, व तेव्हांपासून त्यांना कविता करण्याची स्फूर्ति झाली. यापुढें, त्यांनीं 'राजा शिवाजी' व 'मन' ह्या नांवाचीं दोन मराठी काव्यें रचून प्रसिद्ध केलीं.

कराचीच्या व कोल्हापूरच्या हायस्कुलावर मुख्याध्यापकाचें काम रा. सा. कुंटे यांनीं फार उत्तम प्रकारें केलें. पहिल्यापासून सुबोध व सरस व्याख्यानें देण्याचा त्यांना फार नाद असे. यामुळें त्यांचें लोकांवर वजन चांगलें बसे. व त्यांच्या विद्वत्तेचा ठसा लोकांचे मनावर उठवण्यास फारसा अवकाश लागत नसे. कोल्हापुरास ज्यांनीं त्यांना विद्यार्थि अवस्थेंत बघितलें होतें, त्यांनीं

त्यांस ह्याप्रमाणें मोठा विद्वान आणि पंडितमान्य झालेले पाहून त्यांजविषयीं किती धन्यवाद उच्चारिला असेल हें सांगायला नकोच.

कोल्हापुराहून १८७१ सालीं रा. सा. कुंटे यांस पुणें हायस्कुलावर हेडमास्तर नेमिलें. त्यांच्या विद्वत्तेविषयीं आणि शिकवण्याच्या उत्कृष्ट पद्धतीबद्दल शाळाखात्याचे अधिकाऱ्यांची अगदीं खात्री झाली असल्यामुळें, त्यांस, पुण्यासारख्या ठिकाणच्या पहिल्या प्रतीचे हायस्कुलावर मुख्याध्यापक नेमण्यांत आलें आणि ह्या नेमणुकीनें तर त्यांच्या गुणांची सरकारांत किती चाहा होती हें सर्व लोकांस स्पष्टपणें कळून आलें. कुंटे यांची पुण्याच्या हायस्कुलावर नेमणूक होईपर्यंत येथील जागा युरोपियनाकरितांच राखून ठेविल्यासारखी असे. परंतु शाळाखात्याचें मुख्याधिकारी चाटफील्ड साहेब यांनीं त्यांची पारख उत्तमप्रकारें करून त्यांस पुण्याचे हायस्कुलावर नेमिलें व कुंटे यांनींहि शेवटपर्यंत तेथें फार चांगल्या रीतीनें काम करून यश मिळविलें. कुंटे यांची पुण्यास नेमणूक झाल्यापासून १८७९–८० हीं दोन वर्षें खेरीज करून ते १६ वर्षें एकसारखे पुण्यासच होते. त्या मधल्या दोन वर्षांत ते मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजवर सहा महिनेपर्यंत संस्कृत प्रोफेसर नेमिले गेले होते, व पुढें त्यांची अमदाबाद कॉलेजावर ॲक्टिंग प्रिन्सिपॉलच्या जागीं नेमणूक झाली.

पुण्याहून मुंबई व अमदाबाद येथें जाण्यापूर्वीच कुंटे यांनीं मीमांसाशास्त्राचा अभ्यास करून, त्या शास्त्राचें परिज्ञान आपल्या देशबांधवांस मराठींतून व इंग्रजींतून करून देण्याची सुरवात केली होती. कुंट्यांची ‘ षड्दर्शनचिंतनिका ’ ही कशी होती व तिजवरून त्यांचें त्या शास्त्रांत किती नैपुण्य होतें हें, ज्यांनीं तें पुस्तक पाहिलें असेल त्यांस कळून येईल.

एवढेंच करून कुंटे हे स्वस्थ बसले नाहींत. इटलीच्या विद्वत्परिषदेकडून ‘ आर्य लोकांच्या हिंदुस्थानांतील सुधारणाक्रमाचा इतिहास ’ लिहिणारास बक्षिस देण्याचें प्रसिद्ध झालें, तेव्हां तें बक्षीस मिळविण्याच्या हेतूनें, रा. सा. कुंटे यांनीं ‘ व्हिसिसिट्युडस् ऑफ आर्यन सिव्हिलिझेशन इन इंडिया ’ या नांवाचें एक मोठें थोरलें पुस्तक लिहून, तें रोम येथें पाठविलें. व तें तेथल्या विद्वत्परिषदेस पसंत होऊन, नेमिलेलें बक्षीस रा. सा. कुंटे यांस मिळालें. ज्यांच्या अवलोकनांत हें पुस्तक आलें असेल त्यांस कुंटे यांच्या थोर विद्वत्तेचें व शोधक बुद्धीचें आणखी

एक उत्कृष्ट प्रमाण मिळाल्यासारखें होणार आहे. आपले नेहमींचे व नियमित उद्योगधंदे संभाळून, एवढालीं पुस्तकें लिहिणारे; म्हणजे ते कांहीं सामान्य बुद्धीचे किंवा कर्तृत्वाचे गृहस्थ नव्हते, हें कोणालाहि समजल्यावांचून राहणार नाहीं.

१८७९-८० ह्या सालीं हा लेख लिहिणाराचें (ज्ञानचक्षूकर्त्याचें) गुजराथेंत व अमदाबादेस जाणें झालें होतें. त्यावेळीं वर लिहिल्याप्रमाणें रावसाहेब हे तेथील कॉलेजावर प्रिन्सिपॉल असून त्यांना तिकडे जाऊन पुरे चार महिने देखील झाले नव्हते. असें असून तेथें हेमाभाई इन्स्टिट्यूशनमध्यें त्या वेळीं एक सभा भरली होती व त्या सभेंत रा. सा. कुंटे यांनीं सुमारें अर्धा पाऊण तास गुजराथींत सुंदर व त्यांच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें अस्खलित व्याख्यान दिलेलें ऐकून आम्हांला चमत्कार वाटला. कोणत्याही भाषेचा—व त्यांत देशी भाषेचा—अभ्यास अल्पावकाशांत करून त्यांत व्याख्यानें देण्यासारखें नैपुण्य मिळविणारा असा रा. सा. कुंट्यांवांचून दुसरा कोणी दृढाभ्यासी गृहस्थ आमच्या महाराष्ट्रांत मिळणें कठिण आहे, असें आम्हांस वाटतें!

कुंटे यांनीं मुंबई व अमदाबाद इकडे जाण्यापूर्वीं 'ऋषि' नांवाचें एक इंग्रजी काव्य केलें असून, त्या काव्याची इंग्रजी कवींनींहि तारीफ केल्याची इकडे प्रसिद्धि आहे. त्याचप्रमाणें, १८७६–७७ सालीं जो दुष्काळ पडला होता त्या कालाला अनुसरून रा. सा. कुंटे यांनीं 'फॅमिश्ड् व्हिलेज' या नांवाचें एक इंग्रजी काव्य करून प्रसिद्ध केलें.

रा. सा. कुंटे हे पुण्यास आल्यावर ६-७ वर्षांनीं सर्व हिंदुस्थान पाहून येण्यासाठीं रजा घेऊन प्रवासास निघाले, व पुढें कांहीं दिवसांनीं पुनः रजा घेऊन दक्षिण हिंदुस्थान व लंका बेट हीं बघून आले. त्यांच्या ह्या प्रवासांत, सर्व प्रकारचे शोध करून त्यांचीं टिप्पणें घेण्याची जी त्यांची नैसर्गिक बुद्धि तिला तर पुष्कळच खाजें मिळालें. व त्याचा त्यांनीं आपल्या व्याख्यानांतून वगैरे अनेक वेळेस उपयोग केलेला पुष्कळांस माहीत आहेच. अनेक ग्रंथज्ञानानें व ह्या सर्व प्रवासानें त्यांचे ज्ञानास व माहितीस फारच तेज आलें होतें. मनुष्याचें ग्रांथिक शाहाणपण प्रवासज्ञानाशिवाय व प्रत्यक्ष अनुभवाशिवाय पंगू आहे, असें कुंट्यांच्या रसभरीत व्याख्यानांवरून व बहुश्रुतपणावरून सहज श्रोत्यांना कळून आल्याशिवाय राहत नसे.

रा. सा. कुंटे हे १८७८ पर्यंत येथील पुण्यांतील प्रार्थनासमाजाचे पुरस्कर्ते व अध्वर्यु होते. परंतु धर्मसंबंधानें त्यांचीं मतें पहिल्यापासून स्थिर नसल्यामुळें, व मनुष्याला जों जों जास्त जास्त ज्ञानप्राप्ति व शास्त्राभ्यास होत जातो तों तों त्याचें धर्मविषयक अस्थैर्य जास्त वाढून मनाला चांचल्य येतें, याप्रमाणें रा. सा. कुंटे यांचे मनालाहि त्या धर्मविषयांत चांचल्य उत्पन्न होऊन, त्यांनीं प्रार्थनासमाजाकडचा पक्ष अगदीं सोडून, ते होतां होतां शेवटीं अगदीं वारकरी संतमंडळीप्रमाणें ईश्वरनामाचा उच्चार करून, रोज एकेक तासपर्यंत पायांत चाळ बांधून व हातांत चिपळ्या व वीणा घेऊन अंगांतून घाम निघेपर्यंत निखालस भजन करीत.

रा. सा. कुंटे यांनीं अनेक शास्त्राभ्यास व भाषाभ्यास करून त्यांत उत्कृष्ट अधीतता संपादन केल्यानंतर, त्यांस त्या विषयांचा कंटाळा व तिरस्कार येऊन, त्यांचें लक्ष्य यंत्रें व कारखाने यांचेकडे लागलें. तें इतकें कीं, त्यांना सर्वत्र त्या विषयाशिवाय दुसरें कांहीं सुचेनासें झालें. जो कोणता विषय डोक्यामध्यें येईल त्याचा पिच्छा पुरविल्याशिवाय व तो पुरा आपल्या हस्तगत केल्याशिवाय सोडावयाचा नाहीं, असा त्यांचे स्वभावाचा पहिल्यापासूनच कल असल्यामुळें, त्यांनीं यंत्रांची व कारखान्याची हौसही पूर्ण केली. त्यांनीं येथें ( पुण्यास ) शिसपेन्सिलींचा कारखाना काढून, पेन्सिली तयार करण्याची सुरवात केली. रा. सा. कुंटे ह्यांचें ह्या कामांतलें ज्ञान केवळ वरवर नसून, त्याबद्दलचा त्यांनीं स्वतः चांगल्या रीतीनें अभ्यास करून त्या कारखान्यांत त्यांची चांगली गति झाली होती.

यंत्रें, कारखाने यांचेकडे ५।४ वर्षें घालविल्यावर त्या शास्त्रविषयींहि त्यांना बराच वीट येऊन, मनाला स्वास्थ्य व करमणूक व्हावी म्हणून त्यांनीं आपला कारखाना आपल्या मुलाचे स्वाधीन करून, गायनवादन कलेचा यथाशास्त्र अभ्यास चालविला; व त्यांच्या विलक्षण अभ्यासी स्वभावाप्रमाणें, त्यांनीं अल्पावकाशांतच त्या कलेमध्येंहि तात्त्विक दृष्टीनें चांगलें प्राविण्य मिळविलें. ह्याप्रमाणें त्यांना गायनवादनाचा नाद लागला. त्या कलेच्या संबंधानें, पूर्वीच्या व नवीन संस्कृत व इंग्रजी ग्रंथकारांचे सर्व ग्रंथ त्यांनीं पाहून टाकले, आणि देशी व विदेशी गायनवादनाच्या सामग्रीची तुलना करून, देशी गायन व वादन अधिक सुसंस्कृत व व्यापक आहे, अशी त्यांनीं आपली खात्री करून प्रसंग आले तेव्हां, त्या

विषयावर मोठमोठीं व्याख्यानेंहि दिलीं. गायनवादनाचा त्यांस नाद लागल्यापासून पुणें येथील गायनसमाजाचे ते मोठे पुरस्कर्ते झाले व त्यासंबधानें ते मोठ्या आस्थेनें आपलें काम करीत.

ह्याप्रमाणें, गायनवादन कला संपादित केल्यावर त्याविषयींचा त्यांना अंमळ कंटाळा आल्यासारखा होऊन, ते भूगर्भशास्त्रज्ञानसंपादनाकडे लागले. पुढें कांहीं दिवस पुणें म्युनिसिपालिटींत सभासद म्हणूनहि निवडून आले होते.

माधवराव कुंटे यांना अनेक भाषा येत असत. त्यांतून व्याख्यानें देण्यासारखा भाषाव्यासंग पांच भाषांचा असे. मराठी, सिंधी, गुजराथी, संस्कृत आणि इंग्लिश. या भाषांशिवाय त्यांना ग्रीक, ल्याटिन व पर्शियन या भाषांचेंहि अंशतः ज्ञान असे. खरा अभ्यासी व कोणत्याहि विषयाचेसंबंधानें दडपून बोलण्याला अधिकारी असा माधवराव कुंटे हाच एक पुरुष आमचे पुण्यांत होता. त्यांची जागा भरून निघण्यास पुष्कळ अवकाश लागेल.

कुंटे यांच्या चरित्राची नीट कल्पना यावी म्हणून 'ज्ञानचक्षू'कर्त्यानें लिहिलेलें त्यांचें चरित्र वर दिलें आहे. या चरित्रांत त्यांच्या काव्यवाङ्मयासंबंधीं नुसता उल्लेख येऊन गेला आहे; त्याची चर्चा झालेली नाहीं. विशेषतः कुंट्यांच्या 'राजा शिवाजी' या काव्याबद्दल विशेषत्वानें लिहिणें भाग आहे. या काव्यानें मराठी काव्यरचनेंत नवीन तऱ्हेचा पायंडा घातला. भाषेंतील कृत्रिमता नाहींशी करून टाकण्याचा त्यांत प्रयत्न झाला आहे. गीर्वाण शब्दभांडारांतून उसन्या आणलेल्या आभरणांनीं न नटवितांही महाराष्ट्रकाव्यसुंदरीला सौंदर्यवती करितां येतें हें दाखविण्याचा कुंट्यांनीं निश्चय केला होता, आणि तो पुष्कळ अंशानें यशस्वी झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रा. रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं या काव्यासंबंधीं आपल्या 'मराठीभाषेची घटना' या पुस्तकांत विस्तारपूर्वक लिहिलें आहे. ते लिहितात, "मराठीमध्यें पाश्चात्य नमुन्यावर काव्य करण्याचा अगदीं पहिला प्रयत्न कुंटे यांनीं केला. 'राजा शिवाजी' हें त्यांचें महाकाव्य चांगल्यापैकीं आहे. परंतु कित्येकांनीं त्या काव्याची केवळ नवीन म्हणून फजिती उडविल्यामुळें त्यांचें काव्य पुरें प्रसिद्धीसहि आलें नाहीं. त्यांनीं 'मन' म्हणून तात्विक विषयावर नवीन तऱ्हेचें काव्य लिहिलें. परंतु त्याचीहि तीच अवस्था झाली. 'आतां हे कविमन्य तत्वज्ञानी बनले!"

म्हणून त्यांच्यावर खरमरीत टीका आली.*........कुंटे यांचा उद्देश साधी सोपी कविता करण्याचा होता, 'साकी किंवा पद यांमधून दिसणारी मराठी भाषा श्लोक व आर्या या संस्कृत छंदांतून दिसत नाहीं. जेथें सहज मराठी शब्द योजितां येतील तेथेंहि संस्कृत शब्द कोंबले असल्यामुळें मराठी कवितांमधून संस्कृत शब्दांची निरर्थक गर्दी झाली आहे,' असें त्यांचें मत होतें. या म्हणण्यांत कांहीं एक वावगें नव्हतें. त्यांनीं असें धोरण धरल्यामुळें त्यांचें काव्य निर्भेळ मराठी वळणाचें झालें आहे. त्यांतील भाषा खऱ्या सुरांत काढलेली सडेसोटपणाची आहे. ह्या स्वाभाविक गुणामुळें काव्याचा मुख्य गुण जो वीररस त्यास साह्यच झालें आहे. बहिर्जीसारख्या अशिक्षित मराठी गड्याच्या किंवा सोयराबाईसारख्या स्त्रीच्या तोंडून पदलालित्याची अपेक्षा करणें म्हणजे खरें काव्य न समजणें होय. संभाजीचें बालपण किंवा नूरजादीचें वर्णन यांवरून पाहतां ही नित्यांतली व्यावहारिक भाषा वीररसाप्रमाणेंच अन्य रसांनाहि शोभत आहे असें दिसून येईल. खरोखरी पाहिलें तर हें काव्य उत्कृष्ट वठलें आहे. सांप्रत नित्य होणाऱ्या नवीन काव्यांमधून पुष्कळांमध्यें भाषेचा असाच सहज ओघ दृष्टीस पडतो, पण त्याला आतां कोणी नांवें ठेवीत नाहीं. कुंटे यांनीं पुढें कविता करणें सोडून दिलें, ही मराठी वाङ्मयाची मोठी हानी झाली."

**कुंटे यांचें वाङ्मय**—(१) षड्दर्शनचिंतनिका–मासिक १८७७; (२) राजा शिवाजी काव्य भाग १–६, १८६९; १८७१; १९२४ प्रकाशक—गो. गो. अधिकारी (३) मन–काव्य १८७२; (२) राजाराम महाराज यांचेवर कविता १८७१; (५) बालविवाह निषेध यासंबंधीं वाद, १८७६.

---

* निबंधचंद्रिकेंत यासंबंधीं, 'सत्य प्रसिद्धी इच्छिणारा' या नांवानें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. सदर पत्रलेखक म्हणतो, "कुंटे यांचें '**मन**' नांवाचें तत्वविचारमय काव्य १८७२ मध्यें प्रसिद्ध झालें, त्या सुमारास ज्ञानप्रकाशच्या दोन तीन अंकांत 'A poet turned a philosopher' या नांवाचा निबंध इंग्रजींत प्रसिद्ध झालेला आहे. त्यांतील विचार 'विद्वत्व आणि कवित्व' या निबंधांतील विचारांसारखे आहेत, व 'तो 'मन' ह्या ग्रंथास अनुलक्षून आहे. तो विष्णुशास्त्री यांनीं लिहिला असावा अशी पुष्कळांची समजूत आहे. (नि. चं. अंक ३, १८८३). ही समजूत शेवटीं खरीच ठरली. —**ग्रंथकर्ता.**

**चरित्र, अभ्यास, परीक्षणः**—( १ ) राजा शिवाजी—परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४, अंक ६, ७, ८.

**कुरुंदवाडकर गणपतराव हरिहर**—[१८३८–१८९९] कवि. जन्म कुरुंदवाडकर पटवर्धन घराण्यांत कुरुंदवाड येथें झाला. कुरुंदवाड संस्थानच्या धाकट्या पातीचे हे अधिपती होते. जुन्या पद्धतीनें यांचें शिक्षण झालें होतें. संस्कृत भाषेचा यांचा अभ्यास फारच चांगला होता. पुण्यांतल्या चांगल्या चांगल्या पंडितांशीं हे संस्कृत भाषेंत वादविवाद करूं शकत. जुनी मराठी कविताहि यांनीं चांगली अभ्यासिली होती. यांनीं स्वतः गंगावर्णन, गणेशपुराण आर्या, भट्टवंशकाव्य, जनस्थाननिर्णय इत्यादि सुंदर काव्यें रचिलीं आहेत. यांच्या कवितेचा थाट मोरोपंती वळणाचा आहे.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) गणेशपुराण आर्या–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, जाने–फेब्रु–मार्च १८७९.

( २ ) गणेशपुराण आर्या–उत्तरार्ध परीक्षण, विविधज्ञानविस्तार मार्च–एप्रील १८८८.

**कुळकर्णी गणेश विट्ठल** [१८८९–१९२१] कादंबरीकार. 'सहस्रकर', या साप्ताहिकाचे व 'उद्यान', 'नवयुग' या मासिकांचे संपादक. यांचीं तारुण्यांतील पहिलीं कांहीं वर्षें सर्कशीबरोबर मॅनेजर म्हणून हिंदुस्थानभर हिंडण्यांत गेलीं. लेखनाची हौस असल्यामुळें लेखकाचा धंदा यांनीं पत्करला. त्यांच्या 'ह्या संशयाचा प्रताप', 'कर्मसंन्यास', 'जन्मठेप' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. हे स्वतःस आगरकरपंथीय समजत असत. त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांत सामाजिक अन्यायांविरुद्ध जोराचें टीकास्त्र चालविलें आहे.

**कुळकर्णी यांचें वाङ्मयः**—( १ ) कर्मसंन्यास. ( २ ) चंद्रचूड. ( ३ ) कुसुंबा अथवा विषविनोद. ( ४ ) जन्मठेप. (५) योगायोग. (६) सोनेरी खंजीर. ( ७ ) ह्या संशयाचा प्रताप.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—( १ ) चरित्र, व. ना. नाईक, मनोरंजन, जून १९२१ ( २ ) कर्मसंन्यास–परीक्षण, वाग्भट देशपांडे, विविधज्ञानविस्तार पुस्तक ४९, अंक ४, १९१८.

**केतकर व्यंकटेश बापूजी** [ १८५४–१९३० ] ज्योतिषशास्त्रज्ञ. यांचा जन्म नरगुंद येथें झाला. यांचे वडील बापूशास्त्री हे रामदुर्ग संस्थानाधिपतींच्या आश्रयास होते. वेदांत, व्याकरण व ज्योतिष यांचा त्यांनीं चांगलाच व्यासंग केला होता. पण यांचा अत्यंत आवडीचा विषय म्हणजे गायन. यांत प्राविण्य संपादून त्यांनीं चांगलाच लौकिक मिळविला. बापूशास्त्री व्यंकटराव लहान असतांनाच वारले. व्यंकटरावांनीं मॅट्रिकची परीक्षा १८७४ सालीं दिली. या परीक्षेंत त्यांचा तिसरा नंबर लागून त्यांस 'बाई माणिकबाई बयरामजी जीजीभाई प्राइझ' मिळालें. व्यंकटरावांची घरची स्थिति अगदींच गरिबीची असल्यामुळें त्यांस विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षण घेतां आलें नाहीं. त्यांनीं १८७५ त शाळाखात्यांत दुय्यम शिक्षक म्हणून नोकरी धरली व पुढें फर्स्ट असिस्टंट एज्युकेशनल इन्स्पेक्टरचे हुद्यापर्यंत चढत जाऊन १९११ मध्यें त्यांनीं पेन्शन घेतलें. व्यंकटराव यांचे वडील बापूशास्त्री यांनीं ज्योतिषविषयावर 'ज्योतिषशास्त्रसुबोधिनी' व आणखी दोन ग्रंथ ( अप्रकाशित ) संस्कृत भाषेंत लिहिले आहेत. व्यंकटराव यांना या ग्रंथांचा अभ्यास करण्याची इच्छा झाल्यामुळें त्यांचें ज्योतिषशास्त्राकडे लक्ष वेधलें. त्यांनीं प्रथम आपल्या आर्य ज्योतिषशास्त्रांपैकीं ग्रहलाघव, सूर्यसिद्धांत, शिरोमणि वगैरे ग्रंथांचें अध्ययन केलें. त्यांना जरी युनिव्हर्सिटीचें उच्च शिक्षण मिळालें नव्हतें, तरीं त्यांनीं स्वतः परिश्रम करून लागर्थम् व कॅलक्युलस ( शून्यलब्धि ) पर्यंतचें सर्व गणित आपले अंकित करून घेतलें होतें. आर्यज्योतिषग्रंथांचें अध्ययन चालू असतांनाच त्यांनीं पाश्चात्य ज्योतिषग्रंथांचाहि अभ्यास केला. या दोन्ही प्रकारच्या शास्त्रीय व्यासंगानें त्यांची तुलनात्मक विचार करण्यास तयार अशी दृष्टि बनली. आपलीं प्रचलित पंचांगें दृक्प्रत्ययास येत नाहींत याचें कारण ग्रहलाघवादि ग्रंथांतील गणितपद्धतीस चालना पाहिजे, ही गोष्ट केतकर यांच्या लक्षांत येऊन आपण एक नवीन पंचांगोपयोगी करणग्रंथ तयार करावा, असें त्यांच्या मनानें घेतलें व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी ग्रंथ करण्यास सुरुवात करून १८९२ मध्यें तो पुरा केला. प्रथम त्यांनीं हा ग्रंथ मराठी भाषेंत लिहिला होता; परंतु मराठी भाषा ही महाराष्ट्राचीच फक्त भाषा असल्यानें ग्रंथाचा उपयोग महाराष्ट्राबाहेर होणार नाहीं, हें जाणून त्यांनीं त्याचें संस्कृतांत रूपांतर केलें. हा 'ज्योतिर्गणित' नांवाचा ग्रंथ, त्याचें महत्त्व व उपयुक्तता लक्षांत

घेऊन पुण्यांतील आनंदाश्रम संस्थेनें १८९८ मध्यें छापून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ छापल्यानंतर ग्रहलाघवपद्धतीचा एक श्लोकबद्ध करणग्रंथ असावा, असें वाटल्यावरून केतकर यांनीं 'केतकीग्रहगणितम्' या नांवाचा दुसरा करणग्रंथ १८९९ मध्यें छापून प्रसिद्ध केला. तसेंच तिथी, नक्षत्र व योग हीं तयार करण्याकरितां सारण्या तयार करून 'वैजयंती' या नांवानें १९०० मध्यें त्यांनीं प्रसिद्ध केल्या. अशा रीतीनें करणग्रंथ तयार झाल्यावर या नवीन करणग्रंथाधारें दृक्-प्रत्ययदायी असें शुद्ध पंचांग तयार करून जनतेला सादर करावें, अशी इच्छा होऊन केतकर यांनीं शके १८२१ पासून 'केतकी' पंचांग म्हणून काढण्यास सुरुवात केली. व तेव्हांपासून अद्यापपर्यंत तें निघत आहे. हें पंचांग पुष्कळ ठिकाणीं मान्य होऊन त्या पद्धतीवर 'चित्रशाळा पंचांग,' 'गोसेवक पंचांग,' 'प्रभाकर पंचांग,' पुत्तुर येथील कानडी पंचांग अशीं अनेक पंचांगें निघूं लागलीं आहेत. 'गोलद्वय प्रश्न' हा त्यांचा आकर्षणशास्त्रावरचा ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहून तयार आहे. द्रव्याच्या अभावीं त्यांच्या हयातींत तो छापण्याचा योग आला नाहीं. 'इंडियन ॲण्ड फॉरिन क्रॉनॉलजी' हा ग्रंथ इतक्या उच्च दर्जाचा झाला आहे कीं, तो छापण्याचें काम 'रॉयल एशियाटिक सोसायटी'नें आपल्या शिरावर घेतलें. हा ग्रंथ इंग्रजी भाषेंत असल्यामुळें केतकरांची बुद्धिमत्ता व संशोधनशक्ति यांबद्दल इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड वगैरे पाश्चात्य देशांतील विद्वानांची खात्री पटून आर्यज्योतिषासंबंधीं त्यांचे कित्येक चुकीचे ग्रह या ग्रंथानें दूर झाले आहेत.

पंचांगसंशोधनाचे कामीं आधुनिक वेधोपलब्ध सूक्ष्म तिथी व शुद्ध वर्षमान व अयनगति घेण्याबद्दल पुणें व सांगली येथील ज्योतिषसंमेलनांत ठराव पास होऊन त्याप्रमाणें कांहीं पंचांगेंहि निघूं लागलीं आहेत. जुने ज्योतिषी यांना या गोष्टी अद्याप पटल्या नाहींत, परंतु त्या ते लवकरच मान्य करतील असें वाटतें. विशेषतः अयनांशाचा प्रश्न अजून वादग्रस्त आहे. या प्रश्नावर केतकर यांनीं आपल्या ग्रंथांत फारच संशोधनपूर्वक प्रकाश पाडला आहे. (चित्रमयजगत्, सप्टें. १९२०–संक्षेप.)

**केतकरांचें वाङ्मयः**—(१) ग्रहगणित. (२) नक्षत्रविज्ञान. (३) वैजयंती.

**चरित्र, चर्चा, अभ्यास**—(१) नक्षत्रविज्ञान-परीक्षण, श्री. कृ. कोल्हटकर, विविधज्ञानविस्तार, अंक १२, १९१६. (२) ग्रहगणित-परीक्षण, विविधज्ञानविस्तार, अंक ३, १९१५.

**केशवसुत** [ १८६६–१९०५ ] यांचें संपूर्ण नांव कृष्णाजी केशव दामले असें आहे. या भावगीतकार कवीचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील 'मालगुण्ड' ( केशवसुतांच्या कवितेंतील 'माल्यकूट' ) या गांवीं ता. १५ मार्च १८६६ या दिवशीं झाला. त्यांचे वडील केसोपंत हे एक मराठी शाळेंतील शिक्षक होते. दामल्यांच्या घराण्यांत पूर्वी कोणी प्रसिद्धीस आलेला दिसत नाहीं; परंतु केशवसुतांच्या पिढीला बुद्धिमत्ता आणि प्रसिद्धि या दोन्ही गोष्टींचा लाभ झाला. कोणास ठाऊक, बुद्धिमत्तेचा विशेष आईकडूनच मुलांत उतरला असेल. केशवसुतांची आई ही चिपळूणजवळील 'मालदौली' गांवाचे खोत गणपतराव करंदीकर यांची एकुलती एक कन्या होती; आणि दामल्यांच्या मानानें करंदीकरांचें घराणें सांपत्तिकदृष्ट्या विशेष चांगल्या स्थितींत होतें. केशवसुतांचे ज्येष्ठ बंधु श्रीधरपंत हे मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिली जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ति मिळवून, पुढें पदवीधर होऊन बडोदें येथील कॉलेजांत गणित व संस्कृत या विषयांचे प्रोफेसर झाले; परंतु लौकरच ते विषमज्वरानें अकालीं मृत्युमुखीं पडल्यामुळें त्यांच्या हातून कांहीं कामगिरी होऊं शकली नाहीं. केशवसुतांचे धाकटे बंधू मोरोपंत व सीतारामपंत यांनाही अनुक्रमें उज्जयिनी येथील माधव कॉलेजांत व पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजांत कांहीं काळ प्रोफेसर होण्याचा मान मिळाला होता. सीतारामपंत आपल्या राजकीय चळवळीमुळें व लेखनामुळें विशेष प्रसिद्धीस चढले, तथापि शास्त्रीय मराठी व्याकरण ही मोरोपंतांचीच कामगिरी अधिक भरीव व स्थायी आहे. केशवसुतांची प्रसिद्धि ही त्यांच्या कवितेमुळें, व स्वर्गवासी झाल्यानंतर कित्येक वर्षांनीं झाली. त्यांची हुशारी विश्वविद्यालयाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यास उपयोगी पडणारी नव्हती. त्यांना लिहायला वेळ लागे असें म्हणतात. या कारणानें दोनदां धक्के खाऊन मग वयाच्या तेविसाव्या वर्षी ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. याच्यापूर्वीच म्हणजे १८८० सालीं लहानपणींच केशवसुतांचा विवाह चितळे घराण्यांतील एका सालस पण साधारणपणें कुरूपांतच मोडेल अशा अष्टवर्षा कन्येशीं झाला होता. शिक्षणासाठीं बडोदें, वर्धा,

नागपूर येथें मिळून दोन वर्षांचा काळ घालविल्यावर केशवसुत १८८४ सालीं पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलांत दाखल झाले आणि तेथूनच १८८९ सालीं मॅट्रिक होऊन चरितार्थासाठीं मुंबईस गेले. हंगामी नोकऱ्या करीत तेथें ते १८९६–९७ पर्यंत होते. प्लेगामुळें त्यांना मुंबई सोडावी लागली व ते खानदेशांत गेले. भडगांव व फैजपूर या दोन ठिकाणीं मिळून ते १९०३ पर्यंत तिकडे होते. नंतर धारवाड हायस्कुलांत त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली व ते धारवाडास गेले. दोन वर्षांनीं कांहीं खाजगी कामासाठीं ते हुबळीस गेले असतां प्लेग होऊन तेथेंच निवर्तले. केशवसुतांचा मृत्यु दिन कोणता हें ठरविण्याच्या बाबतींत त्यांचे बंधु सीतारामपंत यांनीं आपला सत्याविरुद्ध दुराग्रह जाणून बुजून आमरण ठेविला; पण तो मृत्युदिन ७ नोवेंबर १९०५ हाच होय, हें रा. शंकर काशीनाथ गर्गे यांनीं विविध ठिकाणांहून माहिती मिळवून व तिची छाननी करून सप्रमाण सिद्ध केलें आहे. केशवसुतांची पत्नी रखमाबाई या मागून आठ दिवसांनींच म्हणजे ता. १५ नोवेंबर रोजीं रात्रीं निवर्तल्या.

केशवसुतांचा स्वभाव स्वाभिमानी, निःस्पृह व बाणेदार असे. ते संकोची व मितभाषणी असत. कित्येकदां त्यांची वृत्ति व्यावहारिकदृष्ट्या चमत्कारिक भासली, तरी त्यांची वागणूक साधी आणि सरळपणाची असे. जगांतील डावपेंचाच्या वागणुकीशीं साहजिकच त्यांचें कधीं जुळत नसे. त्यांचें त्यांच्या आप्तवर्गावर अकृत्रिम व अलोट प्रेम होतें; पण त्यांच्या चमत्कारिकपणामुळें आप्तवर्गाला त्यांच्या विषयीं खेळीमेळीचा व दिलखुलाईचा आपलेपणा वाटला नसावा. केशवसुत भरलेल्या घरांतील दिवाळीचें रसाळ वर्णन करून म्हणतात,

“ खाणें आणि पिणें, विनोद करणें, गाणेंहि वा खेळणें,
जैसें ज्यांस रुचेल त्यांपरि तुम्ही या उत्सवीं वागणें;
मी सन्ध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी.” ( पृ. १४८ )

हृदयाचा चुराडा करणारे संकटांचे डोंगर केशवसुतांच्यावर कोसळलेले दिसत नाहींत; मग त्यांनीं १८९२ सालीं पंचविशी नुक्तीच उलटली आहे अशा काळांत

" काळोखाच्या जगामध्यें या
मृत आशांच्या चितांवरुनिया
पिशाच माझें भटकत आहे,—शांति नसेचि तया !" (पृ. ९१)

असे दारुण निराशेचे हृदयद्रावक उद्गार कां काढावेत ? संसारांत त्यांची थोडी ओढाताण झाली असेल पण पोटापुरतें त्यांस मिळत होतें खास. रक्त आटवून उमेदीची राख करणाऱ्या प्रखर दारिद्र्याची आंच त्यांना लागली नव्हती. पण काव्यग्रंथांतील परोक्ष सृष्टीशीं निकट परिचय अकालींच झाल्यामुळें प्रत्यक्ष सृष्टींत जी निराशा उताविळपणानें होते ती त्यांस झाली असावी, आणि जी अव्यवहारिता येते ती त्यांस बाधली असावी. या निराशेमुळेंच प्रत्यक्ष सृष्टीपासून ते अधिकाधिक अलग राहिले असावेत. याचा एक परिणाम असा झाला कीं मनुष्याच्या एकमेकांशीं येणाऱ्या विविध व्यवहारांत अपेक्षित वाईटाबरोबर जें अकल्पित व अलौकिक चांगलेंही दृग्गोचर होतें त्याला ते मुकले; आणि म्हणून

" जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें " (पृ. १५७)

असें ते म्हणतात त्या काव्यमय रम्यासाठीं त्यांना विजनवास पत्करावा लागला. पण तेथेंही अखेर काय अनुभव आला ?

" जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते;
म्हणुनी विजनीं मी जात्यें,
स्वच्छन्दें त्या आळवित्यें,
स्व-भाव दावुनि
परि तें झटदिनिं
जाई लोपुनि !
मग मी हाका मारितसें,
न परि हरपलें तें गवसें !
त्रिखंड हिंडुनि धुंडितसें,
न परि हरपलें तें गवसे !" (पृ. १९८)

प्रा. क्र. ८२/२३



'हरपलें श्रेय' ही कविता लिहिली होती तेव्हां म्हणजे १९०५ सालीं केशवसुतांची मनःस्थिति कशी झाली होती तें त्यांनीं आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत नमूद करून ठेविलें आहे. तें म्हणतात,—(हरपलें श्रेय) "या माझ्या कवितेवरून आपणास माझ्या मनःस्थितीची कल्पना येईल. माझें हृदय तडकलें आहे; पण हाय! याला उपाय कोठें आहे?"* यानंतर ५॥ महिन्यांनींच जेव्हां मृत्यु आला तेव्हां त्यांच्या आवडत्या शेलीप्रमाणें त्यांना वाटलें असेल काय?—'किती सुंदर आहे हा मृत्यु'!—

"निद्रा दीर्घ, जिच्यामधीं न कसलीं स्वप्नें कधीं येतिल,
ती निद्रा निजतां न मन्नयन हे ओले मुळीं होतिल!"(पृ. १३७)

समानव्यवसायी लोकांत केशवसुतांना अनेक गुणग्राही मित्र लाभले होते; आणि त्या काळांत त्यांची सहानुभूति अमूल्य होती. हरि नारायण आपटे, नारायण वामन टिळक, वासुदेव बळवंत पटवर्धन, माधवानुज, विनायक, रा. नरहर शंकर रहाळकर, रा. किरात यांना केशवसुतांबद्दल व त्यांच्या कवितेबद्दल प्रेम वाटे. सार्वजनिक प्रियतेचा तर तो काळच नव्हता. केवळ मोठ्या नोकरीसाठीं इंग्रजी विद्या संपादन केलेल्या अल्पसंख्य लोकांत वाचनप्रिय आणि काव्यप्रिय असे किती निघणार! जे थोडे काव्य-भक्त असणार त्यांच्यापैकीं किती जणांत इंग्रजी कवितांचीं, मराठींत थोडींबहुत अपरिचित वाटणारीं रूपांतरें वाचायला लागणारी आशावादी सहिष्णुता असणार? काव्यप्रांतांत एकमेकांनीं सहानुभूतिपूर्वक होईल तें कार्य करण्याचा तो काळ होता. प्रतिष्ठेसाठीं चुरशीचे सामने करण्याची वेळ मागाहून यावयाची होती. मनोरंजन, करमणूक वगैरे ठिकाणीं वेळोवेळीं प्रसिद्ध झालेली केशवसुतांची कविता कोणी एकत्र करून प्रसिद्ध कां करीत नाहीं अशी काळजी रसिक कवींना केशवसुतांच्या हयातींतच लागून राहिली होती. १९०२ च्या मासिक मनोरंजनाच्या नोवेंबरच्या अंकांत 'कोणीतरी' या सहीनें प्रसिद्ध झालेल्या आपल्या कवितेंत रहाळकर म्हणतातः

* "You can guess my state of mind from my piece in the last issue of Manoranjan (हरपलें श्रेय). A crack in the heart! But alas! Where is the restorative?"

"रत्नें सोज्ज्वल मोलवान पडलीं येथें तिथें हीं अशीं,
त्यांचा हार न गुंफण्या रसिकता आम्हांत येई कशी !"

केशवसुतांची कविता आरंभीं आरंभीं 'कुणी तरी' 'एक मित्र' 'जगन्मित्र' अशा कांहीं तरी टोपण नांवानें प्रसिद्ध होत असे. त्यांना 'केशवसुत' हें टोपण नांव 'काव्यरत्नावली'कार नारायण नृसिंह फडणीस यांनीं दिलें व केशवसुतांना तें युक्त वाटून त्यांनीं तें प्रचारांत आणिलें. प्रो. नारायण केशव बेहरे यांनीं 'केशवसुत' या नांवानें टिळकांच्या मृत्यूनंतर स्वतःचें एक काव्य प्रसिद्ध केलें ! दोघां कवींच्या कृतींत जमीनअस्मानाचें अंतर असलें व तें स्पष्ट असलें तरी हा टोपण नांवाचा अपहार स्तुत्य वाटत नाहीं.

१९०५ सालीं केशवसुत वारले. त्यानंतर पांच–सहा वर्षांनीं गोविंदाग्रज हे मासिक मनोरंजनांतून धडाडीनें पुढें आले आणि तरुण महाराष्ट्रावर त्यांनीं आपली छाप ताबडतोब बसविली. त्यांनीं स्वतःस केशवसुतांचा सच्चा चेला जाहीर रीतीनें म्हणवून घेतलें आणि केशवसुतांचा संप्रदाय स्थापित झाल्याची द्वाही पुकारली. या कार्यास बालकवि ठोमरे, रेंदाळकर व टिळक यांनीं आपआपल्या परीनें हातभार लाविला. टिळक, गोविंदाग्रज, बालकवि व रा. के. म. सोनाळकर वगैरे मंडळींनीं 'तुतारी मंडळ' काढून प्रत्येक कविता प्रसिद्ध करितांना नांवापुढें 'तुतारी मंडळ' हे शब्द घालायचे ठरविले होते. अशा रीतीनें केशवसुतांचें नांव दुमदुमूं लागलें; जिज्ञासूंची संख्या हळूहळू वाढूं लागली, पण त्यांची गैरसोय टळेना. अखेर १९१७ सालीं 'केशवसुत यांची कविता' हें पुस्तक 'पण लक्षांत कोण घेतो ?'चे कर्ते हरि नारायण आपटे यांनीं प्रसिद्ध केलें; पण त्यांच्या हातून कवीच्या चरित्राविषयीं अथवा कवितेच्या गुणावगुणाविषयीं एक अक्षरही लिहिलें गेलें नाहीं. या पुस्तकाची वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं आत्यंतिक प्रशंसा केली आणि त्या पुस्तकास डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें भरींव पारितोषिक दिलें. १९१९ सालीं ७ नोवेम्बर रोजीं केशवसुतांचा स्मृतिदिन वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्या प्रोत्साहनानें पुण्यास प्रथम साजरा झाला. आणि व्याख्यानांतून ते तरुण पिढीपुढें केशवसुतांची तरफदारी करण्याची संधि वायां घालवीत नसत. सीतारामपंत दामले यांनीं १९२१ सालच्या जून महिन्यांत जी दुसरी वाढविलेली आवृत्ति काढली तिच्या प्रस्तावनेंत त्यांनीं कवीचें 'त्रोटक चरित्र' आणि तेंही कसेंबसेंच दिलें. आश्चर्यकारक गोष्ट ही कीं गृहविषयक

माहिती बंधूनें लिहिलेल्या चरित्रापेक्षां रहाळकरांनीं म्हणजे मित्रानें लिहिलेल्या निबंधांत अधिक आढळते ! १९२७ सालीं तिसरी आवृत्ति सीतारामपंतांनींच काढिली, पण संपादकानें जे परिश्रम घ्यायला पाहिजेत ते त्यांनीं मुळींच घेतलेले दिसत नाहींत. दुर्दैवानें मराठी कवींना नालायक वा निष्काळजीच संपादक भेटतात असें दिसतें. परंतु रा. शंकर काशीनाथ गग यांनीं मात्र एकांतिक भक्तीनें परिश्रमपूर्वक विविध माहिती मिळवून महत्त्वाचीं टाचणें प्रसिद्ध केलीं आहेत. केशवसुतांच्या कवितेचें परीक्षण पांडुरंग दामोदर गुणे, बाळकृष्ण अनंत भिडे, प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे, रा. नारायण महादेव भिडे, रा. नरहर शंकर रहाळकर, प्रि. रा. प. सवनीस, प्रो. रा. कृ. लागू, प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे, रा. ग. त्र्यं. माडखोलकर, रा. ए. या. निफाडकर, रा. वि. स. खांडेकर, रा. श्रीधर विनायक वर्तक, रा. माधव गोविंद भिडे वगैरे अनेक विद्वान् रसिकांनीं केलें आहे. किरकोळ बाबतींत मतभेद झाला तरी राजवाडे यांनीं केलेलें परीक्षण हेंच त्यांतल्यात्यांत अधिक समतोल, चिकित्सक व विश्वसनीय आहे. केशवसुतांच्यावर नवीन कांहीं लिहिण्यासारखें आतां राहिलें नाहीं असें मात्र नाहीं. केशवसुतांच्या पश्चात् त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव अतोनात होत होत आतां प्रतिक्रियेला सुरवात झालेली दिसते. अदमासें १२ वर्षांपूर्वीं रा. माधव गोविंद भिडे यांनीं पुणें येथील एका साप्ताहिकांत ( राष्ट्रहितैषींत ) विरुद्ध परिक्षण केलें होतें. पण फारच थोड्या लोकांच्या तें लक्षांत आहे. अलीकडे मनोरंजनांतून केशवसुतांच्या विरुद्ध प्रो. वासुदेव कृष्ण ताटके यांनीं जी टीका केली आहे ती जरी ठांसून केलेली असली तरी तितकी सप्रमाण व साधार नाहीं.

केशवसुत हें नांव उच्चारल्याबरोबर ‘ तुतारीं ’तील तो उद्बोधक, उद्दीपक, कठोर पण अत्यंत कळकळीचा असा प्रगतिवादी उपदेश, ‘ झपूर्झा ’मधील ती गोड गूढ कांहींतरी शून्यलब्धि, ‘ स्फूर्ति ’मधील ती उन्मत्त आत्मविश्वासाची बंडखोर उमेद, ‘ वातचक्र ’ या कवितेंतील ती जगद्द्रुमाच्या जीर्ण पर्णांची गिरक्या घेत घेत वर जाऊन सच्चिदानंदांत लीन होण्याची अखेरची आशा, ‘ आम्ही कोण ’मधील ती दुर्दम्य पण काव्यमय आत्मश्लाघा, ‘ म्हातारी ’वर केलेले ते क्लिष्ट पण उदात्त आरोप, ‘ घुबडा ’च्या हुंकारांतील ती भीषण व निश्चल निराशा, ‘ हरपलें श्रेय ’ म्हणून लागून राहिलेली ती जीवघेणी तळमळ इत्यादि अनेक गोष्टी मनांत उभ्या रहातात; आणि आपला संबंध, फुरसतीच्या वेळीं करमणूक

म्हणून गणमात्रा जुळणाऱ्या हौशी पद्यकाराशीं नव्हे तर, विक्षिप्त पण उत्कट, अनुकरण करणारा पण तें मनापासून केवळ आत्मसंतोषासाठीं करणारा अशा कवीशीं आला आहे असें वाटतें. गोविंदाग्रजांच्या पूर्वी कोणत्याही कवीच्या इतक्या कविता इतक्या विविध व परिणामकारक वाटल्या नाहींत. तेव्हां आधुनिक मराठी कवींत केशवसुतांस अग्रेसरत्वाचा मान मिळाला हें स्वाभाविक व योग्यच झालें.

संस्कृत आदर्शभूत काव्यांच्या परिचयामुळें त्या तऱ्हेची प्रौढ सालंकृत रचना मराठींत करावी अशी इच्छा अव्वल इंग्रजींतील शास्त्रीकवींस स्वाभाविकपणेंच झाली. इंग्रजी काव्याच्या परिचयामुळेंही पाश्चात्य धर्तीची त्रुटित भावगीतरचना मराठींत करावी अशी इच्छा नवीन आंग्लविद्याविभूषित स्वभाषाभिमानी रसिक पंडितांना होणें हें तितकेंच नैसर्गिक व अपरिहार्य होतें. भाषांतरित, रूपांतरित व अनुकरणात्मक कवितांचा जन्म या कुतूहलजन्य सदिच्छेपासूनच होतो. अमूक एक गोष्ट कुतूहलजनक व इष्ट वाटणें आणि तिचें वेड लागून ती जीवितास अत्यवश्य वाटणें यांत अंतर आहे. पहिल्या भावनेपासून कौतुकास्पद तडजोडीची, एकदम डोळ्यांवर न येणारी अशी कविता उत्पन्न होते; दुसऱ्या भावनेपासून विशिष्ट, विक्षिप्तही म्हणा, पण हृदयाला भिडून धक्के देणारी जिव्हाळ्याची कविता निर्माण होते. भाषांतरित कविता ही जिव्हाळ्याची होऊंच शकत नाहीं असें नाहीं. भाषांतरकार जर समानधर्मा व भाषाप्रभु असेल आणि भाषांतराला प्रेरणा ही विचारांच्या व भावनांच्या आत्मीयतेपासूनच झाली असेल तर भाषांतरांत जिव्हाळा, चैतन्य उतरल्याखेरीज रहाणार नाहीं. केशवसुतांच्या कवितेंत भाषांतरित, रूपांतरित व स्वतंत्र असे तिन्ही प्रकार आहेत. पण इंग्रजी काव्यांच्या वाचनानें स्फूर्ति होऊन त्या वळणाची रचना करणारे जे कवि झाले त्या सर्वांच्यापेक्षां केशवसुतांत जिव्हाळा अधिक प्रतीत होतो. म्हणूनच त्यांना अग्रेसर मानण्यांत येतें. इंग्रजी धर्तीची कविता रचणाऱ्यांत व जात्यात्मक पद्यरचना करणारांतही वस्तुतः ते पहिले नव्हत. इंग्रजी भावगीतांचीं रसाळ रूपांतरें विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं पूर्वींच प्रसिद्ध केलीं होतीं. शिवाय इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर इंग्रजी काव्याशीं वाढता परिचय होत गेल्याकारणानें केशवसुतांच्या कवितेपासून स्फूर्ति घेण्याची आवश्यकताच नव्या पिढीला नव्हती. बालकवि, टिळक, गोविंदाग्रज, रेंदाळकर वगैरे कवींनीं सुधारणेचीं वाद्यें वाजविणें,

गूढगुंजनांत भ्रमणें इत्यादि बाबतींत केशवसुतांचें अनुकरण केलें आहे हें खरें; पण अशा रीतीनें स्थापन झालेला संप्रदाय कृत्रिम असल्यामुळें तो महत्त्वाचा वाटत नाहीं. तेवढे प्रकार वगळल्यास केशवसुतांच्या कवितेनें काळाच्या ओघाबरोबर एरव्हीं घडून आलीच नसती अशी कोणतीही क्रांति घडवून आणिलेली दिसत नाहीं.

केशवसुतांची कविता विपुल नाहीं. त्यांचा काव्यरचनाकाल (१८८५–१९०५) वीस वर्षांचा असून तिसऱ्या आवृत्तींत त्यांचे एकूण १३२ चुटके प्रसिद्ध आहेत; आणखी २।३ अप्रसिद्ध असतील. एकंदर अदमासें १३५ चुटक्यांपैकीं १७ भाषांतरित आहेत. आणखीही ४–५ भाषांतरित असावेत अशी शंका येते. संस्कृतांतून 'खिडकीकडे मौज पहावयास' (पृ. १) 'किरातार्जुनीय सर्ग १ ला' आणि 'खाणावळींतील घृतधारा' (पृ. १०३) हे तीनच चुटके भाषांतरिलेले दिसतात. "संस्कृत कवींचीं भाषांतरें फारच साधारण झालीं आहेत." असें प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे म्हणतात. इंग्रजींतून केलेलीं भाषांतरेंही उत्तम साधलेलीं नाहींत. केशवसुतांनीं सर्व भाषान्तरित कवितांच्यावर मूळाचा उल्लेख दिला आहे असें नाहीं, त्यामुळें कांहीं कविता स्वतन्त्र असून भाषान्तरित तर कांहीं भाषान्तरित असून स्वतन्त्र समजल्या जाण्याची भीति आहे. उदाहरणार्थ, 'जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें ?' (पृ. ४७) व 'अहा पक्षी हे चित्र पङ्ख यांचे !' (पृ. ३९) या कविता म्हणजे अनुक्रमें एलिझाबेथ बॅरेट ब्राउनिंगकृत Work व Toru Dutt कृत A sheaf gleaned in French fields मधील Theophile Gautier चें The butterflies as white as snow या कवितांचीं भाषांतरें आहेत, ही गोष्ट रा. माधव गोविंद भिडे यांनीं उघडकीस आणिली आहे. "मुळामुठेच्या तीरावर" हें स्कॉटच्या Jocko Hazeldean चें वाढवून बिघडविलेलें रूपांतर आहे. हें १८८७ सालचें आहे. 'सृष्टि आणि कवि' (पृ. १९४) आणि 'तिनें जातां चुंबिलें असे यातें' (पृ. १२१) हीं दोन भाषांतरें चांगलीं साधलीं आहेत. 'दंवाचे थेंब' (पृ. १८७) या कवितेला स्फूर्ति J. E. Carpenter कृत The Child and the dew drops या कवितेपासून मिळाली असावी; ही मूळाहून चांगली उतरली आहे पण एकंदरीनें ती तितकी हृदयस्पर्शी वाटत नाहीं. परंतु Victor Hugo च्या

Napoleon le petit च्या Toru Dutt नें केलेल्या रूपांतरावरून सुचविलेली 'दोन बाजी' ही कविता पूर्णपणें यशस्वी ठरली आहे; 'घुवड' (पृ. १५२) ही कविता तर पोच्या Raven हून इतकी सरस व परिणामकारक उतरली आहे कीं, तिचा उत्कृष्ट व स्वतंत्र भावगीतांत समावेश करायला कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं. प्रो. राजवाडे म्हणतात कीं, "कवीची काव्यकला उत्तम तऱ्हेनें येथें दृष्टीस पडते" पण येथें स्फूर्तीपेक्षां बुद्धीचीच कामगिरी जास्त आहे हें त्यांचें विधान मात्र पटत नाहीं. एकंदरीनें विचार करितां केशवसुतांची भाषांतरित कामगिरी यशस्वी वाटत नाहीं. भाषांतराचें काम हें मूलतःच, स्वैरचारी बलाढ्य राजा आणि जागरूक बहुसंख्य प्रजा या दोघांनाही संतुष्ट ठेवण्याच्या प्रयत्नाइतकें दुर्घट व अपेशी आहे. अगोदर तें मूळाइतकें सरस, सुबोध व तंतोतंत उतरणें म्हणजे किती कठिण कार्य, आणि क्वचित् तें तसें उतरलें तरी साधारण चांगल्या स्वतंत्र कवितेइतकेंही श्रेय त्या भाषांतराला मिळत नाहीं.

ज्या सुमारें १२० चुटक्यांना स्वतंत्र म्हणतां येईल त्यांच्यापैकीं २० कवितांचा विषय कविता आणि कवि हा आहे. शिवाय ५-६ कविता प्रच्छन्नपणें कवितासुंदरीसच उद्देशून आहेत. आणखीही १०-१२ कवितांतून गौणपणें पण याच विषयाचे उल्लेख आहेत. या वर्गांतील बहुतेक कविता सरस आहेत. पण कवीस सृष्टींतील विविध विषयांनीं स्फूर्ति होऊन त्यानें काव्यें रचावींत हें स्वाभाविक होय; त्यानें कविता आणि कवि याच विषयावर पद्यें रचीत बसावें हें चमत्कारिक वाटतें. आपल्या कवित्वाची मधून मधून अशी सारखी जाणीव होत रहाणें हें एक रोगटपणाचें लक्षण आहे. निरोगी मनुष्याला आपण निरोगी आहों, आपलें शरीर निकोप व सुदृढ आहे याची जाणीव क्वचितच होते. विस्मृतींत एक प्रकारची निरामयता आहे. आत्मसौंदर्याच्या जाणीवेनें वागण्यांत क्वचित् चटकदार ठसक येईल; पण त्या जाणीवेनें सारखें झपाटलें तर सौंदर्याचीच अवर्णनीय अशी जी बुजरी छटा असते ती नाहींशी होण्यास उशीर लागणार नाहीं.

कवि आणि कविता यांचा गौरव स्पष्ट व अत्युक्तिपूर्ण भाषेनें केशवसुतांनीं जितका केला आहे तितका आधुनिक मराठी कवितेंत इतर कोणीही केलेला नाहीं. गीतें गात व एक अद्भुत वस्त्र विणीत एका दुर्गम भूशिरावर बसलेल्या देवी कल्पकतेचें त्यांनीं केलेलें वर्णन उद्धृत करण्यास योग्य आहे.

"होते शोधक नेत्र, कर्णहि तिचे ते तीक्ष्ण भारी तसे,
होतें भाल विशाल, देवगुरुनें पूजा करावी असें.
सूर्याचीं शशिचीं सुरम्य किरणें घेऊनि देवी सुधी
होती गोंवित इन्द्रचापहि तसें त्या दिव्य वस्त्रामधी,
मेघांच्याहि छटा, तशीच कुटिला विद्युत्, तसे ते ध्वनी
लाटा, पाउस, पक्षि, ते धबधबे–यांतें पटीं ती विणी;
तारांचें पडणें तसें भटकणें केतुग्रहांचें पहा,
सारें सुन्दर भव्य घेवुनि तिनें तें वस्त्र केलें अहा !
आली भू कुतुकें तिथें, तिस तिनें तें वस्त्र लेवीवलें,
तों त्या वृद्ध वसुन्धरेवर पहा ! तारुण्य ओथंबलें;
भूदेवी मग हृष्ट होउनि मनीं नाचावया लागली,
'आतां स्वर्ग मला स्वयेंच वरण्या येईल !' हें बोलली."

(पृ. ७८)

'प्रतिभा' (पृ. १७८) या सुनीतांत ती अत्यद्भुत गूढ शक्ति हृदयांत संचरल्यावर मुक्तात्म्याचें होणारें उड्डाण पाहून इंद्राश्व कसा बिथरतो, दैत्यबलाबरोबरच देव-सत्त्वही अंगीं कसें चढतें, विराट पुरुषाकडून सायुज्यतेची कशी प्राप्ति होते, हृदयांतील दिव्य हिरण्मय मंडलाच्या अरांवर देव आपलीं जुनीं शस्त्रें कशीं पाजळतात, दुरून मोह पावून धावून येणारे दानव कसे पतंगाप्रमाणें जळून मरतात, ब्रह्मांडाचा पिंडांत विलय होऊन नादब्रह्म उचंबळून दाही दिशांना कसें व्यापून टाकितें, आणि त्याच्यांतून निघणाऱ्या भविष्यवाणीनें नवीन रचना करण्याचें सामर्थ्य ब्रह्मयाला कसें लाभतें इत्यादि गोष्टींचें रेखीव व अस्खलित भाषेंत अत्युक्तिपूर्ण वर्णन आहे. या कवितेंतील रचनासौष्ठव खरोखरीच आश्चर्यकारक व आल्हादजनक आहे; इतकेंच नव्हे तर सुनीतांत रचना कशी भरगच्च असावी त्याचा येथें उत्कृष्ट आदर्श पहायला मिळतो. ही कारागिरी उत्कृष्ट आहे खरी पण या कवितेंतील भाव पटत नाहीं आणि हृदय अचल राहतें. कवितेंतील भव्य दिव्य उल्लेखांमुळें आरंभीं आरंभीं उदात्ततेचा भास होतो, पण अत्युक्तीचा, क्लिष्टतेचा, कृत्रिमतेचा संशय आल्याबरोबर तो भास, उदात्त भावरसाचा नव्हे, तर बुद्धि-मरीचिकेचा ठरतो.

'आम्ही कोण?' (पृ. १५१) 'कवि' (पृ. ८०) 'धूमकेतु आणि महाकवि' (पृ. ११७) इत्यादि कविस्तोत्रांत असाच भाषासौष्ठव व अत्युक्ति यांचा केवळ कुतूहलजनक मिलाफ आहे. कवि देवाचे लाडके आहेत; जग हें त्यांचें क्रीडांगण आहे; त्यांची दृष्टी धोंड्यांमधूनच काय, दिक्कालांतूनही आरपार पाहूं शकते; त्यांच्या हस्तस्पर्शानेंच सौंदर्य येतें, शून्यांत सुरांच्या वसाहती वसवून तेच पृथ्वीचा स्वर्ग करायला झटतात; मांगल्याचे, अमृताचे निधि तेच होत; त्यांना वगळल्यास तारांगणें गतप्रभ होतील आणि हें जिणें कवडी मोलानें विकेल इत्यादि अत्युक्तींत क्षणैक डोळ्यांना दिपवील असें वाग्वैभव खास आहे. पण हृदयांत जाऊन ठसणारें व प्रतीतीचा आनंद देणारें सत्य नाहीं. भावनेच्या भाषेंत, सहज सुचणाऱ्या रूपकादि अलंकारांत कांहीं अत्युक्ति ही स्वाभाविकपणेंच येते आणि ती उत्कर्षकच होते; परंतु अचाट क्लिष्ट अत्युक्ति ही किती जरी आश्चर्यकारक वाटली तरी ती हृदयंगम होऊं शकत नाहीं. 'आम्ही कोण?' ही कविता अगदींच भावनाशून्य नाहीं. ती वाचीत असतांना क्षणैक कवीची उदंड आत्मश्रद्धा व आवेश हीं पटतात व म्हणूनच हें सुनीत उत्कृष्ट वाटतें. त्याच्या मानानें 'कवि' ही कविता साधारणच वाटते. तींत केशवसुत म्हणतात,

"राही तो तर देव भूमिवरती येतात हिंडावया
जातां, स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागिं धुंडावया" (पृ० ८०)

कवीचें वास्तव्य पृथ्वीवर असतांना मोह पावून देवांनीं पृथ्वीवर यावें हें युक्तच आहे; परंतु तो गेल्यावर, दिवंगत झाल्यावर म्हणजे स्वर्गाला त्याची प्राप्ति झाल्यावर स्वर्गानें कवीला धुंडायला पृथ्वीवर येण्याचें कारण काय? का, स्वर्गही नाहीं व पृथ्वीही नाहीं अशा एखाद्या लोकीं कवीला गमन करावें लागतें? तसें असतें तरीही स्वर्गाला पृथ्वीवर त्याला शोधायला येण्याचें प्रयोजन नाहीं. वस्तुतः कवि पृथ्वीवर असला कीं स्वर्ग तेथें येतो आणि तिघेंही दिव्य सुखाचा अनुभव घेतात. कवि अशरीर झाला कीं स्वर्ग त्याला घेऊन निघून जातो आणि बिचारी कलाहीन पृथ्वी शोकानें झुरत राहते असें कांहीं तरी युक्त वर्णन कवीनें करायला हवें होतें. 'धूमकेतु आणि महाकवि' (पृ. ११७) यांच्यांतील साम्य वर्णितांना केशवसुतांनीं धूमकेतूवर स्वैर भ्रमणाचा आरोप केला आहे. हा हल्लीं युक्त कसा वाटावा? धूमकेतूचें पुनरागमन केव्हां होईल हें बिनचूक सांगतां येतें, आणि त्याची कक्षा वर्तुलाकार नसली तरी ती अगदीं अनियमित

नसते. शिवाय धूमकेतूच्या पुनरागमनाचें भविष्य वर्तवितां येतें तसें महाकवीच्या अवताराचें वर्तवितां येतें काय? मुळींच नाहीं. महाकवि हा महाक्रांतिभविष्य-वादी असतोच असेंही नाहीं. एखाद्या सहज सुचलेल्या पण अंशतःच सत्य असलेल्या सादृश्य-कल्पनेचा कष्टानें व हट्टानें विस्तार करूं लागलें कीं जादू नाहींशी झालीच म्हणून समजावें.

केशवसुतांनीं एक दोन ठिकाणीं आपल्याकडे लघुत्व घेऊन जरी नम्रता व्यक्त केली असली तरी एकंदरीनें पहातां त्यांना आपल्या कवित्वाचा अभिमान होता असें दिसतें. 'वासुदेव बळवंत पटवर्धन यांस' (पृ. ५२) या कवितेंत केशवसुत म्हणतात,

" कविता करितां मला न येई
रचिले हे गण हो परंतु कांहीं."

तसेंच ज्या कवितेवर शेलीच्या skylark ची छाया आहे त्या 'भृंग' (पृ. ६३) कवितेंत ते म्हणतात,

" भृंगा आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन.
* *
कवि आम्हां लागुनि म्हणणें
कविशब्दार्थां लोळविणें "

'सृष्टि आणि कवि' (पृ. ६) या कवितेंतही हाच संकेत आढळतो.

" वयस्या, गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुर
कसा गाऊं तीच्या पुढति वद मी पामर नर ? "

खरोखर पाहिलें असतां केशवसुतांनीं केलेली कवीची गौरवस्तुति ही जितकी अवास्तव आहे तितकाच हा कमीपणाही अवास्तव आहे. वस्तुतः सृष्टि व कवि यांचें महत्त्व परस्परावलंबी आहे. असो; एरव्हीं ते कवीच्या स्वातंत्र्याची द्वाही पुकारून त्याच्या अलौकिक दिव्यत्वाचे पवाडे गातात.

" अशी असावी कविता फिरून
तशी नसावी कविता म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे ?—पुसतों तुम्हांला " (पृ. ७)

'काव्य कोणाचें ?' (पृ. १२३) या प्रश्नास ते उत्तर देतात,

"शारदेनें जो मंत्र दिला कानीं
तसें लिहिलें मी; काव्य तिचें मानीं."

कवीला तुमच्या लौकिक शिकवणुकीची जरूरी नाहीं:—

"डोळ्यांला बघण्या तसें शिकविणें कानांस ऐकावया
हें हास्यार्ह जसें तसें पढविणें शाहीर आहे तया" (पृ. ५२)

केशवसुतांना वाटे कीं, "आपल्या हृदयांत एक 'दिव्य ठिणगी' (A spark of Heavenly Fire) आहे, तेजाचे पंख हलवीत हवेंतून शारदेचा देव्हारा नेणाऱ्या शब्दपंक्तीनें आपली चित्तभूमि विकसित व हिरवी पाहून खालीं उतरून गौरवानें तेथें शारदेचा देव्हारा स्थापिला आहे." काव्याच्या हेतूविषयीं व कवीच्या कर्तव्याविषयीं ते म्हणतात,

"करूनिया काव्य जनांत आणणें
न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें;
करूनि तें दंग मनांत गुंगणें
तदीय हा सुंदर हेतु मी म्हणें" (पृ. ७)

म्हणजे पद्य रचणें नव्हे तर काव्यमय तल्लीनतेंत तरंगणें हीच कवीची इतिकर्तव्यता होय. या तल्लीनतेंत निर्जीवाची निर्जीवता नष्ट होते.

"अम्हां भ्रमिष्ट बाळकांस काव्यदेवतेच्यिा
जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया" (पृ. ६३)

कधींकधीं कर्तृत्वाच्या लहरी येऊन ते म्हणतात,

"पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे

* * *

टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देउं कसे!
कल्पनेची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं
उद्धरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेंकुनिया देऊं!" (पृ. ११९)

सृष्टीशीं तन्मय झाल्यानें 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्यभास' (पृ. १०१) दिसतात अशी केशवसुतांची श्रद्धा होती आणि त्यांना मोठी उमेद वाटे—

सं. ... थ्रीरॅग नं. ...

“ हा हा ! हे जर सर्व भास धरितां येतील मातें, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर !” (पृ. १०१)

केशवसुतांनीं कवित्वावर दिव्यत्वाचा आरोप केल्यामुळें ‘ झपूर्झा ’ या कवितेचा अर्थ लावतांना वाचकांची फार दिशाभूल झाली आहे. ‘ झपूर्झा ’ या अर्थशून्य शीर्षकाहून ‘ काव्यतंद्रेचा प्रभाव ’ हें नांव या कवितेस अधिक सार्थ झालें असतें. “ आपल्याला जें कांहीं नाहीं असें वाटतें, त्यांतूनच महात्मे कल्याणाच्या चीजा बाहेर काढितात. त्या महात्म्यांची स्थिति लक्षांत वागवून पुढील गाणें वाचल्यास तें दुर्बोध होऊं नये असें वाटतें ” अशी तीन ओळींची प्रस्तावना पुनर्मुद्रणाच्या वेळीं केशवसुतांनीं दिली तरी “ या कवितेचें रहस्य कळत नाहीं” अशी तक्रार प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांच्यासारख्या पंडित रसिकालाही करावी लागते. इतकेंच नव्हे तर ती प्रस्तावना त्यांना ‘ अप्रस्तुत,’ निरर्थक किंवा चुकीची ’ वाटते ! उलटपक्षीं आपल्या प्रस्तावनेंत सीतारामपंत दामले म्हणतात कीं, “ ‘ झपूर्झा ’ ही कविता सर्वसाधारण वाचकांच्या बुद्धीच्या टप्प्यापलीकडची असल्यामुळें पुष्कळांना तिच्यांतील स्वारस्य समजलें नाहीं तर त्यांत त्यांचा दोष नाहीं ! ” केशवसुतांचे कित्येक चहाते तर झपूर्झा या शब्दावरच फिदा झालेले दिसतात आणि तो शब्द त्यांना अनिर्वचनीय काव्यमय दिव्यत्वाचा महामंत्र वाटतो ! तेव्हां या कवितेचें विस्तारानें विवेचन करणें जरूर आहे.

‘ग्यानबा तुकाराम ! ’ हे शब्द वारकरी संप्रदायाचीं भजनें पाहिलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें भक्तितन्मयतेचे सूचक वाटतात त्याप्रमाणें ‘ झपूर्झा ’ हा शब्द मुलींची झिम्मा खेळतांना जी तल्लीनता होते तिचा सूचक होत नाहीं, कारण तो अपभ्रष्ट आहे. मग ‘ काय म्हणावें या स्थितिला ? ’ तन्मयता म्हणायला हरकत कोणती ? मुली झिम्मा खेळतांना ‘ जा पोरी जा ! ’ असें म्हणतच नाहींत; तर त्या ‘ झिम् पोरी झिम् ’ म्हणतात ! असो.

“ हर्ष खेद ते मावळले
हास्य निमालें
अश्रु पळाले,
कंटकशल्यें बोथटलीं,

मखमालीची लव वठली
काहीं न दिसे सृष्टीला,
प्रकाश गेला,
तिमिर हरपला,
काय म्हणावें या स्थितिला ?—
झपूर्झा गडे झपूर्झा !"

हें तन्मयतेच्या स्थितीचें वर्णन आहे; पण कोणत्या तन्मयतेचें ? मन एखाद्या ठिकाणीं एकाग्र, केंद्रीभूत झालें कीं त्या वेळेपुरता बाह्य उपाधींचा विसर पडतो. हर्षाची वा खेदाची, प्रकाशाची वा तिमिराची, कशाचीच जाणीव नसते. या स्थितींत देहांत कंटकशल्यें घुसूं शकत नाहींत व तीं बोथटतात असें नव्हे तर तीं घुसल्यास त्यांची जाणीव होत नाहीं; त्याचप्रमाणें मख्मलीची लव अंगावर वठते असेंही नाहीं तर तिच्या सुखकर मृदुतेची जाणीव होत नाहीं. इकडे कंटकशल्यें बोथटतात तर तिकडे मख्मलीची लव वठते हें वर्णन, वज्राहून कठोर पण कुसुमाहून मृदु या वर्णनाप्रमाणें परस्परविरोधी व चमत्कृतिजनक वाटतें. परंतु येथें 'दुःखेष्वनुद्विग्नमनः सुखेषु विगत स्पृहः' अशा लोकोत्तर, द्वंद्वातीत, स्थितप्रज्ञाची स्थिति अभिप्रेत आहे, का केवळ तन्मयतेची, एकाग्रतेची स्थिति अभिप्रेत आहे !

"समाधीमध्यें प्राप्त होणाऱ्या ब्रह्मानंदाचा जवळजवळ अनुभव शब्दामध्यें सांगण्याचा प्रयत्न 'झपूर्झा' या गूढ काव्यामध्यें केलेला आहे." असें आपल्या प्रस्तावनेंत ( पृ. ३६ ) सीतारामपंत दामले म्हणतात. अशीच समजूत इतर विद्वानांचीच नव्हे तर कवींचीही झालेली असावी. हा गैरसमज होण्यास, कवीची विश्वव्यापी अत्युक्ति आणि अध्यात्मवादांतील परिभाषेचा दुरुपयोग हीं दोन कारणें आहेत. आतां कवितेंत थोडी अत्युक्ति ही अत्यंत स्वाभाविक व अपरिहार्य असते. मनुष्याला फार आनंद झाला कीं स्वाभाविकपणेंच तो ब्रह्मानंद झाला असें म्हणतो; मग त्याला खऱ्या ब्रह्मानंदाची ओळख का नसेना ! 'ब्रह्मानंद' या शब्दाचा उपयोग तो आपल्या आनंदाला उदात्तता व दिव्यता आणण्यासाठीं सहेतुकपणें करीत नाहीं, आणि लोकही त्याचा, समाधींतील दिव्य आनंद असा अर्थ करीत नाहींत. ब्रह्मानंद या शब्दाचा अर्थ नेहमींच्या भाषेंत अत्यानंद

इतकाच आहे. परंतु कवि जेव्हां एरव्हींच्या बोलींत न येणाऱ्या अध्यात्मवादांतील परिभाषेचा उपयोग करितो, तेव्हां वाचक पूर्णार्थानें त्या शब्दाकडे पहायला लागतात आणि त्यांची दिशाभूल होते. बान्धावरील एका झुडुपाचें सुरेख फूल पाहून केशवसुत 'मुदित' झाले, क्षणैक त्यांचें देहभान हरपलेंही असेल. इतकी अत्युक्ति चालेल, पण जेव्हां ते त्या अवस्थेला 'उन्मनी' म्हणतात तेव्हां भलत्याच अर्थाचा आरोप होऊन वाचकाची व कवीचीही वंचना होते. प्रतिभेच्चें स्फुरण तें काय, पण त्याचें वर्णन जेव्हां केशवसुत पुढीलप्रमाणें करितातः—

> " ती अत्यद्भुत गूढ शक्ति सहसा संचारतां अंतरीं
> सायुज्यत्व विराटपुरुष अहा देतो स्वयें लौकरी!
> पिंडीं जाय विलोपुनी विरुनियां ब्रह्मांड हें सत्वर
> शब्दब्रह्म उचंबळून मग तें दाही दिशा व्यापितें,
> ज्यांच्यांतून भविष्य-वाद निघती ऐकून ते सादर
> ब्रम्ह्यातें क्षमता नवीन रचना कार्यक्रमीं लाभते!" (पृ. १७९)

तेव्हां काव्यतंद्रेंतील सुख म्हणजे समाधींतील ब्रह्मानंद असा गैरसमज कवितेंतील दिव्य, भव्य उल्लेखांमुळें सहजच होतो. वस्तुतः 'झपूर्झा'च्या पहिल्या कडव्यांत वर्णिलेली स्थिति समाधिस्थितीची नसून केवळ काव्यतंद्रेची आहे.

शेली, वर्ड्स्वर्थ यांच्या कांहीं कविता वाचून केशवसुतांची अशी समजूत झाली होती कीं सृष्टीची म्हणून एक स्वतंत्र देवता (Spirit of Nature) आहे. सर्वगत चिरंतन तत्त्वही तीच. काव्यदेवता, प्रतिभा ही तीच होय. तिचा व्यावहारिक प्रपंचाशीं एक प्रकारचा विरोध आहे. ती 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' (पृ. १०१) दाखविते, त्या रूपद्युतीनें नयनें दिपून निर्वाणीचें सुख होतें. पण आकाची, जगाची हांक ऐकून आत्मा घराकडे वळतांच त्तय दिव्य साक्षीची विस्मृति होते. त्या सृष्टिदेवतेशीं तादात्म्य झालें कीं कविता स्फुरते व व्यर्थीं अधिकच अर्थ दिसूं लागतो. 'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे!' (पृ. १७८).

'भृङ्ग' या कवितेंत केशवसुत म्हणतात—

> " परंतु भृङ्गा, तव गान
> परमानन्दें परिपूर्ण!

उदासीन ही जगाविशीं
तव तन्मयता सृष्टीशीं ”

व्यवहारांतील सुखदुःखांत जे ( सदैव ) गुरफटलेले आहेत त्यांना या तन्मयतेचें, व त्या तन्मयतेंत स्फुरणाऱ्या ‘गुङ् गुङ् गुङ् गुङ–भान नसे’ या तऱ्हेच्या कवित्वाचें रहस्य काय समजणार ?

“ हर्ष शोक हे ज्यां सगळे,
त्यां काय कळे ?
त्यां काय वळे ?
हंसतिल जरि ते आम्हांला,
भय न धरूं हें वदण्यालाः—
व्यर्थी अधिकचं अर्थ असे
तो त्यांस दिसे
ज्या म्हणति पिसे.
त्या अर्थाचे बोल कसे ?—
झपूर्झा गडे झपूर्झा ! ”   २

व्यवहारी लोकांना ज्या गोष्टी सामान्य, साध्या, व्यर्थ व उपेक्षणीय वाटतात त्यांत खरोखर किती मोठा अर्थ असतो ! पण तो ज्यांना दिसतो त्यांना हे व्यावहारिक शाहाणे वेड्यांत काढतात आणि त्यांच्या उद्गारास निरर्थक शब्दावडंबर समजतात. परंतु हे उद्गार कशाचे पडसाद असतात ?

“ ज्ञाताच्या कुंपणावरून्
धीरत्व धरून्
उड्डाण करून्
चिद्घन चपला ही जाते,
नाचत तेथें चकचकते,
अंधुक आकृति तिस दिसती,
त्या गाताती
निगूढ गीती;
त्या गीतीचे ध्वनि निघती—
झपूर्झा गडे झपूर्झा ! ”   ३

या कडव्यांत केशवसुतांनीं आपला काव्योत्पत्तीसंबंधीं सिद्धांत मांडला आहे.

मोठमोठ्या शास्त्रज्ञांना त्यांच्या शोधाचें आकलन न झाल्याकारणानें त्यांच्या समकालीन पंडितांनीं वेड्यांत काढल्याचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत. ज्या विचारप्रणालिकेंत त्यांना मध्येंच आश्चर्यकारक शोध लागले, त्या विचार-प्रणालिकेला चालना अगदीं क्षुद्र व सामान्य गोष्टीपासूनसुद्धां मिळालेली आहे. झाडावरून फळ पडतांना कोणी पाहिलें नाहीं? पण न्यूटनच्या विचारशक्तीला त्या दृश्यानें अशी चालना दिली कीं अखेर अचानक त्याला गुरुत्वाकर्षणाची कल्पना सुचली! जें पूर्वी अज्ञात होतें तें ज्ञात झालें. हा शोध कसा लागला असेल? अमूक एका वाटेनें गेलें म्हणजे वाटेनें अमूक अमूक स्थळें हीं कोणा-लाही हटकून लागतातच; त्याप्रमाणें निगमनपद्धतीनें (Deductive reasoning) विचार करीत असतांना अपरिहार्यपणें हा शोध लागला काय? ज्यावेळीं हा शोध लागला त्यावेळीं न्यूटनच्या मनाची एकाग्रता असेलच; पण एकाग्रतेनें विचार करीत असतांना एकदम मध्येंच सुचणाऱ्या या कल्पना मन एकाग्र केल्यानें कोणासही आणि केव्हांही सुचतील काय? एकाग्रता ही एक अशी जादूची दुर्बीण आहे काय कीं जिचें एक टोंक अदृश्य, अज्ञात अशा सृष्टीकडे रोखलेलें असून दुसरें टोंक मनुष्याच्या मनःचक्षूंस लावितां येतें, आणि तें तसें लागल्याबरोबर सारें अज्ञात ज्ञात होऊन जातें? गुरूनें कोणत्याही शिष्याच्या शिरावर आपला वरदहस्त ठेविला कीं हटकून त्या शिष्याला ताब-डतोब दिव्य दृष्टि प्राप्त होऊन एका क्षणांत अखिल ब्रह्मांडाचें त्रिकालज्ञान होतें, असें गूढ विद्येचे भगत सांगतात, तसा कांहीं चमत्कार या तन्मयतेच्या दुर्बिणीनें होतो काय? साध्या दुर्बीणीनें दृष्टीचा पल्ला वाढतो; ही वाढ कितीही मोठी व आश्चर्यकारक असली तरी अनंताचा ठाव घेण्यास ती अपुरी पडते. न्यूटनसारख्या प्रतिभावान् शास्त्रज्ञालासुद्धां मर्यादितच शोध लावितां येतात; पण केशवसुत म्हणतात कीं "दिक्कालांतुन आरपार अमुची दृष्टी पहाया शके!" न्यूटनी प्रति-भेच्या कवीला सहज सुचलेल्या कल्पना शास्त्रज्ञाला मार्गदर्शक होऊं शकतात, नाहीं असें नाहीं, पण असें किती वेळां घडतें? आणि हें किती कवींच्या विषयीं म्हणतां येईल? अज्ञाताचीच अशी पृथक् सृष्टि असती आणि तन्मयतेच्या दुर्बी-णींतून ती एकदम गोचर होऊं शकली असती तर वैदिक सूक्तकारानेंच सारें

अज्ञात ज्ञात करून टाकिलें असतें; आणि आर्यभट्टापासून आइन्स्टाइनपर्यंत होऊन गेलेल्या शास्त्रज्ञांना करायला कांहींच कार्य उरलें नसतें.

न्यूटनसारख्या शोधक शास्त्रज्ञांच्या ठिकाणीं असणाऱ्या प्रतिभेप्रमाणेंच कवीची प्रतिभा ही एक निसर्गदत्त देणगी आहे; व कवीच्या प्रतिभेचें स्फुरण हें कांहीं अंशीं न्यूटनसारख्या शास्त्रज्ञांच्या प्रतिभेच्या स्फुरणासारखेंच गूढ असतें. योग्य ज्ञानाच्या अभावीं इतर चमत्कारांप्रमाणें या चमत्काराचाही संबंध दैवी शक्तीशीं जोडण्यांत येतो. तसें करण्यांत आपल्याकडे एक प्रकारचें महत्त्व, दिव्यत्व येतें म्हणून कवीही या दैवी संबंधास मान्यता देतांना दिसतात. प्रेषित हे ज्याप्रमाणें आपल्या बोलास ईश्वरी बोल समजतात त्याचप्रमाणें कवी हे आपल्या कवनांना ईश्वरी निःश्वसितें, अन्तःसाक्षात्काराचे उद्गार समजतात! अनंताचा ठाव घेण्याचें सामर्थ्य आइन्स्टाइनसारख्या शास्त्रज्ञांत नसेल, कँटसारख्या तत्वज्ञांत नसेल पण तें आपल्या ठिकाणीं आहे अशी कांहीं कवींची–गण-मात्रा जुळविणाऱ्यांचीही—समजूत असते. चिद्घनचपला म्हणजे प्रतिभा ही ज्ञाताच्या कुंपणावरून उड्डाण करून, अज्ञाताच्या प्रांतांत शिरून, स्वतःच्या चकचकाटानें त्या प्रांतास प्रकाशित करिते. तेथें तिला अंधुक आकृति निगूढ गीति गातांना दिसतात; आणि, चालू असलेल्या फोनोयंत्रांतील ध्वनिलेखाच्या तबकडीवर ध्वन्युच्चारक डबीची टांचणी टेंकिली कीं जसें तें पूर्वीचें निःशब्द संगीत सशब्द व अखिल मानवजातीस श्रुतिगोचर होतें त्याप्रमाणें तन्मयतेच्या स्थितींत अज्ञातांतील अंधुक आकृतींच्या निगूढ गीती कवीला ऐकूं येऊं लागल्या कीं त्या काव्यरूपानें बाहेर पडून बहुजनसमाजास गम्य होऊं लागतात. निराळ्या शब्दांनीं सांगायचें म्हणजे कवि हा निर्माण कांहींच करीत नाहीं. दूरस्थ वास्तवास दृग्गोचर करण्याचें दुर्बिण हें जसें एक साधन आहे, तसें तल्लीनता पावून अज्ञात वास्तवास गोचर करणारें कविमन हें एक आश्चर्यकारक साधन आहे.

आतां शास्त्रज्ञाला सुचलेली कल्पना ही जरी त्याला गूढ अशा अंतःस्फूर्तीनें सुचली असली तरी इंद्रियगोचर अशा प्रयोगांतीं त्याची खातरी होईपर्यंत तो तिच्यावर विश्वास टाकीत नाहीं; स्वतःची खातरी करून घेतल्यावर तो इतरांचें समाधानही सप्रमाण करूं पाहतो. या गूढ अंतःस्फूर्तीनें सुचलेल्या व मर्यादित प्रयोगांतीं वा निरीक्षणानें सिद्ध झालेल्या कल्पना वाढत्या ज्ञानानें कित्येकदां

अपुऱ्या, असमाधानकारक व टाकाऊ ठरलेल्या आहेत हें शास्त्रांच्या इतिहासांत नमूद आहे. उलटपक्षीं

> " शारदेनें जो मन्त्र दिला कानीं
> तसें लिहिलें मी; काव्य तिचें मानीं (पृ. १२३)

असें म्हणून कवीचे बोल हे वास्तव तथापि अज्ञात अशा सत्याचे अविकृत पडसाद होत हें तत्त्व आरंभींच मान्य केलें जातें व मग तपशील ग्राह्य आहे का अग्राह्य आहे हें ठरविण्याचा प्रश्नच उरत नाहीं. श्रद्धावान् मनुष्यास तशील सर्वस्वी पटेल, अश्रद्ध मनुष्यास कांहींच पटणार नाहीं असा युक्तिवाद चालून कवीचे शब्द प्रेषिताच्या बोलाच्या मोलाचे ठरतात !

पण मौज कशी आहे पहा. स्वप्नांत घेतलेल्या अनुभवाचें जर कोणी वर्णन करून ठेविलें व तें वर्णन कितीही हृदयंगम वठलें तरी त्याला श्रुतिप्रामाण्य कधीं मिळत नाहीं. वस्तुतः केशवसुतांनीं वर्णिलेल्या एकाग्रतेच्या स्थितींत आणि जींत स्वप्नें पडतात व भूमितीचे कूट प्रश्नही केव्हां केव्हां सुटूं शकतात अशा निद्रावस्थेंत असा कोणता मौलिक भेद आहे कीं पद्यात्मक कल्पितानुभवाला साक्षात्कारमाहात्म्य लाभावें आणि गद्यग्रथित स्वप्नानुभवावर असत्याचें शिक्का-मोर्तब व्हावें ? ज्याप्रमाणें प्रतिभेचें स्फुरण ही स्वाधीनची गोष्ट नाहीं, त्याचप्रमाणें स्वप्नदर्शन ही गोष्टसुद्धां स्वाधीनची नाहीं. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं स्वप्नांत पूर्वानुभवांचेंच विकृतीकरण व मिश्रण असतें; आणि प्रतिभाप्रस्फुरित काव्यांत वास्तव अज्ञानाचें आविष्करण असतें. पण येथेंच मोठी चूक आहे.

पूर्वीचे अनुभव हेच स्वप्नाचे घटक असले तरी त्या कारणानें स्वप्नांतील नावीन्य नष्ट होत नाहीं. काव्यांतील नावीन्य याच तऱ्हेचें असतें. काव्यान्तर्गत नावीन्याचे मूलघटक हे कवीच्या अनुभवांपैकींच असतात. ध्वन्युच्चारक डबी ध्वनिलेखाच्या तबकडीवरील लेखाचें यथातथ्य उच्चारण करिते त्या-प्रमाणें कवि अज्ञातांतील तबकड्यांवरील त्रिकालाबाधित लेखांचें केवळ यथातथ्य उच्चारण करितो असें मुळींच नाहीं. काव्य हें कवीला ज्ञात असणाऱ्या गोष्टींचेंच एक नवीन मिश्रण असतें. घटकांच्या संख्याक्रम-प्रमाणादि भेदांनीं नवीं नवीं काव्यें निर्माण होत असतात. हायड्रोजन व

ऑक्सिजन या दोन वायूंच्या विशिष्ट प्रमाणांत झालेलें मिश्रण ( $H_2O$ ) जीवन होतें; पण ऑक्सिजन या जीवन वायूचेंच प्रमाण जरा वाढवून हायड्रोजनच्या इतकें केलें कीं होणारा नवीन पदार्थ ( $H_2O_2$ ) विष होतो ! हे रासायनिक संयोग हुकमी करितां येतात. त्याप्रमाणें मनुष्याच्या विविध अनुभवांचे संयोग हे हुकमी करितां येत नाहींत. हे मनुष्याच्या मनांत कसे होतात हें एक अद्यापि गूढ आहे. काव्यांतील नाविन्याचा उगम ज्ञाताच्या पलीकडील अगदीं पृथक् व अज्ञात अशा प्रदेशांत नसून कवीच्या मनांतच असतो. जन्मापासून सांचत आलेल्या अगणित वैयक्तिक अनुभूतींनीं खळवळणारें, परंतु एरव्हीं इच्छाशक्ति व विवेक यांच्या दडपणाखालीं संथ अचल भासणारें जें अज्ञात मन ( subconscious mind ) असतें त्यापासून कवितेचा उगम होतो. कोणत्याही कारणानें आंतील खळबळ अनिवार होऊन वरचा पापुद्रा जरा बाजूला झाला, कीं आंत जणूं काय गुदमरूं लागल्यामुळें बाहेर पडूं इच्छिणाऱ्या गोष्टी ज्वालामुखीच्या लाव्हारसाप्रमाणें अथवा उतास जाणाऱ्या द्रवाप्रमाणें कमी-अधिक जोरानें व अपूर्वनिश्चित क्रमानें बाहेर पडूं लागतात. याच प्रकारास आपण स्फूर्ति म्हणतों. स्फूर्तीचा हा ओघ कालेंकरून कमजोर होत जाऊन बंद पडतो. हा ओघ हुकमी व कष्टसाध्य नाहीं. व या क्रियेंतील कांहीं गोष्टी अद्यापि अज्ञात, गूढ आहेत; एवढ्याचसाठीं या स्फूर्तीस दैवी म्हणायचें असल्यास गोष्ट निराळी. नाहीं तर दैवी असें यांत काय आहे ? संतकवि दासगणू व लावणीबहाद्दर पठ्ठे बापूराव या दोघांच्या प्रतिभांच्या स्फुरणाची क्रिया एकच आहे. ती आसुरी नाहीं, ती दैवी नाहीं; ती नीतिनिरपेक्ष आहे.

प्रतिभा स्फुरण पावून काव्यनिर्मिती होऊं लागली, कीं मनाची एक प्रकारची तन्मयता होते. गणिताचा प्रश्न सोडवितांना गणितज्ञाची अशीच तन्मयता होते. परंतु केवळ तन्मय झाल्यानें जसा गणिताचा प्रश्न सुटतोच असें नाहीं, त्याप्रमाणें केवळ तल्लीन झाल्यानें प्रतिभेचें स्फुरण होऊन काव्यप्रवाह वाहूं लागेल असें मुळींच नाहीं. तन्मयतेचा सारखा भंग होत राहिला तर काव्यप्रवाह थांबेल; पण पुन्हां तन्मयतेचा भंग करणारी ती गोष्ट दूर झाल्यानें काव्यप्रवाह सुरू होईलच, अथवा पूर्वी तो वहात आला असता तसाच वाहील असें नाहीं. तन्मयता ही काव्यनिर्मितीला अनुकूल अशी स्थिति आहे; काव्यनिर्मितीचें ती आद्यकारण नव्हे. तथापि केशवसुत म्हणतात,

" नांगरल्याविण भुई बरी
   असे कितीतरी,
   पण शेतकरी
सनदी तेथें कोण, वदा?—
हजारांतुनी एखादा!
तरी न तेथुनि वनमाला
   आणायाला
   अटक तुम्हांला;
मात्र गात हा मंत्र चला—
झपूर्झा गडे झपूर्झा!" ४

अहो, अज्ञाताचें काव्यशेत अगदीं मोकळें पडलें आहे. क्वचितच एखादा शेतकरी सनद घेऊन तेथें जातो म्हणजे काय? तुम्ही सारेच जाऊन लूट करून कां आणीत नाहीं? 'झपूर्झा गडे झपूर्झा!' हा अमोघ मंत्र म्हणत जा. 'शिळा उघड' म्हटल्याबरोबर 'निशासहस्री'तील चाळीस चोरांच्या गुहेच्या तोंडाशीं असलेली शिळा ज्याप्रमाणें दूर होऊन आंतील संपत्ति लुटायला वाट देई त्याप्रमाणें 'झपूर्झा'चा मंत्र जपत जा, तो अज्ञातांतील अफाट वैभव तुम्हांला उपलब्ध करून देईल.

पण 'झपूर्झा गडे झपूर्झा!' हा मंत्र म्हणत जा म्हणजे काय करीत जा? पंचाक्षरी षडक्षरी मंत्रांत ज्या प्रकारचें अद्भुत सामर्थ्य असतें म्हणून एक समज आहे तसें कांहीं अद्भुत सामर्थ्य ह्या त्र्यक्षरी मंत्रांत आहे काय? का हा मंत्र जपत जा याचा अर्थ जेणेंकरून प्रापंचिक उपाधींचा विसर पडेल, जगाविषयीं उदासीनता येईल व मन (सृष्टीशीं) तन्मय होईल असें काहींतरी करा एवढाच मर्यादित घ्यायचा! 'ग्यानबा तुकाराम' म्हणत टाळ कुटीत, फेर धरून नाचत राहिल्यानें तेवढ्यापुरती एक प्रकारची तन्मयता, झिंग येऊन हर्षखेद मावळतात ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे; पण तेवढ्यानें मनुष्याचें एरव्हींचें मन निर्मळ होऊन त्याला दैवी संपत्तीचा लाभ हटकून होतोच असें नाहीं. 'झपूर्झा'चा मंत्र गात राहिल्यानें अज्ञातांतील निगूढ गीती ऐकूं येऊन काव्यस्फूर्ति होती तर झिम्मा खेळणाऱ्या पोरी साऱ्याच रससिद्ध कवयित्री होत्या! कवि हा उपजत असावा लागतो. असो. अज्ञाताच्या प्रांतांत चिद्घनचपलेला काय दिसतें!

" पुरुषार्शीं त्या रम्य अती
नित्य प्रकृति
क्रीडा करिती;
स्वरसंगम त्या क्रीडांचा
ओळखणें हा ज्ञानाचा
हेतु; तयाची सुन्दरता
व्हाया चित्ता.
प्रत ती ज्ञाता
वाडेकोडें गा आतां—
झपूर्झा गडे झपूर्झा !" ५

पुरुष-प्रकृतीच्या क्रीडा म्हणजे सृष्टींतील घडामोडीच ना ? मग प्राचीन सांख्यवादांतील पारिभाषिक संज्ञांचें अवडंबर कां ? बाकी या सोवळ्या, प्रतिष्ठित, उदात्त शब्दांचा उपयोग केशवसुतांचा तसा हेतु नसला तरी दुसऱ्यावर वजन पाडायला चांगलाच होतो हें कबूल केलें पाहिजे. केशवसुतांना सृष्टींतील चमत्कारांना जन्म देणाऱ्या शक्तीला कांहीं तरी उदात्त शब्द हवे होते; त्यांनीं प्रकृति-पुरुष वापरले. असो. सृष्टीच्या घडामोडी या अज्ञात अतींद्रिय अशा प्रदेशांत होतात का इंद्रियगोचर अशा या सृष्टींतच होतात ? सृष्टीच्या साऱ्याच घडामोडी रम्य आहेत का त्यांचा स्वरसंगम ओळखणें यांत रम्यता आहे ? जिज्ञासु वैद्याला एखादा दुर्मिळ रोगाचा रोगीही पाहून फार आनंद होतो. पण तो रोगी रम्य आहे म्हणून नव्हे तर तेथें डोकें चालवून, निदान करून, प्रयोग करून पाहून आपली जिज्ञासा तृप्त करायला संधि मिळते म्हणून तो आनंद होतो. या दृष्टीनें जिज्ञासु मनाला सृष्टीच्या घडामोडींचा अभ्यास हा नेहमींच गम्य व रम्य वाटतो; त्याला कविच पाहिजे असें नाहीं. 'पुरुषप्रकृतींच्या क्रीडांचा स्वरसंगम' म्हणजे जर त्या घडामोडींच्या बुडाशीं असलेला निसर्गनियम असा अर्थ असेल तर तें कार्य कवीचें नसून शास्त्रज्ञाचें आहे. या सृष्टींत जेथें जेथें विसंवाद आढळतो तेथें तेथें ज्ञानाच्या साहाय्यानें मूलभूत मानण्यांत आलेला संवाद ओळखून समाधान मिळविणें हा तत्त्वज्ञानाचा हेतु आहे. परंतु तेंही कार्य काव्याचें नव्हे. क्वचित् एखादे वेळीं अंतःस्फूर्तीनें कवीस एखादें तत्त्व, एखादा नियम सुचेल व तो त्यास कवितेंत मांडीलही; पण शास्त्रीय ज्ञान मिळविणें वा शास्त्रीय तत्त्वें शोधून

काढणें व सांगणें हा काव्याचा हेतु नाहीं. काव्याचा हेतु न समजल्यामुळें सामान्य नीतितत्त्वें अथवा व्यावहारिक वा शास्त्रीय सिद्धांत अलंकारिक भाषेनें सांगण्याचा मोह कित्येकदां कवीला होतो; आणि तेवढ्यावरून थिल्लर टीकाकारही त्यास शोधक शास्त्रज्ञाच्या व तत्त्वज्ञाच्या पंक्तीस बसवूं पहातात ! एखाद्या गोष्टी-मुळें कवीच्या संस्कारक्षम मनाला होणारी संवेदना शब्दांच्या द्वारा इतरांस प्रतीत करून देणें हेंच काव्याचें आद्यकर्तव्य आहे. एखादें सुंदर दृश्य पाहून कवीला जो आनंद होईल तो त्यानें गोचरसूचक शब्दचित्र काढून वाचकास प्रतीत करून द्यावयाचा असतो.

केशवसुत म्हणतात कीं सृष्टीच्या घडामोडींतील सुंदरता तुम्हांला पहायची असेल, आणि—

" सूर्यचन्द्र आणिक तारे
नाचत सारे
हे प्रेमभरें
खुडित खपुष्पें फिरति जिथें
आहे जर जाणें तेथें
धरा जरा निःसंगपणा,
मारा फिरके,
मारा गिरके,
नाचत गुंगत म्हणा म्हणा—
झपूर्झा गडे झपूर्झा ! " ६

सूर्यचंद्र आणिक तारे हे ज्ञाताच्या कुंपणापलीकडे आहेत काय ? ते इंद्रिय-गम्य अशा प्रदेशांतच भ्रमण करीत कोणतीं खपुष्पें खुडीत, कोणतीं अशक्य असंभवनीय श्रेयें लुटीत नाचत आहेत ? सूर्य-ताऱ्यांच्या परिभ्रमणाचे नियम अभिप्रेत असतील म्हणावे तर ते कवींनीं शोधून काढिलेले दिसत नाहींत. तें कार्य ज्योतिष्यांनीं केलें आहे. तें कांहींही असो; केशवसुत म्हणतात कीं सूर्य-चंद्राच्या उच्च वातावरणांत जायचें असेल तर 'झपूर्झा गडे झपूर्झा !' म्हणत गिरके फिरके मारा आणि देहभान विसरून जरा निःसंग व्हा ! पण तल्लीन व्हायचें कसें आणि सूर्यचंद्राबरोबर फिरून खपुष्पें खुडायचीं कशीं ?

प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे आपल्या 'केशवसुतांची कविता-चर्चा' या लेखमालेंत म्हणतात कीं, "'झपूर्झा' या कवितेचें रहस्य कळत नाहीं. तथापि तुतारीपेक्षांही ही कविता आनंद देते...ही कविता अत्युत्तम अत्युत्कृष्ट आहे." कवितेचें रहस्य न कळतांही तिच्यापासून आनंद होत असेल तर तो मूळ विषयामुळें न होतां तदनुषंगी गौण गोष्टीपासून होत असला पाहिजे हें उघड आहे. या कवितेचें रहस्य तसें गूढ नाहीं. तन्मयतेच्या स्थितींत प्रतिभा स्फुरली कीं ती कवीला ज्ञाताच्या कुंपणावरून पलीकडे नेऊन कशीं रम्य दृश्यें दाखविते व कशीं गूढ गीतें ऐकविते, आणि तेथें केवळ तन्मय होण्याचा अवकाश कीं कोणालाही कसें जातां येऊन ते दिव्य अनुभव घेतां येतात याचें 'झपूर्झा' या कवितेंत कवीनें अलंकारिक भाषेनें वर्णन केलें आहे. केशवसुतांची विचारसरणी सदोष आहे; पण त्यांची स्वतःची ती सत्य असल्याबद्दल श्रद्धा होती. आणि कल्पनेच्या साहाय्यानें कवि आपल्या विषयाची मांडणी गोचरवाचक भाषेंत मांडतो, ती कारागिरी या कवितेंत फार चांगली पहायला मिळते. दृश्यमाला मनोज्ञ आहे. त्यांतच चित्, निगूढ, मंत्र, पुरुष, प्रकृति, ज्ञानहेतु, सूर्यचंद्र, तारे, ख-पुष्पें, निःसंगपणा इत्यादि ब्रह्मज्ञानाचें व ब्रह्मानंदाचें उच्च वातावरण सूचित करणारे शब्द आढळले कीं वाचकाला आपण उदात्त अशा भूमिकेवर, छे अंतराळांतच गेल्याचा आरंभीं आरंभीं तरी भास होतो; आणि कारागिरीच्या या बाह्य भपक्यानें डोळे दिपून क्षणभर समाधान झाल्यासारखें वाटतें. पण "क्षणैःक्षणैः यन्नवतामुपैति" असें जें असतें त्यांतच खऱ्या कलेचा विलास असतो. न्याहाळून पाहिल्यावर ज्या कवितेंतील विसंगति, कृत्रिमता ही अधिकाधिक प्रतीत होऊं लागते ती जिवंत कलाकृति नव्हे. तल्लीनतेंतील चमत्कार अलंकारिक भाषेनें वर्णन करून आपले काव्यस्फूर्तीविषयींचे सिद्धांत सांगण्याच्या भरीस न पडतां ज्या एखाद्या दृश्यानें कवीस कधीं तल्लीन करून सोडून त्यास उद्बोधनाचा आनंद दिला असेल, त्या दृश्यावरच कवीनें कविता लिहिली असती तर ती कमी सदोष व गूढ आणि अधिक काव्यमय व भावनोद्दीपक झाली असती.

कवित्वाचा उगम, विकास व प्रभाव यांच्याविषयीं केशवसुतांनीं करून घेतलेल्या आपल्या कल्पना आणि त्यांची आत्मकवित्वाची रोगट जाणीव यांनींच केशवसुतांची दारुण निराशा केली आणि त्यांच्या वृत्तीस विपरीत करून टाकिलें! १८८६ सालची 'अपर कविता दैवत' आणि १८९० सालीं प्रसिद्ध केलेली

‘ प्रियेला सादर केलेली पुष्पमाला किंवा कर्तव्य आणि प्रीति ’ या दोन कवितांच्या तुलनेनें त्यांच्यांत कसें वृत्तिवैपरीत्य आलें तें विशद होईल. ‘ अपर कविता दैवत ’ ( पृ. १० ) या उत्कृष्ट भावगीतांत त्यांना प्रियामीलनाचें महत्त्व काव्यरचनेहून अधिक वाटून ते म्हणतातः–

“ बरें का हें वाटे तुज ?—तुजवरी काव्य लिहुनी
रहस्यें फोडावीं सकल अपुलीं मी मग जनीं ?
त्यजूनी ही इच्छा, मज सुखविण्या ये तर खरी,—
स्तनीं तूझे व्हावीं तर रचिन काव्यें स्वनखरीं !
रचाया पूर्वी तीं, रसनिधि असे जो मम उरीं,
—जयाच्या काव्यें या खचित असती फक्त लहरी,
तुला तो द्याया मी निधिच किति हा उत्सुक असें !—
करांनीं गे आकर्षुनि निधिस त्या घे तर कसें ! ”

परन्तु ‘ कर्तव्य आणि प्रीति ’ (पृ. ७४) या कवितेंत प्रियेच्या प्रमळ संगतीहून काव्यप्रसू विजनवसति अधिक प्रिय झालेली दिसते. वल्लीवर फुलांचे घोस शोभावेत तशी जिच्या ओच्यांत मुलें विलसत आहेत अशी प्रिया आणि सुगंधानें रान भरून जावें तसें त्या प्रियेच्या प्रेमानें जें गृह भरून राहिलें आहे असें गृह, दोघांस सोडून, जितक्या उत्सुकतेनें त्यांचा बाळ्या शाळेहून परत घरीं येतो तितक्या उत्सुकतेनें कवि नदीच्या तीरावर सहल करायला जातो ! तेथें कां, तर जसा तो प्रियेला घेऊन घरीं बसतो तसा

“ वसे तो विश्वात्मा वरुनि कवितादेविस तिथें. ”

हा गृहत्याग कशासाठीं तर

“ मनीं माझ्या व्हावी चलित कविता-शक्ति म्हणुनी ” !

आणि मग प्रियेची समजूत कशी करायची ?

“ तधीं मातें तेथें सहजकवनस्फूर्ति चढली,
तुझी वर्णायाला अकपट अशी प्रीति सुचली
फुलांच्या मी भाषेमधिं रुचिर हें काव्य रचिलें
मिषानें माल्याच्या;—ग्रहण कर तूं तें तर भलें ” (पृ. ७५)

या वृत्तिवैपरीत्याचा परिणाम केशवसुतांना लौकरच जाणवूं लागला. सृष्टींतील दिव्य भास दिसल्यानें अथवा प्रतिभेच्या स्फुरणानें क्षणभर त्यांना जें

निर्वाणीचें सुख मिळे असें वाटे. 'फिर्याद' (पृ. १६६) या कवितेंतही ते म्हणतात:—

> " तल्लीन सर्व मी झालों
> विकलगात्र होउनि गेलों
> निर्वाणीं पूर्ण बुडालों. "

असेंच वर्णन जरा निराळ्या शब्दांनीं त्यांनीं 'माझा अन्त' (पृ. ६६) या कवितेंत केलें आहे.

> " नेत्रें क्षणीं तारवटून गेलीं,
> अंगें ज्वरीं त्या परतन्त्र झालीं,
> झालों तिला मी बघतां श्रमिष्ठ
> शुद्धी सवेंच मग होय अहा विनष्ट !

हें वर्णन संस्कृतांतील कामज्वरवैकल्याच्या वर्णनाप्रमाणेंच सांकेतिक व ठरीव ठशाचें असावेंसें वाटतें. पण तें असो; मॉर्फिया अंगांत टोंचवून घेणारा मनुष्य त्यापासून अनिर्वचनीय अशा सुखाची प्राप्ति होते असें प्रामाणिकपणानें म्हणतो; आणि त्या निर्वाणींच्या सुखाची चटक लागली कीं योग्य वेळीं त्या सुखाचें साधन हें पाहिजेच, तेंच त्याचें जीवन होऊन जातें. तें न मिळालें तर त्या जीवाची जशी तळमळ होते, जीवना वेगळ्या मासोळीची जशी तळमळ होते तशी तळमळ केशवसुतांची होऊं लागली. क्षणांत नाहींसें होणारे ते दिव्य भास केशवसुतांना पुढें पुढें अधिकाधिक दुर्मिळ कसे झाले तें त्यांनीं लिहिलेल्या कवितांच्या तारखांवरूनच दिसतें. १८९३ सालच्या सप्टेंबरांत लिहिलेलें 'थकलेल्या भटकणाराचें गाणें' (पृ. ११५) हें कविता सुंदरीसच उद्देशून आहे असें निश्चयानें सांगतां येत नाहीं; पण 'रुष्ट सुन्दरीस' (पृ. १२२), 'फिर्याद' (पृ. १६६), 'वियोगामुळें' (पृ. १६८) आणि 'हरपलें श्रेय' (पृ. १९६) हीं हृदयस्पर्शी विरहगीतें त्या अत्यद्भुत, गूढ, लहरी मोहिनीसच उद्देशून आहेत यांत तिळप्राय सन्देह नाहीं. 'रुष्ट सुन्दरीस' (La Dame Bule Sans Merci ?) या कवितेंत केशवसुत म्हणतात,

> " हाय हाय हें विफल जिणें तव सहवासावांचुनी,
> निघूं कीं निवटूं मनुजांतुनी ?

प्रीतिविषय तो जर का परका प्राण्याला जाहला,
तयाचा जन्महेतु खुंटला !"

केशवसुतांची ही सारी, भ्रमजन्य खरी पण त्यांच्या जिव्हारीं लागून राहिलेली तळमळ पाहिली कीं, 'हरपलें श्रेय' लिहिल्यानंतर ५॥ महिन्यांनीं त्यांना आलेला मृत्यु हा एक प्रकारचा ईश्वरी प्रसादच होता असें क्षणभर वाटल्यावांचून रहात नाहीं. केशवसुतांची ही तळमळ भ्रमजन्य असली तरी वरपांगी नव्हती म्हणूनच त्यांचीं हीं विरहगीतें अत्यंत सरस व हृदयंगम झालीं आहेत. अमुक एक भावना युक्त आहे कीं नाहीं, हितकर आहे कीं नाहीं याच्यावर काव्याची सरसता अवलंबून नसते. भावनेचा जिवंतपणा हा काव्याचा प्राण होय. बाहुलीला झालेल्या अपघातापासून लहान मुलीला होणारें दुःख हें वयस्क व्यवहारज्ञ मनुष्यांना अयुक्त वाटतें, इंदुमतीच्या निधनानें अजास झालेला शोक हाही, शीर सलामत तर पगडी पचास असें मानणाऱ्या स्वार्थबहाद्दरास अथवा ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या असें म्हणणाऱ्या वैराग्याचार्यांस तितकाच अयुक्त वाटेल. तथापि काव्यप्रांतांत अजविलाप हें सुप्रसिद्ध प्रकरण आहे; आणि लहान मुलांचें मन नीट ओळखून त्याच्याशीं समरसून जाऊं शकणाऱ्या एखाद्या कवीनें 'बाहुलीसाठीं शोक' म्हणून विलापिका लिहिली तर तीही अजविलापाइतकीच सरस व आदर्शभूत होऊं शकेल.

'हरपलें श्रेय' या गूढ कवितेच्या अर्थासंबंधानें बराच मतभेद आहे. जें मिळालें आहे तें पाहिजे होतें तें नव्हे असें म्हणून दुष्प्राप्य ध्येयासाठीं तळमळणाऱ्या एका स्त्रीची मनःस्थिति या कवितेंत केशवसुतांनीं तिच्याच मुखानें वदविली आहे आणि केशवसुतांच्या ठिकाणीं स्त्रीदाक्षिण्य व स्वातंत्र्यलालसा हे उत्कट गुण असल्याकारणानें रा. श्रीधर विनायक वर्तक यांस या कवितेंत अथपासून इतिपर्यंत एका स्वातंत्र्येच्छु स्त्रीचा स्वातंत्र्याकरितां स्वतःच्या मनाशीं चाललेला झगडा प्रतिबिंबित झालेला दिसतो. संसाराला विटून स्वातंत्र्यासाठीं, घटस्फोटासाठीं तडफडणाऱ्या दुर्दैवी स्त्रीच्या मनःस्थितीची कल्पना पहिल्या तीन कडव्यांपर्यंत बरोबर जमते. विवाहापूर्वी भातुकलीच्या खेळांत भावी संसाराचीं सुखस्वप्नें पहात असतांना तिला स्वातंत्र्याबरोबर एक प्रकारच्या सुखाचा, श्रेयाचा लाभ होत होता. लग्नानंतर तीं जुनीं मनोराज्यें रसातळाला गेलीं आणि सुखासंगेंच तिचें स्वातंत्र्यही नष्ट झालें. संसारांतील कर्तव्यें करण्यांत तिला हुरूप वाटेना, तिच्याकडून कामांत हयगय होऊं लागली व त्यामुळें अर्थातच तिला

होणारा जाच वाढला. शेवटीं तिनें भीडभाड सोडून दिली आणि रानाची वाट धरिली. रा. वर्तक यांनीं लावलेला अर्थ लागू पडत नाहीं तो येथून पुढें. ती विजनवास कां पत्करिते तर

" जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी;
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते
म्हणुनी विजनीं मी जात्यें,
स्वच्छन्दें त्या आळवित्यें
स्वभाव दावुनि—परि तें झटदिनिं—जाई लोपुनि..."

येथें तिला स्वातंत्र्याची साक्ष पटते म्हणजे काय ? ओढे स्वतंत्रपणें वाहतात हें पाहून तिला आनंद होतो व तिचें मन रमतें म्हणावें तर एकाच जागीं खिळलेल्या वनराजींत तिला स्वातंत्र्याची साक्ष कशी पटणार ? बरें, दुसऱ्याचें स्वातंत्र्य पाहून या बंदी जीवाला आनंद होतो असें म्हणावें तर तें पहायला 'विजनीं'च जाण्याची काय जरूरी आहे ? लोकवस्तींत स्वतन्त्र वाण्याचें मनुष्य मुळींच आढळत नाहीं काय ? बरें, विजनांत तें स्वातंत्र्य 'स्वभाव दावून झटकन् लोपून हिला हांका मारीत ठेवतें' म्हणजे काय ? स्वातंत्र्याचा चंचल भास होऊन स्वतःच्या पारतंत्र्याची जाचक जाणीव जर तिला विजनांत विशेष होऊं लागली तर तिची वृत्ति तेथें रमते असें कसें म्हणतां येईल ? तिचा नवरा सारीं मनोराज्यें लयास नेणारा निघाला म्हणून ती संसाराला विटली आहे; पण तिला काय हवें आहे—स्वातंत्र्य का इष्ट पुरुष ? स्वातंत्र्य हें तिचें ध्येय आहे का आपलें ध्येय मिळविण्यासाठीं अवश्य असलेली ती एक पूर्वस्थिति आहे ? जनमर्यादा तिनें झुगारून दिली आहे यांतच तिचें मानसिक स्वातंत्र्य व्यक्त होत नाहीं काय ? ती विजनांत जाऊं शकते इतपत शारीरिक स्वातंत्र्यही तिला नाहीं काय ? लग्नाच्या आधीं ज्या तऱ्हेच्या पुरुषाशीं आपला योग घडून यावा अशीं मनोराज्यें तिनें केलीं असतील, त्या तऱ्हेच्या पुरुषाशीं तिचा संबंध जुळून आला असता तर विवाहाचें बंधन तिनें मान्य केलें असतें कीं नाहीं ? का मिस पँखर्स्टप्रमाणें संबंध, ऐच्छिक संबंध घडावा पण वैयक्तिक स्वातंत्र्य बिलकुल नष्ट होतां कामा नये या तत्त्वाचा तिनें पुरस्कार केला असता ?

" स्वपतिचितेवर उडी सती
संसृतिविमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो;
मी न करित का तेंवि तधीं
माझें मज लाभेल जधीं ? "

ती म्हणते कीं ध्येयप्राप्तीसाठीं मी देहत्याग सुद्धां करीन. देहत्याग केल्यानें तिच्या असह्य पारतंत्र्याचा शेवट होईल; पण ध्येयप्राप्ति कशी होणार ? दुसऱ्यांना स्वातंत्र्य लाभावें म्हणून अलौकिक स्वार्थत्याग करून लोक आपले प्राण बळी देतात; परंतु स्वतःला स्वातंत्र्य लाभल्यावर जर प्राण द्यायचा तर त्या स्वातंत्र्याचा उपयोग कोणी, केव्हां आणि कसा करायचा ? आणि त्या स्वातंत्र्याचा उपयोग करणें अशक्य होणार असलें तर प्राणत्याग करायचा तरी कशाला ? आतां सती स्वपति-चितेवर उडी कां घेते तर पतिवियोगांत जीवित तिला असह्य झालेलें असतें आणि सती जाण्यानें मरणोत्तर शाश्वत पतिसहवास लाभेल अशी तिची श्रद्धा असते म्हणून. जगांतील ही सारी धडपड मरणोत्तर स्वातंत्र्यासाठीं आहे काय ? पतंग दीपशिखेवर उडी कां घेतो तर तेथेंच त्याला आकर्षक ध्येयाची प्राप्ति दिसते म्हणून. आतां तेथेंच त्याचें मरणही आहे ही गोष्ट निराळी व ती त्याला आधीं माहीतही नसेल. स्त्री आपल्या इष्ट पुरुषाच्या भेटीसाठीं आपला जीव वाटेल त्या धोक्यांत घालील; परन्तु माझें मज स्वातंत्र्य भेटेल तर मी जीवाचें मोल मग देईन हें म्हणणें कांहींतरीच वाटतें ! रा. वर्तक यांनीं लाविलेला अर्थ नवीन म्हणून कुतूहलजनक वाटला तरी तो मुळींच सुसंगत व समाधानकारक नाहीं.

केशवसुत भक्तिमार्गी कवि असून त्यांच्या जीवात्म्यास शिवात्म्याशीं सायुज्य पावण्याविषयींची तळमळ लागून राहिली होती कीं काय, याचा विचार केला पाहिजे. केशवसुत नास्तिकच होते असें म्हणतां येत नाहीं.

" देवळीं त्या देवास बळें आणा
परी राही तो सृष्टिमधें राणा " (पृ. १६)

असें ते 'एक खेडें' या कवितेंत म्हणतात. हें त्यांचें म्हणणें एखाद्या आंग्लकाव्यसंकेताचें भाषांतरही असूं शकेल. मूर्तिपूजक ते कदाचित् नसतील आणि

त्यामुळें रामास वा पांडुरंगास उद्देशून त्यांनीं कविता लिहिली नसेल; तथापि ते भक्तिमार्गी होते म्हणावें तर निर्गुण निराकार ईश्वरास उद्देशून त्यांनीं कविता कां लिहूं नयेत? 'तुझें नाम मुखीं' हा एकच अभंग ईश्वरास संबोधून आहे. निराकार ईश्वराविषयीं कां होईना, पण जिवंत भक्ति ज्याच्या अंतःकरणांत आहे त्या कवीच्या तोंडून एकच भक्तिपर कविता निघेल असें वाटत नाहीं. शिवाय ही कविता केशवसुतांची नसावी अशी शंका रा. रहाळकर यांनीं स्पष्ट-पणें व्यक्त करून ठेविली आहे; व तिचें निराकरणही केशवसुतांच्या कवितेच्या संपादकांनीं केलेलें नाहीं. केशवसुत नास्तिक होते असें समजण्यापेक्षां काव्य-तत्त्वालाच ते परमात्व-तत्त्व समजत असें मानणें अधिक युक्त होईल. 'हरपलें श्रेय' या कवितेंत व तिच्यावरील लघुप्रस्तावनेंत त्यांनीं एकही ईश्वरवाचक सरळ शब्द वापरलेला नाहीं. त्यांची तळमळ अलौकिक अशा कांहीं हरपल्या श्रेयाच्या पुनःप्राप्तीसाठीं आहे. हें श्रेय पूर्वी त्यांच्याजवळ होतें व तें कोणी तरी हिरावून नेलें म्हणून ते जीव पाखडीत आहेत. ईश्वराची प्राप्ति केशवसुतांच्या या जन्मांतच पूर्वी कधीं त्यांस झाली असेल असें वाटत नाहीं. तसें असतें तर त्या गोष्टीचा उल्लेख त्यांच्या उद्गारांत पूर्वीच आला असता. 'क्षणांत नाहींसे होणारे कांहीं दिव्य भास' मात्र त्यांना झाल्याचें त्यांनीं काव्यांत नमूद करून ठेविलें आहे. ते भास ब्रह्मसाक्षात्काराचे होत असें मानणें असमर्थनीय धाष्टर्याचें होईल. कारण ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर मनुष्य जीवन्मुक्त होतो. परंतु 'हरपलें श्रेय' या कवितेचा अर्थ जीवशिवसंबंधाच्या अनुरोधानें लावण्याकडे प्रवृत्ति होते याचें मुख्य कारण केशवसुतांनीं योजिलेलें रूपक हें होय. लग्नाच्या नवऱ्यावर प्रेम न करितां प्रेमाच्या सख्यासाठीं झुरणाऱ्या व जनमर्यादेस झुगारून देणाऱ्या स्वैरिणीचें रूपक, संसाराविषयीं उदासीन राहून ईश्वरासाठीं झुरणाऱ्या भक्तिभाव-नेस योजण्याचा कविसंप्रदाय फार प्राचीन आहे; व साध्वी मिराबाई हें त्या रूपकाचें ऐतिहासिक उदाहरण आहे. तुकाराम आपल्या विराण्यांत म्हणतो;—

"वाळो जन मज म्हणोत शिन्दळी
परी हा वनमाळी न विसंबें.
सांडूनी लौकिक जालियें उदास
नाहीं भय आस जीवित्वाची.
नाइकें वचन बोलतां या लोकां
म्हणे जालों तुका हरिरतां (४५२१)

परपुरुषाचें सुख भोगे तरी
उतरोनी करीं घ्यावें शीस
संवसारा आगी आपुलेनि हातें
लावूनी मागुतें पाहूं नये
तुका म्हणे व्हावें तयापरी धीट
पतंग हा नीट दीपावरी ” ( ४५३९ )

‘ हरपलें श्रेय ’ लिहितांना या विराण्या केशवसुतांच्या डोळ्यांपुढें असाव्यात अशी शंका येते.

“ एक शब्द बोलेन जरी
सकलां कुण्ठित करिन तरी ”

या ओळींचें “ नाइकें वचन बोलतां या लोकां ” या तुकारामोक्तीशीं असलेलें आश्चर्यकारक साम्य पाहून उपर्युक्त शंका बळावते, परंतु केशवसुतांची कविता ही तुकारामाच्या विराणीइतकी असंदिग्धपणें ईश्वरभक्तिवादी नाहीं. मग ‘ हरपलें श्रेय ’ ही कविता कोणास उद्देशून असावी ? ही कविता प्रतिभा नामक मोहक शक्तीस उद्देशून असावी. श्रेय हा शब्द ‘ तन्मयतेचें सुख ’ व तें सुख देणारी ‘ दिव्य शक्ति ’ या दोन्ही अर्थांनीं वापरलेला आहे. वनांतून हिण्डत असतांना तिचा भास मात्र केशवसुतांना पूर्वी झाला होता.

“ ‘ रम्भे ! ’ ‘ उर्वशि गे ! ’—तशींच दुसरीं जीं त्यास होतीं प्रिये
नामें, त्यांतिल घेउनी फिरुनि तो बाही त्वरेनें तिये;
ती काहीं तरि ही वळे न, बघुनी तो विस्मया पावला;
जातां सन्निध, “ ही नवीनचि अहा ! कोणी दिसे ” बोलला.
कांहीं वाव नवीन देउनि तिला जेव्हां तयें बाहिलें
तों तीनें वळुनी प्रसन्न वदनें त्याच्याकडे पाहिलें;
त्या रूपद्युतिनें दिपूनि नयनें, निर्वाण तो पावला;
तों अन्तर्हित, दृष्टिचा विषय तो, एका क्षणीं जाहला ! ” ( पृ. १०१ )

तिला सृष्टिसुन्दरी म्हणा, कवितादेवी म्हणा पण तिचा ध्यास केशवसुतांना लागला होता हें खास. संस्कारक्षम अशा नववयांत इंग्रजी सृष्टिविषयक कविता वाचून जी काल्पनिक सृष्टि त्यांच्यापुढें उभी राहिली व जिच्यावर ते फिदा

होऊन गेले तिच्या मानानें प्रत्यक्ष सृष्टींत त्यांची निराशा झाली; कारण सृष्टीच्या मानानें कल्पना ही अमर्याद आहे. ज्या मानानें स्वप्नजीवी मनुष्य आपल्या ईप्सितावर दिव्यत्वाचा, अलौकिकत्वाचा आरोप करितो त्या मानानें प्रत्यक्ष सृष्टींत त्याची निराशा तीव्र व दीर्घ कालपर्यंत टिकणारी होते. एका वेळीं जें दृश्य स्वर्गीय सौन्दर्यानें मुसमुसलेलें दिसलें तेंच मागाहून फिकें, न्यूनपूर्ण व निराशा-जनक वाटूं लागतें. वर्डस्वर्थच्या ज्या कवितेंतील विचारसरणीनें केशवसुतांच्या मनावर खोल परिणाम केला असला पाहिजे त्या Ode on Intimations of Immortality मध्यें वर्डस्वर्थ म्हणतो, " असा एक काळ होता कीं जेव्हां प्रत्येक सामान्य दृश्य मला स्वर्गीय तेजानें, स्वप्नसृष्टींतील अभिनव तेजानें नटलेलें दिसे. ती पूर्वीची स्थिति आतां राहिली नाहीं. दिवसा, रात्रीं कुठेंही मी फिरलों तरी ज्या गोष्टी मी पूर्वी पाहिल्या त्या आतां मुळींच दृष्टीस पडत नाहींत. इन्द्रधनुष्य येतें आणि जातें; गुलाबही कमनीय दिसतो....पण कोठेंही मी गेलों तरी सृष्टींतील कांहींतरी मोहक तेज नाहींसें झालें आहे. याची जाणीव झाल्या-वांचून रहात नाहीं. "

याचें कारण वर्डस्वर्थ पुढीलप्रमाणें सुचवितो. तो म्हणतो कीं, " तान्हेपणांत आपण स्वर्गीय तेजांत गुरफटलेले असतों....वय वाढत चाललें, कीं या जीवित-तुरुङ्गाचा अन्धार अधिकाधिक गडद होऊं लागतो. होतां होतां मनुष्य-पणांत तें तेज नष्ट होतें. " केशवसुतांनाही तसेंच वाटत असावें. ' निद्रामग्न मुलीस ' ( पृ. ६० ) या कवितेंत ते म्हणतात,

" कौमार्यें नवयौवना न अजुनी थारा दिला वाटतें
स्वर्गातील तरीच मुग्धतरता या त्वन्मुखीं राहते "

केशवसुतांना संचितवाद समाधानकारक वाटत नाहीं. ज्या ' दिव्य भासा'च्या ( वर्डस्वर्थचें Visionary gleam ) मुखाला ते मुकले आहेत त्या दिव्य भासाला त्यांनीं प्रेमदान केलें आहे; आणि

" प्रीतिचा असा असे ग सौदा
प्रीतिनें प्रीति सम्पादा " ( पृ. १९५ )

असा त्यांचा विश्वास आहे. भृङ्ग हा जगाविषयीं उदासीन असतो म्हणून त्याला सृष्टीशीं तन्मय होण्याचें श्रेय लाभतें, अशी केशवसुतांची समजूत आहे.

" म्हणुनी विजनीं मी जात्यें
स्वच्छन्दें त्या आळवित्यें. "

तेथें त्यांना दिव्य भास झाल्यास तो क्षणांत नाहींसा होतो. तान्हेपणांत ज्याप्रमाणें ते नेहमीं स्वर्गीय तेजांत गुरफटलेले असत तसेंच मोठेपणींही आमरण रहातां यावें

" म्हणुनि जीव पाखडीतसें
न परि हरपलें तें गवसें "

माझें हरपलें श्रेय मला पुन्हा एकदां लाभलें कीं मग मरण आलें तरी पर्वा नाहीं; पण प्रौढपणांत तें दिव्य सुख मिळूं शकत नाहीं. आणि म्हणूनच केशवसुत म्हणतात,

" कां हो यापरि वाढलों फुकट मी ? हा हन्त ! मी नष्ट हा !
तान्हा बाळचि राहतों तर किती तें गोड होतें अहा ! " ( पृ. १३६ )

व " प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे " ( पृ. ५७ )

एकंदरीनें पाहतां या बाबतींत केशवसुत हृदयंगम पण निराशेचाच सूर काढित रहातात. उलटपक्षीं वर्डस्वर्थ या निराशेंतही आपला विचारजन्य आशावाद ढळूं देत नाहीं. तो म्हणतो,

" Though nothing can bring back the hour
Of splendour in the grass, of glory in the flower
We will grieve not, rather find
Strength in what remains behind ;
In the primal sympathy
Which having been, must ever be ;
In the soothing thoughts that spring
Out of human suffering;
In the faith that works through death,
In years that bring the philosophic mind."

निर्झराचा उल्लास, पक्ष्यांचें कूजन, आकाशांतील रंगविलास इत्यादि सृष्टींतील विविध श्राव्यांनीं व दृश्यांनीं मनुष्यास कमी अधिक आनंद फार प्राचीन काळा-

पासून होत आला आहे. प्रसंगोपात् सृष्टीचीं हृदयंगम वर्णनें प्राचीन वाङ्मयांतून आलेलीं आढळतात. परंतु एखादें दृश्य पाहून कवीला जो आनंद झाला, त्याच्या मनांत जी भावना उचंबळली तिची प्रतीति त्याच तऱ्हेनें वाचकांस करून देण्यासाठीं त्या दृश्याचें शब्दांनीं यथातथ्य चित्र काढणें, अथवा त्या भावनेचें बारकाईनें वर्णन करणें यापेक्षां जुन्या कवींचा भर वाचकास चमत्कृतिजनक अतिशयोक्तीनें गार करण्यासाठीं त्या दृश्याचें अलंकारिक वर्णन करून, आपलें वाग्वैभव व कल्पनापाटव दाखविणें यांवर अधिक असे. तथापि त्यांचें सृष्टीचें निरीक्षण सूक्ष्म व अचूक होतें, हें त्यांनीं दिलेल्या उपमांच्या अनुरूपतेवरून स्पष्टपणें दिसून येतें. सुभाषितांतून व इतरत्र जरी नदी, पुष्प इत्यादिकांस संबोधून रचना असली तरी तो चेतनधर्मारोप केवळ एक काव्यसंकेत असे. सृष्टि हें एका सगुण शक्तीचें स्वरूप आहे, तिच्यांतील विविध वस्तु या पृथक् पृथक् सचेतन असून मनुष्यप्राण्याप्रमाणें कवितेचे स्वतंत्र विषय होण्यास पात्र आहेत, त्यांच्याशीं संस्कारक्षम मनुष्याचा गूढ संवाद होऊं शकतो, त्या तशा मनुष्याला तन्मयतेच्या संवादांत थोर थोर तत्त्वें शिकवितात इत्यादि कल्पना वर्डस्वर्थ वगैरे आंग्लकवींच्या द्वारा मराठी कवींच्या डोक्यांत शिरल्या; आणि सृष्टिप्रेम हें एक आधुनिक कवित्वाचें लक्षण होऊन बसलें. क्वचित् प्रसंगीं एखादें दृश्य पाहून क्षणैक देहभान हरपेलही; पण ‘सृष्टीशीं तन्मयता’ हा एक आधुनिक कवींचा मूलमंत्र होऊन बसला.

केशवसुतांनीं ‘ उगवत असलेल्या सूर्यास ’, ‘ गुलाबाची कळी ’, ‘ दंवाचे थेंब ’, ‘ पर्जन्याप्रत ’, ‘ पुष्पाप्रत ’, ‘ फुलपांखरूं ’, ‘ भृंग ’, ‘ वातचक्र ’, वगैरे सृष्टींतील विविध विषयांवर कविता रचिल्या आहेत. अशा सृष्टिविषयक कवितांची संख्या अदमासें २० भरेल. परंतु ज्यांत थोडी फार तन्मयता रचनेवरून दिसते अशा दोनच आहेत—‘ भृंग ’ ( पृ. ६३ ) आणि ‘ वातचक्र ’ ( पृ. १३८ ) आणि या दोन्ही कवितांच्यावर आंग्ल कवितांची छाया आहे. मराठी भावगीतांत त्यांचा नंबर वर लागेल यांत शंका नाहीं, पण त्यांची अनुक्रमें शेलीकृत Skylark आणि Ode to the West Wind या कवितांशीं तुलना करून पाहिली, तर केशवसुतांच्या कविता फिक्या पडतात यांत नवलही नाहीं. शेलीच्या पुढें प्रत्यक्ष सृष्टि होती आणि त्याच्या कविता हृदयांत खळबळ होऊन आपोआप बाहेर पडल्या, तर केशवसुतांच्या पुढें आंग्ल काव्यवाङ्मयांतील

सृष्टि होती आणि इंग्रजींत जशा हृदयस्पर्शी कविता आहेत तशा स्वाभिमानपूर्वक त्यांना मराठींत करावयाच्या होत्या. तन्मयतेची कविता लिहिण्यासाठीं त्यांनीं भृंग हा इकडील वाङ्मयाला परिचित असा विषय निवडला, आणि रचनाही बहारीची केली. पण Skylark हा पक्षी महाराष्ट्रांत दिसत नाहीं हें ते विसरले, आणि

"वरुनि नभांतुनि चंडोल
ओतितसे हेची बोल"

असें त्यांनीं लिहून टाकिलें! जें असावेंसें वाटतें तें आहेच असा भ्रम कसा होतो त्याचें हें एक उदाहरण आहे. अशा वर्णनांवरून कवीच्या पुढें सत्यसृष्टि नव्हती असा संशय येतो आणि काव्याचें इन्द्रजाल तितकें विरल व फिकट होतें. मग काव्यांत तन्मयतादर्शक शब्द कितीही घातले, उद्गारचिन्हांचे खाम्ब कितीही उभे केले, तरी थेंबानें हरपलेलें श्रेय हौदानें परत मिळत नाहीं.

केशवसुतांचीं सृष्टिवर्णनें अगदीं सामान्य आहेत. "सृष्टिवर्णनामध्यें केशवसुतांचा हातखण्डा आहे; कारण, त्यांनीं सृष्टि प्रत्यक्ष पाहिली आहे, एवढेंच नव्हे तर अनुभवून हृदयांत सांठवून ठेविली आहे", हें अत्युक्तिपूर्ण विधान डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांनीं केवळ 'वातचक्र' या एका कवितेच्या आधारावर केलें असल्यास नकळे. 'उगवत असलेल्या सूर्यास' (पृ. २) ही कविता प्रो. राजवाडे यांना सामान्य वाटते; "आंतील कल्पना संस्कृतांतील आहेत" असें डॉ. गुणे म्हणतात; परंतु याच कवितेंतील

"अनुकरण करीं मी गाउनी या खगांचें
तदिव सुमनतांचें वंदुनी या लतांचें
अनुसरत असें मी हांसुनी पद्मिनीस,
शरण तुजसि आलों मी असा नम्र दास."

या ओळी उद्धृत करून कवीचे मित्र रा. रहाळकर म्हणतात, "यांत सृष्टीशीं कवि कितीतरी तल्लीन आणि एकरूप झाल्याचें दिसत आहे!" या रीतीनें परीक्षण केल्यास कवि जींत तल्लीन झालेला नाहीं अशी कविताच आढळांत येणार नाहीं! 'भृंग' आणि 'वातचक्र' यांच्या खालोखाल 'पर्जन्याप्रत' (पृ. ८५) ही एकच कविता चांगली आहे. या कवितेंत पाऊस पडूं लागण्याच्या आधींच दर्दुर घोष करूं लागले आहेत, मुंग्या उडूं लागल्या आहेत, काजव्यांचें

आगमन झालें आहे म्हणून जें वर्णन आहे त्यांत थोडा कालविपर्यासाचा दोष असावा असें वाटतें. 'कविता आणि प्रीति' (पृ. ६७) यांतील वर्णन तर अगदींच सामान्य व ठरींव ठशाचें आहे. इतरत्र वर्णन सामान्य असलें तरी श्लोकांतीं एखादा अलंकार साधण्याच्या युक्तीमुळें चमत्कृतीखालीं तो सामान्यपणा झांकला जातो. Pesbody कृत The Autumn Evening या कवितेंतील

"Behold the western evening light !
It melts in deepening gloom,
So calmly Christians sink away
Descending to the tomb"

या श्लोकाप्रमाणेंच 'सन्ध्याकाळ' (पृ. १००) या कवितेंतील पहिले दोन श्लोक मनोरंजक वाटतात.

"संध्याकाळ असे, रवी उतरतो आहे समुद्रावरी
त्याचें बिंब सुरेख चुंबिल पहा लाटांस या लौकरी;
मातीला मिळुनी गळूनि पडलें तें पुष्प जाई जसें
लोपाला लहरींत मंडलहि हें जाईल आतां तसें.
आकाशीं ढग हे पहा विखुरले, त्यांच्यावरी सुंदर
रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्या येतें स्वचित्तावरः—
ह्या मृत्युंगत होतसे दिवस, तन्मस्तिष्क पिंडांतरीं
येती अक्षयमोक्षसिन्धुलहरी तेजोयुता या परी !"

केशवसुत रविबिंबाला फक्त 'सुरेख' म्हणतात, रंगच्छटांना केवळ 'सुंदर' हें एक विशेषण देतात; रंग कोणते व कशासारखे, जेणेंकरून चित्र हुबेहूब डोळ्यांपुढें उभें राहील तें सांगत नाहींत. ज्यांनीं सृष्टि प्रत्यक्ष पाहिली आहे एवढेंच नव्हे तर अनुभवून हृदयांत सांठवून ठेविली आहे, ते एकेका विशेषणानेंही सृष्टीचें विशिष्ट रूप डोळ्यांपुढें उभें करूं शकतील. उदाहरणार्थ, बालकविकृत 'निर्झरास' या कवितेंतील 'घे लोळण खडकावरती' 'फिर गरगर अंगाभंवतीं' यांसारख्या ओळी पहा. ही जादू केशवसुतांच्यामध्यें नाहीं. ते विशिष्ट भावनेची उणीव चमत्कृतीनें, आणि वर्णनांतील जिवंत हुबेहूबपणाची उणीव क्लृप्तीनें भरून काढतात. उपमा देतांना ते मूर्ताला अमूर्ताची व अमानवीस मानवीची उपमा

देण्याचें नाविन्य ( आणि हा प्रकारसुद्धां आंग्ल वाङ्मयांतून विशेषतः शेलीवरून उचलला आहे. ) प्रकट करीत असल्याकारणानें चमत्कृति तितकी अधिक वाटते; पण त्यामुळें सृष्टीचें चित्र अधिक स्पष्ट, रेखींव वा हृदयंगम होतें असें मुळींच नाहीं. पुढील वर्णनें पहाः—

( १ ) " फुलें तीं वल्लींच्या नव किसलयीं शोभत किती !–
तुझ्या ओंच्यामध्यें जशि निज अपत्यें विलसती !
स्वतांशीं तें होतें विपिन मधुरे, फार गढलें
मुलांच्या शब्दांहीं स्वसदन असें जेंवि भरलें;
सुगन्धें तें होतें स्थल भरुनि गेलें अतिशय,
तुझ्या प्रेमानें हें भरुनि असतें जेंवि निलय. " ( पृ. ७४ )

( २ ) " जशा कांहीं नाव्या अनवरत देहांत उडती
तशा ना सिंधूच्या चपल लहरी या उचलती ? " ( पृ. ३३ )

( ३ ) " मनोराज्यीं जैशा विविध हृदयीं क्लृप्ति उठती,
तशा ना अब्धीच्या तरल लहरी या विलसती ? " ( ,, )

( ४ ) " ज्यांच्या थोर शिलांतुनी धबधबा जाती तसे निर्झर
वाणीचे कविदुर्दशा मधुनिया ते ओघ यावे जसे " ( पृ. १३४ )

( ५ ) " हें हृद्रम्य तरंगताण्डव मला तशापरी वाटतें
अज्ञेयावरती जसें क्षणिक हें अस्तित्व हो खेळतें " ( पृ १२७. )

उपमेंत योग्य साधर्म्य असलें म्हणजे ती मनोरम वाटते; परंतु तिच्यामुळें जर सृष्टिवर्णनांत कांहीं असत्य दृग्गोचर झालें तर ती मौज नष्ट होते.

" आस्वर्गात् चढती सदोदित महात्म्यांचीं अशीं मानसें
या दृष्टीपुढते पुन्हा बवतसें अद्रीश ते हो तसे " ( पृ. १३४ )

डोंगर वस्तुतः आकाशास स्पर्श करीत नसले तरी निदान तसा भास तरी होतो. पण पर्वत वाढतात, उंच उंच चढतात असा भास कधींच होत नाहीं. एका मागून एक उंच उंच दिसणाऱ्या डोंगरांच्या रांगा पाहून त्या दृश्यावर कोणी स्वर्ग-सोपानाची उत्प्रेक्षा केली तरी हृदयंगम वाटेल. पण स्थावर अद्रीश आस्वर्गात् चढतात असें मानणें कविसृष्टींतही चुकीचें आहे. विंध्याद्रीला अगस्तिमुनींनीं असाच विनम्र रहा हें बजावण्यापूर्वी त्याच्यांत मात्र आस्वर्गात् चढण्याची शक्ति होती असें पुराणांवरून समजतें.

केशवसुतांना प्रत्यक्ष सृष्टीविषयीं प्रेम होतें, अथवा त्यांनीं तिचें सूक्ष्मपणें निरीक्षण केलें होतें असें वाटत नाहीं. ते चमत्कृतिजनक अशी एखादी कल्पना लढविण्याच्या अथवा सामान्य बोध शोधून काढण्याच्या मागें लागतात ' एक खेडें ' ( पृ. १५ ) यांतील वर्णन स्थूल व सामान्य असून त्यांत वर्णिलेली खेडवळ रहाणीची थोरवी आंग्लवाङ्मयावरून घेतलेली आणि अगदीं अवास्तव आहे. रा. भास्कर रामचंद्र तांबे यांची ' गुराख्याचें गाणें ' म्हणून जी कविता आहे तींत हाच दोष आहे. ' फूलपाखरूं-मरण पाहिलें आहे का कोणी ? ' असा प्रश्न केशवसुत करितात. त्याला कोणीही सृष्टि-निरीक्षक ' होय, पाहिलें आहे' असेंच उत्तर देईल; अर्थातच केशवसुतांना जें फुलपाखराचें अमरत्व सूचित करायचें आहे त्याला या उत्तरानें बाध येईल. ते पुष्पाकडे पाहून रंगून जातांना दिसत नाहींत, तर सामान्य बोधतत्त्वें शोधून काढण्याच्या दृष्टीनें ते पुष्पाविषयीं विचार करितांना आढळतात. ' पारिजाताचीं फुलें ' ( पृ. ३८ ) जास्वंदीच्या फुलांना म्हणतात, " हा रक्तिमा घेऊन शाखांवर का सदैव रहाणार आहांत ? मरून याच मातींत पडाल व अज्ञात अशा थडग्यांत जाल. ही स्थिति आमच्या भाळीं न येवो म्हणून आम्ही थडग्यावर आपलें नांव स्वगंधानें लिहायला झटतों." भाषाप्रयोगावरून ही कविता इंग्रजीवरून भाषांतरिलेली असावी असा संशय येतो. तें कांहींही असो. परंतु वरील कवितेंतील विचारसरणी भ्रामक आहे हें खास; कारण, बकुळीचें फूल वगळल्यास गंध हा सामान्यपणें रंगाबरोबरच लयाला जातो.

' पुष्पाप्रत ' या नांवाच्या दोन कविता आहेत. त्या कोणत्या पुष्पांना संबोधून आहेत याचा त्या कवितांवरून कांहींच बोध होत नाहीं. १८८९ सालीं लिहिलेल्या ' पुष्पाप्रत ' या कवितेंत बोधतत्त्वग्राहक दृष्टि आहे; पण १८९२ सालीं लिहिलेल्या 'पुष्पाप्रत' या कवितेंत एका भावनेचा आविष्कार आहे आणि हीच कविता मनावर खोल ठसा उमटविते. सृष्टींतील एखादें दृश्य पाहून जी स्फूर्ति होते तिच्या ओघांत स्वाभाविकपणें एखादें तत्त्व सुचणें निराळें आणि सृष्टि अभिनव तत्त्वें शिकविते ही वर्डस्वर्थवरून घेतलेली कल्पना उराशीं कवटाळल्यामुळें निसर्गापासून सामान्य बीजतत्त्वें शोधून काढण्याचा प्रयत्न करणें निराळें. बुद्धीला तसें वळण मिळालें म्हणजे ज्याप्रमाणें यमकें, अनुप्रास, कोट्या हीं सुचूं लागतात त्याचप्रमाणें बोधवचनेंही सुचूं लागतात. हा बुद्धि-विलास चमत्कृतिजनक असतो व तेवढ्यापुरता तो काव्यापासून होणाऱ्या आनंदांत थोडी भर टाकतो हें खरें,

पण भावनेची, सरसतेची उणीव तो क्वचित् झाकूं शकला तरी भरून काढूं शकत नाहीं. रा. वि. स. खांडेकर यांच्या सर्वच गोष्टींत चमत्कृतिजनक कोट्या व आल्हादकारक सुभाषितें यांचा सुकाळ असतो; उलटपक्षीं हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांत तशा कोट्यांचा व सुभाषितांचा दुष्काळच असतो असें म्हटलें तरी एकवेळ चालेल. तथापि ' पण लक्षांत कोण घेतो ? ' ही कादंबरी जितकी सरस, हृदयंगम व परिणामकारक वाटते तितकी ' हृदयाची हांक ' ही बिलकुल वाटत नाहीं; आणि यांतील रहस्याकडे दुर्लक्ष्य होतां कामा नये.

' विकसन ' ( पृ. ४५ ) ही कविता प्रो. राजवाडे यांस फार चांगली वाटते. कारण, तिच्यांतील व्यंग्य फार मनोरम आहे. या कवितेंत एका कलिकेवर—ती कोणत्या फुलाची कलिका आहे तें कळायला मार्ग नाहीं—मुग्ध व सलज्ज नवयौवनेचा आरोप करण्यांत आला आहे. हें व्यंग्य फार मनोरम आहे एवढ्याच कारणावरून ही कविता फार चांगली वाटली असल्यास नकळे. आरोप स्थूल मानानें शोभून दिसतो; पण सविस्तर विवेचन केल्यास तितक्या साऱ्या बाबतींत तो भरपूर पटेल असें सादृश्य दाखविलें गेलें पाहिजे. दंवाच्या थेंबावर एकदां स्वेदबिंदूचा व नंतर लगेच अश्रुबिंदूचा आरोप करणें तितकें इष्ट नाहीं पण तें एकवेळ धकेल; वाताकुल कलिकेस भीतीनें कंप सुटला असें म्हटलें तर तें उचितच होईल; पण ' भेणें तिनें मुरकुनी शिर नम्र केलें ' तें कसें ? मनुष्याला ज्याप्रमाणें कांहीं अवयव, बाकीचे स्थिर ठेवून, हलवितां येतात तसें कलिकेस कांहीं करितां येतें काय ? कळी ज्या स्थितींत झाडावर आली असेल त्याच स्थितींत ती फुलत नाहीं काय ? साधर्म्याच्या सहज उल्लेखांत जी मजा आहे ती बहुशः विस्तृत विवेचनांत राहूं शकत नाहीं.

" असे सुंदरता अढळ जरी कोठें
तरी करि ती सृष्टींत मात्र वास "—( पृ. १० )

हें सिद्ध करायला अवलंबिलेली विचारसरणी हेत्वाभासमूलक आहे. ज्या गोष्टीपासून एकदां विशेष आनंद झाला तिच्यापासून पुन्हा तितकाच आनंद होऊं शकत नाहीं मग सृष्टि तीच्तीच असून नेहमीं सारखा आनंद कां देऊं शकते ? अर्थात् अढळ सौंदर्य जर कोठें असेल तर तें सृष्टींतच असलें पाहिजे अशी ही विचारसरणी आहे. पण अतीव सुंदर दृश्यापासून प्रथम दर्शनीं जो आनंद होतो तो द्वितीय दर्शनीं बहुशः एकदम कमी होत नाहीं. कित्येकदां तर त्यांतील नव्या

नव्या सौंदर्यच्छटा दृग्गोचर झाल्यामुळें आनंद उलट वाढतो. शिवाय सृष्टि तीनूतीच आहे हें केवळ स्थूल मानानें खरें आहे. कालचे जे पक्षी तेच आज त्याच त्याच वृक्षांवर वसून कालचींच गाणीं गात आहेत हें वर्णन सत्यास धरून नाहीं. सूर्य तोच व आकाश तेंच असलें तरी वातावरणांतील फेरफारामुळें कोणतेही दोन सूर्योदय वा सूर्यास्त एकसारखे असत नाहींत. सृष्टिस्वरूपांत तेंच तेंपण नाहीं म्हणूनच तर मनुष्याला नित्य नवा आनंद होतो. जेथें सृष्टीचें स्वरूप रोजच्या रोज तेंनूतेंच दिसतें तेथें मनुष्याच्या मनावर व शरीरावरही असा अनिष्ट परिणाम घडतो कीं स्थलांतर हाच एक त्याला उपाय उरतो.

'म्हातारी' ( पृ. १४८ ) ही कविता जितकी चमत्कृतिजनक आहे तितकी हृदयस्पर्शी नाहीं. 'तव जनिमृति न दिसे' हें विधान एक चमत्कृतिजनक असत्य नाहीं तर काय ? मनुष्य विशिष्ट शोकमय मनःस्थितींत असतांना त्याला उडणारी म्हातारी पाहून एखाद्या सजीव आनंदी परीचा भास, ती त्याला मूर्तिमंत आनंदमय बाल्य वाटेल; त्यास तें एखाद्या सूक्ष्म आनंदी जीवाचें तरल वाहन-ही वाटेल. या साऱ्या कल्पना भावनास्फुरित व हृदयंगम वठतील; पण 'म्हातारी'वर खपुष्प, अज्ञातध्वनि, यदृच्छा इत्यादिकांचा आरोप केल्यामुळें जरी एक व्याजोदात्त वातावरण निर्माण झालें, आणि काय या कवीच्या अनंता-पर्यंत भराऱ्या असा अचंबा वाटला, तरी हा कष्टसाध्य बुद्धि-विलास वाटतो. या बुद्धिजन्य व बुद्धि-गम्य कसरतीनें वाचकाच्या भावनेला चालना मिळत नाहीं. या कवितेच्या पुढें दिलेल्या भागांत ही कसरत नाहीं;—

"थाम्ब, थाम्ब ! जाशी अशी का फिर ये गे मजशीं;
वयस्कता माझी म्हणुन जर करिशी इतराजी
तर माझी सोनी पाहुनी ये गे परतोनी !
तुजला पाहूं दे, तियेला खिदळत राहूं दे !
मज वय विसरूं दे, मुग्ध मधु बाल्यीं उतरूं दे !
ते दिन पुष्पांचे कोवळ्या किरणीं खेळाचे !
हे दिन—हाय !—
हे दिन चिन्तांचे परन्तु लटिकें हंसण्याचे !
हे दिन......जाऊं दे ! मला तुज गाणें गाऊं दे !" (पृ. १४९)

आणि हाच भाग विशेष हृदयंगम आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

भावनेच्या उद्रेकांत बाहेर पडणारे कवीचे विचार हे कल्पनेचें गोचर रूप घेऊनच बाहेर पडतात; पण हें रूप निसर्गसिद्ध पाहिजे. तें अंगकांतीप्रमाणें असावें; पृथक् अस्तित्व असलेल्या, लावतां पुसतां येणाऱ्या त्वग्रंगासारखें नसावें. सहजस्फुरित रूपकापासून जसा आल्हाद होतो आणि अर्थाचें आविष्करण जसें अधिक होतें तसें कांहीं हठाकृष्ट रूपकापासून घडून येत नाहीं. हठाकृष्ट रूपकांत कृत्रिमता सूचित करणारें कांहीं तरी न्यून्य डोळ्यावर येतें. जीव आणि कुडी यांचा एकदमच सहसंभव व संयोग होऊन व्यक्तीची निर्मिति होते. विचार-दृष्ट्या जीव व कुडी यांची भिन्नता कल्पितां येण्याजोगी असली तरी व्यक्तिदृष्ट्या तीं अभिन्नच असतात. जीव आणि कुडी यांचें लग्न लागून त्यांच्यापासून व्यक्ति ही प्रजा झाली हें म्हणणें जसें चुकीचें होईल तसेंच भाव आणि मूर्ति यांचें लग्न होऊन त्यांच्यापासून कविक्लृप्ति ही प्रजा झाली हें म्हणणें चूक होईल; कारण, अमूर्त भाव वा रस आणि मूर्त शब्द या, कवितेस जन्म देण्यासाठीं एकत्र येणाऱ्या भिन्न व्यक्ति नसून, केवळ विचारदृष्ट्याच भिन्न अशा कवितेंत सम्मीलित होणाऱ्या गोष्टी आहेत. ध्यान नामक कुंजाच्या द्वारीं कविरूपी उपाध्याय स्फूर्तिज्वालेवर आपल्या जीविताचा होम करून मूर्ति आणि भाव यांचें लग्न लावितो आणि कविक्लृप्ति ही त्या जोडप्याला होणारी प्रजा होय असें जें केशवसुत 'चिन्हीकरण' (पृ. १६४) या कवितेंत म्हणतात तें यथार्थ वाटत नाहीं. एखादा सामान्य विचार जर जिव्हाळ्यानें सरळ अगोचर भाषेंत मांडला तर तें काव्य होणार नाहीं असें नाहीं, उलटपक्षीं काव्याला गोचर स्वरूप पाहिजे अशा विचारानें कवि जेव्हां त्याचें मूर्तिकरण करूं लागतो तेव्हां मात्र तें क्लिष्ट व कृत्रिम होतें.

अशा क्लिष्ट मूर्तीकरणाच्या बऱ्याच कविता केशवसुतांनीं रचिल्या आहेत. संक्षेप करून रचना अधिक भरगच्च केली असती तर 'समृद्धि आणि प्रीति' (पृ. ४८) व 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' (पृ. १०१) या कविता उत्तम झाल्या असत्या. 'शब्दांनो मागुते या!' (पृ. ९४) व 'स्वप्न' (पृ. ६८) या कवितांतील मूर्तिकरण क्लिष्ट आहे. 'शब्दांनो, मागुते या!' या कवितेवर प्रो. राजवाडे यांनीं "कल्पना फारच उत्तम, कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट" असें मत दिलें असल्याकारणानें तिचें विस्तारानें परीक्षण करणें जरूर आहे. तारुण्याच्या नव्हाळींत हृदयांत कवितेचा संचार झाला; त्या नादांत कवीनें

अनेक कविता लिहिल्या व 'गद्यग्रथित' प्रत्यक्ष जगाला तुच्छ लेखिलें. त्या जगानें दिलेल्या शापांनीं चित्ताग्नि भडकून हृदयाची नव्हाळी करपून गेली आणि कवितेचें स्फुरण बंद पडलें. या अर्थाचें कवीनें पुढीलप्रमाणें मूर्तिकरण केलें आहे. आकाशांतून शारदेचा देव्हारा वाहून नेणाऱ्या तेजस्वी शब्दपक्ष्यांनीं माझी हृदयभूमि हिरवीगार पाहून तो देव्हारा उतरून तेथें स्थापिला. त्या शब्दांसंगें हृदयवनांत संचार करून अनेक कल्पपुष्पें खुडून मी शारदेची पूजा बांधिली. त्या शब्दपक्ष्यांच्या कूजितानें हृत्प्रांत नादमय झाला आणि त्या नादांत मी गद्यग्रथित जगाला तुच्छतेनें दूर लोटिलें. त्या जगानें रागानें मला शाप दिल्याबरोबर चित्ताग्नि भडकून हृदयाची हरितता नष्ट झाली; आणि ते सारे गाणारे शब्द-विहग शारदेच्या दिव्य देव्हाऱ्यास त्या दग्ध हृद्वनांतच टाकून देशांतराला गेले! आशामेघांच्या वर्षावानें आतां तो चित्ताग्नि विझून नवा बहार येईलसें वाटतें. तेव्हां शब्दांनो, मागुते या! शारदे, त्या शब्द–विहगांना परत बोलावून घे. त्यांच्या साहाय्याशिवाय तुझें भजन मी कसें करूं?

तेजाचे पंख, शारदेचा देव्हारा, कल्प-पुष्पांनीं बांधलेली पूजा इत्यादि दृश्यांनीं या कवितेंत एक प्रकारची दिव्यता, पवित्रता आली आहे यांत शंका नाहीं. आणि स्थूलमानानें चित्र रमणीयही आहे. परंतु या चित्राकडे निरखून पाहूं लागलें कीं नवी नवी मजा दृष्टीस पडण्याऐवजीं चित्राचे रंग उडून जाऊं लागतात. कवीची चित्तभूमि हिरवी प्रसन्न पाहून शब्दविहंगांनीं तेथें शारदेचा देव्हारा ठेविला, तर पुढें ती हरितता नाहींशी झालेली पाहून ते जेव्हां स्वाभाविकपणें तेथून अधिक कमनीय अशा देशाला उडून गेले तेव्हां जातांना त्यांनीं तो देव्हारा नेला कसा नाहीं? का बरें झालें, ओझें गेलें म्हणून स्वतःचें समाधान करून घेण्याइतके ते सारे स्वार्थी होते? बरें, शब्द हे एका दृष्टीनें अर्थवाहक आहेत, अर्थाची अभिव्यक्ति व त्याचें ग्रहण हीं शब्दांच्या द्वारां होतात. शब्दांच्या द्वारा काव्यभाव कळतो; पण शब्द कांहीं हृदयांत काव्यशक्ति, प्रतिभा उत्पन्न करूं शकत नाहींत. त्याचप्रमाणें वाचकांत जर ग्रहणशक्ति नसेल आणि कवींत जर व्यक्ति-सामर्थ्य नसेल तर शब्द भाषेंत असूनही ते अचेतन पडून रहातील. जेथें शब्द जातात तेथें काव्य जातें असें नाहीं तर जेथें काव्य जातें तेथें शब्द अनुसरतात. हृदयाची हरितता नष्ट झाली म्हणून गाणाऱ्या शब्द-पक्ष्यांनीं उडून जाण्याचें काय प्रयोजन आहे? सांसारिक तापानें तारुण्याची नव्हाळी करपल्या-

वरही हृदयांत जर प्रतिभा असेल तर ती निःशब्द मूक व्हाणार नाहीं, ती शोक-गीतें रचील ! कवीची दुर्दशा झाली तरी तिच्यांतून वाग्मोघ धबधबा वहातात असें केशवसुतांनीं ‘ नैऋत्येकडील वारा’ या कवितेंत म्हटलें आहे.

का या कवितेंत केशवसुतांना कांहीं विशिष्ट अनुभव सांगायचा आहे ? तेजाचे पंख, गाणारे शब्द हे शब्दप्रयोग Winged fancies, Musical words, words winged with light इत्यादि इंग्रजी वाक्यप्रयोगांवरून सुचले असावेत. केशवसुतांना विशेष स्फूर्ति इंग्रजी कवितेच्या वाचनामुळें झाली असावी. आपणाला जें विशेष आवडतें व आपण जें वेडावून जाऊन वाचतों त्याचें अनुकरण स्वाभाविकपणें मनुष्याच्या हातून होतें. येथें अनुकरण हेंच साध्य असतें, इतर कांहीं साधण्यासाठीं योजिलेलें तें साधन नसतें. ही अनुकरणाची प्रवृत्ति अत्यंत स्वाभाविक आहे; आणि पुढें स्वतंत्र व श्रेष्ठ झालेल्या कवींना कवित्वाकडे वळवायला, प्रतिभेला जागृत करायला, प्रथमतः बव्हंशीं हीच कारणीभूत होते. केशवसुतांच्या भाषांतरित कविता हीच प्रवृत्ति दाखवितात. इंग्रजी कवितांच्या सतत वाचनानें त्यांना एक कविता इंग्रजींतच रचावीशी वाटली व ती त्यांनीं रचिली, ही गोष्ट विचारांत घेण्याजोगी आहे. इंग्रजी कविता वाचून त्यांना जो आनंद झाला त्याच्या भरांत स्फूर्ति पावून त्यांनीं कांहीं रचना केली. या रचनेपासून होणाऱ्या स्वाभाविक आनंदाच्या भरांत आपल्या हृदयांत प्रतिभेची ‘दिव्य ठिणगी’ आहे अशी त्यांची समजूत झाली आणि कवि-कवित्वाच्याविषयीं त्यांच्या कल्पना भरमसाट असल्याकारणानें तितक्याच भरमसाट उमेदी त्यांच्या मनांत उद्भूत झाल्या. काव्यग्रंथ हेच त्यांच्या स्फूर्तीचे उगम असल्याकारणानें, जिवंत स्फूर्ति देणाऱ्या गोष्टींचें कधीं न संपणारें भांडार असें जें प्रत्यक्ष जग-ज्याला त्यांनीं तुच्छतापूर्वक ‘ गद्यग्रथित ’ ( prosaic ) म्हटलें आहे-त्याच्याकडे त्यांचें दुर्लक्ष झालें, किंबहुना त्याच्यासंबंधीं त्यांचा भलताच गैरसमज होऊन त्यांचें मन प्रत्यक्ष सृष्टिनिवृत्त झालें; कारण “ उदासीन ही जगाविशीं तव तन्मयता सृष्टीशीं” असें ते म्हणतात. त्या जगानें रागानें कवीस शाप दिला असें ते म्हणतात; पण त्यांत कांहीं तथ्य नाहीं; त्या शापाची प्रतिभेपुढें काय मातब्बरी ? केशवसुतांच्या कवितांचें स्वागत, आंग्ल समाज ज्याप्रमाणें आंग्ल काव्याचें करितो त्याप्रमाणें समकालीन बहुजनसमाजानें केलें नाहीं हें खरें. या औदासीन्याचा परिणाम अंशतः कविमनाची हरितता पार नाहींशी करण्यांत झाला असेल. पण

ऐहिक उपेक्षेला प्रतिभेचा जिवंत झरा आटवितां येणार नाहीं. पण प्रत्यक्ष सृष्टिनिवृत्त झाल्यामुळेंच त्यांच्या स्फूर्तीचा ओघ बळावूं शकला नाहीं व ते निराश झाले. एखादे वेळीं अमुक एक कल्पना सुचून तो काव्यविषय होण्यास योग्य आहे असें वाटावें पण ती शब्दसृष्टींत व्यक्त करायला लागणारी जोरदार स्फूर्ति होऊं नये, हौसच नाहींशी व्हावी व एक प्रकारची कर्म-पराङ्मुख करविणारी उदासीनता पसरावी अशी केशवसुतांची स्थिति झाली. कांहीं काळानंतर पुन्हा आशा पालवली. हृदयांत कवितादेवी आहे अशी त्यांची श्रद्धा होतीच. पण प्रतिभा स्फुरेना. त्यांना वाटलें, उणीव गाणाऱ्या शब्दांचीच आहे. त्याबरोबर ते आळवूं लागले, " शब्दांनो, मागुते या ! "

शब्दांच्या विषयींची केशवसुतांची कल्पनाच चुकीची आहे. शब्दांना ते फारच महत्व देतात. शब्दांचा अर्थ जनसंकेतावर अवलंबून असतो. कवितेंत शब्दांची अर्थवाहकता वाढलेली दिसते याचें कारण कवितेंतील शब्द कोणी निराळे असतात असें नाहीं. कविप्रतिभेच्या योजना-चातुरीचा तो परिणाम असतो. लोक निष्कारण व निष्काळजीपणानें शब्द वापरूं लागले कीं त्यांचें सामर्थ्य ऱ्हास पावूं लागतें. अशा अवनत, दुर्बल शब्दांनांही प्रतिभासंपन्न लेखक कांहीं मर्यादेपर्यंत पुन्हां उन्नत व कार्यक्षम करूं शकतो; पण ' वातचक्र ' या कवितेंत केशवसुत म्हणतात.

" वाग्देवी गे ! दे शब्दांतें
भोंवऱ्यांत या फेंकुनि, त्यांतें
जरा जाउं दे निजधामातें
नरें मळविलें अहह ! तेज तें पूर्वी होतें जें त्यांत !
म्हणुनी शाप न आतां मारी
आशीर्वचहि न आतां तारी,
तर गर गर गर त्यांस चढूं दे ताजे व्हाया स्वर्गांत ! " (पृ. १३८)

जणूं काय शब्दांना पाजळून सतेज करण्याचें सामर्थ्य खुद्द वाग्देवींतही नाहींच ! वर्डस्वर्थच्या अमरत्वाभासावरील कवितेंतील विचारांनीं केशवसुतांचा विलक्षण पाठलाग केलेला दिसतो !

' स्वप्न ' ( पृ. ६८ ) या कवितेंतही किती क्लिष्ट मूर्तीकरण, अवडंबर व विसंगति ! काव्य हें जरी एक प्रकारचें वेड आहे असें मानिलें तरी त्या वेडांतही

एक प्रकारची सुसंबद्धता असावी लागते. मनुष्य झोपेंत असतांना त्याच्या परिस्थितीचें स्वप्नसृष्टींत फार चमत्कारिक स्थित्यंतर होत असतें. केशवसुतांना, नव्हे, काव्यनायकाला म्हणा, प्रियाविरहानें एक चमत्कारिक स्वप्न पडलें. त्यांचीं वियोग-गान्हाणीं ऐकून प्रीतीनें त्याला हंसाचे पक्ष दिले. त्यानें तिला सानंद प्रणाम करून, ते स्कंधास लावून अंतराळीं उड्डाण केलें. तो नायक एका मेघवेष्टित तेजाळ तारकावर उतरून प्रियेला कसा भेटूं, तिला कोणत्या शब्दांनीं रिझवूं याचा विचार करूं लागला. तों सखीही परीप्रमाणें उड्डाण करून तेथें आली आणि मग—चुंबनालिंगनांनीं तीं एकत्र होतात तोंच तो तारा तुटला, आणि नायक घसरून या 'क्लिष्ट' (?) (का क्लेशकारक ?) पृथ्वीवर पडला ! त्या धक्क्यासरशीं त्याची तंद्री पळाली आणि तो पहातो तों कोठें आहेत ते हंसाचे पंख ?

"माझ्या या हृदयावरी ममन्वि हे वेंगून होते कर
हंसाचीं नव्हतीं पिसें चढविलीं या दोन बाहूंवर !"

आतां स्वप्नांत पंख न फुटतांही उडतां येतें; तेव्हां फार तर पंख फुटले व मी उड्डाण केलें इतकें म्हणणें पुरें झालें असतें.

"प्रीतीला विरही दशा कठिण ही मी फार गान्हाणिली,
हंसाचे मग पक्ष ती द्रवुनिया देती मला जाहली"

अशा सविस्तर प्रस्तावनेची आवश्यकताच नव्हती. तें असो; पण कवीनें उड्डाण केल्यावर तो तडक प्रियेकडे कां गेला नाहीं ? केशवसुतांनीं 'अहा पक्षी हे चित्र पंख यांचे' ही कविता ज्या आंग्लभाषांतरावरून भाषांतरिली आहे तिच्यांत स्पष्ट म्हटलें आहे—

"If I could float like them in air,
When I should go through shine and wet ?
Not to the rose, as red it glows
But o'er the vales and forests high
Straight to thy lips that smiles unclose,
Flower of my soul, and there I'd die."

येथें नायक एका तेजाळ ताऱ्यावर जाऊन कां उतरला ? का त्याला प्रियेचें निवासस्थान माहीत नव्हतें ? का ती दिवंगतच झालेली होती ? का तो तारा

हेंच त्याचें संकेतस्थान होतें ? तसें तें होतें म्हणावें, तर प्रियेला कसा भेटूं हा प्रश्न कां उभा रहावा ? भेट होऊन तारा तुटल्यावर नायकाला हंसाचे पक्ष असतांना पृथ्वीवर घसरून पडण्याचें कारण काय ? पृथ्वीवर आपटून गुंगी गेल्यावर पंख नाहींत हें कळलें; अर्थात् पूर्वी पंख असलेच पाहिजेत. बरें, परीप्रमाणें उड्डाण करूं शकणारी प्रिया त्याला सांवरूं शकली नाहीं हें कसें ? या कवितेंत अंतराळीं ताऱ्यावर भेट घडल्याचें म्हटलें आहे एवढ्याच करितां "या चुटक्यांतील कल्पनेची भरारी फारच कुतूहलजनक व उच्च दर्जाची आहे" असें म्हणण्याचा मोह वरवर पहाणारास होत असावा. वस्तुतः ही कविता कृत्रिम आहे. विनायकाची याच विषयावर जी कविता आहे ती या कवितेहून कितीतरी सरस व सुसंगत आहे !

उपमितिनिष्ठ अनुमानांत क्षणभर गंमत वाटते; परंतु अशा तऱ्हेच्या मजेदार पण अतर्कशुद्ध विचारसरणी करणारास तत्त्वज्ञ म्हणणें चुकीचें होईल. या विचारसरणींत जो नावीन्याचा भास होतो तो मोहक वाटतो खरा, पण तो भास जितका टिकतो तितकीच त्याची योग्यता समजली पाहिजे. 'धूमकेतु आणि महाकवि' 'अढळ सौंदर्य' व 'जास्वंदीचीं आणि पारिजाताचीं फुलें' यांतील हेत्वाभासमूलक विचारसरणीचें परीक्षण मागेंच झालें आहे. 'प्रयाणगीत' (पृ. ४४), 'दिवा आणि तारा' (पृ. ९५) 'दिवस आणि रात्र' (पृ. १६२), 'प्रणयकथन' (पृ. १३१), 'मयूरासन आणि ताजमहाल' (पृ. ९७) इत्यादि चुटक्यांत तशीच मजेदार विचारसरणी आढळते. अशा तऱ्हेची विचारसरणी नेहमींच कृत्रिम असते असें नाहीं. क्षणैक समाधान करण्यासाठीं स्वाभाविकपणेंच प्रत्येकजण तिचा थोडाबहुत तरी अवलंब करितो. तेव्हां ज्या मानानें ही अतर्कशुद्ध विचारसरणी स्वाभाविक असेल त्या मानानें ती केवळ चमत्कृतिजनकच नव्हे तर हृदयंगमही वाटते. तांबे यांनीं एका सांवळ्या मुलीचें समाधान करण्याकरितां जी कविता लिहिली आहे ती अशीच मजेदार आहे. तींत विनोदाचीही सूक्ष्म छटा आहे; परंतु गंभीरपणानें एखादें तत्व सिद्ध करण्यासाठीं तशा विचारसरणीची योजना झाली तर वाचकांची दृष्टि बदलून हेत्वाभास उघडकीस येतो. मजेदार विचारसरणीचीं उदाहरणें म्हणून 'मयूरासन आणि ताजमहाल' 'दिवस आणि रात्र' आणि 'प्रणयकथन' या तीन कविता उत्तम आहेत. स्ववैभवप्रदर्शनासाठीं तयार केलेलें सहा कोटी रुपयांचें मयूरासन

चोरीस कां गेलें तर बादशाही सामर्थ्य लयाला गेलें होतें आणि तें मयूरासन जंगम हलवितां येण्याजोगें होतें म्हणून. उलटपक्षीं तीनच कोटी खर्च करून बांधलेलें प्रियपत्नीचें चिरनिद्रामंदिर अजून यमुनातीरीं शाबूत कां आहे तर तें पाषाणी, स्थावर आहे म्हणून. मयूरासन म्हणजे स्वार्थाच्या प्रकृतीपुढें जाळलेला धूप म्हणून त्याची अशी विल्हेवाट लागली असेंही नाहीं; आणि ताजमहाल म्हणजे प्रीतीपुढें धरिलेला साधा टेंभा म्हणून तो सदैव सतेज राहील असेंही नाहीं. ताजमहाल शाबूत आहे याला कारण त्याचा नाश करायला एखादा धर्मवेडा, दीर्घद्वेषी, बलाढ्य, अरसिक, रानटी राजा अजून सुदैवानें झाला नाहीं हेंच होय. मानवी प्रीतीसाठीं बांधलेल्या स्मारकाची ती काय प्रतिष्ठा ? ईश्वरभक्तीनें प्रेरित होऊन मथुरेंत व इतरत्र हिंदूंनीं बांधलेल्या वास्तुशास्त्राच्या उत्कृष्ट नमुन्यांची धर्मवेड्या मूर्तिभंजकांनीं काय दशा केली ! हीं मंदिरें म्हणजे कांहीं स्वार्थाच्या प्रकृतीपुढें जाळलेला धूप नव्हता ! हें सारें खरें; तथापि ताजमहालासारखें प्रीत्यर्पित सौंदर्यपुष्प आणि मयूरासनासारखें साम्राज्यवैभवस्मारक या दोन्ही गोष्टींचा विचार मनांत आला कीं केशवसुतांनीं काढिलेलें अनुमान साहजिकच एकदम सुचतें. यासाठींच, अनुमान तर्कशुद्ध नसलें तरी स्वाभाविक आहे म्हणून, 'मयूरासन व ताजमहाल' ही कविता सरस व हृदयंगम वाटते. 'प्रणयकथन' (पृ. १३१) या कवितेंतही विनोदाची सूक्ष्म छटा असल्यामुळें एकंदरीनें ती स्वाभाविक व चांगली वाटते, पण 'प्रणयगीत' (पृ. ४४) ही कविता समाधानकारक वाटत नाहीं. तिच्यांतील

"तुजला सोडुनि जाणें येई, सखे ! जिवावरती,
परी ओढुनी दूर नेति या, निर्दय दैवगती !

* * *

रवि, पूर्वेला रडत सोडुनी, कष्टें मार्ग धरी
प्रहरामागें प्रहर लोटतां तिजला घे स्वकरीं !"

अशा विचारसरणीचा उपयोग पत्नीस सोडून रात्रीपुरताच इतरत्र रमायला जाणाऱ्या रसज्ञानेंही कुत्सितपणानें करायला हरकत नाहीं. 'दिवा आणि तारा,' 'दिवस आणि रात्र' वगैरे कविता प्रभाकराच्या लक्ष्मीपार्वती संवादाप्रमाणें क्षणभर करमणुकीच्याच आहेत.

कवीनें काय करावें तें केशवसुतांनीं वासुदेव बळवंत पटवर्धन यांस पुढील-प्रमाणें सांगितलें आहे:—

" निर्जीव वस्तु तर लाव वदावयाला,
जंतूंस लावहि विचार करावयाला,
आम्हां शिकीव सुवचीं सुर व्हावयाला,
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला!" (पृ. ५१)

केशवसुतांनीं हें आपलें कर्तव्य पार पाडण्यासाठीं, जनतेला स्फुरण व बोध देण्यासाठीं कांहीं कविता लिहिल्या आहेत. ' नवा शिपाई ' (पृ. १२७) या १८९८ सालीं लिहिलेल्या कवितेंत त्यांनीं युरोपांत नवीन निघालेल्या जगच्छांतिवादाचा अनुवाद केलेला आहे. परंतु केवळ युक्तिवादानें आणि बिचाऱ्या शांततानिष्ठेनें जगांत स्वार्थी बलिष्ठांकडून न्याय मिळत नाहीं. खुद्द केशवसुतांनींच, पोकळ तोऱ्यांत बडबडणारे आळशी, वैयक्तिक चैनीसाठीं दास्य पत्करणारे गुलाम, स्वतः अन्याय सहन करून वर नवीन पिढीलाही दीन व प्रतिकारविमुख व्हायला शिकविणारे मुर्दाड यांच्याविषयीं तीव्र वैर वाटून त्यांना कठिण शब्दांच्या धोंड्यांनीं हाणाहाण करायला 'छान गोफण' (पृ. १८९) केली आहे. त्यांनीं केलेली ' निशाणाची प्रशंसा (पृ. १३३) ही युक्त व जोरदार आहे. त्यांच्या उद्बोधक व प्रोत्साहक कवितांपैकीं 'तुतारी' व 'स्फूर्ति' या उत्कृष्ट आहेत. तुतारींतील उद्बोधक व प्रगतिपर उपदेश केवळ कळकळीचा व सावेश नाहीं. तेवढ्यानेंसुद्धां ती कविता जिवंत व परिणामकारक झाली असती. भावनेच्या क्षोभामुळें कल्पनेला चालना मिळून विचार कसे आपोआप गोचरवाचक भाषेचें रूप घेऊन बाहेर पडले आहेत व चलच्चित्रपटावरील चित्रांप्रमाणें मनःश्चित्रें कशीं एकामागून एक पुढें येत आहेत तें अभ्यास करण्याजोगें आहे. तुतारीची किंकाळी, गगनाचा स्फोट, जुन्या मूक पडसादांचें दुमदुमणें, राक्षसी संतानांनीं समाजाला फाडून खाणें, दुसरीकडे चाललेला जलसा, गगनव्यापी मेघांनीं रविकिरणांचा केलेला कोंडमारा, पिकावर पडलेली कीड, स्वार्थी अगतिक ढेरपोटे, खांद्यास खांदा भिडवून पुढें जाऊं पहाणारे प्रागतिक, प्राप्तकालाच्या विशाल पर्वतावर पराक्रमानें कोरावयाचीं लेणीं, पुराण पडक्या घराशेजारीं अंधुक दिसणारा अधिक स्पृहणीय असा भावी स्वपराक्रमाचा मनोरा, आपल्या देहांनींच भरून काढलेले खंदक, बावरून दिङ्मूढ होऊन रडणारीं रांडापोरें, गतशतकांचीं सांचलेलीं पातकें क्षालायला घातलेला रक्ताचा सडा, उन्नति आणि समता यांचा ध्वज उंच धरून देवांच्या मदतीला धांवलेली नवी पिढी—सारींच मनश्चित्रें, दृश्यें कशीं परिणामकारक आहेत ! या कवितेच्या प्रथमावृत्तींत

सामाजिक अन्यायाच्या विविध प्रकारांचा उल्लेख करणारीं कांहीं कडवीं अधिक होतीं. तीं वाचनीय असलीं तरी तीं गाळून टाकिल्यानें कविता अधिक परिणामकारक झाली आहे. कवीनें आणखीही एकदां या कवितेवरून हात फिरवायला हवा होता. 'तुतारी' ही प्रगतीची एक आर्ष ऋचा आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति बिलकुल होणार नाहीं.

इंग्रजी वाङ्मयाच्या संस्कारानें ज्या सामाजिक अन्यायांची जाणीव होऊं लागली, त्यांत मजूरांची हलाखी आणि अस्पृश्यता यांचा समावेश होतो. 'मजूरावर उपासमारीची पाळी' ( पृ. ४२ ) व 'अन्त्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ( पृ. ५३ ) या दोन कविता लिहून केशवसुतांनीं आपलें प्रागतिक औदार्य व्यक्त केलें आहे; पण ते त्या काळांतील त्या वर्गाच्या अन्तरंगाशीं समरसलेले दिसत नाहींत.

" हीं मंदिरें हो खुलतात चांगलीं
माझ्या वडीलींच न काय बांधिलीं ? "

या ओळींत, भांडवल अर्थोत्पादक नसून श्रमच खरोखर अर्थोत्पादन करितो हा कार्ल मार्क्सचा सिद्धांत ध्वनित केला आहे. मजूरांचे कांहीं पुढारलेले मुकादम आज या तत्त्वाची केवळ पोपटपंची करितांना कोठें कोठें दिसतात; मग ४० वर्षांपूर्वी याची पुसट ओळखसुद्धां हिंदी मजूराला असेल काय ? शिवाय

" हेवा तयांचा मजला मुळीं नसे
जाडी मला भाकर ती पुरे असे "

असें म्हणणारी निर्मत्सर अल्पसंतुष्टता केवळ अवास्तव, काल्पनिक, काव्यप्रांतांतून आलेली आहे. हिंदी अशिक्षित शेतकरीवर्ग व कांहीं अंशीं मजूरवर्ग हे अल्पसंतुष्ट आहेत. पण ते कां तसे आहेत तर ते आळशी व प्रारब्धवादी आहेत, प्रतिकूल अभय परिस्थितीला धडका देऊन उडवून टाकण्याला लागणारें तत्त्वनिष्ठाजन्य वा महत्त्वाकांक्षी धाडस त्यांच्यांत नाहीं म्हणून. एरव्हीं त्यांना चैनीच्या गोष्टी नको आहेत असें थोडेंच आहे ? अस्पृश्यतानिवारणवादी कवितेंतही असाच दोष आहे.

"जरी त्यावरी सावली माझि गेली
तरी काय बाधा असे ठेविलेली ? "

असा प्रश्न विचारायला लागणारी जिज्ञासा लहान मुलांत असणें शक्य नाहीं. स्थानिक स्वराज्य नाटकांतील रंगराव मुकादम अंबू महारणीशीं प्रेमविवाहविषयक कायदेशीर अडचणींची चर्चा करीत असतांना, जेव्हां त्याला मध्येंच "आधीं माणूस कीं आधीं कायदा ?" आणि "कायदा कुणी केला ?" असे प्रश्न सुचतात तेव्हां ते एकदम उद्बोधक व चमत्कृतिजनक वाटले तरी मुकादमाच्याही तोंडीं ते किंचित् अस्वाभाविकच वाटतात. प्रारब्धवादी हिंदु बहुजनसमाज हा प्राप्त परिस्थितीस बव्हंशीं योग्य समजून चालतो. तो केवळ अन्याय सहन करितो इतकेंच नव्हे तर तो त्या अन्यायांना अन्यायच मानीत नाहीं; उलट त्यांस कित्येकदां तो धर्म मानतो हेंच तर विशेष दुर्दैव आहे ! केशवसुतांनीं 'मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस' ( पृ. ४६ ) खरपूस बिदागी देऊन आपली शाळेंतील मुलांच्या विषयींची सहानुभूति व्यक्त केली आहे. केवळ मराठी शिकलेल्यांना या कवितेंतील शेवटच्या श्लोकाची भाषा मुळींच न कळण्याइतकी इंग्रजी धर्तीची आहे. यावरून ही कविता भाषांतरित असावी अशी शंका येते; आणि कवीच्या बंधूंनीं 'केशवसुत स्वतः मारके होते' ही जी माहिती परिश्रमपूर्वक पुरविली आहे, तिच्यामुळें या शंकेस बळकटी येते.

"पण लक्षांत कोण घेतो ?" च्या कर्त्यास ( पृ. ९६ ) ही कविता केशवसुतांची पाश्चात्यानुसारी सुधारणेवरील निष्ठाच व्यक्त करते. स्त्री हें भूपृष्ठस्थित आद्य दैवत आहे असें मानणारें पाश्चात्य स्त्रीदाक्षिण्य हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांत दिसून येतें. ते रूढीच्या मर्मी घाव घालून अबलोन्नति करूं पाहणारे आहेत हाच केशवसुतांना त्यांचा अभिनंदनीय गुण वाटला; परंतु इतकी विविध व्यक्तिमत्ता असलेलीं पात्रें निर्माण करणारी जी त्यांची प्रतिभा तिचा गौरव केशवसुतांना पटला तरी नसेल, अथवा सुधारणावेडामुळें तो करण्याचें त्यांना भान राहिलें नसेल !

देशभक्तीची कल्पना हीहि इंग्रजी वाङ्मयाच्या संस्कारानेंच मराठी वाङ्मयांत आली आहे. केशवसुतांच्या कित्येक कविता देशभक्तीनें प्रेरित झालेल्या आहेत.

"गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल."

असें ते 'कवितेचें प्रयोजन' ( पृ. ५७ ) या कवितेंत आश्वासन देतात; परंतु त्यांच्या कवितेंत समकालीन राष्ट्रीय जीवनांतील प्रसंगांचे उल्लेख अथवा गत-

वैभवाचे स्फूर्तिदायक पोवाडे आढळत नाहींत. यावरून केशवसुतांची स्फूर्ति पुस्तकीच विशेष होती हें स्पष्ट होतें. 'दोन बाजी' (पृ. १६१) या ऊर्जस्वल कवितेंत इतिहासाला उज्वलता आणणाऱ्या कर्त्या वीराबद्दल गाढ आदर आणि त्याच इतिहासाला काळोखी फांसणाऱ्या देशबुडव्या विलासी भ्याडाबद्दल तीव्र तिरस्कार हीं व्यक्त झालीं आहेत. कविता केशवसुतांचीच असून तिला यशस्वी म्हणायला हरकत नाहीं; पण नामसादृश्य असून जमीनअस्मानची चरित्र-भिन्नता, हा जो या कवितेंतील चमत्कृतिजनक कविता-विशेष तो Toru Dutt च्या कविता-संग्रहांतील Victor Hugo कृत Napoleon le petit या कवितेवरून घेतलेला आहे हें उघड आहे. Skylark च्या ऐवजीं त्यांनीं जशी भृंगाची योजना केली त्याप्रमाणें नेपोलियनच्या जागीं त्यांनीं बाजीची योजना केली. 'जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर' (पृ. ५) ही कविता सामान्यच आहे. हे 'कुलदीप' वा 'कुलवृक्षगुच्छ' नव्हते. ते आपआपल्या घराण्यांचे अखेरचे वंशज व स्मारकही नव्हते. त्यामुळें 'व्हेनीसच्या प्रजासत्ताक राज्याच्या इतिश्री'वर वर्डस्वर्थनें लिहिलेल्या सुनीतांत जी मौलिक भावना प्रतीत होते ती केशवसुतांच्या या कवितेंत आढळत नाहीं. 'एका भारतीयाचे उद्गार' (पृ. १३) ही कविता हृदयस्पर्शी असून परवशतेमुळें वाटणारा उद्वेग तींत चांगल्या तऱ्हेनें उतरला आहे.

"वल्लींनो, हीं सुबक सुमनें काय आम्हांस होत ?
युष्मद्गानें मधुर, खग हो! या जना काय होत ?
आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो !
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो ! (पृ. २४)

* * *

देवा, केव्हां परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?
केव्हां आम्हीं सुटुनि सहसा पंजरांतूनि, देवा,
राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हां ?" (पृ. १५)

तसेंच "तेव्हां आम्हीं म्हटलें, "ही ऱ्हासाची
रजनी केव्हां जाइल विरून साची ?
स्वतंत्रतेची पहांट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ?"

"या डोळ्यांनीं पहांट ती बघण्याचें
असेल का हो नशिबीं दुर्दैव्यांचे ?
किंवा तीतें आणायाचे कांहीं
यत्न आमुच्या होतिल काय करांहीं ? " ( पृ. २०–२१ )

ही १८८६–८७ सालची पंचविशीच्या आंतील तळमळ पुढें कां दिसत नाहीं ?

केशवसुतांना स्फूर्ति जरी इंग्रजी कवितेपासून मिळाली असली तरी त्यांना स्वकीयांविषयीं उत्कट प्रेम वाटणें स्वाभाविक होतें. कारण काय असेल तें असो; पण त्यांच्या ममत्वाची उत्कटता तितकी प्रत्ययास येत नाहीं. नवा आलेला एक मुलगा झोपेंत 'आई ! आई !' म्हणून बसणावूं लागला तें ऐकून लिहिलेल्या 'आई ! आई !' ( पृ. ५५ ) या कवितेंत जो जिव्हाळा दिसतो तो प्रत्यक्ष 'आईकरितां शोक' ( पृ. १५९ ) या शोक-गीतांत अनुभूत होत नाहीं. ही कविता सामान्य वाटते. 'एक खेडें' ( पृ. १५ ) ही कविता कोंकणांतील ज्या गांवीं केशवसुतांचे वडील, मातोश्री आणि भावंडें रहात असत त्या दापोली गांवांतील 'वळणें' या गांवावर जरी असली तरी, पहिला श्लोक वगळल्यास ती कोणत्याही खेड्याला लागू पडेल इतकें तिच्यांतील वर्णन सामान्य आहे. 'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे' ( पृ. २७ ) या कवितेंतील वर्णन जरी बारकाईचें असलें आणि तींत आपल्या कुटुंबांतील व्यक्तींच्या विषयींची आपुलीक जरी व्यक्त होत असली, तरी तींत वर्डस्वर्थकृत 'The Reverie of Poor Susan' या कवितेंतील संक्षेप, उत्कटता व बहार हीं नाहींत. केशवसुतांची ही कविता मधून मधून एखाद्या यादीसारखी वाटते.

"ती एक खाट अवलोक समोर आतां
आहे सुषुप्तिवश तेथ मदीय माता,
तीचे कुशींत निजली दिसते मदीय,
भीमा स्वसा, बघुनि ती मज हर्ष होय ( पृ. २९ )

याप्रमाणें घरगुती गोष्टींचें वर्णन करितांना सारखे बोजड अपरिचित पंडिती शब्द आल्यानें जिव्हाळा कमी नसला तरी कमी असावा अशी शंका येते. 'नैऋत्येकडील वारा' ( पृ. १३४ ) या कवितेंत उत्कटता अधिक अनुभवास येते, पण श्लोकांतीं एखादा अलंकार साधण्याची हौस जरा कृत्रिमतेची झांक दाखवितेच. तथापि ही कविता उत्तम आहे. स्वाभाविक ममत्व, चमत्कृतिजनक

कल्पना, भव्यता, उदात्तता यांचा मनोहर संगम आहे. खालील ओळी विशेष संस्मरणीय आहेत.

"श्वासाहीं लिहिलीं, विराम दिसती ज्यांमाजि बाष्पीय ते,
प्रीतीचें बरवें समर्थन असें संस्पृह्य ज्यांमाजि ते,
कांतेचीं असलीं मला पवन हा पत्रें अतां देतसे;
डोळे झांकुनि वाचितां त्वरित तीं सम्मूढ मी होतसें!
आतां प्रेमळ तीं पुन्हां परिसतों थोडीं तिचीं भाषणें,
चित्तीं आणुनि मी तिला अनुभवीं गोडी तिचीं चुम्बनें!
ओठां हालवितां न मी वदतसें मागील संवाद तो;
मी काल क्रमुनी असा, जड जगा काडीवजा लेखितों!
नाहीं चैन तुला मुळीं पडत ना माझ्याविना मत्प्रिये?
तूंतें आठविल्याविना दिवसही माझा न जाई सये!
केव्हां येतिल तीं दिनें न करण्या ताटातुटी आपुली?
केव्हां त्या रजनी? जियांत विसरूं मी-तूंपणाला मुळीं!" (पृ. १३७)

ज्यांत क्लिष्ट चमत्कृतिजनक क्लृप्ति नाहीं तर भावनेची सरळ, रसाळ, हृदयंगम अभिव्यक्ति आहे अशीं स्थळें केशवसुतांच्या कवितेंत फार सांपडत नाहींत. भावनेच्या सरळ जिवंत ओघांत मनश्चित्रें उभीं करणाऱ्या कल्पनेचा प्रवाह बेमालूमपणें मिळून जातो; पण चमत्कृतिजनक कष्टसिद्ध क्लृप्ति या भावनेला अडथळाच करितात. जेथें भावनाविष्काराचा फारसा प्रश्न नसतो, व नीरस प्रसंगांचें कथन अपरिहार्य असतें, तेथें वर्णनांतील मूळ नीरसता झांकून टाकायला आणि वाचकावर एकप्रकारची पकड कायम ठेवायला या चमत्कृतिजनक कल्पना-विलासाचा फार उपयोग होतो. एरव्हीं त्याचें कवितेंत भावनेशीं बहुशः व्यस्त प्रमाण आढळतें. 'निद्रामग्न मुलीस' (पृ. ६०) या उत्तम कवितेंत भावनेचा प्रवाह खोल व संथ आहे तर चमत्कृतिजनक क्लृप्ति एकही आढळत नाहीं. परिणामकारकतेच्या दृष्टीनें पाहतां,

"पापेच्छेस शिवाय चोदक नसे देहीं तुझ्या यौवन"

ही वैरस्यकारक ओळ ज्या श्लोकांत आहे तो श्लोक व अखेरचा आशीर्वादाचा श्लोक हे दोन्ही गाळून टाकण्यांत आले असते, तर फार बरें झालें असतें. कवीला वात्सल्यानें त्या १२–१३ वर्षांच्या निद्रामग्न मुलीचें चुंबन घ्यावेंसें

वाटलें तर त्यांत स्वाभाविक गैर असें काय होतें ? पण आपली कविता वाचून लोक ठपका देतील या भीतीनें केशवसुतांना आपलें समर्थन करावेंसें वाटलें ! ते खरोखर धीर सुधारक असते तर त्यांना ही भीति शिवलीच नसती. ही कविता लिहितांना मागून सुचलेली भीति कवितेच्या मूळ प्रसंगाच्या वेळच्या भावनेच्या ओघांत आगंतुक वाटते. शिवाय त्यांचें समर्थनही लंगडेंच आहे. युवती-विषयीं वाटणारी भावना ही नेहमीं पापेच्छाच असते का ! एखादी युवती एखाद्या तरुणाच्या मनांत प्रणय उत्पन्न करील, तर तीच वडील मनुष्याच्या अंतःकरणांत वात्सल्याचा उद्रेक उत्पन्न करील. कोणती भावना उत्पन्न होईल हें त्या परस्परांच्या वयाच्या प्रमाणावर व मनःप्रवृत्तींवर अवलंबून राहील. जगांत स्त्रीच्या शैशवांतही पापेच्छेच्या पूर्ततेसाठीं बलात्कार करणारे जसे नराधम आहेत, तसेच तिच्या ऐन तारुण्यांत वात्सल्यानें तिला पोटाशीं घेऊन तिचें चुंबन घेणारे साधु-वृत्तीचेहि पुरुष आहेतच.

‘ सिंहावलोकन ’ ( पृ. ७१ ) या उत्तम व भावनापूर्ण कवितेंतही एक हेत्वाभासमूलक कल्पि आहेच.

“ नको वळुनि पाहणें !” म्हणुनि दृक् जरी आवरूं  
धुकें पुढिल जाणुनी मन न घे तसेंही करूं !  
चुकोनि घडलें चुको; परि, ‘ असें नव्हे हें बरें ’  
वदूनहि कितीकदां निज करेंचि केलें बरें !—  
म्हणूनिच अम्हांपुढें घनतमिस्र सारें दिसे,  
पुढें उचलण्या पदा धृति मुळींहि आम्हां नसे ! ” ( पृ. ७१ )

मनुष्य सिंहावलोकन कां आणि केव्हां करितो; तो थोडा विचारशील झाल्यावर. प्रवासांत एखादें खोरें ओलांडून आपण डोंगरमाथ्यावर अगर खिंडींत पुढील नवीन दृग्गोचर होणाऱ्या आणि मागील लुप्त होणाऱ्या प्रदेशांच्या सीमेवर आलों कीं जुन्या प्रदेशाचा निरोप घ्यावा व त्याच्याकडे एकदां वळून डोळे भरून पहावेंसें वाटतें. बालपणांत वृत्ति प्रस्तुतांत पूर्णपणें निमग्न होते, आणि स्थलांत-राची संधि आली कीं हुरळून मागील विचार क्षणभरही न करितां ती पुढील अपेक्षांच्या मनोराज्यांत तितक्याच पूर्णपणानें निमग्न होते. भविष्य हें केव्हांही अव्यक्त, अज्ञातच असतें; पण मनुष्यहृदयांतील वाढत्या रक्ताच्या निरर्गल आशेमुळें भविष्यकाळाचीं कल्पित चित्रें काढीत राहतो. प्रत्यक्षाची प्रखर जाणीव

झाली, आशेला मर्यादा घालण्यांत आलेल्या दिसूं लागल्या, कीं मनुष्याची आशाळभूत केंवीलवाणी नजर दूरावलेल्या स्मरणरम्य भूतकालाकडे वळते. अर्थात् प्रत्यक्षाच्या प्रखर जाणीवेनेंच स्वप्नाळूपणाला आळा बसून, मनुष्य भूतकाळांतील चित्रें गिरवीत बसतो. निराळ्या शब्दांनीं सांगायचें म्हणजे भविष्यकाळ अंधुक आहे म्हणून नव्हे, तर भविष्यकाळाविषयीं मनोज्ञ कल्पना करायला आशा समर्थ नसते, म्हणून मनुष्य सिंहावलोकन करितो. त्याप्रमाणें भविष्यकाळ अज्ञात रहाण्याचें कारण मनुष्य आपल्या चुका ओळखून पुनः पुन्हा त्या करीत राहतो हेंही मुळींच नव्हे. पुढील धुकें, घनतमिस्र याचा अर्थ केवळ अज्ञेय भविष्यकाळ असा नसून ( Dark gloomy prospect ) म्हणजे निराशाजनक भवितव्य असा असल्यास उपर्युक्त ओळींतील हेत्वाभास नष्ट होतो. परंतु हा अर्थ केवळ मराठी जाणणाऱ्यांच्या ध्यानांत येणें शक्य नाहीं व तो मागें केलेली टीका केल्याशिवाय रहाणार नाहीं. पण या कवितेचें हृदयस्पर्शित्व उपरिनिर्दिष्ट हेत्वाभासमूलक क्लृप्तींवर अवलंबूनच नाहीं. वर उद्धृत केलेल्या ओळी काढून टाकिल्या तरी काव्यदृष्ट्या रसहानि कांहीं होत नाहीं. खरे काव्यमय श्लोक पुढील आहेत.

“ प्रदेश किति मागुते रुचिर ते बरे टाकिले,
किती़क तटिनीतटें श्रम जिथें अम्ही वारिले;
किती स्मृतिस धन्यतास्पद वनस्थली राहिल्या,
जिथें धवलिता निशा प्रियजनांसवें भोगिल्या.
सुखें न मिळतील तीं फिरुनि !—तीं जरी लाविती
मनास चटका, तरी नयन त्यांवरी लोभती.
परंतु हृदयास जे त्वरित जाउनी झोंबती,
प्रमाद दिसतां असे नयन हे मिटूं पाहती !—
किती घसरलों !–किती चुकुनि शब्द ते बोललों !–
करूनि भलतें किती पतित हन्त ! हे जाहलों
स्वयें बहकुनी उगा स्वजनमानसें टोंचिलीं !
वृथा, स्वजन लोचनीं, अहह आंसवें आणिलीं !
चुकी भरुनि काढणें फिरुनि, हें घडेना कधीं
विनिष्ठुर असें भरे प्रगट तत्त्व चित्तामधीं !–

म्हणूनि अनिवार हें नयनवारि जें वाहतें,
असें अहह ! शक्त का कवणही टिपायास तें ? (पृ. ७२)

'कविता व कवि' या विषयासंबंधीं केशवसुतांच्या जितक्या कविता आहेत, जवळ जवळ तितक्याच कविता प्रणयविषयक आहेत. प्रणयविषयक कवितेंत एकंदरीनें सरस भाग अधिक आहे; पण या भागाकडे बहुजनसमाजाचें लक्ष जितकें जायला पाहिजे तितकें गेलेलें दिसत नाहीं. 'कचाप्रत देवयानी' (पृ.१९६) या कवितेंतील व्यक्ती जरा पौराणिक असल्या तरी कविता कथनात्मक नसून तिचा समावेश प्रणय-भावगीतांत होईल अशीच तिची रचना आहे. रहाळकर म्हणतात कीं 'बरीचशी कविता पत्नीपासून दूर असलेल्या काळांतच तिचीं प्रेम-चित्रें काढण्यांत कवीनें लिहिली आहे.'' वस्तुतः कविता ही कोणत्या चालत्या बोलत्या व्यक्तीस उद्देशून लिहिलेली आहे हें जाणण्याची इच्छा जरी सर्वसामान्य व स्वाभाविक असली तरी ही जिज्ञासा अतृप्त राहिली म्हणून काव्याचा रस चाखतां येत नाहीं असें थोडेंच आहे ? तथापि रहाळकर म्हणतात त्याप्रमाणें असेलही. 'मनोहारिणी' ( पृ. १९१ ) ही मात्र काल्पनिक सुंदरी असावी; कारण केशवसुतांची पत्नी कुरूपच होती. शिवाय या कवितेंतील वर्णनही जवळ जवळ ठरीव ठशाचेंच आहे.

केशवसुतांच्या प्रणयगीतांतही दुर्दैवानें चमत्कृतिजनक क्लिष्ट क्लृप्ति व मजेदार पण अतर्कशुद्ध विचारसरणी यांच्या छटा अगदीं आरंभींच्या कालापासून मधून मधून आढळतात. अभिनवतेमुळें या क्लृप्तिबाजपणांतच नाविन्य आहे असें समजण्यांत येतें; परंतु भावगीताचें सरसत्व ठरवितांना चमत्कृतिजनक क्लृप्तीपेक्षां हृदय हलवून सोडणाऱ्या भावनाविष्कारासच महत्त्व द्यायला पाहिजे, 'प्रियेचें ध्यान' ( पृ. ४ ) या पहिल्याच कवितेंत वियोगाच्या आधींच्या शेवटल्या रात-भेटीचें वर्णन करितांना केशवसुत म्हणतात,

" विशालाक्षीं तुझे जल भरुनिया मी न दिसुनी,
वियोगाला भावी, समजलिस तूं भूत, चुकुनी ! "

हें कितपत खरें आहे ? हें एक केवळ चमत्कृतिजनक अतिशयोक्तीचें उदाहरण होईल. तसेंच 'जरी तूं ह्या येथें असतिस सखे सौख्यद मला' ( पृ. ८ ) या कवितेंत कवि म्हणतात कीं विरहांत पत्रावर 'प्रिये, कांते' अशी संबोधनें लिहीत असतांना हाताला थरथर सुटून तीं पुरीं करवत नाहींत आणि

" पुरीं हाताच्यानें नच करविती तीं प्रिय जरी
न वा डोळ्यांच्यांनीं क्षण बघवती तेंवि अपुरीं;
पुसाया तीं इच्छीं परि कर धजेना म्हणुनिया
कराया सांगें तें स्वनयनजलाला रडुनिया !"

हेंही कितपत खरें आहे ! कांहींतरी नावीन्य पाहून थोडा चमत्कार वाटतो; पण आत्मानुभवाची स्मृति होऊन सहसंवेदना व्हावयाची ती होत नाहीं. पत्र लिहायला आरंभ करितांना संबोधनाचा मायना लिहून नीट पुढें कांहीं सुचत नाहीं व समाधान होत नाहीं म्हणून कितीदा तरी अर्धवट लिहिलेलीं पत्रें फाडून टाकिलीं जातात ! शिवाय वियोगांत तर लेखणी विशेष वेगानें चालते. ज्या अत्युक्तीनें वास्तवाचा भासही नाहींसा होतो आणि कृत्रिमतेचा वास येऊं लागतो ती त्याज्य होय. उलटपक्षीं खरा अनुभव सूचित झाला म्हणजे कशी बहार होते तें पहायला याच कवितेंतील दुसरा श्लोक पहा. वियोग नसता तर

" त्वरेनें त्या क्रीडा मग उजळित्या या रजनितें,
सरेना जी खेपा करित असतां मी इथतिथें,
तुला वा मच्चित्रें क्षण दिसवुनी लाजवुनियां,
पुन्हा तीं झांकोनी, छल तव करी जी समयिं या. "

'प्रयाणगीत' (पृ. ४४), 'प्रणय कथन' (पृ. १३१) आणि 'माझें ठेवुनि चित्त घे' (पृ. ८८) इत्यादि कवितांत 'प्रेमापेक्षां बुद्धिमत्तेची चमत्कृति दिसते' असें जें प्रो. राजवाडे म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. त्यांतल्या त्यांत तिसरी कविता सरस आहे.—'प्रत' (पृ. ५२) या कवितेचाही तोच प्रकार आहे.

" नाडि माझी तव करीं वाहताहे,
हृदय माझें तव उरीं हालताहे !"

ही अतिशयोक्ति हृदयैक्यसूचक म्हणून क्षम्य व रम्य ठरेल; पण तिच्या आधारावर, पत्र लिहून खुशाली कळविण्याची जरूरी नाहीं हें सिद्ध करायला

" करा अपुल्या तूं पहा चांचपून,
उरा आपुलिया पहा तपासून;
प्रकृति माझीही तिथें तुज कळेल,
विकृति माझी तुज तिथें आढळेल !"

अशी वकीली केली तर ती कितपत समाधानकारक वाटेल ? माझ्या मुख-शशीपासून तुला सुधेची प्राप्ति होत असल्याकारणानें भोजनाचें बिलकुल प्रयोजन नाहीं, असें जर आळशी प्रियेनें भुकेनें व्याकुळ झालेल्या आपल्या वल्लभास सांगितलें, तर तें जितकें पटेल तितकेंच वरील अनुमान पटेल. 'नाहीं ज्यापरि डोंगळा' ( पृ. १३ ) या कवितेंत प्रो. राजवाडे म्हणतात कीं 'विनोद भरला आहे' व ही कविता हातांनीं जिला उचलून घेतां येईल अशा एखाद्या लहान मुलीला उद्देशून असावी. रा. रहाळकर यांना तर

"नाहीं ज्या परि डोंगळा कधिंहि तो गेला झणीं साखरे,
नाहीं ज्या परि चालला कधिंहि तो मार्जार साईकडे,
नाहीं कृष्ण कधींहि ज्यापरि सखे गेला दह्यांडीप्रत
तैसा येइन मी समुत्सुक गडे तूझ्याकडे चालत."

या कवितेंतील दृष्टांतांतील भराऱ्या शेली कवीची स्मृति देतात ! वस्तुतः या कवितेंत केशवसुतांनीं युक्तायुक्तभाव न पाहतां मालोपमा साधण्याचा मात्र हास्यास्पद प्रयत्न केलेला दिसतो.

'स्मरण आणि उत्कण्ठा' ( पृ. १५९ ) ही कविता फार चांगली आहे. भावना बेताचीच आहे पण कवीची कारागिरी मोहक व रसोत्कर्षक आहे. जातिलता-सहकार, पुष्करिणी-मानसहंस, तरी-नाविक हीं संबोधनें तितकीं अभिनव नसलीं तरी सूचक व मजेदार आहेत. सारिका-शुकराज हें युग्मक मात्र मराठींतील पोपट-मैनेच्या जोड्याप्रमाणें केवळ सांकेतिक व अस्वाभाविक आहे. शेवटल्या ओळींतील चमत्कृतिजनक विचारही मनोवेधक व रसपरिपोषकच आहे. वियोगांत दूरस्थ प्रियेचा निदिध्यास लागल्यामुळें निद्रा गेली आणि हाय ! निद्रानाशामुळें प्रियेचें स्वप्नांतील दर्शनही दुर्लभ झालें !

प्रणय-गीतांतही, आत्मभावनेचा आविष्कार करितांनाही केशवसुतांना क्लृप्ति सोडीत नव्हती. त्यांचा शृंगार संस्कृत कवींनीं वर्णिल्याप्रमाणें प्रामाणिकपणें कायिक व स्वाभाविक असा होता. मरणोत्तरही

"जलस्या त्या देवी चरण अपुले गुंतवितिल,
मुखें लाडानें त्या निकट अमुचीं स्पर्शवितिल" ( पृ. ३५ )

अशी त्यांना आशा वाटत आहे. 'प्रिये कान्ते !' अशीं मधुर अभिधानें दन्तांनीं अधरपत्रीं लिहिणें, स्तनभागीं नखांनीं काव्यलेखन करणें इत्यादि सांकेतिक

शृंगारचेष्टांनाही त्यांनीं आपल्या कवितेंत स्थान दिलें आहे. तथापि एकंदरीनें विचार करितांना असें दिसतें कीं केशवसुतांचा मूळ संस्कृत शृंगार हळूहळू इंग्रजी वळणावर गेला आणि रतिलंपटतेपेक्षां वियोगजन्य शोकनिर्मित क्लृप्तिप्रसू मनोराज्यांत दंग होऊन राहणें हेंच केशवसुतांना अधिक आवडूं लागलें.

'माझा अंत' (पृ. ६६) या कवितेंतील बालेला त्यांनीं आरंभीं स्मरसंपदा म्हटलें आहे, पण पुढें त्या कवितेंत त्यांना त्या स्मराचें स्मरण झालेलें दिसत नाहीं. प्रेमवश होण्यानें मनुष्याच्या अंतरंगांत मोठी क्रांति घडून येते हें खरें, पण या कवितेंतील निर्वाणवर्णन अत्युक्तिमयच विशेष आहे. अत्युक्ति ही सदैवच भावनेची परमावधि दाखविते असें नाहीं. कांताच्या परिश्रमाचें चीज करून त्याचा परिहार करणें हें कांतेच्या प्रीतीचें इतिकर्तव्य होय.

"आम्हांला रुचतीं न तीं श्रमफलें कांते दिल्यावांचुनी"

असें केशवसुत म्हणतात.

प्रणयविषयक कवितांत 'अपरकवितादैवत' (पृ. १०), 'प्रीति आणि तूं' (पृ. ११६), 'वियुक्ताचा उद्गार' (पृ. १५८), 'घुबड' (१५२), 'प्रीति' (पृ. १९५) आणि 'कचाप्रत देवयानी' (पृ. १६९) या कविता उत्कृष्ट आहेत. 'फिर्याद' आणि 'वियोगांमुळें' या सरस कवितांमधील उद्दिष्ट व्यक्ति जरी कविता-सुन्दरी असली तरी विषयदृष्ट्या त्यांचा समावेश प्रणयविषयक गीतांत करायला प्रत्यवाय नाहीं. एकंदरीनें पाहतां सरस कवितांची संख्या प्रेमविषयक वर्गातच अधिक मोठी भरते; परंतु तुतारीच्या किंकाळीनें बधिर झालेल्या रसिकांना या प्रेमगीतांतील जिवंत कोमल करुणरव ऐकूं येत नाहीं; आणि महाराष्ट्र केशव-सुतांना प्रेमाचा पहिला शाहीर न समजतां त्यांना बण्डखोर क्रांतीचा कवि समजतो.

केशवसुतांनीं रूढि आणि जुल्म यांच्या विरुद्ध बंड पुकारलें असें म्हणण्यापेक्षां शेलीनें रूढि आणि जुल्म यांच्या विरुद्ध जें बंड पुकारलें होतें त्याचा केशव-सुतांनीं मराठी काव्यप्रान्तांत प्रथम अनुवाद केला हें म्हणणें सत्यास अधिक धरून होईल.

"बण्डाचा तो झेण्डा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे!"

असें म्हणून काव्यप्रांतांत अभूतपूर्व अशा उत्साहानें व आवेशानें त्यांनीं दोन हाका मारिल्या या पलीकडे त्यांनीं कांहीं क्रांति घडवून आणिलेली दिसत नाहीं.

'तुतारी' आणि 'स्फूर्ति' या कविता नव्या रक्ताच्या, तरुण उमेदीच्या, सुधारणावादी महाराष्ट्राच्या अत्यंत आवडीच्या होऊन बसल्या आहेत. त्या अप्रतिमच आहेत. तथापि एकंदरीनें पाहतां केशवसुतांनीं स्वतःचा असा कोणताच मार्ग चोखाळला नाहीं. मराठी कवितेच्या प्रवाहांत त्यांनीं नकळत गूढगुंजनाचा एक चिमुकला ओघ सोडून दिला, पण हा ओघ भ्रमजन्य व क्षीण असल्याकारणानें तो सारखा वहात राहणें शक्य नाहीं.

अंतिम सत्याचें आकलन तर्कानें होणें अशक्य आहे; निर्मम, निरहंकार होऊन अनन्य भक्ति करून, त्या सत्याशीं तन्मय होण्यानेंच त्याचें ज्ञान होतें. निराळ्या शब्दांनीं सांगायचें म्हणजे भक्ति-योग ( युज=जोडणें ) हा एकच ज्ञानाचा मार्ग होय आणि ब्रह्मसाक्षात्कार म्हणजेच त्या अंतिम सत्याचें ज्ञान होय. या मताचे जे तत्त्वजिज्ञासु वा तत्त्वयुयुक्षु असतात त्यांना भक्तियोगमार्गी म्हणणें युक्त होईल. परंतु भक्तियोग या शब्दाला एक विशिष्ट अर्थ आलेला असल्यानें व्यापक सामान्य अर्थीं सायुज्यवाद हा नवीन शब्द योजणें अत्यवश्य आहे. गूढ-वाद, गूढ-गुंजन वगैरे मराठींत सुचविण्यांत आलेले शब्द Mysticism या इंग्रजी शब्दाचें निवळ शब्दशः, लक्षणेकडे लक्ष देऊन नव्हे, भाषांतर करण्याचे प्रयत्न होत. सायुज्यवादी जेव्हां आपल्याला येणाऱ्या विविध अनुभवांचें वर्णन करितो तेव्हां त्याच्या भाषेंत थोडासा गूढपणा येतो, नाहीं असें नाहीं; परंतु गूढत्व हें कांहीं सायुज्यवादाचें लक्षण नव्हे. तेव्हां Mysticism या शब्दाला मराठी प्रतिशब्द म्हणून गूढ-वाद, गूढ-गुंजन इत्यादि शब्द स्वीकारितां येत नाहींत.

तथापि आधुनिक मराठी कवितेंतील एका व्याजसायुज्यवादी प्रकाराला मात्र गूढ-गुंजन हें नांव अत्यंत समर्पक वाटतें. या तऱ्हेच्या कवितेचा अर्थ कित्येकदां रसिक विद्वानांनाही लागत नाहीं म्हणून कवीच्या या व्यापारास शून्यशोधन असेंही म्हणण्याचा प्रघात आहे. गूढगुंजन व शून्यशोधन या दोन्ही शब्दांत मराठी शब्द-ब्रम्ह्यांना प्रिय वाटणारा अनुप्रास आहे; पण, अभेद्य कूटात्मक पण श्रवणमधुर कवन हा अर्थ व्यक्त करायला गूढगुंजन हाच ( प्रो. श्रीकृष्ण निळकंठ चापेकर यांनीं Mysticism या अर्थी सुचविलेला ) शब्द अधिक समर्थ आहे. आधुनिक मराठी कवींना सायुज्यवादी कवि म्हणतां येत नाहीं; कारण त्यांची सायुज्यविषयक उत्कंठा हृदयाला हलवून सोडील अशी जिवंत नाहीं. ती तितकी अपार्थिव व निर्भेळ एकांतिकही नाहीं. इंग्रजी कवितेच्या वाचनानें आणि प्रतिभाविषयक

गैरसमजामुळें हा प्रकार मराठींत आला व पुढें तो एक प्रतिष्ठावर्धक शिष्ट प्रकार म्हणून त्याचें अनुकरण झालें. १९१३ सालीं रवींद्रनाथ यांच्या गीतांजलीला म्हणजे पर्यायानें सायुज्यवादी कवितेला जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक मिळालें, या गोष्टीमुळेंही गूढगुंजनाची टूम रूढ होण्यास साहाय्य झालें असावें.

सर्वगत अंतिम एक सत्य म्हणजेच परमात्मा होय आणि मूर्ति हें त्या सत्याचें केवल एक प्रतीक होय या भावनेनें निर्माण झालेली, सगुणोपासनेची जी प्राचीन सायुज्यवादी भक्तिमार्गी कविता मराठींत आहे, तिचाच गूढ-गुंजन हा एक प्रकार आहे असें नाहीं. गूढ-गुंजनांत कवि ज्याच्यासाठीं तळमळतो त्याला तो 'परमात्मा' असें व्यापक पण असंदिग्ध नांव देणार नाहीं; त्याला तो 'अज्ञेय,' 'श्रेय,' 'दिव्य,' असें कांहीं तरी गूढ, केवळ गुणवाचक वा भाववाचक नाम देईल. वस्तुतः अंतिम सत्याला पाहिजे तर विठ्ठल, पांडुरंग म्हणूं नये, पण परमात्मा म्हणायला हरकत कोणती? पण तसें न करितां ( कित्येकदां संसारिक व्यवहाराचेंही वर्णन करून ) सहेतुकपणें कवि सारें गूढ ठेवितो. वाचकांनीं मग झेपेल त्याप्रमाणें या गूढगुंजनाचा अर्थ अध्यात्माच्या अनुरोधानें लावण्याचा प्रयत्न खुशाल करावा.

प्रतिभा ही इतर कोणत्याही असामान्य शक्तीसारखीच एक निसर्गदत्त देणगी आहे असें समजायला कांहीं प्रत्यवाय नाहीं. सूक्ष्म प्रमाणांत का होईना पण प्रतिभा ही प्रत्येक मनुष्यांत असते; आणि म्हणूनच कवीची अव्याज कृति ही सर्वांना कमी अधिक गम्य व रम्य वाटते. इतर शक्तीप्रमाणेंच प्रतिभा ही मूलतः नीतिनिरपेक्ष आहे. जात्या ती स्वर्गीयही नाहीं व पार्थिवही नाहीं; ती दैवीही नाहीं व आसुरीही नाहीं. प्रतिभेचें स्फुरण हें जसें बायरनमध्यें तसेंच वर्डस्वर्थमध्यें, जसें अभंगकार तुकारामामध्यें तसेंच लावणीबाज प्रभाकरामध्येंही असतें. परंतु प्रतिभा म्हणजेच दिव्यज्ञान करून देणारी, सृष्टींतील कामरूपिणी मोहक शक्ति असा जो स्वतःचा गैरसमज केशवसुतांनीं करून घेतला होता त्यापासूनच गूढ-गुंजनाचा उगम झाला. या गूढगुंजनाचे विशेष कोणते तें आतां पाहूं.

कवितेंत थोडी फार अत्युक्ति ही स्वाभाविक व अपरिहार्य असते. परंतु गूढ-गुंजनांतील अत्युक्ति विश्वव्यापी असून तींत अध्यात्मवादांतील भाषेचा उपयोग–छे! दुरुपयोग असतो. बांधावरील एका झुडुपाचें सुरेख फूल पाहून केशवसुत मुदित झाले, लगेच त्या अवस्थेला त्यांनीं 'उन्मनी' म्हटलें! सृष्टींत अखण्ड चाललेल्या घडामोडींचा उल्लेख त्यांनीं पुरुषप्रकृतीच्या क्रीडा या नांवानें केला!

स्फूर्तीच्या तीव्र पेयाच्या उष्णतेनें द्यावापृथिवी द्रवून मिसळतील अशी त्यांनीं आशा प्रकट केली ! उडणारी म्हातारी पाहून त्यांना तो अज्ञातामधील मूर्त ध्वनि गमला ! तिला पाहून क्षणैक देहभान हरपलें असें साधेपणानें न म्हणतां ते गूढपणें म्हणतात,

"तरी तुझ्या ठायीं वसतसे अद्भुत तें कांहीं
प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें" (पृ. १५१)

कवीला विजनांत एखादें सुंदर दृश्य दिसलें कीं त्याला तो 'दिव्य भास' वाटतो; आणि त्या रूपद्युतीनें नयनें दिपून जाऊन तो 'निर्वाण' पावतो ! पहिली कविता रचतांना, आपल्या अंगीं एखादी अजब गूढ शक्ति आहे याची जाणीव होऊन आनंद व चमत्कार वाटतो हें खरें, पण कवितास्फुरणाचें केशवसुतांनीं केलेलें वर्णन पहा.

"ती अत्यद्भुत गूढ शक्ति सहसा संचारतां अंतरीं,
सायुज्यत्व विराट पूरुष अहा ! देतो स्वयें लौकरी.
पिंडीं जाय विलोपुनी विरुनियां ब्रह्मांड हें सत्वर;
शब्दब्रम्ह उचंबळून मग जें दाही दिशा व्यापितें,
ज्यांच्यांतून भविष्यवाद निघती, ऐकून ते सादर;
ब्रम्ह्यातें क्षमता नवीन रचना कार्यक्रमीं लाभते (पृ. १७९)

सतारीचे उदात्ततेला पोषक असे सुस्वर ऐकल्यावर जी नादसम्मूढता आली तिच्या वर्णनांतील अचाट अत्युक्ति पहाः—

"तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी;
दिक्कालासहि अतीत झालों
उगमीं विलयीं अनंत उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां
*   *   *
भुललों देखुनि सकलहि सुंदर,
सुरांगना तों नाचति भूवर;
स्वर्ग धरेला चुंबायाला
खालीं लवला, मजला गमला" (पृ. १४२)

ही भेदातीत ब्रह्मानंदाची अवस्था म्हणजे केवळ ख-पुष्प नाहीं; पण ती गूढगुंजनी कवींच्या परसांतील भाजी असते! अध्यात्मवादांतील परिभाषेबरोबर कवि अंतराळांतील वस्तूंचे वाचक जे रविशशितारे इत्यादि शब्द त्यांचाही हटकून उपयोग करितो म्हणजे त्या योगानें त्यांचें अंतरालांतील भ्रमण सिद्ध होतें! उपर्युक्त, अफाट, विश्वव्यापी अत्युक्तीसाठीं केशवसुतांनीं पुढील शब्दांचा उपयोग केलेला दिसतो—अणु, अलौकिक, अव्यक्त, अहंस्फुर्ति, अज्ञात, अज्ञेय, आत्मबल, आत्माराम, उदासीन, उन्मनी, खपुष्प, गूढ, चंद्र, चित्, चिरंतनी, जड, तन्मयता, तम, तारका, तेज, दिक्काल, दिव्य, ध्वनि, नादब्रह्म, निजधाम, निर्वाण, परोक्ष, पुरुष, प्रकृति, प्रत्यक्ष, पिंड, ब्रह्मांड, भास, मूर्त, यदृच्छा, विभूति, विश्व, वेडा, शब्दब्रह्म, शून्य, संसृति, सच्चिदानंद, सूर्य, स्वप्न, स्वरसंगम, स्वर्ग, स्वर्भूसंगम. यावरून गूढगुंजनीं कवीला कोणकोणत्या वर्गांतील शब्दांची आवश्यकता असते याची कल्पना होईल.

या अत्युक्तीबरोबरच वर्णनांत चमत्कृतिजनक परस्परविरोध आढळतो, जसें 'व्यर्थी अधिकचि अर्थ असे' (पृ. ११४) 'कण्टकशल्यें बोथटलीं, मखमालीची लव वठली' (पृ. ११२), 'म्हणती म्हातारी—तुज कधीं होतिस तरुण परी?' (पृ. १४९) "जनमर्यादा धरुनि कसें अमर्याद तें मज गवसें?" (पृ.१९८) इत्यादि.

आत्ममहात्म्यकथन हा गूढगुञ्जनाचा तिसरा विशेष आहे. 'प्रतिभा' ही कवीला एक 'दिव्य ठिणगी' ( A spark of heavenly fire ) वाटते. कवीची दृष्टि ही दिव्य व अलौकिक असते. 'कवि' (पृ ८०) आणि 'प्रतिभा' (पृ. १७८) या कवितांत कवित्वशक्तीची महती वर्णिलेली आहेच. 'आम्ही कोण' (पृ. १५१) या कवितेंत तर या आत्मश्लाघेचा कळसच झाला आहे.

"दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके

*     *     *

आम्हाला वगळा—गतप्रभ झणीं होतील तारांगणें,
आम्हाला वगळा—विकेल कवडीमोलापरी हें जिणें!"

अर्थातच कवीला आपला बोल म्हणजे शारदेच्या उक्तीचा पडसाद वाटतो.

ज्याला आत्ममहात्म्याची जाणीव झाली त्याच्या आकांक्षाही अचाटच असणार. केशवसुत म्हणतातः—

(१) " पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर " (पृ. १०२)
(२) " क्लृप्तीची मग करुनी नौका व्योमसागरावर जाऊं,
उड्डुरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेंकुनियां देऊं
(३) पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे
टेंकुनि ती जनता शीर्षावरि जग उलथुनिया देउं कसे !" (पृ. १३९)
(४) " वाटे गिरक्या घेत मिळावें
या पवनाच्या चक्रीं, होउनि लीन सच्चिदानंदांत ! " (पृ. १३९)

'नवा शिपाई' (पृ. १२७) या कवितेंत केशवसुत स्वतःला विश्वबंधुत्वाचें व शक्तीचें साम्राज्य स्थापूं पहाणाऱ्या काळाचे प्रेषित म्हणवितात; आणि आपल्यामध्यें विश्व पाहून त्या विश्वाची म्हणजे स्वतःचीच पूजा करितात !

गूढगुंजनी कवींत एकीकडे दुर्दम्य आत्मश्लाघेची प्रलापिका दिसते तर दुसरीकडे एका गोड निराशेची विलापिका आढळते. कवीला कुणीतरी तिनें 'वेडा' केलेलें असतें आणि तिच्या विरुद्ध तो आपली 'फिर्याद' पुकारीत असतो. पूर्ववयांत ती त्याला 'दिव्य भास' दाखवून निर्वाणीचा चटका लावून अंतर्हित होते; आणि त्या रुष्ट सुंदरीचा ( La Dame Belle sans Merci ) ध्यास घेऊन कवि रानोमाळ हिंडतो. तेथेंच क्वचित् कधीं त्याला त्या श्रेयाची पळपुटी साक्ष पटते. 'वियोगामुळें' विराण्या रचिल्या जातात, निराशेच्या अंधारांत कवीची ती इष्ट देवता तारकेच्या रूपानें त्यास दर्शन देऊन 'तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी' अशा शब्दांनीं ती त्याची बूज करिते. ही इष्ट देवता कधीं प्रतिभा असते तर कधीं विजनवासिनी सृष्टिसती असते. भाषेच्या गूढतेमुळें अशा कवितेवर सायुज्यवादाचा, जीव-शिवसंबंधाचा आरोप होऊं शकतो. परंतु केशवसुतांनीं तरी जेथें परमेश्वर अभिप्रेत आहे तेथें तसा स्पष्ट उल्लेख केला आहे.

संसृति काय आहे, आलों कुठून, जाणें आहे कुठें इत्यादि प्रश्नांचाही गूढगुंजनांत थोडा उल्लेख असतो. 'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना' अथवा 'यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम' अथवा 'असतो मा सद्गमय तमसो मा ज्योतिर्गमय मृत्योर्मामृतंगमय' इत्यादि संस्कृत वचनें कवीस ठाऊक असण्याचा बराच संभव असतो; तथापि केशवसुतांच्यावर वर्ड्स्वर्थकृत Ode on Inti-

mations of Immortality या कवितेंतील विचारसरणीचा खोल परिणाम झालेला दिसतो.

> शून्य म्हणूं जें मागें पुढें
> त्यांतुनि दीप्ती दृष्टि पडे,
> मधला उजेड तिमिरीं दडे
> निजधामाहुनि आलों, गडे,
> तर, ऋणें फेड, चल गडे स्वधामाकडे !" (पृ. १४४)

केशवसुतांची भाषाशैली एकंदरीनें समाधानकारक आहे, पण तिचा अमुक एक विशेष त्यांनीं कमाविला आहे असें म्हणतां येत नाहीं. केशवसुतांना लिहायला कष्ट पडत असावेत. ते खाजगी पत्रें इंग्रजींतून लिहीत व क्वचित् प्रसंगीं काव्य-रचनाही इंग्रजींत करीत. याचें कारण हेंच कीं इंग्रजी ग्रंथांच्या दीर्घ व निकट परिचयामुळें त्यांना सुचणारे विचार अंशतः तरी इंग्रजी भाषेंतून येत; आणि मग रचना करितांना कर्तव्य म्हणून जबाबदारपणानें त्यांना मराठी भाषांतर करावें लागे. अपरिचित आंग्ल कल्पना पहिल्यानेंच मराठींत व्यक्त करितांना भाषा थोडीशी तरी क्लिष्ट व चत्मकारिक होणें अगदीं अपरिहार्य आहे. केशव-सुतांच्या भाषेंत कित्येकदां केवळ मराठी शिकलेल्यांना पूर्णपणें दुर्बोध असें इंग्रजी शब्दप्रयोगाचें शब्दशः भाषांतर आढळतें.

(१) "कोंबायास घशांत मूठभर रे बाळांचिया मृत्तिका,
त्यांचा स्वर्ग समग्रही झडपितां चोपूनि त्यांला फुका !
—हें केव्हां शिवतें तरी तुमचिया का रूक्ष रे अंतरीं ?
कांपा ! मुग्ध मुलें समोर बघुनी, जेव्हां छडी घ्या करीं !" (पृ. ४७)

(२) "खोलींत या सकल त्यास नवे पदार्थ
त्याचेविशीं अलग हे दिसतात मठ्ठ" (पृ. ५६)

(३) "मरूनि मातींतचि या पडाल
अज्ञात ऐशा थडग्यांत जाल" (पृ. ३९)

(४) "वैर तयांला, जे गरिबी शिकवितात बालांस !" (पृ. १९०)

केशवसुतांनीं भावगीतात्मक रचना केली आहे पण तींत तांबे यांचें सहजोद्गारी संगीत नाहीं, नारायण वामन टिळक यांचा रसाळपणा नाहीं, गोविंदाग्रजांचा

ओघ नाहीं, विनायकाची सफाई नाहीं आणि बालकवीचें ललितमार्दवही नाहीं. एकंदरीनें पाहतां त्यांची भाषा खडबडीत आणि संमिश्र अशी असली तरी ती अर्थपूर्ण आहे. कोठें कोठें ती कठिण संस्कृतशब्दप्रचुर भासली, तरी प्रवृत्ति व प्रयत्न हीं तिला सुबोध वरगुती मराठी करण्याकडे आहेत. अभ्यासानें पुढें पुढें त्यांची भाषा चांगलीच सोपी, सफाईदार व मराठमोळ्याची झाली आहे. परंतु ज्या कवितेंत ते

"मूठ वळुनि मी हात हिसकिला,
पुटपुटलोंही अपशब्दांला;
म्हटलें—आटप, आटप मूर्खा !
सतार फोडुनि टाकिशी न कां ?
पिरपिर कसली खुशालचंदा
करिशी—दिडदा, दिडदा, दिडदा ?"

अशी जोरदार अर्थपूर्ण साधी मराठी भाषा योजितात त्याच कवितेंत 'पाणी डोळ्यांतून कितिकदां' असा साधा व म्हणून अधिक परिणामकारक प्रयोग न करितां ते 'लोचनांतुनी तोय कितिकदां' असें लिहितात. मजुराच्या कारभारणीच्या तोंडीं

"घेवोनि अन्ना तुमचा तसा पिता
येईल तो लौकर हो रडूं नका"

अशी भाषा घातलेली पाहून वैरस्यकारक हास्यच येतें ! याचा अर्थ इतकाच कीं केशवसुतांची भाषा प्रयोगावस्थेंत होती. काव्याची म्हणजे पद्यांची भाषा ही दैनिक व्यवहाराच्या, गद्याच्या भाषेशीं होईल तितकी जुळती असावी, या वर्डस्वर्थच्या क्रांतिकारक धोरणाचा परिणाम केशवसुतांच्या मनावर घडून आला असलाच पाहिजे. पण नवीन विचार, नवीन कल्पना व्यक्त करायला संस्कृतांतून अपरिचित व दुर्बोध शब्द घेतल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. वृत्तात्मक रचनेंतही समासांचा व संस्कृत शब्दांचा उपयोग कित्येकदां अपरिहार्यच होतो. तथापि "चित्रोल्लास चिरप्रकाश सुभगच्छाया सखीशीं करी" अथवा 'लज्जारोधित लोललोचन,' 'स्वोपयोगबद्धता,' 'चेतोनिबद्धजनचित्र,' 'कांतीप्रसन्नेक्षण' इत्यादि प्रयोग टाळण्यांत आले असते तर भाषा अधिक एकजिन्सी व सुंदर झाली असती. अधस्तात्, अनपकृत, अनविनय, अन्योन्यशस्त, कुशली कृती,

गद्यग्रथित, गंधवती, चोदक, तूर्ण, दाढर्चेविशिष्ट, दुःखप्रभव, परेत, पाणिपीडित, प्रहरण, भुवि, भूरि, मनसा, माम, राव, लिप्सा, वर्या, व्रतती, शलभ, हेती, सुवृक्ति ( सुवृत्ती–पृ. ७–चूक असेल तर ), स्वभावभूधिष्ठ इत्यादि केशवसुतांनीं योजिलेल्या संस्कृत दुर्बोध शब्दांपैकीं फारच थोडे अपरिहार्य ठरतील. भाषा जर आधुनिक वळणाची लिहावयाची होती तर निजेला, कीजे, लाविजे, टाकिजे, विस्मयेंसी, डुल्लताहे अशीं जुनीं रूपें अथवा कनकितें पत्रें, भविष्यांकालीं, अश्रुक्लिन्नें नयनें, कालनिदर्शनीं यंत्रीं याप्रमाणें नामाप्रमाणें विशेषणासही विभक्ति-प्रत्यय लावण्याची जुनी रीत यांचा केशवसुतांनीं साक्षेपानें त्याग करायला हवा होता. कोठेंकोठें केशवसुत कुसमुडी, चुथडवूं, बरू, मुदली, रखाडी, लकडी अशीं प्रादेशिक रूपें वापरतात आणि अवथिलें, अंतुरी वगैरे प्राचीन मराठी शब्द योजितात; पण तेवढ्यावरून त्यांना भाषेला प्रादेशिक वळण द्यावयाचें होतें अथवा आधुनिक मराठीची शब्दसंपत्ति वाढविण्यासाठीं प्राचीन मराठी शब्दांचें पुनरुज्जीवन करावयाचें होतें असें म्हणतां येत नाहीं.

‘ धिङ्माम् ’ ‘ पश्यात्रास्मि ’ अशीं संस्कृत वाक्यें पेरिल्यानें जेवढी गीर्वाण उदात्तता त्यांच्या कवितेंत येते, तेवढीच ‘इश्काची मजा’ ‘मेरी जान् गुलजार !’ अशा ऊर्दू प्रयोगानें येते. भाषाशुद्धीवरही त्यांचा आत्यंतिक कटाक्ष नव्हता. अला ( आला ), सुळसुळाट, धजल ( धजेल ), वाने ( वानी ), नेच्छूं ( निच्छूं ) वगैरे रूपें; काल् ( काल ), खाक् ( खाक ) या दोन शब्दांतील अंत्य अकारांचें पंक्तिमध्यांतच निभृतीकरण; आणि भेटेल ( पृ. ११६ ), मोडून ( पृ. १३३ ), डोक्याएवढा ( पृ. १७९ ) या तीन शब्दांतील भे, मो, क्या या तीन गुरु अक्षरांचें ऱ्हस्वीकरण असे भाषाशैथिल्याचेही मासले केशवसुतांच्या कवितेंत आढळतात.

इंग्रजी निर्यमक कवितेंत पंक्तींच्या अंतीं विराम असतोच असें नाहीं; तो पंक्तीमध्येंच ठिकठिकाणीं येतो आणि अनेकदां पंक्ति ही मागील पंक्तीस जोडून म्हणावयाची असते. हा प्रकार कीट्सनें Endymion मध्यें सयमक पंक्ति-युग्मकावलि असूनही त्यांत आणिला आहे. त्याचेंच अनुकरण केशवसुतांनीं मराठींत केलेलें दिसतें. परंतु मराठींत पंक्तीच्या अंतीं स्पष्ट विराम असतो. तेव्हां अर्थदृष्ट्या जोडून वाचावयाचे शब्द जर या विरामानें दुरावले गेले तर वैरस्य-कारक दुरान्वय होतो.

( १ ) " कवळुनि करजालें भूमिलागूनि, लाल
विलसित सच्चिभासें फेकितां तूं गुलाल " ( पृ. ३ )

( २ ) " आम्ही कोण म्हणून काय पुससी आम्हीं असूं लाडके
देवाचे, दिधलें असें जग तयें आम्हांस खेळावया;

* * *

पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौंदर्यातिशया, अशी वदतसे जादू करांमाजि या " ( पृ. १५२ )

'कचाप्रत देवयानी' ( पृ. १६९ ), 'राजा शन्तनु' ( पृ. १७३ ) आणि 'रुष्टसुन्दरीस' या तीन कवितांत केशवसुतांनीं यमकानुप्रासाकडे विशेष लक्ष पुरविलें आहे; यावरून यमकानुप्रास हीं कृत्रिम, तुच्छ व त्याज्य बंधनें होत असें त्यांचें मत नसावें. पहाः—

( १ ) " मम जनक दक्षिणांकीं बैसुनि पूर्वी तुवांच ना त्यातें
वचन दिलें, 'तुमच्याशीं सुनेचिया जुळिन साच नात्यातें.' "

( २ ) " मग मी होउनि विव्हल जाउनि एकीकडे कचा रडत्यें,
कढत्यें विरहाग्नीनें, अधोमुखी भूवरी विकल पडत्यें "

( ३ ) " करित्यें विवेक बहु, परि ठसली तव मूर्ति आंत जी कान्त
भ्रान्त मला ती करिते, कांपविते सर्व मन्मनः मात्र "

( ४ ) " तेणेंच द्विजराजा, आसक्त कुमुद्वती स्वयें झालें
नेणें मग कैचें हें प्राक्तन निघृण असें फळा आलें "

( ५ ) " कितीक माल्य श्रम साकल्यें गुम्फुनियां तीं भलीं
तुला गे सन्तत मी वाहिलीं !
आभरणें ही असाधारणें दिधलीं तुज कारणें,
फिटाया दासाचें पारणें.
प्रीतिविषय तो जर का परका प्राण्याला जाहला
तयाचा जन्महेतु खुंटला.

* * *

विषण्ण तो मग विषवृक्षांचीं फळें
सुधारसाचीं मानुनि गिळिलचि बळें

* * *

तुजवर पद्यें हे अनवद्यें, कितीतरी गाइलीं,
भक्तिविण कोणी तीं प्रेरिलीं ? ”

परंतु इतरत्र त्यांनीं यमकें जुळवितांना शुद्धतेकडे व सौंदर्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. यमकाला उपांत्य स्वराची पुनरुक्ति हवी ती तर त्यांनीं ठेविली नाहीं. इतकेंच नव्हे, तर कित्येकदां अन्य व्यंजनाच्या पुनरुक्तीकडेही दुर्लक्ष केलें आहे; उदाहरणार्थ,

( १ ) “ उद्यां प्रातःकाळीं इथुनि मजला जाण निघणें
पुण्याला जाण्याला, स्वजन सगळा सोडुनि गडे ” ( पृ. ४ )

( २ ) “ घेवोनि अन्ना तुमचा तसा पिता
येईल तो लौकरि हो रडूं नका ” ( पृ. ४४ )

इंग्रजी मिल्टनी सुनीताच्या धर्तीवर मराठींत शार्दूलविक्रीडित वृत्तांत कांहीं सुंदर सुनीतें लिहून त्यांनीं तो काव्यप्रकार रूढ केला इतकेंच नव्हे तर त्या प्रकाराला म्हणजे विशिष्ट यमकबंधरचनेंतून विचारांकित भावना खेळवायला शार्दूलविक्रीडित हेंच वृत्त अत्यंत योग्य हेंही त्यांनीं स्थापित करून टाकिलें. परंतु त्यांनीं स्वीकारलेली सुनीताची मिल्टनी यमकबंधपद्धति मात्र मराठींत रूढ होऊं शकली नाहीं. तीन चतुष्पद्यांत येणाऱ्या गोष्टींचा निष्कर्ष वा उत्कर्ष दाखवून त्या तीन श्लोकांस बद्ध करणारें अन्त्य सयमक पंक्तियुग्मकच मराठीस रुचतें असें दिसतें. केशवसुत सुनीताचा पुरस्कार मिशनरी कळकळीनें व चिकाटीनें करीत असें म्हणतात. त्यांच्या कांहीं चतुःश्लोकी कविता अशा आहेत कीं त्यांचीं त्यांनीं सुनीतें बनविलीं असतीं तर तीं अधिक भरदार व बहारदार झालीं असतीं. पण मिल्टनी यमकबंधपद्धतीचा अवलंब त्यांनीं सुनीतासाठीं केला असल्यामुळें त्यांना तें काम सुचलें नसेल अगर सुचून दुर्घट वाटलें असेल.

श्लोकांत अन्य यमकरचना अअ कक अशी साधारणपणें असतें; पण ‘—प्रत ’ ( पृ. ५२ ) व ‘ कोठें जातोस ? ’ ( पृ. ५४ ) या कविता केशवसुतांनीं मध्येंच एका श्लोकांत अन्य यमकरचना अक अक अशी साधिली आहे. पादाकुलकाच्या पांच ओळी घेऊन यमकरचना अककक अ ठेवून त्यांनीं जी पंचपदी ‘ तुतारींत ’ योजिली, तिचें अनुकरण गोविंदाग्रजांनीं ‘ दसरा ’ या कवितेंत केलें आहे. ‘ सुधारक ’ काव्यांत याच पंचपदीचा अथपासून इतिपर्यंत उपयोग करण्यांत आला आहे.

केशवसुतांची पद्यरचना वृत्तात्मक आहे आणि जात्यात्मकही आहे. जात्यात्मक रचना ही वृत्तात्मक रचनेच्या अर्ध्याहून जरा कमी आहे. ' फुलांची पखरण ' (पृ. ८१) ' फुलपांखरूं ' (पृ. ९२), ' गुलाबाची कळी ' (पृ. १८५) या कविता अनियमित छंदांत लिहिलेल्या दिसतात. पद्यांत तालबद्धता प्रतीत होऊन जो आनंद होतो त्याला या अनियमित छंदांत आपण मुकतों इतकेंच नव्हे तर अपेक्षाभंग होऊन एक प्रकारचा विरसच होतो. हीच स्थिति कांहीं अंशीं ' प्रीति ' (पृ. १९५) या कवितेची होते. इंद्रवज्रेच्या तीन ओळींना वसंततिलकेची एक ओळ जोडून केशवसुतांनीं ' माझा अंत ' (पृ. ६६) या कवितेंत जें वृत्त-वैचित्र्य साधिलें आहे, तें अनुकरणीय असूनही त्याचें अजून कोणी अनुकरण केलेलें दिसत नाहीं. ऱ्हस्व व दीर्घ पंक्तीचा एक प्रयोग विशिष्ट बंध जुळविण्याचा त्यांनीं ' वातचक्र ' ' घुवड ' या कवितेंत करून पाहिला तो थोडा बहुत यशस्वी झाला आहे. जलधरमाला वृत्ताच्या चालीवर मेघावलि [ ।प । प।-+ ] जातींत जी त्यांनीं रचना केली तिचें अनुकरण क्वचित् कोठें आढळतें. " मराठी वृत्तांत भर घालणें व त्यांना लवचिकपणा आणणें असें दुहेरी कार्य केशवसुतांनीं फारच कुशलतेनें आणि उत्तम तऱ्हेनें बजाविलें आहे " म्हणून रा. रहाळकर म्हणतात तें एवढेंच, अत्यल्प आहे. वस्तुतः जात्यात्मक रचना ही वृत्तात्मक रचनेहून अधिक सुकर असते; पण केशवसुतांची जात्यात्मक रचना त्यांच्याच वृत्तात्मक रचनेइतकी निर्दोष व सफाईदार नाहीं. ' फिर्याद ' ही कविता उद्धव जातींतील [ -। प ।- + ] असून तिच्या सुरवातीच्याच ओळी बालानंद [ । प ।- - + ] आहेत; उलटपक्षीं ' दंवाचें थेंब ' ही कविता बालानंद जातीची असून तींत मध्येंच उद्धव पंक्ती आढळतात.

" पाहुनि त्या देखाव्याला
कळवळा कवीला आला " (पृ. १८८)

' फिर्याद ' (पृ. १६६) या कवितेंतील

" धा-। व करी न दयाब-। धि रिता "

ही ओळ तर अगदीं संतापजनकच आहे. कोठें कोठें

" होत्यें अजाण । माहेरीं
तों । खेळ खेळलें । परोपरी " (पृ. १९७)

याप्रमाणें आद्यतालकपूर्व द्विमात्रिक गण मध्येंच येतो; अथवा

“ मग । काय सांगणें । द्वारें तुझिया । तयां
। देइल सुफळें । ईश्वर हरिखू–। निया ”

याप्रमाणें तो मध्येंच गळतो ! दोह्याच्या दुसऱ्या गणांत द्विमात्रिक विराम असतो; तो अवधि केशवसुत मध्येंच सशब्द मात्रांनीं भरून काढितात.

“ वैर तयांला । थप्पड मिळतां । चोळिति जे गा- । लांस्
वैर तयांला जे गरिवी ऽऽ । शिकवितात बा- । लांस् ” (पृ. १९० )

तथापि केशवसुतांच्या जात्यात्मक रचनेपैकीं बराच मोठा भाग निर्दोष व सफाईदार आहे. तेव्हां त्यांचा कान तरी चूक होऊंच देणार नाहीं इतका तयार झाला नसावा अथवा शैथिल्याकडे दुर्लक्ष करण्यांत आपण स्वातंत्र्याचेंच कार्य करीत आहों असेंही त्यांस वाटत असेल.

“ केशवसुतांनीं केवळ आपल्या प्रतिभेच्या आणि स्फूर्तीच्या सामर्थ्यावरच महाराष्ट्र कवितादेवीच्या प्रदेशांत, तत्पूर्वींचे सारे चोखाळलेले मार्ग सोडून देऊन नवाच स्वतंत्र मार्ग काढिला ” असें त्यांचे मित्र किरात हे एकटेच म्हणतात असें नाहीं, केशवसुत हें नांव निघाल्यावरोबर उपर्युक्त विधान करण्याची रूढिच पडली आहे ! “ केशवसुतांच्या सर्व कल्पनांच्या मुळाशीं स्वातंत्र्य-तत्त्व आहे व म्हणूनच त्यांचें काव्य जिवंत, जिव्हाळ्याचें व हलवून सोडणारें असें आहे,” असें डॉ. गुणे म्हणतात. केशवसुतांचें काव्य जिवंत, जिव्हाळ्याचें व हलवून सोडणारें आहे यांत शंका नाहीं; पण त्याच्यांत मौलिक स्वातंत्र्य आहे असें वाटत नाहीं. रूढि आणि जुलूम यांचा निषेध आणि स्वातंत्र्य व क्रांति यांचा पुरस्कार काव्यांतून केशवसुतांनीं केला; परंतु हीं तत्त्वें त्यांच्या कृतींत, काव्यकृतींत कितपत उतरलीं याचा विचार करणें अवश्य आहे. मोरोपंती, दासोपंती, अथवा होनाजीबाळी, अथवा चिपळुणकरी कवितेहून केशवसुतांच्या कवितेचें स्वरूप अगदीं निराळें आहे हें निर्विवाद आहे, पण ही क्रांति केशवसुतांनीं स्वकृतीनें कितपत घडवून आणिली याची शंका आहे. सूर्योदयाच्या वेळीं कांहीं पक्षी किलबील करून जणू काय त्याचें स्वागत करितांना दिसतात; परंतु सूर्योदय हा कांहीं त्यांच्या किलबिलाटानें घडून येत नाहीं हें विसरतां कामा नये. इंग्रजी विद्येच्या सेवनानें कांहीं लोक पाश्चात्य कल्पनांस व संस्कृतीस भुलून सुधारक बनले. तोंडानें पाश्चात्य विचार बोलावेत, वर्तनांत आहार–पोशाखादि कांहीं बाबतींत लोकांच्या डोळ्यावर येईल इतकें पाश्चात्यांचें स्वैर अनुकरण

करावें, तथापि अनेक गोष्टींत जुन्या परंपरेची, रूढीची पकड अंतरंगावर रहावीच, ती तोडण्याचें सामर्थ्य नसावें अथवा त्या बंधनांची जाणीवच नसावी —अशी या सुधारकांची स्थिति असे. नव्या दमाच्या पाश्चात्य संस्कृतीचें, प्राचीन जीर्ण हिंदी संस्कृतीशीं संघर्षण चालू झाल्यावर कांहींतरी क्रांति घडून येणें अपरिहार्यच होतें. पण सामाजिक व राजकीय बाबतींत, आपण आलों कोठून, आहों कोणत्या ठिकाणीं आणि इष्ट आहे जाणें कोठें इत्यादि गोष्टींचा खोल विचार करून नवतत्त्वांचा पुरस्कार करीत करीत, होऊं घातलेल्या क्रांतीस स्वतःच्या विचारानें व कृतीनें इष्ट वळण देणारे कांहीं धुरीण समाजास लाभले. इंग्रजी काव्याच्या वाचनानेंही जीर्ण जुन्याशीं संबंध तुटून नव्या नव्या तऱ्हांची हौस व ती पुरवायला लागणाऱ्या स्वातंत्र्याची इच्छा या उत्पन्न होणें स्वाभाविक व अपरिहार्य होतें. विष्णु मोरेश्वर महाजनि यांच्या भाषांतरित व रूपांतरित भावगीतात्मक काव्यकृतींत ही काव्यप्रांतांत चालू झालेली क्रांति स्पष्टपणें दिसते. परंतु पाश्चात्य व पौरस्त्य समाज हे रचनेच्या व संस्कृतीच्या दृष्टीनें भिन्न आहेत; प्रगति इष्ट असली तरी प्राचीन स्वसंस्कृतीचा पूर्ण नाश होणें हें इष्ट नाहीं; पुढें हें जायचेंच आहे, पण एकाकी पुढें जाण्यांत कांहीं लाभ नाहीं; समाजास बरोबर घेऊन गेलें पाहिजे. तेव्हां इष्ट वाटणारी क्रांति ही समाजास रुचेल व पचेल इतपतच अंगीकारिली पाहिजे, या विचारसरणीचा परिणाम महाजनींच्या कवितेवर दिसतो. आपल्याला जें पटलें—मग तें खोल, बारकाईनें व विविध दृष्टींनीं विचार करून नंतरच पटलें असलें पाहिजे असें नाहीं—आपल्याला जें पटलें, आवडलें म्हणा त्याचा सक्रिय पुरस्कार करावयाचा आणि इतर जनांची पर्वा करायची नाहीं अशा प्रामाणिक उतावीळ वृत्तीचे लोक ज्याप्रमाणें सामाजिक व राजकीय क्षेत्रांत आढळतात तसेंच ते काव्याच्या प्रांतांतही आढळतात. हे बहुजनसमाजाची फारशी पर्वा न करितां वागतात म्हणून यांस बंडखोर म्हणायला, अथवा ते इतर तंत्रांकडे लक्ष न देतां आपल्याच तंत्रानें चालतात, एवढ्यापुरतें त्यांस स्वतंत्र म्हणायला हरकत नाहीं; पण वस्तुतः ते अधिक एकांगी वा अधिक उतावीळ असतात. यांच्या वर्गांत केशवसुतांचें स्थान आहे. होऊं घातलेल्या क्रांतींत सांपडलेले—ती क्रांति घडवून आणणारे नव्हत—असे जे प्रामाणिक व जोमदार, पण एकांगी व उतावीळ कवि होऊन गेले त्यांच्यांत वस्तुतः 'राजा शिवाजी' या काव्याचे कर्ते महादेव

मोरेश्वर कुंटे हे पहिले होत. पण त्यांची काव्यरचना भावगीतात्मक नाहीं. तेव्हां इंग्रजी वळणाची, कमी अधिक स्वतंत्र पण जिव्हाळ्याची भावगीतात्मक रचना करणारांच्यामध्यें केशवसुत हेच अग्रेसर होत.

ते इंग्रजाळले होते पण इंग्रजी झाले नव्हते. इंग्रजी भाषेचा व इंग्रजी कल्पनांचा त्यांच्या मनावर विलक्षण पगडा होता; पण कांहीं जुन्या गोष्टींची त्यांच्या मनावर जी पकड कायम राहिली होती त्यांची त्यांना तितकी जाणीव नव्हती. त्यामुळें उक्तीनें जहाल पण कृतीनें मवाळ अशी त्यांची स्थिति झाली. त्यांच्यांत मजेदार विसंगति दृष्टीस पडते. आपणांला प्रिय झालेले विचार स्वाभिमानपूर्वक ते मराठींत प्रकट करण्याचा प्रयत्न करीत; पण कित्येकदां, केवळ मराठी जाणणाऱ्याला पूर्ण दुर्बोध असें इंग्रजीचें मराठी भाषांतर मात्र त्यांच्या हातून घडे.

"करूनिया काव्य जनांत आणणें,
न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें;
करूनि तें दंग मनांत गुंगणें
तदीय हा सुंदर हेतु मी म्हणें" ( पृ. ७ )

रहाळकरांनीं उद्धृत केलेल्या एका पत्रांत याचप्रमाणें केशवसुत म्हणतात, "कवि हे स्वप्नसृष्टींत गुंगणारे असल्याकारणानें त्यांनीं निःशब्दांतील स्वर्गीय ध्वनि ऐकत दूर अलग बसावें, आणि काव्यदेवता अनुग्रह करील त्याप्रमाणें त्यांनीं तो ध्वनि आपल्या अडाणी मायभाषेंतून प्रकट करण्याचा प्रयत्न करावा हेंच त्यांस उचित आहे."* तथापि ते भाषांतरित, रूपांतरित व स्वतंत्र कविता लिहिण्याचे मनस्वी कष्ट घेत.

"हृदय आत्म्याला जधीं खेळवीतें,
हृदय आत्म्याला जधीं आळवीतें

* "Poets as dreamers should sit aloof listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars whenever the Muse favours them." (रा. राहाळकर यांनीं आपल्या पुस्तकाच्या २१ व्या पृष्ठावर उद्धृत केलेलें पत्र.)

तर्धी तुमचें तें नको कलाज्ञान
तर्धी हृदयासम नसे तानसेन " ( पृ. १६५ )

आणि "शारदेनें जो मन्त्र दिला कार्नी
तसें लिहिलें मी; काव्य तिचें मार्नी " ( पृ. १२३ )

अशा शब्दांनीं त्यांनीं अशिक्षित स्फूर्तीची महती गाइली; परंतु कविता प्रसिद्ध झाल्यावरही ते तींत बुद्धिपुरस्सर अनेक शाब्दिक फेरफार करीत, इतकेंच नव्हे तर 'तुतारी' व 'वियुक्ताचा उद्गार' या कवितांच्या मांडणींतही त्यांनीं पुष्कळच फरक केला आहे. सृष्टीशीं तन्मय होऊन गीतें स्फुरलीं पाहिजेत असें त्यांचें मत, पण त्यांच्या सृष्टिविषयक गीतांत सृष्टीशीं निकट परिचयही प्रतीत होत नाहीं. ते

( १ ) " वरुनि नभांतुनि चंडोल
ओतितसे हेची बोल "

( २ ) " जसें कलहंसा वाहतां प्रवाहीं
प्राप्त मरणाचें ज्ञान नसे कांहीं "

इत्यादि, महाराष्ट्रांत केवळ कृत्रिम काव्यसंकेत वाटणाऱ्या गोष्टींचा निःशंक स्वीकार करितात. अज्ञातांतील निगूढ गीतींचे पडसाद उमटविण्याची ज्यांची महत्त्वाकांक्षा ते सामान्य नीतिबोधाच्या पलीकडे जातांना दिसत नाहींत. त्यांचा सायुज्यवाद म्हणजे पाश्चात्य उसनवार कल्पनांचा एक ब्रह्मघोटाळा आहे. मूर्ताला अमूर्ताची उपमा देणें, प्रतीप, मालोपमा, अर्थांतरन्यास यांसारखे चमत्कृतिजनक अलंकार साधणें इत्यादि गोष्टींचा त्यांना बराच नाद होता. सुभाषितांत ज्या तऱ्हेचा कष्टसाध्य व चमत्कृतिजनक बुद्धिविलास दिसतो, त्यांची केशवसुतांना फार चटक होती हें त्यांच्या 'स्फुट', 'पद्यपंक्ति', 'कांहीं स्वकृत वचनें', 'स्फुट विचार' इत्यादि प्रकरणांवरून स्पष्ट दिसतें. तेव्हां त्यांची कविता स्वतंत्र व क्रांतिकारक आहे असें म्हणण्यापेक्षां पाश्चात्य कवित्वांत केशवसुत इतर आधुनिक मराठी कवींहून अधिक रंगून गेल्यामुळें त्यांची कविता अगदीं पृथगात्म नसली तरी अधिक जिव्हाळ्याची उतरली आहे, असें म्हणणें न्यायास अधिक धरून होईल. कीर्तीसाठीं प्रचलित लोकाभिरुचीकडे पाहून खपेल तें पुरविण्याचा व्यापार त्यांनीं केला नाहीं.

"सभारुची पाहुनि अल्प फार
रङ्गीं नटी नाचवि सूत्रधार
त्याचें तयाला सुख काय होय ?
तें लोकनिंदाभयही शिवाय."

स्वतःला आल्हाद देईल असें काव्य–मग लोक वानोत, निंदोत–त्यांची पर्वा न करितां प्रामाणिकपणानें ते लिहीत राहिले. त्यांचे विचार भ्रामक असतील; पण काव्य मूलतः कशावर अधिष्ठित व्हायला पाहिजे हें त्यांनीं अचूक ओळखिलें होतें.

"हृदयांतून न जे बोल
निघती ते सारे फोल"

कित्येकदां त्यांचे बोल म्हणजे केवळ पडसाद असतील; पण ते पडसादही हृदयापासून निघालेले आहेत. कांहीं तरी मिळविण्यासाठीं नकल करून काढलेले ते नाहींत.

हेंच केशवसुतांचें स्वातंत्र्य होय; आणि भावगीताच्या प्रांतांत हीच मुख्य कामगिरी त्यांनीं केली. त्यांच्या जिव्हाळ्यामुळेंच त्यांची कविता समकालीन कवींना मान्य झाली. बहुजनसमाजांत म्हणजे सुशिक्षित काव्यप्रिय समाजांत त्यांस विशेष मान्यता मरणोत्तर मिळाली. त्यांच्या कवितेंतील बोधपरता व अवतरणक्षमता यांत कित्येकांना नाविन्य दिसलें; खडवडींत, रांगडेपणांत सामर्थ्य आढळलें; क्लिष्ट अतर्कशुद्ध विचारसरणी व मूर्तिकरण यांत कल्पनेचा चमत्कृति-जनक विलास दृग्गोचर झाला; अत्युक्ति म्हणजेच उत्कटता वाटली; अध्यात्म-वादांतील परिभाषेच्या दुरुपयोगांत आणि अंतरालांतील उल्लेखांत उदात्त दिव्यता भासमान झाली आणि (जरा फरकानें)

"तन्नादेंच लहान थोर सगळे गुंगून वेडावले"

आणि अति स्तुतीचा लोंढा वाहूं लागला. कवित्वास वाङ्मयांत उच्च दर्जा प्राप्त करून देण्यासाठीं त्यांनीं त्याचा गौरव साक्षेपानें व सरस अत्युक्तिपूर्ण भाषेनें गाइला; त्या गौरवाचा बराच मोठा वांटा केशवसुतांच्या वैयक्तिक कवि-त्वास मिळाला. "बहुजनसमाजाचा कवि होण्यांत कांहीं विशेष नाहीं; आपण कवींचा कवी झालें पाहिजे" असें केशवसुतांना वाटत असल्याचें रा. राहाळ-कर लिहितात. टिळक, बालकवि, गोविंदाग्रज व रेंदाळकर यांनीं कांहीं

बाबतींत केशवसुतांचें अनुकरण केलें ही गोष्ट जरी खरी आहे तरी त्यांना कवींचा कवि मानितां येत नाहीं. त्यांना तसें मानणें म्हणजे पर्यायानें महाराष्ट्राची काव्यविषयक कल्पना किती कोती आहे याचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. जें भाषांतरित व रूपांतरित नाहीं तें स्वतंत्र, या अर्थानें त्यांची बरीच कविता स्वतंत्र आहे; परंतु अबोधपूर्व कल्पनांची अभिव्यक्ति या अर्थानें केशवसुतांच्या कवितेंत स्वतंत्रता नाहीं. बाकी हा गुण कवि म्हटला कीं त्याच्यांत असला पाहिजे असें नाहीं. कवीला अवश्य वाटणारी हृदयंगम उत्कटता त्यांच्यांत होती. केशवसुतांच्या कवितेंत इतर समकालीन कवींच्या मानानें पृथगात्मता आहे; पण जोरदार पृथगात्मता, सरस रचनेची विपुलता आणि कलेची आदर्शभूत कारागिरी या त्रयींचा संगम असाधारण प्रतिभेच्या ठिकाणीं असतो, तो केशवसुतांच्या मध्यें दिसत नाहीं.

आपलें वैयक्तिक सामर्थ्य किती हें केशवसुतांनांच अखेर अखेर कळून चुकलें होतें. आपल्या एका पत्रांत ते म्हणतात कीं " मी खुजट आहे हें पाहून मला वाईट वाटतें; उंच वाढण्याचीं कांहीं चिन्हें अजून माझ्यामध्यें दिसत नाहींत. म्हणून मला माझाच राग येतो; आणि जे केवळ लहान सहान गोष्टीच करण्याचा प्रयत्न करितात ते मला आवडत नाहींत. "

" द्या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचें मुकें "

हें खरें; पण केशवसुतांना कवींचा कवि, वर्ड्स्वर्थ, शेली वा शिलर म्हटल्यानें खऱ्या कवित्वास उत्तेजन मिळतें असें नाहीं. केशवसुत हे महाराष्ट्राचे प्रिय व चिरस्मरणीय कवि आहेत. अति स्तुतीची प्रतिक्रिया त्यांच्याच स्मृतीस जाचक होईल. कवीच्या कविता आम्ही हृदयाशीं बाळगाव्यात व जिव्हाग्रीं खेळवाव्यात यांतच त्याच्या जन्माचें सार्थक आहे. अवास्तव स्तुतिनिंदेच्या कल्लोलावर प्रिय कवीच्या नांवाला आत्यंतिक हेलकावे मिळावेत हें इष्ट नाहीं.

केशवसुतांची परीक्षा घेऊन त्यांना अनुक्रमांक देण्याकरितां हा लेख लिहिलेला नाहीं. आधुनिक मराठी कवितेंत त्यांचा नंबर पहिलाच आहे. पण पोकळ स्तुति करण्याची रूढि पडूं नये, सोनें असलें तरी तें किती नंबरी आहे हें ओळखतां यावें म्हणून हें विस्तृत व दिसायला जरा निष्ठुर असें परीक्षण केलें आहे. याच्या वाचनानें काव्यचिकित्सेस व रसग्रहणास मदत होईल अशी आशा आहे. मतभेद

अपरिहार्य आहे; आणि प्रकृतिभेदामुळेंही कांहीं कविता आवडल्या नसतील. तथापि वाङ्मयाची ही चिकित्सा मूलतः आत्मप्रत्ययनिविष्टच असायला पाहिजे. पुढें मग विविध ठिकाणच्या व विविध प्रकृतींच्या रसिक पंडितांच्या बहुमतानें अचूक उत्कृष्ट कोणतें तें ठरेल. केशवसुतांच्या कवितेंत इतके विविध विवेचनीय प्रश्न निघूं शकले हें त्यांच्या महत्त्वाचेंच द्योतक आहे.

माधवराव त्रिं. पटवर्धन.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) केशवसुत आणि त्यांची कविता, न. शं. रहाळकर, मनोरंजन प्रेस, १९१९.

( २ ) तुतारीचे पडसाद, श्री. वि. वर्तक, ट्युटोरिअल प्रेस, १९२६.

( ३ ) केशवसुतांची कविता, चर्चा, प्रि. वै. का. राजवाडे, मनोरंजन, जुलै, सप्टेंबर, आक्टोबर, नोव्हेंबर, १९२०.

( ४ ) 'झपूर्झा' आणि 'म्हातारी', चर्चा, श्री. म. वर्दे, मनोरंजन, जानेवारी, १९२०.

( ५ ) केशवसुतांची कविता, परीक्षण, डॉ. पां. दा. गुणे, मनोरंजन, ऑक्टोबर, १९१७.

( ६ ) केशवसुतांची राष्ट्रीय कविता, ना. म. भिडे, मनोरंजन, नोव्हेंबर, १९२५.

( ७ ) केशवसुतांचें अंतरंग, चर्चा, वि. कृ. आंबेकर, मनोरंजन, मार्च १९१८.

( ८ ) केशवसुत यांची कविता, विविधज्ञानविस्तार, अंक ४, १९१९.

( ९ ) केशवसुत यांची कविता, ना. म. भिडे, विविधज्ञानविस्तार, अंक ६, १९१९.

( १० ) केशवसुतांची अभिनव काव्यरचना, प्रो. लागू, नवयुग, आक्टोबर-नोव्हेंबर, १९२१.

( ११ ) केशवसुतांचा सांप्रदाय, ग. त्र्यं. माडखोलकर, नवयुग, जुलै १९१९.

( १२ ) केशवसुतांचा सांप्रदाय, ए. या. निफाडकर, नवयुग, आगष्ट-सप्टेंबर १९१९.

( १३ ) तुतारी वाङ्मय व दसरा, वि. स. खांडेकर, नवयुग, आगष्ट–सप्टेंबर, १९२९.

( १४ ) केशवसुतांची कविता, ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कविपंचक, पृष्ठ ५३-८४, १९२१.
( १५ ) केशवसुत, ग. त्र्यं. माडखोलकर, काव्यविचार, पृष्ठ १-१४.
( १६ ) केशवसुतांच्या परंपरेविषयीं कांहीं त्रोटक विचार, प्रो. श्री. बा. रानडे, महाराष्ट्रसाहित्य, आगष्ट व आक्टोबर, १९२३.
( १७ ) केशवसुतांची कविता, प्रि. वा. बा. पटवर्धन, रत्नाकर, जानेवारी, १९२६.
( १८ ) केशवसुतांची कविता, वा. कृ. ताटके, मनोरंजन, डिसेंबर, १९३०.
( १९ ) मराठी काव्याची उत्क्रांति व केशवसुत, बा. अ. भिडे, काव्यचर्चा, पृष्ठ २०४-२१९.
( २० ) केशवसुत आणि कवीचा व्यापार; प्रो. सबनीस, काव्यचर्चा, पृष्ठ २२०-२२७.
( २१ ) केशवसुत; साधुदास, काव्यचर्चा, पृष्ठ २२८-२३१.
( २२ ) केशवसुत व टिळक; प्रो. मायदेव, काव्यचर्चा, पृष्ठ २२३-२४६.
( २३ ) केशवसुत-चरित्रविषयक टिपणें, शं. का. गर्गे, रत्नाकर, फेब्रुवारी, १९२६.
( २३ ) ,, ,, ,, रत्नाकर, नोव्हेंबर-डिसेंबर, १९३०.
( २४ ) ,, ,, ,, रत्नाकर, फेब्रुवारी, १९३१

## केळकर नारायण चिंतामण—[ इ. स. १८६७-१९०४ ]

काव्यसंग्रहकार. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील वानिवडें या गांवीं झाला. वडील मिरजेस नोकर असल्यामुळें यांचें विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेपर्यंतचें शिक्षण तेथेंच झालें. उच्च शिक्षण राजाराम व डेक्कन या कॉलेजांत होऊन १८८८ सालीं ते बी. ए. झाले. सरकारी शिक्षणखात्यांत हे अखेरपर्यंत होते. प्रसिद्ध संशोधक व इतिहासपंडित विश्वनाथपंत राजवाडे यांच्या सहवासांत यांना काव्येतिहासाच्या अभ्यासाची गोडी लागली व त्यांनीं काव्याचा संशोधक, संग्राहक व संपादक बनण्याचा निश्चय केला. काव्यवाङ्मयाचें मार्मिक अध्ययन करण्यासाठीं साहित्यदर्पण, सरस्वतीकंठभरण, कुवलयानंद व मराठी व्याकरणा-

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे



रा. सा. गोविंदराव कानिटकर



विनायक कोंडदेव ओक



अच्युत बळवंत कोल्हटकर

वरील ग्रंथ व निबंध व अशा प्रकारची इतर तयारी मोठ्या आस्थेनें करून उपलब्ध सर्व काव्यवाङ्मय व त्यावर असलेल्या टीपा यांचें अवलोकन केलें. अनेक लोकांशीं पत्रव्यवहार व संभाषण करून विविध माहितीचा संग्रह केला. राजवाडे यांनीं दिलेल्या काव्यग्रंथांत नवीन मिळविलेल्या पोथ्यांची भर घातली. अशी सर्व जुळवाजुळव करून निर्णयसागरचे मालक तुकाराम जावजी यांच्या विनंती-वरून यांनीं 'काव्यसंग्रहा'चें काम अंगावर घेतलें. त्यांनीं जवळ जवळ चार वर्षें हें काम उत्कृष्टपणें केलें. यांच्या अकाल मृत्यूमुळें एक श्रेष्ठ दर्जाचा काव्यचिकित्सक व संग्राहक नाहींसा झाला.

**केळकर वासुदेव बाळकृष्ण**—[ १८६०–१८९५ ] संपादक व नाट्यमर्मज्ञ. यांचा जन्म पुणें येथें झाला. मुंबईच्या एलिफन्स्टन कॉलेजांतून हे बी. ए. झाले. बी. ए. झाल्यावर फर्ग्युसन कॉलेजांत ते इंग्रजी वाङ्मयाच्या अध्यापकाचें काम करूं लागले. काव्य, कादंबरी व नाटक शिकविण्यांत त्यांचा हातखंडा असे. १८८७ व १८९१ या दरम्यानच्या काळांत 'केसरी' पत्राचे हे संपादक होते. नाट्यविषयाची यांस विशेष गोडी असल्यामुळें यांनीं 'नाट्य-कथार्णव' नांवाचें मासिक चालविलें होतें. शेक्सिपअरच्या 'टेमिंग ऑफ धि श्रु' व 'अँटनी अॅण्ड क्लिओपॅट्रा' या दोन नाटकांच्या आधारें त्यांनीं अनुक्रमें 'त्राटिका' व 'वीरमणी आणि शृंगारसुंदरी' अशीं नाटकें लिहिलीं आहेत. यांपैकीं त्राटिका हें नाटक वरच्या दर्जाच्या नाटकांत मोडतें. प्रसाद हा केळ-करांच्या भाषेंतील विशेष गुण होय.

**केळकर वा. बा. यांचें वाङ्मय**—( १ ) त्राटिका, ( २ ) वीरमणी आणि शृंगारसुंदरी १८९३; ( ३ ) लटपट्या पद्या, १८९३.

**कोल्हटकर महादेवशास्त्री**—[१८२२–१८६५] कवि व नाटक-कार. हे वांई येथें राहणारे. पुणें येथील पाठशाळेंत ज्योतिष व व्याकरण या शास्त्रांचा अभ्यास केल्यावर शिष्यवृत्ति देऊन सरकारनें यांना पांच वर्षें कँडीसाहेबांच्या हाताखालीं प्रथम ठेविलें. तेथून १८५१ सालीं पुण्याची संस्कृत पाठशाळा आणि इंग्रजी शाळा एक होऊन पूना कॉलेज बनलें. त्यांत महादेव-शास्त्री यांना मराठीचे प्रोफेसर नेमण्यांत आलें. महादेवशास्त्र्यांचे नातु प्रसिद्ध वृत्तपत्रकार रा. अच्युतराव कोल्हटकर यांनीं शास्त्रीबोवांसंबंधीं माहिती पुढील

प्रमाणें दिली आहे. "कौटुंबिक व नागरिक प्रतिष्ठेहून एक पायरी वर चढून, सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेणारे महादेव शास्त्री हेच कोल्हटकर घराण्यांत पहिले झाले. पूर्वपद्धतीप्रमाणें उत्तम प्रकारचें शास्त्राध्ययन करून महादेवशास्त्री आपल्या प्रपंचास सुरवात करणार तोंच सुप्रसिद्ध कँडीसाहेब यांनीं त्यांना उपदेश केला, कीं, 'महादेव, तूं असा अंगावर शालजोडी घेऊन फिरलास तर तुला लोक विद्वान म्हणतील, परंतु तुझ्या गुणांचें खरें चीज व्हावयाचें नाहीं. यासाठीं तूं इंग्रजी शीक व आधुनिक विद्यांत पारंगत होऊन जगाच्या समोर ये.' महादेवशास्त्र्यांना हा उपदेश तंतोतंत पटला व प्रौढ वयांत इंग्रजी शिकण्याला सुरवात करून ते झपाट्यानें पुढें सरसावले. त्यावेळीं महादेवशास्त्र्यांचें नांव माहीत नाहीं असा एकहि सुशिक्षित मनुष्य नव्हता, व अजूनहि त्यांची आठवण करून गहिंवरून जाणारे लोक वृद्ध पिढींत आढळतात.

"महादेवशास्त्री हे विद्याखात्यांत नोकरी करावयास लागून डेप्युटी इन्स्पेक्टरच्या जागेपर्यंत चढले, व त्या जागेवर असतांनाच त्यांचा अकालीं अंत झाला. तथापि महाराष्ट्रांत जो त्यांचा त्यावेळीं लौकिक झाला, तो ते 'लोकोत्तर वक्ते' या नात्यानें झाला. त्यांच्या वक्तृत्वाचीं पुष्कळ वर्णनें मागें ऐकूं येत व 'निबंधमाले'त सुद्धां त्यांच्या वक्तृत्वाबद्दल उल्लेख आलेले आहेत. त्यांच्या वक्तृत्वाचा मुख्य गुण म्हणजे वाणीचा अप्रतिहत प्रवाह आणि बोलण्यांतील अप्रतिम माधुर्य हे होत. त्यांच्या बोलण्यानें श्रोत्यांचें मन इतकें तल्लीन होऊन जात असे कीं, त्यांचें भाषण कितीहि वेळां ऐकलें तरी त्यांची तृप्ति होत नसे. आपल्या महाराष्ट्रांत वक्तृत्वगुणाचा साधारणतः तुटवडाच आहे. या कामांत फार पुढें गेलेले म्हणजे बंगाली लोकच. पण अशा तुटवड्यांत सुद्धां ज्यांनीं वक्तृत्वाबद्दल आपलें नांव गाजविलें अशा लोकांत महादेवशास्त्री यांची गणना आहे.........त्यांचें नांव महाराष्ट्रांत जर कांहीं कारणानें राहणार असेल तर त्यांनीं केलेल्या 'अथेल्लो' नाटकाच्या सर्वमान्य भाषांतरामुळेंच होय. हें भाषांतर अत्यंत सुरस व समर्पक झालेलें आहे व देवलांच्या अथेल्लो नाटकाच्या रंगावृत्तीचाहि पाया महादेवशास्त्र्यांचेंच भाषांतर आहे." (वामनराव कोल्हटकर चरित्र, मासिक मनोरंजन, जून १९२०.)

यांजविषयीं प्रो. पोतदार यांनीं 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' या पुस्तकांत पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे. "जसा संस्कृतांतून नाटकें

उतरण्याचा उपक्रम झाला तसा किंबहुना त्याहूनहि कठिण असा उपक्रम यावेळीं मराठींत झाला. तो महादेवशास्त्री कोल्हटकर या एका इंग्रजी शास्त्र्यांनींच केला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यांनीं शेक्सपियर या आंग्ल महाकवीचें अथेल्लो नांवाचें हृत्क्षोभकारक नाटक मराठींत उतरलें व इंग्रजींतील ललित वाङ्मयावर धाडसाचा मराठी हल्ला चढविला. दुर्दैवानें आपल्या कृतीवर सफाईचा हात फिरवून तें छापून निघण्यापूर्वी हे वारले. तथापि इ. स. १८६७ त यांच्या भाच्यांनीं अथेल्लो छापून प्रसिद्ध केलें व निबंधमालाकारांसहि तें 'उत्कृष्ट' वाटलें. (निबंधमाला–भाषांतर) 'ह्यांची लिहिण्याची शैली अजून कोणी उचलली नाहीं,' असें पुर्णेवर्णनकर्ता म्हणतो. (भाग १, पृ. ८०) 'त्यांचें वक्तृत्व फार सुरस असे. जसा नाग गारोड्याच्या पुंगीस भुलून त्याकडे सर्व तनमन लावून तल्लीन होतो याप्रमाणें यांचे श्रोते भुलत असत.' (सदर) यांजविषयीं बाबा पदमनजी अरुणोदयांत (पृ. ५२) लिहितात:—'त्यांची शिकविण्याची शैली फार चांगली असे. त्यांची मराठी भाषा मला फार गोड लागे; कारण आमच्या वर्गांतील सोनार, परभु, शेणवी, यांच्या मराठी भाषेस मी हंसावें. ते आम्हांस बाळ गंगाधर शास्त्री यांनीं केलेल्या एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें मराठी भाषांतर शिकवीत.' मूळ अस्सल इंग्रजी किंवा मराठी जातिवंत ग्रंथाचें स्वारस्य दुसऱ्या भाषेंत तंतोतंत उतरणें परम दुर्घट. तें एक कृष्णशास्त्र्यांसारखाच पुरुष रासेलसांत करूं जाणें! महादेव शास्त्र्यांचा कित्ता कोणी लवकर गिरविला नाहीं. कारण संस्कृत ग्रंथ मराठींत उतरण्याइतकें तें सोपें व सुधें नव्हतें."

महादेवशास्त्र्यांनीं इंग्रजी कवितेच्या धर्तीवर कांहीं चुटकेवजा लहानलहान कविता लिहिल्या होत्या. क्रमिक पुस्तकांतील 'मुंगीच्या आर्या', 'कज्जेकफावती' इत्यादि कविता त्यांच्याच आहेत. या कवितांसंबंधीं 'दंभहारक'कार म्हणतात, "नवीन शिक्षणाचा क्रम सुरू झाल्यावर कांहीं दिवसांनीं कै. कोल्हटकर यांचें 'कवितेचें पहिलें पुस्तक' प्रसिद्ध झालें. त्याची त्यावेळेस बरीच चेष्टा झाली" (दंभहारक, वर्ष ५, पृ. ७४). याशिवाय यांनीं 'कोलंबसाचा वृत्तांत' हें चरित्रात्मकपुस्तक लिहिलें आहे. हें रोबर्तसनकृत अमेरिकेच्या इतिहासाच्या द्वितीय पुस्तकावरून केलें आहे. हें शाळाखात्याकडून विद्यार्थ्यांकरितां वाचन-पुस्तक म्हणून लाविलें गेलें होतें. याच्या चार आवृत्त्या निघाल्या. चौथी आवृत्ती १८७३ त निघाली. ती परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं शोधिली आहे.

**कोल्हटकरांचें वाङ्मय**—( १ ) कोलंबसाचा वृत्तांत. ( २ ) ऑथेल्लो नाटक. ( ३ ) कवितेचें पहिलें पुस्तक.

**कोल्हटकर अच्युत बळवंत:**—[ १८७९–१९३१ ] वर्तमानपत्रकार व अष्टपैलू लेखक. अच्युतराव यांचा जन्म कृष्णानदीचे कांठीं वांई येथें शुक्रवार १ आगस्ट इ. स. १८७९ या सालीं झाला. पुढील आयुष्यांत ज्यांनीं हिंदुधर्माचा पुरस्कार व त्या धर्मांतील उदात्त तत्त्वांचा प्रसार करण्यासाठीं लेखनद्वारा व व्याख्यानद्वारा अविश्रांत चळवळी केल्या त्या अच्युतराव यांचा जन्म एका क्षेत्रांत झाला ही गोष्ट त्यांच्या भावी आयुष्यक्रमाला साजेशीच झाली ! वयाचे पांचवे वर्षी सरस्वतीची आराधना करण्याकरितां ते पाटीवर बसले परंतु ' श्रीगणेशायनमः ' यांतील सुरवातीचें ' श्री ' हें अक्षर त्यांना कित्येक महिने बरोबर काढतां आलें नाहीं ! अच्युतराव यांना श्रीच्या त्यांजवरील अवकृपेमुळें पुढें ज्या अनेक आपदा भोगाव्या लागल्या त्यांची आगाऊ सूचना ' श्री ' ह्या अक्षरानें ज्या विचित्र तऱ्हेनें त्यांना इतक्या बालवयांतच दिली, ती त्यांना त्या वेळीं किंवा नंतरही केव्हां समजली असेल काय ? तथापि त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट एवढीच कीं ' श्री ' पुढील ' गणेशाची ' मात्र त्यांजवर केव्हांच अवकृपा झाली नाहीं; कारण शरीरसंपत्ति व बुद्धिवैभव या बाबतींत अच्युतराव या स्थूलदेही व सूक्ष्मबुद्धी देवतेची प्रतिमाच होते असें म्हणावयास हरकत नाहीं. असो. अच्युतराव यांची बुद्धि शाळेंतील अभ्यासांत फारशी चमकली नाहीं. शाळेंत त्यांचें पाठांतर चांगलें होतें. पुढें दैनिक वर्तमानपत्रें चालवितांना अच्युतरावांना या पाठांतराचा चांगला उपयोग झाला असला पाहिजे. शाळेंत असतांनाच अच्युतराव यांना वाचनाचा नाद लागला व रामायण, महाभारत, दासबोध व ऐतिहासिक बखरी वगैरे बडे बडे ग्रंथ त्यांनीं विद्यार्थीदशेंतच वाचून काढले. समर्थांची करुणाष्टकें अच्युतराव यांस फार आवडत असत; हीं बहुधा त्यांनीं विद्यार्थिदशेंतच पाठ करून टाकिलीं असावीं. निवडक ऐतिहासिक प्रसंग आपल्या सोबत्यांना वाचून दाखवावे किंवा त्यांतील स्फूर्तिदायक भाषणें खड्या आवाजांत साभिनय म्हणून दाखवावीं हा त्यांचा बालपणचा एक आवडता व्यवसाय होता. शिवाजीविषयीं अच्युतराव यांचे अंतःकरणांत जी विलक्षण पूज्यबुद्धि आढळून येत असे ती त्यांच्या मनांत लहानपणींच बाणली

होती. छत्रपतींच्या चरित्राचा त्यांच्या कोंवळया मनावर जो संस्कार घडला तो अगदीं त्यांच्या मनावर तितक्याच उत्कटतेनें कायम राहिला. ऐतिहासिक प्रसंगांतील भाषणें म्हणून दाखविण्याचा त्यांचा हा बालपणांतला आवडता व्यवसाय पाहिला म्हणजे वक्तृत्व आणि नाट्य या कलांच्या अभ्यासाला त्यांनीं अगदीं लहानपणींच कशी सुरवात केली होती हें दिसून येतें. अच्युतराव इ. स. १८९४ सालीं म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षींच मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले; व पुढें दहा वर्षांनीं म्हणजे १९०४ या सालांत एल्एल्. बी. झाले. कॉलेजमध्यें असतांनाच त्यांना राजकारणाची गोडी लागली. 'केसरी'चे वाचनानें त्यांचे विचार राष्ट्रीय वृत्तीचे बनले व लो. टिळक यांजविषयीं त्यांचे मनांत आदर व पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. लोकमान्यांना राजकारणांतील आपले गुरु कल्पून त्यांच्याप्रमाणेंच देशसेवा करण्याचा निश्चय त्यांनीं याच वयांत केला. ते एल्एल्. बी. झाले त्या वेळीं त्यांचे वडील वामनराव हे न्यायाधीश होते व त्याचा फायदा अच्युतरावांस आपल्या धंद्यांत झाला असता. तरी वकिली करण्याकडे त्यांचे मनाचा ओढा होईना; त्यामुळें सातारा येथील शाळेंत दोन वर्षें त्यांनीं शिक्षकाचेंही काम केलें. परंतु घरांतील वडील माणसांच्या व मित्रमंडळीच्या आग्रहास्तव त्यांनीं नागपूर येथें वकिली करण्यास सुरवात करून, ती उंणीपुरी तीन वर्षें चालविली. तथापि राजकारणाचें वेड त्यांच्या डोक्यांतून जाईना. त्यांनीं केसरीशीं पत्रव्यवहार सुरू करून राजकारणाचे चर्चेला प्रारंभ केला व नागपूर येथील 'देशसेवक' नांवाच्या पत्रांत राजकारणावर लेख लिहिण्यास सुरवात केली; व एका वर्षाच्या आंतच १९०६ त ते त्या पत्राचे संपादकहि बनले. देशसेवकाचें संपादकत्व हातीं येतांच त्यांनीं जहाल पक्षाच्या चळवळीला उचलून धरून टिळकांच्या राजकारणाचा जोरदारपणें पुरस्कार केला. १९०७ सालच्या सुरतेच्या राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानांतील स्वराज्याच्या चळवळींत जी क्रांति घडवून आणिली तितकीच किंबहुना त्याहूनही जास्त क्रांति तिनें अच्युतराव यांच्या आयुष्यांत घडवून आणिली. या सभेमुळें जहाल व नेमस्त यांजमधील मतभेद विकोपाला जाऊन त्यांचें वैमनस्य दुणावलें. अच्युतराव यांचे वडील रावबहादूर वामनराव कोल्हटकर हे मवाळाग्रणी असून टिळकांविषयीं त्यांचे मनांत विलक्षण अढी होती. वामनराव जितके मवाळ तितकेच त्यांचे चिरंजीव अच्युतराव जहाल! त्यामुळें जहालमवाळांचे तंट्यांतून

उपस्थित झालेलें या पिता-पुत्रांतील द्वंद्वयुद्ध परशुराम आणि राम यांजमधील द्वंद्वयुद्धाइतकेंच प्रेक्षणीय झालें. या वाग्युद्धांत अच्युतराव यांनीं वडिलांची कांहींच भीडमुर्वत ठेवली नाहीं; एवढेंच नव्हे तर रामाला वनवासास पाठविल्याबद्दल कैकेयीला आई म्हणावयास तयार नसलेल्या भरताप्रमाणें अच्युतरावांनीं आपल्या वडिलांची निर्भर्त्सना करून, त्यांना पिता म्हणावयाचेंही नाकारलें व बळवंताला पितृस्थानीं समजून तेव्हांपासून अच्युत 'बळवंत' कोल्हटकर या नावानें ते प्रसिद्धीस आले. तथापि पितृनामत्यागाचें हें पातक अच्युतराव यांस लवकरच भोंवलें! १९०८ सालीं सरकारची राष्ट्रीयपक्षावर वक्रदृष्टि होऊन टिळकांना सहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली व टिळकांना गुरुस्थानीं मानणाऱ्या अच्युतरावांसही राज्यद्रोहाच्या आरोपावरून १॥। वर्षांची सजा होऊन त्यांची कैदखान्याकडे रवानगी करण्यांत आली. हिंदुस्थानाच्या राजकीय वातावरणांत नुकत्याच उदय पावलेल्या या तेजस्वी ताऱ्याचें तेज सरकारच्या सूक्ष्म दृष्टीला फारच प्रखर भासलें असावेंसें वाटतें. कारण तुरुंगाच्या भिंतीच्या ढगाआड लपविलेल्या ताऱ्यांचा कायमचा तेजोभंग व्हावा या उद्देशानें अच्युतराव यांचा तुरुंगांत फारच अमानुषपणें छळ करण्यांत आला. प्रभावशाली लेखक म्हणून अच्युतराव यांनीं अगोदरच मिळविलेल्या कीर्तिप्रभेंत या शिक्षेमुळें अधिकच भर पडली. तथापि अच्युतरावांस नेस्तनाबूद करण्याचा सरकारचा उद्देश थोडाबहुत सिद्धीस गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण तुरुंगांतून सुटून आल्यानंतर अच्युतराव प्रथम मुंबईस आले व आतां पुढें काय करावें याचा जणूं विचार करण्याकरितांच मद्रासेंत जाऊन कांहीं दिवस अज्ञातवासांत काढण्याचें त्यांनीं ठरविलें. वनवास संपल्यानंतर नामांतरें करून विराटनगरींत राहाणाऱ्या पांडवांप्रमाणेंच अच्युतराव यांनीं एक टोपणनांव धारण करून मद्रदेशांत सुमारें दोन वर्षें घालविलीं! या कालांत राजकारणाचा वासही नाहीं अशा व्यापारांत शिरण्याचें अच्युतराव यांनीं ठरवून मद्रास येथें एका मद्रासी गृहस्थाच्या 'गुडमन्' कंपनीच्या पेढीवर काम करण्याकरितां ते राहिले. मद्रासला ते सकुटुंब सपरिवार राहात असून त्यांची परिस्थितीही बरीच सुधारली होती. तथापि लेख लिहावयाला चटावलेल्या लेखणीची हौस कीर्दखतावण्या लिहून थोडीच भागणार होती! त्यामुळें बी. विश्वनाथ (न्?) या टोपण नांवाखालीं मनोरंजनमध्यें ते आपले लेख प्रसिद्ध करूं लागले! या कालांतच त्यांनीं पांडेचरीस

जाऊन अरविंद घोष यांची भेट घेतली. राजकारणांत दोघेही टिळकांचे पक्षपाती व दोघांनींही अज्ञातवास अंगिकारलेला. त्यामुळें ह्या दोघां देशभक्तांच्या भेटीचा योग एका दृष्टीनें अपूर्वच म्हटला पाहिजे !

मद्रास येथें अच्युतरावांचें बस्तान जरी नीट जमत चाललें होतें, तरी अच्युतरावांचा राजकारणाकडील ओढा त्यांना तेथें चैन पडूं देईना. त्यामुळें अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच १९१२ सालीं ते फिरून मुंबईस आले व तेव्हां पासून तेथेंच स्थायिक होऊन राहिले. मुंबईस आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांनीं 'संदेश' हें सुप्रसिद्ध मराठी दैनिक काढलें व त्याच्या जोडीला 'मेसेज' हें इंग्रजी वृत्तपत्रही सुरू केलें. अच्युतराव यांच्या लेखनकलेंतील सव्यसाचित्वाची जनतेला यावेळीं चांगलीच खात्री पटली. परंतु अनेक अडचणींमुळें लवकरच 'मेसेज' बंद पडून अच्युतरावांचा एक हात लुला पडला. 'मेसेज' बंद पडल्यामुळें आलेलें न्यून अच्युतराव यांनीं आपल्या 'संदेश'पत्राच्या द्वारें भरून काढण्याचें ठरवून तें पत्र लोकप्रिय करण्याकरितां आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें. 'संदेश' सुरू झाल्यापासून अच्युतराव यांच्या आयुष्याच्या नवीन विभागाला सुरवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. भारतीय युद्धाचे वेळीं श्रीकृष्णाचे हात जरी सारथ्य करण्यांत गुंतले होते, तरी त्याचे डोक्यांत ज्याप्रमाणें तत्त्वज्ञानविषयक विचारच घोळत होते त्याचप्रमाणें अच्युतराव यांचे हातांतील लेखणी जरी संदेशाचे रकाने भरण्यांत दंग झाली होती तरी त्याचें डोकें यावेळीं धार्मिक विचारांनीं भरून गेलें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण याच वेळीं 'श्रुतिबोध' काढून रा. दत्तो आप्पाजी तुळजापुरकर आणि रा. रामचंद्र विनायक पटवर्धन यांचे मदतीनें त्यांनीं वेदांचें मराठींत भाषांतर छापावयास सुरवात केली; व वेदांचें अध्ययन कोणत्या तऱ्हेनें करावें याविषयीं चर्चा करण्याकरितां उपरोक्त दोन व्यक्तींच्या साहाय्यानेंच 'उषा' या नांवाचें एक मासिक काढलें. दोन वर्षांच्या आंतच 'श्रुतिबोध' व 'उषा' हीं दोन्ही बंद पडलीं. फक्त संदेश तेवढाच चालू राहिला. परंतु दुर्दैवानें पुढें लवकरच म्हणजे १९१८ या सालीं सरकारनें जबर जामीन मागितल्यामुळें तोही बंद करावा लागला. यापुढें त्यांस 'संदेश'ला केव्हांही भक्कम पायावर उभें करतां आलें नाहीं. 'संदेश' नंतर त्यांनीं तन्नाम-सदृश 'संजय' या नांवाचें पत्र कांहीं दिवस चालविलें. तें बंद पडल्यानंतर 'चाबुकस्वार' या नांवाचें पत्रही ते कांहीं काळ चालवीत असत. परंतु त्यांस

'संदेश' इतकी लोकप्रियता कधींच संपादन करतां आली नाहीं. चाबुकस्वारांतून शिवाजीचा त्रिशतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्याकरितां त्यांनीं पुष्कळच खटपट केली. पुढें १९२१ मध्यें डेमोक्रॅटिक कंपनीनें 'इंदुप्रकाश' घेतल्यानंतर कांहीं महिने त्याचें संपादकत्व अच्युतराव यांजकडे आलें होतें. ज्या अच्युतरावांनीं 'संदेश'मधून इंदुप्रकाशाचे पूर्वी अनेकवार वाभाडे काढले होते त्यांच्याच हातून पुढें कांहीं दिवस 'इंदू'चें संगोपन होईल असें भविष्य कोणी आगाऊ वर्तविलें असतें तर अच्युतरावांनीं त्याची टरच केली असती. १९१८ चे सुमारास अच्युतराव यांनीं 'नारिंगी निशाण मंडळी' या नांवाचा एक नाट्यसमाज काढून त्या समाजाकरितां 'नारिंगी निशाण' 'ताई तेलीण' 'वहृचा बोळ' वगैरे नाटकें लिहून त्यांत त्यांनीं स्वतः अनेक भूमिकाही घेतल्या! याच सुमारास त्यांचा केसरी पक्षाशीं टिळक ज्युबिली फंडासंबंधीं बेबनाव होऊन प्रसिद्ध 'फंडगुंड' प्रकरण उद्भवलें. या वादविवादांत अच्युतराव यांनीं आपल्या पुन्हां सुरू केलेल्या संदेशांतून टिळकांचे शिष्यावर पैसे खाल्लयाचे आरोप करण्यास सुरवात केली; व त्याचें पर्यवसान शेवटीं खुद्द टिळकांशीं दोन हात करण्यांत झालें. या एकंदर किळसवाण्या प्रकरणांत अच्युतराव यांनीं आपली लेखणी टिळकांविरुद्ध इतकी बेगुमान व बेलगामी रीतीनें चालविली, कीं त्यांनीं यापूर्वी मिळविलेली लोकप्रियता तर घालविलीच परंतु एकंदर लोकांचा आपल्यावर रोष मात्र ओढवून घेतला; तो इतका कीं मुंबईमध्यें जाहीर व्याख्यान देणें त्यांना अशक्य होऊन बसलें!

लोकमान्यांचा पांसष्टावा वाढदिवस साजरा करण्याकरितां मुंबई येथें शांतारामाचे चाळींत भरलेल्या जाहीर सभेंत टिळकांविषयीं आपणाला वाटत असलेला आदर व्यक्त करून दाखविण्याकरितां भाषण करण्याचा अच्युतराव यांनीं हट्ट धरला, त्यावेळीं तर त्यांजवर दगडांचा वर्षावही करण्यांत आला. या प्रसंगीं शौकतअल्ली यांच्या विशाल देहाची ढाल त्यांना जर मिळाली नसती, तर विशेष दुखापत न होतां सभेंतून परत जाणें त्यांना अशक्य होऊन गेलें असतें! योगायोग असा कीं, यानंतर थोड्याच दिवसांत टिळक मरण पावले; त्यामुळें टिळकभक्तांचा अच्युतरावांवर अधिक रोष झाला व अच्युतरावांना कोणत्याही सार्वजनिक चळवळींत भाग घेणें अशक्य होऊन बसलें. यानंतर अच्युतराव पुन्हां लोकांसमोर प्रामुख्यानें आले ते महात्मा गांधी यांनीं आपली कायदेभंगाची चळवळ सुरू

केली तेव्हां. महात्मा गांधी यांनीं चळवळ सुरू केली तेव्हांपासून अच्युतराव यांच्या आयुष्यांतील तिसऱ्या व शेवटच्या विभागाला सुरवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. या काळांत त्यांनीं मजुरांच्या चळवळींत भाग घेऊन त्यांजविषयीं अनुकूल लोकमत तयार केलें व मजूरवर्गाची सहानुभूति मिळविली.

१९३० मध्यें महात्माजींनीं जी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली, त्यांत अच्युतराव यांनीं भाषणद्वारा व लेखनद्वारा लोकजागृतीचें काम केलें व १९३० च्या डिसेंबरांत मुंबई प्रांतिक युद्धमंडळाचे अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं कारागृहवासही पत्करला. त्यांच्या मागोमाग त्यांच्या पत्नीनें देखील युद्धमंडळाचें अध्यक्षपद मंडित करून तुरुंगाची वाट धरली. पुढें लगेच महात्माजी व सरकार यांजमध्यें तात्पुरता तह झाल्यामुळें चळवळींत भाग घेतलेल्या सर्व कैद्यांची मुक्तता झाली. त्यांत अच्युतराव व त्यांची पत्नी यांचीही सुटका झाली. परंतु सरकार-बरोबर चाललेल्या युद्धतहकुबीचा शेवट कसा काय होतो हें पहावयास अच्युतराव जगले नाहींत; कारण तुरुंगांतून मुक्तता झाल्यानंतर पांच महिन्यांच्या आंतच त्यांचा विषमज्वराच्या दुखण्यांत अंत झाला.

मृत्युसमयीं सोमवार, (ता. १५ जून १९३१) त्यांचें वय ५२ वर्षाचें होतें. मुंबईतील 'प्रभात' या नांवाच्या दैनिकांत ते नियमितपणें लिहीत असत. हाच त्यांच्या वर्तमानपत्री लिखाणांतील शेवटचा व्यवसाय होय. मृत्यूपूर्वीं कांहीं दिवस आपला आवडता 'संदेश' पुन्हां सुरू करण्याच्या खटपटींत ते होते. परंतु विधिघटना निराळीच होती व त्यांचा 'संदेश' सुरू होण्यापूर्वींच त्यांना मृत्यूचा संदेश आल्यामुळें त्यांना आपल्या इच्छेला मूर्तस्वरूप देण्याच्या अगोदरच परलोकाचा रस्ता धरावा लागला.

अच्युतराव यांची आंगलट पाहिली असतां त्यांचा मृत्यु कांहींसा अकालींच झाला असें म्हणावें लागतें. त्यांची शरीरप्रकृति चांगली सुदृढ व निकोप होती, व दुखणेंबाणें वगैरे त्यांना फारसें माहीत नव्हतें. त्यांना आयुष्यांत ज्या अनेक आपत्तींशीं झगडावें लागलें त्यांतून सहीसलामत बाहेर पडण्याला या शरीर-संपत्तीचा फारच उपयोग झाला. तथापि शरीरापेक्षां देखील त्यांचें मन अधिक खंबीर होतें. त्यांच्या मनाची प्रसन्नता अगदीं बिकट प्रसंगींही कधीं ढळली नाहीं. शेंकडों संकटांना तोंड देऊनही त्यांची उल्हसित वृत्ति कायम टिकली होती. त्यांचा स्वभाव निसर्गतःच आनंदी होता. आपत्तींचे अनेक तडाखे सहन करून

त्यांचें मन घट्ट बनलें होतें. त्यांच्या स्वभावाप्रमाणें त्यांची मूर्ति व वागणूकही विनोदमय होती. त्यांचा शरीराचा बांधा, त्यांचें बसकें व चपटें नाक, दांत कांहींसे पुढें आल्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर विलसणारें एक प्रकारचें मिस्किल हास्य, त्यांचें टक्कल पडलेलें शिरस्त्राणरहित डोकें, त्यांचीं केंसांचीं झुलपें ठेवण्याची कांहींशी जगावेगळीच तऱ्हा, चालतांना व व्याख्यान देतांना खिशांमध्यें हात घालण्याची संवय, पायमोजे घालूनही केव्हां केव्हां जोडे वापरण्याची त्यांची पद्धति, व कोटाचीं बटनें न लावल्यामुळें पोटाचा आकार दर्शविणारें त्यांचें जाकीट हीं सर्व एकसमयावच्छेदेंकरून दिसलीं म्हणजे कोणालाही हंसूं कोसळल्याशिवाय राहिलें नसतें. परंतु या बहिरुपाधींनींही ज्याचें गांभीर्य ढळलें नसतें त्याला तें अच्युतरावांचें भाषण ऐकिल्यानंतरही टिकवितां आलें असतें किंवा काय याची शंकाच आहे. कारण या विनोदमूर्तीनें बोलावयाला तोंड उघडतांच उच्छृंखल विनोदाचा अस्खलित प्रवाह सुरू झाला नाहीं असें कधीं झालेंच नाहीं. किंबहुना विनोदाखेरीज त्यांना कांहीं गंभीरपणें बोलतांच येत नव्हतें असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांच्या विनोदांत आटपशीरपणा नव्हता, त्यामुळें क्वचित् त्याला बाष्कळपणाचेंही स्वरूप येई. वर्तमानपत्रांचे रोजच्या रोज रकाने भरावयाला जसा त्यांच्या लेखणीला सराव झाला होता, तसाच तासन् तास भाषण करीत राहण्याला त्यांची रसना तरबेज झाली होती! शिवाजीमहाराजांचा त्रिशतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्याकरितां एक लक्ष व्याख्यानें देण्याची कल्पना फक्त त्यांच्या डोक्यांत उद्भूत होणें शक्य होतें व त्यांत त्यांच्याशीं इतर व्याख्यात्यांनीं सहकार्य केलें नसतें तरी तीं त्यांनीं एकट्यांनींच पार पाडलीं असतीं! मुंबईत गणेशोत्सवांत त्यांच्या व्याख्यानांच्या दररोज खिरापतीच होत असत! खरोखरच अच्युतराव हे एक बहुरुपी होते. त्यांनीं सार्वजनिक चळवळ करण्याचे सर्व ढंग करून पाहिले! त्यांनीं व्याख्यानें दिलीं, नाटक कंपनी काढून त्याकरितां खास नाटकें लिहिलीं व शेक्सपिअरप्रमाणें स्वरचित नाटकांत स्वतः कामेंही केलीं. ते कीर्तन करीत असत व पुराणही सांगत असत; पोवाडे रचण्याचा त्यांना नाद होता व कित्येक अनंतफंदी नवीन पोवाडे रचून देण्याकरितां त्यांची मनधरणी करीत. त्यांनीं फक्त तमाशा करावयाचा शिल्लक ठेविला होता! तथापि एका कीर्तनाला त्यांनीं लावणीनें सुरवात व शेवट केल्याचें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे!

अच्युतराव उद्योगी होते. आळस त्यांना माहीत नव्हता. ते स्वभावाचे उदार व मनाचे दिलदार होते. त्यांनीं पैसे कमावले पण त्याहीपेक्षां जास्त गमावले. पैशांची कटकट त्यांना केव्हांही चुकवितां आली नाहीं. द्रव्य-संग्रह करण्यापेक्षां तें खर्च करण्यांतच ते अधिक तरबेज होते. पैशाचे देवघेवींत त्यांना आपला बोज राखतां न आल्यामुळें त्यांनीं पुष्कळांची सहानुभूति गमावली, कित्येकांचीं मनें दुखविलीं, व कांहींचें तर शत्रुत्वही ओढवून घेतलें. पैशांच्या बाबतींतील या ढिलाईमुळें ज्या वृत्तपत्रानें त्यांना एवढें प्रसिद्धीस आणिलें तो 'संदेश'ही त्यांना नीट चालवितां आला नाहीं. याला कारण त्यांचे बुद्धीचा चवचालपणा होय. अच्युतरावांची बुद्धि विद्युल्लतेप्रमाणें तेजाळ होती पण तितकीच चंचलही होती. त्यांच्या बुद्धींत स्थैर्य नव्हतें. त्यांनीं आयुष्यांत स्वतःला जर एकाच विषयाला वाहून घेतलें असतें तर त्यांनीं त्यांत खात्रीनें आपलें नांव अजरामर करून दाखविलें असतें. त्यांची विद्वत्ता वाखाणण्यासारखी होती, त्यांची बुद्धि तीक्ष्ण आणि मार्मिक होती, भावना उचंबळून टाकण्याचें त्यांचे लेखणींत आणि वाणींत सामर्थ्य होतें, त्यांची कल्पनाशक्ति दांडगी होती व त्यांचा देशाभिमान व धर्माभिमानही जाज्वल्य होता. त्यांच्या या सर्व गुण-समुच्चयाचा परिपोष त्यांच्या 'संदेशां'त प्रकर्षानें झालेला पहावयास सांपडतो. 'संदेशां'तील सुरवातीचें लिखाण ज्यांचे स्मरणांत असेल त्यांना 'संदेश'नें त्यावेळीं इतकी लोकप्रियता कशी संपादन केली याचें आश्चर्य वाटणार नाहीं. 'केसरी'ची गर्जनाही जेथें ऐकूं जात नसे तेथें अच्युतरावांचा संदेश पोंचत असे, हें कित्येकांना आज खरें देखील वाटणार नाहीं; पण तें अक्षरशः खरें आहे. ' संदेश ' ही अच्युतरावांच्या आयुष्यांतील सर्वांत मोठी कामगिरी होय.

' संदेश ' निघण्यापूर्वी वर्तमानपत्रें हीं राजकारणांत पडलेल्या व मुरलेल्या मूठभर लोकांकरितांच आहेत अशी समजूत होती. वर्तमानपत्रें पैसे टाकून विकत घेणें ही कल्पनाही सामान्य लोकांना असह्य होत असे. वर्तमानपत्रें हीं सार्वजनिक लायब्ररींत जाऊनच वाचावयाचीं असा त्यावेळच्या लोकांचा परिपाठ होता. परंतु ' संदेश'नें ही सर्व परिस्थिति बदलून टाकिली. ' संदेश'नें सामान्य लोकांना वर्तमानपत्रें वाचण्याची चटक लावली, व तीं विकत घेऊन वाचण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न केली. राजकारण हा कांहीं केवळ गंभीर चर्चेचाच विषय नाहीं; त्यालाही एक विनोदाची बाजू असते हें प्रथम ' संदेश 'नें लोकांना शिकविलें.

वर्तमानपत्रें हीं निव्वळ राजकारणालाच वाहलेलीं असलीं पाहिजेत हा समज प्रथम 'संदेश'नेंच दूर केला. 'केसरी'नें राजकारणाचा कितीही ऊहापोह केला तरी वर्तमानपत्री भाषा महाराष्ट्रांत प्रथम अच्युतरावांनींच निर्माण केली. मोठ्या अक्षरांचीं शीर्षकें देण्याचा पायंडा प्रथम 'संदेशनें'च पाडला. राजकारणाबरोबर इतर विषयांची चर्चा करण्याचीही पद्धत 'संदेश'नेंच अमलांत आणिली. निरनिराळ्या विषयांवर चटकदार लेख, खुसखुशीत बातम्या, घोसदार भाषा आणि बोचदार विनोद हे सर्व प्रकार प्रथम 'संदेशनें'च प्रचारांत आणिले. 'संदेशाचा फुलबाग' 'संदेशाचे साखरदाणे' 'संदेश दरबारचा पदवीदान समारंभ', 'संदेशाचा अहेर', 'संदेश आर्ट गॅलरी', 'संदेश स्पेशल अंक', 'चहा चिवडा चिरूट' इत्यादि वर्तमानपत्री खातीं प्रथम 'संदेश'-नेंच उघडलीं ! याखेरीज 'नाटकमंडळ्यांचें गॅझेट', 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी', 'वत्सलावहिनींचीं पत्रें' इत्यादिकांनीं 'संदेश'ला वैचित्र्य व वैदग्ध्य आणिलें. चुरचुरीत बातमीपत्रें व अहवाल छापणें आणि सुप्रसिद्ध व्यक्तींच्या हालचालींच्या बित्तंबातम्या प्रसिद्ध करणें हा पायंडाही प्रथम 'संदेश'नेंच पाडला. 'केसरी'च्या गहन राजकारणाचा संदेश सोप्या भाषेंत प्रथम अच्युतराव यांनींच सामान्य जनसमूहाला सांगितला. 'संदेश'च्या ऐन भरभराटीचे काळीं जहाल, मवाळ, सुधारक व दुर्धारक यांजमधील मतभेद विकोपाला जाऊन त्यांजमध्यें एक प्रकारची चुरस उत्पन्न झाली होती. अशा वेळीं 'संदेश'सारख्या तोंडाळ वृत्तपत्राची केसरीला किती बहुमोल मदत झाली असेल याची कल्पनाच करणें बरें. ज्या गोष्टी 'केसरी'च्या गंभीर संपादकांना आपला बोज राखून लिहितां येत नसत त्यांवर 'संदेश'मधून रकानेच्या रकाने येत. 'केसरी' कठोर टीका करी पण त्याला प्रतिपक्षाची टर करणें आवडत नसे किंवा साधत नसे. विरुद्ध पक्षाची टर करून त्याची हुर्रेवडी उडविणें ही कला अच्युतराव यांनीं अगदीं आत्मसात् करून टाकिली होती. राजकारणावर व्याख्यानें झोडण्याचें कार्य अच्युतराव 'संदेश'मधूनच उत्तम रीतीनें करीत. त्यांचें डोकें कमालीचें कल्पक होतें; त्याला नवीन कल्पनांचें वावडें कधींच पडलें नाहीं. "बाबा, संदेशाची एक प्रत माझ्या टेबलावर आणून टाकीत जा !" ही बाबासाहेब विध्वंसांना लो. टिळकांनीं केलेली आज्ञा अच्युतरावांच्या वर्तमानपत्री कर्तबगारीची उत्तम साक्ष पटविते. ज्या गोष्टी गुरूला स्वतः करणें योग्य नसतें, त्या तो शिष्याकडून करून घेत

असतो. छचोरवृत्तीच्या ज्या टीकाकारांना टिळक यांस उत्तर देणें कमीपणाचें वाटत असे त्यांचा खरपूस समाचार अच्युतराव 'संदेश'मधून घेत असत. अच्युतरावांची लेखणी प्रतिपक्षाला किती वोंचत असे याचें प्रत्यंतर वत्सलावहिनी यांच्या लेखांवरून उत्तम रीतीनें पटतें. या बृहन्नडेनें त्यावेळच्या सार्वजनिक वातावरणांत किती हलकल्लोळ उडवून दिला होता याची कल्पना आज यथार्थपणें करतां येणार नाहीं. वत्सलावहिनी यांनीं आपल्या भूमिकेची निवड फारच मार्मिकपणें केली होती. त्या स्वतः जितक्या जहालपक्षाच्या पक्षपाती होत्या तितकेच त्यांचे पति नेमस्तपक्षाची तरफदारी करणारे होते. सौ. वत्सलावहिनी यांचीं पत्रें पुढें पुस्तकरूपानें छापण्यांत आलीं. ह्या पुस्तकाला त्यांच्या पतिराजांनींच प्रस्तावना लिहून आपल्या प्रेमळ पत्नीच्या भांडखोरपणाचें मोठ्या प्रेमानें कोडकौतुक केलें आहे. ते म्हणतात—" माझी पत्नी माझ्याप्रमाणेंच महादेव गोविंद रानड्यांची भक्त आहे. फक्त मी समजतों तसे टिळक दोषी नाहींत असें तिचें म्हणणें आहे. तिच्या म्हणण्यानें माझी अजून खात्री झालेली नाहीं व तोंपर्यंत टिळकांवरील माझा राग कमी होणें शक्य नाहीं. " पति-पत्नीमधील या लाडिक मतभेदाच्या नांवाखालीं सौ. वत्सलावहिनी यांनीं आपल्या पत्रांत ज्या राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा केली आहे ती अत्यंत मार्मिकपणें व समतोल बुद्धीनें केली आहे. रावसाहेब रानडे, ना. गोखले, प्रि. परांजपे, सर फेरोजशहा मेहता, इत्यादि मवाळाग्रणींवर वत्सलावहिनी यांच्या पत्रांत जितकी सुहानुभूतिपर टीका आली आहे तितकी खुद्द नेमस्तांच्या मुखपत्रांतूनही आली असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. अच्युतराव यांची गुणग्राहकता फारच वाखाणण्यासारखी होती. प्रतिपक्षाच्या गुणांचींही ते मुक्तकंठानें स्तुतिस्तोत्रें गात असत. या गुणग्राहकतेचा उत्कृष्ट मासला वत्सलावहिनींच्या पत्रांत भरपूर पहावयास मिळतो. तथापि प्रतिपक्षाच्या गुणग्राहकतेइतकींच त्यांचीं बिंगें व त्यांचे दोष बाहेर काढून त्यांची टर उडविण्यांतही त्यांची बुद्धि तितकीच चालत असे. या टीकेच्या भडिमारामुळें वत्सलावहिनी यांजवर व पर्यायानें अच्युतरावांवर नेमस्त वृत्तपत्रकारांनीं कसा गहजब केला होता याची कल्पना वहिनीबाईंच्या पत्रांतील मजकुरावरून व मजकुराखालीं प्रसंगानुरूप दिलेल्या संपादकीय टीपांवरून उत्तम तऱ्हेनें येते. सौ. वत्सलावहिनी या खरोखरच स्त्री आहेत कीं पुरुष आहेत, या संशयानें त्या वेळच्या लोकांना इतकें पछाडलें

होतें कीं त्याचा छडा लावण्याकरितां त्यांजकडून अनेक प्रकारचे बरे वाईट प्रकारांचा अवलंब करण्यांत आला. बहुतेक नेमस्त पुढारी हे केवळ बोलघेवडे सुधारक आहेत, त्यांच्या हातून प्रत्यक्ष अशी सामाजिक सुधारणा कांहींच होत नाहीं, बोलण्याप्रमाणें कृति करण्याचा स्वतःवर प्रसंग आला म्हणजे ते कच खातात, अशा स्वरूपाची टीका एकदां वत्सलावहिनी यांनीं आपल्या पत्रांत केली होती. त्यामुळें खवळून जाऊन 'इंदुप्रकाशां'तून 'हा पुरुष आहे काय?' या मथळ्याखालीं एका लेखकानें 'प्रेषित' या सहीखालीं एक लेख लिहिला होता. त्यांत वहिनीबाईवर शिव्यांची लाखोली वाहून त्यांजविषयीं फारच अनुदार उद्गार काढण्यांत आले होते. याबद्दल 'इंदुप्रकाश'कारांना दिलगिरी प्रदर्शित करावी लागली. त्या एकंदर हकीकतीवरून वहिनीसाहेबांच्या पत्रांनीं म्हणजे पर्यायानें 'संदेश'-कारांनीं त्यावेळीं जिकडे तिकडे कशी धामधूम उडवून दिली होती याची कल्पना येईल. वत्सलावहिनींची भाषाशैली पहातां ती सुशिक्षित स्त्रियांना शोभेल अशाच स्वरूपाची होती हें कोणालाही कबूल करावें लागेल. हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्ष्यांत कोण घेतो' या कादंबरीनंतर स्त्रियांना शोभेल अशी भाषा वत्सलावहिनी यांच्या पत्रांतच आढळते. 'डोहाळ जेवणाची धांदल', 'श्रीखंडपुरी', 'हुलग्याचें माडगें', 'सगळेंच मुसळ केरांत', 'कांकडीला मीठ', 'कडबोळीं नू शंकरपाळे' इत्यादि पत्रांवरील मथळ्यांवरूनच भाषेची सजावट एखाद्या अभिनय–कुशल नटाच्या स्त्रीवेषांतील पोषाखाप्रमाणें बेमालूम झाली होती हें कबूल करावें लागेल. तथापि त्याकाळची स्त्रीसुधारणा व स्त्रीशिक्षण हीं लक्षांत घेतलीं असतां वत्सलावहिनींच्या पत्रांतून दिसून येणारें राजकारणाचें सूक्ष्म ज्ञान त्यावेळच्या सुशिक्षित स्त्रियांतही असणें शक्य आहे काय याविषयीं जबरदस्त शंका वाटते. त्यांतील विनोद तर कित्येक स्थळीं थेट अच्युतरावांच्या धाटणीचा आहे. वहिनींच्या पत्रांतील नाटकांसंबंधींचे उल्लेख पाहिले म्हणजे बाईंचा नाटकांचा शोक अच्युतराव यांनाच साजेसा होता हें कबूल करावें लागेल. त्याचप्रमाणें बाईंनीं आपण स्त्री असल्याबद्दल व आपल्या चुलीपुढच्या ज्ञानाबद्दल इतकेवेळ उल्लेख केला आहे कीं बाईंना स्वतःलाच आपल्या स्त्रीत्वाची खात्री होती कीं नाहीं याची शंका येते. बाईंच्या लेखनशैलीवरून त्यांनीं अच्युतरावांच्या हाताला हात लावूनच आपलीं पत्रें लिहिलीं असलीं पाहिजेत असा भास झाल्याखेरीज रहात नाहीं. क्वचित् प्रसंगीं रा. दत्तोपंत तुळजापुरकर यांच्या भाषापद्धतीचाही वास येतो; परंतु

त्यामुळें त्यांचें कोल्हटकरी वळण कमी होत नाहीं. एकंदरींत शिखंडीला पुढें करून त्याचेमागून बाण सोडणाऱ्या अर्जुनाप्रमाणें वत्सलावहिनीचे नांवाखालीं अच्युतराव यांनीं पत्रें लिहून मराठी वाचकांना चांगलेंच चकविलें एवढें मात्र खरें.

अच्युतरावांच्या ज्या गुणामुळें त्यांना आपला ‘ संदेश ’ लोकप्रिय करतां आला तेच गुण फाजील उधळल्यामुळें त्यांना पुढें लोकनिंदेला पात्र व्हावें लागलें. अच्युतराव एखाद्याच्या पाठीला हात धुवून लागले म्हणजे त्याला कसलाच सुमार रहात नसे. प्राण जाईपर्यंत गुदगुल्या करण्याची त्यांना संवय होती. त्यांचा विनोद फारच उच्छृंखळ असे. उधळलेल्या घोड्याप्रमाणें भरधांव धांवणाऱ्या आपल्या लेखणीला त्यांना केव्हांच आवरतां आलें नाहीं. त्यामुळेंच फंडगुंड प्रकरणांत नरसोपंत केळकर, यशवंतराव नेने इत्यादि मंडळीवर त्यांनीं वाटेल तसे आरोप केले. या फंडगुंड प्रकरणावर त्यांनीं ओंवीबद्ध दशाध्यायी अधिकमास माहात्म्यही लिहून काढलें आहे. त्यावरून अच्युतराव यांचें कवित्व जरी चांगलेंच नजरेस येतें तरी त्यांतील विषारी वाणी व घाणेरडी विचारसरणी यांमुळें हें काव्य अभिजात वाङ्मयास लांछनास्पदच झालें आहे.

“ टिळक जाणा शंभू जैसा ।। भिक्षा मागोनि करी तपस्या ।।
परी टिळकगणासि फण्डपिपासा ।। मत्त करी निर्धारें ।।
टिळक जरी ते निग्रही ।। सन्देश त्यांचाच भक्त पाहीं ।।
गुरूशीं सामना देतांही ।। हटेल ना कदापि ।।
या रणसंग्रामाची मौज ऐका ।। वीरश्री चढेल ही बायकां ।।
मग पुरुषार्थाची नौका ।। कैशी अपेशीं बुडेल ? ।।
टिळक सद्गुरू म्हणोनि ।। पहिले दोन बाण टाकिले वन्दनीं ।।
पुढती ठेला रणांगणीं ।। झुंज खेळाया भयंकर ।।

*                    *                    *

ऐशी कथा अति सुंदर ।। परिणामानें गोड फार ।।
ती परिसतां भाविक नर ।। पावतील फंडमोक्ष ।।
या कथेंत पस्तीस अंक ।। पावला अति कौतुक ।।
म्हणोनि पस्तीस लेंक ।। होतील भाविकां श्रोतियां ।।
श्रोता उभा राहील कौन्सिला ।। पस्तिस व्होटें विजय त्याला ।।
मुळीं ना करितां परिश्रमाला ।। फंडकृपें मिळतील ।।

वरील उतारे हे त्यांतल्या त्यांत सोंवळे म्हणून निवडून काढिल्यामुळें या फंड-काव्याच्या दूषित अंतरंगाची त्यावरून कल्पनाही करतां येणार नाहीं. Butler याच्या Hudibras ह्या विडंबन काव्यांतील मर्मभेदक विनोद जरी या फंडकाव्यांत कांहीं ठिकाणीं दिसून येतो तरी Hudibras मधील ठाकठीकपणा व कोटीबाजपणा त्यांत आढळत नाहीं. शिवाय अच्युतराव यांच्या काव्यांतील व्यक्तिविषयक टीकेचा दर्पही वाचकास तोंड फिरावयास लावितो. फण्डगुण्ड प्रकरणांत पुढें जेव्हां अच्युतराव प्रत्यक्ष टिळकांवरच घसरले त्यावेळीं टिळकांविषयीं त्यांनीं काढलेले 'हाय हाय गंगापूर', 'टिळक बाळंतीण झाले' इत्यादि लेखांतील उद्गार कोणाही सदभिरुचीच्या माणसास चीड आणतील असेच होते. 'बापासि बाप न' म्हणणाऱ्या अच्युतरावांस लो. टिळकांचें गुरुत्व एकंदरींत मानवलें नाहीं असेंच म्हणावें लागतें. त्यांना गुरु केल्यानंतर थोड्याच दिवसांत अच्युतरावांना कारागृहाचा अनुभव घ्यावा लागला. तो त्यांची कीर्ति वाढविण्यास जरी कारणीभूत झाला हें जरी खरें तरी पुढें फंडगुण्ड प्रकरणांत त्यांनीं जो टिळकांशीं विरोध केला त्यांत त्यांचा कीर्तिचंद्र मावळला एवढेंच नव्हे तर त्यावेळीं त्यांना लागलेल्या नैतिक अधःपाताचा डाग पुढें केव्हांही पूर्णपणें धुवून टाकतां आला नाहीं. शांतारामाचे चाळींत त्यांच्या डोक्यावरून जी त्यांची एकदां टोपी खालीं पडली ती कायमचीच पडली! क्रांतिकारक वृत्तपत्रकार म्हणून अच्युतराव यांनीं जें यश मिळविलें तें वृत्तपत्रकार या नात्यानें त्यांनीं आपली जबाबदारी न ओळखल्यामुळें सर्व घालविलें. अच्युतराव यांच्या वर्तमानपत्री लिखाणांत ॲडीसनची चिकित्सक बुद्धि आणि स्टीलचा अंतःकरणांतील ओलावा होता, तरी उपरोक्त दोघांही निबंधकारांची सार्वजनिक नीतिमत्ता नसल्यामुळें त्यांचे वृत्तपत्र-विषयक व्यवसाय डिफो व बी. जी. हॉर्निमन यांच्या व्यवसायांप्रमाणेंच शेवटीं अल्पजीवी आणि अपेशी ठरले. तथापि 'संदेश'मधील त्यांचे 'छत्रपती शिवाजी व समर्थ रामदास', 'राष्ट्रध्येयाची कांचनगंगा', 'दादाभाई गया' 'बापू गोखले, विष्णु शास्त्री चिपळूणकर, आगरकर, रावसाहेब रानडे, गोखले, जिन्सीवाले, फेरोजशहा, अण्णासाहेब पटवर्धन, भाऊशास्त्री लेले इत्यादि विषयांवरील व व्यक्तींवरील लेख उत्कृष्ट वाङ्मयाचे नमुने म्हणून आजही पुनर्मुद्रित करून प्रसिद्ध करावयास हरकत नाहींत.

अच्युतराव यांचें अस्सल वाङ्मय जरी त्यांच्या 'संदेश'मधूनच प्रसिद्ध झालें आहे तरी तद्व्यतिरिक्त इतर कांहीं पुस्तकेंही त्यांनीं लिहिलीं आहेत. त्यांनीं

'स्वामी विवेकानंद' हें नाटक लिहून मराठी नाट्यवाङ्मयांत समकालीन व्यक्ती घालण्याचा एक नवीनच उपक्रम केला. अच्युतराव यांचा हिंदुधर्माभिमान त्यांच्या स्वदेशाभिमानाइतकाच जाज्वल्य होता याचें प्रत्यंतर या नाटकावरून पटतें. या नाटकांत बरींच मद्रासी पात्रें घातलीं आहेत. त्यांचे स्वभावविशेष रंगवितांना त्यांना त्यांच्या मद्रासेंतील वास्तव्याचा बराचसा उपयोग झाला असावा. पहिल्या कारागृहवासांत त्यांनीं कुराणाचें परिशीलन केलें होतें व बायबल, कुराण व भगवद्गीता यांचा तौलनिक अभ्यास करतां यावा म्हणून त्यांचीं भाषांतरें वर्तमानपत्रांतून एकमेकांशेजारीं छापण्याचाही उपक्रम त्यांनीं एकदां सुरू केला होता. 'स्वामी विवेकानंदा' खेरीज 'सुंदोपसुंद', 'नारिंगी-निशाण', 'ताई तेलीण', बह्या बोळ' इत्यादि नाटकेंही त्यांनीं लिहिलीं असून, पहिलीं दोन पुस्तकरूपानेंही प्रसिद्ध आहेत. वर्तमानपत्री मजकुराप्रमाणें अच्युतराव यांनीं आपलीं नाटकेंही घिसाडघाईनें लिहून काढलीं असल्यामुळें वाङ्मयांत त्यांची योग्यता फारशी वरच्या दर्जाची नाहीं. तथापि 'स्वामी विवेकानंद', सुंदोपसुंद' व 'मस्तानी' हीं त्यांचीं नाटकें खात्रीनें एकदा वाचण्यालायक आहेत. अच्युतराव यांस मराठ्यांचा इतिहास वाचण्याचें अगदीं लहानपणापासूनच वेड होतें. त्यांची 'इंग्रजांचा पराभव' ही कादंबरी ऐतिहासिक असून तींत वडगांव येथें महादजी शिंद्यानें केलेल्या इंग्रजांच्या पराभवाचें वर्णन कथानकाच्या साहाय्यानें केलें आहे. 'चोरी कशी करावी' ह्या त्यांच्या अत्यंत चटकदार पुस्तकांत हिंदुस्थानला स्वातंत्र्याची चोरी किती मार्गांनीं करितां येईल याचें विवेचन केलें आहे. लोकांच्या उल्लू स्वभावाचा फायदा घेऊन त्यांना स्वाभिमानाचे व स्वदेशाभिमानाचे धडे कसे देतां येतात हें त्यांनीं आपल्या 'पहिली रात्र' या तीन आणे मालेंत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून उत्तम रीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे. या खेरीज 'महायुद्धाचा इतिहास', 'विसकटलेली वेणी', 'कोल्हापुरच्या आक्काबाई', 'रंगेल रंग', 'भोळा सांब ग बाई' इत्यादि किरकोळ पुस्तकेंही त्यांनीं लिहिलीं आहेत. परंतु या छोट्या निबंधांत त्यांचा परामर्ष करण्या इतकें त्यांचें महत्त्व नाहीं. 'उषा' मासिकांतील त्यांचीं पुस्तकपरीक्षणें व आपले वडील कै. वामनराव कोल्हटकर यांजवरील त्यांचा मासिक मनोरंजनांतील लेख हींदेखील एकदां अवश्य वाचनीय आहेत. विशेषतः आपल्या वडिलांवरील लेखांत त्यांनीं 'मरणान्तानि वैराणि' या

तत्त्वाचा अवलंब करून पित्याविषयीं आपल्या हातून घडलेल्या प्रमादाबद्दल पश्चात्तापदग्ध मनानें प्रायश्चित्तच घेतलें असें म्हणावयास हरकत नाहीं. दीर्घद्वेष त्यांना कधींच माहीत नव्हता. नरसोपंत केळकर यांजवर अनेकदां हल्ले करूनही शेवटीं त्यांच्या गुणगौरवपर असा एक उत्कृष्ट लेख त्यांनीं लिहिला होता. त्यांच्या खेळाडू वृत्तीचे व उच्छृंखल बुद्धीचे हे भाग म्हणून मानावयास हरकत नाहीं.

अच्युतराव यांची भाषाशैली त्यांच्या वर्तमानपत्री पेशाला सर्वस्वीं साजेल अशी होती. चटकदारपणा हा त्यांच्या भाषाशैलीचा विशेष गुण आहे. त्यांचीं वाक्यें सुटसुटीत आणि सहजसुंदर असल्यामुळें तीं वाचतांना बुद्धीला ताण द्यावा लागत नाहीं. कल्पनेच्या कोलांट्या उड्या एकामागून एक सफाईदारपणें घेण्यांत सर्कशींतील एखाद्या पटाईत खेळाडू इतके ते प्रवीण होते. त्यांच्या लेखणीची दौड विलक्षण होती; ती एकदां भरधांव सुटली म्हणजे मागें वळून पहावयास तिला अवसर नसे. केव्हां केव्हां तिची दौड दारू पाजलेल्या शर्यतीच्या घोड्याप्रमाणें बेफाम होऊन मार्गांत येणाऱ्या सर्व वस्तू सर्रहा तुडविल्या जात. अच्युतरावांच्या कल्पनेचे फुटाणे उडूं लागले म्हणजे ते वेंचणेंही दुर्घट होऊन जातें. उपमा आणि उत्प्रेक्षा यांची तर त्यांच्या लिखाणांत निव्वळ खैरात केलेली असते. अतिशयोक्ति हा अलंकार तर त्यांच्या बारशालाच पुजला होता. अच्युतरावांच्या लेखनपद्धतींत वैचित्र्य आहे पण विविधता नाहीं, विद्वत्ता आहे पण विद्वत्तेचा डौलदारपणा नाहीं, नखरा आहे पण नाजुकपणा नाहीं, आवेश आहे पण ओज नाहीं. त्यांची भाषासुंदरी मनाला मोहित करणारी असली तरी तिच्यांत कलावंतिणीचा छिचोरपणा असल्यामुळें तिच्या सभ्यपणाविषयीं मन साशंक होतें. ती तोंडाचा फटकळ असल्यामुळें तिच्या तोंडांतून केव्हां कोणतीं मुक्ताफळें पडतील याचा नेम नाहीं. तिच्या नृत्यांत अंगविक्षेप जरा फाजील असून त्याला थिल्लरपणाचेंही स्वरूप येतें. तिच्या गाण्यांत ढंग असला तरी त्यांत सुरेलपणा आणि तालबद्धता नाहीं; त्यामुळें तें कंटाळवाणें होतें. एकच तान पुनःपुन्हां घेण्याची तिला फार वाईट संवय आहे. अच्युतराव लिहितांनाही व्याख्यानाचा दौरा काढल्याचा आव आणीत, त्यामुळें त्यांना तोलून मेजके शब्द घालण्याची कधींच संवय लागली नाहीं. एकाच अर्थाचे अनेक शब्द घालण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें त्यांच्या वाग्जालांत अर्थाचे मासे फारच कमी प्रमाणांत सांपडतात. पुनरुक्ति हा त्यांच्या लेखनपद्धतीचा सर्वांत मोठा दोष होय. त्यांच्या लेखांतील

पहिलें वाक्य वाचलें असतां त्या खालील वीस ओळी वाचल्याचें श्रेय मिळत असे.

अच्युतराव यांच्या लिखाणाला चटकदारपणा त्यांतील विनोदामुळें येत असे. अच्युतराव यांचा विनोद समजावयाला सोपा असल्यामुळें सामान्य वाचकांस तो फार प्रिय होऊन बसला होता. अच्युतरावांच्या विनोदांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा रेंखीवपणा नाहीं; उपहास हा त्याचा आत्मा आहे. अच्युतरावांच्या विनोदांत मार्मिकपणा असला तरी अणकुचीदारपणा नाहीं. त्यांचा विनोद हंशा पिकवितो पण गुदगुदल्या करीत नाहीं. जुन्या गोष्टींना आधुनिक उपमा देऊन विनोद उत्पन्न करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. तथापि एकंदरींत त्यांच्या विनोदांत नरसोपंत केळकरांचा मार्मिकपणा, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा रेखींवपणा, शिवरामपंत परांजप्यांची वक्रोक्ति, गडकऱ्यांची कल्पकता यांचा अभावच आढळतो.

वि. ह. कुळकर्णी.

**कोल्हटकरांचें वाङ्मयः—**( १ ) युरोपांतील युद्ध; ( २ ) नारिंगी निशाण, १९१७; ( ३ ) सुंदोपसुंद नाटक; ( ४ ) स्वामी विवेकानंद नाटक, १९१४; ( ५ ) वत्सलावहिनींचे लेख, १९१५; ( ६ ) चोरी कशी करावी, १९२५; ( ७ ) रंगेल रंग, १९२५; ( ८ ) विस्कटलेली वेणी; ( ९ ) पहिली रात्र, १९२५; ( १० ) कोल्हापुरच्या आक्काबाई; ( ११ ) इंग्रजांचा पराभव, १९२६; ( १२ ) भोळा सांब ग बाई व वत्सलावहिनीचें पत्र, १९३०; (१३) मस्तानी नाटक व संगीत सौख्यसोपान नाटक.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) अच्युत बळवंत कोल्हटकर यांचें चरित्र, विठ्ठल विनायक लेले, १९३१.

( २ ) स्वामी विवेकानंद–परीक्षण–डॉ. पां. दा. गुणे, मनोरंजन, जुलै, १९१४.

( ३ ) नारिंगी निशाण–परीक्षण, प्रो. ह. रा. दिवेकर, मनोरंजन, डिसेंबर १९१७.

**क्यांडी टॉमस—**[इ. स. १८०६–१८७७] कोशकार व कायद्याच्या पुस्तकांचा भाषांतरकार. हे इंग्लंडहून १८२२ सालीं ईस्ट इंडिया कंपनीचे लष्करांत चाकरी पतकरून मुंबईस आले. कांहीं वर्षांनीं सरकारनें त्यांस कॅप्टन मोल्स्वर्थ यांस ते रचित असलेल्या मराठी–इंग्लिश कोशाचे कामीं मदत करण्या-

करितां नेमिलें. या कामावर ते १८३२ पासून १८३५ पर्यंत होते. १८४० त त्यांनीं इंग्लिश-मराठी कोशाचें काम हातीं घेतलें व पुरें केलें. या कोशाची प्रथमावृत्ति १८४७ त प्रसिद्ध झाली व दुसरी आवृत्ति—सुधारून व वाढवून—१८७३ त छापली गेली. या कोशाचें पारितोषक म्हणून सरकारकडून क्यांडींस दहा हजार रुपये देण्यांत आले. कोश छापण्याचें काम मुंबई सरकारनेंच केलें.

क्यांडीसंबंधींचा विस्तृत माहितीनें भरलेला असा चरित्रलेख विनायक कोंडदेव ओक यांनीं १९११ च्या 'बालबोधा'च्या अंकांत लिहिला आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग खालीं देत आहों:-

"इ. स. १८५१ पासून १८५५ पर्यंत मेजर क्यांडीसाहेब हे पुण्याच्या पाठशाळेचे प्रिन्सिपॉल होते. तेव्हां तिची रचना कांहीं वेगळ्या प्रकारची होती. सध्यांच्या प्रमाणें तींत प्रीव्हियसचे, आणि बी. ए. चे वर्ग नव्हते. कां कीं, तेव्हां विश्वविद्यालय स्थापित झालें नव्हतें. त्या पाठशाळेस १८६७ त पूना कॉलेज हें नांव मिळून, त्याची व्यवस्था अगदीं नवी झाली, आणि तींत ग्रॅज्युएट तयार होऊं लागले. मेजर क्यांडीसाहेब म्हटले म्हणजे लष्करी खात्यांतील नौकर होते. त्यांची नेमणूक कोश तयार करण्याच्या कामावर आणि पाठशाळेच्या मुख्य अध्यापकाच्या कामावर त्यावेळीं कोणकोणत्या योगांनीं कशी झाली असावी, ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें.'

'मेजर क्यांडी ह्यांस १८५५त मुंबई सरकारच्या विद्याखात्याचे मराठी ट्रान्सलेटर नेमिलें. या खात्यांत असतां सरकारी हुकुमानुसार त्यांनीं क्रमिक पुस्तकें तयार केलीं. या कामीं त्यांस परशुरामतात्या गोडबोले वगैरेंचें साह्य झालें. ह्या कामाचीं सगळीं सूत्रें मेजर क्यांडी साहेबांनीं आपल्या हातीं ठेविलीं होतीं. इंग्रजी भाषेंतील अनेक प्रकारचीं क्रमिक पुस्तकें त्यांनीं जमविलीं होतीं. त्यांतल्या धड्यांची निवड क्यांडी साहेबांनीं करावयाची व त्यांचीं मराठी भाषांतरें गोडबोले आदि मंडळींनीं करावयाचीं. तीं साद्यंत ह्यांनीं तपासावयाचीं; त्यांतल्या भाषापद्धतीविषयीं आणि परिज्ञानाविषयीं शंकासमाधानें व्हावयाचीं आणि मग तीं छापावयाचीं, असा क्रम असे. ह्या पुस्तकांतील कवितांच्या धड्यांचें सगळें काम परशुरामपंत तात्या गोडबोले यांजकडे सोंपविलें होतें. मंडळीच्या सांगण्यांत असें येत असे कीं, हीं मराठी क्रमिक पुस्तकें इंग्रजींतल्या क्रमिक पुस्तकांच्या नमुन्यावर

तयार व्हावीं, अशी त्या साहेबांची फार इच्छा असे. त्यांनीं कधीं एकहि वाक्य चालढकलीवर नेलें नाहीं. शब्दशुद्धीवर आणि अर्थस्पष्टतेवर त्यांचा फार कटाक्ष असे. आज तीस चाळीस वर्षें जी मराठी शब्दलेखनपद्धति सर्वत्र प्रचारांत आलेली आहे, ती सगळी मेजर क्यांडी ह्यांच्या क्रमिक पुस्तकांतली आहे. ती त्यांनीं कोठून नवीन आणली नाहीं. त्यांच्या आधीं बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर ह्यांनीं हिंदुस्थानचा इतिहास वगैरे जीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं होतीं, त्यांतलीच ती आहे. तरी, तिजविषयीं असा एक आक्षेप होता कीं, भोंवतालची बहुतेक मंडळी कोंकणस्थ असल्याकारणानें, क्यांडी साहेबांस त्यांच्या भाषेची गोडी लागून, त्यांची पद्धति लेखनांत आली. तींतलें ऱ्हस्वदीर्घत्व आणि अनुनासिकत्व देशस्थ वगैरे मंडळीस फार अडवितें. म्हणून, तें अजीबात काढून टाकण्याचा प्रयत्न, सांप्रतचीं मॅकमिलनचीं नवीं क्रमिक पुस्तकें रचण्याच्या आधीं, कांहीं मंडळींनीं केला होता. तो साधला असता तर **आणि** ह्याच्या जागीं '**आणी**' झालें असतें, आणि **परंतु** चें '**परंतू**' असें झालें असतें. आणखी असे दुसरे पुष्कळ फेरफार झाले असते. परंतु, तेव्हां मुंबईच्या महाराष्ट्र मंडळीनें सर भालचंद्र भाटवडेकर ह्यांच्या अग्रगण्यत्वानें आणि रेव्ह. डॉ. म्याकिकन ह्यांच्या साह्यानें तें प्रकरण अगदीं मुख्य सरकारापर्यंत नेऊन, आणि त्या अदलाबदलीनें विनाकारण किती त्रास झाला असता हें दाखवून, त्यांच्या अनुज्ञेनें मेजर क्यांडी ह्यांचीच लेखनपद्धति कायम राखिली."

"पूर्वीं मराठी ग्रंथकारांस उत्तेजन देण्याकरितां शाळाखात्याकडे बरीच रक्कम काढून ठेविलेली असे. तींतून ग्रंथांचे हक्क विकत घेऊन ते छापीत असत, किंवा ग्रंथकारांपासून कांहीं प्रती विकत घेऊन त्यांना आश्रय देत असत. शिवाय अशाच कामाकरितां दक्षिणा प्रैझ म्हणून एक कमिटी असे. तिच्या स्वाधीन बरेच पैसे असत. आणि ह्या दोन्ही संस्थांकडे आश्रयार्थ आलेले ग्रंथ क्यांडी साहेबांकडे जात असत. कां कीं, ते शाळाखात्याचे ट्रान्सलेटर होते आणि त्या कमिटीचे अध्यक्ष होते. हे ग्रंथ ते किती आस्थेनें पहात असत ह्याची माहिती ज्यांचे ग्रंथ त्यांनीं तपासून नीट केलेले आहेत, त्यांसच आहे. इतरांस त्याची कल्पना यावयाची नाहीं. ते अनुस्वार विसर्गापर्यंत बारीक पाहात असत. तरी त्यामध्यें त्यांचें एक मोठें धोरण हें असे कीं, कोणाही लेखकाची हिम्मत खचूं द्यावयाची नाहीं. चुक्या दाखवावयाच्या, ग्रंथ शुद्ध करावयाचा, आणि त्या रीतीनें तो

सुधारण्यास ग्रंथकारांस सुचवावयाचें. तें इतकें जपून करावयाचें कीं, पुस्तक 'वाईट' असें कधीं सहसा म्हणावयाचें नाहीं. तितकाच प्रसंग आला, तर 'चांगलें नाहीं' म्हणावयाचें. दुखवावयाचें नाहीं. हातपाय मोडावयाचे नाहींत. कां कीं, आपण इंग्लिश लोक जसे इतर अनेक विषय हिंदुस्थानच्या प्रजाजनांस शिकवीत आहों, तसें स्वभाषेचें ग्रंथलेखन हेंहि त्यांना शिकवावयाचें आपलें काम आहे, अशी त्यांची बुद्धि नेहमीं असे. तिचा फार उपयोग झाला आहे. मराठींत चांगले ग्रंथकार तयार करण्याकडे त्यांचा ओढा त्यांच्या अभिप्रायांत उघड दिसून येत असे. या योगें पुष्कळ मराठी लेखकांस पुष्कळ लाभ झाले आहेत. क्यांडी साहेब मराठी ट्रान्सलेटरच्या जागेवर असतां, सरकारच्या आश्रयानें जितके मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत, तितके ग्रंथ तेवढ्या अवकाशांत पूर्वी प्रसिद्ध झाले नव्हते, आणि तसे पुढें प्रसिद्ध होण्याची आशा दिसत नाहीं."

"क्यांडी साहेबांस इंग्रजी आणि मराठी ह्या दोन्ही भाषा मार्मिकपणें कळत असत, हें जाणून सरकारनें त्यांजकडून इंडियन पिनलकोड, सिव्हिल प्रोसीजर कोड, व क्रिमिनल प्रोसीजर कोड यांचें मराठी भाषांतर करविलें. त्यांत त्यांना कितीएक शब्द अगदीं नवे करावे लागले आहेत."

क्यांडींची सर्व हयात महाराष्ट्रांतच गेली. त्यांनीं आपला देहहि महाराष्ट्रांत—महाबळेश्वरीं—ठेविला.

**खरे वासुदेव वामनशास्त्री** [१८५८–१९२४] कवि, नाटककार, इतिहाससंशोधक. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील गुहागर या गांवीं झाला. मराठी सहा यत्तांपर्यंतचें शिक्षण गुहागर येथें झालें. १८७६ चे सुमारास ते सातार्‍यास आले व तेथील विख्यात पंडित अनंताचार्य गजेंद्रगडकर यांजकडे त्यांनीं संस्कृत भाषेचें व वाङ्मयाचें अध्ययन सुरू केलें. तदनंतर पुणें येथें शिक्षकाची नोकरी पत्करून, पुण्यांतील त्यावेळचे प्रसिद्ध वैय्याकरणी नारायणशास्त्री गोडबोले यांजपाशीं व्याकरण ग्रंथांचें अध्ययन केलें. याच ठिकाणीं त्यांचा विष्णुशास्त्री चिपळुणकर, जनार्दन बाळाजी मोडक, काशिनाथ नारायण साने यांच्यांशीं परिचय झाला व त्यांचे सहवासांत त्यांस इतिहासाभ्यासाची व संशोधनाची गोडी लागली. टिळक व आगरकर यांच्याशींहीं त्यांचा यावेळीं दाट परिचय झाला. न्यू इंग्लिश स्कुलाच्या स्थापनेच्या वेळीं जे लोक शिक्षक म्हणून दाखल झाले त्यांत वासुदेवशास्त्री हे एक होते. या

शाळेंत त्यांनीं जवळ जवळ एक वर्ष काम केलें, व पुढें मिरजेच्या शाळेंत संस्कृताध्यापकाची नोकरी केली. त्यांची सर्व हयात मिरजेंतच शिक्षकाचें काम करण्यांत गेली.

मिरजेस गेल्यावर त्यांनीं इंग्रजीचा स्वतंत्रपणें अभ्यास सुरू केला व इतिहाससंशोधनाचें कार्य हातीं घेतलें. त्यांचा पहिला इतिहासविषयक ग्रंथ म्हणजे नाना फडणविसाचें चरित्र हा होय. हें चरित्र लिहिलें जात असतां त्यांस मळे संस्थानच्या जुन्या दप्तराची माहिती लागली. हें दप्तर फार जुनें व मोठें आहे. "वस्तुतः तें मिरजेचेंच दप्तर आहे व पटवर्धन जहागिरीच्या वांटण्याहोण्यापूर्वी मिरजकिल्ला हाच पटवर्धनांच्या राजकीय उलाढालीचें केंद्र असल्यामुळें चोहों बाजूंनीं होणारा राजकारणी पत्रव्यवहार या मध्यवर्ती ठिकाणाशींच होत असे; मिरज व मिरजमळा ही वांटणी वरीच अलीकडची आहे; आणि हेंच मिरजेचें दप्तर आज मिरजमळा संस्थानच्या ताब्यांत आहे. सांगली व जमखंडी येथील दप्तरें मोठीं असलीं तरी तीं अलीकडचीं—एकोणीसाव्या शतकांतील—आहेत. शास्त्रीबुवांनीं कामापुरतीं तींहि अंशतः पाहिलीं होतीं. पण मळे संस्थानचे पत्रसंग्रहाचे ३०० रुमाल—गठ्ठे—असून, त्यांतला अगदीं कपटानूकपटा खरेशास्त्री यांनीं वाचून पाहिला होता. वाचतांना महत्त्वाचीं पत्रें वाटलीं तीं त्यांनीं निवडून काढलीं; कांहीं पत्रांतील निवडक भागांचीं त्यांनीं टिपणें करून घेतलीं; या निवडलेल्या पत्रांच्या मोडींत नकला करवून त्या अस्सल पत्रांवरून तपासून पाहिल्या; या मोडी लेखकांस नकला करण्यासाठीं मोबदला त्यांस ७-८ शें रुपये द्यावा लागला. शिवाय ते स्वतः लिहीत तें वेगळेंच. असा क्रम पहिलीं ५-७ वर्षें तर सतत चालला होता. त्यानंतर मिरज, कुरुंदवाड, इचलकरंजी इत्यादि संस्थानांच्या अधिपतींची परवानगी मिळवून तेथील दप्तरेंहि त्यांनीं शोधून पाहिलीं. यांखेरीज ह्या भागांतले लहान लहान जहागिरदार, इनामदार, तैनातदार व इतर जुनीं घराणीं—जेथून जेथून जुना पत्रव्यवहार मिळणें शक्य होतें तेथून—तो मिळविण्याचा हरएक प्रयत्न करून त्यांनीं मिळविला. पुण्यासारख्या दूरच्या ठिकाणांहूनसुद्धां कित्येक कागदपत्र त्यांनीं मिळविले व ह्या सर्व कागदपत्रांचा त्यांनीं आपल्या संशोधनकार्यास उपयोग करून घेतला. मराठी राज्याच्या पानिपतोत्तरकालीन इतिहासाच्या दृष्टीनें पटवर्धनी दप्तराची योग्यता फार मोठी आहे. पटवर्धन सरदारांची चलती १७६०-६१ पासून पेशवाईच्या अंता-

पर्यंत ४० वर्षें चांगलीच होती. ह्या अवधींत पेशव्यांनीं केलेल्या सर्व मोहिमांत पटवर्धन प्रमुख होते. प्रत्येक लढाईंत आघाडीचा मान पटवर्धनांकडे असे. ह्या४०वर्षांतील लढायांत ह्या घराण्यांपैकीं २०—२५ पुरुष समरांगणीं पडले आहेत. प्रत्येक स्वारींतील सैन्याच्या हालचाली, वेढे, लुटालुटी, लढाया, छापे, पाठलाग, फंदफितूर वगैरे जे जे प्रकार झाले त्या सर्वांचें इत्थंभूत वर्तमान त्या त्या स्वारींतील सरदारांनीं व कारकुनांनीं मिरजेस लिहून पाठविलेलें आहे. पटवर्धनांच्या कुळांत गोपाळराव व परशुरामभाऊ हे धुरंधर योद्धे होऊन गेले. त्यांनीं मोठमोठ्या आणीबाणीच्या वेळीं लिहिलेलीं हजारों पत्रें शास्त्रीबुवांस उपलब्ध झालीं. वामनराव, निळकंठराव, कोन्हेरराव, रघुनाथराव, पुरुषोत्तमदाजी, पांडुरंगराव, वगैरे पटवर्धन सरदारांची तसेंच नानासाहेबांपासून रावबाजीपर्यंत सर्व पेशवे, सखारामबापू, मोरोबादादा व नाना फडणवीस, गोविंद शिवराम, अप्पा बळवंत, त्रिंबकरावमामा, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, धायगुडे, रास्ते, कोल्हापूरराजमंडळाचे सरदार, हैदरअल्ली, निजामअल्ली, नागपूरकर भोंसले, गायकवाड, मुराररावं घोरपडे, इत्यादि इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं पत्रें पटवर्धन दप्तरांत सामील झालेलीं आहेत. सारांश, या चाळीस वर्षांत, मिरज हें तत्कालीन राजकीय उलाढालींचें एक मोठें केंद्रस्थान असल्यामुळें, अनेक लहान मोठ्या नद्या जशा समुद्रास जाऊन मिळतात त्याप्रमाणें देशांतील सर्व राजकीय घडामोडींचीं आणि कारस्थानांचीं बातमीपत्रें मिरजेंत यावींच लागत." (भटकृत खरे चरित्र).

वि. का. राजवाडे यांनीं खरेशास्त्र्यांजवळ तीस हजार निवडक ऐतिहासिक लेख असल्याचें एके ठिकाणीं लिहिलें आहे. यावरून शास्त्रीबुवांच्या संशोधनाच्या अवाढव्यतेची कल्पना येईल. शास्त्रीबुवांनीं या कामीं सतत २८ वर्षें कष्ट केले. संशोधिलेलीं ऐतिहासिक पत्रें प्रसिद्ध करण्यासाठीं त्यांनीं १८९७ सालीं 'ऐतिहासिक लेखसंग्रह' नांवाचें मासिक सुरू केलें पण पुरेसे वर्गणीदार न मिळाल्यामुळें त्यांनीं तें बंद केलें. यापुढें ते ऐतिहासिक लेख विस्तृत प्रस्तावनांसह खंडशः प्रसिद्ध करूं लागले. १९२४ पर्यंत त्यांनीं १२ खंड प्रसिद्ध केले. याखेरीज त्यांनीं 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास,' 'मिरजप्रकरण,' 'हैदरअल्लीवरील तिसरी स्वारी,' 'अधिकार योग,' 'हरिवंशाची बखर' हीं ऐतिहासिक पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

वासुदेवशास्त्र्यांच्या संशोधनविषयक कामगिरीविषयीं रा. न. चिं. केळकर यांनीं पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहे, "जुन्यापुराण्या पत्रांच्या भाराभर गळाठ्यांतून नेमकीं महत्त्वाचीं पत्रें निवडून काढणें व मग त्यांतला वेंचक भाग वाचकांपुढें व्यवस्थितपणें मांडणें ह्यामुळें त्यांचें ऐतिहासिक शोधनकार्य भरींव व इतकें सुव्यवस्थित झालें आहे कीं, कोणाहि आंग्लविद्याविभूषित पदवीधराला तें शोभेसें आहे. त्यांचे अंगीं कोणत्याहि युनिव्हर्सिटीचे उच्च पदवीधर अगर फर्डा वकील किंवा बॅरिस्टर होण्याच्या योग्यतेची बुद्धिमत्ता होती. पारसनिसांप्रमाणें साधनानुकूलता व राजवाड्यांप्रमाणें संचारस्वातंत्र्य नसतांहि शास्त्रीबुवांचें संशोधनकार्य सूत्रबद्ध व व्यवस्थित झालें. पारसनिसांचा संग्रह मौल्यवान् व मातबर असेल आणि राजवाडे यांची कल्पनेची भरारी व शीघ्र ग्रहणशक्ति त्यांचे ठिकाणीं नसेल, तथापि खरेशास्त्री यांचे अंगीं या उभयतांपेक्षां निकोप अशी विवेचक बुद्धि होती; इतकेंच नव्हे तर त्यांच्या ग्रंथप्रसिद्धीमध्यें जी सारासार बुद्धि, प्रमाणबद्धता, शिस्त, पद्धत व वाचकांना आपल्याशीं समरस करण्याची हातोटी, होती ती खरोखरच अवर्णनीय होय. पारसनिसांचा ऐतिहासिक संग्रह पाहून मनुष्यास हेवा वाटेल आणि राजवाड्यांची संशोधकीय आतषबाजी पाहून मनुष्य क्षणभर आश्चर्यचकित होऊं शकेल. परंतु ऐतिहासिक चिकित्सक बुद्धीला रुचकर, सहज पचणारें व कायमची पुष्टी देणारें खाद्य खरेशास्त्री यांच्या ग्रंथांत जसें मिळतें तसें इतरत्र क्वचितच मिळेल. मोठ्या पायावर लहान इमारत ते रचीत. ह्यामुळें त्यांचीं अनुमानें सहसा अबाधित राहात व आपल्या ऐतिहासिक माहितीचा ते कधींहि 'मीनाबझार' करून मांडीत नसल्यामुळें त्यांच्या निबंधप्रबंधांतील प्रमेयें आपल्या आवाक्यांतील आहेत असेंच सर्वांस वाटे. त्यांच्या लिहिण्यांत सुबकपणा, सुव्यवस्थितपणा व उपयुक्तता दिसून येते." ( केसरी, १७ जून १९२४. )

वासुदेवशास्त्र्यांनीं सर्व संशोधन हालअपेष्टा सोसून व स्वतःच्या पदरास खार लावून केलें. त्यांस कोणाकडून कधींहि म्हणण्यासारखी आर्थिक मदत झाली नाहीं. वास्तविक ज्या पटवर्धन संस्थानिकाच्या पदरीं ते होते त्यानें त्यांच्या कार्यांचें महत्व जाणून त्यांस मदत करावयास हवी होती. पण ती कधीं झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर ३०-४० रुपयांहून अधिक पगार त्यांना कधीं मिळाला नाहीं. संशोधन व ग्रंथप्रकाशन यांसाठीं होणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं त्यांस नाटकें लिहावीं लागलीं. 'गुणोत्कर्ष,' 'तारामंडळ,' 'कृष्णकांचन,'

' चित्रवंचना, ' ' शिवसंभव, ' ' उग्रमंगल, ' हीं त्यांचीं नाटकें प्रसिद्ध आहेत. या नाटकांनींच त्यांना त्यांच्या गरिबींत हात दिला. हीं नाटकें शास्त्रीबुवांनीं जरी गरजेकरितां लिहिलीं असलीं, तरी त्यांचा वाङ्मयिक दर्जा मोठा आहे. भाषाप्रभुत्व, रसिकता, मार्मिकता, व विनोद हे शास्त्रीबुवांतील विशेष गुण त्यांत उत्कटत्वानें प्रगट झाले आहेत.

वासुदेवशास्त्री हे उत्तम प्रकारचे कवीहि होते. त्यांनीं पूर्ववयांत बरीच स्फुट कविता लिहिली असून, ' समुद्र, ' ' यशवंतराव महाकाव्य ' हीं त्यांचीं काव्यें प्रसिद्ध आहेत.

**खरेशास्त्री यांचें वाङ्मय** ( १ ) समुद्र—काव्य १८८४; ( २ ) यशवंतराव महाकाव्य, १८८८; ( ३ ) गुणोत्कर्ष नाटक १८८५; ( ४ ) तारामंडळ नाटक; ( ५ ) संगीत चित्रवंचना नाटक; ( ६ ) संगीत कृष्णकांचन नाटक, १९१७; ( ७ ) शिवसंभव नाटक; ( ८ ) संगीत उग्रमंगल नाटक; ( ९ ) संगीत देशकंटक नाटक; ( १० ) नाना फडणविसांचें चरित्र, १८९२; ( ११ ) अधिकार योग, १९०८; ( १२ ) हरिवंशाची बखर, १९०९; ( १३ ) इचलकरंजी संस्थानचा इतिहास, १९१३; ( १४ ) मालोजी व शहाजी १९२०; ( १५ ) ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १ ते १२, १८९७—१९२४.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) वासुदेव वामनशास्त्री खरे यांचें चरित्र व ग्रंथपरिचय, दा. मो. भट, १९२९.

( २ ) अधिकारयोग—नाना फडणविसांचें चरित्र—परीक्षण, वा. ना. देव, विविधज्ञानविस्तार, पु. ४१, अंक १२, १९१०; पु. ४२ अंक १, १९११

( ३ ) शिवसंभव परीक्षण, ए. या. निफाडकर, नवयुग, एप्रिल १९२०.

**गडकरी राम गणेश** [ १८८५—१९१९ ] कवि, नाटककार, विनोदी लेखक. श्रावणांत निरभ्र आकाशांतून नकळत एकदम पृथ्वीवर पाऊस पडूं लागतो. सूर्यकिरणांनीं चमकूं लागलेल्या या सरीकडे माणसें सानंद पाहूं लागतात न लागतात तोंच ती सर अदृश्य होते. पृथ्वी मात्र स्नानगृहांतून बाहेर आलेल्या सुंदर स्त्रीप्रमाणें दिसूं लागते. उन्हानें गालाला हात लावतांच हांसणारे

वृक्षपर्णावरील जलबिंदूही विद्युल्लतेच्या वेगानें आलेल्या व गेलेल्या त्या सरीची आठवण करून देतात.

गडकऱ्यांचें वाङ्मयजीवनही असेंच झालें. १९१२ त ज्याची पहिली नाट्यकृति रंगभूमिवर आली तो नाटककार चार पूर्ण व दोन अपूर्ण नाट्यकृति रंगदेवतेच्या चरणीं अर्पण करून १९१९ मध्यें कालाच्या पडद्याआड कायमचा निघून गेला. अवघ्या अर्ध्या तपाचा सारा खेळ. पण तसेंच पाहिलें तर पराक्रमाचा व कालावधीचा काय संबंध आहे? वीज क्षणभरच चमकते पण सबंध आकाश उजळून जाते; परंतु काजवा रात्रभर चमकत राहिला तरी प्रवाशाला पायाखालची वाट दिसण्याच्या कामींसुद्धां त्याच्या प्रकाशाचा उपयोग होत नाहीं!

गडकऱ्यांचा जन्म १८८५ सालीं गुजराथमध्यें झाला. वयाचीं दहा वर्षे उलटण्यापूर्वीच पितृवियोगाची आपत्ति त्यांच्यावर कोसळली. वडिलांच्या मृत्यूमुळें उद्भवलेल्या सर्व हालअपेष्टांना तोंड देत वयाच्या एकोणिसाव्या वर्षी ते प्रवेश परीक्षा पास झाले. पुढील वर्षी प्रीव्हियसच्या परीक्षेंत त्यांना शारीरिक व मानसिक अस्वास्थ्यामुळें अपयश आलें. वावटळ कुठल्या दिशेनें जाईल याचा जसा नियम नसतो त्याप्रमाणें मनांतलें वादळही मनुष्याला कुठें नेईल अगर त्याच्या हातून काय करवील हें सांगतां येत नाहीं. पदवी आणि तिच्या मागून येणारी प्रोफेसरकी हे दीपस्तंभ गडकऱ्यांना यावेळीं दिसेनासे झाले. निराशेच्या गाढ अंधकारांत जिकडून आनंदाचा प्रकाशकिरण येईल असें त्यांना वाटलें तिकडे त्यांनीं आपली जीवितनौका हांकारली.

अशा रीतीनें वयाच्या एकविसाव्या वर्षी किर्लोस्कर नाटक मंडळीशीं मंडळींतील लहान मुलांचे शिक्षक या नात्यानें त्यांचा संबंध आला. वाङ्मयाची त्यांना उपजत आवड असून किर्लोस्कर मंडळींत येऊन दाखल होण्यापूर्वीच कोल्हटकरांच्या वाङ्मयाचे ते एकनिष्ठ भक्त झाले होते. किर्लोस्कर नाटकमंडळींत त्यांचा कोल्हटकरांशीं परिचय होऊन त्याचें स्नेहांत रूपांतर झालें. मंडळीच्या नाट्यप्रयोगाचें चिकित्सापूर्वक अध्ययन करतां आल्यामुळें नाटककार, नट व प्रेक्षक या तिरंगी सामन्यांत नाटककाराला विजयी व्हावयाचें असेल तर त्यानें कोणत्या मार्गाचा आश्रय केला पाहिजे याची त्यांना कल्पना आली, आणि

नाटकमंडळीबरोबर गांवोगांव फिरावें लागल्यामुळें त्यांच्या ज्ञानसंग्रहांत विविध अनुभवांची भर पडली.

किर्लोस्कर नाटकमंडळींत गडकरी गेल्यापासून त्यांचें प्रेमसंन्यास नाटक रंगभूमीवर येईपर्यंत सुमारें सहा वर्षें गेलीं. हा त्यांचा पूर्वतयारीचा काळ म्हणतां येईल. आपल्या कीर्तिमंदिराचा पाया घालण्याचे प्रयत्न त्यांनीं या वेळीं केले. १९११ सालापूर्वी त्यांच्या कांहीं कविता काळ, मनोरंजन वगैरे नियतकालिकांत आणि त्यांचे नाट्यपर विनोदी लेख रंगभूमि मासिकांत प्रसिद्ध झाले असले तरी कवि व विनोदी लेखक या दोन्ही नात्यांनीं त्यांना महाराष्ट्रीय कीर्ति मिळवून देणारें त्यांचें सर्व वाङ्मय १९११ नंतरच प्रसिद्ध झालें.

**वाग्वैजयंती**—गडकऱ्यांच्या सर्व कवितांचा हा संग्रह त्यांच्या मृत्यू-नंतर प्रसिद्ध झाला. त्यांची उत्कृष्ट कविता १९११ ते १९१९ या पांच वर्षांत प्रसिद्ध झाली. हळूवार अंतःकरण व विशाल कल्पनाशक्ति यामुळें ते कवि होण्या-करितांच जन्माला आले होते यांत शंका नाहीं. आधुनिक कवींपैकीं केशवसुत त्यांचे फार आवडते होते व स्वतःला ‘ केशवसुतांचा सच्चा चेला ’ म्हणवून घेण्यांत गडकऱ्यांना अभिमान वाटे. या शिष्यत्वाच्या जाणीवीमुळेंच त्यांनीं ‘ तुतारी ’ च्या धर्तीवर ‘ दसरा ’ व ‘ झपूर्झा ’ च्या धर्तीवर ‘ कलगीचें गाणें ’ इत्यादि कविता रचल्या. पण राष्ट्रीय, सामाजिक अगर तत्वज्ञानपर कविता या काव्यविभागांची हवा गडकऱ्यांच्या प्रतिभेला फारशी मानवणारी नव्हती. भाषा-प्रभुत्व व कल्पनाप्राचुर्य यांमुळें असल्या प्रकारची कविता शृंगारण्यांत ते कुशल होते. पण सोन्याची पुतळी हिरेमाणकांनीं सजविली तरी उत्सुक डोळे, उत्कंठित ओष्ठ आणि स्पर्शानें स्वर्गसुख देण्याची शक्ति तिच्यांत कोठून येणार ? त्यांच्या ‘ स्मशानांतल्या गाण्यां ’त काव्यकल्पनांपेक्षां कोट्याच जास्ती आहेत. ‘ एक समस्या ’ ही कविता उपरोधपूर्ण आहे. ‘दसऱ्यां’त आवेश आहे पण सरसता नाहीं. राष्ट्रीय कविता त्यांनीं हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच लिहिल्या आहेत; पण त्यांत सर्वांगसुंदर अशी एकही नाहीं. श्रीमहाराष्ट्रगीताची जडण घडण सुंदर आहे; पण रसोत्कटतेपेक्षां वर्णनविस्ताराकडेच कवीनें अधिक लक्ष दिल्यामुळें ती व्हावी तितकी स्फूर्तिदायक झाली नाहीं. ‘ पांच देवींचा पाळणा ’ या अपूर्ण गीताची कल्पना मात्र भव्य व काव्यमय आहे.

गडकऱ्यांच्या तत्त्वज्ञानपर कवितेंत ‘ कलगीचें गाणें, ’ ‘ फुटकी तपेली ’, ‘ प्रेमाचा प्रलयकाल, ’ इत्यादि मोठ्या व थोड्या छोट्या कवनांचा अंतर्भाव होतो. गडकऱ्यांना काव्यद्वारें तत्वज्ञानाचा एखादा विशिष्ट सिद्धांत सांगायचा होता असं नाहीं. यामुळें या सर्व कवितांत त्यांच्या कल्पनेचा स्वैर संचार तेवढा आढळतो. शब्द भाव व्यक्त करण्यासाठीं नसून ते लपविण्यासाठीं असतात या उक्तीचीही प्रचीति त्यांच्या या कविता वाचतांना येते. जुन्या कवींच्या काव्यांतील वेदांतपर मेखांप्रमाणें आपलीही एखादी मेख मारून ठेवण्याची त्यांना मोठी हौस होती असें दिसतें. कल्पनेची कसरत या दृष्टीनें त्यांच्या कविता वाचनीय असल्या तरी कसरतीचा परिणाम जसा शरीरावर होतो, आत्म्यावर होत नाहीं त्याप्रमाणें त्यांच्या कल्पनांनीं त्यांच्या काव्याचें शरीर सुंदर दिसतें, पण अंतरात्म्याची प्रसन्नता वाचकांना जाणवत नाहीं.

पण गरुडाप्रमाणें स्वर्गातून अमृत आणण्याचें सामर्थ्य नसलें तरी मानससरोवरांतील मोत्यांचा चारा मिळविण्याची अनन्यसामान्य शक्ति जशी हंसांत असते, त्याप्रमाणें राष्ट्रीय, सामाजिक, तत्वज्ञानपर वगैरे काव्यविभागांत जिला चमकतां आलें नाहीं त्या प्रतिभेनें आपल्या प्रेमकवनांनीं सर्वांना दिपविलें. त्यांच्या चांगल्या कवितांचा मुख्य भाग प्रेमगीतांनीं भरला आहे. एवढेंच नव्हे तर ‘ अरुणा ’ सारख्या वर्णनपर कवितेच्या शेवटीं आणि मुरलीसारख्या तात्विक कवितेच्या प्रत्येक कडव्यांतून त्यांच्या प्रतिभेची प्रेमप्रवणता दिसून येते. त्यांच्या प्रत्येक नाटकांत दिसून येणारा प्रेमभंग त्यांच्या कवितेंत प्रेमनिराशेच्या रूपानें अवतरला आहे. ‘ एका जुन्या श्लोकाची आठवण ’, ‘ वेडा ’, ‘ ती कोण ’, ‘गीतविरक्ति ’, ‘ कधीं ’, ‘ ओसाड आडांतील एकच फूल ’, ‘ प्रेम आणि मरण ’, ‘अल्लड प्रेमास ’, ‘दैवाची निर्दयता’, ‘ गोफ ’, ‘ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ’ इत्यादि सरस काव्यसुमनें प्रेमनिराशेच्या सूत्रांतच त्यांच्या प्रतिभेनें गुंफिलीं आहेत असें म्हणावयाला हरकत नाहीं. या कवितांपैकीं कांहीं नाट्यगीतें आहेत तर कांहीं भावगीतें आहेत; एका कवितेवर निराशेची तर दुसरीवर उत्कंठेची छाया पडली आहे; पण इतकें वैचित्र्य असूनही त्या सर्वांच्या अंतरंगांतून एकच सूर वाहतो व तो भग्न प्रेमवीणेचाच आहे यांत संशय नाहीं. गडकऱ्यांनीं आपलें भावसर्वस्व या गीतांत ओतलें असल्यामुळें तीं सर्व हृदयस्पर्शी झालीं आहेत.

'गुलाबी कोर्डे', 'पहिलें चुंबन', 'गोड निराशा' वगैरे प्रेमगीतें सुंदर कल्पनेचा आविष्कार करण्यासाठींच त्यांनीं लिहिलीं. रसोत्कटतेपेक्षां कल्पनासौंदर्यच या कवितांत प्रभावी झालेलें दिसून येतें. प्रेमगीतांत ज्यांची गणना होणार नाहीं अशा कांहीं निराशापर कविता गडकऱ्यांनीं लिहिल्या आहेत. विषयपरत्वें बाह्य रूप बदललें तरी या निराशेचें मूळ प्रेमगीतांतील निराशेंतूनच उद्भवलें आहे. प्रेमगीतांप्रमाणें थोड्या आत्मपर कविताही त्यांनीं लिहिल्या आहेत. 'अनामिकाचे अभंग', 'फूल ना फुलाची पाकळी', 'माझा मृत्युलेख' वगैरे या जातीच्या कविता त्यांतील जिव्हाळयामुळें वाचनीय वाटतात.

वसंताच्या आगमनानें कांटेरी वेलीपासून आम्रवृक्षांपर्यंत सर्व तऱ्हेच्या तरुलता पल्लवित होतात. गडकऱ्यांच्या कल्पकतेनें त्यांच्या कवनांनाही असेंच रम्य रूप दिलें आहे. या कल्पकतेला नादमधुर शब्दसंपत्तीची जोड मिळाल्यामुळें त्यांच्या कवितेनें प्रथमदर्शनींच वाचकांना मोहून टाकलें. या मोहिनीला प्रेमाच्या इंद्रजालाची जोड मिळाली. प्रेम हा आधींच जगाचा आवडता विषय. त्यांतून शेलेनें म्हटल्याप्रमाणें काव्य जितकें अधिक करुण तितकें तें अधिक मधुर. प्रेमभंगाचीं गीतें यामुळें साहजिकच अधिक हृदयंगम होतात.

रसोत्कटता व प्रमाणबद्धता यांचा अभाव गडकऱ्यांच्या कवितेंत अनेक स्थळीं आढळतो, शब्द आणि व्याकरण यांच्या दृष्टीनें सदोष असणारी रचनाही तिच्यांत नाहीं असें नाहीं, कल्पनेला फुलवितां फुलवितां त्यांनीं तिला पिंजून काढल्याचीं उदाहरणेंही वाग्वैजयंतींत सांपडतील; पण हे व इतर सर्व दोष लक्षांत घेऊनही असें म्हणतां येईल कीं त्यांचीं 'गुलाबी कोर्डे', 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस', 'राजहंस', 'ओसाड आडांतील एकच फूल', 'प्रेम आणि मरण', 'मुरली', 'गोड निराशा', 'घुंगुरवाळा', 'गोफ', 'तीन तरी' वगैरे कवनें महाराष्ट्र शारदेच्या अंगावरील भूषणें म्हणून बरेच दिवसपर्यंत चमकत राहतील.

**संपूर्ण बाळकराम**—गडकऱ्यांच्या विनोदी लेखांचा हा संग्रह त्या लेखासाठीं त्यांनीं धारण केलेल्या टोपण नांवानें प्रसिद्ध झाला आहे. 'रिकामपणची कामगिरी' या मथळयाखालीं त्यांनीं १९१३-१५ चे अवधींत लिहिलेले पांच लेख हा या संग्रहाचा मुख्य भाग होय. सौभाग्याकांक्षिणी चि. ठकूताई हिच्या लग्नाविषयींच्या पहिल्या तीन लेखांत प्रचलित लग्नपद्धति व इतर सामाजिक चालीरीति

यांच्यांतील दोषदिग्दर्शन चांगल्या रीतीनें झालें आहे. कल्पकता, कोटिबाजपणा, व्यंगोक्ति, अतिशयोक्ति इत्यादिकांच्या समुच्चयामुळें हे लेख चुरचुरीत व मनोरंजक झाले आहेत. कथानकापेक्षां टीकेकडेच लेखकाचें अस्सल लक्ष असल्यामुळें या लेखांत रचनाकौशल्य फारसें प्रतीत होत नाहीं. पण समाजाचें सूक्ष्म निरीक्षण व या निरीक्षणांत आढळणाऱ्या दोषांचें विनोदप्रचुर वर्णन हे गुण प्रत्येक पानावर दृग्गोचर होतात. विनोदाच्या भरांत लेखकानें ठकीचें इतकें भयंकर वर्णन केलें आहे कीं, ठकीच्या बापाची सर्व मालमत्ताच काय पण प्रत्यक्ष इंद्रपद मिळालें तरी कोणीही तिच्याशीं लग्न करायला कबूल होणार नाहीं. एकच प्याल्यांतील जनुभाऊ व मन्याबापू दारूच्या धुंदींत जसे आपण घेतलेल्या बाजूविरुद्धच बोलूं लागतात, त्याप्रमाणें बाळकरामही विनोदाच्या धुंदींत उपवर मित्रकन्या ठकी हिची चेष्टा करतो. या लेखांत क्वचित् क्लिष्ट वाक्यें आढळतात. अतिशयोक्तीही अनेकदां इतकी ताणली जाते कीं, तिला कृत्रिम व रसभंगकारक स्वरूप प्राप्त होतें. हे दोष जमेस धरूनही ह्या लग्नविषयक लेखमालेला उच्च दर्जाच्या विनोदी वाङ्मयांत स्थान देण्याला कोणीहि रसिक अनमान करणार नाहीं. 'रिकामपणच्या कामगिरीं'तील चवथा लेख, विशेषतः त्याचा उत्तरार्ध, गडकऱ्यांच्या कोट्याधीशत्वाचा साक्षीदार आहे. सरस व सुंदर कोट्यांचा हा एक छोटासा संग्रहच आहे. या लेखाची स्फूर्ति मनोरंजनांत येणाऱ्या 'स्वयंपाकघरांतील गोष्टी' या सदरानें दिली. प्रतिभावान् लेखक साध्या विषयांतूनही विनोद कसा निर्माण करूं शकतो याचें उदाहरण म्हणून ह्या लेखाकडे बोट दाखवायला हरकत नाहीं. 'कवींच्या कारखान्यांत' उपरोध, उपहास वगैरे प्रकारचा खूप माल भरलेला आहे. टीकाकाराला नातीं नसतात हें तत्व डोळ्यांपुढें ठेवून गडकऱ्यांनीं आपल्या कविबंधूंची या लेखांत हजिरी घेतली आहे. पण क्लिष्ट रचना, शुद्ध विनोदापेक्षां उपरोध व उपहास यांचें प्राबल्य व अपूर्णता यांमुळें हा लेख फारसा सरस वाटत नाहीं.

रंगभूमी मासिकांत आलेल्या नाट्यविषयक लेखांत गडकऱ्यांनीं किर्लोस्कर मंडळींत असतांना आलेले विविध अनुभव नमूद केलेले आहेत. नट, नाटककार, प्रेक्षक वगैरेंवर प्रसंगोपात त्यांनीं केलेली टीका खुसखुशीत आहे. या लेखांशिवाय 'मूकनायक', 'सकाळचा अभ्यास' व 'दीडपानी नाटक' हीं छोटीं प्रहसनेंही त्यांनीं लिहिलीं आहेत. 'सकाळचा अभ्यास' हें बालस्वभावदर्शक प्रहसन सात्विक व प्रसंगनिष्ठ विनोदाचें उत्तम उदाहरण आहे. 'मूकनायक'

या प्रहसनाची मूळ कल्पनाही मार्मिक आहे. यांतील कांहीं प्रसंग भडक वाटले तरी रूढीच्या पाशांनीं जखडलेल्या मनुष्याचें जीवित यंत्राप्रमाणें कसें होतें हें या छोट्या प्रहसनांत उत्तम रीतीनें दाखविलें आहे. दीडपानी नाटकही स्वभावदर्शक आहे.

विनोदी लेखांत गडकऱ्यांनीं कोल्हटकरांची परंपराच पुढें चालविली. कोल्हटकरांप्रमाणें श्लेष व कोट्या करण्याची एकही संधि ते वायां दवडीत नाहींत. कोल्हटकरांच्या मानानें गडकऱ्यांच्या विनोदविषयांचें क्षेत्र मात्र अगदींच संकुचित वाटतें. कोल्हटकरांचे निम्मे अधिक लेख सामाजिक टीका या सदराखालीं येतील. कोल्हटकरांपेक्षां गडकरी प्रसंगांचा विनोदाकरितां अधिक उपयोग करून घेतात. कोल्हटकरांची भाषा अल्पविस्तर पण अर्थपूर्ण, आणि सूक्ष्म विनोदानें नटलेली अशी आहे. गडकऱ्यांना विस्तार फार प्रिय असून, कोट्याकल्पनांच्या लखलखाटानें ह्या विस्तार सुंदर करण्याकडे त्यांचा ओढा आहे. कोल्हटकरांतील संयम आणि रचनाचातुर्य हीं दोन्ही गडकऱ्यांच्या विनोदी लेखांत कमी आहेत; पण विनोददृष्टि, सूक्ष्म निरीक्षण इत्यादि गुणांत ते गुरूची निःसंशय बरोबरी करतात आणि कोटिबाजपणांत तर ते त्यांना मागेंही टाकतात.

**नाटकें**—गडकऱ्यांचा अठरा नाटकें लिहिण्याचा संकल्प त्यांच्या अकाल मृत्यूनें जागच्या जागींच राहिला. चार पूर्ण व दोन अपूर्ण नाटकें मागें ठेवून वयाच्या चवतिसाव्या वर्षी त्यांना या मृत्युलोकाचा निरोप घ्यावा लागला. त्यांचीं सर्व पूर्ण नाटकें अत्यंत लोकप्रिय असून अपूर्ण राजसंन्यासाचे खेळही अनेकदां केले जातात.

( १ ) **प्रेमसंन्यास** (१९१२)—या सामाजिक नाटकांत पुनर्विवाह, विषमविवाह व प्रेमविवाह यांचा विचार करण्यांत आला आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं. पतिमूर्तीच्या चिंतनांत मग्न असलेली सुशीला, जयंताच्या प्रेमासाठीं तळमळणारी लीला आणि प्रथमतः कमलाकराच्या कामुक बाहुपाशांत आणि नंतर मृत्युपाशांत सांपडणारी दुर्दैवी द्रुमन हीं तीन विधवांचीं चित्रें पुनर्विवाहाच्या सर्व बाजू पुढें मांडतात. विषम विवाहाचे दुष्परिणाम—काव्यदृष्टीनें जयंत-मनोरमेच्या कलहांत आणि विनोददृष्ट्या गोकुळ-मथुरेच्या झगड्यांत पहावयाला मिळतात. जयंत व लीला यांचें प्रेम आणि त्यांचा झालेला निराशाजनक अंत पाहून प्रेमविवाहाच्या विरोधकांचें हृदयदेखील द्रवून जाईल.

विषयाच्या दृष्टीनें हा विचार झाला. नाटक रंगभूमीवर परिणामकारक करण्याकरतां गडकऱ्यांनीं अनेक चमत्कृति व संक्षोभ उत्पन्न करणाऱ्या प्रसंगांचा आश्रय केला आहे. सुशीला गत पतीचें चिंतन करण्यांत मग्न आहे एवढें दाखवून त्यांचें समाधान झालें नाहीं. पुराणांतल्या सीमंतिनीला तिचा बुडालेला नवरा जसा परत मिळतो त्याप्रमाणें सुशीलेला पतिप्राप्ति झाली पाहिजे असें वाटून, त्यांनीं विद्याधर व त्याचें रहस्य नाटकांत घातलें. हें रहस्य फारशा कुशलतेनें रचण्यांत आलेलें नाहीं. विद्याधराचा नाटकाच्या कथानकालाही तादृश उपयोग नाहीं. त्याच्या हातून होणारें काम इतर भूमिकांच्याकडूनही सहज करून घेतां आलें असतें.

विद्याधराच्या उपकथानकाच्या मुळाशीं चमत्कृति आहे असें म्हटलें तर कमलाकराच्या चित्रणाचा हेतु संक्षोभ हाच मानतां येईल. हा कलिपुरुष लीलेचें जयंतावर प्रेम आहे म्हणून त्याचा द्वेष करतो, लीलेचा पापी हेतूनें हात धरतो, त्यांत यश न आल्यामुळें तिचा सूड घेण्याच्या नादाला लागतो, द्रुमनला पापाचा मार्ग दाखवून शेवटीं तिला आगगाडींत बसवून नशीब नेईल तिकडे तिला पाठवून देतो. नाइलाजानें बालहत्या करणारी द्रुमन चवताळून परत आलेली पाहून कमलाकर तिला कुत्र्याच्या मोतीनें मारतो, तिच्या प्रेताचे तुकडे करून ते पेटींत भरतो, पेटींतील प्रेताचा संबंध जयंताकडे लागावा म्हणून लीलेच्या नांवचें खोटेंच पत्र त्याला पाठवितो—एकन् दोन ! कमलाकराचीं सर्व कृष्ण कृत्यें कळायला प्रेमसंन्यास अक्षरशः वाचलें पाहिजे ! शिशुपालाचे शंभर अपराध भरतांच कृष्णानें त्याचें डोकें उडविलें, पण कमलाकराच्या अगणित अपराधांचें शासन होण्याची शक्यता नाटकांत प्रथमतः तरी कुठेंच दिसत नाहीं. शेवटीं तळ्या मानकाप्या त्याच्या उरावर बसून, त्याचा गळा दाबतो व कमलाकराचा अवतार समाप्त होतो.

या नाटकांतील भावनाप्रधान जयंत व लीला यांचीं स्वभावचित्रें चांगलीं साधलीं आहेत. कमलाकराच्या रेखनांत अतिरंजनाचा दोष दिसून येतो. द्रुमनच्या चित्रणाला फारसा अवसर मिळाला नसला तरी तें परिणामकारक झालें आहे. नाटकाशीं फारसा संबंध नसलेलें वसंत-वीणेचें जोडपेंही ठीक आहे. विनोदपरिपोष करणाऱ्या गोकुळाचा कथानकाशीं बादरायण संबंध आहे. साखर व केशर यांत शेरभर काय आणायचें याची आठवण न राहणारा हा विस्मरण-

विशारद उत्कृष्ट कोट्या करतो ! ही विसंगति दृष्टिआड केल्यास गोकुळच्या सर्व प्रवेशांत गडकऱ्यांचा कोटिबाजपणा उत्तम रीतीनें प्रगट झाला आहे. विनोदी प्रवेशांत प्रसंगगत विनोद फारच थोडा आहे, बहुतेक भर कोटि व कल्पनाचातुर्य यांच्यावरच.

प्रेमसंन्यासाची भाषा प्रौढ व काव्यमय आहे. काव्य बोलत नाहीं असें पात्रच या नाटकांत नाहीं म्हटलें तरी चालेल. अंक १ प्र. ५, अंक २ प्र. ५ आणि शेवटच्या अंकांतील लीलेचा विषपानाचा व जयंताचा प्रेमसंन्यासाचा हे सर्व प्रवेश काव्यकल्पनांनीं फुलून गेले आहेत. मात्र हें काव्य कळायला वाचक चांगलाच रसिक व बहुश्रुत असला पाहिजे. रंगभूमीच्या दृष्टीनें काव्यप्रचुर संभाषणें व लांबलचक भाषणें फारशीं इष्ट नसतात. गडकऱ्यांनीं या निर्बंधाकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें आहे. स्त्रिया व पुरुष, असंस्कृत व सुसंस्कृत या सर्वांची या नाटकांतील भाषा एकरूप भासते व त्यामुळें नाट्यचित्रांतील सत्याभास कमी होतो.

**पुण्यप्रभाव ( १९१६ )**—या नाटकांतील मुख्य विषय पतिव्रतेचा प्रभाव हा आहे. वसुंधरेच्या पतीला कपटानें अंधारकोठडी दाखविणारा आणि तिच्या देखत तिच्या पुत्राची हत्या करणारा वृंदावन शेवटीं तिच्या तेजापुढें फिक्का पडतो आणि तिच्या हातांतील हार स्वतःच्या गळ्यांत घालून घेण्याऐवजीं तिच्या पायांवर आपलें डोकें ठेवतो. वसुंधरा व वृंदावन यांच्यांतील विरोधाला तिसऱ्या अंकांत स्पष्टपणें सुरवात होते. पहिले दोन अंक भूपाल व वसुंधरा वृंदावनाच्या ताब्यांत देण्याकरतां खर्च करण्यांत आले आहेत. नाटकाच्या या पूर्वार्धांत विनोदी पात्रांच्या फातर प्रवेशाखेरीज एक लहानसें कारस्थान आहे. राजपुत्राचा वध करून गादी बळकावण्याचा आरोप भूपालावर लादण्याचें हें कपटनाटक इतकें कृत्रिम आहे कीं, तें प्रत्यक्ष दाखविलें नसतें तर नाट्यरचना व स्वाभाविकपणा या दोन्ही दृष्टींनीं बरें झालें असतें.

वसुंधरेचा स्वभाव धीरोदात्त आहे. पातिव्रत्याकरतां ती पुत्राच्या प्राणांवर पाणी सोडते. पण जेव्हां पतीच्या प्राणांचा प्रश्न पुढें येतो त्यावेळीं तिचा आत्मविश्वास जागृत होतो आणि वृंदावनाच्या इच्छेप्रमाणें ती त्याच्या गळ्यांत हार घालण्याचें कबूल करिते. वृंदावनाच्या पाषाणतुल्य हृदयाला पाझर फुटूं लागल्याचें तिनें

पाहिलेलें असतें. हार घालण्याच्या वेळच्या तिच्या तेजस्वी भाषणानें हा पाषाण एकदम द्रवून त्याचें पाणी पाणी होतें.

वसुंधरेचें वर्तन मानवी कोटींतलें वाटत नाहीं. ती कर्तव्यनिष्ठुर देवता आहे. तत्व व हृदय यांच्या कलहांत तत्वाचाच विजय झाला पाहिजे असें तिचें तत्वज्ञान आहे. हें तत्वज्ञान लक्ष्यांत घेतलें म्हणजे तिच्या वज्रकठोर वर्तनाचें आश्चर्य वाटत नाहीं. वृंदावनाच्या कठोर हृदयांतही थोडें मृदुत्व आहे असें गडकऱ्यांनीं दोन तीन ठिकाणीं सूचित केलें आहे. पण सहारांत मधून मधून आढळणाऱ्या हिरवळीमुळें त्या वालुकामय मैदानांत जिकडे तिकडे फळांच्या बागा होणें शक्य आहे असा अभिप्राय देणाऱ्या शेतकीशास्त्रज्ञाची गणना वेड्यांतच होईल. वृंदावनाच्या अंतःकरणांतील अमावास्येच्या अंधःकाराचें रूपांतर सुंदर सूर्योदयांत कसें होतें हें क्रमाक्रमानें व नाजुक कुंचल्यानें रंगविणें आवश्यक होतें. या मुख्य दोन भूमिका सोडल्या कीं भूपाल, ईश्वर व कालिंदी यांच्याकडे दृष्टी वळते. भूपाल वसुंधरेचा नवरा आहे म्हणूनच त्याला या नाटकांत महत्व आहे असें मानायचें. कालिंदी वसुंधरेच्या मुलाला वांचविण्यासाठीं आपल्या मुलाचा बळी देते; तेव्हां तिच्या मुलाचें रक्षण करण्याकरतां एखाद्या मेलेल्या मुलाचा बळी देण्याची क्लृप्ति लढवायला नाटकांत कुणी तरी पाहिजेच होतें. मुलांची अदलाबदल करतांना कथानकाच्या प्रगतीला कितीही आवश्यक मानली तरी बाजारांत जाऊन साबण आणण्याइतकें मेलेलें मूल संपादन करणें हें काम सोपें नाहीं. हें रहस्य निर्माण करण्यांत व उलगडण्यांत गडकऱ्यांनीं उच्च दर्जाचें रचनाचातुर्य दाखविलें नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. कालिंदीची भूमिका मात्र उठावदार झाली आहे. पातिव्रत्याची तिची कल्पना वसुंधरेच्या इतकीच उज्वल आहे; पण तिच्या अंतःकरणावर न्यायबुद्धीनें उत्पन्न होणाऱ्या संयमापेक्षां वात्सल्यानें उत्पन्न होणाऱ्या भावनांचेंच स्वामित्व चालतें. वृंदावनाच्या कृष्ण कृत्यांची उज्ज्वल पार्श्वभूमि या दृष्टीनेंही नाटकांत तिचें कार्य महत्वाचें आहे.

या नाटकांत विनोदी पात्रें पांच आहेत. त्यांतील दामिनी बुरखा पांघरीत असल्यामुळेंच तिच्या ऐवजीं कालिंदीला तळघरांत जाऊन बसतां येतें. दामिनीइतकें कथानकाशीं निगडित न झालेलें परंतु अगदींच विलग न वाटणारें विनोदी पात्र कंकण हें आहे. बाकीचीं तीन सुदाम दामिनीचा नवरा म्हणून, किंकिणी कंकणाची भावी पत्नी या नात्यानें आणि नूपुर ग्रामकंटक असल्यामुळें या

नाटकांत रंगभूमीवर येतात. या नाटकांतील विनोदाचा रोख अनेकदां स्त्रीपुरुषांच्या इष्टानिष्ट संबंधावर असल्यामुळें तो उत्तान वाटतो. नाटकांतील विनोदाची मदार मुख्यतः कोटीवरच आहे. ज्या पेटाऱ्यांत सुदाम दामिनीला नकळत आधींच दडून बसलेला असतो त्याच पेटाऱ्यांत तिनें नूपुराला लपविणें, बुरख्याच्या अदलाबदलीमुळें होणारा घोंटाळा, इत्यादि ठिकाणीं प्रसंगगत विनोद आहे. नाटकाची भाषा प्रेमसंन्यासाइतकीच किंबहुना त्याच्याहूनही अधिक काव्यमय व त्यामुळेंच अनेक स्थळीं क्लिष्ट झाली आहे. आर्द्रा नक्षत्राच्या पावसाप्रमाणें गडकऱ्यांच्या कल्पकतेनें भूपाल-वसुंधरा ( अंक २ प्र. २ ) आणि व वसुंधरा वृंदावन ( अंक ६ प्र. ४ ) यांच्या प्रवेशांत आपलें सर्वस्व ओतलें आहे. सुंदर व नाविन्यपूर्ण काव्यकल्पनांनीं हें नाटक गजबजलें असलें तरी भूमिका, प्रसंग आणि भाषा इत्यादिकांच्या औचित्याचा अनेक स्थळीं भंग झाला असल्यामुळें त्या कल्पना व्हाव्या तितक्या आनंदप्रद होत नाहींत.

**एकच प्याला ( १९१९ )**—हें नाटक पूर्वीच्या दोन नाटकांपेक्षां आकारानें लहान असून कथानकदृष्ट्याही बरेंच साधें आहे. गडकऱ्यांनीं १९१७ सालीं याचें लेखन संपविलें. दारूच्या पायीं बुद्धिमान् मनुष्य मातीमोल होतो, त्याच्या सोन्यासारख्या संसाराची राखरांगोळी होते, बायकामुलांना जीव कीं प्राण करणारा मनुष्य दारूबाज झाला कीं त्यांचे जीव घेतो, इत्यादि गोष्टी या नाटकांत परिणामकारक रीतीनें रेखाटण्यांत आल्या आहेत. सुधाकर, सिंधू व त्यांचा मुलगा या तिन्हींच्या मृत्यूंत या करुणान्त नाटकाचा शेवट झाला आहे.

सुधाकराचा मित्र रामलाल, त्याच्या उपदेशानें मद्यपान सोडून देणारा भगीरथ आणि सुधाकराची बहीण शरद् अशीं तीन पात्रें नाटकांत असून त्यांचें एक उपकथानक बनविण्याचा कर्त्यानें प्रयत्न केला आहे. पण विषय अगर कथानक या दोन्हींच्याही दृष्टीनें हें उपकथानक परिपोषक होत नाहीं. ‘दारूच्या एकच प्याल्याप्रमाणें स्त्रीचा एकच स्पर्शही मनुष्याचा अधःपात करतो’ हें तत्व रामलालच्या मुखांतून वदविण्याकरतां उपकथानकाचा डोंगर उभारण्याचें कांहींच कारण नव्हतें. एकमेकांचा कांहींच संबंध नसलेले दोन प्रवासी वाटेनें बरोबर जात असतात त्यांतलाच मुख्य कथानक व उपकथानक यांचा हा प्रकार झाला आहे. शिवाय रामलालनें स्वतःला सुधाकराचा जीवश्चकंठश्च मित्र म्हणवून घेऊनही

त्याची दारू सोडविण्याचा कुठलाही दृश्य प्रयत्न न करणें, सुधाकराच्या आधीं दारू प्यायला लागलेल्या भगीरथाची दारू रामलालच्या छोट्या व्याख्यानानें सुटणें आणि सुधाकरावर सत्वशील सिंधूच्या सद्वर्तनाचाही परिणाम न होणें, शरदनें दारूबाज भाऊ व विपद्ग्रस्त भावजय यांच्याविषयीं चकार शब्दही न काढतां रघुवंशाचें अध्ययन करीत बसणें इत्यादि गोष्टी रसभंगकारकच वाटतात.

विनोदाकरितां स्थापण्यांत आलेलें आर्यमदिरामंडळ व त्याचे अध्वर्यु तळिराम यांचादेखील मुख्य कथानकाशीं असावा तेवढा निकट संबंध नाहीं. आग लावायला जशी कुणी तरी काडी ओढावी लागते त्याप्रमाणें सुधाकराचा दारूच्या पायीं नाश व्हायला कुणी तरी प्रथमतः त्याला दारूचा प्याला द्यायला पाहिजे. हें काम करण्याकरितां ग्रंथकर्त्यांनीं तळिरामाला 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' (दोन्ही हातांत दारूचे दोन पेले पिणें तळिरामला अशक्य नसल्यामुळें सव्यसाची या पदवीवर त्याचा पूर्ण हक्क पोंचतो.) अशा शब्दांनीं विनंति केली व त्या मद्य-पानबहाद्दरांनीं ती मान्यही केली. आर्यमदिरामंडळांत जोंपर्यंत दारूवर कोट्या चालतात तोंपर्यंत त्याचें कथानकाशीं थोडें तरी नातें आहे असा भास होतो. पण आसन्नमरण तळिरामाला तपासण्याच्या निमित्तानें डॉक्टर आणि वैद्य जेव्हां रंगभूमीवर एकमेकांच्या उरावर बसूं लागतात तेव्हां तुमच्या बायकोच्या माहे-रचा कुत्रा आणि माझ्या बायकोच्या माहेरचा कुत्रा हे अगदीं सख्खे भाऊ असें सांगून एखाद्याच्या घरांत पाहुण्याच्या नात्यानें महिनेच्या महिने पुख्खा झोड-णाऱ्या मनुष्याची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं !

या नाटकांतील सुधाकर सिंधूच्या सुखी संसाराचा पहिला प्रवेश सुंदर साधला आहे. सुधाकराला दारूचें व्यसन निमिषार्धांत लावण्यांत मात्र भलती घाई झाली असून, दुसऱ्या व तिसऱ्या अंकांत सिंधू व रामलाल त्याचें व्यसन सोडविण्याचा म्हणण्यासारखा कांहींच प्रयत्न करीत नाहींत हें कसेंसेंच वाटतें. दारूबाज नव-ऱ्याच्या आज्ञेनुसार दुसऱ्याची पैदेखील न घेण्याची सिंधूनें घेतलेली शपथ, मोकळ्या जीभेच्या गीतेचे उद्गार ऐकून सुधाकराला झालेला पश्चात्ताप आणि दुधाच्या थेंबालाही महाग झालेल्या आपल्या चिमुकल्याला उद्देशून सिंधूनें काढ-लेले उद्गार हे सर्व प्रसंग करुणरसाचा परिपोष करणारे असून चांगले साधले आहेत. सुधाकरानें मद्यपानाच्या मीमांसेवर दिलेलें व्याख्यान विद्वत्ताप्रचुर असलें

तरी नाट्यदृष्ट्या अस्वाभाविक वाटतें. सिंधूचें स्वभावचित्र आकर्षक आहे; पण दारूबाज नवऱ्याची आज्ञा वेदतुल्य मानण्याची तिची प्रवृत्ति अनुकरणीय आहे असें कुणीही मानणार नाहीं.

या नाटकाची भाषा पूर्वीच्या दोन्ही नाटकांपेक्षां अधिक सुबोध व रसपरिपोषक आहे. सिंधू व गीता यांचीं कांहीं भाषणें तर अगदीं व्यवहारांतील भासतात. सुंदर कल्पना नाटकांत पुष्कळ आहेत, पण पूर्वीच्या नाटकांइतकी त्यांची खैरात केलेली नाहीं. यामुळें कृत्रिमतेचा दोष बऱ्याच कमी प्रमाणांत आढळतो. विनोद कोटिप्रधान आहे. कथानकांतले दोष काढून टाकून गडकऱ्यांनीं अधिक रचनाचातुर्य दाखविलें असतें तर 'एकच प्याला' हें निःसंशय त्यांचें सर्वोत्कृष्ट नाटक ठरलें असतें.

**भावबंधन**—( १९२० ) या नाटकाचें लेखन गडकऱ्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या प्रहरांत पूर्ण झालें. गडकऱ्यांच्या सर्व नाटकांत हें मोठें असून ( १८० पृष्ठांचें ) त्यांत कोणत्याही विशिष्ट विषयाचें प्रतिपादन नाहीं. फटकळ लतिकेच्या बोलण्यानें चिडलेला घनश्याम तिचा व तिच्या प्रियजनांचा सूड घेण्याकरतां दोन कारस्थानें रचतो. एक मालतीच्या बापाकडून चोरीची खोटी कबुली लिहून घेणें व दुसरें लतिकेच्या बापाचे खोटे दस्तऐवज महेश्वराकडून चोरविणें. या दोन कारस्थानांच्या पात्यांची कात्री करून तो भराभर धुंडिराज, मालती, लतिका वगैरेंचीं हृदयें छिन्नविच्छिन्न करूं लागतो. मालतीचा प्रियकर मनोहर याला स्मशानांत घनश्यामानें पुरून ठेवलेले धनेश्वराचे खोटे कागद मिळतात व अशा रीतीनें घनश्यामाच्या तीक्ष्ण कात्रीचें एक पातें मोडून पडतें. घनश्यामानें पोलीसच्या वेषांत यावें असें आमिष निर्माण करून त्याचा उरलासुरला दुष्टपणाही नाहींसा करण्यांत आला आहे.

धुंडिराज-मालती व धनेश्वर-लतिका यांचीं सुखदुःखें या कथानकांत एकत्र गुंफण्यांत आलीं आहेत. घनश्याम आणि लतिका यांच्या मुख्य कथानकांत मालतीचें उपकथानक गुंतवून टाकण्यामध्यें गडकऱ्यांनीं पूर्वीच्या सर्व नाटकांपेक्षां अधिक चातुर्य प्रगट केलें आहे. मात्र दुसऱ्या अंकामध्यें उपकथानकच इतकें रंगतें कीं, त्यापुढें मुख्य कथानक फिकें भासतें. धनेश्वराचे कागद चोरण्याकरतां आंधळ्याचें सोंग घेणारा महेश्वर निर्माण केला असून, त्याला विनोद करतां यावा

म्हणून त्याच्या पाठीमागें इंदुबिंदु या दोन काळ्याकुट्ट पोरी लावल्या आहेत. हें उपकथानक केवळ विनोदसुखार्थंच चिकटविण्यांत आलें आहे असें म्हणायला हरकत नाहीं.

या नाटकांतील कलिपुरुष घनश्याम याच्या सूडाला अपमानाचें भरभक्कम कारण आहे. मात्र लतिका शरण येऊन पायांवर डोकें ठेवूं लागली तरी देखील त्याचें अंतःकरण तिलमात्र द्रवत नाहीं, हें फारसें सुसंगत नाहीं. शेवटच्या प्रवेशांत निरपेक्ष दयेचें दर्शन होतांच तो एकदम सज्जन होतो! लतिका व मालती या दोन्ही मैत्रिणींचे स्वभाव चांगले रेखाटण्यांत आले आहेत. लतिकेच्या स्वभावाचे निरनिराळे पैलु वाचकांच्या दृष्टीला पडत असल्यामुळें तिची भूमिका अधिक रमणीय वठली आहे. नायक व उपनायक हे दोन्ही निर्जीव पुतळे वाटतात. त्यांच्याकडून नाटककारानें थोडें कार्य करून घेतलें असलें तरी त्यांचें स्वतंत्र अस्तित्व कुठेंही जाणवत नाहीं. धुंडिराजाची भूमिका इतकी स्वाभाविक व सुंदर वठली आहे कीं मराठी नाट्य—वाङ्मयांतील स्वतंत्र व उत्कृष्ट स्वभावचित्रांत तिची गणना होईल. या बडबड्या परंतु प्रेमळ पित्यामुळें नाटकांत हास्य व करुण या दोन्ही रसांचा उत्कृष्ट परिपोष झाला आहे. अकृत्रिम विनोद निर्माण करण्याचीही शक्ति गडकऱ्यांमध्यें विपुल प्रमाणांत होती याचें हें पात्र हें उत्तम उदाहरण आहे. धनेश्वराचें पात्र ठरीव ठशाचें वाटलें तरी स्वाभाविक पश्चात्तापामुळें तेंही थोडें फार सजीव भासूं लागतें. महेश्वर व इंदुबिंदु यांच्याविषयीं कांहीं लिहावयालाच नको. या तिघांनाही लग्नाची गरज आहे व गरजवंताला अक्कल नसते ही म्हण सुप्रसिद्धच आहे.

भावबंधनाचा पहिला अंक ५८ पृष्ठांचा असून तो मुख्य कथासूत्राची पूर्वतयारी करण्यासाठीं खर्च झाला आहे. रचनेचें हें शैथिल्य या नाटकांत सर्वत्र आढळतें. प्रत्येक प्रवेश संपूर्ण नाटकासाठीं लिहावयाचा असतो याचा विसर पडून, कित्येक प्रवेश त्यांची कल्पना चांगली वाटल्यामुळें लिहिण्यांत आले आहेत. भाषा व कल्पना या दोन्हींत बरीच सुबोधता आहे. पण अंक १ प्र. २ सारखीं क्लिष्ट स्थळें दुर्मिळ आहेत असें मात्र नाहीं. धुंडिराजाच्या स्वभावप्रधान विनोदाप्रमाणें प्रभाकराचा प्रसंगपर व महेश्वराचा कोटिबाज विनोदही नाटकांत भरपूर आहे. नाटकाचा शेवट करण्याकरतां कथानकाचीं सूत्रें शेवटीं कशीं तरी गुंडाळलीं आहेत

असें वाटल्यावांचून राहत नाहीं. ' राजसंन्यास ' व ' वेड्यांचा बाजार ' हीं अपूर्ण नाटकें अद्भुतरम्य कल्पकता व विनोद या दृष्टीनें वाचनीय आहेत.

**वाङ्मयविषयक कामगिरी**—कवि या दृष्टीनें केशवसुत, नाटककार या नात्यानें खाडिलकर आणि विनोदी लेखक म्हणून कोल्हटकर हे मागील पिढींतील लेखक जितके लोकप्रिय झाले तितकीच लोकप्रियता गडकऱ्यांनीं अल्पावधींत या तिन्ही क्षेत्रांत संपादन केली असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. तरुण मनाला मोहिनी घालणाऱ्या सर्व गुणांचा त्यांच्या प्रतिभेंत संगम झालेला होता. शृंगार व हृदयभंग या विषयांवरलीं सरस प्रेमगीतें, कल्पकता आणि कोटिबाज-पणा यांनीं नटलेला विनोद, रहस्यपूर्ण नाट्यकथानकें, करुण व हास्य यांचा परमोत्कर्ष साधणारे आणि हृदय हलवून सोडणारे नाट्यप्रसंग, नक्षत्रमंडित आकाशाप्रमाणें नाट्यवस्तूंवर चमकणारी अलंकारिक भाषा, इत्यादि गोष्टी अवघ्या अर्ध्या तपांत सरस्वतीच्या चरणीं गडकऱ्यांनीं अर्पण केल्या. त्यामुळें तरुणांचे डोळे दिपून गेले यांत नवल नाहीं.

गडकऱ्यांची प्रतिभा असामान्य होती यांत शंका नाहीं. कल्पकता व भावनोत्कटता या दोण गुणांमध्यें त्यांची बरोबरी करणारे मराठी लेखक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके देखील सांपडणार नाहींत. पण कलेला आवश्यक असणारा संयम अंगीं न बाणल्यामुळें या गुणांच्या अतिरेकानेंच त्यांच्या लेखनांतले कित्येक दोष निर्माण केले आहेत. जुने विचारच नव्या रीतीनें नटवून सजवून मांडण्यांत त्यांची प्रतिभा नित्य निमग्न असल्यामुळें समाजाला मार्गदर्शक होणारे नवे विचार त्यांच्या लेखनांत फारसे आढळत नाहींत. उज्ज्वल कल्पकता व उत्कट भावना यांच्या अंगीं वाचकांना मोहून सोडण्याचा गुण असल्यामुळें त्यांचें लेखन निर्दोष नसलें तरी नेहमींच लोकप्रिय राहील.

वि. स. खांडेकर.

**गडकऱ्यांचें वाङ्मयः**—( १ ) वाग्वैजयन्ती; ( २ ) गोविंदाग्रजांच्या सहा कविता; ( ३ ) रिकामपणची कामगिरी; ( ४ ) संपूर्ण बाळकराम; ( ५ ) प्रेमसंन्यास; ( ६ ) पुण्यप्रभाव; ( ७ ) भावबन्धन; ( ८ ) एकच प्याला; ( ९ ) राजसंन्यास; ( १० ) वेड्यांचा बाजार.

चरित्र, चर्चा, अभ्यासः—

( १ ) आधुनिक नाटककार—गडकरी, डॉ. साठे व जोशी.

( २ ) गडकऱ्यांचा विनोद, शि. गो. भावे.

( ३ ) गोविंदाग्रज—काव्यपरीक्षणात्मक प्रबंध, रा. ग. हर्षे.

( ४ ) भावबंधनावरील टीका, गो. ह. घारपुरे.

( ५ ) गडकऱ्यांचा वाग्विलास, क्षीरसागर.

( ६ ) गडकरी यांच्या आठवणी, संपादक—गो. गो. अधिकारी.

( ७ ) अकाल सूर्यास्त—चरित्रलेख, वि. सि. गुर्जर, मनोरंजन, फेब्रुवारी १९१९.

( ८ ) राम गणेश गडकरी—चरित्रलेख, नवयुग, जानेवारी १९१९.

( ९ ) राम गणेश गडकरी—आठवणी, नवयुग, फेब्रुवारी १९१९.

( १० ) हा हन्त हन्त—चरित्रलेख, वि. स. खांडेकर, नवयुग, फेब्रुवारी १९२०.

( ११ ) गोविंदाग्रजांशीं अल्प परिचय—आठवणी, वि. द. घाटे, नवयुग, फेब्रुवारी १९२०.

( १२ ) पांच वर्षांच्या परिचयांत—आठवणी, प्र. के. अत्रे, नवयुग, फेब्रुवारी १९२०.

( १३ ) राम गणेश गडकरी—चरित्रविषयक माहिती, शं. ग. जोशी, महाराष्ट्र-साहित्य, जानेवारी, फेब्रुवारी १९२४.

( १४ ) गडकऱ्यांच्या ओझरत्या आठवणी, 'आदर्श', महाराष्ट्रसाहित्य, नोव्हेंबर डिसेंबर १९२४.

( १५ ) राम गणेशांची आठवण, श्री. म. माटे, रत्नाकर, फेब्रुवारी १९२६.

( १६ ) गोविंदाग्रजांच्या एका कवितेसंबंधीं आठवण, शं. के. कानेटकर, मनोरंजन, मार्च १९२४.

( १७ ) गडकऱ्यांची व माझी ओळख कशी झाली ? 'भालचंद्र', अरुण, जानेवारी १९३०.

( १८ ) प्रेमसंन्यास—परीक्षण, डॉ. पां. दा. गुणे, मनोरंजन, जानेवारी १९१५.

( १९ ) प्रेमसंन्यास—चर्चा, वि. स. खांडेकर, यशवंत, एप्रील १९३०.
( २० ) गडकऱ्यांची लीला, स. बा. हुद्लीकर, मनोरंजन, जानेवारी १९२७.
( २१ ) गडकरी आणि त्यांची लीला, चर्चा, मो. बा. देशमुख, महाराष्ट्रसाहित्य, नोव्हेंबर-डिसेंबर १९२४.
( २२ ) प्रेमसंन्यास दुःखपर्यवसायी कां ? द. सी मुणगेकर, मनोरंजन, आगष्ट १९३१.
( २३ ) पुण्यप्रभाव—परीक्षण, दामोदरपंत मंगळमूर्ति, नवयुग, जून १९१७.
( २४ ) पुण्यप्रभाव, एक वाचक, नवयुग, आगष्ट १९१७.
( २५ ) गडकऱ्यांचा वृंदावन, चर्चा, रंगभूमी, आक्टोबर-नोव्हेंबर, डिसेंबर १९२७.
( २६ ) गडकऱ्यांची कालिंदी, चर्चा, प्रो. ना. सी. फडके, रत्नाकर, एप्रील १९२९.
( २७ ) कालिंदीची भ्रामक रमणीयता, चर्चा, र. कृ. फडके, रत्नाकर, जून १९२९.
( २८ ) भावबंधन, टीका, ग. बा. फणसे, नवयुग, आगष्ट, सप्टेंबर १९२०.
( २९ ) त्राटिका व भावबंधन, प्रो. श्री. ना. बनहट्टी, रत्नाकर, नोव्हेंबर १९२८.
( ३० ) भावबंधनांतील कांहीं शंका, वि. वा. जोशी, मनोरंजन, नोव्हेंबर १९३०.
( ३१ ) गडकऱ्यांची लतिका, अ. ज. करंदीकर, चित्रमयजगत्, नोव्हेंबर १९२२.
( ३२ ) एकच प्याला—परीक्षण, प्रो. ना. सी. फडके, मनोरंजन, सप्टेंबर १९१९.
( ३३ ) संगीत एकच प्याला—प्रयोग पाहून सुचलेले विचार, विद्यार्थी, नवयुग, मे—जून १९१९.
( ३४ ) एकच प्याला, चर्चात्मक लेख, य. मं. नाडकर्णी, नवयुग, जुलै, आगष्ट—सप्टेंबर १९१९.
( ३५ ) मद्यपानविषयक तीन नाटकें, चर्चा, त्र्यं. वि. पर्वते, नवयुग, जुलै १९२०.

( ३६ ) एकच प्याला, चर्चा, 'मधुव्रत', नवयुग, जानेवारी १९२२.
( ३७ ) एकच प्याल्यांतील आंतररहस्य, अ. ज. करंदीकर, चित्रमयजगत्, मार्च १९२२.
( ३८ ) एकच प्याला व विद्याहरण, अ. गो. जोशी, चित्रमयजगत्, मार्च १९२४.
( ३९ ) एकच प्याल्यांतील सिंधू, कमलाबाई सोहनी, मनोरंजन, जुलै १९२४.
( ४० ) एकच प्याल्यांतील सिंधू, सखूबाई जोशी, चित्रमयजगत्, आक्टोबर १९२४.
( ४१ ) प्याला टीकाकार, मास्टर डी. आत्माराम, महाराष्ट्रसाहित्य, मार्च-एप्रिल-मे, जून १९२४.
( ४२ ) एकच प्याला नाटकांतील सिंधू, 'शनैश्वर', महाराष्ट्रसाहित्य, नोव्हेंबर-डिसेंबर १९२४.
( ४३ ) राजसंन्यास, चर्चा, स. वा. जोशी, नवयुग, जून—जुलै १९२२.
( ४४ ) राजस राजसंन्यास, सौ. वत्सलाबाई, महाराष्ट्रसाहित्य, सप्टेंबर-आक्टोबर १९२२.
( ४५ ) शिवांगी, शुभांगी, शिवगंगा; 'उमेश', महाराष्ट्रसाहित्य, जानेवारी १९२३.
( ४६ ) गडकऱ्यांचीं नाटकें, चर्चा, र. गो. सरदेसाई, महाराष्ट्रसाहित्य, नोव्हेंबर, डिसेंबर १९२३, नोव्हेंबर-डिसेंबर १९२४.
( ४७ ) गडकऱ्यांचे दुर्जन, प्रो. ना. सि. फडके, रत्नाकर, जून १९२७.
( ४८ ) गडकऱ्यांच्या नाटकांतील विशेष, चर्चा, व. शां. देसाई, रत्नाकर, जानेवारी १९३१.
( ४९ ) वाग्वैजयंती निरीक्षण, 'कृष्णचंद्र', महाराष्ट्रसाहित्य, जानेवारी १९२३.
( ५० ) वाग्वैजयंतीचे टीकाकार, गो. गं. पोतदार, महाराष्ट्रसाहित्य, नोव्हेंबर-डिसेंबर १९२४.
( ५१ ) गोविंदाग्रजांचीं कांहीं गीतें, यू. एस्. पालेकर, महाराष्ट्रसाहित्य, नोव्हेंबर—डिसेंबर १९२४.

( ५२ ) गोविंदाग्रजांचीं प्रेमगीतें, चर्चा, ना. वा. पराडकर, विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर–आक्टोबर १९३०.

( ५३ ) गोविंदाग्रज, य. दि. पेंढरकर, काव्यविचार पृष्ठ ७३–८३.

( ५४ ) गोविंदाग्रजांची कविता, ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कविपंचक, पृष्ठ ११५–१४२.

( ५५ ) गोविंदाग्रजांची कविता, द. ल. गोखले, काव्यचर्चा, पृष्ठ २८१–३०४.

( ५६ ) गडकरी व निसर्ग, व्यं. कृ. चाटे, रत्नाकर, आक्टोबर १९२९.

( ५७ ) गोविंदाग्रजांच्या सहा कविता, परीक्षण, 'एक वाङ्मयोपासक,' मनोरंजन, एप्रिल १९२०.

( ५८ ) गडकऱ्यांचा दसरा, चर्चा, कद्रेकर, मनोरंजन, जानेवारी १९२८.

( ५९ ) गडकऱ्यांची एक प्रसिद्ध कविता, ह. वि. जोशी, चित्रमयजगत्, आगष्ट १९२६.

( ६० ) गडकऱ्यांचें यशोबीज, प्रो. ना. सि. फडके, मनोरंजन, एप्रिल १९२५.

( ६१ ) आधुनिक कविपंचक–परीक्षण [ गोविंदग्रजांची कविता ] वा. कृ. भावे, महाराष्ट्रसाहित्य, वर्ष ३, अंक १२.

**गायकवाड सीताराम रामचंद्र** [ १८५९–१८९७ ] स्थलवर्णनकार. यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें होतें. रसायनशास्त्राचा यांचा अभ्यास चांगला होता. त्यांनीं शाईचा कारखाना काढून चांगले पैसे कमविले. यांनीं शाईचे कागद, गोळ्या, पूड वगैरे तयार करण्याची कल्पना काढून सन १८८८ सालीं चांगली प्रसिद्धी मिळविली. यांच्या शाईच्या कागदांची फार वाखाणणी झाली. सन १८९० सालीं हे कागद विलायतेंत एक लाख खपले. यांचा विद्याव्यासंग जबर होता. यांनीं लिहिलेलें 'पुणें वर्णन' हें पुस्तक विशेष प्रसिद्ध आहे. या पुस्तकांत पुण्यासंबंधींची प्राचीन व तत्कालीन सर्व माहिती दिली आहे.

**गायकवाड यांचें वाङ्मयः**—( १ ) विजापूरवर्णन १८८४; ( २ ) पुणें शहर वर्णन भा. १, १८८६; ( ३ ) पुणें शहर वर्णन भा. २, १८८८; ( ४ ) कुणकेश्वर; ( ५ ) सोलापूर जिल्ह्याचा भूगोल; ( ६ ) विजापुरांतील प्राचीन इमारती १८८७; ( ७ ) बाळबाळंतीण संगोपन १८८८; ( ८ ) आशीरिया, १८९५.

**गुणे पांडुरंग दामोदर** [ १८८२–१९२२ ] भाषाशास्त्रज्ञ व वेदाभ्यासक. यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यांतील राहुरी गांवीं झाला. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंतून हे १९०० सालीं मॅट्रिक झाले व त्यांस मुंबई विश्वविद्यालयाची दुसरी जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळाली. यांचें पुढील एम. ए. पर्यंतचें शिक्षण मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्यें झालें. बी. ए. व एम. ए. च्या परीक्षेंत यांनीं अनुक्रमें 'भाऊ दाजी' व 'झाला वेदान्त' हीं बक्षिसें मिळविलीं. एम्. ए. झाल्यावर १९०८ सालापासून फर्ग्युसन कॉलेजांत ते संस्कृतचे अध्यापक म्हणून काम करूं लागले. १९१० सालीं त्यांस संस्कृतच्या विशेष अभ्यासाकरितां म्हणून हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ती मिळाली. या शिष्यवृत्तीचा फायदा घेऊन ते जर्मनींत गेले व तेथील लिप्झिग् विश्वविद्यालयांत तीन वर्षें त्यांनीं अभ्यास केला व पीएच्. डी. ही पदवी संपादन केली. १९१४ चे आरंभीं ते स्वदेशीं परत आले. इकडे आल्यावर ' जर्मनींतील लोकशिक्षण, ' ' माझा युरोपांतील प्रवास ' अशीं दोन पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. भाषाशास्त्र हा त्यांचा आवडता विषय होता. या शास्त्राचा संशोधनपूर्वक त्यांनीं चांगलाच अभ्यास केला होता. त्यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलेलें भाषाशास्त्रावरील पुस्तक व मराठींत लिहिलेले एतद्विषयक निबंध त्यांच्या गाढ विद्वत्तेची साक्ष पटवितात. राजवाडे यांचें नांव वगळल्यास डॉ. गुणे यांच्या तोलाचा भाषाशास्त्रज्ञ अद्याप महाराष्ट्रांत झालेला नाहीं. त्यांचा प्राकृत भाषेचा अभ्यास वाखाणण्यासारखा होता. महाराष्ट्रांत विद्वान् संशोधकांची परंपरा सुरू रहावी यासाठीं त्यांनीं फार प्रयत्न केले. या प्रयत्नांचें निदर्शक म्हणजे १९१६ सालीं स्थापन केलेलें भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन मंदिर हें होय. डॉ. गुण्यांच्या हातून आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळवून देणारी कामगिरी होईल अशी पुष्कळांची अपेक्षा होती. परंतु त्यांच्या अकालिक निधनानें ती विफल ठरली.

**गुणे यांचें वाङ्मयः—पुस्तकें** ( १ ) माझा युरोपांतील प्रवास, १९१६; (२) जर्मनींतील लोकशिक्षण. **निबंध** (१) प्रेमसंन्यास–परीक्षण, मासिक मनोरंजन, पु. २०; (२) आजकालचे जर्मन लोक, मासिक मनोरंजन, पु. २०; (३) जर्मनींतील स्त्रिया व समाजसेवा, चित्रमयजगत् पु. ५; ( ४ ) जर्मनींतील समाजव्यवस्था, चित्रमयजगत् पु. ५; (५) मराठी कवितेच्या पूर्वीच्या व हल्लींच्या स्थितीविषयीं तुलनात्मक प्रासंगिक विचार, महाराष्ट्रसाहित्यपत्रिका; ( ६ ) भाषाशास्त्र व

निरुक्ति, विविधज्ञानविस्तार निबंधसंग्रह भा. २, पृष्ठ ८३-९८ (७) मराठी भाषेचा कालनिर्णय भा. इ. स. मं. षष्ठवृत्त शके १८४०, पृष्ठें २८-४०; ( ८ ) अपभ्रंशभाषेंतील वाङ्मय भा. इ. सं. मं. सप्तसंमेलन वृत्त शके १८४१, पृष्ठ १५५-१६१ ( ९ ) कुलगुरु चिं. वि. वैद्य व मराठी भाषेची उत्पत्ती, विविधज्ञानविस्तार जुलै, सप्टेंबर, आक्टोबर १९२२;(१०) कविमैत्री, मनोरंजन, वसंत अंक, १९१५; ( ११ ) स्वामी विवेकानंद नाटक–परिक्षणात्मक–मनोरंजन, जुलै १९१४; ( १२ ) केशवसुतांची कविता–परीक्षणात्मक–मनोरंजन, आक्टोबर १९१७; ( १३ ) आधुनिक जर्मनीची उत्क्रांति–परीक्षण, विविधज्ञानविस्तार मार्च १९१६.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) चरित्रलेख—द. वि. पारखे, मनोरंजन, डिसेंबर १९२२.

( २ ) जर्मनींतील लोकशिक्षण–परीक्षण, स. बा. हुदलीकर, विविधज्ञानविस्तार पुस्तक ४८, अंक २, १९१७.

( ३ ) भगवद्गीता व डॉ. गुणे, टीका, आचार्य पाक्षिक, १९१५ वर्ष २ पृ. ९, ११, २२, २४, ३५–३९, ५७–६०.

**गुंजीकर रामचंद्र भिकाजी** [ १८४३–१९०१ ] यांचा जन्म बेळगांवपासून १४ मैलांवर असलेल्या जांबोटी गांवीं झाला. इंग्रजी शिक्षण बेळगांव येथील 'सरदार हायस्कूल' व मुंबईतील 'एल्फिन्स्टन् हायस्कूल' यांत झालें. ते १८६४ त प्रवेश परीक्षा पास झाले. प्रवेश परीक्षा पास झाल्यावर एल्फिन्स्टन् कॉलेजांत त्यांनीं नांव दाखल केलें होतें, परंतु कौटुंबिक परिस्थिति अनुकूल नसल्यामुळें पुढें शिक्षण घेणें शक्य झालें नाहीं. काशिनाथ त्रिंबक तेलंग, श्री. बा. ठाकूर इत्यादि मंडळी कॉलेजांत यांची सहाध्यायी होती. कॉलेज सोडल्यावर १८६६ त त्यांनीं मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कुलांत शिक्षकाची नोकरी धरली. या शाळेंत ते सतत बावीस वर्षें काम करीत होते. पुढें ते असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरचे जागेपर्यंत वाढत गेले.

गुंजीकरांच्या लेखनव्यवसायास १८६६ पासून सुरवात झाली. त्यावेळेस 'मित्रोदय' नांवाचें एक वर्तमानपत्र मुंबईत प्रसिद्ध होत असे, त्यांत ते लिहीत. १८६७ सालीं 'मराठी ज्ञानप्रसारक' हें मासिक जवळ जवळ २० वर्षें चालून


बंद पडलें. या मासिकाच्या धर्तीवर एखादें नवें मासिक काढावें असा यावेळीं गुंजीकर व त्यांची मित्रमंडळी यांच्यांत विचार घाटूं लागला आणि १८६७ च्या जुलै महिन्यांत त्यास मूर्तस्वरूप येऊन 'विविधज्ञानविस्तार' मासिकाचा जन्म झाला. या मासिकाचे गुंजीकर हे सुमारें सात वर्षें संपादक व चालक होते. एवढया सात वर्षांच्या कालांत त्यांनीं त्यांत विविध विषयांची चर्चा करणारे १५० ते २०० लेख लिहिले असतील. 'विस्तारा'शीं संपादकीय संबंध सुटल्यावरहि त्यांनीं त्यांत लेख लिहिले आहेत. पण ते फारच थोडे. १५–२० हून ते अधिक भरणार नाहींत.

गुंजीकरांचा विविधज्ञानविस्ताराशीं संपादक म्हणून असलेला संबंध सुटल्यावर त्यांनीं व त्यांच्या स्नेह्यांनीं 'दंभहारक' नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें. या मासिक पुस्तकाविषयीं व त्यांच्या इतर ग्रंथकर्तृत्वासंबंधीं बा. ना. देव यांनीं त्यांजविषयीं लिहिलेल्या चरित्रात्मक निबंधांत खालीलप्रमाणें माहिती दिली आहेः—

"गुंजीकरांच्या मित्रमंडळींत अनेक मराठी वाङ्मयाचे रसिक भक्त, भोक्ते, वाचक व लेखक होते. त्यांच्यांत कित्येकदां अनेक लौकिक विषय, प्रचलित लोककार्यें, सार्वजनिक संस्था, सभा, व्याख्यानें वादविवाद यांवर विचारविनिमय होऊन त्यापासून कांहीं उपयुक्त कार्यें निपजलीं. त्यांत 'दंभहारक' हें मासिक होय. त्याच्या चालकांत गुंजीकर हे एक होते. आपल्यापुढें ॲडिसनकृत 'स्पेक्टेटर' ह्या नियतकालिकाचा कित्ता धरून या नव्या मासिकाचा सांचा ते रचूं पाहात होते, पण तसा घाट जामणें शक्य नव्हतें, व तो कांहीं जमलाही पण नाहीं. त्याचीं अनेक कारणें आहेत. प्रथमतः 'मूर्ति तितक्या प्रकृति' या म्हणींतील तत्त्व तर मूळ पायासारखें आहेच, पण त्याशिवाय अनेक अवांतर गोष्टी त्याच्या बाबतींत दिसतात. ॲडिसनच्या काळीं इंग्रजी समाजाची राष्ट्रीय शिक्षणविषयक संस्कृति 'दंभहारका'च्या वेळच्या देशी संस्कृतीच्या मानानें बरीच वरच्या पायरीवर होती, असें मानावें लागतें. कारण स्पेक्टेटरच्या काळीं स्त्रियाही वृत्तपत्रें वाचीत व त्यांत लेखही लिहित असत. यावरून त्या वेळीं इंग्रजी समाजांत जितकें स्त्रीशिक्षण होतें तितकें सध्यांसुद्धां आमच्या भगिनीवर्गांत असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. त्या वेळच्या समाजांत एक प्रकारचें स्वत्व वसत होतें तें संपूर्ण राजकीय ऐक्यभावास साधक होतें. शिवाय त्यांतील लेखकवर्गांत

पुढें नामांकित ग्रंथकार म्हणून गाजलेलें अनेक विद्वान होते. ह्या मानानें दंभहार-काच्या चालकांत बरेच नवशिके, कच्चे, अननुभवी लेखक दिसतात. शिवाय या मासिकास कोणी जबाबदार प्रकाशक होतासें दिसत नाहीं. या वेळीं पाद्री व बाटे लोक हिंदु धर्माची वाटेल ती नालस्ती करींत असत त्याच्या प्रतिकारार्थ म्हणून बोलून चालूनच त्याचा अवतार झाला. पण त्यांतली खंडनपर टीका 'माला' कारासारख्या टीकाकारालादेखील अचूक नेम मारणारी व हृदयविदारक वाटली नाहीं; उलट वाग्जाळप्रसारक अशीच वाटली. आणि त्याबद्दल त्यांनीं नाजुक इषाराही आपल्या चर्चात्मक निबंधांत दिला होता. पण त्यांतील वर्म न ओळखतां आल्यामुळें किंवा विकारवश होऊन या मासिकानें 'निबंधमाले' वर जो कडाका उडविला तो न भूतो न भविष्यति असाच विचित्र होता. मग काय विचारतां ? 'माला' कारासारख्या वादपटूस हें चांगलेंच खुलें मैदान अनायासें मिळालें. त्यांत त्यांनीं भावी काळांत प्रगट होणाऱ्या आपल्या कलमबहाद्दरीचा नवा मासला स्वसंरक्षणार्थ इतक्या तीव्र व ज्वलज्जहाल प्रखरतेनें दाखविला कीं, तो पाहून सर्वांनीं तोंडांत बोटेंच घातलीं. 'माला' कारासारख्या नवशिक्या कलमांतून असें जालीम प्रतिखंडन कसें बाहेर पडलें याचा अंदाज कोणासच होईना. त्यावर 'दंभहारका' स प्रत्युत्तरच सुचलें नाहीं. पण एकंदरींत हा प्रकार अत्यंत अनिष्ठच खरा ! त्यावरून या मासिकास कोणी जबाबदार प्रकाशक नसावा, किंवा असल्यास तो आपलें काम नीट करीत नसावा असें दिसतें. पुढें हरी माधव पंडित, वामन दाजी ओक, अशा चांगल्या लेखकांनीं त्यास वरिष्ठ दर्जावर चढविलें."

"गुंजीकरांचा लेखनव्यवसाय नुसत्या वृत्तपत्रांत किंवा मासिकांत लेख लिहूनच संपला नाहीं. त्यांनीं अनेक स्वतंत्र ग्रंथ लिहिले. कांहीं ग्रंथ प्रथम विविध-ज्ञानविस्तारांत येऊन नंतर स्वतंत्र पुस्तकरूपानें छापले गेले. त्यांत 'मोचनगड' ही कादंबरी येते. हिच्या आजपर्यंत अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. ही कादंबरी समकालीन कादंबऱ्यांच्या मालिकेंत बरीच श्रेष्ठ आहे. याचें कारण तिचा पाया ऐतिहासिक गोष्टीवर रचला आहे. स्कॉटकृत ऐव्हॅनो नांवाच्या ऐतिहासिक नवलकथेच्या वाचनापासून हा कथाभाग सुचला असावा असें दिसतें. पण तिला तिचें रूपांतर किंवा भाषांतर म्हणणें रास्त नाहीं. दोहोंत तसें निकट साम्य नाहीं. त्यांतला ऐतिहासिक म्हणून दिलेला भागही बराच काल्पनिक असून वस्तुस्थिति-दर्शक नाहीं. मनुष्यस्वभावाचें ज्ञानही बरेंच वरपांगी दर्शनीयच भासतें. गोदावरी



राम गणेश गडकरी



कृष्णाजी केशव गोखले



रामचंद्र भिकाजी जोशी



विष्णुबुवा जोग

म्हणून दुसरी एक कादंबरी ते लिहीत होते व स्वतंत्र पुस्तकरूपानें काढणार होते. पण ती अपुरीच राहिली ! युरोपांत १६ व्या शतकांत धर्मच्छळ जोरांत होता, त्याच्या गोष्टींत या कथेचा उगम झाल्यासारखें वाटतें. 'सुबोध रत्नमाला' नांवाच्या ग्रंथाचे दोन भाग स्वतंत्र छापले होते. त्यांतील कथा नीतिकथेच्या ( Moral Tales ) च्या धर्तीवर असून कुटुंबसुधारणेस साधक आहेत. पहिल्या भागांतील सर्व गोष्टी गुंजीकरांनींच लिहिल्या. दुसऱ्यांतील कांहीं गोष्टी रा. नि मोघे, ह. भ. केसकर वगैरे त्यांच्या जोडीदारांनीं लिहिल्या आहेत. याशिवाय 'मराठी सुबोध व्याकरण,' 'मराठी शुद्धलेखन,' 'चित्रबोध' हीं तीन पुस्तकें त्यांनीं मुलांसाठीं लिहिलीं आहेत. प्रसिद्ध संस्कृतज्ञ काशीनाथ पांडुरंग परब यांच्या सहकारितेनें त्यांनीं 'कौमुदी महोत्साह' या नांवाचें १८७८ त एक त्रैमासिक काढलें होतें. यांत संस्कृत व्याकरणावरील सर्वमान्य ग्रंथ जो कौमुदी त्यावर मराठींत टीका आहे; पण तो पुरा होण्यापूर्वींच हें त्रैमासिक बंद पडलें. 'सुबोधचंद्रिका' नांवाचें भगवद्गीतेचें त्यांनीं मराठींत भाषांतर केलें होतें. या पुस्तकावर त्यांचें नांव नाहीं. त्यांचा अखेरचा ग्रंथ 'सरस्वतीमंडळ' हा होय. या ग्रंथानें तत्कालीन ब्राह्मण समाजांत बरीच खळबळ उडवून दिली होती. प्रसिद्ध वादविवादपटु लेखक राजाराम शास्त्री भागवत व गुंजीकर यांमध्यें कडाक्याचा वाद बरेच महिने सुरू होता."

"गुंजीकरांचें मराठी भाषाप्रेम पूर्ण नैसर्गिक, परम शुद्ध व बरेंच असाधारण दिसतें. 'जें जें आपणास ठावें, तें तें इतरांस सांगावें, शहाणे करूनि सोडावे, सकळ जन' हा रामदासांचा गुरुमंत्र त्यांनीं बहुतेक जन्मभर बराच पाळला. शिवाय त्यांच्यांत आचारविचारपूर्ण ऐक्य असे ही गोष्ट महशूर आहे. त्यावर आक्षेप प्रतीपक्षानेंही घेतलेला दिसत नाहीं. त्यांच्या बहुतेक लेखांत समकालीन आचारविचार, लोककार्यें, वादविवाद इत्यादि प्रगतिसाधक चळवळीचें प्रतिबिंब पडलेलें दिसतें. त्यांच्या लेखांत क्रांतिकारक असें कांहींच दिसत नाहीं. सर्व कांहीं सयुक्तिक, विवेकवाद, सदुपदेश यांस साधक दिसतें; पण ज्याप्रमाणें त्यांत क्षोभदायक कांहीं दिसत नाहीं त्याप्रमाणेंच त्यांत मोहिनी मंत्र, जादु, चटक लावून सोडणारी कल्पना यांची भरारी यांचें मान नेमस्त दिसतें. प्रासादिक कवि किंवा ग्रंथकार यांच्या अंगचा सर्वकालोपयोगी वाग्विहार नव्या रमणीयतेचें भावावरण लेवून सजलेला फारसा दिसणार नाहीं."

**गुंजीकरांचें वाङ्मयः**—( १ ) मोचनगड कादंबरी; ( २ ) अभिज्ञान शाकुंतल—नाटक; ( ३ ) विद्यावृद्धीच्या कामीं आमची अनास्था; ( ४ ) सरस्वतीमंडळ ( ५ ) सुबोध रत्नमाला; ( ६ ) कौमुदी महोत्साह; ( ७ ) महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धी; ( ८ ) सुबोध व्याकरण ( ९ ) लाघवी लिपी.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) चरित्रलेख, बा. ना. देव, विविधज्ञानविस्तार. मे १९२७.

( २ ) कौमुदी महोत्साह—परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पु. ९ अंक ८; ९; १०; १८७७.

**गोखले कृष्णाजी केशव** [ मृत्यु १९२७ ] कथालेखक. हे जत संस्थानांत कांहीं वर्षे न्यायाधीश व पुढें कारभारी होते. कादंबरीकार हरि नारायण आपटे यांच्याशीं यांचा स्नेह अतिशय गाढ होता. हरिभाऊंच्या सहवासामुळें यांस लेखनाची गोडी लागली. आंग्ल कादंबरीलेखिका जेन ऑस्टेन हिच्या ' प्राइड अँड प्रेज्युडिस ' या कादंबरीचें ' आजपासून पन्नास वर्षांनीं ' हा मथळा देऊन यांनीं रूपांतर केलें आहे. तें चांगलें वठलें आहे. " सुशिक्षित स्त्रियांत गायनाला कमी दर्जाचें लेखण्यांत येतें. ज्या गायकांच्या हातीं आजपर्यंत ही कला होती, त्यांचें शील चांगलें नसल्यामुळें या कलेला समाजांत देखील कमी लेखण्यांत येऊं लागलें. ही गोष्ट पटविण्याकरितां व गायनकलेची लोकप्रियता वाढविण्याकरितां यांनीं ' तिलोत्तमा ' नांवाची कादंबरी लिहिली आहे. " ( बेहरे, म. क. वा.; वि. ज्यु. ग्रं. १ ) हिंदुसमाजांतील एकत्र कुटुंबपद्धतींतील कांहीं महत्त्वाचे दोष दाखविणारी ' एकत्र कीं विभक्त ' या नांवाची यांची एक कादंबरी ' नवयुग ' मासिकांत १९२० सालीं प्रसिद्ध झाली आहे. स्त्रीशिक्षणाचे हे कळकळीचे पुरस्कर्ते होते. हिंदु कायद्यांत स्त्रियांच्या वारसाहक्काच्या बाबतींत कसा अन्याय झालेला आहे हें दाखविण्याकरितां त्यांनीं ' हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा ' म्हणून एक लेखमाला मासिक मनोरंजनांतून प्रसिद्ध केली होती. ती बरीच विचारप्रवर्तक होती. गोखल्यांचा विशेष लौकिक मनोरंजक लघुकथा लिहिणारा लेखक म्हणून आहे. त्यांच्या लघुकथांविषयीं टीकाकार वि. स. खांडेकर म्हणतातः—" गोखले यांनीं सुमारें पाऊणशें गोष्टी लिहिल्या असतील. ' खूप केलीत सूनबाई ' या नांवानें त्यांचा एक कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. इंग्रजी

कथांचें बेमालूम रूपांतर करण्याची हातोटी त्यांना चांगली साधली होती. त्यांच्या गोष्टींपैकीं स्वतंत्र किती व भाषान्तरित किती हें नक्की सांगणें कठीण आहे. 'मंतरलेलें पाणी' 'मैनाबाईचा राघू' या गोष्टींत त्यांचें लेखनकौशल्य उत्तम रीतीनें प्रगट झालें आहे. त्यांच्या गोष्टी नर्मविनोदात्मक, एखाद्याचा भोळेपणा गमतीनें उघडकीला आणणाऱ्या, लहानशा प्रसंगाभोंवतीं कथासूत्र चातुर्यानें गुंफून तयार केलेल्या अशा असतात. गोखल्यांच्या भाषेंत माधुर्य नसलें तरी ती सुबोध व सहजसुंदर आहे. त्यांच्या पहिल्या कांहीं गोष्टी सामाजिक असल्या तरी विशिष्ट प्रश्नांचा समाजाला विचार करावयाला लावणाऱ्या कथालेखकांत त्यांची गणना करतां येणार नाहीं. कथानकाचा उलगडा रहस्यावर अवलंबून ठेवून तें मनोरंजक करण्याची कला त्यांना चांगली साधलेली आहे. कथानकाला आवश्यक एवढाच स्वभाव-परिपोष ते करतात. पण स्वभावाची चिकित्सा करण्याकडे त्यांचा मुळींच ओढा नाहीं. त्यांच्या गोष्टी कादंबरीवजा नसल्या तरी विस्तार, कथानकाची एकसूत्रता वगैरे लघुकथेचे कांटेकोर नियम लावले तर त्या संमिश्र स्वरूपाच्या ठरतील ( यशवंत, एप्रिल-मे १९३० पृष्ठ ८५ )

गोखले यांनीं मराठी टाइपांचे सुधारणेचे बाबतींत बरेच प्रयत्न केले होते.

**गोखले यांचें वाङ्मयः**—( १ ) आजपासून पन्नास वर्षांनीं; ( २ ) खूप केलीत सूनबाई व इतर गोष्टी; ( ३ ) तिलोत्तमा; ( ४ ) मूर्तिमंत गुलामगिरी.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

(१) आजपासून पन्नास वर्षांनीं, परीक्षण, प्रो. ग. स. भाटे, विविधज्ञानविस्तार; पुस्तक ४५, अंक ३, १९१४.

**गोगटे गणेश वामन**—[ १८७४–१९२९ ] चरित्रकार व स्वामी विवेकानंदांच्या समग्र ग्रंथांचे भाषांतरकार. यांचा जन्म रत्नागिरीच्या दक्षिणेस असलेल्या गोळप गांवीं झाला. यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत पुणें येथें झालें. मॅट्रिक झाल्यानंतर यांनीं कांहीं वर्षें मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें वैद्यकीचा अभ्यास केला, पण अखेरपर्यंत टॅंक न धरतां त्यांनीं कॉलेजाला मध्येंच राम राम ठोकून व्यापारास सुरुवात केली. हा व्यापार तुकारामबोवांच्या व्यापारासारखाच ठरला. लहानपणीं त्यांचें वाचनाकडे लक्ष नव्हतें. तें पुढें देशभक्तीच्या वावटळींत लागूं लागलें. ते राष्ट्रमत, मनोरंजन वगैरेंतून लिहूं लागले. त्यांच्या लेखनांत

सर्व विषय येत. कोणाचाहि नोकर राहूं नये अशी यांची तीव्र इच्छा. या इच्छेच्या परिपूर्तीसाठीं घड्याळें दुरुस्त करण्याचा धंदा त्यांनीं पत्करिला होता. मुंबईत ठाकुरद्वारीं असलेल्या आर्यन वॉच कंपनींत ते काम करीत. पण तेथें ते नोकर म्हणून नव्हते. करीन तें काम, पडेल तो दाम अशा तऱ्हेनें ते असत. या कामांत ते जेमतेम पोटापुरती कमाई करीत. त्यांस जास्त कमाई करतां आली नसती असें नाहीं. पण ते शक्य तितका वेळ वाचनांत घालवूं इच्छित असल्यामुळें जरूरीपेक्षां जास्त काळ ते घड्याळांत घालवूं इच्छित नव्हते. काव्यशास्त्रविनोदाच्या गप्पांत काळ घालविणें त्यांस आवडे व त्यांनीं आपल्या आयुष्याचा बराच भाग तशा तऱ्हेनें घालविलाहि. त्यामुळें साहजिकच त्यांच्यांत बहुश्रुतता आली होती. वेदान्त विषयांत त्यांचें मन विशेष रमे व म्हणूनच विवेकानंदांच्या समग्र ग्रंथांस ( कर्नाटक छापखान्यानें प्रसिद्ध केलेले ) त्यांनीं मराठी पेहेराव चढविला. त्याचे तेरा भाग झाले आहेत. अगदीं शब्दशः भाषांतर न करतां मुळांतला अर्थ उतरविण्याकडे त्यांचें लक्ष असे व त्यामुळें त्यांच्या लेखनांत रसाळपणा आला आहे. या ग्रंथांच्या भाषांतराव्यतिरिक्त भारतगौरव ग्रंथमालेमधून प्रसिद्ध झालेलीं टॉलस्टॉयचें चरित्र, केसरची प्रभावळ, प्रिन्स बिस्मार्क, ज्ञानदीप हीं पुस्तकें त्यांच्याच लेखणींतून उतरलीं आहेत. गोगट्यांनीं आपलें नांव ग्रंथावर कधींच घालूं दिलें नाहीं. त्यामुळें ग्रंथ लोकप्रिय होऊनहि त्यांचें नांव अखेरपर्यंत अज्ञातच राहिलें. [ आधारः–प्रगति, वर्ष १, अंक १ ]

**गोगटे यांचें वाङ्मयः**–( १ ) स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ खंड १ ते १३; ( २ ) कौंट टॉलस्टॉय, खंड १–५; ( ३ ) केसरची प्रभावळ; ( ४ ) प्रिन्स बिस्मार्क; ( ५ ) ज्ञानदीप.

**गोडबोले कृष्णशास्त्रीः**—[ १८३१-१८८६ ] ज्योतिर्विद्, गणितज्ञ व व्याकरणकार. यांचा वांई येथें जन्म झाला. यांचे वडील पुणें येथील सदर–अमीन कोर्टांत शिरस्तेदार होते. यांचें मराठी व संस्कृत शिक्षण पुण्यासच झालें. मेजर कँडी यांच्या सांगण्यावरून यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला. यांना लहानपणापासून गणित विषयाचा फार नाद असे. पाठशाळेंत असतां त्यांनीं शंकर जोशी या गृहस्थाकडे ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. १८५५ सालीं यांची पूना कॉलेजच्या नॉर्मल स्कूल ह्या भागांत गणिताचे शिक्षक म्हणून नेमणूक

झाली. १८६४–६५ मध्यें त्यांस मुंबईच्या कुलाबा वेधशाळेंत कांहीं दिवसांकरितां म्हणून नेमण्यांत आलें. १८६५ मध्यें पुनः पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांत त्यांची नेमणूक झाली. १८६६ मध्यें सिंधांत हैद्राबाद हायस्कुलांत व १८६७ मध्यें कराची हायस्कुलांत त्यांची नेमणूक झाली. १८७२ सालीं कांहीं दिवस पुणें हायस्कुलांत व पुढें कांहीं दिवस मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कुलांत ते उपशिक्षक होते. व पुढें त्याच वर्षापासून १८८२ मार्चपर्यंत मुंबईत फणसवाडी अँग्लो–मराठी शाळेचे ते हेडमास्तर होते. सिंधप्रांतांत असतां त्यांनीं सिंधी व फार्शी या भाषांचें चांगलें अध्ययन केलें होतें. १८७१ पासून १८७९ पर्यंत मुंबई विश्वविद्यालयाच्या परीक्षांत ते सिंधी भाषेचे परीक्षक असत. सन १८५६ मध्यें त्यांनीं व वामन कृष्ण जोशी गद्रे यांनीं लिहून ग्रहलाघवाचें मराठी भाषांतर सोदाहरण करून छापलें. तें बहुतेक विश्वनाथी टीकेचें भाषांतर आहे. या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापली आहे. कृष्णशास्त्री यांनीं ग्रहलाघवाची उपपत्तीहि मराठींत लिहिली आहे; तींत मल्लारी टीकेंतील दोष दुरुस्त केले आहेत. १८६२ सालीं ' ज्योतिःशास्त्र ' या नांवाचें मराठी पुस्तक इंग्रजींतील चेंबर्सच्या पुस्तकावरून लिहून छापलें आहे. तें आतां प्रचारांत नाहीं. हटनच्या बीजगणिताचें मराठी भाषांतर पूर्वी झालें होतें, तें १८५४ मध्यें दुरुस्त करून यांनीं छापविलें. तें बरींच वर्षें शाळाखात्यांत चालत असे. १८७४ मध्यें ते व गोविंद विठ्ठल करकरे या दोघांनीं मिळून मराठींत युक्लीडच्या भूमितीच्या पहिल्या चार पुस्तकांचें भाषांतर केलें. त्यापूर्वी नानाशास्त्री आपटे यांनीं केलेलें युक्लीडच्या पुस्तकांचें भाषांतर मराठी शाळांत चालत असे. पुढें १८८५ पासून देवकुळे यांचें पुस्तक चालूं लागलें. १८८२ मध्यें ' वेदांचें प्राचीनत्व ' या नांवाचा एक निबंध इंग्रजींत लिहून तो त्यांनीं ' थिऑसाफिस्ट ' मासिकांत प्रसिद्ध केला. ' मासानां मार्गशीर्षोऽहं ' या गीतावाक्यावरून मार्गशीर्षांत वसंत असें घेऊन वेदकाल शकापूर्वी ३० हजार वर्षांहून प्राचीन, असें सिद्ध करण्याचा त्यांत प्रयत्न केला आहे. त्यांनीं १८६७ सालीं ' मराठी भाषेचें नवीन व्याकरण ' हें पुस्तक लिहिलें. हें पुस्तक ' त्या पूर्वीच्या सर्व व्याकरणग्रंथांपेक्षां अधिक सरस, आटोपसर, व्युत्पत्ति, वाक्यपृथक्करण, छंदःशास्त्र, आणि संस्कृत–प्राकृत–मराठी यांचा संबंध दाखविणारीं प्रकरणें जोडल्यामुळें, अधिक व्यापक असें झालें आहे,' असें तज्ज्ञ म्हणतात.

**गोडबोले यांचे ग्रंथः**—( १ ) चेंबरचें ज्योतिःशास्त्र, १८६२; ( २ ) मराठी भाषेचें नवीन व्याकरण, १८६७; ( ३ ) ग्रहलाघव-भाषांतर, १८५६; ( ४ ) सिंधी भाषेचें निरूपण.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) चरित्रलेख, भारतीय ज्योतिःशास्त्र पृ. ३०५–६;

( २ ) चरित्रलेख, मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबंधकार; पृ. १२७–१२९.

**गोडबोले परशुराम बल्लाळः**—[ १७९९–१८७४ ] कवि, छंदशास्त्रज्ञ, संस्कृत नाटकांचा कुशल मराठी भाषांतरकार. ह्यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील पावसगोळप हें होय. तेथून बळवंतराव गोडबोले—चरित्र नायकाचे पणजे—हे वांईस रास्त्यांच्या आश्रयास येऊन राहिले. त्यांचे चिरंजीव परशुरामपंत ह्यांनीं रास्त्यांबरोबर मराठ्यांच्या सैन्यासहवर्तमान कर्नाटक, म्हैसुर, वगैरे प्रांतांत जाऊन बराच द्रव्यसंचय केला, आणि चांगली मानमान्यता मिळविली. त्यांचे शरीरसंबंध तासगांवच्या जोगांशीं आणि स्वतः रास्त्यांशीं झाले. पुढें कालचक्र फिरल्यामुळें, त्यांचे चिरंजीव बळवंतराव हे रोजगारधंदा पाहण्यास पुण्यास येऊन राहिले. या बळवंतरावांचे चिरंजीव परशुरामपंत तात्या होत. यांचा जन्म वांई येथें झाला. त्यांचा लहानपणचा विद्याभ्यासहि तेथें झाला. ह्यांचें मोडी अक्षर फार सुरेख होतें, आणि ह्यांस जमाखर्चाची माहिती चांगली होती. ते नारायणशास्त्री देव ह्यांपाशीं संस्कृत पढले. ह्यांचे वडील बंधु दाजीबा म्हणून होते, त्यांस मोरोपंतादि महाराष्ट्र कवींचीं काव्यें वाचण्याचा नाद फार होता. त्यांच्या सहवासानें परशुरामपंततात्यांस महाराष्ट्र काव्यांची रुचि लागली. पुढें प्रपंचाच्या निर्वाहार्थ तात्या पुण्यास येऊन आपले मातुल जोग ह्यांच्या पेढीवर कारकून राहिले. तरी, त्यांचा मराठी काव्यांचा अभ्यास चाललाच होता. त्यावरून मराठी भाषेच्या मार्मिकपणाविषयीं त्यांचा चांगला लौकिक होऊन, तेव्हां बोर्ड ऑफ एज्युकेशन ह्या मंडळीनें मराठी कोश तयार करण्याकरितां जी विद्वान मंडळी नेमिली, तींत तात्यांची योजना झाली. ह्याच सुमारास विश्रामबागेंत सरकारी छापखाना घातला गेला, त्यावर देखरेख पुणें कॉलेजाच्या प्रिन्सिपॉलच्या नात्यानें, मेजर क्यांडीसाहेबांची होती, तेथें त्यांची आणि तात्यांची ओळख झाली, आणि तात्यांच्या मराठी भाषेच्या मार्मिकपणाविषयीं

त्यांची खातरी झाली. पुढें त्या साहेबांस सरकारी शाळांकरितां मराठी पुस्तकें लिहिण्यासाठीं सरकारनें मराठी ट्रान्स्लेटर नेमिलें, तेव्हां त्यांनीं तात्यांस आपले हाताखालीं पंडित म्हणून नेमून घेतलें. ह्या जागेवर तात्या अखेरपर्यंत होते. ते मेजर क्यांडीसाहेबांचा उजवा हात होते. मराठी क्रमिक पुस्तकांतल्या सगळ्या नव्या कविता तात्यांच्या आहेत.

सरकारी काम संभाळून तात्यांनीं अनेक मराठी ग्रंथ केले आहेत. त्यांचे तीन प्रकार आहेत :—

( १ ) संस्कृतावरून मराठी केलेले ग्रंथ—ह्यांत शाकुंतल, वेणीसंहार, उत्तररामचरित्र, मृच्छकटिक, नागानंद आणि पार्वतीपरिणय हीं नाटकें प्रमुख होत. शब्दास शब्द ठेवणें हें कांहीं खरें भाषांतर नव्हे, तर मूळावरून जो रसाविर्भाव होतो, तो भाषांतरावरून झाला पाहिजे, हें भाषांतराचें मुख्य तत्त्व तात्यांच्या ग्रंथांत चांगलें व्यक्त होतें. ह्याचें प्रमाण पाहावयाचें असल्यास, वेणीसंहारांतील ' ती भीमाची वार्ता परिसुनि ' ही लावणी आणि मृच्छकटिकांतील ' वसंत नायकिणीचा वाडा ' ही लावणी वाचावी. तात्यांचीं भाषांतरें हीं भाषांतरें वाटत नाहींत, मूळ ग्रंथ वाटतात. त्याचा थोडासा मासला येथें दाखवितों.

शाकुंतल—कण्वाचे उद्गारः—

जाते आज शकुंतला म्हणुनियां वाईट वाटे मला
येती दाटुनि अश्रुपूर नयनीं हा कंठही दाटला
स्नेहें दुःख पहा वनांत वसत्या मातेंहि होतें असें
होईना मग तें प्रपंचिक जनां कन्यावियोगें कसें.

शाकुंतल—कण्वाचा शकुंतलेस बोधः—

शुश्रूषा पतिची करीं सवतिशीं स्नेहप्रवृत्ती धरीं
केलें यद्यपि अप्रिय स्वपतिनें कोपूं नको अंतरीं
राहीं सावध फार गर्व न धरीं दासीं करावी दया
येणें पावति थोर मान युवती होती दुजा अप्रिया.

वेणीसंहार—भीमाची प्रतिज्ञाः—

जी ही गदा मम करांत सदैव नाचे
घातें इच्या चुरिन ऊरु सुयोधनाचे

मराठी ग्रं... सं...

रक्तें तयांतिल विलेपिन मी स्वपाणी
त्यांहींच बांधिन सखे तव मुक्त वेणी.

( २ ) जुन्या कवींच्या काव्यांचा संग्रह—यांत 'नवनीत,' 'केकादर्श' आणि माधव चंद्रोबांनीं कितीएक वर्षें चालविलेला 'सर्वसंग्रह' ह्यांचा समावेश होतो. ह्यांपैकीं 'नवनीत' तर आज कित्येक वर्षें तुकाराम, रामदास, श्रीधर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादिकांच्या कृतींशीं विद्यार्थ्यांचा परिचय करून देण्यास कारणीभूत झालेलें आहे. दादोबांची 'यशोदापांडुरंगी' सामान्य लोकांस समजावयास फार जड जाऊं लागली, म्हणून तात्यांनीं 'केकादर्श' हा ग्रंथ लिहिला. तो पाहिला म्हणजे तात्यांची कविता समजावून सांगण्याची अप्रतिम शैली दिसून येते. आणखी आपल्या महाराष्ट्र कवींचा जीर्णोद्धार व्हावा म्हणून तात्यांनीं 'सर्वसंग्रहा'स साह्य केलें. तेणेंकरून महाराष्ट्र कवींचीं काव्यें लोकांच्या हस्तगत झालीं. शिवाय, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यांनीं तुकारामाची गाथा सरकारच्या आश्रयानें इंदुप्रकाशांत प्रथम छापून काढिली. त्या कामींहि त्यांना तात्यांनीं पुष्कळ मदत केली.

( ३ ) नवीन ग्रंथ—मराठ्यांच्या इतिहासावर सोप्या कविता, नामार्थदीपिका, बालबोधामृत, कादंबरीसार, वृत्तदर्पण हीं त्यांचीं पुस्तकें लक्षपूर्वक पाहिलीं म्हणजे एक विशेष गोष्ट अशी दिसून येते कीं, सामान्य प्रतीच्या लोकांस अत्यंत सुलभ रीतीनें ज्ञानलाभ व्हावा, हा तात्यांचा मुख्य प्रयत्न होता. आणि तो उत्तम प्रकारें सिद्धीस गेला आहे.

ह्या सगळ्या ग्रंथांचें अवलोकन केलें म्हणजे तात्यांस महाराष्ट्र भाषा किती वश होती, गूढार्थ सुलभ करण्याचें त्यांचें सामर्थ्य केवढें होतें, आणि काव्यरसपरिपाक यथास्थित उतरण्याची सामुग्री त्यांचे ठायीं किती सिद्ध होती, हें सहज ध्यानांत येतें. मूळांतला रस सगळा आणून, सुंदर शब्दयोजना करून, कविता कशी रचावी, हें तात्यांस फार चांगलें येत होतें.

तात्या मोठे रसिक आणि मर्मज्ञ होते. त्यांस महाराष्ट्र कविता लावण्याच्या कामीं—आणि त्यांतहि मोरोपंतांच्या आर्या लावण्यांत—तर त्यांचा हातखंडा असे. त्याविषयीं त्यांस नेहमीं मोठमोठ्यांचीं दूरदूरच्या ठिकाणांहून पत्रें येत. त्यांचीं समर्पक उत्तरें ते, तिळमात्रहि आळस न करितां, जेव्हांचे तेव्हां मोठ्या आनंदानें देत. महाराष्ट्रांत कवींचें माहात्म्य वाढत चाललेलें पाहून त्यांस मोठा

संतोष होई. मोठ्या विद्वान् लोकांतसुद्धां एवढी आख्या होती कीं, थोरले चिपळूणकरदेखील अडलेली आर्या त्यांस विचारीत असत. मोरोपंतांविषयीं त्यांचे ठायीं अत्यंत पूज्यबुद्धि होती. मोरोपंतांच्या काव्यास कोणीं नांव ठेविलें कीं, त्यांना अतिशय राग येत असे. आणि खरोखरीच मोरोपंतांचें हृद्गत बरोबर समजणारा पुरुष महाराष्ट्रांत ह्यांच्यासारखा दुसरा कोणी झाला नाहीं.

परशुरामपंत तात्यांनीं संस्कृताचें प्राकृत करून, नवीन कविता रचून, आणि जुन्या कविता लोकांत प्रसिद्धीस आणून महाराष्ट्र भाषेची फार मोठी सेवा केली आहे. महाराष्ट्र वाङ्मय म्हणून कांहीं आहे असें ज्यांच्या उद्योगानें लोकांस वाटूं लागलें आहे, त्या पुरुषांमध्यें तात्यांस अग्रस्थान दिलें पाहिजे.

[बालबोध, फेब्रुवारी १९०५ मधील चरित्राचा संक्षेप.]

**गोडबोले परशरामपंत यांचें वाङ्मयः**—(१) वेणीसंहार, १८५७; (२) उत्तररामचरित्र, १८५९; (३) शाकुंतल, १८६१; (४) मृच्छकटिक; (५) नागानंद; (६) पार्वतीपरिणय; (७) नवनीत; (८) केकादर्श; (९) मराठ्यांच्या इतिहासावर सोप्या कविता; (१०) नामार्थदीपिका; (११) बालबोधामृत; (१२) कादंबरीसार; (१३) वृत्तदर्पण.

**गोडबोले रघुनाथ भास्करः**—[जन्म–मृत्यू काल अनुपलब्ध] कोशकार. जन्म वांई येथें झाला. यांचें पुणें येथें थोडेंसें इंग्रजी शिक्षण झालें होतें. यांनीं कांहीं वर्षें सैन्यांत कारकुनीचें व पुढें शाळाखात्यांत शिक्षकाचें काम केलें. हे परमार्थवृत्तीचे होते. त्यांनीं हंसराज नांवाच्या साधूचा अनुग्रह घेतला होता. यांनीं पुढीलप्रमाणें कोश तयार केले आहेतः–(१) हंसकोश, १८७६; (२) भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश १८७५; (३) भारतवर्षीय अर्वाचीन कोश १८८०; (४) मराठी भाषेचा नवीन कोश, १८७०; (५) मराठी इंग्रजी कोश, १८८०. "यांनीं फार माहिती जमा करून प्रसिद्ध केली. किंबहुना अलीकडे संशोधनाचें युग सुरू होण्यापूर्वीच्या काळांत एवढा शोध एक लोकहितवादीशिवाय कोणी केला असें वाटत नाहीं. हंस–कोशावांचून आजहि पदोपदीं जुन्या काव्याभ्यासकांचें अडून राहतें. गोडबोल्यांची वाङ्मयसेवा मोठी संस्मरणीय झाली याबद्दल मतभेद व्हावयाचा नाहीं." (प्रो. पोतदार, म. ग. इं. अ. पृष्ठ, १०७)

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) हंसदास रघुनाथ भास्कर गोडबोले, चरित्र, मो. स. मोने, मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबंधकार, पृष्ठ २१४–२१७.

( २ ) भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश, गुणदोषविवेचन, वि. कृ. चिपळूणकर, निबंधमाला, पृष्ठ ४४३–४५७.

**गोविंदः**—गोविंद त्र्यंबक दरेकर—[ १८७४–१९२६ ] कवि. यांचा जन्म नाशिक येथें झाला. यांचे वडील लहानपणींच वारल्यामुळें व एकदां ताप भयंकर येऊन पाय व हात लुले पडल्यामुळें यांचें फारसें शिक्षण झालें नाहीं. हे जातीनें मराठा होते. १८९८–९९ चे सुमारास बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर यांच्याशीं त्यांचा परिचय घडून आला. या परिचयाचा ‘ गोविंदां ’वर परिणाम होऊन त्यांच्या अंगीं असलेल्या कवित्व गुणाला महत्त्वाचें वळण लागलें. १८९९ सालीं तरुणांची देशाच्या हिताचा विचार करणारी व ते विचार प्रत्यक्ष कृतींत आणण्याचा प्रयत्न करणारी अशी एक स्वतंत्र संस्था असावी, असें बॅ. विनायकराव सावरकरादि मंडळीस वाटूं लागून त्यांनीं ‘ मित्रमेळा ’ स्थापन केला. हिंदुस्थानाला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणें हें या मेळयाचें ध्येय होतें. त्या ध्येयानुसार यांतील सर्व सभासदांचें वाचन, लेखन, मनन चाले. नाना फडणवीस, श्री. शिवाजीमहाराज, श्रीसमर्थ रामदास, श्री गजानन यांचे उत्सव जाहीर रीतीनें ही संस्था साजरी करी. या उत्सवप्रसंगीं कवि गोविंद कविता करीत व म्हणून दाखवीत. या कविता स्वातंत्र्यध्येयाची कल्पना प्रसृत करण्याकरितां व लोकांत स्वदेशाभिमान जागृत करण्याकरितां लिहिल्या जात. १९०६ चे सुमारास हीं वेळोवेळीं रचलेलीं कवनें ‘ लघु अभिनव मालेचीं ’ पुष्पें म्हणून प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलीं. याच वेळीं मित्रमेळयाचें ‘ अभिनवभारत ’ या नावांत रूपांतर झालें. ‘ मालें ’तून एकंदर ९ पुष्पें प्रसिद्ध झालीं. त्यांपैकीं ५ गोविंदांनीं गुंफिलेलीं होतीं. १९०८–९ च्या दडपशाहीच्या काळांत हीं सर्व पुष्पें सरकारजमा करण्यांत आलीं. १९०९ सालीं सावरकर बंधूंपैकीं थोरले सावरकर पकडले गेले व बॅरिस्टर सावरकरांवर खटला होऊन त्यांस काळेपाण्याची शिक्षा झाली. त्यामुळें मेळयाच्या सर्व चळवळी थंडावल्या. गोविंदांचें मन उदास झालें. १९१७ पर्यंत त्यांचे हातून कविता अशी फारशी लिहिली

गेली नाहीं. १९१८ चे सुमारास ‘ होमरूल ’ची चळवळ जोरांत सुरू झाली. त्यानें प्रोत्साहित होऊन ते पुनः कवनें रचूं लागले. त्यांच्या कवितासंग्रहांतील बऱ्याचशा कविता याच काळांतील आहेत.

कवि गोविंद यांच्या कवितासंग्रहाचे प्रारंभीं प्रो. रा. श्री. जोग यांनीं जो काव्यविवेचनात्मक निबंध लिहिला आहे त्यांत त्यांनीं कवीच्या कवितेसंबंधीं पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहे. “ त्यांच्या काव्याचा मुख्य विशेष म्हणजे रसरसणाऱ्या भावना. काव्याच्या जुन्या व नव्या लक्षणांप्रमाणें रसात्मकता हा जो काव्यात्मा–तो त्यांच्या काव्यांत परिपूर्ण आहे. दुसरा विशेष म्हणजे अनुप्रासयुक्त नादमाधुर्य हा होय. या बाबतींत ते गडकऱ्यांहून कमी ठरणार नाहींत. क्वचित् ठिकाणीं या गुणाचा अतिरेक होत असला तरी उपर्युक्त कवींच्यापेक्षां अर्थशून्य शब्दरचना यांच्या काव्यांत थोडी सांपडेल. स्वतः कवि गोविंद यांची काव्याची कल्पना जरी एकांगी असली तरी उदात्त आहे. ते म्हणतातः—‘ शृंगाराला दूर सारी । हास्यरसाला नांगिकारी । परि वीररसा स्वीकारी ॥ देशा तारुनि । जी ठरली जगिं । बल–साजिरा । गुणगोजिरा । करुणाकरा । ती वीरा कविता मधुतर मधुरा । प्रतिभाभरासम सुंदरा ॥ असें जरी असलें तरी त्यांच्या ‘ मुरली ’ ‘ पक्षिदूत ’ या काव्यांवरून ती एवढ्याच साच्यांतून जावी असें त्यांचें मत नसावें. अर्थात् काव्याची त्यांची कल्पना जशी एकांगी तशीच त्यांची काव्यरचनाहि एकांगी व्हावी यांत नवल नाहीं. परंतु जें अंग त्यांनीं उचललें त्या अंगांत म्हणजे महाराष्ट्रवाङ्मयांत राष्ट्रीय शाहिरी काव्यांत त्यांचा दर्जा सर्वांत वर लागेल यांत शंका नाहीं. काव्यामध्यें स्पष्ट संदेश हुडकूं पाहणाऱ्या काव्यभक्तांस त्यांत स्फूर्तिदायक संदेशहि मिळेल. बहुजनसमाजावर, तात्कालिक कां होईना पण होणाऱ्या परिणामावरून काव्याची योग्यता ठरवावयाची असेल तर गोविंद कवींची योग्यता निःसंशय उच्च होती. त्यांच्या काव्यामधील भावना विश्वजनीन सर्वव्यापक नसल्या तरी अंतस्तीव्र खास होत्या. त्यांची बरीचशी कविता महाराष्ट्रीयांनाच पटणारी असली तरी त्यांना ती आवेशानें उड्या मारावयाला लावील यांत शंका नाहीं. मानवी मनाच्या गूढ गूढ पडद्याआड असणाऱ्या सूक्ष्म भावना हलवून मनुष्यास गुदगुल्या करून सोडणारें त्यांचें काव्य नसलें, तरी देशाभिमानासारख्या स्थूल भावनेला गदगदां हलवून, ऐकणाराला झोंपेंतून जागें खास करील. उच्चतर कल्पनाविलास त्यांच्या

कवितेला माहित नसले तरी आपलें शरीर शब्दालंकारांनीं कसें सुशोभित करावें हें त्यांच्या कवितादेवीस पूर्ण अवगत आहे. असें करितांना क्वचित् अतिरेकाचा दोष घडला असला तरी तो क्षम्यच आहे. महाराष्ट्रवाङ्मयांत कवि लोकांत शाहीर म्हणून गोविंदांची जागा पहिली आहे यांत शंका नाहीं. राजस्थानच्या इतिहासांत चांदभाटाला जो मान आपण द्यावा, तोच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत गोविंदांना देणें योग्य होईल."

कवि गोविंद १९२६ सालीं नाशिक येथें क्षयानें वारले.

**गोविंदांचें वाङ्मयः**—( १ ) कवि गोविंद यांची कविता १९३०; १९३१;

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) चरित्र, वैद्यभूषण वामनशास्त्री दातार, कवि गोविंद यांची कविता पृष्ठ १—३४

( २ ) गोविंद कवीची कविता, प्रो. जोग, कवि गोविंद यांची कविता पृष्ठ ४५—६५

( ३ ) कवि गोविंद यांची कविता, समीक्षण, पां. जि. सबनिस, यशवंत, जुलै, १९३१.

**गोळे महादेव शिवरामः**—[ १८९८–१९०७ ] गद्य ग्रंथकार. यांचा जन्म सातारा जिल्ह्यांतील मर्ढे या गांवीं झाला. डेक्कन कॉलेजांतून विज्ञान हा विषय घेऊन हे १८८३ त एम्. ए. झाले. एम्. ए. झाल्यावर गोपाळराव आगरकरांच्या आग्रहावरून ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीस येऊन मिळाले व त्यांच्या मृत्यूनंतर फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. 'हिंदुधर्म आणि सुधारणा' व 'ब्राह्मण व त्यांची विद्या' हीं त्यांचीं दोन पुस्तकें विशेष प्रसिद्ध आहेत. या दोन पुस्तकांनीं त्यांचे काळच्या समाजांत बरीच खळबळ उडाली होती. यांची भाषा सहजमनोहर व सुसंस्कृत असून, वर्णनशैली अत्यंत सूक्ष्म अशी आहे.

**गोळे यांचें वाङ्मयः**—( १ ) ब्राह्मण आणि त्यांची विद्या; ( २ ) हिंदुधर्म आणि सुधारणा; ( ३ ) शाळेचा अभिमान; ( ४ ) कुळाचा अभिमान; ( ५ ) अमरसार; ( ६ ) संस्कृत कोर्सेस; ( ७ ) ब्युबॉनिक प्लेग व त्यासंबंधीं लोकांचीं कर्तव्यें; ( ८ ) हवा.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) ब्राह्मण आणि त्यांची विद्या, परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २८, अंक १।२, ३।४, ५।६; १८९६.

( २ ) ब्राह्मण आणि त्यांची विद्या, टीका, बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरींतील लेख खण्ड ४, पृष्ठ २०५–२३८.

( ३ ) हिंदुधर्म आणि सुधारणा—परीक्षण; श्री. कृ. कोल्हटकर, विविधज्ञान-विस्तार पुस्तक ३०, एप्रील, मे, जून १८९९.

**घाटे दत्तात्रय कोंडोः**—( दत्तकवि )—[ १८७५–१८९९ ] यांचा जन्म अहमदनगर येथें झाला. १८९० सालीं हे प्रवेश परीक्षा पास झाले. व १८९८ सालीं कलकत्ता विश्वविद्यालयाचे बी. ए. झाले. याच सालीं ते नोकरी मिळविण्यासाठीं बडोद्यास गेले. बडोद्यास तो काळ बौद्धिक जागृतीचा होता. तेथें शंकर मोरो रानडे, यंदे वगैरे गृहस्थांशीं दत्त कवींचा परिचय होऊन ते सयाजीविजय या मराठी पत्रांत लेख लिहूं लागले. कवि चंद्रशेखर यांच्याशीं त्यांचा अकृत्रिम व असामान्य असा स्नेह याच वेळीं येथें जडला. लवकरच बडोद्यांत प्लेग उद्भवला व त्याला दत्त बळी पडले.

दत्त हे आपल्या ऐन उमेदींत येण्यापूर्वीच म्हणजे वयाला चोवीस वर्षेंहि पुरीं न होतां वारले ही गोष्ट त्यांच्या काव्यकामगिरीचा आढावा घेतांना ध्यानांत ठेविली पाहिजे. बाकी, प्रतिभा ही मोठी आश्चर्यकारक शक्ति आहे. इंग्रजी कवि शेली हा अकालींच वारला, परंतु त्याच्या काव्यसंभाराच्या पासंगालाहि अर्वाचीन मराठी कवींचा काव्यसंभार पुरणार नाहीं. उलट, टॉमस हार्डी याची खरी काव्यरचना उत्तर आयुष्यांत म्हणजे कादंबरीलेखन थांबल्यावरच झाली. कवीची श्रेष्ठता ही मुख्यत्वेंकरून कशी कविता लिहिली यावरून, का किती कविता लिहिली यावरून ठरवायची, हाहि प्रश्न आहेच. दत्तांनीं कवितालेखन आठ वर्षें केलें. त्यांपैकीं शेवटल्या साडेचार वर्षांत लिहिलेल्या त्यांच्या कविता 'दत्तांची कविता' या, त्यांचेच चिरंजीव रा. विठ्ठलराव घाटे यांनीं १९२२ सालीं संपादून प्रकाशित केलेल्या पुस्तकांत दिलेल्या आहेत. या ४८ कवितांवरूनच दत्तांच्या कामगिरीचा आढावा घ्यायचा आहे.

दत्त केशवसुती सांप्रदायांतील होते हें निर्विवाद आहे, परंतु याचा अर्थ ते केशवसुतांचे चेले होते असा मुळींच होत नाहीं. गोविंदाग्रजांनीं स्वतःस केशवसुतांचा ‘ सच्चा चेला ’ म्हटलें आहे. तरीहि गोविंदाग्रजांच्या उघड उघड अनुकरणात्मक अशा ‘ दसरा ’ या सारख्या दोन तीन कविता सोडल्या तर गुरुशिष्यांच्या कवितेंत फारसें साम्य नाहीं हेंच आढळून येईल. परंतु केशवसुत हे गोविंदाग्रजांचे स्फूर्तिदाते तरी होते; परंतु केशवसुतांची कविता दत्तांना स्फूर्तिदायी झाली असें मानावयाला पुरावा नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या चौथ्या पंचविशींत इंग्रजी कवितांच्या आणि विशेषतः पाल्ग्रेव्हसंपादित हैमकोशांतील इंग्रजी भावगीतांच्या वाचनानें स्फूर्ति पावून ज्यांनीं पाश्चात्य धर्तीची कविता रचावयाला सुरुवात केली त्या कविमंडळांतच दत्त समाविष्ट होतात. या कविवर्गांत कालदृष्टया व गुणदृष्टया केशवसुत अग्रेसर होते म्हणूनच या सांप्रदायास केशवसुती सांप्रदाय म्हणतात. दत्तांच्या कवितेंत अखेर अखेरपर्यंत संस्कृतांतील रूढ संकेताबरोबरच इंग्रजी कवितांतील केवळ प्रतिध्वनि नव्हे तर पंक्तींचा अनुवाद आढळतो. सृष्टिप्रेम, देशभक्ति, प्रेममाहात्म्य वगैरे विषय इंग्रजी कवितांच्या वाचनामुळेंच मराठी काव्यप्रांतांत शिरले व आतां कायमचे रहिवासी बनून राहिले आहेत. नव काव्याविषयीं कौतुक वाटल्यास भाषांतरित कविता होते, त्याच्याविषयीं प्रीति वाटल्यास अनुकृत कविता होऊन तींत मूळाचे प्रतिध्वनि उमटतात. परंतु कवीच्या वृत्तीशीं नव काव्य समरसून गेलें म्हणजे जी सहजस्फूर्त कविता होते; ती दिसावयाला थोडी परकी दिसली तरी स्वतंत्र, पृथगात्म व चैतन्यानें मुसमुसलेली अशी होते. केशवसुतांची कविता या तिसऱ्या उच्च कोटींतील आहे. दत्तांना आपलें वैशिष्टय जाणवून त्यांनीं स्व-भाव गीतरचनेला आरंभ केला न केला तोंच काळानें त्यांच्यावर झडप घातली.

दत्तांची बहुतेक कविता सुबोध व करुण असली तरी तिचें वैशिष्टय जेवढें त्यांनीं लिहिलें आहे तेवढ्याचाच विचार करितां, शिशुगीतांतच आहे. आणि मराठी काव्यप्रांतांत नवीन जीवंत झरा जर त्यांनीं दाखवून दिला असेल तर तो वत्सल रसाचाच होय. त्यांच्या इतर कविता वाचनीय नाहींत असें नाहीं. तरी त्यांतील अपवादात्मक दोन तीन कविता वगळल्या तर उरलेल्यांत जीवंत भावनेचा विलास प्रतीत होत नाहीं. काव्यांत जें हृद्य तेंच हृय व हृदयंगम

ठरतें. भावना आणि भावनाभास यांतील फरक ओळखला पाहिजे. यौवनाच्या पूर्वकालांत जें इष्ट वाटतें तें विद्यमान आहेच अशी भावना होते. या काळांत मनुष्य प्रेम करीत नाहीं तर प्रेमाच्या कल्पनेवर भाळून जातो. या काळांतील विषादसुद्धां अनेकदां तीव्र असला तरी संभ्रमज व बालरुदनाप्रमाणें चंचल असतो. आतां या भावनाभासाच्याच लहरींत झालेल्या लेखनांत केव्हां केव्हां पुढें खऱ्या भावनेचा कल्लोळ प्रतीत होऊन चमत्कार वाटतो; परंतु असे प्रसंग विरळा. दत्त एके ठिकाणीं ( कवितासंग्रह पृ. ३६ ) म्हणतात.

जो त्यागितो निरस मानुनि रम्य सृष्टी
ठेवोनि कल्पित कृतीवर नित्य दृष्टी
तो टाकुनी उदकपूर्ण घटा घरांत
प्याया सदा मृगजळा फिरतो वनांत.

अशी स्थिति त्यांची स्वतःचीच, विशेषतः सृष्टिविषयक कवितांत झालेली आहे. त्यांची प्रतिभा १८९७ सालीं खरी जागृत झाली. परंतु त्याच सालीं लिहिलेल्या ‘ सख्या वसंतवाता ’ ‘ बाई लतिके ’ ‘ मुग्धकलिका ’ इत्यादि कवितांत सुललित शब्दांच्या गर्द मंडपांत कल्पित कारणपरंपरा व रंजक आरोपावलि करणाऱ्या बुद्धीचा कुतूहलजनक विलास मात्र आढळतो; पण हृदयास हलवून सोडील असें कांहीं आढळत नाहीं. ‘ कोकिल कूजित ’ ( पृ. ३० ) व ‘ प्रभात ’ ( पृ. ५७ ) या कवितांत तर भिन्न भिन्न काळीं गोचर होणाऱ्या देखाव्याचा संकर म्हणजे सृष्टीचा विपर्यासच केलेला आहे. नगरास नसेल पण महाराष्ट्रांत कुठेंहि वसंतागमीं ‘ बालतृणाचे रम्य गालिचे वनांत पसरलेले ’ आढळतात काय ? वसंतागमीं ‘ दिगङ्गना दहिंवर सिंचतात ’ काय ? वायूवर बसून उंच अंबरीं तल्लीन होऊन प्रभुगुण गाणारे गगनविहारी खगवैतालिक किती व कोणते आहेत ? ‘ विश्वामित्रीच्या काठीं ’ ( पृ. ४९ ) या कवितेंत मात्र उत्प्रेक्षामाला प्रसविणाऱ्या कल्पनेचा विलास व एका तऱ्हेची गूढ प्रसन्न शांति अशी ‘ द्विगुणित शोभा ’ व ‘ द्विगुणित आनंदाची भरती ’ आहे. परंतु या रम्य कवितेलाहि दोषाचीं गालबोटें आहेतच. तारांगण खालीं पाण्यांत स्पष्ट बिंबलेलें आहे, त्या अर्थी वातावरण पारदर्शक व आकाश निरभ्र असलें पाहिजे. परंतु पौर्णिमेची चांदणी रात्र असल्यामुळें तारांगण फिकट दिसलें पाहिजे व अस्पष्टपणेंच प्रतिबिंबित व्हायला पाहिजे. वातावरण पारदर्शक असल्यास

चांदण्याला बर्फाचा पाऊस म्हणतां येणार नाहीं, कारण तो पिठासारखा पडतो व त्यामुळें हवेंत धुक्यासारखी अपारदर्शकता येते. आकाश निरभ्र असल्यास चंद्र स्थिर दिसतो, त्याची गति दिसत नाहीं. उन्हाळ्यांत कापशी ढगांच्या गतीमुळें चंद्र गतिमान् दिसतो. अर्थात् चंद्र जर पौर्णिमेच्या निरभ्र आकाशांत स्थिर आहे तर तो 'कलहंसापरि पोहुं लागला' कसा? तो तडागांतील कमलाप्रमाणें स्थिर दिसेल, पोहूं लागणार नाहीं. शिवाय, 'वरती खालीं दिसतें गगन, मध्यें लंबित अपुलें भवन' अशा भवनास 'गोजिरवाणी फेकिला चेंडु हा कोणी?' असें म्हणणें समुचित वाटत नाहीं. ही उपमा कुणास क्षुद्र वाटेल, कुणास फाजील मोठी वाटेल. उंच भूमिकेवरून पाहतां पृथ्वी रजःकणाप्रमाणें सूक्ष्म वाटावयास हवी. वस्तुतः पाण्यांत पाताळाचें प्रतिबिंब पहात असतां मध्यें पृथ्वी रहातच नाहीं. या कवितेच्या अंतीं 'स्मरणशक्तिके जागृत होई' वगैरे उद्गार म्हणजे याचाच प्रतिध्वनि होय.

शृंगारातीत प्रेमाकडे दत्त वळलेले दिसत नाहींत. "दत्तांचा कालिदासी शृंगार आधुनिक काव्यांत अपूर्व आहे. तो उत्तम, अदम्य व खुल्या दिलाचा आहे," अशी ग्वाही त्यांचेच पुत्र रा. विठ्ठलराव घाटे हे 'सहज चालतां मार्गीं तुजला' या लावणीवरील टीपेंत देतात. दत्तांवर संस्कृत सारस्वताचे संस्कार चांगलेच झाले होते. जुन्याच कविकल्पना पण दत्तांच्या कवितेंत अशा रीतीनें आलेल्या आहेत कीं, त्या त्यांना तरी शिळ्या व नीरस वाटत नसाव्यात. 'सखे सुमनमाले' आणि 'स्वप्नभेट' याहि कविता या दृष्टीनें वाचनीय आहेत. इंग्रजी कवितांतूनहि रुचतील त्या कविकल्पना त्यांनीं घेतल्या, पण इंग्रजी कवितांतील शृंगारांतील प्रेमाशीं ते रंगले नाहींत.

दत्तांनीं देशभक्तिपर कविता ५।६ लिहिल्या; परंतु त्यांत भावनेचा उद्रेक नाहीं. देशभक्ति ही एक इष्ट भावना आहे असें वाटणाऱ्या कोमल हृदयावरील त्या कविता म्हणजे कुतूहलजनक लहरी वाटतात.

दत्तांच्या इतर कवितांपैकीं 'फुलें विकणारी पोर' व 'एका आसन्नमरण दुष्काळपीडितास' या कविता हृदयद्रावक आहेत. पहिलीस 'लास्ट डेज् ऑफ पॉम्पी' या कादंबरींतील आंधळ्या मुलीच्या गाण्याचा आधार आहे तर दुसरी शेक्सपिअरकृत 'सिंबेलाइन'मधील चौथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांतील गीता-वरून सुचली असावी. 'निज नीज माझ्या बाळा' हें करुण निद्रागीत उत्कृष्ट

आहे. याच्या तोडीचें करुणगीत महाराष्ट्रकाव्यप्रांतांत दुसरें नाहींच. पूर्वी चांगले दिवस पाहिलेल्या व नंतर अन्नान्नगत झालेल्या सुसंस्कृत, स्वाभिमानी, प्रभुश्रद्धान हिंदु विधवेचें वात्सल्य या करुणगीतांत ससंय्यम वहात आहे. मूर्ताला अमूर्ताची उपमा देण्याची कल्पना शेलीवरून सुचली असली, तरी प्रस्तुत कवितेंत विधवेनें रात्रीची तुलना आपल्या निराशाजनक स्थितीशीं करून त्यावरून तिला उपमा सुचाव्यात हें अत्यंत साहजिक आहे. गोविंदाग्रजांच्या राजहंसांतील हृदयंगम पण परिस्थितीशीं विसदृश अशा ( उ० 'मोत्याचा चारा' व ' कौस्तुभ माळेमधला ') कल्पना या कवितेंत नाहींत. यांत संयम आहे म्हणूनच कवितेचें हृदयस्पर्शित्व विशेष आहे. " जोंवरती या कुडींत राहिल प्राण। तोंवरि तुज संगोपीन " असें आश्वासन देणाऱ्या "तुज जन्म दिला सार्थक नाहीं केलें। तुज कांहिं न मी ठेवीलें " म्हणून हळहळणाऱ्या मातेची " तदनन्तरची करूं नको तूं चिंता, नारायण तुजला त्राता " असें म्हणणारी भाबडी श्रद्धा आणि " भिक्षेविण धंदा नाहीं तरि सोडुं नको सत्याला, धन अक्षय तेंच जिवाला " असा उपदेश करणारी बाणेदार नेकी पाहिली कीं, डोळ्यांला पाणी आल्यावांचून रहातच नाहीं. या हिंदु विधवेंत फोल तुफानी आक्रोश नाहीं, " अनंत गूढें मनीं वाहण्याला, अनंत दुःखें हृदयीं धरण्याला " लागणारें असें मूक शौर्य आहे कीं, जें पाहून संसारग्रस्तांना दिलासा वाटावा. दत्तांच्या शिशुगीतांपैकीं ' शहाणी बाहुली ' हें गीत अप्रतीम आहे.

दत्तांच्या कवितेचा एकंदर आढावा घेतां असें दिसून येतें कीं, दत्तांजवळ नादमाधुर्य होतें, शब्दसौष्ठव होतें पण त्यांना परिष्करणाची जरूरी भासली नाहीं. त्यांच्या कित्येक कविता त्यांनीं जरा आंखूड केल्या असत्या तर त्या अधिक परिणामकारक झाल्या असत्या. संयुक्त व्यंजनांतील आद्य व्यंजन छंदोभंग होऊं नये म्हणून कितीदां तरी निसरडें अस्पष्ट उच्चारावें लागतें. परंतु स्वतःच्या कवितेचे स्वतःच टीकाकार होऊन परिष्करण करावयाला ते जगलेच फार थोडे. दत्त अधिक जगते तर त्यांनीं मराठी कवितेंत कशाची भर टाकिली असती हें निश्चयानें सांगतां येणें अशक्य आहे. तरी एवढें मात्र खरें कीं, दत्तांच्या मृत्यूमुळें मराठी भाषा केशवसुती जिव्हाळ्याच्या शृंगाराच्या—कांतकांताप्रेमाच्या कवितांना आणि अजूनहि कुणास साधलीं नाहींत अशा कांहीं शिशुगीतांना मुकली.

माधवराव त्रि. पटवर्धन.

**घाटे यांचें वाङ्मयः**—दत्तांची कविता, प्रकाशक–विठ्ठलराव घाटे, १९२२.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) चरित्र, वि. द. घाटे, ' दत्तांची कविता ' यास जोडलेलें.

( २ ) दत्तांची कविता, चर्चा, ना. के. बेहरे, मनोरंजन, जून १९२२.

( ३ ) दत्त कवीची कविता, वि. सि. टिळक; मनोरंजन, जुलै १९२९.

( ४ ) दत्तांची कविता, निरीक्षण, ' कृष्णचंद्र ', महाराष्ट्रसाहित्य, जुलै १९२९.

( ५ ) दत्तांची कविता, गो. रा. हिंगणेकर, काव्यचर्चा, पृष्ठ ३२५–३३६.

( ६ ) दत्तांची कविता, य. दि. पेंढरकर, काव्यचर्चा, पृष्ठ ३३७–३४६.

**चांदोरकर गोविंद काशिनाथः**—[ मृत्यु १९२१ ] इतिहास-संशोधक. हे धुळें येथें वकिली करीत असत. इतिहाससंशोधक राजवाडे यांच्या तालमींत तयार झालेले हे एक कष्टाळु, बुद्धिमान, व्यासंगी असे इतिहाससंशोधक होते. यांचीं ' आर्यलिपि ' ( १९०८ ); ' महाराष्ट्रीय संत–कवि–काव्यसूचि ' ( १९१६ ) हीं दोन पुस्तकें महत्त्वाचीं आहेत. धुळें येथें ' प्रभात ' नांवाचें एक मासिक कांहीं दिवस हे चालवित असत.

**चिटणीस मल्हार खंडेरावः**—[ १८६०–१९०८ ] कवि व गद्य ग्रंथकार. उमरावती येथें वकिली करीत असत. बहुश्रुत व व्यासंगी विद्वान् म्हणून यांचा लौकिक असे. ' अंतरिक्षांतील चमत्कार ' हा त्यांचा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे.

**चिटणीसांचें वाङ्मयः**—( १ ) नवकुसुममाला–काव्य, १९०७; ( २ ) अंतरिक्षांतील चमत्कार, १८९६.

**चिपळूणकर कृष्णशास्त्रीः**—[ १८२४–१८७८ ] यांचा जन्म पुणें येथें झाला. विश्रामबागेंतील पाठशाळेंत यांनीं संस्कृताध्ययन केलें. यांचे गुरु विख्यात पंडित मोरशास्त्री साठे हे होते. यांच्या हाताखालीं त्यांनीं अलंकार, न्याय व धर्म या तीन शास्त्रांचा अभ्यास केला. कृष्णशास्त्री यांची विशाल बुद्धिमत्ता पाहून, त्यांस त्यांनीं बृहस्पति असें नांव ठेविलें होतें. संस्कृताभ्यास आटोपल्यानंतर विश्रामबागेंत नुक्ताच इंग्रजी भाषा पढविण्याचा उपक्रम सुरू

झाला होता, त्याचा फायदा घेऊन त्यांनीं इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली व त्यांत त्यांनीं चांगलें प्राविण्य मिळविलें. इंग्रजी पाठशाळेंत असतां त्यांनीं अर्थशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र वगैरे शास्त्रांवरील ग्रंथांचें चांगलेंच पर्यालोचन केलें होतें. विद्याभ्यास आटोपल्यावर १८५२ त त्यांस सरकारनें 'ट्रान्स्लेशन एक्झिबिशनर' ची जागा दिली. यापुढें पुणें पाठशाळेंत असिस्टंट प्रोफेसर, दक्षिणा प्रैझकमिटीचे सेक्रेटरी, पूना ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल या निरनिराळ्या जागांवर नेमणुका होऊन अखेरीस १८६८ सालीं त्यांची बदली 'रिपोर्टर ऑन धि नेटिव्ह प्रेस' या जागेवर झाली.

कृष्णशास्त्र्यांच्या काळांत ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा फार सुळसुळाट झाला होता. बाटाबाटीचा प्रकार फार मोठ्या प्रमाणांत चाले. त्याला आळा घालण्यासाठीं, ख्रिस्तीमताचे खंडनार्थ 'विचारलहरी' नांवाचें पाक्षिक १८५२ त यांनीं सुरू केलें. ट्रेनिंग कॉलेजांत असतां 'शाळापत्रकाचें' संपादकत्व यांजकडेच होतें. 'शाळापत्रक' मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या 'व्याकरणावरील निबंधां' खेरीजचें यांचें इतर लिखाण भाषांतराच्या स्वरूपाचें आहे. जाडी विद्वत्ता अंगीं असूनहि तिचा उपयोग यांनीं स्वतंत्र ग्रंथरचनेकडे केल्याचें दिसत नाहीं. 'त्यांनीं संस्कृत व इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें करून शुद्ध मराठी भाषा कशी लिहावी, याचें चांगलें वळण लावून दिलें. शास्त्रीबोवांची सरळ, सुगम, मार्मिक व शुद्ध लिहिण्याची सरणी अनुकरणार्ह आहे.' निबंधचंद्रिकाकार म्हणतात "चिपळूणकर शास्त्रीबुवा ( थोरले ) यांनीं तर आमच्या प्रथमतः जोग घेतलेल्या व नंतर दरबारी बनलेल्या महाराष्ट्र वाणीचें पाणिग्रहण करून तिला आपल्या स्वतःच्या गोड व रंगेल स्वभावानें मोठें मनोरम स्वरूप आणिलें. त्यांनीं तिला गद्यपद्यरूपी अनेक साधे पण झोकदार व मनोरम असे अलंकार घालून तिच्या दर्शनानें वाचकांचीं मनें तल्लीन व्हावीं, अशी ती तयार केली." ( मराठी भाषेची दैना, निबंधचंद्रिका अंक ४२; पृष्ठ १० )

**चिपळूणकर कृष्णशास्त्री यांचें वाङ्मयः**—( १ ) आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी; ( २ ) अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह १८६१; ( ३ ) अर्थशास्त्रपरिभाषा १८५५; ( ४ ) साक्रेतिसाचें चरित्र १८५२; ( ५ ) रासेलस १८७३; ( ६ ) पद्यरत्नावलि–काव्यसंग्रह १८६५; ( ७ ) दादोबाकृत व्याकरणावरील टीकात्मक लेख ( संपादक—रा. भि. जोशी ).

**चिपळूणकर लक्ष्मण कृष्णः**—[ १८५२–१९०० ] चरित्रकार व इतिहासकार. सुप्रसिद्ध कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे हे चिरंजीव. १८७५ सालीं हे बी. ए. झाले. वऱ्हाडांतील शाळाखात्यांत हे अखेरपर्यंत नोकर होते. अकोला हायस्कूलचे ते कांहीं वर्षें मुख्याध्यापक होते. यांनीं आपले बंधू 'निबंध-माला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें एक विस्तृत चरित्र लिहिलें आहे. या चरित्राची पहिली आवृत्ती चित्रशाळा छापखान्यानें १८९४ सालीं व दुसरी आवृत्ती १९२१ सालीं प्रसिद्ध केली. या चरित्रावर 'ग्रंथमाला' मासिकांत बा. ना. देव, मुंडले व दामले यांची विस्तृत चर्चा प्रसिद्ध झाली आहे. बा. ना. देव, यांचा टीकात्मक लेख सडेतोड व मार्मिक आहे. विष्णुशास्त्र्यांचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांनीं तो अवश्य वाचावा. लक्ष्मणरावांनीं लिहिलेलें दुसरें पुस्तक म्हणजे 'महाराष्ट्राचा इतिहास' हें होय. यांतील प्रकरणें 'ग्रंथमाला' मासिकांतून १८९४ सालापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत आलीं. डेमी आकाराचा ४९० पृष्ठांचा असा हा ग्रंथ आहे. हा ग्रंथ स्वतंत्र असून त्यांत महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यनाशापासून म्हणजे सुमारें सन १३९० पासून तों सन १७०७ पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास आला आहे. त्यावेळीं उपलब्ध असलेल्या सर्व ऐतिहासिक साधनांचा यांत उपयोग केला आहे. मराठे लोकांची पारतंत्र्यांतून सुटका कशी झाली हा या पुस्तकाचा मुख्य आशय आहे. या इतिहासाचा दुसरा खंड लिहिला जावयाचा होता, परंतु लक्ष्मणराव लवकरच वारल्यामुळें त्याची सिद्धी तशीच राहिली.

**चिपळूणकर लक्ष्मण कृष्ण यांचें वाङ्मयः**—(१) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, १८९४, १९२१; ( २ ) महाराष्ट्राचा इतिहास, १८९४.

**चिपळूणकर विष्णुशास्त्रीः**—( १८५०–१८८२ ) अर्वाचीन मराठी वाङ्मयांतील प्रसिद्ध निबंधलेखक व टीकाकार. मराठी वाङ्मयांत आपल्या लेखनशक्तीच्या प्रभावानें आपलीं नांवें अजरामर करून ठेवणाऱ्या लेखकांत विष्णुशास्त्र्यांचें स्थान फारच उच्च दर्जाचें आहे. मराठी भाषा जिवंत असेपर्यंत शास्त्रीबुवांच्या ओजस्वी लेखणींतून उतरलेलें वाङ्मय मराठी वाङ्मयाकाशांत तेजस्वी ताऱ्याप्रमाणें चमकत राहील व मराठी लेखकांस मार्गदर्शक होईल यांत संशय नाहीं.

चिपळूणकर घराण्याचें मूळस्थान रत्नागिरी जिल्हा. पेशवाईच्या काळांत इतर अनेक लोकांप्रमाणें चिपळूणकर घराण्यांतील कांहीं पुरुष घांटावर आले, व त्यांपैकीं कित्येकांनीं पेशवाईंत नोकऱ्याहि केल्या. परंतु आपल्या अलौकिक बुद्धि-प्रागल्भ्यानें चिपळूणकर घराण्याला अखंड कीर्ति मिळवून देणारा पुरुष पेशवा-ईच्या अस्ताच्या वेळीं जन्मास यावयाचा होता. तो पुरुष म्हणजे प्रत्यक्ष ' बृह-स्पती 'चा अवतार कृष्णशास्त्री चिपळूणकर हा होय. इंग्रजी साम्राज्याची स्थिर-स्थावर होत असतांना निसर्गदत्त बुद्धिमत्ता, रसिकता, भाषाप्रभुत्व इत्यादि गुणांमुळें व द्रव्यदृष्टया, मानदृष्ट्या महत्वाची समजली जाणारी सरकारी नोकरी आणि वैयक्तिक सुधारकी धोरण वगैरे कारणांमुळें कृष्णशास्त्री म्हणजे त्यावेळचें एक बडें प्रस्थच होतें. या प्रसिद्ध कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे ज्येष्ठ चिरंजीव विष्णुशास्त्री हे होत. यांचा जन्म पुणें येथें ता. २० मे १८५० रोजीं झाला. " विष्णूचें " लालनपालन विशेषेंकरून त्याचे आजाआजी यांजकडून झालें. म्हणून विष्णुशास्त्र्यांच्या मनांत आजाआजीविषयीं जेवढा पूज्यभाव होता तेवढा आई-बापांविषयीं नव्हता. त्यांचें प्राथमिक शिक्षण ' इन्फंट स्कूल ' नांवाच्या शाळेंत व एका गांवठी शाळेंत झालें. प्रथम खाजगी रीतीनें इंग्रजी शिकून सन १८६१ सालीं ते पुना हायस्कुलांत चौथे इयत्तेंत दाखल झाले व याच शाळेंतून वयाच्या सोळाव्या वर्षीं ' मॅट्रिक्युलेशन 'ची परीक्षा पास झाले.

पुढें विष्णुशास्त्री ' पुना ' कॉलेजांत ( हल्लींचें डेक्कन कॉलेज ) उच्च शिक्षणासाठीं जाऊं लागले. त्यावेळीं प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ, प्रो. छत्रे, शंकर पांडुरंग पंडित, आबाजी विष्णु काथवटे, वगैरे प्रसिद्ध विद्वानांच्या हाताखालीं शिक्षण घेण्याची संधि त्यांना मिळाली. त्याशिवाय घरींही विद्वान पित्याचीं संभाषणें, वादविवाद, लेख, परीक्षणें इत्यादि ऐकणें व वाचणें या गोष्टी चालूच होत्या. या काळांत मराठी कविता वाचण्याचा नाद त्यांना लागला. वाचनाची त्यांची आवड जबर-दस्त असल्यामुळें मोठमोठीं संस्कृत काव्यें व नाटकें, मोरोपंतांच्या कविता, भाषाज्ञान व इतिहास यांवरील इंग्रजींतील पुष्कळ ग्रंथ त्यांनीं वाचून काढले. वाचनाची इतकी आवड असूनहि चालू राजकीय, सामाजिक चळवळीची माहिती देणारीं वर्तमानपत्रें मात्र शास्त्रीबुवा कधीं वाचीत नसत याचें आश्चर्य वाटतें. सन १८७० सालीं ते बी. ए. च्या परीक्षेस बसले परंतु तयारी व्हावी तशी न झाल्यामुळें ते नापास झाले; पुढें कॉलेज सोडून घरींच अभ्यास करण्याचें त्यांनीं

ठरविलें. या अवधींत बाबा गोखले यांचे शाळेंत ते शिकविण्यास जात. सन १८७२ सालीं ते बी. ए. ची परीक्षा पास झाले.

कॉलेजांत असल्या वेळेपासूनच मराठी लेखनास त्यांनीं सुरवात केली होती. मराठी शाळापत्रकांत चालू केलेलें 'रासेलस'चें भाषांतर १८–२० भाग संपवून पुढील भाग भाषांतरित करण्यास कृष्णशास्त्र्यांनीं चिरंजीवांकडे दिलें. चिरंजीवांनींहि दिलेली कामगिरी उत्कृष्ट रीतीनें बजावून वडिलांना मान डोलाविण्यास लाविलें. या प्रोत्साहानें उत्तेजित होऊन विष्णुशास्त्र्यांनीं स्वतंत्रपणें ग्रंथरचना करण्याचा निश्चय केला व बी. ए. ची परीक्षा आटोपतांच 'संस्कृत कवि' या लेखमालेस त्यांनीं आरंभ केला.

बी. ए. पास झाल्यावर कृष्णशास्त्र्यांच्या ओळखीमुळें विष्णुशास्त्र्यांस 'पुना हायस्कूल' मध्यें शिक्षकाची नोकरी मिळाली. त्यावेळीं त्या शाळेवर 'राजा शिवाजी' या काव्याचे कर्ते प्रसिद्ध विद्वान् महादेव मोरेश्वर कुंटे हे मुख्याध्यापक होते. राजश्री कुंटे यांची विक्षिप्त व फाजील स्वातंत्र्ययुक्त वागणूक व राजश्री विष्णुशास्त्री यांच्या अंगीं असलेला शिक्षकाला अत्यंत लाजिरवाणा असा अनियमितपणा हा अवगुण यामुळें त्या दोघांमध्यें लवकरच वैमनस्य उत्पन्न झालें. दरम्यान १८७४ सालांत त्यांनीं 'निबंधमाला' सुरू केली व त्यांतून मेकॉले, मॉरिस, मिल्ल वगैरे पाश्चात्य ग्रंथकार, हिंदुस्थानांतील मिशनरी व अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले सुधारक यांवर टीकास्त्रांचे प्रहार करण्यास सुरवात केली. ही गोष्ट अर्थातच त्यावेळच्या सरकारी अधिकाऱ्यांस उद्दामपणाची वाटून त्यांच्या नाकास मिर्च्या झोंबल्यासारख्या झाल्या. याचाच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम असा झाला कीं, विष्णुशास्त्र्यांची बदली एकदम रत्नागिरीसारख्या दूरच्या गांवीं करण्यांत आली. आधींच सरकारी नोकरीची नावड व त्यांत वरील तऱ्हेचा प्रकार. यामुळें विष्णुशास्त्र्यांना सरकारी नोकरीचा अत्यंत कंटाळा आला. 'निबंधमाला' सुरू होतीच व रत्नागिरीस जाण्यापूर्वी थोडेच दिवस आधीं 'काव्येतिहाससंग्रह' व 'चित्रशाळा' हे उद्योग त्यांनीं सुरू केले होते. वरील सर्व कामें सुरळीत चाललीं असल्यामुळें, आर्थिकदृष्ट्या आपलें अडणार नाहीं, ही गोष्ट ध्यानांत आणून शास्त्रीबुवांनीं नोकरीचा राजिनामा दिला व ते तडक पुण्यास येऊन दाखल झाले.

सरकारी सेवेची शृंखळा तुटल्यामुळें शास्त्रीबुवांना आपलें सर्व लक्ष त्यांनीं आरंभिलेल्या निरनिराळ्या कार्यांत घालतां येऊं लागलें व तीं सर्व कामें ऊर्जितावस्थेस आणण्याचा ते आटोकाट प्रयत्न करूं लागले. याच सुमारास त्यांचें 'किताबखाना' नांवाचें पुस्तकविक्रीचें दुकान सुरू झालें होतें.


सरकारी नोकरीचा राजिनामा देण्यापूर्वीच आपण आपल्या मालकीची एक स्वतंत्र शाळा काढावी, अशी कल्पना विष्णुशास्त्र्यांच्या मनांत प्रादुर्भूत झाली होती. राजिनामा पाठविल्यावर त्या कल्पनेचें रूपांतर क्रियेंत होण्याच्या वेळीं देशसेवेचें कंकण हातांत बांधून, 'डेक्कन कॉलेजां'तून बाहेर पडलेल्या 'बाळ गोपाळादि' मंडळीचें सहाय्य त्यांना मिळालें व ता. १ जानेवारी १८८० या दिवशीं 'न्यू इंग्लिश स्कूल' नांवाच्या नवीन शाळेला शास्त्रीबोवांनीं सुरवात केली. शाळेंतील शिक्षकांची तरतरी, कार्योत्साह, विद्वत्ता इत्यादि गुणांनीं अल्पावधींत शाळा फारच भरभराटीस आली, इतकी कीं, दुसऱ्या इंग्रजी शाळा बंद पडण्याच्या बेतांत आल्या. उत्साही शिक्षकांनीं शाळेचें काम उत्तम चालविलें होतेंच, परंतु आपल्या स्वतंत्र नवीन मतांचा प्रसार कसा करावा हा विचार त्यांपैकीं कांहीं लोकांच्या मनांत एकसारखा चाललेला होता. शेवटीं 'आर्यभूषण' या नांवाचा स्वतंत्र छापखाना काढून, केसरी व मराठा हीं पत्रें सुरू करण्याचा आपला मनोदय या उत्साही मंडळीनें प्रसिद्ध केला. लवकरच 'केसरी' व 'मराठा' हीं पत्रें निघूं लागलीं. केसरींतील त्यावेळचे बहुतेक वाङ्मयविषयक लेख शास्त्रीबोवांच्या ओजस्वी लेखणींतून उतरलेले असत.

'निबंधमाला' सुरू होऊन आठ वर्षें झालीं. तिचे ८४ अंक बाहेर पडले. निबंधलेखन ही ग्रंथलेखनाची पहिली पायरी. त्या पायरीवरून प्रत्यक्ष ग्रंथलेखनाच्या दुसऱ्या पायरीवर चढण्याची शास्त्रीबोवांनीं तयारी केली. 'निबंधमाला' बंद करून 'ग्रंथमाला' सुरू करण्याच्या विचारांत शास्त्रीबोवा होते. परंतु ह्या त्यांच्या व्यापक लेखनाचा फायदा मराठी वाङ्मयाच्या नशिबीं लिहिलेला नव्हता. शास्त्रीबोवांची प्रकृति बिघडली. दरम्यान् "काव्येतिहाससंग्रहा"त त्यांच्या बरोबरीनें काम करणारे रा. ब. काशीनाथ नारायण साने यांचें व शास्त्रीबोवांचें पटेनासें होऊन, शास्त्रीबोवा त्या कार्यांतून बाहेर पडले. आजारामुळें बिघडत चाललेल्या प्रकृतीची त्यांनीं विशेष काळजी घेतली नाहीं व औषधोपचाराचीही पर्वा केली नाहीं. त्यांतच त्यांच्या चित्तास अधिक व्यग्र करण्यास कारणीभूत

झालेला ' केसरी–मराठा ' पत्रावरील कोल्हापूरच्या बऱ्याचा प्रसिद्ध खटला सुरू झाला होता. या सर्व कारणांनीं शास्त्रीबोवांचें दुखणें विकोपास जाऊन ता. १७ मार्च १८८२ गुरुवार रोजीं त्यांचा अंत झाला.

विष्णुशास्त्र्यांच्या वाङ्मयिक कामगिरीचें महत्व पूर्णपणें लक्षांत येण्यासाठीं त्यांच्या वेळची राजकीय व सामाजिक परिस्थिति कशी होती हें समजून घेणें आवश्यक आहे. एकाद्या मोठ्या मनुष्याचा ' श्रेष्ठपणा ' वादविवादाचा विषय बनतो, त्या वेळीं एका पक्षांत ज्या प्रमाणांत विभूतिपूजा दिसून येते त्याच प्रमाणांत विरुद्ध बाजू त्या विभूतीच्या वेळची परिस्थिति किंवा ती परिस्थिति उत्पन्न करणारीं कारणें लक्षांत न आणतां, कालौघानें परिणति पावलेल्या स्वस्थितींतील अनुमानावरून त्या श्रेष्ठ पुरुषाचें ' माहात्म्यमंदिर ' धुळीस मिळविण्याचा प्रयत्न करीत असते. शास्त्रीबुवांच्या बाबतींत आतांपर्यंत जी चर्चा झाली आहे ती एक ना दुसऱ्या कोणत्या तरी पक्षांत पडते. मोठा मनुष्य अनुरूप परिस्थिति उत्पन्न करतो अगर परिस्थिति मोठा मनुष्य उत्पन्न करते हा प्रश्न जरी वादाचा असला, तरी एकादी मोठी विभूति जन्मल्यानंतर विद्यमान परिस्थितीचा ओघ आपल्या इष्ट ध्येयाच्या मार्गाकडे ती वळवूं शकते, ही गोष्ट सिद्ध करणारीं उदाहरणें इतिहास देऊं शकेल. हेंच स्थित्यंतर राष्ट्रीय पद्धतीनें होऊन इष्ट मार्गावरून पराङ्मुख झालेल्या समाजाला आपली कांहींतरी चूक झाली खरी, ती सुधरून आपण इष्ट मार्गानें गेलें पाहिजे, अशी सामुदायिक जाणीव उत्पन्न झाली म्हणजे ही जाणीव उत्पन्न होण्याला कारणीभूत झालेल्या व्यक्तींना ' महात्म्य ' प्राप्त होतें. शास्त्रीबोवांच्या ' महात्म्या 'बद्दल चालू असलेल्या वादांत वरील सिद्धांत आपणाला विसरून चालणार नाहीं.

१८१८ सालांत महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यरवीचा अस्त झाला व आपल्या नवीन ' प्रभू ' च्या सत्तेचा उदय झाला. पेशवाईच्या अस्तकालाच्या पूर्वी थोडीं वर्षें राजकीय अव्यवस्था, दुष्काळ इत्यादि कारणांनीं लोकांना जो भयंकर त्रास झाला होता, त्यामुळें जीवाला कंटाळलेल्या लोकांना नवीन ' प्रभू ' च्या राज्यांत शांतता व स्वास्थ्य यांचा लाभ झाला. अर्थातच स्वातंत्र्याची होळी होऊन, पारतंत्र्याच्या जड बेड्या आपल्या पायांत बांधल्या जात आहेत याची अल्पसुद्धां जाणीव समाजाच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर चार पैसे जास्त किंमत येईल या स्वार्थप्रेरीत आशेनें कसाबाकडून मूठभर जास्त दिल्या जाणाऱ्या



रे. नारायण वामन टिळक



पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी


विष्णुशास्त्री चिपळूणकर.


डॉ. पांडुरंग दामोदर गुणे.

घांसदाण्यामुळें धष्टपुष्ट झालेल्या बकऱ्याप्रमाणें मोहांधकारमग्न झालेला समाज उदयोन्मुख 'प्रभूच्या' औदार्याचें व वैभवाचें स्तुतिगान करण्यांत गुंतला होता. इंग्रजांनीं राज्याचीं सूत्रें हातांत आल्यावर लवकरच लोकशिक्षणाच्या कामाला सुरवात केली. जित राष्ट्र आपल्या ताब्यांत पूर्णपणें आणण्याचीं जीं अनेक साधनें विजयी राष्ट्रांकडून योजिलीं जातात, त्यांमध्यें विजयी राष्ट्राची भाषा जित राष्ट्रांवर बळजबरीनें लादणें हें एक प्रमुख साधन आहे. स्वभाषेचा नाश, स्वसंस्कृतिनाशाला कारणीभूत होतो; संस्कृतिनाश स्वधर्माचा नाश करतो; धर्मनाश झाला म्हणजे जित राष्ट्र विजयी राष्ट्राच्या पूर्ण अंकित होतें. इंग्रज लोकांचा शिक्षण देण्याचा हेतू पूर्णपणें स्वार्थमय होता याला भरपूर पुरावा त्यावेळच्या सरकारी कागदपत्रांत दिसून येईल. एकंदरींत इंग्रजशाहीचीं पहिलीं कांहीं वर्षें कर्तव्यविमूढ झालेल्या समाजाला 'आश्चर्यवत् पश्यति' या स्थितींत घालवावीं लागलीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं. नवीन शिक्षण देण्यास सुरवात झाली त्यावेळीं धर्म व नीति यांचें नांवही शिक्षणक्रमांत घेतलें जाणार नाहीं, याबद्दल अत्यंत खबरदारी घेतली गेली होती. वास्तविक शिक्षणाच्या मूलभूत उद्देशांत शीलसंवर्धनाला मोठें महत्वाचें स्थान दिलें जातें व धर्म व नीति हीं तर शीलवृक्षांची बीजें आहेत. अशा शीलसंवर्धनविरहित दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा परिणाम किती अहितकारक झाला याचें वर्णन लो. टिळकांच्या पुढील उद्गारांत दिसून येईल.

लो. टिळक म्हणतात, "इंग्रजी शाळांतून पहिल्यापहिल्यानें जी मंडळी बाहेर पडली त्यांच्या मनाची स्थिति एक प्रकारें फारच भयंकर व शोचनीय झालेली होती. स्वधर्माचें किंवा त्यांतील नीतितत्त्वांचें शिक्षण बिलकुल नाहीं आणि परधर्माचेंही नाहीं; समाजाच्या परंपरागत बंधनाबद्दल आदर असावयाचा तोही नाहींसा झाला, आणि दोनचार बुकें झाल्यावर बऱ्याच मोठ्या पगाराची जागा त्यावेळीं मिळत असल्यामुळें, अधिकारमदाचाही बराच अंमल यांच्या मनावर बसलेला होता. युरोपांतील किंवा विलायतेंतील शाळांतून अशाच तऱ्हेचें शिक्षण मिळतें; पण स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची गोडी वगैरे जे गुण बुद्धीचा चांचल्यदोष घालवितात त्यांच्या साहाय्यानें तें शिक्षण मनुष्यांस बेहोष करीत नाहीं. आमच्याइकडे या सर्व बंधनांचा अभाव असल्यामुळें त्याच शिक्षणापासून स्वल्प ज्ञानानें संतुष्ट, बेपर्वा, स्वहितापलीकडे लक्ष न देणारे आणि स्वतःसच विद्वान् मानून इतर सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे

असे नवे म्होरपे या कारखान्यांतून प्रथमतः तयार झाले, परंतु याहीपेक्षां विशेष दुर्दैवाची गोष्ट म्हटली म्हणजे या लोकांचा सरकारांतून त्यावेळीं जो मान होत असे, तो होय. राज्यकारभाराच्या नवीन पद्धतीस इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची त्यावेळीं जरूर होती. यामुळें या अर्ध्याकच्च्या विद्वानांस मोठ्या नोकऱ्या मिळून, अधिकारामुळें त्यांस समाजांत एक प्रकारचा मोठेपणा प्राप्त झाला. तात्पर्य, अव्वल पेशवाईंत कुलशील, पराक्रम, सदाचरण, संपत्ति वगैरे गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादन केलें होतें त्यांचे वंशज लवकरच भिकेस लागून, त्यांचें स्थान समाजाच्या खालच्या वर्गांतील अर्धवट इंग्रजी शिकलेल्या या मंडळीस प्राप्त झालें.”

अशा रीतीनें धार्मिक व सामाजिक क्रांति होत असतांना आपली संस्कृति, आपला धर्म, आपली भाषा हीं सर्व कुचकामाचीं असून, पाश्चात्य तेवढें चांगलें या मताचा जोराचा प्रसार होत होता. राजकीय क्षेत्रांतहि पाश्चात्य संस्कृतीनें दिपून गेल्यामुळें ईश्वरानें या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे ‘ हे गुरु दूर देशांतून इकडे परमेश्वरानें पाठविले आहेत’ ‘हिंदुलोकांस हा फार मोठा लाभ आहे’ ‘ही इंग्रजसंयोगाची गोष्ट सहजासहजीं घडून आलेली नाहीं, त्यांत कांहीं परमेश्वरी योजना आहे ’ अशातऱ्हेच्या तत्वज्ञानाचा उदय झाला होता. अध्यात्मिक तत्त्वनिष्ठ पौर्वात्य संस्कृति व आधिभौतिक सुखनिष्ठ पाश्चात्य संस्कृति या दोघींच्या भांडणांत अल्पकाल कां होईना पाश्चात्य संस्कृतीचा विजय होत गेला व आपल्या संस्कृतीची जागा पाश्चात्य संस्कृतीनें घेतल्याशिवाय आपला उद्धार होणार नाहीं, अशा तऱ्हेच्या प्रामाणिक समजुतीनें प्रेरीत होऊन, आपापल्या शक्तीप्रमाणें सामाजिक व धार्मिक स्थित्यंतरें पाश्चात्य धर्तीवर घडवून आणण्याच्या प्रयत्नाला त्यावेळच्या सुशिक्षित समाजांतील कांहीं व्यक्ती लागल्या. ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज या संस्था वरील प्रयत्नाचींच उदाहरणें होत.

एकंदरींत सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं एकोणिसाव्या शतकाच्या द्वितीयार्धांत रानडे, भांडारकर, लोकहितवादी, मोडक वगैरे पुढारी अंतःकरणपूर्वक झटत होते. ‘ज्ञानप्रसारक’, ‘विविधज्ञानविस्तार’, ‘दंभहारक’ वगैरे नियतकालिकें व दादोबा पांडुरंग, मंडलिक, माडगांवकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर,

परशुराम तात्या गोडबोले इत्यादि विद्वान् भाषाविषयक कामगिरी आस्थापूर्वक करीत होते.

शास्त्रीबोवांची लेखणी सुरू होण्यापूर्वीच चालू झालेल्या निरनिराळ्या क्षेत्रांतील विधायक सुधारणा विचारांत घेण्याजोग्या आहेत. उपरिनिर्दिष्ट नियतकालिकें व पुढारी आपापल्या कामगिरीमुळें स्तुतीला व आदराला पात्र आहेतच, परंतु ' निबंधमाला ' व वरील नियतकालिकें व शास्त्रीबोवा आणि उपरिनिर्दिष्ट पुढारी यांची तुलना करण्याचा प्रसंग आला म्हणजे 'नक्षत्रताराग्रहसंकुलाऽपि ज्योतिष्मती चंद्रमसैव रात्रिः ।' या श्लोकार्धातील सत्य डोळ्यांपुढें उभें राहातें. शास्त्रीबोवांच्या पूर्वी झालेल्या कामगिरीनें समाजाला द्यावा तितका जोराचा धक्का दिला नाहीं व त्यामुळें समाजजागृतीचें काम लोकांच्या डोळ्यांत भरण्याजोगें झालें नाहीं. शास्त्रीबोवांच्या अंगची ईश्वरदत्त बुद्धिमत्ता, सरस भाषाशैली, विषयप्रतिपादनाची परिणामकारक पद्धत इत्यादि गुणांमुळें ' माले 'चें नांव सर्वतोमुखीं होऊन, ' स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश ' इत्यादिकांच्या अभिमानाची ज्योत समाजाच्या मनांत चेतवली गेली. लढाईत विजय संपादन केल्यानंतर त्याच्या श्रेयाचा व मानाचा सर्व वांटा ज्याप्रमाणें सेनापतीच्या पदरांत पडतो व ज्या सैन्याच्या बळावर, धैर्यावर व शिस्तीवर तो विजय मिळविला जातो त्या सैनिकांना कोणी विचारीत नाहीं, तद्वतच शास्त्रीबोवांच्या लेखनपरिणामाविषयीं म्हणतां येईल.

सामाजिक व धार्मिक सुधारणा या नांवाखालीं पाश्चात्य संस्कृतींचें जें अंधानुकरण चाललेलें होतें, त्याला योग्य वेळीं आळा पडला नसता, तर त्याचे परिणाम आपल्या राष्ट्राला नामशेषत्वाला नेणारे झाले असते. त्या अनुकरणांतील ज्या योग्य गोष्टी होत्या त्या समाजानें आत्मसात् केलेल्या आपणांला आजही दिसतील, परंतु योग्य गोष्टींबरोबर ज्या कित्येक अयोग्य व हानिकारक गोष्टी समाजांत रूढ होऊं पहात होत्या त्या मात्र शास्त्रीबोवांच्या लेखणीनें मुळांतच दाबून टाकल्या असें म्हणावयास हरकत नाहीं. विशेषतः राजकीय क्षेत्रांत विधिघटना या नांवाखालीं जें फोल तत्वज्ञान उदय पावत होतें, त्या तत्वज्ञानावर 'इंग्रजी राज्य हा अनुग्रह नसून आपत्ति आहे ' या मंत्राची योजना करून, त्या तत्वज्ञानाचा फोलकटपणा समाजाच्या नजरेस शास्त्रीबोवांनीं आणून दिला.

वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतां शास्त्रीबोवांच्या भक्तांनीं व चहात्यांनीं रानडे, भांडारकर इत्यादि सद्गृहस्थांच्या कामगिरीकडे कानाडोळा करणें हें जितकें

हटवादीपणाचें होईल, तितकेंच जशास तसें या न्यायानें रानडे, भांडारकर यांच्या भक्तांनीं आपल्या देवतांचा ‘ उदो उदो ’ करून, शास्त्रीबोवांना शेलक्या अपशब्दांनीं शालजोडी पागोट्याचा अहेर करणें हास्यास्पद किंबहुना गर्हणीय होणार आहे.

शास्त्रीबुवांच्या लेखनाला १८६८ सालीं ‘रासेलस’ च्या भाषांतरानें सुरवात झाली. १८७१ नंतर ‘ शाळापत्रकाचें ’ सर्वच काम वडिलांनीं त्यांच्यावर सोपविलें. ‘शाळापत्रक’ १८७२ पासून १८७५ पर्यंत चालून, शेवटीं मिशनरीं-वर जेव्हां योग्य परंतु कडक टीका त्यांत येऊं लागली, तेव्हां शाळाधि-काऱ्यांना ती गोष्ट न आवडून ‘ शाळापत्रक ’ कायमचें बंद करण्यांत आलें. सदरहू ‘ शाळापत्रकां ’ त शास्त्रीबोवांनीं जे निबंध लिहिले आहेत, त्यांतील बरेचसे भाषांतरित व रूपांतरित आहेत. शालोपयोगी विषयांना प्राधान्य दिलें गेलें असल्यामुळें, वाङ्मयदृष्ट्या ते फार महत्वाचे आहेत असें म्हणतां येत नाहीं. त्यांतल्या त्यांत ‘ चंद्र व तारे ’, ‘मनुष्याचें आटोकाट ज्ञान ’, ‘ समुद्र ’ वगैरे लेख सुंदर आहेत. स्वतंत्र लेखांत ‘ प्रवास ’, ‘ शिक्षकाचें काम ’ हे लेख चांगले आहेत.

टीकाकार या नात्यानें शास्त्रीबोवांची कामगिरी यावेळींच सुरू झाली होती. हे टीकालेख नवीन धर्तीवर लिहिले असून, उच्च दर्जाचे आहेत. त्यांतील संस्कृत कवींवरील पांच निबंध ‘ संस्कृत कविपंचक ’ या नांवाखालीं छापले गेले आहेत. याच पुस्तकाला प्रस्तावनेदाखल म्हणून शास्त्रीबोवांनीं ‘ कविता ’ या विषयाची चार निबंधांत चर्चा केली आहे. त्यांत कवितेच्या व्याख्येपासून सुरवात करून, पेशवाईंतील प्रसिद्ध व्यक्तींवर रचलेले पोवाडे व लावण्या मराठींतील आद्य कविता समजल्या पाहिजेत, असा त्यांनीं आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. याचें कारण ते म्हणतात कीं, “ वामनपंडित, मोरोपंत वगैरे कवींनीं जरी मराठी भाषेंत कविता लिहिली, तरी ती संस्कृत भाषेच्याच केवळ धाटणीवर असल्या-मुळें तीस मराठी कविता म्हणण्यापेक्षां संस्कृत कवितेचें रूपांतर म्हणणें हें वाजवी आहे. ” यापुढील लेखांत त्यांनीं इंग्रजी कवितेचा इतिहास दिला आहे.

‘ संस्कृत कविपंचक ’ म्हणजे कालिदास, भवभूति, बाणभट्ट, सुबंधु आणि दंडी यांवरील निबंध होत. संशोधनाचें कार्य महाराष्ट्रांत डॉक्टर भाऊ दाजी, भांडारकर

इत्यादिकांनीं ह्यापूर्वींच सुरू केलें होतें. परंतु तें सर्व इंग्रजींत प्रसिद्ध केलें जात असे. शास्त्रीबोवांच्या अंगीं संशोधनाला आवश्यक असणारी शोधक व चिकित्सक बुद्धी होती, परंतु त्यांचें त्या कार्याकडे विशेष लक्ष नसल्यामुळें या पांचही निबंधांत त्या त्या कवींच्या बाबतींत तत्कालीन उपलब्ध असलेली माहितीच देऊन, नंतर कवींच्या काव्यग्रंथांचें परीक्षण रहस्योद्ग्राही पद्धतीनें केलेलें आहे. कवींचे गुणावगुण दाखविण्यासाठीं उताऱ्यांची निवड अत्यंत मार्मिकपणानें केलेली असून, ते उतारे शास्त्रीबोवांच्या रसिकतेची साक्ष देतात. हे निबंध लिहितांना शास्त्रीबोवांनीं ठिकठिकाणीं पाश्चात्य संस्कृतज्ञ पंडितांच्या मतांचा पुरस्कार केला आहे; परंतु 'वासवदत्ता' प्रसिद्ध करतांना डॉक्टर हॉलनें 'सुबंधू' विषयीं कांहीं ठिकाणीं काढलेले अनादरप्रेरित उद्गार मात्र त्यांना सहन करतां आले नाहींत. डॉक्टर हॉलचीं मतें सप्रमाण खोडून टाकण्याचा त्यांनीं या लेखांत प्रयत्न केला आहे. एकंदरींत वरील पुस्तक वाचून संस्कृत कवींची व कवितेच्या सौंदर्याची ओळख वाचकांस चांगल्या तऱ्हेनें होईल यांत संशय नाहीं. निबंधांची भाषा प्रौढ, सुबोध व मार्मिक असल्यामुळें आणि मनोरंजनपर माहिती भरपूर दिल्यामुळें, ते निबंध सर्वांना त्यावेळीं आवडले व आतांहि आवडतील असें म्हणावयास हरकत नाहीं.

सन १८७३ च्या अखेरीस नाताळच्या सुटींत विष्णुशास्त्री आपल्या मित्र-मंडळीसह मौजेनें आळंदीस गेले होते. परत येतांना त्यांच्या एका मित्रानें "तुम्ही एकादें 'मासिकपुस्तक' कां काढीत नाहीं ? त्यांत नवीन निबंध घालावे व कधीं तुम्ही 'शाळापत्रकांत' संस्कृतकवींविषयीं जे निबंध यापूर्वी छापिले आहेत त्यांतीलच कांहीं घालावेत," असें सुचविलें. ही कल्पना शास्त्रीबोवांना पसंत पडून, त्यांनीं 'निबंधमाला' नामक मासिक पुस्तकाची जाहिरात ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध केली. लवकरच निबंधमालेचा पहिला अंक बाहेर पडला. 'माला' चालविण्याचे बाबतींत अगर त्यांतील मजकुराबद्दल त्यांनीं दुसऱ्या कोणाचीच मदत घेतली नव्हती. 'माले'संबंधीं सर्व उद्योग ते स्वतः करीत. सन १८७४ पासून १८८१ पर्यंत मालेचे ८४ अंक निघाले. 'मालें'तील लेखन हेंच महाराष्ट्र वाङ्मयांतील शास्त्रीबोवांच्या हातून झालेलें शाश्वत स्वरूपाचें महत्त्वाचें कार्य होय. या मालेनें इंग्रजी भाषेप्रमाणेंच उत्तम ग्रंथ निपजविण्याची मराठीभाषेचीहि पात्रता आहे हें सिद्ध केलें.

इतकेंच नव्हे तर तिनें महाराष्ट्राच्या विचारांना व भावनांना धार्मिक, सामाजिक व विशेषतः राजकीय बाबतींत निराळेंच वळण लावलें. १८७४ पूर्वींचा महाराष्ट्र व नंतरचा महाराष्ट्र यांत जमीन–अस्मानाचें अंतर दिसून येऊं लागलें. 'स्व'त्वापासून विन्मुख झालेल्या महाराष्ट्राला जोराचा धक्का देऊन, आत्मनाशापासून त्याला परावृत्त करण्याचें श्रेय बऱ्याच अंशीं 'निबंधमाले'लाच दिलें पाहिजे.

'मालेंतील मुख्य विषयांचे वाङ्मयदृष्ट्या पुढीलप्रमाणें विभाग पाडतां येतील.

( १ ) भाषाविषयकः—मराठी भाषेची सांप्रतची स्थिति, भाषादूषण, लेखन-शुद्धि, भाषापद्धति, भाषांतर, व इंग्रजी भाषा.

( २ ) वाङ्मयविषयक व चर्चात्मकः—इतिहास, वाचन, वक्तृत्व, विद्वत्व आणि कवित्व, ग्रंथावर टीका, डॉ. जान्सन, मोरोपंताची कविता.

( ३ ) परमतखंडनात्मकः—लोकहितवादी.

( ४ ) सामाजिकः—संपत्तीचा उपभोग, लोकभ्रम.

( ५ ) राजकीयः—आमच्या देशाची स्थिति.

( ६ ) मानसशास्त्रीयः—गर्व.

( १ ) **'भाषाविषयक'**:—भाषाशोधन हा 'निबंधमाले'च्या उद्देशांपैकीं एक मुख्य उद्देश असल्यामुळें, या भागांत येणाऱ्या बहुतेक निबंधांत भाषाशोधन हें ध्येय शास्त्रीबोवांनीं दृष्टीसमोर ठेविलें आहे असें दिसून येईल. " आम्हांस कित्येकांच्या तोंडून ऐकिलेलें आठवतें कीं, मनांतील अभिप्राय खुबीदार रीतीनें स्पष्ट करण्यास मराठी अगदीं, अप्रयोजक, तींत कांहीं जीव नाहीं. कित्येक शिक्षक इंग्रेजींतील अर्थ मराठींत समजून देतांना निरुपाय होऊन हात टेकतात; त्यांतून जे कोणी अमळ चणचणीत असतात ते तर साफ सांगून जातात कीं, 'छे! मराठी भाषेंत यांचें भाषांतरच होऊं शकत नाहीं. आपली भाषा फार भिकार आहे.....प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठीण असें वाटून, विलायती शिक्षयाचे नवीन शब्द त्यांस पदोपदीं आपल्या भाषणांत आणावे लागतात." वरील उताऱ्यावरून इंग्रजी भाषेचा अभ्यास

केलेल्या लोकांच्या तोंडून मराठीबद्दल अवहेलनात्मक शब्द तत्कालीं कसे बाहेर पडत होते हें उत्तम दिसून येईल. मराठीवरील हे आरोप कसे निराधार आहेत, संत-वाङ्मयानें पुनीत झालेली मराठी भाषा जगांतील इतर थोर भाषांच्या बरोबरीची कशी आहे, या गोष्टी शास्त्रीबोवांनीं सप्रमाण सिद्ध केल्या व आपल्या लेखनानें या सिद्धीला दुजोरा दिला. तत्कालीन व तत्पूर्वी सुरू झालेल्या नियतकालिकांची भाषा कशी विकृत झालेली आहे, हें त्यांनीं चांगल्या रीतीनें वाचकांपुढें मांडलेलें आहे.

भाषादूषणः—यामध्यें इंग्रजीचा मराठीशीं झालेला संकर, भाषादूषणाचे तीन प्रकार, पारिभाषिक शब्दांसाठीं संस्कृताचें सहाय्य वगैरे मुद्यांचें विस्तृत विवेचन करून, भाषादूषणाचीं उदाहरणेंहि दिलीं आहेत. तीं वाचून तत्कालीन मराठीनें धारण केलेला घेडगुजरी पेहेराव पाहून, वाचकास हसूं आल्यावांचून रहाणार नाहीं.

लेखनशुद्धिः—लेखनशुद्धीसाठीं व्याकरणाचा अप्रतिहत अंमल जिवंत भाषेवर चालविणें अशक्य आहे. भाषेला जीं बंधनें घालावयाचीं तीं फार जपून घातलीं पाहिजेत, तरच भाषेचें हित होईल. संस्कृत, बालभाषा, फार्शी, आरबी इत्यादि भाषा मराठीच्या उगमस्थानीं असल्यामुळें याच भाषांच्या सहाय्यानें मराठींतील वर्णशुद्धि, शब्दशुद्धि व वाक्यशुद्धि झाली पाहिजे, या मुद्यांचा शास्त्रीबोवांनीं प्रस्तुत निबंधांत सुंदर ऊहापोह केला आहे.

भाषापद्धतिः—भाषा बोलण्यांत व लिहिण्यांत जी शब्दयोजना होते तिचा प्रकार कसा असावा ह्याचा विचार या निबंधांत आला आहे. इंग्रजी भाषेचा मराठीवर कसा परिणाम झाला आहे हें सांगून शुद्धता, साधेपणा, सुबोधत्व ह्या उत्तम भाषापद्धतीच्या आवश्यक गुणांचें विवेचन करण्यांत आलें आहे. उत्कृष्ट ग्रंथांत दिसून येणाऱ्या अवतरण, म्हणी, न्याय, अलंकार इत्यादि गोष्टी भाषापद्धतीचीं उपांगें आहेत. भाषापद्धति मनुष्याच्या मनोवृत्तींचा व हृदयवृत्तींचा उद्गार असल्यामुळें तींत भिन्नता येणें साहजिक आहे. असें असलें तरी लोकोपयोगी ग्रंथांत भाषापद्धति सरळ, मनोरंजक, झोंकदार असली पाहिजे या मुद्याचें स्पष्टीकरण करून, तत्पुष्टयर्थ निरनिराळे उतारेहि दिलेले आहेत. नंतर इंग्रजी भाषेच्या अनुकरणानें मराठींत सुरू झालेल्या काव्य, नाटक, कादंबरी सृष्टिवर्णन इत्यादि प्रकारांबद्दल लिहून हा निबंध संपविला आहे.

भाषांतरः—शास्त्रीबोवा म्हणतात, भाषांतराचा प्रकार प्राचीन मराठींतील संतवाङ्मयांत सुद्धां दिसून येतो. इंग्रजशाही सुरू झाल्यानंतर तर इंग्रजी व संस्कृत ग्रंथांच्या भाषांतरांनींच मराठीची अभिवृद्धि झालेली आहे. उत्कृष्ट भाषांतर होण्यास तें करणाराच्या अंगीं दोन्ही भाषांचें पूर्ण ज्ञान अत्यंत आवश्यक असून, शिवाय त्याच्या अंगीं समंजसता, चातुर्य व अनुभवहि पाहिजे. शेवटची गोष्ट म्हणजे ज्याचें भाषांतर करावयाचें त्याचें भाषांतर होण्याजोगें पाहिजे. वरील मुद्यांचें विवेचन संपवून, भाषांतराच्या निरनिराळ्या प्रकारांविषयीं माहिती देण्यांत आली आहे.

वरील सर्व लेख त्या वेळीं होत असलेली मराठीची उपेक्षा होऊं नये, तर तिची दिवसें दिवस चांगल्या रीतीनें अभिवृद्धि व्हावी ह्याच उद्देशानें लिहिले आहेत असें आपणांस दिसून येईल. भाषाविषय हा शास्त्रीबोवांचा अत्यंत आवडता विषय असून त्या विषयाचें त्यांचें वाचनहि दांडगें होतें. म्हणूनच या विषयावरील निबंध त्यांनीं अत्यंत कल्पक बुद्धीनें व मार्मिकपणानें लिहिले आहेत.

इंग्रजी भाषाः—इंग्रजी भाषा हा निबंध लिहितांना इंग्रजी भाषा उत्तरोत्तर कशी उत्कर्ष पावत गेली, तींत ग्रंथसंग्रह कोणत्या प्रकारचा आहे व तो कसकसा वाढत गेला आहे, या गोष्टींचें ज्ञान देशभाषा सुधारण्याला उपयोगी पडेल हा उद्देश शास्त्रीबोवांच्या मनांत होता. प्रस्तुत निबंधांत इंग्रजी भाषेची उत्पत्ति, त्या भाषेंतील ग्रंथांची प्रवृत्ति, गद्याचे प्रकार इत्यादि विषय एकत्र आणले असून, इतिहास ह्या त्यांच्या आवडत्या विषयावर त्यांनीं फारच भर दिला आहे. तो इतका कीं, प्रस्तुत निबंधाला इंग्रजी भाषा हें नांव मुळीं शोभतच नाहीं. इंग्रजी भाषेवर मराठींत यापूर्वी निबंध लिहिला गेला नसल्यामुळें प्रस्तुत निबंधाला थोडेंसें महत्व देतां येईल, इतकेंच.

**(२) वाङ्मयविषयक व चर्चात्मकः**—मालेंत विस्तृत व विद्वत्तापूर्ण असे जे निबंध आले आहेत, त्यांपैकीं ‘ इतिहास ’ हा एक होय. यांतील विवेचन शास्त्रीय पद्धतीचें नसून मॉरिस, मिल, मेकॉले इत्यादि पाश्चात्य ग्रंथकारांच्या अंगीं हिंदुस्थानच्या इतिहासाचें किती अज्ञान वसत होतें व ह्या पाश्चात्य ग्रंथ-कारांचा ‘ उदो उदो ’ करणाऱ्या त्यावेळच्या नवीन विद्वान लोकांच्या लेखांपासून महाराष्ट्रावर कसे अनिष्ट परिणाम होत होते, याचा ऊहापोह यांत केलेला आहे.

इतिहास हा विषय शास्त्रीबुवांच्या अत्यंत आवडीचा असल्यामुळें, त्यावरील इंग्रजींतील उत्तमोत्तम ग्रंथ त्यांनीं वाचलेले होते. या वाचनाचें प्रतिबिंब प्रस्तुत निबंधांत पडलेलें दिसल्यास आश्चर्य नाहीं. ह्या निबंधांत, योग्य संधि मिळाल्यामुळें शास्त्रीबोवांनीं मिशनरी मंडळी व नवीन विद्वान यांच्या उपहासाला तीक्ष्ण व कडक भाषेंत सुरवात केलेली दिसून येते. ग्रँट डफच्या इतिहासावर नीळकंठराव कीर्तन्यांची टीका यापूर्वीच झालेली होती व त्यामुळें इतिहाससंशोधनाला महत्व आलें होतें. याच संधीस शास्त्रीबोवांचा प्रस्तुत निबंध बाहेर पडला व त्यामुळें संशोधनकार्याला अधिकच स्फूर्ति मिळाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या देशांतील प्राचीन कालच्या इतिहासाच्या अभावाची कारणमीमांसा करून, ग्रीस देशांतील इतिहासाची गोष्ट दिलेली आहे. नंतर जिज्ञासातृप्ति, नीतिबोध, मनोरंजन, मानसिक प्रसन्नतेचा व उन्नतींचा लाभ इत्यादि इतिहासाच्या फायद्यांचें विवरण करून, यापुढील अंकांत पाश्चात्य ग्रंथकारांचा, नवीन विद्वानांचा व मिशनरींचा समाचार घेतलेला आहे. शेवटीं आपली जुनी ऐतिहासिक माहिती मिळेल त्या ठिकाणीं गोळा करावी अशी कळकळीची विनंति करून शास्त्रीबोवांनीं हा लेख संपविला आहे.

वाचनः—या चटकदार निबंधांत ग्रंथवाचनाचा नाद किती हितावह आहे, त्यापासून ज्ञानप्राप्ति व मनोरंजन हीं कशीं होतात, मराठींत त्यावेळीं ग्रंथसंग्रह कोणत्या योग्यतेचा होता व लोकांत वाचनाचा प्रघात कसा होता या सर्व मुद्यांचें विवेचन आलें आहे. शेंकडों जाडे, मोठमोठाले ग्रंथ घोकून टाकले, परंतु जर त्यांचें विवेचन करण्यास वाचणारानें आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला नाहीं, तर भारवाही उंटाप्रमाणें त्याची स्थिति होते असा समारोप केला आहे.

वक्तृत्वः—वक्तृत्वकलेचा लोकसत्तात्मक राज्यांशीं निकटचा संबंध असल्यामुळें ग्रीस, रोम, इंग्लंड वगैरे देशांत ती कशी प्रगल्भ दशेस पोचली याचें वर्णन देऊन, त्या त्या देशांतील प्रसिद्ध वक्त्यांची माहितीहि दिली आहे. नंतर आपल्या देशाकडे वळून पुराणें, धार्मिक व शास्त्रीय ग्रंथ यांत दिसून येणाऱ्या या कलेच्या स्वरूपाचें दिग्दर्शन केलें आहे. आपल्या देशांत धर्मविषयक व्याख्यानाचें स्वरूप जें 'कीर्तन' त्याबद्दल बराच उहापोह केलेला आहे. प्रसिद्ध कीर्तनकारांची माहिती देऊन, शास्त्रीबोवांची लेखणी वक्तृत्वाच्या विद्यमान स्थितीकडे वळते. वक्तृत्वोत्तेजक सभांच्या युक्तायुक्ततेची चर्चा केल्यावर वक्तृत्व हा गुण संपादणाऱ्यानें उत्तम भाषा, विद्वत्व व बहुश्रुतपणा हीं साधनें कशीं अवश्य

संपादिलीं पाहिजेत, याची शास्त्रीबोवांनीं चर्चा केली आहे. प्रसिद्ध वक्त्यांची माहिती देतांना शास्त्रीबोवांनीं आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांच्या-वर बरीच कडक टीका केली आहे. शेवटीं मनाचा शुद्धपणा, विद्वत्व, सहृदयत्व, व तार्किकता इत्यादि गुण वक्त्याला अत्यंत आवश्यक आहेत असें सांगून हा लेख संपतो. या लेखांतील टीका कांहीं ठिकाणीं मनाला लागणारी व सहन न होणारी असून, अप्रयोजकहि आहे हें कबूल केलें पाहिजे. या टीकेबद्दल चर्चा पुढें येणारच आहे, परंतु एकंदर वर्णनांतील भाषा चटकदार असल्यामुळें वाच-कास वाचतांना एक प्रकारची मजा वाटते. हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर शास्त्री-बोवांवर चारी बाजूंनीं टीका झाली व त्या सर्व टीकेला शास्त्रीबोवांनीं यथाशक्ति उत्तरेंही दिलीं आहेत.

विद्वत्व व कवित्वः—हा निबंध या भागांतील निबंधांत भाषादृष्ट्या सरस आहे. यांत कवित्वाच्या जुन्या कल्पनांचा निरास करून ‘ जें वाचल्यानें किंवा ऐकल्यानें मनाच्या वृत्ती प्रसन्न होऊन तो तो रस अंतःकरणांत सहज बिंबून जातो त्यास काव्य म्हणावें,’ असें काव्याचें लक्षण करण्यांत आलें आहे.

कविता म्हणजे काय याचा विचार संपवून, शास्त्रीबोवा विद्वत्तेच्या जोरावर रचलेल्या काव्याकडे वळले व “ कवित्वास विद्वत्तेची अगदीं गरज नाहीं. निर-निराळ्या शास्त्रांत पुरतेपणीं गति होणें हें कवित्वास अनुकूल होणार नाहीं हें तर काय पण अगदीं साक्षात् प्रतिकूलच बहुधा होणार आहे” असा आपला सिद्धांत त्यांनीं वाचकांपुढें मांडला आहे. त्यांच्या मतें कवीचें मन व तत्वज्ञान्याचें मन यांमध्यें स्वभावतःच परस्परविरोध असतो. पहिल्याचा विषय कल्पना व दुस-ऱ्याचा विषय सत्यासत्यविवेचन. या मुद्यानंतर कवीच्या अंगचा मुख्य गुण सहृदयता हा होय; बाह्यसृष्टीचें स्वरूप नेहमीं कवीच्या दृष्टीसमोर पाहिजे, त्याच-प्रमाणें कवीच्या मनोवृत्ती स्वानुभूत पाहिजेत, इत्यादि कवीला उपयुक्त अशा गुणांचें विवेचन करून, काव्यांतील पदलालित्य, मृदुत्व, माधुर्य, व्याकरणशुद्धता इत्यादि गौण गुणांकडे सुद्धां कवीनें लक्ष दिलें पाहिजे असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे.

ह्या लेखांतील ‘ कवित्वास विद्वत्तेची अगदीं गरज नाहीं ’ हा शास्त्रीबोवांचा सिद्धांत एकपक्षीय दिसतो. तर्कशास्त्राच्या दृष्टीनें प्रस्तुत सिद्धांत अन्वयव्यति-रेकाच्या कसोटीला उतरत नाहीं. विद्वान् मनुष्य कवि होणार नाहीं, याच्या उलट जितकीं उदाहरणें दाखवितां येतील तितकींच, अनेक चांगले चांगले कवि विद्वान्

होते अशीं उदाहरणें आपणांस दिसतील. याच निबंधांतील, "सर्वांपेक्षां अधिक सदोष कविता पाहणें असल्यास आमची मराठी होय. हाही शास्त्रीबोवांचा सिद्धांत वरील सिद्धांताप्रमाणें सापवादच आहे असें म्हणतां येईल. शास्त्रीबोवांच्या एकंदर काव्यविषयक कल्पना प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार मेकॉले याच्या चुकीच्या कल्पनांवरून बनविलेल्या असल्यामुळें त्या साहजिकच अप्रयोजक व खंडनीय झाल्या असल्यास आश्चर्य नाहीं. या निबंधांतील एकंदर चर्चा मात्र फार मार्मिक, व्यापक व मनोरंजक झाली आहे.

ग्रंथांवरील टीका:—'संस्कृतकविपंचक' हे टीकात्मक निबंध लिहून, टीकाकार म्हणून शास्त्रीबोवांचें नांव आधींच गाजलें होतें. अर्थातच टीका कशी करावी हें सांगण्याचा त्यांना अधिकार आला होता. भाषेंत ग्रंथांची संख्या वाढत चालली म्हणजे त्या वाढीला हितावह अशी गुणदोषविवेचकांची संख्याही वाढत जाणें इष्ट आहे. गुणदोषविवेचनामुळें चांगले ग्रंथ पुढें येतात व ग्रंथाचें यथार्थ परीक्षण झाल्यानें देशभाषा सुधारते. इंग्रजी भाषेंत अशा तऱ्हेची टीका बहुतेक नियतकालिकांत आढळून येते. टीका करणाराचे अंगीं मूळ ग्रंथाचें पूर्ण ज्ञान, सत्यप्रीति, शांत स्वभाव, सहृदयता हे गुण आवश्यॆकरून पाहिजेत. वरील गुण टीकाकारांच्या अंगीं नसल्यामुळें एकंदर लोकांची स्तुतीपेक्षां निंदेकडे फारच विशेष प्रवृत्ति असते. याचें कारण अहंकारादि दुष्ट मनोवृत्तीहि असतात. एकंदरींत असला प्रकार दूषणार्हच आहे. टीकाकार म्हटला म्हणजे तो गर्विष्ठ व दुष्ट मनुष्य असावा अशी एक खुळी समजूत लोकांची झालेली असते. ही समजूत कांहीं बाबतींत चुकीची असते. कारण सत्यनिष्ठेपासूनही ग्रंथांचें दोषविवेचन होणें संभवतें. आपणाहून जे थोर आहेत त्यांचे दोष आपण काढूं नयेत या समजुतींत तर कांहीं अर्थच नाहीं. कारण खरोखर जे आपल्याठायीं दोष आहेत ते दाखवल्यास सूज्ञ मनुष्यास कधींही राग येणार नाहीं. अमुक ग्रंथ वाचण्यासारखा आहे आणि अमुक नाहीं हें वाचकास टीकाकारांमुळें कळतें व चांगले ग्रंथ निवडले जाऊन, त्यांना उत्तेजन मिळाल्यामुळें भाषेची उत्तरोत्तर सुधारणा होते व ती अभियुक्त भाषांच्या वर्गांत मोडण्यास पात्र होते, हा प्रस्तुत निबंधाचा थोडक्यांत सारांश आहे.

या निबंधांत लिहिल्याप्रमाणें शास्त्रीबोवांनीं मालेंत पुष्कळ ग्रंथांचीं परीक्षणें केलेलीं आहेत. त्यांच्या टीकेंत निर्भीडपणा जितका दिसून येतो, तेवढाच गुण-

ग्राहकत्वाचाहि गुण आढळतो. शास्त्रीबोवा आपल्या टीकेंत नुसते दोषच दाखवून राहत नसत, तर ग्रंथकारांना मार्गदर्शक अशा मार्मिक सूचनाहि करीत असत. एकंदरींत हा विद्वत्तापूर्ण व उद्बोधक निबंध प्रत्येक टीकाकारानें वाचण्याजोगा झाला आहे.

डॉ. जॉनसनः—या विषयावर मालेचे एकंदर आठ अंक झाले असून, त्यांत प्रथम जॉनसननें आपलें दरिद्रपूर्ण व कष्टमय आयुष्य लोकमान्य ग्रंथ लिहिण्यांत कसें घालविलें; इंग्लिश भाषेची तत्कालीन भिकार स्थिति आपल्या कोशानें व ग्रंथांनीं कशी सुधारली याचें उत्तम वर्णन केलेलें आहे. नंतर जॉनसनचे आचार-विचार, विक्षिप्त संवयी, गुणावगुण यांची माहिती देऊन, शेवटीं आपणांला भाषाविषयक, धर्मविषयक, राज्यविषयक बाबतींत जॉनसनच्या चरित्रापासून काय बोध घेतां येईल हें निर्दिष्ट केलें आहे.

या निबंधांत नेहमींच्या टीकात्मक विषयांचा संबंध फारसा न आल्यामुळें शास्त्रीबोवांची लेखणी संथ चालली असून, भाषाहि इतर निबंधांप्रमाणें साधी व मार्मिक आहे. हातीं घेतलेल्या विषयाचा सर्वबाजूंनीं विचार कसा करावा व विशेषतः चरित्र कसें लिहावें याचें उत्तम उदाहरण शास्त्रीबोवांनीं या निबंधाच्या रूपानें आपल्या पुढें ठेवलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

मोरोपंतांची कविताः—१८७८ सालांत मुद्रणनियंत्रणाचा कायदा झाल्या-मुळें इतर विषय बाजूला ठेऊन, शास्त्रीबोवांनीं मुद्दाम हा विषय हातीं घेतला. प्रस्तुत निबंधांत आमचे नवीन विद्वान लोक, त्यांनीं उपस्थित केलेले सुधारणेचे मार्ग, वीररसप्रधान काव्य, व ख्रिस्ती धर्म यांचा संबंध थोडाफार येणार आहे अशी सूचना शास्त्रीबोवांनीं आधींच देऊन ठेविली आहे. प्रथम जुने पंडित व नवीन विद्वान् यांनीं मोरोपंतांविषयीं करून घेतलेल्या आपल्या प्रतिकूल समजुती, त्याचप्रमाणें पंतभक्त हरिदासांनीं पंतांच्या ठिकाणीं नसलेले गुण त्यांच्यावर लादण्याच्या बाबतींत केलेले वेडगळ प्रयत्न, या मुद्यांचें निरूपण केलें आहे. पहिल्या पक्षांत विविधज्ञानविस्तारकर्ते, रानडे, डॉ. विलसन व कृष्णशास्त्री यांचा समावेश प्रामुख्यानें करण्यांत आला आहे. शास्त्रीबोवांचा मुख्य आरोप हा कीं, हे लोक कोणत्याही प्राच्य विषयांचा पूर्ण अभ्यास न करतां कांहीं तरी मतें झोंकून देतात व त्यामुळें त्यांच्या विद्वत्तेवर विश्वास ठेवणारे लोक फसतात. दुसरी गोष्ट अशी कीं, हे ‘ नवीन विद्वान् ’ मराठी ग्रंथांविषयीं अनास्था व तिर-

स्कार दाखवितात. जुन्या पंडितांच्या बाबतींतही हीच गोष्ट दिसून येते. नवीन विद्वानांचें सर्वस्व म्हणजे इंग्रजी भाषा, तर जुन्या पंडितांचें सर्वस्व संस्कृत. प्राकृत भाषा दोघांनाहि सारख्याच अपवित्र, अतएव त्याज्य.

पहिल्यांदा पंतांची कविता भाषांतरमय आहे हा विरुद्ध पक्षानें घेतलेला आक्षेप आपलीं प्रमाणें देऊन, शास्त्रीबोवांनीं समाधानकारक रीतीनें खोडून काढिला आहे. पंतांच्या कवितेंतील अपरिचित शब्द, यमकप्रासादि शब्दालंकारांचें बाहुल्य इत्यादींवर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना उत्तरें देऊन शास्त्रीबोवा, रा. रानड्यांनीं केकादर्शावर आपला अभिप्राय प्रगट करतांना सर्व महाराष्ट्र कवितेवर सर्वसाधारणरीत्या कृत्रिमत्वाचा व अर्थबाहुल्याचा जो छाप मारला आहे त्या आक्षेपाच्या निरसनाकडे वळले आहेत. प्रस्तुत आक्षेपाचें खंडन करतां करतां रा. रानड्यांनीं प्रार्थनासमाजामार्फत जो नवीन धर्मपंथ सुरू केला होता, त्यांतील उणीवांकडे व द्वैताद्वैत वादाकडे शास्त्रीबोवांची लेखणी फिरणें साहजिकच होतें. यापुढें सर्वज्ञतेच्या घमेंडींत वाटेल ते अभिप्राय ठोकून देण्याची तयारी असणारे डॉ. विल्सन यांनीं मोल्स्वर्थकृत कोशांच्या आरंभीं मराठी भाषेवर व तींतील ग्रंथांवर जो निबंध लिहिला आहे व त्यांत मराठीवर जे अज्ञतेमुळें कोरडे ओढले आहेत त्या कोरड्यांना प्रतिकोरडे अत्यंत कडक भाषेनें ओढून, शास्त्रीबोवांनीं विल्सनसाहेबांना चितच केलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

पुढच्या अंकांत पंतांचे भक्त पंतांना अगदीं मोठ्या पदावर चढवितात ही गोष्ट किती अयथार्थ आहे याचें स्पष्टीकरण केलें आहे. मोरोपंत कवि आहे कीं नाहीं हा वाद ड्रायडन, पोप इत्यादि पाश्चात्य कवींसंबंधीं तिकडे निघालेल्या वादविवादांवरून नवीन विद्वानांनीं महाराष्ट्रांत कसा आणला याची माहिती देऊन 'मोरोपंत कवि नाहीं' हें सिद्ध करणारीं विविधज्ञानविस्ताराचीं उदाहरणें खोडून काढण्यांत आलीं आहेत. मोरोपंतावर कृष्णशास्त्र्यांनीं आणलेल्या आक्षेपांना उत्तरें देऊन मोरोपंत कवि होता हें शास्त्रीबोवांनीं सोदाहरण सिद्ध केलें आहे. शेवटीं पंतांच्या काव्यांतील गुणदोष, पंतांचे कवित्व-विशेष इत्यादि विषयांचें विवेचन करून हा लेख संपविला आहे.

या निबंधांतील मुद्यांबद्दल जितका वाद माजला तितका इतर कोणत्याही निबंधासंबंधीं माजला नसेल. निबंध लिहिला जात असतांनाच वामन दाजी ओक व केशवराव कानेटकर इत्यादिकांनीं शास्त्रीबोवांचे मुद्दे व एकंदरींत विवेचन

कसें चुकीचें आहे, त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांनीं दिलेली माहिती किती अर्धवट आहे, यांचें स्पष्टीकरण करणारीं पत्रें 'माले'कडे पाठविलीं होतीं. हीं पत्रें व त्यांना शास्त्रीबोवांनीं दिलेलीं उत्तरें खुद्द 'मालें'तच छापलेलीं आहेत. या वादांत रा. ओकांना आपले मुद्दे सिद्ध करणारीं प्रत्यक्ष प्रमाणें देतां आलीं नाहींत म्हणून शास्त्रीबोवांनीं आपल्या शब्दपांडित्यानें त्यांना घटकाभर गप्प बसविलें आहे असें दिसून येईल. अलिकडे मोरोपंती वाङ्मयाचें पूर्ण संशोधन करून रा. पांगारकर यांनीं लिहिलेल्या आपल्या 'मोरोपंत चरित्र व काव्यविवेचन' या ग्रंथांत शास्त्रीबोवांचे बहुतेक मुद्दे सप्रमाण खोडून काढलेले वाचकांस आढळून येतील. शास्त्रीबोवांचे चरित्रकार बंधु या निबंधाबद्दल म्हणतात "हा निबंध एकंदरींत चांगला साधला आहे यांत संशय नाहीं. यांतील प्रतिपादन उत्कृष्ट तऱ्हेचें, मुद्देसूद व चांगले मजबूत आधार देऊन केलें आहे." परंतु इतर बहुतेक टीकाकारांच्या मतें प्रस्तुत निबंधांत शास्त्रीबोवांनीं केवळ नवनीतांतील मोरोपंती वेंच्यांच्या आधारावर ही टोलेजंग इमारत उभारली असल्यामुळें तिचा पाया अत्यंत अरुंद व कच्चा झाला आहे. त्यांतील टीका 'उथळ, व मतें अपरिपक्व आहेत, माहिती अपूर्ण तर विवेचन अविश्वसनीय आहे.'

समतोल मनानें विचार केला असतां समंजस वाचकांचें मत या दुसऱ्या अभिप्रायाकडेच अधिक झुकेल यांत संशय नाहीं. शास्त्रीबोवांनीं मोरोपंतांची योग्यता समाजाच्या नजरेस आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला हें खरें, परंतु त्याचबरोबर पंतांच्या विद्वत्तेबद्दल दिलेलें मत व इतर टीकात्मक मुद्यांचें केलेलें विवेचन वाचकांस पटण्याजोगें आहे असें म्हणवत नाहीं. रा. ओक व कानेटकर यांच्या आक्षेपांना उत्तरें देतांना शास्त्रीबोवांनीं जी शब्दांची ओढाताण केली आहे व मुख्य मुद्दा मुद्दाम दृष्टीआड करून, केवळ शब्दपांडित्याचें जें अवडंबर वाचकांपुढें उभें केलें आहे, तें पाहून आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं.

( ३ ) **'परमतखंडनात्मक':**—लोकहितवादी—निबंधमालेच्या वेळची व तत्पूर्वीची महाराष्ट्राची स्थिति कशी होती याचें दिग्दर्शन यापूर्वीच केलेलें आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या पहिल्याच झगझगाटानें डोळे दिपून जाऊन, समाजांतील नेते म्हणविणारे लोकहि 'स्व'त्वाला कसे विसरले होते, हें सर्व आपण पाहिलें आहे. त्यावेळच्या सुशिक्षित वर्गाचे प्रतिनिधि म्हणून 'लोकहितवादींना' घेतां येईल. लोकहितवादींच्या चरित्राकडे पाहिलें असतां आपणांस दिसून येईल कीं,

त्यांचें वर्तन आदर्शभूत असून त्यांची परोपकारबुद्धि, प्रेमळ वागणूक, नियमितपणा, अविश्रांत परिश्रम करण्याची हौस वगैरे गुण वाखाणण्याजोगे आहेत. अहमदाबादेस असतांना त्यांनीं अनेक लोकोपयोगी संस्था स्थापल्या व कित्येक चळवळी सुरू केल्या, म्हणूनच महाराष्ट्रापेक्षां गुजराथेंतच त्यांची प्रसिद्धी फार आहे.

आपला समाज सुधारावा, पाश्चात्यांबरोबर वागण्यास आपण लायक आहोंत हें सिद्ध करण्यासाठीं आपल्या समाजांतील अयोग्य व लाजिरवाण्या चाली नाहींशा व्हाव्या, एतदर्थ त्यांनीं अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक कळकळीचे प्रयत्न केले. त्यांचें सर्व लिखाण म्हणजे या कळकळीचा आदर्श आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु आपलीं मतें समाजाच्या घशांत एकाद्या रागीट व चिडखोर पंतोजीप्रमाणें धाकदपटशानें, अपशब्दपूर्वक, निंदानिर्भत्सनेनें त्यांनीं उतरविण्याचा जो प्रयत्न केला तो त्यांची कळकळ शंभर नंबरी असूनसुद्धां अगदीं फुकट गेला असेंच म्हटलें पाहिजे. आपले दोष आपणाला दाखविले गेले असतां दाखविणारावर न रागावतां त्यांचे उपकार मानून दोष सुधारण्याचा प्रयत्न करणारे महात्मे या स्वार्थलोलुप समाजांत कितीसे मिळतील ? लोकहितवादींचा उद्देश उदात्त असूनसुद्धां त्यांचे सर्व परिश्रम कवडीमोल झाले; त्यांच्या स्वार्थत्यागाची किंमत जनता विसरून गेली याचा दोष सर्वांशीं जरी नाहीं तरी बहुतांशीं त्यांच्या या सुधारणा घडवून आणण्याच्या पद्धतीवर लादावा लागेल, असें समदृष्टीनें पाहाणाऱ्या वाचकांस कळून येईल.

शास्त्रीबोवांनीं लोकहितवादींवर जो एवढा गहजब उडविला, त्याला तरी हेंच मुख्य कारण झालें. दुसरीहि एक गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, शास्त्रीबोवांनीं लोकहितवादींवर केलेली टीका व्यक्तिविषयक घेऊन चालणार नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें तत्कालीन समाजांतील एका विशिष्ट विचारसरणीच्या वर्गाचे प्रतिनिधि असेंच त्यांना मानिलें पाहिजे. असें असलें तरी टीकेच्या भरांत लोकहितवादींचें 'प्रतिनिधित्व' बाजूला सारून, शास्त्रीबोवांनीं त्यांचा व्यक्तिविषयक केलेला उपहास समंजस वाचकांस खात्रीनें आवडणार नाहीं.

लोकहितवादींवरील या निबंधांत प्रथम लोकहितवादींची माहिती देऊन व त्यांच्या ठायीं असलेल्या कित्येक गुणांचें वर्णन करून, निबंधसंग्रहादि पुस्तकांतून त्यांच्या तऱ्हेवाईक मतांची थोडक्यांत ओळख करून दिली आहे. पुढें

तत्कालीन निकृष्ट देशस्थितीला आपलाच मूर्खपणा कारण आहे, ह्या लोकहित-वादींच्या मुद्याचा खंडणात्मक विचार करण्यांत आलेला आहे. लोकहितवादींचे मुख्य मुद्दे ( १ ) ब्राह्मण मुत्सद्यांचें वेडेपण, ( २ ) जुन्या पंडितांची निरुपयोगी विद्या, ( ३ ) व भटांनीं लावून दिलेलें वेड हे सविस्तर देऊन शास्त्रीबोवांनीं त्यांचें खंडन केलें आहे. शास्त्रीबोवांनीं केलेलें खंडन सर्वच ठिकाणीं पटणारें व सयुक्तिक आहे, असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी त्यांची खंडन करणाची पद्धत—व्यक्तिविषयक टीका वगळली तर—परिणामकारक आहे असें वाटल्यावांचून राहत नाहीं. लेखनाच्या उद्देशाकडे पाहिलें तर लोकहितवादी व शास्त्रीबोवा या दोघांमध्यें साम्यच दिसेल; दोघेहि देशाभिमानी, दोघांनाहि स्वजनहिताची तीव्र जाणीव, पण राजकीयदृष्ट्या पहिले विधिघटना अगर प्रारब्धवाद पुढें करून आपल्या विक्षिप्त वाटणाऱ्या मतांनीं देशाचा 'गतकाल' काळ्याकुट्ट रंगानें रेखाटूं लागले, तर दुसरे 'गतकाला'चें उज्वल चित्र वाचकांपुढें ठेऊन स्वधर्म, स्वेतिहास ह्यांच्या सहाय्यानें घटकाभर आलेल्या परकीय सत्तात्मक आपत्तीला न डगमगतां त्यांतून बाहेर पडण्याचा उपदेश करूं लागले. वाङ्मयदृष्ट्याहि पहिल्यांचें लिखाण विशेष आकर्षक नाहीं, तर दुसऱ्यांची 'माला' आपल्या मनोहारित्वानें वाचकांचीं अंतः-करणें मोहित करून सोडीत आहे.

**४ सामाजिकः**—'संपत्तीचा उपभोग' व 'लोकभ्रम' या दोन निबंधांवरून शास्त्रीबोवांचीं सामाजिक मतें आपणांस अजमावितां येतात. 'संपत्ति हें अनर्थांचें मूळ होय' हें प्राचीन मत खरेंहि आहे व खोटेंहि आहे याचें सप्रमाण विवरण करून शास्त्रीबोवांनीं नंतर राष्ट्रीय दृष्ट्या संपत्तीचा विचार केला आहे. पुढें संप-त्तीचा उपयोग करणाऱ्यांपैकीं कृपण, विषयी, मिजासी, रिकामटेकडा यांचीं शब्दचित्रें उत्कृष्ट रीतीनें रंगवून संपत्तीचा सदुपयोग जो धर्म त्याचें विवेचन केलें आहे; त्यांतच धर्म करावयाचा तो पात्रापात्र विचार करून अंतःकरणाच्या कळ-वळ्यानें व निरपेक्षबुद्धीनें केला पाहिजे अशी सूचना देऊन लेख संपविला आहे.

लोकभ्रमः—या निबंधांत भुतेंखेतें, शकुन, मंत्र, ग्रह, दैव, नवस, किमया इत्यादि जीं खुळें समाजांत माजलेलीं आहेत, त्यांचें वैय्यर्थ्य प्रतिपादन केलें आहे. प्रथम भुतांच्या अस्तित्वाविषयीं विचार प्रदर्शित करून भुतांविषयीं सांगितलेल्या गोष्टी निव्वळ गप्पा असतात असा सिद्धांत काढला आहे. शकुनांत मांजर आडवें जाणें, विधवादर्शन वगैरे प्रकार देऊन त्यांवर विश्वास ठेवणें कसें

असमंजसपणाचें आहे याचें विवरण केलें आहे. विशेषतः विधवा स्त्रियांच्या करुणास्पद स्थितीविषयीं शास्त्रीबोवांनीं काढिलेले उद्गार सहृदय वाचकाला पटल्याशिवाय राहणार नाहींत. "केवळ दैवयोगानें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थितिविशेषावरून मनुष्यास मंगळ किंवा अमंगळ मानावें हा केवढा अन्याय? स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी तोंड कां बघावें," हे उद्गार गुरुवर्य आगरकरांची आठवण कोणाला बरें करून देणार नाहींत? यापुढें ज्योतिषाच्या खरेखोटेपणाबद्दल लांबलचक चर्चा होऊन हा लेख संपतो.

शास्त्रीबोवांनीं सामाजिक स्थितीपेक्षां राजकीय स्थितीवर अधिक जोर दिला असल्यामुळें सामाजिक बाबतींत त्यांचें लिखाण फार झालेलें नाहीं. तरीसुद्धां जें थोडेंसें आहे त्यावरून 'तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणाः' पकीं ते नव्हते हें निश्चित आहे. इतकेंच नव्हे तर सामाजिक बाबतींतहि ते राजकीय बाबीप्रमाणें प्रागतिक होते, फरक इतकाच कीं उतावळा सुधारकपणा त्यांना पसंत नव्हता. जुनें सर्व टाकून नवीन तेवढें अनुसरा असें म्हणणारांवर त्यांचा पूर्ण कटाक्ष होता. जुन्यांतील उत्तम गोष्टी न टाकतां जुन्यानव्याची योजना व्हावी हीच गोष्ट राष्ट्राला हितकारक आहे हें त्यांचें मत असावें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

(५) **राजकीयः**—आमच्या देशाची स्थितिः—'मालें'तील हा निबंध शेवटचा व अत्यंत महत्वाचा आहे. राजकीय विषयावर शास्त्रीबोवांचीं मतें इतर निबंधांतून मधून मधून आलीं आहेत, परंतु या निबंधांत आपणाला तीं संकलित केलेलीं दिसून येतील. सुरवातीस इंग्रज लोक इकडे आले कसे, त्यांनीं आपल्या तागडीच्या व तरवारीच्या जोरावर तक्त कसें मिळविलें याची माहिती देऊन, इंग्रजी राज्यापासून आपले खरे फायदे काय झाले आहेत, यांचें त्यांनीं प्रांजलपणानें विवरण केलें आहे. परंतु या फायद्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाणारे राष्ट्राला चैतन्यभूत असलेल्या स्वातंत्र्याच्या नाशाकडे लक्ष देत नाहींत, हा शास्त्रीबोवांचा मुख्य मुद्दा आहे. स्वातंत्र्यरूपी किंमत देऊन जर हे फायदे विकत घेतले आहेत, तर त्या सर्वांची किंमत कस्पटासमान नाहीं का होणार? चैतन्यनाशानंतर मृतदेहाला सजविण्यांत व त्याच्याकडे बघून आनंद मानण्यांत काय अर्थ आहे, या मुद्याचा शास्त्रीबोवांनीं अत्यंत कळकळीनें विचार केला आहे. यापुढें इंग्रजांचीं आमच्या संबंधीं काय

कर्तव्यें आहेत, याचें दिग्दर्शन करून राजेरजवाड्यांच्या तत्कालिन स्थितीचें हुबेहूब शब्दचित्र वाचकांपुढें उभें करण्यांत आलें आहे. नंतर देशाच्या निकृष्ट स्थितीचें वर्णन करून, त्यावर राजमान्य उपाय म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें व ही संपन्नता घडवून आणणारीं मुख्य दोन साधनें म्हटलीं म्हणजे रसना व लेखणी हीं होत असा शास्त्रीबोवांनीं आपला अभिप्राय दिला आहे.

हा निबंध सर्व दृष्टींनीं मननीय झाला आहे. यांतील विवेचन परिणामकारक असून, भाषाहि ओजस्वी व गंभीर स्वरूपाची आहे. या निबंधानें समाजजागृतीचें महत्वाचें काम केलें, पण पुढचा मार्ग स्पष्ट रीतीनें दाखविण्याची कामगिरी शास्त्रीबोवांच्या हातून झाली आहे असें म्हणवत नाहीं. त्यावेळचे सर्वमान्य पुढारी माधव गोविंद रानडे हे आपल्या अलौकिक बुद्धीनें व वक्तृत्वशक्तीनें समाजाला राजकीय आकांक्षांची जाणीव करून देत होते; परंतु त्यावेळच्या सुशिक्षित समाजावर, 'ब्रिटीश राज्य विधिघटनेनेंच आलेलें आहे, त्यामुळें आपलें आत्यंतिक हित होणार आहे, तें राज्य घालविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या पायांवर दगड घालण्यासारखें आहे,' अशा तऱ्हेच्या राजकीय तत्वज्ञानाचा पगडा बसविला असल्यामुळें शास्त्रीबोवांची राजकीय मीमांसा अर्थातच रा. रानडे यांस आवडणें शक्य नव्हतें. शास्त्रीबोवा इंग्रजी राज्यापासून झालेले फायदे नाकबूल करीत नाहींत, परंतु दास्यत्वांत राहून हें सोन्याच्या ताटांतील पक्वान्न-भोजन त्यांना नको आहे. एकंदरींत राजकीय प्रवाहाचे हे दोन परस्पर भिन्न ओघ त्यावेळेपासून सुरू झाले असें म्हणावयास हरकत नाहीं. रा. रानडे, ना. गोपाळराव गोखले वगैरेंपासून तों सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीच्या कार्यांत दिसून येणारा एक ओघ, तर शास्त्रीबोवांनीं सुरू केलेला व लोकमान्य आणि त्यांचे अनुयायी यांनीं पुढें चालविलेला दुसरा असे हे दोन्ही ओघ एकमेकांशीं जुळते न घेतां वळणावळणांनींच आपले मार्ग आक्रमिणार आहेत असें दिसतें.

(६) **मानसशास्त्रीयः**—'गर्व' हा विषय या विभागांत येतो. प्रथम दोषरूप व अदोषरूप असे गर्वाचे दोन प्रकार सांगून, अदोषरूप गर्व राष्ट्रोन्नतीला कसा फायदेशीर होतो याचें विवेचन शास्त्रीबोवांनीं केलें आहे. शेवटीं संस्कृत मराठी कवींच्या उक्ती देऊन हा निबंध संपविला आहे.

अशा तऱ्हेचें 'मालें'तील मुख्य निबंधांचें स्वरूप आहे. निबंधांशिवाय मालेंत आलेल्या इतर लिखाणांचे पुढीलप्रमाणें भाग पाडतां येतील. (१) **पत्रव्यवहार-**

स्वामी दयानंदांसंबंधीं मजकूर लिहितांना' हितेच्छूनें शास्त्रीबोवांच्या लिखाणांतील दूषणें काढण्याचा प्रयत्न केला आहे व शास्त्रीबोवांनीं त्याला उत्तरहि दिलेलें आहे. लोकभ्रम निबंधाच्या वेळींही भुतांचें अस्तित्व सिद्ध करून देणाऱ्या मजकुरांचीं अनेक पत्रें आलीं, परंतु खरा पत्रव्यवहार म्हणजे मोरोपंतांच्या कवितेवर जी धुमश्चक्री माजली त्याबद्दलचा होय. त्यांत कै. ज. वा. मोडक, वा. दा. ओक, केशवराव कानेटकर, गणेशशास्त्री लेले, गणपतराव हरिहर कुरुंदवाडकर यांचीं जीं पत्रें छापलीं आहेत तीं वाङ्मयदृष्ट्या फार महत्त्वाचीं आहेत. ( २ ) **चमत्कारिक माहितीः**—या भागांत पाश्चात्य वाङ्मयांतील माहिती अत्यंत मनोरंजक तऱ्हेनें दिली असल्यामुळें वाचकांना ती फार आवडत असे. 'डायनां'चें देऊळ, आल्प्स पर्वतांतील बोगदा, ज्योतिषविषयक समजुती इत्यादि मजकूर विशेष चित्ताकर्षक आहे. ( ३ ) **भाषापरिज्ञान** या शीर्षकाखालीं कित्येक शब्दांची व्युत्पत्ति व वाक्प्रचारांची मनोरंजक माहिती देण्यांत आली आहे. ( ४ ) **सुभाषित, अर्थसादृश्य व साहित्य** या सदरांखालीं सुंदर सुभाषितें मराठी भाषांतरासह आलीं आहेत. ( ५ ) **उतारेः**—मोरोपंतांच्या काव्यांतील उत्तम कविता, पोवाडे, मुक्तामालेचें भाषांतर, भर्तृहरीचे श्लोक यांचा या भागांत समावेश केलेला आहे. (६) **विनोद व महदाख्यायिकाः**—मालेंतील अत्यंत मनोरंजक व लोकांच्या आवडीचें हें सदर होतें. मोठ्या लोकांच्या चातुर्याच्या विनोदपर लहानलहान आख्यायिका यांत दिल्या जात असत. या सर्वांचा संग्रह चित्रशाळा प्रेसनें पुस्तक रूपानें प्रसिद्ध केला आहे. (७) **ग्रंथांवर टीकाः**—टीका कशी करावी हें स्वतःच्या निबंधांत सांगून शास्त्रीबोवांनीं तदनुसार 'पंडितांचा वेदार्थयत्न,' 'तारा,' 'रसायन-शास्त्र,' 'भारतवर्षीय ऐतिहासिक कोश,' 'ब्राह्मणांची गुलामगिरी,' 'टेंम्पेस्ट' इत्यादि पुस्तकांचीं परिक्षणें केलेलीं आहेत. एकंदरीनें भाषासंवर्धन, लोकशिक्षण, लोकमनोरंजन हे आपले उद्दिष्ट हेतु साधण्यासाठीं शास्त्रीबोवांनीं आपली 'माला' सर्वांगसुंदर व मोहक करण्याचा प्रयत्न कसा केला व तो कसा पूर्णतेस गेला हें आतांपर्यंत झालेल्या निबंधमालेच्या विवेचनावरून दिसून येईल.

**'केसरींतील व इतर प्रसिद्ध झालेले लेख':**—'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केल्यानंतर शाळेंतील काम करणाऱ्या उत्साही मंडळींनीं आपल्या मतप्रसारार्थ 'केसरी' व 'मराठा' हीं पत्रें सुरू केल्याची माहिती वर आलीच आहे. या

वर्तमानपत्रांच्या कल्पनेचा उगम एकंदर परिस्थितीचा विचार करतां शास्त्रीबोवांच्याच मनांत झाला हें म्हणणें अधिक सयुक्तिक वाटतें. परंतु 'निबंधमाले'वर शास्त्रीबोवांचें जेवढें लक्ष होतें तेवढें 'केसरी'वर होतें असें म्हणवत नाहीं. 'केसरीं'तील वाङ्मयविषयक बहुतेक लेख त्यांनीं लिहिलेले असून, त्यांचा संग्रह रा. खंडेराव भिकाजी बेलसरे यांनीं 'विष्णु शास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह भाग २' यामध्यें केला आहे. रा. बेलसरे यांनीं शास्त्रीबोवांच्या किरकोळ लेखांचा संग्रह दोन भागांत प्रसिद्ध करून त्यांचें इतर लिखाण वाचकांसमोर आणिलें आहे. पहिल्या भागांत 'शाळापत्रकां'तील १८ निबंध असून 'ज्ञानप्रकाशांतील' इंग्रजी तीन, मराठी दोन व रत्नागिरीच्या 'सत्यशोधकांतील' दोन लेख आले आहेत. पैकीं शाळापत्रकांतील निबंधासंबंधीं विचार वर आलाच आहे. सदरहू पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत केसरींतील १५ निबंध, 'मालें'तील कांहीं पत्रव्यवहार, प्रसिद्ध 'एलिफास'चें पत्र, त्याला शास्त्रीबोवांनीं दिलेलें उत्तर, 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या विद्यार्थ्यांपुढें दिलेलें व्याख्यान व खाजगी पत्रव्यवहार यांचा समावेश करण्यांत आला आहे. केसरींतील निबंधांपैकीं 'अनुकरण' 'नाटकें करावीं कीं करूं नये,' 'मुद्रणस्वातंत्र्य,' 'देशोन्नति' इत्यादि लेख वाचनीय व मननीय आहेत.

**'माले'ची कामगिरी.**—आपल्या अल्पकालीन आयुष्यांत शास्त्रीबोवांनीं वाङ्मयदृष्ट्या जें एवढें प्रचंड कार्य केलें आहे त्याचे परिणाम महाराष्ट्रावर काय झाले हें पाहणें ओघानेंच प्राप्त होतें. या बाबतींतली पहिली प्रमुख कामगिरी म्हणजे 'माले'च्या उद्देशांत लिहिल्याप्रमाणें भाषाशुद्धि व भाषासंवर्धन याविषयींची होय. मराठी भाषा म्हणजे अगदीं अपक्व, तींत ग्रंथसंग्रह तर मुळींच नाहीं या मुद्यांवर तिची विश्वविद्यालयांतून देखील हकालपट्टी झाली होती. इंग्रजी भाषेंत लिहिणें व बोलणें हें अत्यंत मानाचें व सभ्यपणाचें लक्षण गणिलें जात असे. अशा रीतीनें आपल्या तत्कालीन पदवीधरांस लाजिरवाण्या वाटत असलेल्या भाषेंतच आपला निबंधमालेसारखा समाजाच्या डोळ्यांत भरणारा ग्रंथ लिहून, शास्त्रीबोवानीं या पदवीधरांनांच लाजविलें असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. आपला देश, आपला धर्म, आपला इतिहास इत्यादि महत्वाच्या विषयांचें वास्तविक उज्वल स्वरूप जनतेपुढें मांडून, पाश्चात्य ग्रंथकार व नवीन विद्वान् यांच्या दुराग्रहांचें पूर्ण उच्चाटन शास्त्रीबोवांच्या 'माले'नेंच केलें व यापुढें तर

'केसरी' पत्र सुरू करून पदच्युत झालेल्या आपल्या मायभाषेला तिचें उच्च स्थान मिळवून दिलें. एकंदरींत शास्त्रीबोवांनीं महाराष्ट्रांत एका नवीन 'युगा'स आरंभ केला असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं.

शास्त्रीबोवांच्या एकंदर लिखाणाच्या विध्वंसक व विधायक अशा दोन बाजू आहेत. एक समाजांत माजून राहिलेल्या गुलामगिरीचें उच्चाटन करते, तर दुसरी देशाभिमानाच्या भावना उद्दीपित करून समाजाला राष्ट्रकार्यप्रवृत्त करिते. पहिलें कार्य करतांना शास्त्रीबोवांची भाषा फार कडक व कठोर असून, कांहीं ठिकाणीं तत्कालीन बऱ्या लोकांची टर उडविण्यासाठींच शास्त्रीबोवा प्रवृत्त झाले आहेत असें वाटतें; परंतु पूर्ण विचार केला असतां शास्त्रीबोवांच्या अशा प्रकारच्या लिखाणांची विचिकित्सा आपणांस पुढीलप्रमाणें करतां येईल. एकतर आज अशी परिस्थिति आहे कीं, शास्त्रीबोवांनीं ज्या व्यक्तींवर व संस्थांवर टीका केली त्या व्यक्तींच्या व संस्थांच्या चरित्रांतील त्यावेळच्या बहुजनसमाजाला चमत्कारीक वाटणाऱ्या व न आवडणाऱ्या बारिकसारिक गोष्टी आपणाला नीट व स्पष्ट रीतीनें कळणें शक्य नाहीं. परंतु 'निबंधमालें'त याच गोष्टींवर केलेली तीक्ष्ण टीका मात्र आपल्यासमोर पूर्वीच्या स्वरूपांत उभी आहे. म्हणून एक बाजू अजिबात न दिसतां दुसरी बाजू फक्त ढळढळीत स्वरूपांत दिसत असल्यामुळें 'अरेरे! शास्त्रीबोवांनीं कां बरें या व्यक्तीची उगीच टर उडविली!' असे उद्गार वाचकांच्या तोंडून साहजिकच बाहेर पडतात. कोणी म्हणतात कीं, शास्त्रीबोवांना मोठ्या लोकांची निंदा करून 'सवंग लोकप्रियता' मिळवावयाची होती, तर दुसऱ्यांच्या मतें मोठ्या लोकांनीं ज्या विषयांचा पूर्वपक्ष केला त्या विषयावर आपण उत्तरपक्ष करावा या लालसेनेंच शास्त्रीबोवांनीं प्रस्तुत कार्याला हात घातला. वरील सर्व मतें बहुतांशीं एकपक्षीय विचारांचीं निदर्शक आहेत असें म्हटलें असतां चालेल. आर्यसमाजसंस्थापक दयानंदस्वामी यांनीं आर्यसमाज स्थापन करून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय बाबतींत अप्रतिम कामगिरी केली आहे व याबद्दल सर्व समाज त्यांचा सदैव ऋणी राहील यांत संशय नाहीं. परंतु खुद्द स्वामीमहाराजांची स्वारी ज्या वेळीं संचारार्थ निघे, त्यावेळीं त्यांच्या व्याख्यानांत व संभाषणांत आपल्या धार्मिक व सामाजिक चालीरीतींवर इतक्या अश्लील व असभ्य भाषेची योजना होत असे कीं, ऐकणाऱ्या साधारण श्रोत्यांनासुद्धां कसेंसेंच वाटत असे. टीका कर-

तांना शास्त्रीबोवांच्या पुढें आर्यसमाजाचें हल्लींचें कार्य नसून, स्वामीमहाराजांचे हे 'प्रलाप' होते व ते कोणत्याहि स्वाभिमानी माणसास चीड आणणारे होते हें समंजस वाचकांस सांगावयास नको. प्रार्थनासमाजाकडे वळल्यावर समाजानें केलेली सामाजिक सेवा खरोखरच स्तुत्य आहे, असेंच कोणीहि म्हणेल; परंतु त्यावेळीं सर्व बाबतींत समाजानें पाश्चात्यांचें जें अंधानुकरण चालविलें होतें तें इतकें चमत्कारिक व हास्यास्पद होतें कीं, त्यावर टीका झाली नसती तरच आश्चर्य ! आपल्या निर्भीडपणाबद्दल, स्पष्टवक्तेपणाबद्दल व प्रागतिक मतांबद्दल प्रसिद्ध असलेल्या राजारामशास्त्री भागवतांनासुद्धां समाजाचें हें अनुकरणात्मक कार्य आवडलें नाहीं. 'मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार' या आपल्या लेखमालेंत प्रार्थनासमाजासंबंधीं लिहितांना समाजांतील पुढारी मंडळींत एकांतिक निष्ठेचा अभाव कसा आहे तें दाखवून, पुढें ते म्हणतात "......ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे महाराष्ट्रचूडामणींचा व मुकुंदराजासारख्या वेदांत्यांचा व तत्प्रिय अद्वैत सिद्धांताचा प्रार्थनासमाजाचे प्रतिष्ठापक द्वेष करीत होते; व त्यामुळें ख्रिस्ती लोकांचे आचार व विचार हा एक मोठा चिंतामणीच मिळाला असा भास होऊन, त्या नमुन्यावर त्यांनीं नवा 'नंदादीप' पाजळण्याचा खटाटोप पत्करला. आदितवारीं संध्याकाळीं ख्रिस्तीलोक देवळांत जातात तर प्रार्थनासमाजानेंही तोच सुमुहूर्त आपल्या प्रार्थनांचा केला. ज्या हेल्वर व ज्या सुरांवर ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थना होतात तीच हेळ व तोच सूर समाजवाल्यांनीं धरला. ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनेच्या शेवटीं 'आमेन्' (Amen) येतें त्याप्रमाणें समाजवाल्यांनीं 'तथास्तु'चा प्रघात घातला." प्रार्थनासमाजांतील वरील तऱ्हा टीकाविषयाला कारणीभूत झाल्यास काय बरें आश्चर्य आहे ?

एकंदरींत नवीन विद्वान व त्यांनीं सुरू केलेले सुधारणेचे मार्ग या विषयांवर शास्त्रीबोवांनीं आपल्या लेखणीला जरा फाजील स्वातंत्र्य दिलें यांत त्यांचा जितका मोठा गुन्हा समजला जातो तितका तो मोठा नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. या बाबतींत आणखीहि एक गोष्ट ध्यानांत ठेवावयास पाहिजे ती हीं कीं, शास्त्रीबोवा म्हणजे कोणी ब्राम्ही स्थितीला पोहोंचलेले 'तुकाराम' नव्हते; किंवा अपकारांची फेड उपकारांनीं करावी हें तत्त्व पाळणारे 'महात्मेहि' नव्हते, केवळ सांसारिक मनुष्याप्रमाणें बऱ्यावाईट मानवी भावनांनीं युक्त अशीच ती एक व्यक्ति होती; मग आपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें देशाला त्यांना अहितकारक वाट-

णाऱ्या तत्त्वांवर जर त्यांनीं ' जशास तसें ' या न्यायानें ज़रा कठोर व प्रतिपक्षाला हृदयमर्मच्छेदक वाटणारी टीका केली तर त्यांत विशेषसें काय झालें ? '

टीकेचा हा मुद्दा बाजूला ठेवला तर शास्त्रीबोवांची दुर्मतखंडनात्मक कामगिरी प्रशंसनीय असून, त्या कामगिरीमुळेंच समाजाच्या मनांत स्वातंत्र्यनाश व तज्जन्य दुःस्थिति यांची जाणीव प्रखरतेनें उत्पन्न झाली असें कबूल करावें लागेल. निबंधमालेच्या पूर्वींचीं नियतकालिकें, तद्वतच शास्त्रीबोवांच्या पूर्वींचे विद्वान लोकनायक या सर्वांना स्वदेशाच्या हलाखीची तीव्र जाणीव होती, स्वदेशाभिमानाचें महात्म्य ते विसरले नव्हते, भाषाभिमानहि त्यांच्या ठायीं कमी नव्हता, परंतु सर्वसाधारण समाजाच्या अंतःकरणांत 'स्व'त्व रूपी अग्नीवर जो मोहाच्या राखेचा ढिगारा जमला होता—ज्या ढिगाऱ्याखालीं या अग्नीची शेवटची ठिणगी विझून जाते कीं काय अशी भीति वाटत होती—तो राखेचा ढीग उपरिनिर्दिष्ट नियतकालिकें व लोकनायक यांच्या निर्बल फुंकारांनीं उडाला नाहीं व उडणेंहि शक्य नव्हतें. तो उडवून देण्यास अत्यंत जोराचा भाताच पाहिजे होता. 'माले'नें त्या भात्याची जागा भरून काढली व आपल्या अल्प पण तेजस्वी आयुर्मर्यादेंत ती राख इतकी दूर उडवून दिली कीं, विझण्याच्या बेतांत आलेली 'स्व'त्वाची ठिणगी आपल्या मूळ स्वरूपांत प्रज्वलित झाली. समाज जागृत झाला, 'स्व'त्व संरक्षणासाठीं लढण्यास तयार झाला. अशा तऱ्हेची राष्ट्राला अत्यंत उपयुक्त अशी भरींव कामगिरी शास्त्रीबोवांनीं बजाविली. ती दृष्टीआड करून थोड्याशा प्रखर टीकेसाठीं त्यांचा कीर्ति-चंद्र कलंकित करण्यास तयार होणें हें फारसें न्याय्य होईल असें वाटत नाहीं.

'माले'च्या विधायक कार्याकडे दृष्टि फेकली असतां भाषासंवर्धनाव्यतिरिक्त इतिहाससंशोधनाकडेहि समाजाची प्रवृत्ति मालेनें वळविली असें म्हणतां येईल. त्याचप्रमाणें मालेनें ज्या अनेक व्यक्तींना देशसेवेची व वाङ्मयसेवेची स्फूर्ति दिली त्या व्यक्तींत प्रसिद्ध कादंबरीकार ह. ना. आपटे, काळकर्ते कै. शि. म. परांजपे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, रसिकवर्य श्री. कृ. कोल्हटकर, केसरीचे माजी विद्वान् संपादक रा. न. चिं. केळकर, हरिभक्तिपरायण ल. रा. पांगारकर इत्यादि विद्वान् लेखकांचा समावेश केला जातो. वरील व्यक्तींनीं आपापल्या क्षेत्रांत केवढाली कामगिरी करून ठेवली आहे याची माहिती वाचकांस करून द्यावयास नकोच. अशा तऱ्हेचीं नररत्नें ज्या मालेनें महाराष्ट्राला

दिलीं तिनें आणखी काय द्यावयाचें राहिलें आहे ? अजूनसुद्धां व पुढेंहि अनंतकाल मराठीचा अभ्यास 'माले'च्या पारायणाशिवाय पूर्ण होणें शक्य नाहीं असें म्हटल्यास फारसें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

**शास्त्रीबोवांची भाषापद्धतिः**—या विषयाकडे वळण्यापूर्वी शास्त्रीबोवांच्या इंग्रजी वाङ्मयाच्या व्यासंगाबद्दल थोडासा विचार करणें आवश्यक आहे. इंग्रजींतील ग्रंथकारांत ॲडिसन, मेकॉले व जॉन्सन् हे तिघे शास्त्रीबोवांच्या आवडीचे दिसतात. इंग्रजी निबंधवाङ्मयांत या तिन्ही लेखकांनीं आपापली विशिष्ट पद्धति सुरू केलेली आहे, हें इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास करणारांस माहित आहेच. प्रसादयुक्त ( Perspicuity ) भाषेंत गद्य लिहिण्याबद्दल ॲडिसन्ची प्रसिद्धी असून, आपलीं मतें गोडीगुलाबीनें वाचकांच्या गळीं उतरण्याला लागणारा भाषेचा चटकदारपणा त्यांच्या सर्व निबंधांत दिसून येतो. मेकॉलेचें वाङ्मयांतील स्थान ॲडिसन्हून फार निराळें आहे. त्याची भाषा ओजस्वी, अलंकारपूर्ण आणि इतकी नादमधुर असते कीं, कित्येक ठिकाणीं अतिशयोक्तीच्या भरांत त्यांच्या हातून झालेला सत्यापलाप वाचकांच्या सहजासहजीं लक्षांत येत नाहीं. ऐतिहासिक निबंधलेखनांत त्यांचें भाषाकौशल्य स्पष्ट रीतीनें पाहावयास मिळतें. टीकाकार या नात्यानेंहि इंग्रजी वाङ्मयांत त्यांची प्रसिद्धि आहे. जॉन्सनचा संबंध शास्त्रीबोवांच्या लिखाणापेक्षां त्यांच्या चरित्राशींच फार आलेला आहे, व ह्यामुळेंच शास्त्रीबोवांना तो आवडत असावा असें वाटतें.

ॲडिसन् व मेकॉले यांच्या ग्रंथांच्या वाचनाचा फायदा शास्त्रीबोवांना झाला आहे हें निःसंशय खरें आहे. त्यांच्या भाषासरणींतील वैशिष्ट्यांचा उपयोगहि त्यांनीं मधून मधून केलेला आढळतो. परंतु शास्त्रीबोवांसारख्या बुद्धिप्रतिभादि गुणांनीं युक्त अशा लेखकाच्या बाबतींत The style is the Man ( प्रत्येकाची भाषासरणी व्यक्तिनिष्ठ असते ) या तत्त्वाकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. शास्त्रीबोवांनीं एक विशिष्ट भाषापद्धति सुरू करून, मराठी गद्याला एक प्रकारचें निराळेंच वळण लावलें, ही गोष्ट तत्कालीन गद्यवाङ्मयाचें परीक्षण केलें असतां सहज दिसून येणारी आहे. लोकहितवादी, माडगांवकर, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री, परशुरामतात्या इत्यादि विद्वान् लेखकांनीं गद्यग्रंथ लिहिले असतांनाहि 'मराठी गद्यवाङ्मयाच्या जनक'त्वाचा मान शास्त्रीबोवांना देण्यांत येतो त्याचें कारण हेंच 'चिपळूणकरी' विशिष्ट वळण होय. शास्त्रीपंडितांच्या ग्रंथांत जाड्या-

जाड्या संस्कृत शब्दांचा भरणा केलेला असल्यामुळें त्यांची भाषा बेडौल व दुर्बोध झाली आहे, तर इंग्रजी शिकलेल्या बहुतेक लेखकांच्या ग्रंथांत इंग्रजीची छाप स्पष्टपणें दिसून येते. गद्याची भाषा शुद्ध मराठी ठेऊन व सोपेसोपे संस्कृत शब्द मध्यें आणून, भाषेची सजावट करण्याचा प्रयत्न थोरल्या शास्त्रीबोवांनीं केला; व त्याच भाषापद्धतीच्या उत्क्रान्त स्वरूपाचें अवलंबन करून विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या लेखनांत निरनिराळ्या भावनांचीं सुंदर शब्दचित्रें वाचकांसमोर उभीं केलीं आहेत. हातीं घेतलेला विषय वाचकांस नीट समजून देणें हा निबंधलेखनाचा मूलभूत हेतु असल्यामुळें, विषयविवेचन अत्यंत सोप्या भाषेंत व सर्वांगपरिपूर्ण होणें व उदाहरणें, दृष्टांत वगैरेंच्या सहाय्यानें आपलें म्हणणें वाचकांस सहज कळेल असें करणें, यांतच लेखकाचें खरें कौशल्य दिसून येतें. अशा तऱ्हेच्या पद्धतीचा उपयोग आपल्या लेखनांत शास्त्रीबोवांनीं ठिकठिकाणीं केलेला दिसून येतो.

ओजस्वितेबद्दल शास्त्रीबोवांची प्रख्यातीच आहे. रूपक, विरोध इत्यादि अलंकारांच्या साहाय्यानें त्यांनीं आपली भाषा कांहीं प्रसंगीं इतकी जोरदार केली आहे कीं, ते भाग वाचतांना वाचकांचें अंतःकरण उचंबळून येतें. सरसतेच्या दृष्टीनेंहि शास्त्रीबुवांचें गद्य उच्च तऱ्हेचें असून, त्यांचीं वर्णनें चटकदार असतात. निरनिराळ्या कोट्या करून, आपले लेख विनोदपूर्ण व मनोरंजक करण्याची शास्त्रीबोवांची पद्धत जिथें तिथें दिसून येते. मात्र त्यांचा विनोद ‘सात्विक’ तऱ्हेचा नसून प्रतिपक्षाची फजिती करण्यासाठीं लेखकांकडून नेहमीं वापरल्या जाणाऱ्या शस्त्राच्या स्वरूपाचा आहे.

शास्त्रीबोवांच्या रसिकतेला मार्मिकपणाची जोड मिळाल्यामुळें, विषयाची मुद्देसूद मांडणी, उपमा, रूपक, म्हणी, लोकोक्ति, सुभाषितें, सृष्टिवर्णनपर माहिती इत्यादिकांच्या जोरावर आपले लेख सर्वांगसुंदर व चित्ताकर्षक करण्याची त्यांची रीत तत्कालीन इतर लेखकांत क्वचितच दिसून येते. वरील सर्व गुणांमुळें ‘निबंधमाला’ ही मराठींतील उत्तम भाषेचा नमुना होऊन राहिली आहे यांत संशय नाहीं.

शास्त्रीबोवांचें लिखाण सुरू होण्यापूर्वी मराठी वाङ्मयांत निबंधलेखनाची तऱ्हा अगदीं बाल्यावस्थेंत होती, कारण वाङ्मयांतील हा प्रकार मराठींत मूळचा नसून उघड उघड इंग्रजी भाषेंतून इकडे आलेला आहे. निबंध कोणत्याहि विषयावर

लिहितां येतो, मात्र विषयाची मांडणी नीटनेटकी, विवेचन सांगोपांग, सोप्या भाषेंत व बिनपाल्हाळी असलें पाहिजे. निबंधलेखनास विशेषतः विवेचक शक्ति व बहुश्रुतपणा हे गुण अत्यंत जरूरीचे आहेत. निबंधाचें ध्येय मनोरंजन हें नसून ज्ञानप्राप्ति हें आहे. या दृष्टीनें पाहतां शास्त्रीबोवांच्या पूर्वीच भाऊ महाजन, हरि केशवजी, माडगांवकर, लोकहितवादी, कृष्णशास्त्री वगैरे लेखकांनीं निबंध या भागांत येणारें वाङ्मय लिहिलें होतें. परंतु कलेच्या दृष्टीनें पाहतां शास्त्रीबोवांनीं निबंधलेखन हा प्रकार पूर्णावस्थेस नेऊन पोंचविला यांत शंका नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या नंतरच्या बहुतेक लेखकांच्या लेखनावर 'माले' ची छाप पडलेली दिसेल. हे पुढील लेखक कित्येक बाबतींत शास्त्रीबोवांपेक्षां वरचढ आहेत ही गोष्ट कबूल केली पाहिजे; लो. टिळकांची कुशाग्र बुद्धि, गुरुवर्य आगरकरांच्या निबंधांत दिसून येणारी हृदयाची तळमळ, तर्कशुद्धता, समतोलपणा इत्यादि गुण शास्त्रीबोवांच्या लिखाणांत कमी प्रमाणांत दिसून येतात. याच्याहि पुढें जरा गेल्यास प्रतिभा, वर्णनशैली, अलंकारप्रचुरता इत्यादि गुणांबद्दल प्रसिद्ध असलेले कै. शि. म. परांजपे; सूक्ष्म विवेचन, कल्पनानाविन्य, सडेतोडपणा या गुणांमुळें नांवाजलेले कै. वि. का. राजवाडे; गहन विचार, मार्मिक विनोद, शुद्ध भाषा या गुणांमुळें पुढें आलेले श्री. कृ. कोल्हटकर; रसिकता, मार्मिकपणा अष्टपैलू बुद्धि इत्यादि अलौकिक गुणांनीं मराठी वाङ्मयाचीं सर्व दालनें व्यापणारे न. चिं. केळकर या सर्व लेखकांचे निबंध शास्त्रीबोवांच्या निबंधांपेक्षां वरच्या दर्जाचे आहेत यांत संशय नाहीं. परंतु ह्या सर्व लेखकांना वाङ्मयसेवेची व देशसेवेची स्फूर्ति 'माले' नेंच दिली ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे 'माले' नें आपली कामगिरी उत्तम बजावली व आपल्याहिपेक्षां सवाई शिष्य निर्माण केले हें आपोआपच सिद्ध होतें.

आतांपर्यंत शास्त्रीबोवांच्या जीवनवृत्तांताचें व वाङ्मयिक कामगिरीचें पर्यालोचन केलें. वाङ्मयक्षेत्रांत शास्त्रीबोवांनीं किती भरींव व स्फूर्तिदायक कार्य केलें आहे याची जाणीव वरील विवेचनावरून वाचकांस होईलच. 'सवंग लोकप्रियता' मिळविण्याच्या लालसेनें समाजाला प्रिय होतील असेच लेख शास्त्रीबोवांनीं लिहिले या म्हणण्यांत फारसें तथ्य दिसत नाहीं. शास्त्रीबोवांना कीर्तीची हांव नव्हती असें सांगण्याचा आमचा इरादा नाहीं. लो. टिळकांनीं लिहिल्याप्रमाणें तत्कालीन सुशिक्षित समाजांत दिसून येणाऱ्या अंधानुकरणांतील

हास्यास्पदता व अहितकारिता शास्त्रीबोवांनीं नाहीं तर दुसऱ्या कोणीतरी चवाठ्यावर आणलीच असती. शास्त्रीबोवांच्या स्वार्थत्यागाबद्दलहि कित्येकांकडून संशय व्यक्त करण्यांत येतो, तोहि अनाठायीं आहे असें आमचें प्रामाणिक मत आहे. हें खरें कीं, शास्त्रीबोवांचा स्वार्थत्याग घरादारावर तुळसीपत्र ठेवण्याइतका सोळा आणे निर्भेळ नव्हता; आपली आर्थिक स्थिति आपण हातीं घेतलेल्या कार्याच्या आड येणार नाहीं ही गोष्ट लक्षांत घेऊनच त्यांनीं सरकारी नोकरीचा राजिनामा दिला, यांत सांसारिक मनुष्याचें जसें दूरदर्शित्व दिसून येतें, त्याचप्रमाणें त्यांचे बाणेदारपणा व ध्येयनिष्ठा हे गुण दिसून येतात. आपल्या ध्येयाप्रमाणें लोकसेवेला वाहून घेण्यासाठीं आपली नोकरी सोडणारे तत्कालीन समाजांत कितीसे खंदे वीर होते ? अर्थातच त्या वेळच्या एकंदर परिस्थितीचा विचार करतां शास्त्रीबोवांची योग्यता सामान्य जनांपेक्षां, इतकेंच नव्हे तर लठ्ठ सरकारी पगार घेऊन देशासाठीं काडीमात्र कार्य न करणाऱ्या विद्वानांपेक्षां, खात्रीनें अधिक होती यांत संशय नाहीं. वाङ्मयदृष्ट्या तर ती योग्यता फार मोठी होती व अद्यापहि आहे हें सांगावयास नकोच. मराठी वाङ्मयशारदेच्या अंगावरील उत्तमोत्तम लेण्यांत ‘माले’ चा हा दागिना ठसकेदार, डोळ्यांत भरणारा व चित्ताकर्षक असा झाला आहे, असें बहुतेक विद्वानांचें मत आहे. अशा तऱ्हेची उत्कृष्ट कामगिरी अवघ्या बत्तीस वर्षांच्या अल्प आयुर्मर्यादेंत घडवून आणणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूची दुःखद वार्ता ऐकून, रा. ब. माधवराव रानड्यांनीं डोळ्यांतून अश्रुप्रवाह चालला असतांना ‘He had no business to die so soon’ असे जे कळवळ्याचे उद्गार काढले, ते अन्वर्थक नाहींत असें कोण म्हणेल ?

वासुदेव दामोदर गोखले.

**चिपळूणकर विष्णुशास्त्री यांचें वाङ्मयः—**( १ ) निबंधमाला; ( २ ) विनोद आणि महदाख्यायिका; ( ३ ) संस्कृत कविपंचक; ( ४ ) किरकोळ लेखांचा संग्रह, भाग १, २, संग्राहक खं. मि. बेलसरे.

**चरित्र, चर्चा अभ्यासः—**

( १ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, ल. कृ. चिपळूणकर, चित्रशाळा प्रेस; १८९४, १९२१.

( २ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, खं. मि. बेलसरे.
( ३ ) विष्णु कृष्ण चिपळूणकर टीकात्मक निबंध, ग. त्र्यं. माडखोलकर, आर्यभूषण प्रेस, १९२३.
( ४ ) निबंधमालेचें स्वरूप व कार्य, ल. रा. पांगारकर.
( ५ ) कालिदास—परीक्षण, विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १८७६.
( ६ ) भवभूति—परीक्षण, ,, जानेवारी १८७७.
( ७ ) बाणभट्ट—परीक्षण, ,, पुस्तक ९ अं. ७
( ८ ) सुबंधु—परीक्षण ,, पुस्तक १० अं. ८.
( ९ ) दंडी—परीक्षण ,, पुस्तक १० अं. ११।१२.
( १० ) शास्त्रीबुवा व निबंधमाला, रा. मि. जोशी, निबंधचंद्रिका.
( ११ ) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या वेळची स्थिति, बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड ४, पृ. २८८–२९३.
( १२ ) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड ४, पृष्ठ २९४–३०३.
( १३ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचें व निबंधांचें साधारण स्वरूप, केरळकोकीळ वर्ष ६.
( १४ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र—परीक्षण, बा. ना. देव, ग्रंथमाला, जून १९००.
( १५ ) निबंधमाला ( नवी आवृत्ती, चित्रशाळा ) चर्चा, बा. ना. देव, विविधज्ञानविस्तार, अंक १२, १९१७.
( १६ ) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांजवर रा. देव यांनीं सोडलेलें टीकास्त्र, वा. दा. मुंडले, ग्रंथमाला, नोव्हेंबर १९००.
( १७ ) हेतु कीं परिणाम ? मो. के. दामले, ग्रंथमाला, आक्टोबर १९००.
( १८ ) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्रावर टीका—मुंडले व दामले यांस उत्तर, बा. ना. देव, ग्रंथमाला, जानेवारी १९०२.
( १९ ) चिपळूणकर यांची कामगिरी, ह. र. भागवत, प्रभात ( धुळें ) वर्ष १, अंक १२.
( २० ) चिपळूणकर व त्यांचे टीकाकार प्रो. श्री. ना. बनहट्टी, रत्नाकर, मार्च १९२६.

( २१ ) चिपळूणकर व त्यांचे आधुनिक आक्षेपक, प्रो. श्री. ना. बनहट्टी, रत्नाकर, एप्रिल, मे, जुलै, आगष्ट १९२६.
( २२ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर व न्यायमूर्ती तेलंग, श्री. ना. कर्नाटकी, रत्नाकर, आक्टोबर १९२६.
( २३ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर व न्यायमूर्ती तेलंग, उत्तर, प्रो. बनहट्टी, रत्नाकर, जानेवारी १९२७.
( २४ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर, न. र. फाटक, विविधज्ञानविस्तार, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे १९३०.

**चिपळूणकर विष्णु गोविंद:**—[ १८६२–१९१६ ] यांचा जन्म पुणें येथें झाला. यांचें शिक्षण बडोदें येथें झालें. बडोद्यास कांहीं वर्षांपूर्वी व्हर्नाक्युलर कॉलेज स्थापन झालें होतें. त्यांत यांनीं सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचे हाताखालीं वैद्यकीचा अभ्यास केला. यांच्या आयुष्यांतील मुख्य व्यवसाय वैद्यकी हाच होता. मराठी भाषा व तींतील प्राचीन कवि व ग्रंथकार यांविषयीं त्यांना फार अभिमान असे. त्यांनीं विविध विषयांवर ग्रंथ लिहून, मराठी भाषेंत चांगली भर घातली आहे. ' हिंदुस्थानांतील सर्प ' हें त्यांचें पुस्तक इतकें माहितीनें पूर्ण आहे कीं, या विषयावरील त्यांचें ज्ञान धंदेवाल्या गारुड्यांसहि मागें सारील. यांना शिकारीचा फार नाद असल्यामुळें त्याहि विषयावर त्यांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत. ' मृगयाकुतूहल ' हा त्यांचा यासंबंधींचा ग्रंथ वाखाणण्यासारखा आहे. यांनीं शिवछत्रपति यांचे चरित्रांतील प्रसंगांवर दोन व संभाजी महाराज यांचे चरित्रावर एक अशीं तीन ऐतिहासिक नाटकें लिहिलीं आहेत.

**चिपळूणकर विष्णु गोविंद यांचें वाङ्मय:**—( १ ) मृगयाकुतूहल १९०७. ( २ ) हिंदुस्थानांतील सर्प. ( ३ ) शारीरशिक्षण, १८९४. ( ४ ) हिंदुस्थानांतील मोजणी, १८९४.

**चिंतामणिपेठकर पांडुरंग व्यंकटेश:**—[ १८५१–१८७९ ] कवि. मुंबई विश्वविद्यालयाचे हे पदवीधर असून, सरकारी शाळाखात्यांत नोकर होते. ' डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरचे हुद्यापर्यंत चढले होते. यांना इंग्रजी व स्वभाषा यांखेरीज कानडी, उर्दू, संस्कृत व गुजराथी यांचें चांगलें ज्ञान होतें. 'गंगावर्णना' या काव्यामुळें यांचें नांव विशेष गाजलें. या काव्यास दक्षिणा प्राइझ

कमिटीनें ४०० रुपयांचें बक्षिस दिलें होतें. या काव्यावर विविधज्ञानविस्ताराच्या जुलै १८७६ च्या अंकांत विस्तृत परीक्षण आलें आहे. यांचें अगदींच अकालीं निधन झाल्यामुळें या काव्याव्यतिरिक्त निराळी अशी यांची वाङ्मयकृती कांहीं नाहीं.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) गंगावर्णना–परीक्षण, विविधज्ञानविस्तार, जुलै १८७६.

**छत्रे केरो लक्ष्मण:**—[ १८२४–१८८४ ] गणितज्ञ, ज्योतिषशास्त्रज्ञ व सृष्टिशास्त्रज्ञ. यांचा जन्म मुंबईच्या दक्षिणेस १३ कोसांवर अष्टागर प्रांतांत नागांव या नांवाचा एक गांव समुद्रतीरीं आहे, तेथें झाला. यांचें इंग्रजी भाषेचें आणि तद्द्वारा तींतील शास्त्रांचें अध्ययन मुंबई येथें एल्फिन्स्टन् इन्स्टिट्यूशन नांवाच्या विद्यालयांत झालें. प्रोफेसर आर्लिबारसाहेबांचे हे प्रिय शिष्य होते. १८४० मध्यें मुंबई येथें कुलाबादांडीवर अंतरिक्षचमत्कार आणि लोहचुंबक यांचे अनुभव घेण्याकरितां वेधशाळा झाली; तिची सुरवात आर्लिबारसाहेबांनीं केली. तेव्हां तेथें केरोपंतांची नेमणूक असिस्टंटाचे जागीं झाली. १८५१ च्या जूनच्या ७ व्या तारखेस पुणें संस्कृत पाठशाळेच्या जागीं 'पूना कॉलेज' झालें. त्यानंतर कांहीं महिन्यांनीं तेथें त्याच्या मराठी व नॉर्मल स्कूल या भागांत सृष्टिशास्त्र आणि गणित शिकविण्याकरितां असिस्टंट प्रोफेसरच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. त्या कॉलेजांत हे विषय मराठींत व इंग्रजींतहि ते शिकवीत असत. पुढें त्या कॉलेजाचा नॉर्मल स्कूल हा भाग निराळा झाला, त्यांत ते अध्यापक होते. व पुढें कांहीं वर्षें त्याचे सुपरिंटेंडेंट होते. त्या वेळेस त्या विद्यालयास व्हर्न्याक्युलर कॉलेज असेंहि म्हणत. याच विद्यालयाला हल्लीं ट्रेनिंग कॉलेज म्हणतात. यावेळीं कांहीं दिवस ते इंजिनिअरींग कॉलेजांतहि सृष्टिशास्त्रावर व्याख्यानें देत. मध्यें कांहीं दिवस ते अहमदनगर इंग्लिश स्कूलाचे हेडमास्तर होते. १८५६ मध्यें त्यांस पूना कॉलेजांत गणित आणि सृष्टिशास्त्र यांचे प्रोफेसर नेमलें. तेथें हे विषय ते इंग्रजींत शिकवीत. हें कॉलेज पुढें डेक्कन कॉलेज या नांवानें संबोधिलें जाऊं लागलें. १८७९ मध्यें छत्रे यांनीं पेन्शन घेतलें. त्यावेळीं त्यांस एक हजार रुपये दरमहा पगार मिळत असे. छत्रे यांचें लोकप्रिय नांव नाना असें होतें. यांच्या आंगच्या अनेक सद्गुणांत सतत विद्याव्यासंगिता आणि स्वभावसौजन्य हे गुण विशेष वाखाणण्यासारखे होते.

छत्रे यांनीं फ्रेंच आणि इंग्लिश ज्योतिष ग्रंथांच्या आधारें ग्रहसाधनांचीं कोष्टकें या नांवाचा मराठी ग्रंथ १८५० च्या सुमारास तयार करून तो १८६० मध्यें छापून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ R. S. Vince यानें १८०८ मध्यें केलेल्या ग्रंथाच्या आधारें लिहिला, असें कृष्णशास्त्री गोडबोले लिहितात. याच्यापूर्वी मराठींत व संस्कृतांत असा ग्रंथ नव्हता, म्हणून याची योग्यता मोठी आहे. ह्या ग्रंथांत वर्षमान सूर्यसिद्धांतांतलें घेतलें आहे. आणि ग्रहगतिस्थिति सायन घेतल्या आहेत. यामुळें ग्रंथावरून ग्रह सायन येतात. रेवतीयोगतारा झिटापिशियम मानिली आहे. ती शक ४९६ मध्यें मेषसंपातीं होती. त्या वर्षी अयनांश शून्य मानावे आणि अयनगति वर्षाची ५०.१ विकला घेऊन, त्याप्रमाणें अयनांशसंस्कार सायन ग्रहांस करून, निरयन ग्रह करावे असें सांगितलें आहे. यांत निरयन वर्षमान शुद्ध म्हणजे ३६५।१५।२३ घेतल्यासारखें होतें. हें वर्षमान व ५०.२ अयनगति घेऊन केरोपंत नाना हे शके १७८७ पासून नॉटिकल आल्मनाकवरून निराळें पंचांग प्रसिद्ध करूं लागले. नानांच्या ग्रंथावरून ग्रहस्थिति पुष्कळ शुद्ध येते.

तिथिसाधनाचा तिथिचिंतामणीसारखा ग्रंथ नानांनीं केला आहे. तो काशी येथें छापला आहे. हा ग्रंथ छापणारा इकडे कोणी मिळाला नाहीं ! इकडे कोणास तो बहुधा ठाऊकहि नाहीं, व हल्लीं तो व ग्रहसाधनांचीं कोष्टकें हे दोन्ही ग्रंथ मिळत नाहींत.

नानांनीं मराठी शाळांत उपयोगी अशीं पदार्थविज्ञानशास्त्र आणि अंकगणित हीं दोन पुस्तकें केलीं आहेत. [ आधारः—भारतीय ज्योतिःशास्त्र ]

**छत्रे यांचीं पुस्तकें:**—( १ ) ग्रहसाधनांचें कोष्टक, १८६०; ( २ ) अंकगणित ( मोठें ) १८६४, भाग दुसरा १८६७; ( ३ ) पदार्थविज्ञान, १८५५–१८५७.

**छत्रे सदाशिव काशिनाथ:**—[ १७८८–१८३० ] आद्यगद्य-ग्रंथकार. तत्कालीन शिक्षणाचे कल्पनेप्रमाणें यांचें थोडेंसें संस्कृत भाषेचें शिक्षण झालें होतें. यांचा मराठी काव्यवाङ्मयाचा अभ्यास चांगलाच होता. या अभ्यासाच्या जोरावर महाराष्ट्रभाषामिज्ञ अशी ख्याती त्यांनीं मिळविली. १८०८ सालीं हे रोजगारानिमित्त मुंबईस आले. त्या काळांत पेशवाईचा अंमल असल्या-

मुळें इंग्रजांनीं शाळा घातलेल्या नव्हत्या. तरी छत्रे एका मिशनऱ्यापाशीं इंग्रजीचीं चार-पांच पुस्तकें शिकले. पेशवाई आटोपून इंग्रजांचा अंमल सुरू झाल्यावर इंग्रजांचें लक्ष्य विद्याप्रसाराकडे लागलें, व प्राथमिक देशी शिक्षणाच्या शाळाहि स्थापन करण्यास त्यांनीं सुरुवात केली होती. "हा शिक्षणप्रसार कोणत्या मार्गानें सुकर व सुलभ होईल या विचारांत सरकार होतें. यावेळीं लोकांत विद्याभिरुचि मुळींच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. आईबाप मुलें शाळेंत धाडण्यास भीत असत. इंग्रजी शिक्षणाच्या संबंधानें लोकांच्या मनांत विलक्षण दुराग्रह होते. अशा स्थितींत कोणी एतद्देशीय इंग्रजी जाणणारा, वजनदार सुज्ञ पुरुष मदतीस घेतल्याशिवाय हें काम तडीस जाणार नाहीं, असें अंमलदारांच्या लक्षांत येऊन ते अशा गृहस्थाच्या शोधांत होते. अशा वेळीं ज्या मिशनरीपाशीं छत्रे इंग्रजी शिकले होते, त्यानें आपल्या शिष्याची शिफारस त्या अधिकाऱ्यांकडे केली व त्यांस त्यांजकडे नेऊन भेटविलें. त्यांचा ग्रह छत्रे यांजबद्दल फार अनुकूल झाला व त्यांच्या शिफारसीनें त्यांस देशी शाळांचे तपासनिसाची मोठ्या मानाची व चांगल्या पगाराची अशी जागा दिली. त्यांस हें काम १८१४ चे सुमारास मिळालें व तें त्यांनीं अखेरपर्यंत केलें." यांनीं विद्यार्थ्यांस प्रोत्साहन देऊन, त्यांच्यांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न करून, नांवालौकिकास आणले. अशा विद्यार्थ्यांपैकीं बाळशास्त्री जांभेकर व प्रसिद्ध वृत्तपत्रकार भाऊ महाजन हे होत.

छत्रे यांनीं बाळमित्र; इसापनीति (१८६१); 'वेताळपंचविशी' (१८५२) व सिंहासनबत्तिशी (१८५४) अशीं चार पुस्तकें लिहिलीं. यांतील पहिलीं दोन 'चिल्ड्रन्स फ्रेंडस' व 'इसॉप्स फेबल्स' यांचीं अनुक्रमें भाषांतरें आहेत. सुबोध, सरळ आणि सुरम्य अशी भाषापद्धति हा यांचा विशेष आहे.

**जांभेकर बाळशास्त्री:**—[१८१०-१८४६] शास्त्रज्ञ, संशोधक, निबंधकार. यांचा जन्म राजापूर तालुक्यांतील पोंभुर्लें या गांवीं झाला. यांचे वडील गंगाधरशास्त्री शंकरशेटच्या नामांकित घराण्याचे आश्रित होते असें म्हणतात. बाळशास्त्र्यांचें लहान वयांतच संस्कृत अध्ययन बरेंच झालें होतें. गीर्वाण भाषेशीं व तींतील प्रख्यात ग्रंथकारांच्या कृतींशीं त्यांचा चांगला परिचय असून, न्यायशास्त्र व व्याकरणशास्त्र यांत त्यांची पूर्ववयांत बरीच गति झाली

होती, असें पुष्कळ लोक सांगतात. ते एकपाठी होते म्हणून त्यांचे गुरु व सहाध्यायी त्यांस ' बृहस्पति ' म्हणत अशी लोकवार्ता आहे.

सन १८२१ त विद्यालयें स्थापन करण्याचा आपला उद्देश मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टननें एतद्देशीय लोकांस कळविला व या स्तुत्य कामीं त्यांची मदत मागितली. या समयीं शेटसावकार, जहागीरदार, मांडलिक राजे, यांनीं प्रशंसनीय औदार्य दाखविलें, असा लेख सांपडतो.

ता. २१ आगष्ट १८२२ रोजीं एज्युकेशन सोसायटीची शाळा मुंबईत स्थापन झाली. प्रारंभीं लोकांस एतद्देशीय भाषांतून शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला. जागोजाग शाळा स्थापल्या. त्यांवर देखरेख ठेवण्याकरितां हुशार व विद्वान् लोक नेमले. मराठी शाळांवर मुख्य " मुक्तसर " ( तपासनीस ) सदाशिव काशिनाथ छत्रे व जगन्नाथ शास्त्री क्रमवंत हे दोघे प्रथम होते. विद्यावृद्धीचे कामीं विशेष उत्साहानें व आस्थेनें पहिल्या गृहस्थांनीं मेहनत केली. आपले आप्त, सुहृद, परिच्चित यांस शिकण्याकरितां त्यांनीं मुंबईस आणलें व त्यांस शिक्षण देऊन पुढें मोठ्या योग्यतेस चढविलें. अशा लोकांपैकीं बाळशास्त्री हे एक होत.

बाळशास्त्री यांनीं इंग्रजी विद्यालयांत प्रविष्ट होऊन पांच वर्षांत तेथील सर्व अभ्यासक्रम पुरा केला. १८२८ च्या सुमारास त्यांचा हा अभ्यासक्रम पुरा झाला. या वेळीं भाषाज्ञान, इतिहास, गणितविषय यांत त्यांनीं चांगलें प्राविण्य मिळविलें. भाषाज्ञानांत व इतिहासांत त्यांची इतकी गति झाली होती कीं, ती आतांच्या एखाद्या नामांकित पदवीधरास देखील भूषणास्पद झाली असती. पण त्यांस विशेष आवड म्हटली तर शास्त्रीय विषयांची होती. ज्योतिषशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि आनुभविक व आध्यात्मिक शास्त्रांवर त्यांची विशेष भक्ति होती. ज्योतिषशास्त्रासारख्या प्रयोगपर व मानसशास्त्रासारख्या विचारपर शास्त्रांत इतर विद्यार्थ्यांबरोबर त्यांचा प्रवेश वर्गांत झालाच होता. जे ग्रंथ पूर्वोक्त क्लिष्ट विषयांवर त्या वेळीं उपलब्ध होते ते वाचून त्यांत ते इतके निष्णात झाले होते कीं, त्याची कल्पना प्रथम सर्वांस करतां आली नाहीं. गणितशास्त्रांत ते फार निष्णात होते, ही गोष्ट मात्र त्यांच्या शिक्षकांस व विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांस माहित होती, म्हणून प्रथमतः एल्फिन्स्टन् विद्यालयांत १८२९ सालीं त्यांस गणितशास्त्राचे अध्यापक ओर्लिबार यांचे हाताखालीं

उपाध्यापकाची जागा देण्यांत आली, व पुढें थोड्याच वेळांत त्यांस त्याच ठिकाणीं अध्यापकहि नेमण्यांत आलें. त्यांच्यापूर्वी हा मान एतद्देशीय गृहस्थास मिळालेला नव्हता. आपल्या लोकांमध्यें शास्त्रीबोवा पहिलेच ' प्रोफेसर ' होत. त्या वेळीं त्यांची पुरती विशी देखील संपली नव्हती. पुढें १८४२ त त्यांस एज्युकेशन इन्स्पेक्टरची जागा देण्यांत आली. हें काम त्यांनीं दोन अडीच वर्षें केलें. यानंतर सरकारनें १८४५ त नॉर्मल स्कूल स्थापन केलें. त्याचे ते अध्यक्ष झाले.

विद्यालयांतील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर शास्त्रीबोवा केवळ द्रव्यार्जनांतच गुंतून राहिले नाहींत. मराठी भाषेची एकनिष्ठपणें सेवा करण्याचें त्यांनीं व्रत अंगिकारिलें. त्यांनीं लहान मुलांकरितां ( १ ) बालव्याकरण. ( २ ) भूगोलविद्या ( १८३६ ). ( ३ ) नीतिकथा आणि ( ४ ) सारसंग्रह हे चार ग्रंथ लिहिले. या पुस्तकांतील भाषासरणी, मांडणी आणि विषयप्रतिपादन हीं फार सुबोध आणि सरळ आहेत. विशेषतः पहिल्या पुस्तकांतील व्याख्या फार व्यापक असून पुनः संक्षिप्त आहेत. कोणताहि विषय हातीं धरला म्हणजे त्याचें पूर्णपणें आकलन करून, त्याचें विवेचन ते किती मार्मिकपणें करीत, याची कांहींशी कल्पना या लहानशा पुस्तकावरून देखील करतां येईल.

एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाच्या आधारें आपल्या देशाचा इतिहास त्यांनीं रचला होता; परंतु हा ग्रंथ त्यांच्या हातून चांगल्या रीतीनें शेवटास गेला नाहीं. त्यांच्या मृत्यूनंतर मेजर क्यांडी यांनीं १८५१ त तो छापून प्रसिद्ध केला. या शिवाय शास्त्रीबोवांनीं इंग्लंडचा इतिहास लिहिला, मरेनें केलेलें व्याकरण शोधलें, भूगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र आणि गणितशास्त्र इतक्या विषयांवर ग्रंथ रचले. हे ग्रंथ हल्लीं फारसे उपलब्ध दिसत नाहींत. त्यांनीं मराठी भाषेचें एक मोठें व्याकरण लिहिलें होतें, अशी जुन्या लोकांत दाट वदंता होती. या पुस्तकाचा कांहीं भाग ' स्वतः शास्त्रीबोवांच्या येथें पाहिला होता असें एका वृद्ध गृहस्थांनीं आपणास सांगितल्याचें ' शास्त्रीबोवांचे चरित्रकार राजारामशास्त्री भागवत यांनीं लिहिलें आहे. या ग्रंथाचें हस्तलिखित व्याकरणकार दादोबा तर्खडकर यांचे हातास लागून त्यांनीं त्याचा उपयोग केला, अशी या काळीं बरीच वदंता होती. पण ती खोटी असल्याचें दादोबांनीं आपल्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत जाहीर केलें असून, ' बोर्ड ऑफ

एज्युकेशननें व्याकरण पुनः शोधण्याचें व रचण्याचें काम शास्त्रीबोवांच्या शिफारसीवरून आपणाकडे सोंपविलें होतें ', असा खुलासा केला आहे.

' हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास ' ( मुसलमानी अंमल ) शास्त्रीबोवांनीं लिहिला होता व तो शाळांच्या अभ्यासक्रमांत दाखल झाला होता. शून्यलब्धि गणीतहि त्यांनीं तयार केलें होतें.

बाळशास्त्री आणि भाऊ महाजन ( प्रभाकरकर्ते ) या उभयतांनीं मिळून ' शब्दसिद्धि निबंध ' नांवाचें एक पुस्तक रचिलें. यांत मराठी भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्तीच्या संबंधीं माहिती दिली आहे. या पुस्तकावरून दोन्ही कर्त्यांची शोधक बुद्धि व भाषाज्ञान हीं बरींच व्यक्त होतात. मृत्यूपूर्वी कांहीं दिवस आबट क्रांबीकृत ग्रंथाच्या आधारानें शास्त्रीबोवांनीं ' मानसशास्त्रा ' वर ग्रंथरचना करण्याचें काम हातीं घेतलें होतें, पण तें पूर्ण होऊं शकलें नाहीं.

मुंबई इलाख्यांत प्रथम वर्तमानपत्र काढण्याचें श्रेय शास्त्रीबोवांस दिलें पाहिजे. यांच्या मदतीनें त्यांचे विद्वान स्नेही भाऊ महाजन यांनीं ' दर्पण ' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें व दोघांनीं मिळून तें कित्येक वर्षें चालविलें. इंग्रजी व मराठी अशा दोन भागांत तें निघे. राजकीय, सामाजिक आणि व्यापारासंबंधीं मजकूर त्यांत येई. त्या वेळच्या लोकांत या पत्राचें मोठें वजन होतें. हरएक विषयाचा ऊहापोह त्यांत मोठ्या मार्मिकपणानें, निःपक्षपातानें व योग्य रीतीनें होई. या पत्राची मालकी प्रभु ज्ञातींतील रघुनाथ हरिश्चंद्रजी व सारस्वत ज्ञातींतील आत्माराम केशव भांडारे या दोन गृहस्थांकडे होती असें दिसतें. या पत्रांतील इंग्रजी मजकूर बाळशास्त्री लिहीत व मराठी मजकूर भाऊ महाजन लिहीत.

शास्त्रीबोवांनीं शास्त्रीय विषयांस वाहिलेलें ' दिग्दर्शन ' ( १८३७ ) नांवाचें मासिक काढलें होतें, पण त्यास भरपूर लोकाश्रय न मिळाल्यामुळें लवकरच तें बंद करावें लागलें.

शास्त्रीबोवा मुंबईतील ' रॉयल एशियाटिक सोसायटी 'चे व ' जिऑग्राफिकल सोसायटी'चे सभासद होते. या संस्थांकरितां त्यांनीं प्राचीन ताम्रपट, शिलालेख, भूगर्भशास्त्र, आणि वनस्पतिशास्त्र या विषयांवर लेख लिहून, त्यांच्या मासिक पुस्तकांत व अहवालांत ते प्रसिद्ध केले आहेत.

शास्त्रीबोवांची भाषासरणी सरळ, स्वाभाविक आणि सुबोध आहे. यद्यपि ते गीर्वाणभाषामिज्ञ पंडित व नांवाजलेले शास्त्री होते, तथापि त्यांच्या मराठी भाषेवर संस्कृताचें फाजील वर्चस्व झालेलें आढळून येत नाहीं. रिकामा डामडौल त्यांत नाहीं. उपमादिक अलंकार त्यांच्या भाषेंत फारसे आढळत नाहींत. लौकिक विषयांवर चर्चा करतांना लोकांचीं मनें विनाकारण न दुखविण्याविषयीं ते पुष्कळ जपत. त्यांची टीका समतोल असे.

शास्त्रीबोवांस ल्याटिन, ग्रीक, फ्रेंच, बंगाली, गुजराथी, हिंदुस्थानी, कानडी, तेलगु आणि फारसी या भाषांचें चांगलेंच ज्ञान होतें.

शास्त्रीबोवांच्या कार्याविषयीं सामर्थ्यानें लिहितांना राजारामशास्त्री भागवत म्हणतात, "त्यांनीं लोकमत उत्पन्न केलें, लोकांमध्यें सत्यासत्यविचार जागृत केला, दुराग्रह व दुर्मतें सोडण्याचा त्यांस उपदेश केला, मराठींत प्रथम साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू करून त्यांत इंग्रजींतहि निबंध लिहिण्याचा आणि सुशिक्षित लोकांच्या तर्फे राज्यकर्त्यांच्या कानावर रयतेचें गाऱ्हाणें घालण्याचा स्तुत्य क्रम आरंभिला. लोकांतील अज्ञानाच्या ध्वंसनार्थ प्रथम मराठींत मासिक पुस्तक सुरू केलें, इंग्रजी भाषेंत निबंध लिहून व आपला बहुश्रुतपणा इंग्रज लोकांच्याहि लक्षांत आणून, एतद्देशीयांच्या संबंधानें त्यांच्या मनाचा ओघ एकदम आपल्या लोकांस फायदेशीर होणाऱ्या दिशेकडे वळविला, मराठी भाषेंत नवीन तऱ्हेची पहिल्यानेंच ग्रंथरचना केली, सामाजिक विषयांवर विचारशील निबंध लिहून लोकांच्या हृदयभूमीमध्यें स्वदेशाभिमानाचें व स्वदेशोन्नतीचें बीज पेरलें."

बाळशास्त्र्यांच्या कामगिरीविषयीं राजारामशास्त्री भागवतांहून जरा वेगळ्या-तऱ्हेचें मत प्रो. दत्तो वामन पोतदार यांनीं आपल्या 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' या पुस्तकांत प्रदर्शित केलें आहे. ते म्हणतात, "एकंदरींत विचार करून पाहिलें असतां, जरी बाळशास्त्री जाडे विद्वान होते, तरी त्यांच्या हातून आमच्या मतें मराठी वाङ्मयाची कांहीं अलौकिक सेवा झाली असें वाटत नाहीं. छत्रे यांची भाषा व ग्रंथ अद्यापिहि गोड लागतात. परंतु बाळशास्त्री यांचे ग्रंथ, बहुतेक शालोपयोगी व प्रौढ असले तरी चटकदार किंवा रमणीय नाहींत. त्यांचा शास्त्रीय शोधावर व ज्ञानावर भर फार, यामुळें त्यांचें लिहिणें गंभीर परंतु जड लागतें. त्यांचे सहाध्यायी दादोबा किंवा समकालीन हरि केशवजी किंवा गुरु

बापू छत्रे यांचेप्रमाणें त्यांची लेखणी रसाळ नाहीं. शास्त्रीय वाङ्मयांत बाळशास्त्री यांची कामगिरी चांगली झाली. तथापि हरि केशवजी यांच्या ग्रंथाप्रमाणें त्यांचे ग्रंथांत मोहकपणा व कोमलता नाहीं. विद्वत्तेंत मात्र बाळशास्त्री या सर्वांहून निःसंशय वरचढ होते. त्यांची दांडगी पाठशक्ति, स्मरणशक्ति, व शोधबुद्धि यायोगें त्यांची छाप त्या वेळीं जबरदस्त बसली होती." ( म. ग. इं. अ. पृष्ठ ३६ )

**जांभेकर यांचें वाङ्मयः**—( १ ) हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास–मुसलमानी अंमल; ( २ ) हिंदुस्थानांतील इंग्लिशांचे राज्याचा इतिहास; ( ३ ) एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास; ( ४ ) भूगोलविद्या; ( ५ ) बालव्याकरण; ( ६ ) नीतिकथा; ( ७ ) शब्दसिद्धी निबंध; ( ८ ) सारसंग्रह.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) बाळ गंगाधर शास्त्री, चरित्र, राजारामशास्त्री भागवत.

( २ ) बाळ गंगाधर शास्त्री, चरित्र, बा. ना. देव, १८९२.

**जोग विष्णुबुवा**—[ १८६४–१९२० ] भागवतधर्मप्रचारक. बुवांचा जन्म पुणें येथें झाला. हे नैष्ठिक ब्रह्मचारी होते. यांचें शाळेंतील शिक्षण बेताचेंच होतें. यांस थोडेंसें इंग्रजी लिहितां बोलतां येत असे. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या दोन ग्रंथांचा अभ्यास करण्याची तळमळ बोवांत तरुणपणींच उत्पन्न झाली. ही तळमळ उत्पन्न होतांच त्यांनीं नानामहाराज साखरे यांजकडे सांप्रदायिकरीत्या त्या ग्रंथांचें अध्ययन केलें. व त्यांचेच जवळ 'वासुदेवमननाचें' मनन केलें. प्रसिद्ध केशवानंद उदासी यांचें शारीरभाष्य बुवांनीं सांग्रंत श्रवण केलें. याप्रमाणें वेदांतशास्त्रांत व ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांत त्यांतील खंद्या व निष्णात वक्त्यांच्या द्वारें बुवांनीं प्रवेश करून घेतला होता. तरी पण सामान्य प्रवाहांत सांपडणाऱ्या श्रोत्यांपैकीं ते एक नव्हते. बोवांचें त्यानें समाधान होईना. काशीचे प्रसिद्ध विद्वान् स्वामी कृष्णानंदस्वामी यांच्यापुढें त्यांनीं आपल्या शंका मांडल्या व समाधान करून घेतलें.

विष्णुबोवांची ज्ञानेश्वरांवरील निष्ठा जबर होती. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारार्थ आपला जन्म आहे असें ते मानीत. त्यांनीं आपलें सर्व आयुष्य पंढरी–आळंदीच्या वारींत, ज्ञानेश्वरी–अमृतानुभवाचे चर्चेत, कीर्तनांत व परमार्थ ग्रंथ लिहिण्यांत व शिकविण्यांत घालविलीं. महिपतीनें निवडलेले 'ज्ञानेश्वरीचे

सार्थ वेंचे', 'तुकोबारायांच्या अभंगांच्या सार्थ गाथा', 'चांगदेव पांसष्टी', 'हरिपाठ सार्थ', 'सार्थ व सविवरण अनुभवामृत' व 'वेदांतविचार' हे ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत.

वारकरी सांप्रदायाचें शिक्षण देण्याकरितां यांनीं आळंदीस स्वतःच्या पदरचे पंचवीस हजार रुपये खर्च करून 'वारकरी शिक्षण संस्था', या नांवाची संस्था स्थापन केली.

**जोशी अण्णा मार्तंड:**—[ १८४८–१८९८ ] नाटककार. अण्णा किर्लोस्कर यांचे हे समकालीन होत. अण्णासाहेबांस हे गुरुस्थानीं समजत असत. अण्णासाहेब बेळगांवास असतांना 'भरतशास्त्रोत्तेजक' या नांवाची एक मंडळी स्थापन झाली होती. तिच्या उत्पादकांपैकीं हे एक होते. त्यानंतर मुंबईस १८७९ सालीं उद्योगानिमित्त आले असतांना याच नांवानें तेथील हौशी मंडळी जमा करून ते नाटकाचे प्रयोग करीत असत. त्यांनीं 'संगीत सौभाग्यरमा', 'संगीत सावित्री' व 'संगीत छत्रपतिविजय' अशीं तीन स्वतंत्र नाटकें रचलेलीं उपलब्ध आहेत. या नाटकांचे प्रयोग 'आर्यनाट्य-कलोत्तेजक' नांवाच्या मंडळीच्या द्वारें फक्त मुंबई शहरांत होत असत. 'सौभाग्यरमा' नाटक सामाजिक होतें, त्यामुळें त्याच्या प्रयोगासंबंधानें कांहीं दिवस मुंबईशहरांत नाटक पाहणाऱ्या लोकांत उत्सुकता होती. अण्णा मार्तंड हे सुधारक मताचे होते. त्यांनीं नाटकाच्या द्वारें अबला स्त्रियांच्या दुःखद स्थितीचें चित्र रमा नाटकांत उठविलें आहे. नोकरी संभाळून ते नाटकें लिहिण्याचें काम करीत; व तीं तयार झालीं म्हणजे आपल्या छात्रवर्गाकडून त्यांचे रंगभूमीवर प्रयोग करवीत. ( आधार–रंगभूमि, वर्ष ५ ).

**जोशी अण्णा मार्तंड यांचें वाङ्मय:**—( १ ) संगीत सौभाग्यरमा; ( २ ) संगीत सावित्री; ( ३ ) संगीत छत्रपतिविजय.

**जोशी पुरुषोत्तम बाळकृष्ण**—[ १८५६–१९३० ] कवि व इतिहाससंशोधक. यांचा जन्म मुंबई येथें झाला. शिक्षण विल्सन कॉलेजांत झालें. सर जेम्स कँबेल यांस मुंबई इलाख्याचें गॅझेटीयर तयार करण्याचे कामीं, तसेंच सर जॉर्ज फॉरेस्ट, मि. एडवर्डस्, मि. एंथोव्हेन इत्यादि विद्वान् लेखकांच्या

ग्रंथांस यांनीं इतिहासंशोधनद्वारा महत्त्वाचें साहाय्य केलें. यांच्या संशोधन-विषयक कामगिरीबद्दल यांस मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीकडून 'कॅम्बेल मेमोरियल मेडल्' देण्यांत आलें होतें. यांना कविता करण्याचा फार नाद असे. भारतवर्षिणी, समाधिशतावली, भरतखंडाचें भावी स्वराज्य, परिषदाभिनंदन, श्रेष्ठत्वाचा झगडा वगैरे यांच्या कविता बऱ्यापैकीं आहेत. यांच्या कवितेची रचना प्रौढ व हृदयंगम आहे. यांनीं आयुष्याच्या उत्तरार्धाचे अखेरी अखेरीस 'उत्तर कोंकणचा इतिहास' नांवाचें पुस्तक लिहिलें होतें.

**जोशी यांचें वाङ्मयः**—काव्यें—( १ ) काव्यरत्न १ लें; ( २ ) पद्यसुधा ( ३ ) मुक्तावली अगर ईश्वराराधनेची नवीन मराठी कविता, १८७४; ( ४ ) शिवदुःखाश्रुमार्जन, १८८६; ( ५ ) समाधिशतावलि, १८८५; ( ६ ) युवराज-निधन काव्य १९०९; ( ७ ) आधुनिक कविताप्राप्ति १९१२. गद्यग्रंथ—( १ ) उत्तर कोंकणचा इतिहास.

**जोशी महादेव मल्हारः**—[ मृत्यू १९२८ ] तत्वज्ञ व मार्मिक टीकाकार. हे डेक्कन कॉलेजांतून एम. ए. झाले. यांनीं कांहीं वर्षे अहमदनगर येथील हायस्कूलवर मुख्याध्यापक म्हणून काम केलें व १९०२ सालीं जुनागड येथील बहाउद्दीन कॉलेजला ते येऊन मिळाले. याच ठिकाणीं ते अखेरपर्यंत अध्यापनाचें काम करीत होते. यांचा व्यासंग बहुविध व दांडगा होता. 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' या लहानशा पुस्तकाखेरीज यांजकडून ग्रंथ असा लिहिला गेलेला नाहीं. परंतु नियतकालिकांतून त्यांनीं प्रसिद्ध केलेले वाङ्मयविषयक लेख महत्त्वाचे आहेत. नवयुग मासिकांतून त्यांची 'स्वामी सच्चिदानंदाचे वाङ्मयविषयक विचार' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेली लेखमाला विशिष्ट लेखनपद्धतीचा व विचार-पद्धतीचा नमुना म्हणून वाचण्याजोगी आहे.

**जोशी यांचें वाङ्मयः**—( १ ) आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त, १९१०.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) चरित्रलेख, पारसनीस, मनोरंजन, एप्रिल १९२८.

( २ ) आधुनिक सुशिक्षितांचा वेदांत, चर्चा, आचार्यपाक्षिक, वर्ष २, पृष्ठ २५७–२६०, २८९–२९४.

**जोशी बापु पुरुषोत्तमः**—[ १८३५–१९२१ ] इंग्रजी कायद्यांच्या पुस्तकांचा भाषांतरकार. यांचा जन्म नगर जिल्ह्यांतील टोकें या गांवीं झाला. यांचे एक पणजे बाळशास्त्री हे शेवटच्या बाजिरावाचे कारकीर्दीत न्यायाधीश होते. त्याचप्रमाणें यांचे वडील पुरुषोत्तमपंत हे सरदार बापु गोखले यांच्या पथकांत शिलेदार होते. पेशवाई बुडाल्यावर बाजिरावाबरोबर ते ब्रह्मावर्तास गेले. पुढें तेथून नोकरी सोडून ते नगर जिल्ह्यांतील टोकें गांवीं आले. यावेळीं त्यांची अत्यंत गरिबी होती. त्यामुळें बापूंचें शिक्षण बेताचेंच झालें. त्यांनीं सासवडास मराठी शाळेंत ५ रुपये पगारावर नोकरी धरली. पुढें शाळाखात्यांतील ट्रान्स्लेटरचे कचेरींत कारकुनाची नोकरी करीत असतां त्यांनीं क्रिमिनल प्रोसिजर क़ोड, पिनलकोड, सिव्हिल प्रोसिजर कोड, यांचीं मराठी भाषांतरें केलीं. या भाषांतरामुळें त्यांस कायद्याची गोडी लागून त्यांनीं १८६२ त वकिलीची परीक्षा दिली. परीक्षा दिल्यावर वकिली न करतां त्यांनीं आपला रेव्हिन्युखात्यांत प्रवेश करून घेतला. १८६७ सालीं ते सांगोलें येथें प्रथम मामलेदार झाले. या जागेवरून वाढत वाढत ते डेप्युटी कलेक्टर झाले. १८९१ त यांनीं पेन्शन घेतलें. यांनीं आपलें शेष आयुष्य ईश्वरचिंतनांत, धर्मकृत्यांत व यात्रांत घोलविलें.

**जोशी रामचंद्र भिकाजीः**—[ १८५६–१९२७ ] शालोपयोगी व्याकरणकार, निबंधकार व वाङ्मयेतिहासकार. रत्नागिरी जिल्ह्यांतील मुरुड हें यांचें गांव. प्रिव्हियसपर्यंत शिक्षण झाल्यावर यांनीं पुणें येथील न्यु इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी धरली. हे स्वतः सुधारकपंथीय असूनहि विष्णुशास्त्री चिपळूणकरांबद्दल त्यांस विलक्षण आदर वाटे. या आदराचें निदर्शक म्हणजे त्यांनीं ‘ निबंधमाले ’च्या धर्तीवर काढलेलें ‘ निबंधचंद्रिका ’ मासिक होय. हें मासिक त्यांनीं ३।४ वर्षें मोठ्या चिकाटीनें चालविलें. यांनीं विद्यार्थ्यांकरितां ‘ शिशुव्याकरण ’, ‘ बालबोध व्याकरण ’ व ‘ प्रौढबोध व्याकरण ’ अशीं तीन व्याकरणाचीं पुस्तकें लिहिलीं आहेत. व्याकरणाच्या पुस्तकांव्यतिरिक्तहि त्यांचीं कांहीं पुस्तकें आहेत. यांपैकीं ‘ मराठी भाषेची घटना ’ हें महत्वाचें होय. मराठी भाषेचा आजतागायतचा इतिहास साकल्यानें व्यवस्थितपणें मांडणारें असें हें पहिलेंच पुस्तक होय. यांचा मराठी वाङ्मयावरील अभ्यास सूक्ष्म व बहुत दिवसांचा होता.

**जोशी रा. भि. यांचें वाङ्मयः—** ( १ ) मराठी भाषेची घटना, ( २ ) मराठी शब्दसिद्धि, १९१०; ( ३ ) सुलभ अलंकार १९१२; ( ४ ) प्रौढबोध व्याकरण; ( ५ ) बालबोध व्याकरण, १८९०; ( ६ ) पद्यसमुच्चय, १८८५।१८८७; ( ७ ) रत्नागिरी जिल्ह्याचा भूगोल.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) मराठी भाषेची घटना–दोषदिग्दर्शन, वाकसकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ५१, अंक ६, १९२०.
( २ ) मराठी भाषेची घटना–टीका, शं. श्री. देव. रामदास–रामदासी, वर्ष ५, अंक ४९, पृष्ठ १२८–३६.
( ३ ) जोशीकृत व्याकरणाचीं दोन पुस्तकें, चर्चा, दांडेकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४०, अंक ५, १९०९.
( ४ ) बालबोध व्याकरण दुसरें, परीक्षा, ना. गो. चांफेकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४०, अंक ९, १९०९.
( ५ ) जोशीकृत व्याकरणाचीं दोन पुस्तकें, दांडेकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ५१, अंक ४।५, १९१०.

**टिपणीस गोविंद गोपाळ**—[ १८६७–१९२५ ] प्राचीन काव्याभ्यासक व निबंधकार. यांचा जन्म महाड येथें झाला. यांचे वडील गोपाळराव हे महाडांतील सुखवस्तु घरंदाज कायस्थ प्रभु घराण्यांतील गृहस्थ असून, ते गोंडाळे गांवचे अर्धे हिस्सेदार खोत होते. गोविंदरावांचे बालपणींच ते वारले. यांचें दुय्यम शिक्षण पुण्यास झालें. हे कांहीं दिवस कॉलेजांतहि शिक्षण घेत होते. परंतु आपल्या गैरहजेरींत आपल्या जमीनजुमल्याची अव्यवस्था होऊन आपण सफै बुडूं असें वाटूं लागल्यामुळें, पुढील शिक्षणाची इच्छा दाबून त्यांस घरीं राहावें लागलें.

गोविंदरावांनीं पोक्तपणानें पुढलें शिक्षण सोडलें खरें, पण जी विद्येची गोडी, ज्ञानाची लालसा व लोकोपयोगी काम करण्याची हौस पुण्यांतल्या त्यांच्या विद्यार्थिदशेंत त्यांच्यामध्यें उद्भूत झाली होती, ती आमरणांत कायम राहिली व त्यामुळेंच त्यांच्या हातून झालें इतकें काम झालें.

गोविंदरावजींना विद्यार्थिदशेंत मराठी कविता, मराठी बखरी वगैरे जुनें वाङ्मय वाचण्याचा नाद लागला. ते या वयांत कविताहि करीत असत. त्यांनीं 'राकेल राक्षस' या नांवाची राकेल तेलाच्या उपयोगानें होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल एक कविता छापून काढली होती. त्यांच्या पूर्ववयांत त्यांचा सामाजिक विषयांकडे विशेष ओढा असे. कै. आगरकर यांनीं १८८८ मध्यें सुधारक काढला, त्या पत्राकरितां गोविंदरावजींनीं सामाजिक विषयावर विद्यार्थिदशेंत 'लग्न' या विषयावर एक लेखमाला लिहिली. आपल्याच वर्गांत व आपल्या हाताखालीं शिकणाऱ्या विद्यार्थ्यानें इतके चांगले लेख लिहिले याबद्दल आगरकरांनीं गोविंदरावांचें कौतुक केलें व त्यांचे लेख सुधारकांत छापले. पुढें महाडास गेल्यावर गोविंदराव पुष्कळ वेळां सुधारकांत लिहीत असत. आपल्या कायस्थ प्रभू जातीमध्यें पुनर्विवाहाचा प्रचार सुरू करण्याकरितां त्यांनीं पुष्कळ लेख लिहून मोठी चळवळ केली व त्यांच्या एका स्वज्ञातीय स्नेह्यानें प्रत्यक्ष पुनर्विवाह करून त्यांच्या चळवळीला मूर्तरूप आणलें.

गोविंदरावांचे गुरु आगरकर यांचेप्रमाणेंच गोविंदराव बहुरंगी लेखक होते. त्यांना निरनिराळ्या विषयांची हौस असे. राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक अशा सर्व प्रश्नांसंबंधी ते वाचीत, विचार करीत व वेळोवेळीं वर्तमानपत्रांत लेख लिहीत. पण पुढें पुढें मराठी साधुसंतांच्या कवितांवर त्यांची विशेष भक्ति जडली यांत शंका नाहीं. व त्यांनीं जुन्या वाङ्मयाचा जास्त आस्थेवाईक व शास्त्रीय अभ्यास सुरू केला.

कै. हरिपंत गोखले यांनीं ज्ञानप्रकाश पत्र व छापखाना विकत घेतल्यावर कांहीं दिवसांनीं हरिपंतांनीं गोविंदरावजी टिपणीस यांस त्या वर्तमानपत्राचे संपादक नेमलें होतें. ज्ञानप्रकाश साप्ताहिक असतांना व पुढें तें दैनिकपत्र झाल्यावर कांहीं दिवस गोविंदरावजी हे ज्ञानप्रकाशचे संपादक होते. पुढें बऱ्याच कालानंतर त्यांनीं 'महाराष्ट्रसाहित्य' नांवाचें स्वतंत्र मासिक काढलें व त्याचें संपादकत्व त्यांनीं कांहीं वर्षें केलें. मासिक मनोरंजनांत ते पुष्कळ वेळां लिहीत असत व 'संतांचा परिचय' या नांवाखालीं त्यांनीं मराठींतील साधुसंतांचीं अल्प चरित्रें व त्यांच्या ग्रंथांचें सटीक सार देणारी एक बरीच मोठी लेखमाला त्यांत लिहिली होती. महाराष्ट्रदेशांतील जनतेला वेदासारख्या वंद्य असलेल्या मराठी चार संतकवींच्या कवितांतील निवडक वेंचे 'महाराष्ट्र वेद' या नांवाखालीं

चार पुस्तकांत छापण्याची गोविंदरावजींची कल्पना मासिक मनोरंजनाचे मालक कै. काशिनाथपंत मित्र यांस पसंत पडून त्यांनीं तुकाराम व एकनाथ या दोन संतांच्या कवितांचे वेंचे आपल्या हयातींत छापून काढले. पुढें कै. मित्रांच्या मृत्यूमुळें तें काम मागें पडलें. पुनः कांहीं दिवसांनीं मनोरंजन छापखान्यानें तें काम अंगावर घेऊन ज्ञानेश्वरीच्या कवितेच्या वेंच्यांचें पुस्तक छापून काढलें. हें पुस्तक छापलेलें पाहण्यास गोविंदरावजी जगले नाहींत.

गोविंदरावजींचें आयुष्य कोकणांतील, रेलवेपासून फार दूर अशा, गांवीं गेल्यामुळें त्यांच्या सार्वजनिक कामाचा फारसा गाजावाजा झालेला नाहीं. पण महाड गावांत व कुलाबा जिल्ह्यांत अशी एक चळवळ किंवा सार्वजनिक काम सांपडावयाचें नाहीं कीं, ज्यांत गोविंदरावजींनीं प्रमुख भाग घेतला नाहीं. त्यांना सार्वजनिक कामाची विलक्षण हौस होती. त्याकरितां ते स्वतः आंग-मेहनत करीत, पैशाची घस सोशीत, पण हातीं घेतलेलें काम यशस्वी रीतीनें पार पाडीत. त्यांची विविधज्ञानलालसा व भाषानैपुण्यहि वाखाणण्यासारखें होतें. ते उत्तम प्रकारचे वक्ते व नटहि होते. सर्व महाराष्ट्रभर नाणावलेल्या महाराष्ट्र नाटक मंडळीच्या उत्पादकांपैकीं ते एक होते व त्या मंडळीच्या प्रथमावस्थेंत त्यांनीं नाटकांत कामेंहि केलेलीं होतीं.

मुंबईच्या विश्वविद्यालयानें बी. ए. च्या परीक्षेला ऐच्छिक विषयामध्यें मराठीचा अंतर्भाव करण्याचा ठराव १९२० मध्यें पास केला. या ठरावाप्रमाणें डेक्कन व एल्फिन्स्टन या कॉलेजांत मराठीच्या प्रोफेसराच्या दोन जागा निर्माण करण्यांत आल्या. यांपैकीं एल्फिन्स्टन कॉलेजांतील जागा त्यावेळचे शिक्षणमंत्री रँ. परांजपे यांनीं टिपणीस यांस दिली. या जागेवर काम करीत असतांच ते दम्या खोकल्याच्या विकारानें वारले. ( प्रो. गो. चि. भाटेकृत चरित्रलेखाचा संक्षेप ).

**टिपणीस यांचें वाङ्मयः**—( १ ) रायगडची माहिती; ( २ ) उत्तररामचरित १९१०; ( ३ ) बेंजामिन फ्रांकलिन यांचें चरित्र १८९६; ( ४ ) साक्रेटीस आणि त्याचे विचार, १९१६; ( ५ ) हिंदुस्थानांतील दुष्काळ, १९०५; ( ६ ) सरकार आणि कुलाबा जिल्ह्यांतील खोत, १९१६; ( ७ ) तुकाराम—वेंचे, १९१६; ( ८ ) एकनाथ—वेंचे; ( ९ ) ज्ञानेश्वर—वेंचे, १९२५; ( १० ) संतांचा परिचय—विस्तृत लेखमाला, मासिक मनोरंजन, वर्ष, १७, १८, १९.

**टिळक नारायण वामनः**—[ १८६२-१९१९ ] कवि. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यांत करझगांवीं झाला. हें त्यांचें आजोळ. वामनराव तलाठी असल्यामुळें त्यांस नेहमीं फिरतीवर जावें लागे व म्हणून त्यांनीं आपलीं मुलेंमाणसें करझगांवींच ठेवलीं होतीं. येथेंच नारायणाच्या आयुष्याचीं पहिलीं सात वर्षें गेलीं. बाळपणींच्या या भावनाविवश काळांत नारायणाच्या मनांत निसर्गप्रीति व धार्मिक वृत्ति हे दोन संस्कार रुजले गेले आणि तेच त्याच्या काव्यांत पुढें प्रामुख्यानें उमटले.

करझगांव महाबळेश्वराच्या डोंगराच्या पायथ्याशीं आहे. या डोंगराचा समुद्रदर्शनी भाग सोसाट्याच्या वाऱ्यांच्या योगानें अगदीं रुक्ष झालेला आहे. पण पायथ्यापासून समुद्रापर्यंतचा भाग अत्यंत सुपीक, वनसृष्टीनें शोभणारा, निर्झरगानानें निनादित असा आहे. अशा रम्य निसर्गपरिवारांत बालवयांतलीं कोमल वर्षें गेल्यामुळें टिळकांच्या मनांत निसर्गप्रीति जी ठसली ती कायम राहिली. म्हणूनच त्यांच्या काव्यांत सृष्टीशीं केलेलीं हितगुजें फार सांपडतात.

टिळकांचे आजोबा विरक्त वृत्तीचे गृहस्थ होते. सर्व काळ भजनपूजनांत घालवावा हा त्यांचा नित्यक्रम. नारायणाला घेऊन, ते जंगलांत जात आणि तेथें त्याच्याबरोबर भजन म्हणत नाचत. त्यांच्यापासूनच टिळक नाचण्याबागडण्याची आवड, मुलांविषयीं लडिवाळपणा वगैरे गुण शिकले. पण आजोबांच्या सान्निध्यानें नारायणाच्या मनावर झालेला सर्वांत महत्वाचा परिणाम म्हणजे धर्मबुद्धीची जागृति होय.

इ. स. १८६९ मध्यें वामनरावांची बदली चिखलगांवाहून मोरवाड्यास झाली. आणि त्यांनीं आपलें बिऱ्हाड कल्याणला नेलें. या ठिकाणीं काढलेल्या चार वर्षांत नारायणाचें मराठी शिक्षण झालें. १८७३ त त्याच्या आयुष्यांतील एक महत्त्वाचा प्रसंग घडला तो म्हणजे त्याची आई जानकीबाई यांचा मृत्यु होय. जानकीबाई आजारी असतां वामनरावांचा निरोप आला कीं, मी आजारी आहें, ताबडतोब निघून यावें. त्याचप्रमाणें जानकीबाई मुलांनिशीं पायीं जाऊन पहातात तों वामनरावांचा आजार म्हणजे स्वतःची पारख करण्यासाठीं पांघरलेलें ढोंग होतें. पण या परीक्षेचा विपरीत परिणाम होऊन, जानकीबाई जास्तच आजारी पडल्या, व त्यांतच त्यांचा अंत झाला.

नारायणाला आईविषयीं फारच प्रेम व आदर वाटे. जानकीबाईंना लिहितां वाचतां चांगलें येत असून त्यांस कवनें रचण्याचाही नाद होता. टिळक आपल्या काव्यस्फूर्तीचा उगम आईपासूनच झाला असें मानीत. अर्थातच आईच्या मृत्यूचा परिणाम त्यांच्या मनावर फार झाला. नारायणाच्या असामान्य स्वभावामुळें या परिणामाचें स्वरूपही विपरीतच होतें. आईच्या मृत्यूबरोबर आपला घराण्याशीं संबंध सुटला, आतां आपण ·स्वावलंबी बनलें पाहिजे असा त्यानें निर्धार केला.

म्हणून आईच्या उत्तरक्रियेसाठीं तो जो त्रिंबकेश्वराला गेला तो परत आला नाहीं. स्वतंत्रपणें नाशकांतच राहिला. सुदैवानें तेथें त्याची चांगल्या माणसांशीं गांठ पडली, शिवाय गणेशशास्त्री लेल्यांसारखे गुरु त्यांस लाभले. म्हणून त्याचें संस्कृत शिक्षण जुन्या शास्त्रीय पद्धतीनें परिपूर्ण झालें. हें त्याचें शिक्षण सुमारें चार वर्षें चालू होतें. १८७७ च्या सुमारास नारायणानें इंग्रजी शिकण्यास सुरवात करून दोन वर्षांत पांच इयत्तांचा अभ्यास पार पाडला. पण दुर्दैवानें तो अभ्यास त्यास पुरा करतां आला नाहीं. कारण वामनरावांनीं त्याच्याकडे चार धाकटीं भावंडें पाठवून आठ रुपयांत निर्वाह करण्यास सांगितलें. म्हणून नारायणाला इंग्रजी सहावी यत्तेंत असतांच शाळा सोडून नोकरी धरावी लागली. नोकरी धरतांच विवाह करण्याविषयीं आप्तांचा लकडा त्याच्या पाठीमागें लागला. आणि नाशिकजवळील जलालपुर बेटांत रहाणाऱ्या गोखल्यांच्या मनुबाईशीं नारायणाचा विवाह १८८० त पारही पडला.

नाशिकमधील या आठ वर्षांना टिळकांच्या चरित्रांत बरेंच महत्त्व आहे. येथेंच त्यांना संस्कृत व इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला व काव्यरसाची गोडी लागली. त्यांच्या कवित्वशक्तीचा प्रथम प्रादुर्भावही येथेंच झाला. शिवाय त्यांच्या बालपणांत जे संस्कार त्यांच्या मनावर झाले होते ते येथें दृढतर झाले. गोदावरीचा स्निग्ध गंभीर प्रवाह, घाटावरील देवळें, दाट वनराई, आकाशांतील अभ्रपटलें हीं सर्व त्यांच्या निसर्गप्रेमाला पोषक झालीं; आणि नाशिकांतील धार्मिक वातावरणानें त्यांच्या धर्मप्रवृत्तीला जोर दिला. आणखी एक संस्मरणीय गोष्ट ही कीं, नाशिक येथेंच त्यांना देशभक्तीचें बाळकडू मिळालें. त्यांच्या शाळेंतील एका शिक्षकाच्या स्फूर्तिपूर्ण वाणीनें त्यांच्या मनांत देशाविषयीं जीवंत कळकळ उत्पन्न झाली आणि तिचा त्यांच्या पुढील सर्व आयुष्यावर परिणाम झाला.

या सर्व संस्कारांचें पर्यवसान असें झालें कीं, विवाहानंतर लगेच टिळकांनीं नाशिक सोडलें, आणि अकरा वर्षें सर्व महाराष्ट्रभर भटकण्यांत घालविलीं. या अकरा वर्षांत त्यांनीं खानदेश, वऱ्हाड, पुणें, मुंबई, मुरबाड, वणी, इत्यादि अनेक ठिकाणीं वास्तव्य केलें; व पुराणिक, कीर्तनकार, छाप जुळविणार, शाळामास्तर इत्यादि अनेक व्यवसाय केले. पण या सर्व भ्रमणांत त्यांना दोन उत्कंठा लागलेल्या दिसून येतात–देशोन्नतीची कळकळ आणि ईश्वराचा ध्यास. या दोन्ही भावनांचें पर्यवसान त्यांच्या बाबतींत एकच झालें.

आपल्या देशाची कष्टदशा कशी संपेल, विशेषतः त्याचें मानसिक दास्य कसें नष्ट होईल हा ध्यास त्यांना लागला होता. आणि त्यांच्या बुद्धीनें या दोन्ही प्रश्नांचें एकच उत्तर दिलें. तें हेंच कीं नवधर्मस्थापना हाच हिंदुस्थानचा तरणोपाय आहे. खानदेशांत एका बंगाली साधूशीं गांठ पडून त्यांचें या बाबतींत एक मत दिसून येतांच टिळकांचा हा विचार जास्तच दृढ झाला. पुष्कळदां तर आपणच या नवीन धर्माचे संस्थापक होऊं असें त्यांस वाटे. व त्यास आवश्यक अशी चमत्कारक्षमता मिळविण्यासाठीं त्यांनीं योगाचा अभ्यास सुरू करून थोडी सिद्धिही मिळवली होती. पण लवकरच त्यांस आढळून आलें कीं लोकांचें लक्ष आपल्या उपदेशाकडे नसून, केवळ स्वहित साधावयाकडेच आहे. यामुळें त्यांनीं योगाभ्यासाचा आणि धर्मस्थापनेचा खटाटोप सोडून दिला.

इ. स. १८९१ सालीं टिळकांनीं आपल्या भ्रमणाचा शेवट केला. कारण स्वतःची धर्मजिज्ञासा तृप्त होण्याची संधि त्यांना दिसून आली. नागपूर येथें श्री. अप्पासाहेब बुटी यांनीं अपार पैसा खर्च करून धार्मिक संस्कृत ग्रंथ जमा केले होते. त्यांचें संशोधन व भाषांतर करण्याच्या कामावर त्यांनीं टिळकांची नेमणूक केली, व महिना चाळिस रुपये पगार, शिवाय रहावयास घर दिलें. तेव्हां टिळक बिऱ्हाड करून नागपुरास राहूं लागले.

नागपुर येथेंच टिळकांची कवि म्हणून कीर्ति प्रथम पसरूं लागली. शिवाय त्यांच्या धर्ममतांची परिणतिहि येथेंच झाली. बुटींचा अलोट ग्रंथसंग्रह पाहून, त्यांना फार आनंद झाला. पण त्यांच्या चौकस बुद्धीच्या प्रशमनार्थ इतका वेळ खर्च होई कीं, भाषांतराचें काम मागेंच पडे. त्यांच्या धर्माभ्यासाचें फल म्हणजे बुटींच्या सांगण्यावरून काढलेलें धर्मचर्चेला वाहिलेलें 'ऋषि' नांवाचें

मासिक होय. परंतु या मासिकाला कांहीं फार दिवस आयुष्य लाभलें नाहीं. लवकरच त्यांच्या प्रगतिपर मतांमुळें टिळकांना मासिकाचें संपादकत्व व बुटींची नोकरी सोडावी लागली.

त्यानंतर लगेच त्यांनीं राजनंदगावच्या नोकरीचा स्वीकार केला. व रुजू होण्यासाठीं नागपूरहून त्या गांवीं जात असतां गाडींत त्यांची एका ख्रिस्ती धर्मगुरूशीं गांठ पडली. टिळकांनीं आपलीं धर्ममतें त्यांस सांगतांच तुम्हीं दोन वर्षांत ख्रिस्ती व्हाल असें त्यानें भविष्य वर्तविलें व तें खरेंही ठरलें. त्याच्या-पासून घेतलेलें बायबल टिळकांनीं वाचलें, इतरही धार्मिक ख्रिस्ती वाङ्मयाचा अभ्यास केला, आणि अंतःकरणाची खात्री होऊन त्यांनीं १८९५ च्या फेब्रुवारी महिन्यांत बाप्तिस्मा घेतला.

यानंतर टिळकांनीं १८९५–१९१७ पर्यंतचा काळ अहमदनगरला, व १९१७–१९ पर्यंतचा अखेरचा काळ सातार्‍याला ख्रिस्ती धर्माच्या सेवेंत घाल-विला. पण बाप्तिस्मा घेऊन अहमदनगरच्या मिशनमध्यें राहण्यास सुरवात केल्याबरोबर त्यांच्या मानसिक उत्क्रांतीचा इतिहास संपला असें म्हणावयास हरकत नाहीं. यावेळींच त्यांच्या मनाची तळमळ शांत होऊन, त्यांचें आयुष्यांतील ध्येय ठरलें व पुढें तें केव्हांही बदललें नाहीं. ख्रिश्चन मिशनरी म्हणून त्यांनीं केलेल्या कामगिरीचा त्यांच्या काव्यावर तादृश परिणाम झाला नाहीं. धर्मांतराचें प्रतिबिंब जर त्यांच्या काव्यांत कुठें दिसत असेल, तर ख्रिस्तविषयक उत्कट भक्तींत. पण यांतही विशिष्ट ख्रिस्ती भाग थोडा आहे. ईश्वरविषयक भक्ती येथूनतेथून सारखीच. एखादा हिंदु रामाचा धांवा करील तर टिळक ख्रिस्ताचा करतात एवढाच काय तो फरक.

मिशनरी म्हणून टिळकांनीं केलेल्या एका कार्याचा मात्र येथें अवश्य उल्लेख केला पाहिजे. त्यांचा मिशनकार्यांत प्रवेश होण्यापूर्वी हिंदी ख्रिस्ती लोक आपल्या देशभाषाविषयक आत्मीय भावनेला पारखे झालेले होते. टिळकांनीं ही परिस्थिति पार बदलून टाकली. त्यांच्या अंगीं विचित्रच कां होईना पण कळकळीची देश-भक्ति होती; आणि त्यांच्या भाषाभिमानाला तोड क्वचितच सांपडेल. ख्रिस्ति लोकांनाही देशहितरत कसें रहातां येईल हें त्यांनीं दाखवून दिलें; ख्रिस्ति समाजाच्या मराठी भाषेंत त्यांनीं घडवून आणलेली क्रांति तर खरोखर अपूर्व

होय. पूर्वीची घेडगुजरी मराठी त्यांनीं नामशेष केली; उपासना आणि प्रवचनें मराठींत करण्याची पद्धत पाडली; जुन्या चालीवर भजनें रचून त्यांचा प्रसार व प्रचार केला; इतकेंच नव्हे तर कीर्तनाचाही प्रकार त्यांनीं ख्रिस्ती लोकांत नेला. ख्रिस्ती धर्माच्या स्वीकारामुळें घडून येणारी सांस्कृतिक व भाषाविषयक फारकत अशा रीतीनें, थांबवून हिंदी ख्रिस्त्यांचें धर्ममंदिर हिंदी पद्धतीवर व हिंदी परंपरेला अनुसरून उभारलें पाहिजे हें नवीन तत्त्व त्यांनीं प्रस्थापित केलें.

या चरित्रनिवेदनावरून टिळकांची मनोभूमिका स्पष्ट होईल. त्यांच्या भावनोत्कट मनाला लहानपणापासून देशोन्नतीचा व अध्यात्माचा ध्यास लागला होता. ख्रिस्ती धर्मविषयीं मनाची खात्री होतांच त्याच्या अध्यात्मध्यासाचें भक्तींत रूपांतर झालें, आणि देशभक्तीचा प्रवाह लोकांना ख्रिस्ताचा संदेश पटविण्याच्या प्रयत्नांकडे वळला. कारण ख्रिस्ती धर्माचा स्वीकार हा हिंदुस्थानचा एकच तरणोपाय आहे, असा त्यांच्या मनाचा निर्धार झाला होता. त्यांच्या मनाच्या या सर्व भावना त्यांच्या कवितेला प्रेरक झालेल्या दिसून येतात. याशिवाय कौटुंबिक वागणुकींतील प्रमळपणा, पुष्पादिक निसर्गगोष्टीवरील ममता, कार्यधडाडी, श्रमसहिष्णुता इत्यादि अनेक गुण टिळकांच्या ठिकाणीं वसत होते आणि विशेषतः पहिले दोन त्यांच्या काव्यांत दृग्गोचर होतात.

टिळकांच्या काव्यस्फूर्तीचा जन्म नाशिकला संस्कृत काव्यांच्या परिशीलनापासून झाला, आणि संस्कृतांतच त्यांनीं पद्यरचनेला सुरवात केली. पुढें मात्र त्यांनीं आपलें सर्व कवित्वकौशल्य मायभाषेलाच वाहिलें. अर्थातच त्यांची आरंभींची मराठी कविता जुन्या वळणाची होती. नंतर जसजशी त्यांच्या विचारांत क्रांति होत गेली, तसतसें त्यांच्या कवितेचें स्वरूपही पालटलें. संस्कृत कवींचें वळण सोडून देऊन, केशवसुतांच्या उदाहरणानें त्यांनीं इंग्रजी धर्तीची रचना सुरू केली, व नवीन वृत्तांचा अवलंब केला. नंतर इंग्रजी कवींच्या अभ्यासाचा परिणाम होऊन निसर्गप्रेम इत्यादि विषयांना कवितेंत त्यांनीं आद्यस्थान दिलें. शेवटच्या पांच वर्षांत त्यांची धार्मिक बुद्धि वळावून तिनेंच त्यांचा सर्व काव्यप्रदेश व्यापून टाकला; आणि टिळकांची कविता पुन्हा उलट खाऊन ओवी व अभंग या साध्या मराठी वृत्तांत आणि जुन्या कवितेचा केवळ आत्माच अशा भक्तिरसांत रमली.

कालानुक्रमानें टिळकांच्या वाङ्मयव्यवसायाचे चार भाग पडतात. पहिला विभाग म्हणजे १८९५ तील त्यांच्या धर्मांतरापर्यंतचा काळ. या वेळचें टिळकांचें

लेखन बहुविध होतें. कवितेच्या प्रांतांत अजून त्यांची उमेदवारी चालू होती. शिवाय वीर-कन्या नांवाची एक लहान कादंबरी व आनंदराव व गोरक्षण या नांवाचीं दोन नाटकेंही त्यांनीं लिहिलीं. दुसरा विभाग १८९५ पासून १९०० पर्यंतचा. या काळांत टिळकांनीं केशवसुतांचें अनुयायित्व पतकरून नवीन धर्तीची बरीच कविता आणि फुलामुलांचे कवि म्हणून प्रसिद्धि मिळविली. या पुढचा विभाग १९०० पासून १९१२ पर्यंतचा. या अवधींत निसर्ग, गृह इत्यादि विषयांवर नवीन कविता लिहिणें चालूच असून शिवाय बऱ्याच धार्मिक कविताही टिळकांकडून लिहिल्या जात होत्या. याच सर्व पुढें भजनसंग्रहांत प्रसिद्ध झाल्या. शेवटचा विभाग टिळकांच्या मरणापर्यंतचा. या अवधींत टिळकांनीं धार्मिक कविताच विशेष लिहिल्या. अपुरें राहिलेलें ख्रिस्तायन आणि अभंगाञ्जली हे दोन्ही ग्रंथ या शेवटच्या कालविभागांतले आहेत.

पण टिळकांच्या कवितांचा विचार कालानुक्रमानें न करतां वेगळ्याच वर्गीकरणाप्रमाणें करणें जास्त सुकर जाईल. ' ख्रिस्तायन ' हें अपुरें महाकाव्य म्हणजे त्यांच्या कवितेचा एक स्वतंत्र विभागच आहे. वनवासी फूल, सृष्टीची भाऊबीज, सुशीला, माझी भार्या, ब्रिटॅनिया या खंडकाव्यांचा समावेश एकाच सदरांत करतां येईल. अभंगांजली व भजनसंग्रह यांचा विचार एकत्र करणें सोइस्कर आहे आणि सर्व स्फुट कवितांचा एक संघ कल्पून त्यांचा साकल्यानें विचार करण्यासही अडचण नाहीं. अशा रीतीनें टिळकांच्या काव्याचे स्वाभाविक चार वर्ग पडतात; आणि त्यांचा पृथक् विचार केल्यानेंच त्यांच्या कवितेचें मर्म आपणास जास्त चांगलें उमगूं शकेल.

'ख्रिस्तायन' म्हणजे टिळकांच्या उत्कट ख्रिस्तभक्तीची साक्ष आहे. रामायणाच्या धर्तीवर त्याच्या तोडीचें ख्रिस्तचरित्रपर महाकाव्य मराठींत रचण्याच्या अभिनिवेशानें टिळकांनीं १९०९ मध्यें लेखनास सुरवात केली. दुर्दैवानें तें काव्य टिळकांच्या हातून पुरें झालें नाहीं. त्याच्या रचनेंत भौतिक अडथळे अनेक आलेच. शिवाय दीर्घ रचनेला आवश्यक अशी चिकाटी टिळकांच्या अंगीं नव्हती असें दिसतें. कदाचित् उत्तरोत्तर त्यांची काव्यशक्ति क्षीण होत गेली असेल. आणि त्यांनीं निवडलेली चार यमकांची एकनाथी ओवी लिहिणेंही त्यांस जड गेलें असेल. कांहीं असो. दहा वर्षेंपर्यंत त्या काव्यावर टिळकांचा व्यासंग असून, पुरें करण्याची उत्कट इच्छा असूनही काव्य अपुरेंच राहिलें. शिवाय

टिळकांच्या इतर काव्यांत दिसणारा भाषेचा प्रसादही त्यांत आढळून येत नाहीं. रचनेला गंभीरता आणण्याच्या भरांत टिळकांनीं दुर्गमता व क्लिष्टता मात्र साधली आहे. ख्रिस्ती लोकांना अर्थातच या ग्रंथाचें कौतुक वाटेल; पण त्यामुळें मराठी भाषेच्या वैभवांत विशेष म्हणण्यासारखी भर पडली आहे असें खास म्हणतां येणार नाहीं.

टिळकांच्या खंडकाव्यांपैकीं ' सृष्टीची भाऊबीज ' व ' वनवासी फूल ' हीं दोन सृष्टिविषयक, ' माझी भार्या ' व ' सुशीला ' प्रेमपर—विशेषतः पतिपत्नी-मधील प्रेमाचा आदर्श दर्शवणारीं असून ' जय ब्रिटानिए ' चा विषय कांहीं अंशीं राजकीय, कांहीं अंशीं सामाजिक व धार्मिक आहे. या सर्व खंडकाव्यापैकीं-' वनवासी फुलाची ' प्रसिद्धि विशेष आहे. तत्वज्ञानात्मक कविता म्हणून या कवितेला दुसरी भगवद्‌गीता म्हणण्यांत आलें आहे. उलटसुलट अनेक विचार येणें एवढेंच साम्य प्रतीत होतें. बाकी बरेचसे जुनेच विचार यांत ग्रथित केले आहेत इतकेंच, त्यांत सूत्रबद्धता नाहीं, तर्कशुद्ध मांडणी नाहीं, कथा-नुसंधानही नाहीं. अमुक एका प्रकारच्या मनोवृत्तीचें किंवा दुष्ट विचारांचें आपणांस खंडन करावयाचें आहे, अमुक एक योग्य तत्व प्रस्थापित करावयाचें आहे, अशा दृष्टीनें कवीचें लिखाण झालेलें नाहीं.

असें सुचविण्यांत येतें कीं, निवृत्तिविरुद्ध प्रवृत्ति किंवा ध्यानयोग विरुद्ध कर्मयोग या झगड्याचें विवेचन प्रस्तुत खंडकाव्यांत केलेलें आहे. याही विषयाचें थोडेंसें दिग्दर्शन काव्यांत निःसंशय दिसतें. पण कवीनें काढलेलें सार वेगळेंच असल्यामुळें या मुद्द्यावर त्याचा विशेष कटाक्ष होता असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय ' जग हें मिथ्या होय, सारा मायेचा पसारा, अर्थात् त्यांत गुरफटून राहणें अयोग्य ' हा जो निवृत्तिपर विचारांविषयींचा सामान्य समजुतीप्रमाणें निष्कर्ष आहे तसा विचार वनवासी फुलाचा कधींच दिसून येत नाहीं.

'वनवासी फूल' जगापेक्षां अरण्यालाच पसंत कां करतें तें आपण पाहूं. निर-निराळे चार समज या निश्चयाला कारणीभूत असतात. ईश्वरसेवेची लालसा, जगाचा दुष्टपणा, सृष्टींतील निःस्वार्थ प्रेम, आणि दैवाची अप्रतिहत शक्ती. जग मिथ्या म्हणून नव्हे तर तें दुष्ट आहे म्हणून फुलाला त्याचा तिटकारा वाटतो. शिवाय विनाकारण जगांत झगडून तरी काय फायदा ? शेवटीं दैव सर्वांवर

मात करणारच, हाही विचार त्याला बोंचत होता. हीं नकारात्मक कारणें झालीं. सृष्टींतील निःस्वार्थ प्रेमाचा लाभ आणि ईश्वराची सेवा हीं दोन अस्तिपक्षीं कारणें हीं फुलानें आत्मसमर्थनार्थ पुढें आणलीं आहेत.

अशा या विस्कळित विचारचतुष्टयीला उत्तर देण्याचें काम कवीवर येऊन पडलें; तें कवीनें कसें पार पाडलें तें आतां आपण पाहूं. दैवावरच अवलंबून रहायचें तर मग वन आणि जन दोन्हीं सारखींच, चल मजबरोबर असें क्षीणशक्ति उत्तर कवि देतो. दैवाची कल्पनाच खोटी असें समजावण्याचा प्रयत्न तो करीत नाहीं. फुलाच्या ईश्वरभक्तीची तो टरच उडवितो. ईश्वराच्या सृष्टीला बोल लावायचा, तिच्यापासून दूर रहायचें ही भक्तीच नव्हे असें तो सांगतो. पण फुलाचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा जगाचा दुष्टपणा हा असतो. आणि त्याचें खरेंपण कवीलाच पटत असल्यानें तो उत्तरादाखल असंबद्ध, घोटाळलेलें विस्तृत तत्त्वविवेचन करतो. जग दुष्ट असलें म्हणून काय झालें ? त्यासाठीं आपली उदार वृत्ति सोडण्याचें काय कारण ? ज्याच्याजवळ कांहीं विशेष गुण असेल तो त्यानें जनसेवेला लावावा असाच ईश्वरी नियम आहे. हा आपला सिद्धांत पुढें मांडून कवि या मुद्याला टाळाटाळीचें उत्तर देतो.

नंतर तो एकदम सुखमीमांसा करूं लागतो. निर्भेळ सुख जगांत मिळत नाहीं, हें फुलाचें मत साफ खोटें असें तो आधीं ठांसून सांगतो. पण लगेच म्हणतो कीं, सुखदुःख हीं जर सापेक्ष आहेत तर निर्भेळ सुख मिळणार कसें ? आणि शेवटीं तर सुखदुःख या मानसिक कल्पना आहेत त्यांच्यावर आसक्ती ठेवूं नये असा त्याचा अभिप्राय पडतो. लगेच कवि पौरुषाच्या विवेचनाकडे वळतो. कबूल केलें, जगांत दुःखें पुष्कळ आहेत. म्हणून काय अरण्यांत पळायचें ? जातिवंत मनुष्याला दुःखांशीं झगडण्यांतच आनंद वाटतो. पुन्हां एकदां विचारांतर करून कवि म्हणतो, दुःखच स्पृहणीय आहे. कारण त्यांतूनच प्रेमाचा उद्भव होतो. प्रेम वनांत कोठून मिळणार ? आणि निष्प्रेम जीवन तुच्छ होय, कारण परमेश्वर प्रेमस्वरूप आहे.

अशा रीतीनें तर्कशुद्ध प्रतिपादन न करतां कवि केवळ स्वतःचे सिद्धांत मांडीत जातो. त्याच्या भाषणांत फुलाच्या आक्षेपांना तर उत्तर मिळत नाहींच, पण त्याचे स्वतःचे विचारही अनिश्चित दिसतात. जगांत राहिलें पाहिजे, रमलें

पाहिजे, झटलें पाहिजे, असें त्याचें ठाम मत आहे, पण कां ? या प्रश्नाला सयुक्तिक उत्तर त्याच्याकडून मिळत नाहीं. त्यानें पुढें मांडलेल्या सिद्धांतांत नवीन असा एकही सिद्धांत नाहीं, त्याच्या विवेचनांत सुसंबद्धता नाहीं. अर्थातच तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें या कवितेला महत्त्व बिलकुल नाहीं.

पण आपण जर तत्त्वज्ञान शोधण्यासाठीं काव्य वाचूं, तर आपली वृत्तीच चुकली असें म्हणावें लागेल. कवीच्या रचनेंत महत्त्व रम्यतेला आणि गौणत्व विचारास असतें. हें चित्ताकर्षक रम्यत्व शोधण्याच्या दृष्टीनें आपण 'वनवासी फुला'कडे पाहूं लागलों म्हणजे त्याचे वर निर्दिष्ट केलेले दोष गुणांच्या स्वरूपांत आपल्याला दिसूं लागतात. परस्परविरोध हा तत्त्वविवेचनाला अर्थात् बाधक होय; पण त्याच्यापासून अलिप्त असा एक तरी मनुष्य आपणांला सांपडेल काय ? टिळक तत्त्वप्रतिपादन करीत नसून स्वभावदिग्दर्शन करीत आहेत ही कल्पना आपल्या डोळ्यांपुढें उभी केली कीं, या विरोधाचा अर्थ लगेच मनांत भरूं लागतो. 'वनवासी फुला'चा विशेष गुण हा आहे कीं, त्यांत फूल आणि कवि या दोघांचींही स्वभावचित्रें उत्तम रंगविलीं आहेत. काव्य वाचतांना फुलाचा हट्टीपणा, स्वतःच्या ज्ञानाविषयींची त्याची घमेंड, कोटिक्रम करण्याची आवड आणि या सर्वांखालीं लपलेलें कोमल हृदय; आणि कवीची आग्रही वावदूकता, जगाच्या इच्छेविरुद्ध त्याला सन्मार्गाला लावण्याचा निश्चय, आत्मविश्वासाच्या अतिरेकानें केवळ सिद्धांतमय प्रवचन करण्याची त्याची हातोटी; हे गुण स्पष्ट होत जातात; आणि या दोघांच्या प्रेमविवादांत एक अपूर्व लज्जत आपल्याला प्रतीत होऊं लागते. या शिवाय कवीच्या व फुलाच्या महात्म्याचीं रम्य व सार्थ वर्णनें, प्रासादिक गोड भाषा, अनुप्रासादि शब्दालंकार इत्यादि गुणांमुळें हें काव्य निःसंशय रसाळ व मनोहर झालें आहे. पण त्याला महत्त्व आहे तें त्यांतील काव्यामुळें, तत्त्वज्ञानामुळें नव्हे.

'सृष्टीची भाऊबीज' हें खंडकाव्य तर त्याहूनही गोड आहे. यांत कोणाला तत्त्वज्ञानाचा वास येण्याचा संभव नाहीं. टिळकांनीं आपल्या कल्पनेला यांत स्वैर विहाराची मोकळीक दिलेली असून, तिच्याकरवीं बन्धु-भगिनींना आपलें प्रेम व्यक्त करण्यास संधी देणाऱ्या भाऊबीजेवरील आपलें प्रेम व्यक्त केलें आहे. पण टिळक कवि असल्यामुळें त्यांची दृष्टि मानवजातीपुरती आकुंचित नव्हती. सृष्टींतील सर्व वस्तूंचा परस्परपूरक असा मिलाफ आकस्मिकपणें झालेला नसून,

त्याच्या मूळाशीं अतिमानुष योजना आहे, अशी टिळकांची दृढश्रद्धा होती. यामुळें सर्व चराचर सृष्टींत त्यांना भावंडांचें नातें व प्रेम पसरलेलें दिसे. ही स्वतःस होणारी सहानभूतीची आणि सहकारित्वाची जाणीव टिळकांनीं या कवितेंत प्रगट केली. आणि तीही इतक्या हंसत खेळत कीं, वाचकांचें मन वर्ण्य विषयांतच पूर्ण गुंगून जातें. आणि त्या पलीकडील या सूचित भावनेचा ठाव घेण्याचें त्याला भानच रहात नाहीं. धरणी आणि जलद, तरु आणि सरिता, लहरी आणि फेन यांच्या भाऊबीजेचा थाट वाचकाला मोहून टाकतो; आणि फुलवेली व कवि यांच्यामधील विनोदी मधुर संवाद तर मनाला अगदीं गुदगुल्या करतो.

'सुशीला' या खंडकाव्यांत कथानक फारसें नाहीं. खेडेगांवांतील अडाणी आईबापांची सुशीला नांवाची सुंदर व हुशार मुलगी शिकण्यासाठीं शाळेंत जाऊन राहिलेली असते. घरीं परत येते तेव्हां आपल्या भोंवतींच्या अडाणी मंडळीला स्वतःच्या सौंदर्यामुळें व ज्ञानामुळें दिपून गेलेली पाहून, तिच्या मनांत अहंकाराचा शिरकाव होतो. आणि आईबापांनीं पसंत केलेला भावाचा मित्र चारुदत्त याच्या प्रेमाचा ती धिक्कार करते. पण लवकरच तिच्या गर्वाचें प्रायश्चित्त तिला मिळतें. चारुदत्त परीक्षेंत पास होतो, पण ती नापास होते. पुढें ती आजारी पडते व त्यांत तिचें सौंदर्य लयाला जातें. आतां तिचा अहंकार मावळतो व चारुदत्तच आतां आपला धिक्कार करील अशी तिला भीति वाटते. पण तो मात्र खिस्त शिकवणुकीप्रमाणें अढळ राहून तिचा स्वीकार करतो. त्यांच्याच तोंडानें टिळकांनीं

> रूप यौवन हें काम्य परी प्रीति
> न गे यांवर निज जीव सांवरीती.

असें कवितेचें सार वदविलें आहे.

कथानक अल्प असलें, तरी त्यांत टिळकांनीं गृहस्थाश्रम, अलंकार इत्यादि विषयांवरील आपल्या मतांची भर घातली आहे. एकंदर स्वरूपावरून कविता नीतिबोध करण्याच्या हेतूनें लिहिलेली आहे हें उघड होतें. अर्थातच कवितेकडे आपण तितक्या चिकित्सक दृष्टीनें पाहूं लागलों तर दोष सांपडतील. अहंकारामुळें मुलगी नापास होणें संभवनीय आहे, पण त्यामुळें देवींसारखा रोग तिला होणें तितकें स्वाभाविक वाटत नाहीं. सुशीलेची सुधारणा अशा आकस्मिक

घटनेमुळें होते हा कथानकांतील मोठाच दोष आहे. सुशीलेच्या घरची सर्व मंडळी निर्दोष सद्गुणी दाखविण्यांत आली असून, नायिकेचें चित्र मात्र मुद्दाम दोषदुष्ट दाखविल्यासारखें दिसतें. एकंदरींत पात्रांच्या स्वभावांमध्यें स्वाभाविकपणा कमी दिसतो. शिवाय कांहीं ठिकाणीं कवीनें उगाचच लांबण लावल्याचा भास होतो. तरीही सुंदर स्थळें या कवितेंत नाहींत असें नाहीं. गृहाच्या थोरवींचें जें वर्णन कवितेच्या आरंभींच्या भागांत आढळतें तें हृद्य आणि ओजस्वी आहे. शिवाय

> ममत्वाचें खालती आलवाल
> वरुन विरहाचें ऊनही विलोल
> आसवांचें जल सदा मिळत राहे
> प्रीतिलतिका जगतांत वाढताहे !

हें सुंदर रूपक, व

> पात्र सोन्याचें असो मृत्तिकेचें
> वेड मजला आंतल्या अमृताचें

हा चपखल दृष्टांत,—अशा तऱ्हेच्या अलंकारांनीं कवितेला मोहकपणा आला आहे.

'माझी भार्या' या खंडकाव्याचा विषय त्याच्या नांवावरूनच स्पष्ट होतो. टिळकांना नेहमींच प्रिय व वंद्य वाटणाऱ्या गृहस्थाश्रमाचें अधिष्ठान जी गृहिणी तिचें आदर्श चित्र या काव्यांत रेखाटून त्यांनीं खरी व खोटी प्रीति यांमधील भेद स्पष्ट केला आहे. आधींच विषय आवडता, त्यांतून ( पुनर्लेखनाच्या वेळीं तरी ) त्याला स्वानुभवाच्या प्रतीतीची जोड लाभलेली; यामुळें हें काव्य अत्यंत रसाळ व हृदयस्पर्शी झालें आहे. यांतील भावना जेवढ्या मधुर तेवढीच भाषाही गोड पडली असून, मोजक्या पण वेंचक अलंकारांनीं कवितेला मोहकपणा आला आहे. आदर्श भार्येचें चित्र रेखाटतांना जरी कवीनें कालिदासाच्या एतद्विषयक प्रसिद्ध श्लोकांचा उघड उपयोग केला असला, तरी त्याचें चित्र निःसंशय स्वतंत्र व रम्यतर आहे. आणि असें असूनही त्यांत वाचकाला आपल्या आकांक्षांचें प्रतिबिंब उमटलेलें दिसतें. मनुष्यांच्या सामान्य विचारांचा परामर्ष घेऊनही स्वतःचें वैशिष्ट्य प्रगट करण्याचा जो कवींचा मोठा गुण

तो यांत निःसंशय प्रतीत होतो. कवितेच्या माधुर्याची कल्पना वाचकांना पुढील श्लोकांवरून येईलः—

स्वभावोक्ती साधी म्हणुनच अलंकारि सरसा,
प्रिया माझी साधी म्हणुन मम तो स्वर्गच जसा!

* * *

जिच्या लावण्यानें तम दुर पळे, चित्त उजळे,
उषेच्या लावण्यें जगत उजळे जेविं सगळें!

* * *

तिच्या अल्पा स्वल्पाकृति, लघु तिची चाटु गदितें
तिचीं प्रेमस्वप्नें मनिं, नयनिं वाणींत उदितें;
तिच्या दीनासाठीं, अविरत दयेच्या लघुकृती,
तिचे ते हेतू जे सहज हलु बाहेर पडती.

* * *

'ब्रिटनिया' हें खंडकाव्य 'सुशीला' व 'वनवासी फूल' यांहून लहान व नीरस आहे. एखाद्या आंग्ल कट्टराची नसेल इतकी टिळकांची श्रद्धा ब्रिटनच्या दैवनियोजित थोरपणावर होती. या पृथ्वीला सुरलोकसाम्य आणण्याची जबाबदारी ईश्वरानें ब्रिटनवर टाकली असून, तो देश ती पार पाडणार असा आपला विश्वास टिळकांनीं या काव्यांत प्रगट केला आहे. विषय रुक्ष व अपुरता यामुळें काव्यांत पाल्हाळ फार झाला असून रसोत्पत्ती झाली नाहीं.

'बापाचे अश्रु' हें खंडकाव्य एका मित्राचा मुलगा वारला तेव्हां टिळकांनीं लिहिलें. 'परदुःख शीतळ' म्हणून असो किंवा इतर कांहीं कारणानें असो पण शोक-काव्य म्हणून रचिलेल्या या काव्यांत जीवंतपणा वाटत नाहीं. प्रसंग दुःखाचा असूनही करुणरसाचा परिपोष कवीला नीट साधलेला नाहीं.

एकंदर खंडकाव्याचा विचार करतां प्रदीर्घ रचनेस लागणारे गुण टिळकांच्या अंगीं कमी होते असेंच म्हणावें लागतें. स्वाभाविक पण आकर्षक कथासूत्र निर्माण करण्याची कला त्यांच्या अंगीं नव्हती; किंबहुना विधायक कल्पकतेचा त्यांच्या अंगीं अभावच होता. यामुळेंच त्यांचीं खंडकाव्यें आधाराविण भटक-

णाऱ्या वावडीप्रमाणें अनिर्बंध वाटतात. त्याचप्रमाणें पात्रांचा स्वभाव-परिपोष रेखाटण्यासाठीं लागणारें बुद्धीचें श्रमसातत्यही त्यांच्या ठिकाणीं आढळून येत नाहीं. अशा तऱ्हेच्या रचनेला लागणारा एकच गुण टिळकांच्या ठिकाणीं दिसतो; व तो म्हणजे लेखनाचा बहुवसपणा. 'पुढें काय लिहूं ?' हा प्रश्न टिळकांपुढें कधींच उद्भवला नसेल. परंतु इतर गुणांच्या अभावीं या विचार-बाहुल्याला खंडकाव्यांत पाल्हाळाचें स्वरूप येतें; आणि त्याच्या रम्यतेंत भर न पडतां सदोषता मात्र अधिक उठून दिसते.

'अभंगाञ्जली' व 'भजनसंग्रह' या दोन्ही पुस्तकांतून टिळकांच्या उत्कट भक्तीचा रम्य विलास दिसून येतो. ही भक्ती त्यांनीं ख्रिस्ताला वाहिली होती म्हणून कोणीही रागावण्याचें कारण नाहीं. संत कवींच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनीं रचना केली; आणि सुदैवानें तो प्रसाद, ती उत्कटता, तें सांत्वनक्षमत्व इत्यादि सर्व गुण टिळकांच्याही कवितेंत उतरले. केवळ रचनेच्या गुणांवरून जर कवींची माळ ओवावयाची असेल तर टिळकांना नामदेव तुकाराम इत्यादि कवींच्या मालिकेंत स्थान देण्यास प्रत्यवाय नसावा. 'सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय' आणि 'ख्रिस्तावांचोनी सांपडेना सोय' या वचनांमधील फरकाचा कीस तेवढ्यासाठीं काढण्याचें प्रयोजन नाहीं.

टिळकांचे अभंग निःसंशय हृदयस्पर्शी आहेत; आणि त्यांतून पाझरणाऱ्या भक्तिरसाच्या उत्कटतेंत हे अभंग इतर कोणत्याही अभंगांना हार जाणार नाहींत. टिळकांनींही अभंगांचा उपयोग तुकारामाप्रमाणेंच आपल्या मनांतील भक्तीच्या निरनिराळ्या पायऱ्या व्यक्त करण्यासाठीं, संसारांतील अन्यायांविषयीं आपला तिरस्कार दाखविण्यासाठीं, आणि ढोंगी स्वार्थसाधूंच्या दंभपरिस्फोटासाठीं केला आहे. तरीही सूक्ष्मपणें निरीक्षण करणाराला दोघांच्या अभंगांत फरक दिसून येतातच. टिळकांच्या वाणींत तुकारामाचा प्रसाद आहे, पण ती तडफ नाहीं. भाषेला सहजच वाकडें वळण देऊन तिच्यांत जोरकसपणा उत्पन्न करण्याची तुकारामाची किमया टिळकांना साधत नाहीं, किंबहुना ती साधण्याचा त्यांनीं प्रयत्नही केला नाहीं; अलिप्त राहूनच तुकारामानें केलेलें समाजाचें अंतर्भेदी निरीक्षण टिळकांच्या अभंगांत सांपडत नाहीं. म्हणूनच व्यवहारांतील अनेक चपखल दृष्टांत देऊन विषय विशद करण्याच्या तुकारामाच्या हातोटीचा टिळकांच्या अभंगांत अभावच आहे.

एवढा फरक असला तरीही टिळकांची ही धार्मिक कविता निःसंशय श्रेष्ठ दर्जाची आहे. समाजोद्धाराची कळकळ आणि त्या उद्धारार्चे एकच साधन वाटत असलेली भक्ती या दोन गुणांमुळें अतीव हृदयस्पर्शी प्रभाव या कवितेंत दिसून येतो. शिवाय तिचें वेगळें महत्त्व असें आहे कीं तिच्या योगेंच टिळकांनीं ख्रिस्ती महाराष्ट्रीयांची मनें इंग्रजीकडून पुन्हां मराठीकडे खेचून घेतलीं.

टिळकांच्या स्फुट कवितेचें स्वरूप विविध आहे. राजकीय, सामाजिक, उपदेशपर, आत्मनिरीक्षणपर, मुलें फुलें आणि इतर सृष्टपदार्थविषयक अशी अनेक तऱ्हेची कविता त्यांनीं लिहिली. पण भावगीतांतील त्यांचा सर्वांत आवडता विषय प्रेम होय. प्रेमाच्या अनेकविध स्वरूपावर टिळकांनीं जितक्या कविता लिहिल्या, तितक्या दुसऱ्या कोणत्याही आधुनिक कवीनें लिहिल्या नाहींत. आणि ही त्यांची प्रेम-कविता हाच त्यांच्या स्फुट कवितेंतील सर्वांत रमणीय भाग आहे. इतर विषयांवरील कविताही कांहीं अगदींच टाकाऊ आहेत असें नाहीं. तरी पण या प्रेमविषयक कवनांत जी अनुभवाची प्रतीति, भावनेची उत्कटता, रचनेची सहजरम्यता आहे ती इतरत्र दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. 'प्रेम आणि आवड' 'कुणी सांगा बघूं नांव,' 'अश्रूंची माला,' 'ओझरतें दर्शन,' 'कुणास्तव कुणी तरी' इत्यादि सर्व कविता मनोवेधक व आनंददायक आहेत.

टिळकांना फुलामुलांचे कवि म्हणण्याचा प्रघात आहे. पण तो विशेष सयुक्तिक दिसत नाहीं. फुलांवरील टिळकांच्या सर्व कविता तत्त्वशोधनानें भरलेल्या आहेत, आणि बालस्वभावाविषयीं विशेष ज्ञान टिळकांना होतें असें त्यांच्या कवितांवरून तरी वाटत नाहीं. त्यांचें मन अध्यात्ममय झालें होतें आणि ईश्वराची आठवण करून देणाऱ्या सुंदर गोजिरवाण्या गोष्टी म्हणून फुलें व मुलें यांच्याविषयीं त्यांना आपलेपणा वाटे. याच दृष्टीनें त्या दोन्हीं वस्तूंकडे टिळक पहात व त्यांच्याविषयीं लिहीत. आणि या बाबतींत ते वर्डस्वर्थचे अनुयायी होते. वर्डस्वर्थला मुलांमध्यें आणि सृष्टीमध्यें परतत्त्वाचा साक्षात्कार होत असे, आणि तीच त्याची सृष्टीविषयींची व मुलांविषयींची भावना टिळकांनीं आत्मसात् करून घेतली. किंबहुना वर्डस्वर्थ हाच टिळकांचा काव्यगुरू होता असें निःशंकपणें म्हणण्यास हरकत नाहीं. वर्डस्वर्थच्या काव्यांची जी तऱ्हा तीच हुबेहूब टिळकांच्या कवितेची आहे. त्या आंग्ल कवितांच्या रचनेंत जे गुणदोष दिसतात तेच नेमके टिळकांच्याही कवितेंत सांपडतात. 'अश्रूंची माला' 'सृष्टीची करमणुकीची

घटका, ' ' रानांत एकटेंच पडलेलें फूल ' इत्यादि कवितांत कोणत्याही विषयावरील कवितेला शेवटीं तात्पर्याचें किंवा तत्त्वविचाराचें ठिगळ लावण्याची वर्डस्वर्थची लकब टिळकांनीं बेमालूम उचललेली दिसते. टिळकांनाही वर्डस्वर्थप्रमाणेंच उपदेश करण्याची अनावर हौस होती आणि ती त्यांनीं ' गुलाब, ' ' पळाचा भरंवसा ' ' चाललेली घटका ' ' वृक्षान्योक्ति ' इत्यादि कवितांतून फेडून घेतली आहे. खंडकाव्यांतून दिसणारा तत्त्वविचारांचा पाल्हाळ हाही वर्डस्वर्थच्या अनुकरणाचाच परिणाम आहे. सृष्टि व मुलें एतद्विषयक विचारांतील साम्य वर दाखविलेंच आहे. उलटपक्षीं टिळकांची कविता वर्डस्वर्थच्या रचनेप्रमाणेंच साधी व सहजमनोहर आहे. तिचे अलंकारही साधे पण मनांत भरणारे असतात. शिवाय वर्डस्वर्थच्या कवितेंत दिसून येणारें वृत्तिगांभीर्य टिळकांच्या कवितेंत दृष्टोत्पत्तीस येतें.

' रणशिंग, ' ' बोम्बाबोम्ब ' ' ब्राह्मण किंवा महार ' इत्यादि टिळकांची सामाजिक कविता केशवसुतांच्या अनुकरणाचें फळ आहे. पण केशवसुतांचा टिळकांच्या मनावरील पगडा फार वेळ टिकला नाहीं. कारण टिळकांची मनोवृत्ति केशवसुतांच्या मनासारखी बंडखोर केव्हांच नव्हती. म्हणूनच टिळकांच्या वरील कविता म्हणजे केशवसुतांच्या विचारांचे उमटलेले अस्फुट पडसाद वाटतात. त्यांत केशवसुतांच्या कवितेचें संहारक तेज दिसून येत नाहीं. टिळकांची मनोवृत्ती भावोत्कट व चिवट होती. धर्मांतरामुळें ते बंडखोर असावेत असा क्षणिक भास आपणांला होतो. पण तें धर्मांतर म्हणजे त्यांच्या आत्म्याच्या तीव्र तळमळीच्या उपशमाचा उपाय होता. ' नवधर्म स्थापूं ' अशी कल्पनेची भरारी मारणारे टिळक ख्रिस्ती धर्मांत रुळले यावरूनच त्यांचें मन क्रांतिकारक नव्हतें हें सिद्ध होतें. ' श्रेय सांपडलें ' अशी त्यांच्या मनाची भावना होतांच तें मन ख्रिस्तपदीं चिकटलें आणि तेथून कधींही चळलें नाहीं. त्याचप्रमाणें पूर्ववयांत जडलेलें त्यांचें संतवाङ्मयावरील प्रेमही अबाधितच राहिलें. या दोन्ही बालेकिल्ल्यांपासून त्यांच्या मनाला ढळविण्याचे सर्व प्रयत्न निष्फळच झाले. म्हणूनच टिळकांच्या कवितेचें वळण शेवटपर्यंत जुनें राहिलें.

टिळकांच्या स्फुट कवितेंतील सामान्य गुण म्हणजे साधी व गोड भाषा आणि भावनेचा प्रामाणिकपणा हे आहेत. त्यांची कविता आपणांस आवडो वा न आवडो; तिच्यांतील विचार आपणांस पटोत वा न पटोत; पण तिची रचना

कृत्रिम किंवा भावना दांभिक आहे असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. शिवाय कांहीं कवितांतून इतरही गुण दृष्टीस पडतात. उदाहरणादाखल नावेंच घ्यावयाचीं तर वर्णनासाठीं ' एक अमेरिकन मुलगी ', सश्रद्ध आवेशासाठीं ' सदा तरुण ' व ' पुरें जाणतों मीच माझें बल ', उत्कट देशप्रीतीसाठीं ' माझ्या जन्मभूमीचें नांव ' सहानुभूतीसाठीं ' केवढें हें क्रौर्य ' सूचित उपदेशासाठीं ' श्रमसौंदर्य ' व ' हें सुख कां नाश ' इत्यादि कवितांकडे बोट दाखवितां येईल. वर सांगितल्या-प्रमाणें उपदेश करण्याची हांव व तत्त्वविचाराचें ठिगळ लावण्याची आवड यामुळें अनेक कवितांचें सौंदर्य नाहींसें झालें आहे. शिवाय भावनेची उत्कटता सर्व कवितांतून दिसून येत नाहीं त्यामुळें बऱ्याच कविता नीरस झाल्या आहेत. पण या स्फुट कवितांतील सर्वांत मोठा दोष कल्पनांची पुनरुक्ति हा आहे. काव्य, प्रेम इत्यादि विषयांवरील विचार इतक्या वेळां पुनरुक्त झाले आहेत कीं, त्यांची कल्पनाशक्तीच दुर्बल होती कीं, काय असा संशय येतो.

टिळकांच्या कवितेचे दोन भाग अजून प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. म्हणून त्यांच्या कवितेविषयीं साधारण मत एव्हांच प्रदर्शित करणें कदाचित् धाडसाचें ठरेल. उलट पक्षीं असें म्हणतां येईल कीं, टिळकांची कांहीं कविता जरी अजून अप्रकाशित असली तरी तिचें स्वरूप प्रसिद्ध कवितेपेक्षां फारसें निराळें अस-ण्याचा संभव अगदींच कमी आहे. शिवाय त्यांची मुख्य कविता प्रसिद्ध व लोकप्रिय होऊन बरेच दिवस लोटले आहेत. तेव्हां आधुनिक कवींमधील त्यांचें स्थान ठरविण्याचा प्रयत्न कांहीं अगदींच वावगा म्हणतां येणार नाहीं. वरील विवेचनावरून टिळकांची गणना स्वतंत्र कवींत न होतां अनुयायी कवींमध्येंच होते हें उघड आहे. जन्मभर टिळकांनीं अनुकरणच केलें. तें अनुकरण त्यांनीं अत्यंत कौशल्यानें केलें हें कोणासही कबूल करावें लागेल. पण केशवसुत, विनायक, बालकवि यांनीं आपआपल्या कवितांच्या विषयांच्या व ध्येयाच्या बाबतींत जी स्वतंत्र वृत्ति दाखविली ती टिळकांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. यांनीं गोविंदाग्रजांप्रमाणेंच दुसऱ्यांच्या पावलावर पाऊल टाकून काव्यरचना केली. मात्र गोविंदाग्रजांनीं आपल्या गुरूवर मात केली, टिळकांना तें यश लाभलें नाहीं. सारांश टिळकांची प्रतिभा इतर चारहि कवींच्या प्रतिभेपेक्षां हिणकस होती.

या दृष्टीनें जरी टिळकांचें स्थान जरा गौण असलें तरी भाषागुणाच्या बाबतींत ते बहुतेक आधुनिक कवींपेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहेत. कांहीं रसिकांना कदाचित

बालकवींची भाषा टिळकांच्या भाषेपेक्षांही अधिक आवडेल; पण इतर कोणत्याही आधुनिक कवीनें टिळकांच्या भाषेसारखी साधी पण प्रासादिक, सरळ पण मधुर भाषा लिहिली नाहीं. अलंकारांच्या उपयोगाच्या बाबतींतही त्यांचें कौशल्य श्रेष्ठ दर्जाचें ठरेल. त्यांनाही उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत इत्यादि अलंकारांची आवड होती. पण अलंकारांच्या बुरख्याखालीं वर्ण्य विषयाला लपवून टाकण्याची अप्रयोजकता त्यांनीं केव्हांही दाखविली नाही. आवश्यक तितकेच व समर्पक अलंकार योजण्याची त्यांची हातोटी अनुकरणीय आहे. शिवाय त्यांच्या रचना-विस्तारामुळेंही टिळकांना आधुनिक कवींत वरचें स्थान मिळेल.

शेवटीं सांगावयाचें म्हणजे टिळकांच्या कवितेंत प्रासादिक भाषेशिवाय असा एक आत्मीयतेचा गुण आहे कीं, ज्या योगानें ती कविता निरंतर लोकांना आवडेल.

असें कांहीं वसे विश्वीं कुणी सांगा बघूं नाव !
जिथें नांदे अहा तें हो तिथें नांदे सदा देव !

*　　　*　　　*

जिच्या स्पर्शें मृतालाही नवें चैतन्य लाभावें,
जिच्या स्पर्शें अहा मूकें नव्या गानांत रंगावें,
जिच्या स्पर्शें अहा अंधा दिसे सारें पुढें दिव्य,
अशी मात्रा जगीं आहे; कुणी सांगा तिचें नांव !

*　　　*　　　*

या ओळींत नवीन असें कांहीं नाहीं, कल्पना परिचयाच्याच आहेत. पण हृदयाच्या संवेदना जागृत करण्याची अशी एक शक्ती त्यांच्यांत आहे कीं, जिच्यामुळें कलैकदृष्ट्या रम्यतर पंक्ती विसरून गेल्या तरी या ओळी जिभेवर घोळतच रहातात. आणि या शक्तीमुळेंच टिळकांच्या अनेक कविता नेहमीं रसिकांच्या तोंडीं रहातील.

रामचंद्र महादेव मराठे.

**टिळकांचें वाङ्मयः**—( १ ) टिळकांची कविता—संग्राहक व प्रकाशक, उजगरे; ( २ ) अभंगाञ्जलि; ( ३ ) ब्रिटानिया काव्य; ( ४ ) माझा ओसाड पडलेला गांव–काव्य; ( ५ ) बापाचे अश्रु–काव्य; ( ६ ) वनवासी फूल–काव्य;

( ७ ) आनंदीबाई; ( ८ ) आमच्या विधवा; ( ९ ) ख्रिस्तजयंती; ( १० ) पवित्र क्रुसाचा राजमार्ग; ( ११ ) भजनसंग्रह; ( १२ ) बोध आणि रंजन; ( १३ ) शीलं परं भूषणम्–नाटिका; ( १४ ) यशवंतराव महाराजांचें वर्णन.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) Narayan Vaman Tilak, The Christian Poet of Maharashtra, by J. C. Winslow, १९२३.

( २ ) चरित्रात्मक लेख, भा. कृ. उजगरे, मनोरंजन, जून १९१९.

( ३ ) „ „ सखाराम वामन टिळक, मनोरंजन, जून १९१९.

( ४ ) „ „ सीतानंदन, महाराष्ट्रसाहित्य, आक्टोबर १९१९.

( ५ ) „ „ टिळकांची कविता, परीक्षण, वि. मो. महाजनि, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४६, अंक २.

( ६ ) टिळकांची कविता, ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कविपंचक, पृष्ठ २१–५०.

( ७ ) केशवसुत व टिळक, वा. गो. मायदेव, काव्यचर्चा, पृष्ठ २३२–२४६.

( ८ ) टिळकांची कविता, गो. गं. पोतदार, काव्यचर्चा, पृष्ठ २४७–२५६.

( ९ ) टिळकांची कविता, परीक्षण, लक्ष्मणशास्त्री लेले, प्रभात, फेब्रुवारी १९१५.

8363

# पूरणिका.

**आपटे गोविंद विनायक:**—[ मृत्यु १९२५ ] इतिहाससंशोधक. यांनीं ( १ ) आपटे ( हिंदुस्थानांतील ) घराण्याचा इतिहास, १९१५; ( २ ) पटवर्धन घराण्याचा इतिहास; ( ३ ) बरवे घराण्याचा इतिहास; ( ४ ) निर्मळ क्षेत्रवर्णन; ( ५ ) श्रीक्षेत्र वांईवर्णन; ( ६ ) न्यायाचा मासला–हीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

**आपटे महादेव चिमणाजी:**—[ १८४५–१८९४ ] प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचे हे चुलते. मुंबईचे हायकोर्टांत हे वकिली करीत असत. वकिलींत यांनीं अमूप पैसा मिळविला. 'मौजेच्या चार घटिका' या नांवानें कालिदासाच्या शाकुंतलाचें यांनीं मराठींत भाषांतर केलें आहे, तें चांगलें वठलें आहे. यांनीं लाख दीड लाख रुपये खर्च करून, पुणें येथें, संस्कृत ग्रंथांच्या जीर्णोद्धारार्थ 'आनंदाश्रम' नांवाची संस्था स्थापन केली आहे. मृत्यूपूर्वी यांनीं संन्यास घेऊन 'आनंदसरस्वती' हें नांव धारण केलें होतें.

**आपटे विष्णु गोपाळ:**—[ १८५१–१८९९ ] वैद्यकीय ग्रंथांचा लेखक. कोल्हापूर येथील रहिवाशी असून, दरबारचे असिस्टंट सर्जन होते. निष्णात वैद्य म्हणून त्यांची कीर्ति होती. यांनीं 'ग्रामवैद्य', 'प्रसूतिचिकित्सा' व 'न्यायवैद्यक' हीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत.

**आचार्य** ( कालगांवकर ) **कृष्णाजी विष्णु:**—[१८५७–१९१९] इतिहाससंशोधक. यांचा जन्म कऱ्हाड तालुक्यांतील कालगांव या गांवीं झाला. हे शाळा खात्यांत मराठी शिक्षक होते. साने, खरे वगैरेंच्या सान्निध्यांत यांस संशोधनाची गोडी लागली. जुन्या कागदपत्रांचा तपास व संग्रह करून, तद्विषयक व इतर ऐतिहासिक माहितीचे अनेक लेख, त्यांनीं 'भारत-इतिहास-संशोधक मंडळ' या संस्थेमार्फत व इतर मासिकांचे द्वारा प्रसिद्ध केले. कै. पारसनीस यांच्या 'भारतवर्ष' व 'इतिहाससंग्रह' या दोन्ही मासिकांतून 'जुन्या ऐतिहासिक गोष्टी' या सदराखालीं त्यांचे बरेच लेख गोष्टीरूपानें प्रसिद्ध झाले आहेत. त्याशिवाय 'काव्येतिहाससंग्रह', 'विविधज्ञानविस्तार' व 'शाळापत्रक' यांतहि त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

स्प. प्रत



चरित्र, चर्चा, अभ्यासः—

( १ ) माझ्या इतिहाससंशोधनाची अव्वल । अखेर हकीकत व तदंतर्गत आत्मचरित्र, विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९१९.

( २ ) कृ. वि. आचार्य यांच्या आत्मचरित्राची पूरणिका, गो. प्र. जांबळे; विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९१९.

**इस्लामपूरकर वामनशास्त्री** [ मृत्यू १९१३ ] संस्कृत ग्रंथांचा कुशल भाषांतरकार. हे एक अत्यंत दीर्घोद्योगी व व्यासंगी शास्त्री होते. ‘ कथासरित्सागर ’ या संस्कृत कथात्मक ग्रंथावरून ‘ बृहत्कथासागर ’ नांवाचा ग्रंथ मराठींत लिहून त्याचे पांच खण्ड यांनीं प्रसिद्ध केले. पहिला खण्ड १८८७त प्रसिद्ध केला. हा ग्रंथ नऊ खण्डांत प्रसिद्ध व्हावयाचा होता. याच वर्षी त्यानीं ‘ मेघदूतकाव्यार्थ दीपिका ’ नांवाची मराठी टीका व ‘ शूद्रधर्मतत्त्वप्रकाश ’ असे ग्रंथ प्रसिद्ध केले. या ग्रंथांखेरीज, मुंबईस निघणाऱ्या पोतदारांच्या छोट्या ग्रंथमालेंतून, ‘ करुणराघव, ’ ‘ चारुदत्त आणि वसंतसेना, ’ ‘ प्रणयी माधव, ’ ‘ राजा अग्निमित्र, ’ ‘ ललित वत्सराज, ’ ‘ विदग्ध पुरूरवा, ’ ‘ सुंदरी व वसंतसेना, ’ हीं कादंबरी–वजा पुस्तकें; बडोदें दरबारकडून ‘ कर्पूरमंजरी, ’ ‘ आदिराज चरित्र ’ व कविताशास्त्र; ’ आर्यभूषणकडून ‘ अविचाराचा परिणाम अथवा मुंजराजाचा मृत्यू ’ ही ऐतिहासिक कादंबरी अशीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. यांची भाषाशैली प्रौढ, सुरस व चित्ताकर्षक आहे.

**करंदीकर बाळकृष्ण शंकर**—[मृत्यू १९११] शास्त्रीय वाङ्मयाचा लेखक. मुंबई विश्वविद्यालयाचे हे बी. एस्सी. होते. तळेगांव येथील पैसाफंड कांचकारखान्याचे हे व्यवस्थापक होते. पेणचें ‘ कोंकण विद्यालय ’ यांनींच संस्थापिलें.

**करंदीकरांचें वाङ्मयः**—( १ ) वातावरण, १९०५; (२) वनस्पतिशास्त्र.

**काथवटे आबाजी विष्णु**—[१८४६–१९०७] यांचा जन्म वांई येथें झाला. डेक्कन कॉलेजांत हे बरींच वर्षें संस्कृतचे प्रोफेसर होते.

**काथवटे यांचें वाङ्मयः**—( १ ) शिक्षण आणि अध्यापन; ( २ ) कीर्तिकौमुदी; ( ३ ) द्व्याश्रय कोश; ( ४ ) अथर्ववेद उत्तर भाग.

**'के. स. रि.'**—केशव सदाशिव रिसवूड [ अनुपलब्ध ] कवि "यांची कविता 'के. स. रि.' या नांवानें प्रसिद्ध झाली आहे. 'व्यवसाय पद्यसहस्र' आणि 'सुधारणावारणांकुश' अशीं त्यांचीं दोन मोठीं काव्यप्रकरणें असून 'प्रभूलीलाशती' हें एक खंडप्रकरण आहे. हें खंडकाव्य अत्यंत रसाळ आहे. रचना व रसाविर्भाव या दोन्हीहि दृष्टींनीं पाहिलें तर या काव्याला 'अधुनिक केकावली' म्हणणें योग्य होईल. मोठ्या प्रकरणांपैकीं पहिलें काव्य १८८४ सालीं प्रसिद्ध झालें. त्यांत व्यवहारास उपयोगी अशा विषयांवर सुभाषितें रचिलीं आहेत. 'सुधारणावारणांकुशा'च्या विषयाचें आकलन त्याच्या नांवावरूनच होतें. 'के. स. रि'ची रचनापद्धति शुद्ध, सरळ व सुबोध आहे. कवितांतून वरचेवर दृष्टांत दिले असल्यानें त्यांतील तात्पर्य मनावर चांगलें विंवतें. ह्या कवीचे नेत्र गेल्यावर त्यानें 'केसरीचें अंधत्व' म्हणून एक मार्मिक स्फुट कविता लिहिली आहे. ह्या कवींतील मोठा दोष म्हटला म्हणजे नवीनांबद्दलची त्यांची दोषैकदृष्टि हा होय. या दृष्टींतील एकांगीपणाचा कळस तर त्यांच्या सुधारणावारणांकुशामध्यें झाला आहे." (ना. म. भिडे; 'अर्वाचीन मराठी कवि व काव्यें,' विविधज्ञानविस्तार निबंधावली ग्रंथ १, पृष्ठ १७१.)

**'के. स. रि.'चें वाङ्मयः**—( १ ) शिवछत्रपति–काव्य भाग १, १८८७; ( २ ) वसंतकोकिला कादंबरी, १८७६; ( ३ ) यशवंत चरित्र, १८७०; ( ४ ) सुधारणावारणांकुश, १८९४ ( ५ ) व्यवहार–पद्यसहस्र, १८८४; ( ६ ) पद्यात्मक स्वदेश–कल्याण चंद्रिका, किर्तनपर कथा, भाग १–४.

**केळकर सदाशिव पांडुरंग**–[१८४८–१९०६] ब्राह्मधर्ममतप्रचारक. यांचा जन्म पुणें जिल्ह्यांतील चाकण गांवीं झाला. पुण्यास बाबा गोखले यांच्या शाळेंत मॅट्रीकपर्यंत शिक्षण घेतलें परंतु परीक्षा पास झाले नाहींत. हे पुढें प्रार्थनासमाजी बनून मतप्रसाराचें काम करूं लागले. 'ज्ञानदीप' नांवाचें प्रार्थनासमाजाच्या विचारसरणीचें मासिक ते कांहीं वर्षें चालवीत असत.

**केळकरांचें वाङ्मयः**—( १ ) मुंबईतील हिंदु मुसलमानांचा दंगा, १८९३; ( २ ) हरिकीर्तन, १८८४.

**चरित्रः**—सदाशिव पांडुरंग केळकर, प्रार्थनासमाजाचा इतिहास, पृष्ठ १५३–१७६.

**खरे गणेश सखाराम**—[मृत्यू १९२२] गणिती व इतिहाससंशोधक. सरकारी इंजिनियरिंग खात्यांत हे इंजिनियर होते. यांचा इतिहासाचा व्यासंग चांगला होता. 'शिवकालीन जंत्री' हें यांचें पुस्तक ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचें आहे.

**गर्दे खंडो कृष्ण**—[१८४८–१९२६] वेदांती व कवि. शिक्षण खात्यांत यांनीं नोकरी केली. गाढा अनुभवी वेदांती म्हणून यांची ख्याति होती.

**गर्दे यांचें वाङ्मयः**—(१) विजनपुरी–काव्य, १८८५; (२) पंचदशी सार्थ; (३) गीतापंचदशी, १८८४; (४) गीतामृतशतपदी, १८९०; (५) ब्रह्मसिद्धांतमाला, १९१०.

**गाडगीळ कृष्णाजी परशुरामः**—[१८४८–१८९६] इंग्रजी ग्रंथांचा भाषांतरकार. कांहीं वर्षें पुणें हायस्कुलांत शिक्षकाचें काम करून कंटाळा आल्यामुळें वकिली करूं लागले. १८८१ सालीं हे न्यायखात्यांत मुन्सफ झाले. 'कॅटेलाइन विरुद्ध सिसरोच्या दोन भाषणांचें भाषांतर,' (१८९१) व 'संसारसुख' (१८९३) अशीं त्यांनीं दोन पुस्तकें लिहिलीं. 'संसारसुख' हें सर जॉन लबकच्या 'प्लेझर्स ऑफ लाइफ' या ग्रंथाचें भाषांतर आहे. या पुस्तकाची उत्कृष्ट भाषांतरांत गणना केली जाते. गाडगीळ मराठीप्रमाणें इंग्रजींतहि सुंदर लिहीत.

**गुरुजी कृष्णाजी आबाजी** [मृत्यु १९२३] लो. टिळकांचे पहिले चरित्रकार व गोरक्षणाचे पुरस्कर्ते. हे कांहीं वर्षें पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटमध्यें होते. पुढें हे काशीस जाऊन राहिले. ते 'कालिदास' नांवाचें वर्तमानपत्र चालवित असत. त्यावर सरकारनें खटला भरल्यानें तें बंद पडलें व गुरुजी दक्षिणेंत निघून आले. इकडे आल्यावर त्यांनीं गोरक्षणाचें कार्य हातीं घेऊन तद्विषयक बरेंच वाङ्मय लिहिलें.

**गुरुजींचें वाङ्मयः**—(१) माधवाचार्य चरित्र, १८९८; (२) गोरक्षण १८९१; (३) पिरली, १९०२; (४) गणेशोत्सव १९०२; (५) विजयादशमी; (६) गाईचा अनुभव, १९०३; (७) बाळ गंगाधर टिळक यांचें चरित्र, १९०६; (८) गोरक्षण कां केलें पाहिजे ? १९०९; (९) गोरक्षण कसें करावें ? १९०९; (१०) नाट्यकलेची उत्पत्ति, नाटकाचीं स्थित्यंतरें, १९१४; (११) वागरगडचा सुभेदार–नाटक, १९१५.

# चरित्रसूचि


| | पृष्ठ |
|---|---|
| अनंततनय .... .... | १ |
| आगरकर गोपाळ गणेश ... | २ |
| आगाशे गणेश कृष्ण ... | ३१ |
| आगाशे गणेश जनार्दन ... | ३२ |
| आठल्ये कृष्णाजी नारायण | ३४ |
| आपटे वासुदेव गोविंद .... | ३७ |
| आपटे गोविंद विनायक ... | ३११ |
| आपटे महादेव चिमणाजी | ३११ |
| आपटे विष्णू गोपाळ ... | ३११ |
| आपटे हरि नारायण .... | ४२ |
| आचार्य कृष्णाजी वामन ... | ३११ |
| इस्लामपूरकर वामनशास्त्री | ३१२ |
| उदास यशवंतराव आनंदराव | ५४ |
| ओक जनार्दन विनायक ... | ५५ |
| ओक वामन दाजी ... | ५६ |
| ओक विनायक कोंडदेव ... | ५८ |
| करंदीकर विनायक जनार्दन | ५९ |
| करंदीकर बाळकृष्ण शंकर ... | ३१२ |
| काथवटे आबाजी विष्णू ... | ३१२ |
| कानिटकर गोविंद वासुदेव | ६४ |
| कानिटकर नारायण बापूजी | ६६ |
| काळे त्र्यंबक गुरुनाथ ... | ६७ |
| किर्लोस्कर बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णा | ६८ |
| कीर्तने विनायक जनार्दन .... | ७७ |

| | पृष्ठ |
|---|---|
| कीर्तने नीळकंठ जनार्दन .... | ८३ |
| कीर्तिकर कान्होबा रणछोडदास | ८४ |
| कुंटे महादेव मोरेश्वर .... | ८६ |
| केतकर व्यंकटेश बापूजी ... | ९६ |
| 'के. स. रि.' ... .... | ३१३ |
| केशवसुत ... ... | ९८ |
| केळकर नारायण चिंतामण | १७६ |
| केळकर वासुदेव बाळकृष्ण | १७७ |
| केळकर सदाशिव पांडुरंग ... | ३१३ |
| कोल्हटकर अच्युत बळवंत | १८० |
| कोल्हटकर महादेवशास्त्री .... | १७७ |
| कँडी टॉमस .... ... | १९५ |
| खरे वासुदेव वामनशास्त्री ... | १९८ |
| खरे गणेश सखाराम ... | ३१४ |
| गडकरी राम गणेश .... | २०२ |
| गर्दे खंडो कृष्ण ... ... | ३१४ |
| गाडगीळ कृष्णाजी परशुराम | ३१४ |
| गायकवाड सिताराम रामचंद्र | २२० |
| गुणे पांडुरंग दामोदर ... | २२१ |
| गुंजीकर रामचंद्र भिकाजी ... | २२३ |
| गुरुजी कृष्णाजी आबाजी ... | ३१४ |
| गोखले कृष्णाजी केशव ... | २२६ |
| गोगटे गणेश वामन ... | २२७ |
| गोडबोले कृष्णशास्त्री ... | २२८ |
| गोडबोले परशुराम बल्लाळ ... | २३० |

| | पृष्ठ |
|---|---|
| गोडबोले रघुनाथ भास्कर | २३३ |
| गोविंद ... ... | २३४ |
| गोळे महादेव शिवराम ... | २३६ |
| घाटे दत्तात्रय कोंडो ... | २३७ |
| चांदोरकर गोविंद काशिनाथ | २४२ |
| चिटणीस मल्हार खंडेराव ... | २४२ |
| चिपळूणकर कृष्णशास्त्री ... | २४२ |
| चिपळूणकर लक्ष्मण कृष्ण ... | २४४ |
| चिपळूणकर विष्णु शास्त्री .... | २४४ |
| चिपळूणकर विष्णु गोविंद .... | २७७ |
| चिंतामणिपेठकर पांडुरंग व्यंकटेश .... | २७७ |
| छत्रे केरो लक्ष्मण .... | २७८ |
| छत्रे सदाशिव काशिनाथ ... | २७९ |
| जांभेकर बाळशास्त्री ... | २८० |
| जोग विष्णुबुवा ... | २८५ |
| जोशी अण्णा मार्तंड ... | २८६ |
| जोशी पुरुषोत्तम बाळकृष्ण | २८६ |
| जोशी महादेव मल्हार ... | २८७ |
| जोशी बापु पुरुषोत्तम ... | २८८ |
| जोशी रामचंद्र भिकाजी .... | २८८ |
| टिपणीस गोविंद गोपाळ .... | २८९ |
| टिळक नारायण वामन .... | २९२ |


REFBK-0004383